म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२७३०

कर-स्मारक-ग्रंथ

भाग १ ला

# साहित्य-गौरव

( विद्वानांचा लेखसंग्रह )

संपादक

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे

गजानन त्र्यंबक बगदे ( कुळकर्णी

REFBK-0007164

मूल्य ८ रुपये

श्री. पांगारकर–स्मारक-ग्रंथ

# भाग १ ला

# साहित्य–गौरव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ......... वि: .........
क्रमांक ......... नों. दि. .........

डॉ. ... 
गजानन ... णी )

REFBK-0007164

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ०७६४

मूल्य ८ रुपये

प्रकाशक—गजानन त्र्यंबक बगदे ( कुळकर्णी )
कार्यवाह, श्री. पांगारकर स्मारक-मंडळ
२०६० शुक्लवाडा, दिल्ली दरवाजा, नासिक

( सर्व हक्क पां. स्मारक मंडळाधीन )

मुद्रक—श्री. बाळकृष्ण भाऊराव जोशी
ज्ञानविलास प्रेस, पुणें २.

...8.3.8.... वि: ......
[redacted] ...२३...... ... दि. ...

# स्मृति–समर्पण

[ वृत्त– शार्दूलविक्रीडित ]

भाषा भव्य मराठि माय अमुची, अभ्यासुनी सुंदर ।
यत्नें वाङ्मय संत–ग्रंथ रचुनी, जो शोभवी मंदिर ॥
काया, वाणि तसें निरंतर मना, जो कष्टवी सुकृतीं ।
ऐशा 'लक्ष्मण रामचंद्र' कविची,केव्हां न हो विस्मृती ॥१॥

शोभे ज्यांस ' समर्थ ' थोर पदवी, राष्ट्रीं मराठ्यांचिया ।
त्यांचें कार्य करावया झिजविली, काया जयें निर्भया ॥
लोकांना उपदेशिली हरिकथा, गंगौघ चाले जसा ।
श्रोत्यांना जणु वाटलें मलिनता, नाशावया आरसा ॥२॥

यासाठीं करुनी प्रबंधरचना, सुज्ञें जनें सांप्रत ।
त्यांचे थोर विचार आज रसिकां, केले तुम्हां अर्पित ॥
व्हावा तो उपयोग फार इतुकी इच्छा मनीं राहिली ।
लाभो ती परिपूर्णता हरिकृपें, 'स्मृत्यंजली' वाहिली ॥३॥

—श्री. पांगारकर स्मारकमंडळ, नासिक.

# प्रकाशकाचे दोन शब्द

**झालें पुनीत जीवन, संतसमागमिं सदैव बहु रमला ।**
**श्रीमयूरभक्त कविला, प्रेमादरें अर्पिली सुमनमाला ॥**

—त्र्यंबकतनय.

महाराष्ट्रशारदेच्या कृपाप्रसादानें व श्री. पांगारकर स्मारकमंडळाच्या वतीनें श्री. पांगारकर-स्मारक-ग्रंथ, भाग १ ला ' साहित्य-गौरव ' नामक विद्वानांचा ' संतवाङ्मयविषयक लेखसंग्रह ' मराठी वाचकांच्या हातीं देण्यास स्मा. मं. च्या सभासदांस अत्यानंद होत आहे. श्री. पांगारकर स्मा. मंडळ स्थापन होऊन आज आठ वर्षें होत आलीं. या दीर्घ मुदतीच्या कालांत गु. पांगारकर यांचें लहानसें हें वाङ्मयीन स्मारककार्य यापूर्वींच मूर्त स्वरूपांत यावयास पाहिजे होतें. परंतु तसें तें झालें नाहीं याबद्दल स्मा. मंडळास अत्यंत खेद होत आहे. हा वाङ्मयगुच्छ मराठी भाषिकांच्या हातीं देण्यास जो विलंब होत आहे, याला युद्धजन्य परिस्थिति कारणीभूत झाली हें सर्वांना विदित आहेच. आणखी असें कीं, साहित्यप्रकाशनाचें यंत्र, मंत्र नि तंत्र ज्यांच्या हातीं आहेत, अशा श्रीलक्ष्मीसरस्वतीच्या पुत्रांनीं या सत्कार्याला त्वरित साहाय्य न देतां उलट दाखविलेली उपेक्षाबुद्धि हेंहि एक कारण आहेच. कांहीं जरी असलें तरी गुरुवर्य पांगारकरांनीं अर्धशतकभर आपल्या प्रासादिक वाणी—लेखणीनें महाराष्ट्र सारस्वताची केलेली ही नयनमनोहर पूजा मराठी वाङ्मयरसिकांच्या नि पंडितांच्या आदराला व मान्यतेला पात्र झालेली आहे; हें पाहून आत्यंतिक समाधान वाटतें. 'अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ', अशा ह. भ. प. पांगारकरांनीं आपल्या आयुष्यभर केलेली प्रचंड ग्रंथनिर्मिति ' व स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म व स्वसंस्कृतिप्रभृति महत्त्वाच्या विषयांवर शतक—सहस्रांनीं मापन करतां येईल इतकीं प्रवचनें, कीर्तनें, व्याख्यानें देऊन त्या थोर पूर्वजांचा, संतजीवनाचा नि संतकार्याचा संदेश जनमनावर बिंबविण्यासाठीं जे अविश्रांत परिश्रम घेतले, त्याबद्दल कृतज्ञ

महाराष्ट्रजनता ' आचंद्रार्क ' भक्तिविनम्रभावानें या साहित्यलक्ष्मणास आदरांजलिच सतत वहात राहील, यांत संदेह नाहीं. उशिरानें का होईना, हा ' साहित्यगौरव ' ग्रंथ त्यांचे स्नेही, चहाते व मराठी भाषिकांचे हातीं पडत आहे, हें महाराष्ट्राचें सुदैव समजलें पाहिजे.

बृहन्महाराष्ट्रांतील निरानिराळया वृत्तपत्रांतून प्रसिद्धिलेल्या स्मारक-मंडळाच्या विनंतिपत्रकाला अनुसरून वडोदें येथील पांगारकरांचे स्नेही श्री. अनंत नरहर महाजन यांनीं प्रथम आपली शंभर रुपयांची देणगी पाठवून कार्यारंभीं श्री. गणपतीपूजन केलें. या प्रकाशनकार्यास मोठें साहाय्य दिलें याबद्दल स्मा. मं. त्यांचें अत्यंत ऋणी आहे. तसेंच पुणें येथून श्रीमंत सरदार बापूसाहेब विंचूरकर, श्रीमंत गिरजाबाईसाहेब विंचूरकर, व श्रीमंत सरदार नारायणराव गणपतराव तथा भय्यासाहेब विंचूरकर यांनीं प्रत्येकीं ५१ रु. पाठविले आणि रावबहादूर डॉ. मोनेसाहेब विंचुर, अमरावतीचे प्रख्यात वकील श्री. भाऊसाहेब पांगारकर व विंचूरचे श्री. वि. व्यं. कचोळे यांनीं प्रत्येकीं ५० रु. पाठवून या प्रकाशननिधिकार्यास उत्तेजन दिलें हें नमूद करण्यास आनंद वाटतो. विंचुराहून श्री. विष्णु व्यंकटेश कचोळे, यवतमाळहून डॉ. य. खु. तथा अप्पासाहेब देशपांडे यांनीं प्रकाशननिधि गोळा करून पाठविला व या ग्रंथप्रकाशनकार्यास जोराची चालना दिली, याबद्दल स्मा. मं. त्यांचें फारच आभारी आहे. आपल्या सवडीप्रमाणें मजबरोबर फिरून श्रीयुत वि. वा. चांदोरकर कार्यवाह यांनीं स्मारकनिधि मिळविण्यास जें साहाय्य दिलें त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें हें स्मा. मं. चें कर्तव्यच आहे.

नागपूरचे डॉ. वि. भि. कोलते यांनीं आपला ' महानुभावतत्त्वज्ञान ' हा निबंध व २५ रु., तसेंच धुळयाचे श्री. वि. ह. निजसुरे यांनीं ' मोरोपंतांचें आर्याभारत' हा निबंध व ११ रु., श्री. बा. भा. जोशी पुणें यांनीं २५ रु. ग्रंथप्रकाशनकार्यास देऊन स्मा. मंडळास उपकृत केलें याबद्दल स्मा. मंडळ या विद्वानांचें अत्यंत ऋणी आहे.

आमची सुशील नि सुविद्य पत्नी कै. सौ. शारदाबाई यांनीं श्री. पांगारकर स्मा. मं. स्थापन केल्यापासून दि. २४।११।४८ इ. रोजीं त्या अकालीं

कैलासवासी होईपर्यंत, स्मा. मं. च्या कार्यालयाची व्यवस्था मोठ्या उत्साहानें व दक्षतेनें ठेवली नि या स्मारक–कार्यास त्यांनीं तनुमनानें जें बहुमोल साहाय्य दिलें त्याबद्दल त्यांचें पुण्यस्मरण करून त्यांच्या पवित्र आत्म्यास धन्यवाद देणें हें स्मा. मं. चें कर्तव्यच आहे व त्याप्रमाणें तें बजावलेंहि.

येथील जुन्या पिढींतील नामवंत साहित्यिक, ह. भ. प. पांगारकरांचे स्नेही, स्मा. मं. चे सदस्य श्री. विश्वनाथ नारायण वाड यांनीं स्मा. मंडळातर्फें केलेल्या विनंतीला मान देऊन 'स्मृति–समर्पण' ही कविता ताबडतोब तयार करून दिली, याबद्दल स्मा. मं. त्यांचें हार्दिक आभारी आहे.

तसेंच पुणें येथील श्रीसंतवाङ्मयभक्त व ज्ञानविलास मुद्रणमंदिराचे मालक श्री. बाळकृष्ण भाऊराव जोशी यांनीं 'साहित्य–गौरव' ग्रंथाची अंतर्बाह्य छपाई सुंदर, मनोवेधक नि आस्थेवाईकपणानें करून दिल्याबद्दल त्यांचे व मुद्रणमंदिराचे तरुण, विद्वान्, ग्रंथकार्यदक्ष असे व्यवस्थापक श्री. मधुकर बाळकृष्ण जोशी, बी. ए. यांनीं ग्रंथाचीं मुद्रितें तपासून जें साहाय्य दिलें याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानणें हें मी आपलें कर्तव्य समजतों.

महाराष्ट्र रसिकजन ह. भ. प. पांगारकर यांच्या स्मारक-ग्रंथाचें, 'साहित्य-गौरवा'चें कौतुक करून यापुढील ग्रंथकार्यास उत्तेजन देतील अशी आशा व्यक्त करतों.

शेवटीं ज्याच्या कृपाबलानें व प्रेरक शक्तीनें या स्मारक-ग्रंथाचें कार्य हातावेगळें होऊन वाचकांच्या हातीं हा ग्रंथ पडत आहे, त्या सर्वशक्तिमान्, सर्वांतर्यामी, सच्चिदानंदरूप, स्थिरचरव्यापी अशा परमेश्वराला शतशः वंदन करून हें लहानसें निवेदन संपवितों.

ॐ तत्सत् !

कार्यालय
श्री. पांगारकर स्मा. मंडळ, नाशिक
( हनुमज्जयंती, शके १८७१ )

संतचरणरज,
**ग. त्र्यं. बगदे** ( कुळकर्णी )
कार्यवाह.

७८
९१४

# प्रस्तावना.

पांगारकर स्मारक समितीतर्फे स्मारकग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. त्याला पुरस्कारार्थ मी चार शब्द लिहावे अशी सूचना या ग्रंथाचे विद्वान् संपादक व माझे परमप्रिय मित्र. रा. यशवंत खुशाल उर्फ आप्पासाहेब देशपांडे व ग्रंथाचे प्रकाशक रा. गजाननराव बगदे यांनीं केली. इतर महत्त्वाच्या कामांमुळें हें काम करण्यास मला वेळ मिळणार नाहीं हें मी त्यांना मोठ्या नाखुशीनें व नम्रतेनें लिहून कळविलें. पण रा. बगदे यांनीं आपला आग्रह वरील उत्तरानंतरही सुरूच ठेवल्यामुळें मला निरुपायास्तव त्यांच्या सूचनेस मान्यता द्यावी लागली.

या स्मारकग्रंथाला 'साहित्यग्रंथगौरव' हें नांव देण्यांत आलें आहे. यांत नामांकित साहित्यसेवकांनीं लिहिलेले १६ लेख आहेत. त्यांतील आचार्य श्रीराम गोसावी यांचा पहिला लेख 'व्यक्ति आणि वाङ्मय', 'संतचरित्रकार पांगारकर' हा अवधूत जोशींचा १० वा लेख आणि वि. बा. आंबेकर यांचा 'आत्मवृत्त व ह. भ. प. पांगारकर' हा शेवटला १६ वा लेख हे तीन कै. वा. पांगारकरांचें व्यक्ति व वाङ्मय यासंबंधाचे आहेत. इतर १३ लेख निरनिराळ्या साहित्यिक विषयावर आहेत. त्यांतील प्रतिपाद्य विषयांचा संबंध एका अर्थी कै. वा. पांगारकरांच्या जीवितकार्याशीं निगडित आहेच; कारण त्यांतील प्रत्येकांतून महाराष्ट्रांतील संतवाङ्मयाच्या कोणत्या ना कोणत्या अंगाचा उहापोह करण्यांत आला आहे.

रा. पेंडसे यांचा 'ज्ञानेश्वराची भूमिका' हा तिसरा लेख, प्रोफेसर दाण्डेकर यांचा 'भागवतधर्म' हा ११ वा लेख, प्रो. कोलते यांचा 'महानुभाव तत्त्वज्ञान' हा ४ था लेख व वे. शा. सं. नरहर सदाशिव जोशी ऊर्फ खरशीकर शास्त्री यांचा 'ह. भ. प. पांगारकरांचें भागवतधर्मकार्य' हा लेख हे तात्त्विक विवेचन करणारे आहेत.

अकोलकर यांचा 'संत कवयित्रींचें ओझरतें दर्शन' हा ८ वा आणि डॉ. कमलाबाई देशपांडे यांचा 'अपौरुषेय वाङ्मय' हा ९ वा लेख हे लेख

साहित्यांतील स्त्रियांच्या पारमार्थिक नि व्यावहारिक प्रभावी जीवनांतील कृतींचा पुरस्कार करणारे आहेत.

उरलेले लेख निजसुरे यांचा नं. २ चा ' मोरोपंतांचें आर्याभारत ', ' निरंजन माधव ' हा पंगूंचा ५ वा लेख, चिं. नी. जोशी यांचा ' सांप्रदायपरिमळाचा कर्ता कोण ' हा ६ वा लेख व कविवर्य मुक्तेश्वरावरील सबनीस यांचा ७ वा लेख हे संतसाहित्यविषयक आहेत.

हे सर्व लेख प्रथितयश साहित्यिकांच्या व त्या त्या विषयांच्या तज्ञांच्या लेखणींतून उतरले असल्यामुळें कै. वा. पांगारकरांसारख्या नामवंत साधू-साहित्यसेवकाच्या स्मारक-ग्रंथांत सर्वस्वीं संग्राह्य असेच आहेत हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

इंग्रजी अमदानी सुरू होण्यापूर्वी मराठी भाषेंत जें वाङ्मय होतें तें प्रायः काव्यरूप होतें. मुकुंदराज-ज्ञानेश्वरांपासून तों महिपतीपर्यंत शेंकडों कवींनीं आपल्या प्रासादिक ग्रंथांनीं मराठी भाषेस भूषविलें. पण पारमार्थिक दृष्टि समोर ठेवून व स्वत्वाचा विसर पाडून ज्यांनीं ग्रंथरचना केली त्यांनीं स्वतःचे चरित्रासंबंधानें आपले ग्रंथांतून बहुशः कांहींही उल्लेख केला नाहीं व क्वचित् केला असला तरी तो फारच संक्षिप्त असा असायचा. महिपती-सारख्या भगवद्भक्तानें मोठे परिश्रम करून या संतकवींसंबंधानें जी माहिती दंतकथांतून सांप्रदायिक वर्गांतून प्रचलित होती ती संतविजय, भक्तिविजय इत्यादि ग्रंथांतून ग्रथित केली हे त्याचे मराठी वाचकांवर महदुपकार आहेत.

सुरू इंग्रजींत परशुरामतात्या गोडबोले इ. पंडितांच्या उद्योगामुळें ' नवनीता ' सारखा ग्रंथ प्रसिद्ध झाला व त्यांत वरील महिपत्यादिक संत-चारित्रकारांचे ग्रंथाधारें लहानशा टीपा देऊन कवींच्या जीवनचरित्राचाही परिचय करून देण्यांत आला होता. इतिहास व काव्य यांच्या संशोधना-संबंधानें एक प्रकारचा उत्साह सुशिक्षित व जुने पंडित यांतही उत्पन्न झाला होता. प्राचीन मराठी काव्येतिहासाचा उद्धार करण्याकरितां मासिकें काढण्यांत आलीं. निबंधमालाकारानें आपल्या प्रभावी लेखणीनें मराठी वाङ्मयाच्या उद्धाराकडे महाराष्ट्रांतील तरुणांचें लक्ष वेधलें. संतकवींच्या कृतींच्या

आवृत्याहि निघावयास लागल्या व त्याबरोबरच कांहीं संतांचीं किरकोळ चरित्रें लिहून छापलीं गेलीं. या सर्व कार्यांत काव्येतिहाससंग्रहांतून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांखेरीज बाकीचे ग्रंथ हे कोणत्याही संशोधनाशिवाय हातीं असलेल्या एखाद्या जुनाट हस्तलिखित बाडाचें मुद्रणांकित रूप होतें. त्यांत संशोधनाचा व चिकित्सक पद्धतीचा बहुशः अभाव होता.

माझ्या मतें पांगारकरांनीं प्रसिद्ध केलेलें 'मोरोपंतांचें चरित्र' हाच मराठी वाङ्मयांत चरित्रसाहित्य जमवून व चिकित्सक पद्धतीनें विचार करून लिहिलेला मराठी कवींचा आद्य चरित्र-ग्रंथ आहे. १८९८ त ते बी. ए. झाले. १९०८ मध्यें त्यांनीं हा चरित्र-ग्रंथ प्रसिद्ध केला. दरम्यानच्या १० वर्षांत व त्याचेही पूर्वीं कांहीं वर्षें त्यांनीं मराठी इतिहास व संतकवी यासंबंधानें अनेक लेख व व्याख्यानें दिलीं. पुढें उदरनिर्वाहाकरितां जरी त्यांनीं शिक्षकाचा व्यवसाय कांहीं वर्षें केला तरी पुढें लवकरच त्यांनीं आपणास संतवाङ्मयास वाहून घेतलें. ते वारकरी सांप्रदायांत शिरले व पुढील सर्व आयुष्य त्यांनीं संतांच्या वाङ्मयाच्या अभ्यासांत, भक्तिमार्ग व वारकरी सांप्रदाय यांच्या तत्त्वाच्या विवेचनांत आणि संतांच्या चरित्राच्या लेखनांत काढलें. त्याच काळांत त्यांनीं मराठी वाङ्मयाच्या इतिहासावर ग्रंथरचना केली; पण ती अपूर्णच राहिली. त्यांनीं एक आत्मचरित्राचा ग्रंथही प्रसिद्ध केला.

ही त्यांची वाङ्मयसेवा बहुमोल आहे. त्यांनीं संशोधन करून व लिहून प्रसिद्ध केलेल्या चरित्र-ग्रंथांत तुकारामचरित्र हा ग्रंथ लोकप्रिय झालेला होता.

समाजांत जी धर्मश्रद्धा अनेक कारणानें डळमळीत झाली आहे ती पुनश्च दृढमूल करण्याकरितां त्यांनीं संतांच्या प्रासादिक वाणीचा मोठ्या कुशलतेनें व आस्थेनें उपयोग केला. सत्पुरुषांचें समाजोन्नतींत एक उच्च व अचल स्थान आहे हा विचार लोकांच्या मनावर ठसविण्याचा त्यांनीं महनीय उद्योग केला व महाराष्ट्रांत एक शंकर श्रीकृष्ण उर्फ नानासाहेब देव सोडून संतवाङ्मयाकरितां व भागवतधर्माकरितां कायावाचामनानें झटणारा त्यांच्याइतका तळमळीचा ध्येयनिष्ठ असा दुसरा महाराष्ट्रीय पदवी-धर झाला नाहीं. पांगारकरांचें वैशिष्ट्य यांत आहे. त्यांच्या लेखांत दोष

आहेत, पूर्वग्रहदूषित विधानें आहेत, तर्कशुद्ध पद्धतीस न पटणारीं अनुमानें आहेत हें जरी मान्य केलें, तरी त्यांत एक प्रकारची तळमळ आहे. मोहिनी, आकर्षकता व विलक्षण प्रवाहित्व आहे. त्यामुळें त्यांची ग्रंथबद्ध ओघवती वाणी ही मराठी वाङ्मयाच्या व महाराष्ट्र समाजाच्या धार्मिक इतिहासलेखकास सर्वदा अभ्यसनीयच राहील.

अशा या थोर साहित्यलेखकाच्या पूज्य स्मृतीच्या गौरवार्थ जो ग्रंथ प्रसिद्ध होत आहे, तो संतकाव्याभ्यासाची प्रथा या महाराष्ट्रांत चिरस्थायी व प्रभावी करण्यास अंशतः तरी कारणीभूत होईल असा मला विश्वास वाटतो. पांगारकरांच्या संतप्रेमी आत्म्याचें पूजन करण्याचा तोच खरा मार्ग होय.

पाटणा,
ता. ११ एप्रिल १९४९.

माधव श्रीहरि अणे

# संपादकीय निवेदन

निष्ठा स्वधर्मकार्यीं भाषा वाङ्मयिं तशीच संतजनीं ।
' साहित्य-लक्ष्मणा' ला प्रेमें वाखाणिती सदा ज्ञानी ॥ १ ॥

—त्र्यंबकतनय.

' पांगारकर स्मारक मंडळ, नाशिक ' या संस्थेनें योजिलेल्या ' पांगारकर स्मृतिग्रंथां- ' पैकीं हा ' साहित्य-गौरव ' नांवाचा पहिला ग्रंथ मराठी भाषा आणि वाङ्मय यांची आवड असणाऱ्या रसिकांसमोर ठेवण्यास मंडळाच्या सभासदांना समाधान वाटत आहे. कै. ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं ' संतवाङ्मया- ' ची सेवा हें आपल्या आयुष्याचें ध्येय ठरवून आपल्या रसाळ आणि मनोवेधक वाणीनें संतवाङ्मयावर महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेरही हजारों व्याख्यानें दिलीं. अनेक काव्यग्रंथांचें संशोधन करून तें विचिकित्सक पद्धतीनें संपादन करून प्रसिद्ध केलें, निरनिराळ्या प्रमुख कवींवर आणि त्यांच्या वाङ्मयावर विवेचनात्मक ग्रंथ लिहिले. अशी विविध प्रकारची वाङ्मयसेवा करून मराठी वाङ्मयाला समृद्ध केलें. त्यांनीं निर्माण केलेली ग्रंथसंपत्ति हें तर त्यांचें स्मारक आहेच आणि मराठी भाषा जिवंत आहे तोंवर तें चिरंतन राहीलच; तथापि मराठी भाषाभिमानी महाराष्ट्रीय जनतेनें कै. पांगारकर यांचें स्मारक करणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

कै. ह. भ. प. पांगारकर यांच्या आयुष्यांतील बराचसा अंतिम भाग नाशिक शहरांत वास्तव्य करून व्यतीत झाला. तेथेंच त्यांची बरीचशी ग्रंथरचना झाली. नाशिक येथील बऱ्याचशा सज्जनांचा त्यांच्याशीं जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झाला होता. तेव्हां त्यांच्या स्मारकासंबंधानें योजना तयार करून ती यशस्वी करण्यांत नाशिककरांनींच पुढाकार घेणें हें क्रमप्राप्तच होतें. कै. पांगारकर ता. १०–११–४१ रोजीं वर्धा येथें दिवंगत झाल्यावर थोड्याच दिवसांनीं नाशिक येथें ता. २५–५–४२ रोजीं

' लोकसत्ता ' सभागृहांत प्रमुख नागरिकांनीं सार्वजनिक सभा भरवून पांगारकर स्मारक-मंडळ निर्माण केलें आणि त्या मंडळामार्फत दरवर्षी पांगारकर-स्मृतिदिन साजरा करण्याचा उपक्रम सुरू झाला. नाशिक येथें महाराष्ट्र साहित्यसंमेलन भरलें, तेव्हां अध्यक्ष आचार्य अत्रे यांचे हस्तें कै. पांगारकर यांचें तैलाचित्र अनावृत केलें. पुढें तें नाशिक नगरवाचनालयांत समारंभानें ठेवण्यांत आलें. अखिल महाराष्ट्रातर्फे एखादें विशिष्ट स्मारक करावयाची योजना मूर्तस्वरूपांत आणण्यापूर्वी, त्याला पोषक म्हणून ' कै. पांगारकर स्मृति-ग्रंथमाला ' प्रकाशित करावी, असा मंडळातर्फे ता. १९-८-४५ रोजीं बोलाविलेल्या सार्वजनिक सभेंत निर्णय घेण्यांत आला आणि ही स्मृति-ग्रंथमाला प्रकाशित करण्याचें कार्य पांगारकर स्मारक मंडळ, नाशिक या संस्थेनें आपल्या शिरावर घेतलें.

प्रस्तुत स्मारक मंडळाचे चिटणीस श्री. गजानन त्र्यंबक बगदे, मुख्याध्यापक नाशिक, हे आहेत. श्री. बगदे हे कै. पांगारकरांचे स्नेही आणि चहाते आहेत. त्यांना कै. पांगारकर यांच्याबद्दल आणि त्यांनीं निर्माण केलेल्या प्रचंड ग्रंथसंभाराबद्दल नितांत आदर आहे. त्यांनीं हें स्मृतिग्रंथाचें कार्य तनमनघनेंकरून अत्यंत निरलसपणें व चिकाटीनें चालविलें आहे. किंबहुना पांगारकर स्मारक मंडळाचे ते एक प्रमुख आधारस्तंभ आहेत. तीन वर्षांपूर्वी मला नाशिक येथें कांहीं विशिष्ट कामाकरितां कांहीं दिवस वास्तव्य करण्याचा योग आला, तेव्हां माझा श्री. ग. त्र्यं. बगदे यांच्याशीं परिचय झाला. त्यांनीं पांगारकर स्मृति-ग्रंथाची योजना ठरविण्याकरितां मंडळाची सभा बोलाविली होती. त्या सभेस हजर राहण्याचें मला मुद्दाम पाचारण केलें होतें. या सभेंत मंडळाच्या सभासदांबरोबर स्मृतिग्रंथासंबंधानें विचार-विनिमय करण्याचा योग आला. प्रस्तुत स्मृतिग्रंथाचे तीन खंड प्रकाशित करण्याचें ठरलें आणि ते ग्रंथ संपादन करण्याचें कार्य मीं अंगिकारावें, म्हणून सभासदांनीं निर्णय घेतला.

कै. पांगारकर हे माझ्यापेक्षां वयानें वडील; परंतु त्यांचा माझा अनेक कारणांमुळें घनिष्ठ संबंध आला.त्यांनीं केलेल्या वाङ्मयसेवेबद्दल मला नितांत आदर आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखनप्रसंगीं थोडें-

बहुत सहकार्य करण्याचाही मला योग आला होता. वाङ्मयाच्या इतिहासाच्या प्रथम खंडांतील महानुभाव वाङ्मयाचा भाग कै. पांगारकर यांनींच लिहिला होता; परंतु तो प्रेसमध्यें जाण्यापूर्वी मी एकदां नजरेखालून घालावा, असें त्यांनीं सुचविलें होतें व ती कामगिरी मीं आनंदानें स्वीकारिली. इतिहासाच्या दुसऱ्या खंडांतील महानुभावीय वाङ्मयविषयक भाग लिहिण्याचें त्यांनीं माझ्याकडेच सोपविलें होतें व तो भाग त्यांनीं ह्या खंडांत शेवटीं परिशिष्टरूपानें माझ्या नांवावरच प्रसिद्ध केला आहे. कै. पांगारकर यांच्या सहवासाचा मला अनेकदां लाभ घडला आहे. तेव्हां पांगारकर स्मृतिग्रंथाचें संपादन करावयाची कामगिरी माझ्या अंगीं पात्रता नसतां केवळ कै. पांगारकरांची सेवा घडावी म्हणून निरनिराळीं कामें अंगावर घेतलीं असतांसुद्धां, केवळ आमचे मित्र श्री. ग. त्र्यं. बगदे यांच्या अविरत सहकार्याच्या भरंवशावरच मीं स्वीकारलें आणि नमूद करावयास आनंद वाटतो कीं, त्यांच्याच सहकार्यानें या स्मृतिग्रंथाचा पहिला खंड ‘ साहित्य-गौरव ’ हा आज हातावेगळा होऊन प्रकाशांत येत आहे.

पांगारकर स्मृतिग्रंथाची स्थूल मानानें रूपरेषा आखण्यांत आली होती ती अशीः—प्रथम खंडः कै. पांगारकर यांनीं ज्या ज्या विषयावर ग्रंथरचना केली, त्या त्या विषयाचे तज्ज्ञ आणि अभ्यासु अशा महाराष्ट्रांतील प्रथितयश साहित्यिकांना विनंती करून त्या त्या विषयावर लेख लिहविणें व ते सर्व लेख एकत्रित करून ‘ साहित्य-गौरव ’ या शीर्षकाखालीं प्रसिद्ध करणें. द्वितीय खंडः कै. पांगारकर यांच्या सर्व ग्रंथांतून विखुरलेलीं त्यांची सुक्तिवचनें एकत्रित करून तीं प्रकाशित करणें. त्याचबरोबर कै. पांगारकर यांच्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध आला, त्यांच्याकडून त्यांच्या आठवणी मागवून त्या प्रकाशित करणें. तिसरा खंडः कै. पांगारकर यांनीं लिहिलेलें परंतु अप्रकाशित असें लिखाण एकत्र प्रकाशित करणें; त्याचप्रमाणें त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या, पण दुर्मिळ अशा महत्त्वाच्या निवडक लेखांचें पुनर्मुद्रण करणें अशी ही स्थूल मानानें रूपरेषा होती.

स्मृतिग्रंथाचा प्रथम खंड जो ‘ साहित्य–गौरव ’ ग्रंथ त्याच्या तयारीसाठीं निरनिराळे विषय आणि त्यांवर ज्यांना लिहावयास सांगावयाचें अशा

तज्ज्ञ आणि अभ्यासु विद्वानांची सभेंतच जंत्री तयार करण्यांत आली. त्या अनुरोधानें निबंध लिहिण्याबद्दल विद्वानांकडे विनंतीपत्रें पाठविण्यांत आलीं व वर्तमानपत्रांतूनही जाहीर विनंती करण्यांत आली. मंडळाच्या विनंतीस मान देऊन सोळा विद्वानांनीं आमच्याकडे सुचविलेल्या त्यांच्या आवडीच्या आणि अभ्यासाच्या विषयांवर लेख लिहून पाठविले. त्यांचीं नांवें पुढें दिलेल्या अनुक्रमाणिकेवरून वाचकांना कळून येतीलच.

ही समग्र यादी वरवर पाहिल्यावरही महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या विद्वानांनींहि आपल्या आवडीच्या आणि अभ्यासाच्या विषयांवर लेख लिहून हा ' साहित्य-गौरव ' ग्रंथ निर्माण करावयास स्मारक मंडळाशीं सहकार्य केलें आहे, ही गोष्ट वाचकांच्या निदर्शनास येईल. या विद्वानांनीं हे लेख लिहून स्मारक–मंडळास आणि तद्द्वारा महाराष्ट्र जनतेस उपकृत केलें आहे.

आमच्या विनंतीस मान देऊन बहुतेक विद्वानांनीं ताबडतोब लेख लिहून आमच्याकडे पाठविले. परंतु ग्रंथ मुद्रित करण्याचें काम अनेकविध अडचणीं-मुळें जवळजवळ तीन वर्षेंपर्यंत दिरंगाईवर पडलें; त्यामुळें अनेक लेखक विद्वानांची गैरसोय आणि कुचंबणा झाली, याबद्दल मंडळास जाणीव आहे. तथापि सद्यःपरिस्थिति लक्षांत घेऊन ते आम्हांस क्षमा करतील असा विश्वास आहे. प्रा. चिं. नी. जोशी तर हा ग्रंथ प्रकाशित झालेला पहावयास विद्यमान् नाहींत, याबद्दल अत्यंत खेद वाटतो !

एक गोष्ट आणखी नमूद करणें अवश्य वाटते, ती ही कीं, याशिवाय आणखीही कांहीं विद्वानांना लेख लिहिण्याबद्दल विनंति केली होती. परंतु वारंवार स्मरणपत्रें पाठवूनही त्यांच्याकडून लेख येऊं शकले नाहींत. त्यांच्या अभ्यासाच्या विषयावरील त्यांचें विद्वत्ताप्रचुर लिखाण या साहित्य-गौरवा-मधून महाराष्ट्र जनतेपुढें ठेवितां आलें नाहीं, याबद्दल मंडळाच्या सभा-सदांचा नाइलाज आहे.

कांहीं लेखांची पृष्ठमर्यादा अपेक्षेपेक्षां जास्त वाढली. त्यामुळें प्रस्तुत ग्रंथ मोठा झाला आहे. लेखकांना साधारणपणें पृष्ठमर्यादा दिली होती, तथापि सर्वस्वीं त्यांच्याच इच्छेवर तें ठेविलें होतें. विषयप्रतिपादनाच्या

भरांत जर कांहीं पृष्ठें वाढलीं तर संपादकीय कात्री लावून लेखाचे स्वारस्यांत कमीपणा आणावयाचा नाहीं, हें धोरण स्वीकारल्यामुळें, लेखकांचे विचार मूळ स्थितींतच वाचावयास मिळत आहेत. लेखकांना आपले विचार अबाधितपणें मांडावयाचें पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें, अर्थात् मतप्रतिपादनाचें उत्तरदायित्वही त्यांच्याकडेच आहे. सांप्रदायपरिमळाचा कर्ता कोण ? यासंबंधीं प्रा. पंगु आणि प्रा. जोशी या उभयतांचीं भिन्न मतें त्यांच्या त्यांच्या साधार विचारसरणीसह वाचावयास मिळतील.

प्रस्तुत वाङ्मयगौरवग्रंथांत कै. पांगारकर यांचें जीवनचरित्र, व्यक्ति आणि वाङ्मय, याशिवाय त्यांनीं ज्या विषयावर ग्रंथरचना केली त्या विषयांवरील तज्ज्ञ विद्वानांचे अभ्यासपूर्ण लेख यावेत, अशी योजना आंखल्यामुळें, या ग्रंथाच्या द्वारें साहित्यिक अशा कै. ह. भ. प. पांगारकर यांचें संपूर्ण दर्शन घडावें, असा स्मारकमंडळाचा उद्देश होता. तो बऱ्याच अंशानें साध्य झाला, असें ग्रंथ वाचल्यानें वाचकांस कळून येईल.

लो. ना. नामदार बापूजी अणे दीड वर्षांपूर्वी नाशकास असतांना, मंडळाचे चिटणीस श्री. ग. त्र्यं. बगदे यांनीं स्मारक-ग्रंथाची आणि त्यावर योजलेल्या कै. पांगारकरांच्या स्मारकाची कल्पना त्यांना निवेदन केली. ती त्यांना पसंत पडली. त्यांनीं या ' साहित्य-गौरव ' ग्रंथास प्रस्तावना लिहिण्यास संमति दिली. कै. पांगारकर यांचा लो. ना. बापूजी अणे यांच्याशीं फार पूर्वीपासून स्नेहसंबंध होता. सन १९०६ च्या सुमारास हे दोघेही अमरावती येथें प्रायव्हेट हायस्कूलमध्यें शिक्षक होते. दोघांनाही आपल्या प्राचीन संस्कृतीचा नितांत आदर. उभयतांचा स्नेहसंबंध कै. पांगारकरांच्या निधनापर्यंत कायम होता. हा ग्रंथ छापून तयार झाल्यानंतर नामदार बापूजी अणे यांच्याकडे पाठविण्यांत आला. नामदार बापूजी यांना बिहार प्रांताचे गव्हर्नर या नात्यानें अनेक महत्त्वाचीं कामें असतांनासुद्धां सवड नसतांही समग्र ग्रंथ वाचून त्यांनीं आपुलकीच्या भावनेनें ग्रंथास प्रस्तावना लिहून दिली त्यामुळें स्मारक-मंडळाच्या कार्यास गौरव प्राप्त झाला आहे. प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल स्मारक मंडळ नामदार बापूजी अणे यांना सादर धन्यवाद देत आहे.

आतां शेवटीं महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें विवेचन करून हें संपादकीय निवेदन पुरें करतों. प्रस्तुत स्मारक-ग्रंथमाला प्रकाशित करणें म्हणजे अखिल महाराष्ट्रातर्फे कै. ह. भ. प. पांगारकर यांचें विशिष्ट स्मारक करण्याची पूर्वतयारी होय. हें स्मारक करावयास लागणारा निधि गोळा करावयास, या स्मारक ग्रंथाच्या विक्रींतून जो पैसा येईल तो त्या निधीचा आरंभ समजण्यांत येईल. त्याचप्रमाणें ग्रंथप्रकाशनास लागणारें द्रव्य अखिल महाराष्ट्रांतील जनतेकडून देणगीरूपानें ग्रंथाची आगाऊ किंमत देऊन आणि ग्रंथ विकत घेण्याचें आश्वासन देऊन, ग्राहक म्हणून नांवें नोंदवून जमा करण्यांत यावयाचा ही कल्पना जाहीर रीतीनें वर्तमानपत्रांतून आणि कांहीं सद्गृहस्थांकडे विनंतीपत्रें पाठवून कार्यास आरंभ केला. चिटणीस श्री. ग. त्र्यं. बगदे यांच्या परिश्रमानें नाशिक शहरांतूनच या कार्यास द्रव्यरूपानें बरेंच उत्तेजन मिळालें. स्वयंस्फूर्तीनेंही या कार्यास बऱ्याच देणग्या मिळाल्या. त्या संपूर्ण ग्रंथ प्रकाशित करावयास जरी पुरेशा नाहींत तथापि कार्यारंभासाठीं उपयोगी पडण्यासारख्या आहेत. स्मारक मंडळास असा विश्वास वाटतो कीं, पां. स्मारक ग्रंथांपैकीं हा ' वाङ्मयगौरव-ग्रंथ ' प्रकाशित झाला म्हणजे महाराष्ट्र रसिक जनता आमच्या या अल्प कार्याचें चीज करील आणि या ग्रंथाच्या विक्रीच्या पैशांतून योजिलेले उर्वरित ग्रंथ प्रकाशित होतील आणि त्यामुळें अखिल महाराष्ट्राचें कै. पांगारकरांचें विशिष्ट स्मारक थोड्याच अवधींत पूर्णत्वास येईल.

तें कार्य लवकरच मूर्त स्वरूपास यावें या हेतूनें हा कै. पांगारकरांचा ' साहित्य-गौरव ' ग्रंथ आणि त्यासंबंधीं हें संपादकीय निवेदन जनता-जनार्दनाच्या चरणीं श्रद्धापूर्वक ठेवीत आहें.

**यशवंत खुशाल देशपांडे,**
शारदाश्रम, यवतमाळ.

श्रीरामनवमी, शके १८७१ ]

**ग. त्र्यं. बगदे ( कुलकर्णी )**
श्री. पां. स्मा. मंडळ, नाशिक

# अनुक्रमणिका


| विषय | लेखक | पृष्ठसंख्या |
|---|---|---|
| सुमनांजलि | ग. त्र्यं. वगदे | १–२ |
| १ पांगारकर व्यक्ति आणि वाङ्मय | आचार्य श्रीराम गोसावी, नाशिक | ३–४८ |
| २ मोरोपंतांचें आर्याभारत | विष्णु हरि निजसुरे, धुळें | ४९–१११ |
| ३ ज्ञानेश्वरीची भूमिका | डॉ. शं. दा. पेंडसे, एम्. ए. नागपूर | ११२–१२२ |
| ४ महानुभावतत्त्वज्ञान | डॉ. विष्णु भिकाजी कोलते एम्. ए. एलएल. बी., पीएच. डी. नागपूर | १२३–१५५ |
| ५ निरंजनमाधवः व्यक्ति आणि वाङ्मय | प्रा. दत्तात्रेय सिताराम पंगू एम्. ए., कोल्हापूर | १५६–१८६ |
| ६ सांप्रदाय परिमळाचा कर्ता कोण ? अर्थातच निरंजनमाधव | प्रा. चिंतामण नीळकंठ जोशी एम्. ए., हैद्राबाद | १८७–२२४ |
| ७ कविवर्य मुक्तेश्वर | श्री पांडुरंग जिवाजी सबनीस एम्.ए. एलएल.बी. नाशिक. | २२५–२७५ |
| ८ संत कवयित्रींचें ओझरतें दर्शन | श्री. ग. वि. अकोलकर एम्. ए., नाशिक | २७६–२९१ |
| ९ अपौरुषेय वाङ्मय अर्थात् अर्वाचीन श्रुति | डॉ. कमळाबाई देशपांडे पीएच. डी., पुणें. | २९२–३५१ |
| १० संतचरित्रकार पांगारकर | प्रा. अवधूत महादेव जोशी एम्. ए., ग्वाल्हेर | ३५२–३८० |


| विषय | लेखक | पृष्ठसंख्या |
|---|---|---|
| ११ भागवतधर्म | प्राचार्य शंकर वामन दांडेकर एम. ए., पुणें | ३८१–४०४ |
| १२ ह.भ.प. पांगारकर यांचें भागवतधर्मकार्य | श्री. नरहर सदाशिव जोशी खरशी, जि. सातारा | ४०५–४१६ |
| १३ मराठी कवितेची इंग्रजी राजवट | प्रा. म. श्री. पंडित, एम.ए. नागपूर | ४१७–४५७ |
| १४ संस्कृत साहित्याचें महत्त्व | पं. श्रीधर अण्णाशास्त्री वारे नाशिक | ४५८–४९० |
| १५ वामनी त्रिविध पराक्रम | श्री. वासुदेवशास्त्री निसाळ संगमनेर, जि. नगर | ४९१–५२८ |
| १६ आत्मवृत्त आणि ह.भ.प. पांगारकर | प्रा. वि. बा. आंबेकर, एम्.ए. नाशिक | ५२९–५५८ |




# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| **प्रकाशकाचे दोन शब्दः–** | | | |
| ५ | १२ | विंचूर, | ( शब्द नको ) |
| **संपादकीय निवेदनः–** | | | |
| १३ | २०।२१ | मुक्तिवचनें | सूक्तिसुमनें |
| **मूळ ग्रंथ** | | | |
| ८ | २४ | आय.सी.एस्. | आय.एम्.एस् |
| ५५ | ६ | रंवी शमनीं | रवी शमनीं |
| ५७ | १ | यांतील | यांत |
| ५७ | ६ | कुतस्त्यात् | कुतस्स्यात् |
| ६४ | १२ | स्मर, हरहरहर | स्मरहर, हरहर |
| ६५ | १७ | तो होता | तो होता असें म्हणते |
| ९१ | १४ | त्रया | त्रपा |
| १३५ | १ | ब्रज्र | ब्रह्म |
| १३९ | ११ | सांघातानें | संघातानें |
| २०१ | २० | प्रतिपा | प्रतिपादन |
| २०८ | २३ | एशी | ऐशी |
| २३१ | शेवटची | मुक्तेश्वरांचे | नाथांचे |
| २३५ | पहिली | असती | नसती |
| २३८ | शेवटची | हीत | गृहीत |
| २४१ | १९ | निर्याणशंका | निर्याणशका |
| २४८ | २२ | भतळीं | भूतळीं |
| २५३ | १५ | ब्राहुलें | बहुलें |
| २५२ | ५ | साहित्यरानीं | साहित्यरत्नीं |
| २५८ | २ | श्रवत | स्रवत |
| २५९ | २२ | षावक | पावक |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| २६४ | ५ | वर्णनाची खुलावट | वर्णनाची खालील खुलावट |
| २६७ | १० | पुसोनी | पुजोनी |
| ३७८ | १३ | कविन्नुवांची | कविळ्वांची |
| ४४१ | २४ | नियमक | निर्यमक |
| ४४८ | शेवटची | पत्नी | पत्री |
| ४४८ | १९ | अहसहकार | असहकार |
| ४५५ | २२ | पा. ना. | वा. ना. |
| ४५६ | १० | ना. घ. | ना. घ. |
| ४७३ | ४ | वचक्षण्यं | वैनक्षण्य |
| ४७६ | ४ | श्रव्य | श्राव्य |
| ४८९ | १९ | आय | आर्य |
| ५२७ | ६ | अन्थयी | अन्वयी |
| ५३५ | २१ | खेककर | खेळकर |
| ५३६ | १८ | दशन | दर्शन |
| ५५८ | ५ | यद्वारा | याद्वारा |



समष्टींत भक्तिप्रेमानंद निर्माण करणारे थोर पुरुष

ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर



ऊर्जस्वल उद्गाता संतांच्या तूं चरित्रकाव्याचा ।
नुरला रसाळ वक्ता नायकही त्या चरित्रचंद्राचा ॥

—कवि विमलप्रभ.

अ. क्र. ...... दि. ......
क्रमांक १२९० ...... १५८५

गुरुवर्य ल. रा. पांगारकर यांस

# सुमनांजलि

( आर्यागीति. )

संतचरित्रें रचिलीं, दिधलीं आपण जनांस गुरुराया। ।
धर्मस्वदेशभाषा यांवरि तुमची अतीव ती माया ॥ १
संतकृपा-प्रसादें, तद्वाङ्मयिं रंगली तुझी वाणी ।
भक्तिरसामृत सेवी, देई इतरां, दुजें मनीं नाणी ॥ २
प्रज्ञा ज्वलंत तुमची, प्रभुगुणगानांत ती रमे नित्य ।
भक्तिरसामृतयोगें, डोलवि प्रभु शिर सहर्ष तो सत्य ॥ ३
कीर्तन-भाषण-भजनें, भक्तिद्रुम पोषिला तुम्हीं राष्ट्रीं ।
प्रेमामृतकुंभ जसे ग्रंथ जनां अर्पिले महाराष्ट्रीं ॥ ४
प्रथम द्वादश वर्षें जनसेवा करुनियां प्रसन्न मनें ।
राष्ट्रियकार्यधुरंधर बा. गं. टिळकांनिं अर्पिलीं सुमनें ॥ ५
भाषा-इतिहासाच्या विषयीं गेलां तुम्ही अती रमुनी ।
त्वद्वाङ्मयमाधुर्यें डोलविला जनसमूह आत्ममनीं ॥ ६
आश्रमभक्ति खरोखर नाथापरि वाटली मला अपुली ।
सन्मार्ग जनां दाउनि उन्नतिची वाट त्यांस दाखविली ॥ ७
सीताराम तसे ते दास गणू सत् गुलाब-सहवासीं ।
रंगुनि गेली तुमची तत्सान्निध्यांत वृत्ति ती खाशी ॥ ८
संतवर्य नारायण, साईबाबा, उपासनी भक्त ।
राहुनि तत्सहवासीं जोडियले त्वां अमूप गुरुभक्त ॥ ९
भट संत पंत पंडित हरिपदरत यांत नित्य ते असती ।
तैसे तुम्हीहि रमलां-प्रभुपदिं चित्तास देउनी सुमती ॥ १०

ब्राह्मणकुल भूषविलें, गाजविल्या त्या प्रचंड साधुसभा ।
डोलाविलें जनवृंदा, तोषविल्या त्या उदंड संतसभा ॥ ११
भारति हिंदुत्वाचा संस्कृतिसंदेश धाडण्या लोकीं ।
झाला बद्धपरीकर, स्थापुनि ना तो 'मुमुक्षु' या लोकीं ॥ १२
अगणित प्रवचनें तुम्हीं तैशीं व्याख्यानकीर्तनें केलीं ।
भगवन्नामस्मरणें अज्ञजनीं जागृती बहू आणिली ॥ १३
'भक्तीमार्गप्रदीपें' गेहीं गेहीं प्रकाश पाडियला ।
भक्तिज्ञानविरागें जनहृदयीं ज्योतिवान्हि चेतविला ॥ १४
सुमति अहिल्या देवी नगरीमध्यें तुम्हांस बोलाविलें ।
राज्ञें आदरिलें अन् दानें देउनि बहूत पूजियलें ॥ १५
झालें कार्य अमर तव, वाङ्मयक्षेत्रीं अपूर्व तें शोभे ।
गौरविलें मित्रजनें मुंबानगरीं प्रभूत यश लाभे ॥ १६
नमिलें पंढरिनाथा पुंडलिकादी अनेक संतांला ।
राहुनि संतसमागमिं घेउनि त्यांच्या अखंड नामाला ॥ १७
यावें पुनरपि येथें अतृप्तचि धर्मकार्य करण्याला ।
करितों मार्गप्रतिक्षा, मी जणुं परिचातका गुरो, तुजला ॥ १८

श्रीसमर्थचरणरज

गजानन त्र्यंबक वगेद

श्री. पांगारकर-स्मारक-ग्रंथ, क्रमांक १

# साहित्य-गौरव

## १. व्यक्ति आणि वाङ्मय

ले.:-आचार्य श्रीराम गोसावी, हिंदुसंस्कृतिज्ञानशाला, नाशिक.

इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं
त्याचा वेलु गेला गगनावरी ॥
मोगरा फुलला मोगरा फुलला ।
फुलें वेचितां अति भारु कळियांसी आला ॥

—श्रीज्ञानेश्वर.

'Chief glory of every people arises from its authors.'

—डॉ. जान्सन.

मानवसंस्कृतीच्या विकासाचें मुख्य गमक भाषा होय. ती भाषा जितकी सुसंस्कृत व तीमधील ग्रंथसंपत्ति जितकी समृद्ध तितका तो मानवपुंज इतर मानवांपेक्षां अधिक सुसंस्कृत व अधिक संपन्न समजला पाहिजे. राष्ट्राची वैभवशाली कीर्ति त्या राष्ट्रांतील ग्रंथकार निर्माण करीत असतात, असे डॉ. जान्सननें आपल्या इंग्रजी भाषेच्या कोषाच्या प्रस्तावनेंत जे उद्गार काढले आहेत, ते अत्यंत सार्थ आहेत. इंग्रजी राजवटींत हिंदुस्थानचें राजकीय स्वातंत्र्य गेलें, पण त्याच्या प्राचीन ज्ञानवैभवाची कीर्ति ते हिरावून घेऊं शकले नाहींत. संस्कृत भाषा व तींतील ज्ञानभांडाराची पाइकी युरोपियन

पंडितांसही करावी लागली. संस्कृत भाषेंतील ज्ञानाची थोरवी पंडित मॅक्समुल्लर, प्रो. मॅकडोनेल, प्रो. मॉनिअर वुइल्यम, जस्टिस सर जॉन वुड्रॉफ यांनीं मुक्तकंठानें केली आहे. गेल्या सहस्रकांतील हिंदुस्थानांतील प्राकृत भाषांचा विस्तार या संस्कृत भाषेचा आधार घेऊनच पंडितांनीं व सन्तांनीं आपापल्या प्रांतांत केला. महाराष्ट्रांतील मराठी भाषेचा उगम व विकास गेल्या सहस्रकांतील प्रारंभापासूनचाच आहे. व संस्कृत ज्ञानभांडार हें अध्यात्मप्राण असल्यानें देशी भाषांतील पाहिली निर्मिति संत मंडळींनीं केलेली धर्मवाङ्मयाचीच आहे.

स्वदेशाभिमानाच्या चळवळी सुरू झाल्याबरोबर महाराष्ट्रांत मालाकार चिपळूणकरांनीं देशी भाषा व तिचें वाङ्मय यांचाही अभिमान सुशिक्षित पदवीधरांत निर्माण केला. तो अभिमान घेऊन संशोधनाच्या दोन परंपरा महाराष्ट्रांत दोन वाङ्मयतपस्व्यांनीं सुरू केल्या. श्री. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं इतिहाससंशोधनाची परंपरा सुरू केली व श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकरांनीं संतवाङ्मयसंशोधनाची परंपरा सुरू केली. आपापल्या क्षेत्रांत दोघांनींही साधनवाङ्मय अमाप धुंडाळलें व प्रचंड ग्रंथ संपादन केले. एकानें देशाचें भौतिक अंग कां ढांसळलें याचा त्याच्या राजकीय सुधाराच्या दृष्टीनें विचार केला, तर दुसऱ्यानें देशाच्या राजकीय अधःपातांतही त्याचा सांस्कृतिक आत्मा कसा शाबूत राहिला याचा नैतिक विचार केला. राजवाड्यांचे मराठी इतिहासाचे साधनखंड त्यांच्या प्रस्तावनेसह पाहिले व पांगारकरांचे मराठी संतवाङ्मयाच्या इतिहासाचे खंड अवलोकन केले तर कोणाच्याही ध्यानांत वरील उक्तीचें प्रत्यंतर सहज येईल.

राजवाड्यांनीं राजकीय इतिहाससंशोधनाचें व पांगारकरांनीं

धार्मिक संत वाङ्मयाभ्यासाचें कार्य अंगीकारलें, तें त्यांच्या पिंडगत भिन्न अभिरुचीप्रमाणेंच होय. महाराष्ट्रांतील देशस्थ ब्राह्मण हा जात्याच धर्मप्रधानवृत्तीचा व भावनाप्रधान आहे. देशावर आलेल्या कोकणस्थ ब्राह्मणाचा पिंड पेशवाईतील राजकारणामुळें राजकारण-प्रधान बनला. एकाची दृष्टि आत्मकल्याणावर तर एकाची दृष्टि देशाच्या राजकीय कल्याणावर खिळलेली. यामुळें राजवाड्यांनीं संशोधनांतही राजकारण केलें व पांगारकरांनीं आपल्या वाङ्मया-भ्यासांत आत्मिक उपासना साधली. दोघेही मुमुक्षु खरे; पण एक राजकीय पारतंत्र्यांतून देशाचा मोक्ष करण्याची इच्छा करणारा व दुसरा प्रकृतीच्या पारतंत्र्यांतून लोकांचा मोक्ष साधूं इच्छिणारा. समाजकल्याणाचें कार्य दोघांनींही वाङ्मयसंशोधनद्वारा व ग्रंथ-लेखनद्वारा केलें.

प्रस्तुत पांगारकरांच्या चरित्राचा व त्यांच्या वाङ्मयाचा ओझरता परिचय आपणांस करून घेणें आहे, तिकडे आपण वळूं. श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचा जन्म शके १७९४ मध्यें म्हणजे सन १८७२ सालीं झाला. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत त्यांचें नांव ‘ लक्ष्मण कृष्णाजी ’ असें होतें. पण त्यानंतर तें ‘ लक्ष्मण रामचंद्र ’ झालें. कारण त्यांचे जनक वडील लहानपणींच वारले व काका, रामभाऊ पांगारकर, यांनीं त्यांस लहानाचें मोठें केलें, व मुलगा हवा म्हणून मांडीवर दत्तकही घेतलें व ते पितृव्याचे खरेच पितृश्री बनले. त्यामुळें शाळेंत, तसेंच लोकदृष्ट्या ते जे ‘ लक्ष्मण कृष्णाजी ’ म्हणून ओळखले जात, तें यापुढें ‘ लक्ष्मण रामचंद्र ’ म्हणून प्रसिद्ध झाले.

पांगारकरांची पांगरी सोलापूर जिल्ह्यांत बारशी तालुक्यांत आहे. पण या पांगरीशीं पांगारकरांचा संबंध फक्त आडनांवापुरताच

आला. कारण, पांगारकरांच्या आजोबापासून पांगरी सुटून त्यांचें घराणें पुणें प्रांतांत चाकण, खेड व पौड या भागांत स्थायिक झालें होतें. या भागांतील पाटील-कुलकर्णीपण मिळवून थोडी शेतीभाती या घराण्यानें इकडे मिळविली होती. खुद्द पांगारकरांचें बालपण व बालपणींचें मराठी शिक्षण पौडासच झालें.

पांगारकर हे बालपणापासून हाडाचे दणकट व प्रकृतीनें निरोगी होते. त्यामुळें शरीराचा दांडगेपणा त्यांच्या मनांतही उतरला होता. निरोगीपणामुळें त्यांची वृत्ति नेहमीं आनंदी असे. व ही बालसुलभ आनंदी वृत्ति त्यांच्या आयुष्यांत कायम होती. नाहीं म्हणायला आकडीचा रोग त्यांना कांहीं दिवस जडला होता. "हा रोग मुलास जडणें चांगलें नाहीं. त्यामुळें त्याच्या जन्माचें मातेरें होईल. पुण्यास नेऊन चांगल्या वैद्याचें औषध सुरू करा" म्हणून घरांतून सांगणें होतांच पांगारकरांच्या वडिलांनीं त्यांना गाडींत घालून पुण्यास न नेतां आळंदीस नेलें. "औषधं जान्हवी-तोयं वैद्यो नारायणो हरिः" यांत म्हटल्याप्रमाणें ज्ञानेश्वर-महाराजांचें तीर्थ मुलास पाजून त्यांनाच आकडींतून बरें करण्याची त्यांनीं विनंती केली. हा प्रसंग पांगारकरांनीं खालील सुंदर कवितेंत वर्णन केला आहे.

वडिलांनीं खालील प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांस केली:

**देवा तुझा बाळ, तूं यास सांभाळ, याची न आबाळ, कांहिं करीं**
**संसारजंजाळ, वारीं कृपापाळ ! दारीं करी काळ, हा चाकरी ॥**
**दावीं न वैद्यास, धन्वंतरी यास, तूं एक विश्वास, हा अंतरीं**
**बा वाचवी यास, त्वत्कीर्ति गायास, लावी त्वरी आस, माझी हरी॥**

**ज्ञानेशें सदयें स्वभक्तकृत ही सत्प्रार्थना पेकिली ।**
**देहाची मम दुर्दशा पुनरपी नाहीं कधीं जाहली ॥**

भक्तें प्रेमभरें सगद्गद् रवें देवासि लेभारलें ।
देवें त्यासि उपेक्षिलें न कधिही ऐसें कुणीं ऐकिलें ॥

हा प्रसंग पांगारकरांच्या हृदयावर लहानपणीं सुद्धां कोरला गेला व त्यावरून बापलेकांचें दोघांचेंही अंतःकरण किती धर्मश्रद्ध होतें हें स्पष्ट दिसून येतें.

पांगारकरांचें मराठी शिक्षण पैडास झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणासाठीं ते पुण्यास आले. तें साल होतें १८८६ चें. पुण्यास त्या वेळीं सरकारी हायस्कूल, बाबा गोखल्यांची इंग्रजी शाळा व विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें न्यू इंग्लिश स्कूल अशा तीन इंग्रजी शाळा चालू होत्या. पंढरपुरास इतर मंदिरें अनेक असलीं तरी यात्रेकरूंचा तोबा जसा पांडुरंगाच्या मंदिरावर उडायचा, त्याचप्रमाणें चिपळुणकरांच्या न्यू स्कुलाकडे विद्यार्थ्यांचे लोट लागत, असें पांगारकरांनीं म्हटलें आहे. चिपळुणकर-टिळक-आगरकरांच्या राष्ट्रीय युगाचा तो प्रारंभ व न्यू स्कूल म्हणजे त्या राष्ट्रीयतेचें प्रवेशमंदिर, अशी त्या वेळची परिस्थिति होती. आश्चर्य नाहीं, कीं पांगारकरांनीं आपलें नांव न्यू इंग्लिश स्कूलमध्येंच नोंदविलें.

विष्णुशास्त्र्याची स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांच्या अभिमानानें रसरसलेली निबंधमाला, न्यूस्कूल, फर्ग्युसन कॉलेज, केसरी-मराठा या साधनद्वारा अर्वाचीन महाराष्ट्राची राष्ट्रीय इमारत या वेळीं पुण्यास उभारली जात होती. टिळक-आगरकरांच्या देशाभिमानी व त्यागपूर्ण ध्येयनिष्ठेनें पुण्याचेंच काय, पण साऱ्या महाराष्ट्राचें चैतन्य उत्तेजित होऊं लागलें होतें. अशा या चैतन्यमय वातावरणांत व धीरोदात्त आदर्शांत भावनाप्रधान पांगारकरांच्या व्यक्तिमत्वाची कळी विकसली व त्यांच्या जीवनाचा वेल महाराष्ट्राच्या गगनावर चढून त्यांचा मोगरा फुलला, तर त्यांत आश्चर्य नाहीं.

पांगारकर न्यू स्कुलांत गेले, तेव्हां वामन शिवराम आपटे मुख्याध्यापक होते. मोठ्या पगाराच्या व मानाच्या सरकारी नोकरीची हाव सोडून न्यू स्कुलांत ते आले होते; व त्यांच्या थोर गुणाकडे पाहून टिळक-आगरकरांनीं शाळेची मुख्य देखरेख त्यांचेकडे सुपूर्त केली होती. ते शिस्तीचे जसे कडक, तसे शिकविण्यांतही मोठे पटाईत. त्यांचा संस्कृत हा मोठा आवडता विषय. आपट्यांचें संस्कृत गाईड व संस्कृत कोश प्रसिद्ध आहे. संस्कृत साहित्याची गोडी पांगारकरांस आपट्यांच्या शिकवणुकीमुळेंच लागली. त्याचप्रमाणें आपट्यांची स्मरणशक्तिही दांडगी असल्यामुळें त्यांचें संस्कृत पाठांतर शिकवितांना अचूक बाहेर येई. मोरोपंतांच्या आर्या व संतवाङ्मयाचें पाठांतर पांगारकरांचे तोंडून पुढें जें ऐकूं येई, त्याची सुरवात आपट्यांच्या उदाहरणानेंच पांगारकरांनीं केली. इंग्रजी शिकवायला गोपाळ कृष्ण गोखले पांगारकरांस होते, पण शाळेंत व पुढें कॉलेजांतही पांगारकरांचे आवडते शिक्षक आगरकर हेच होते. इंग्रजी पांचवीपासून तों पुढें पांगारकर कॉलेजांत गेल्यावर इंटरचें लॉजिक शिकविण्यापर्यंत गोपाळराव आगरकर पांगारकरांचे सारखे सहा वर्षें शिक्षक राहिले. 'अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ' या तुकोबाच्या शब्दांत पांगारकरांनीं आगरकरांचें वर्णन केलें आहे. शाळेच्या वेळाशिवाय आगरकरांच्या घरींही पांगारकर जाऊन बसत असत. आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे. अशा या कट्ट्या सुधारकाच्या व नास्तिकाच्या शिकवणींत वाढलेला विद्यार्थी पुढें सनातनी वळणाचा व पूर्ण ईश्वरश्रध्द निघावा! त्यावरून ज्याचें त्याचें संचितच बलवत्तर असतें, यांत शंका नाहीं. योगी अरविंद घोषाच्या आय्.सी.एस्. वडिलांनीं सातव्या वर्षीं, पुरा साहेब बनून येण्यासाठीं अरविंदास इंग्लडांत, इंग्लिश कुटुंबांत ठेविलें. तेच अरविंद पुढें हिंदु-

स्थानांत आल्यावर सर्वसंगपरित्याग करणारे साधू बनले ! तसलाच पांगारकरांचा प्रकार; आगरकरांच्या सुधारकी मताचा परिणाम नाहीं म्हणायला पांगारकरांच्या चरित्रांत एकदा दिसला. पांगारकरांचें लग्न झाल्यावर पहिल्या मंगळागौरीच्या पूजनाला ते पत्नीसमवेत पाटावर बसले असतां मागें एक अक्षतयोनि बालविधवा मुलगी तो समारंभ अनिमिष नेत्रानें पाहात होती. कारण पांगारकरांची ही मंगळागौरीची सपत्नीक पूजा चांगले हार, गजरे, केळीचे खुंट, वाजंत्री या थाटांत चालली होती. इतक्यांत कोणा सौभाग्यवती बायांचें लक्ष त्या विधवा मुलीकडे जाऊन एक तीवर खेकसून म्हणाली " कारटे दळभद्रे, बिजवरी नवरा खाऊन बसलीस, अन् पुढेंपुढें काय करतेस ?" हे शब्द चरचर करीत त्या बालविधवेला जिव्हारीं लागले व ती धुसफुसून रडूं लागली. तेव्हां तें करुण दृश्य बघून पांगारकरांचें हृदय विरघळलें. त्यांनीं तिला आपल्याजवळ स्वतःच्या मुलीसारखें पाटावर घेतलें व ते म्हणाले " या अर्भकाला नवरा मेल्याची काय बरें कल्पना आहे ? असें राक्षसीप्रमाणें तिजशीं बोलूं नका." अशा अक्षतयोनि मुलींना पुनर्विवाह करून संसारांत बसण्याची समाज परवानगी देईल तर किती बरें होईल, असें मत पांगारकरांनीं या प्रसंगानें व्यक्त केलें आहे. निःसंशय हें आगरकरांचें हृदयच पांगारकरांच्या मुखानें या वेळीं बोललें. पण ज्याला समाजांत एक कार्य करावयाचें आहे, त्यानें इतर कार्यांत लुडबुड करून विरोधाचीं भुतें उठवूं नयेत, हा शहाणा युक्तिवाद पुढें मनांत वागवून सामाजिक सुधारणेच्या बाबतींत पांगारकरांनीं कायमचें मौन अवलंबिलें. पण त्याबरोबर हेंही खरें कीं, ते पुढें जितका सनातनीपणा दाखवीत, तसे ते मनोमन नव्हते. आगरकरांविषयीं आपल्या 'उपकृतिस्मरण' काव्यात पांगार-

करांनीं पुढील श्लोक लिहिला आहे.

**झाला नाहिंच शिष्यवृंदकलिजा गोपाळरावांपरी,**
**मूर्ती प्रेमळ, वृत्ति मोकळि सदा, ती साधुमूर्ती खरी;**
**त्यांचे ते न मला विचार रुचले, तेव्हांहि आतांपरी,**
**तत्रापि स्मरतां उदार मन तें, नेत्रांत येती सरी!**

टिळक एकदांच काय ते युक्लीडची भूमिति शिकवायला त्यांच्या वर्गावर आले होते. पण धार्मिक मताच्या व चालचलणुकीच्या बाबतीत पांगारकर टिळकांच्या वळणावर अधिक गेले.

१८९१ सालीं पांगारकर जेव्हां मॅट्रिक झाले, तेव्हां त्या वेळीं त्यांची परिस्थिति अत्यंत हलाखीची होती. कुटुंबकर्ते पुरुष काळानें नेले होते, व जे कांहीं राहिले, ते कर्जामुळें परागंदा झाले. कोठी-घराला आग लागून वर्षाची धान्याची बेगमीही जळून गेली. त्यामुळें हातातोंडास गांठ पडणें कठीण होऊन बसलें. अशा स्थितींत मॅट्रिक परीक्षा पास होऊन पांगारकर घरीं आले, तर त्यांशीं आनंदाचा शब्द बोलण्यास कोणी नव्हतें; तर पुढच्या शिक्षणाविषयीं कोण गोष्ट काढतो? उलट शेजारपाजारचे शिष्ट पांगारकरांस आगंतुकपणें नोकरी धरण्याचा साळसूद उपदेश करूं लागले. पांगारकरांच्या आयुष्यांत हा मोठा आणीबाणीचा प्रसंग होता. बरें; नोकरी न धरावी तर घरच्या अवलंबित मंडळींस कोण पोसणार? व कॉलेजच्या खर्चाची सोय काय? पण म्हणतात ना, निश्चय असला म्हणजे रस्ता निघतो. टिळक-आगरकरांच्या त्यागपूर्ण ध्येयनिष्ठेनें पांगारकरांच्या मनाची इतकी पकड घेतली होती कीं, काय होईल तें होवो, कॉलेजांत जाऊन पुढें शिक्षण घ्यावयाचें हें पांगारकरांनीं परिस्थिति विरुद्ध असतांही मनोमन ठरविलें. हातांतील तीन माशाची सोन्याची मुदी व कानांतील भिकबाळी शेजारच्या गृहस्थाकडे

गहाण टाकून व कॉलेजच्या पाहिल्या हप्त्याचे पंधरा रुपये अशा रीतीनें उभारून ते तडक पुण्यास आले. व बेधडकपणें पुढचा-मागचा विचार न करितां फर्ग्युसन कॉलेजांत जाऊन त्यांनीं आपलें नांव तर नोंदविलें. कॉलेजचा कारकून दीक्षित यास पांगारकरांच्या घरची दुःस्थिति माहीत होती. तो सुद्धां पांगारकरांचे १५ रुपये घेऊन नांव नोंदवितांना कचरत होता. " तुम्ही रुपये द्या व नांव नोंदवा " असें ओरडून पांगारकरांनीं सांगितल्यावरच त्यानें नांव लिहिलें. राहण्यासाठीं कोठें तरी सहा आणे भाड्याची खोली मिळविली. दरमहा सहा रुपये दर असलेल्या खानावळींत जेवणाचें ठरविलें. घरीं येऊन वहिनीस तिच्या माहेरीं व आईस तिच्या बहिणी-कडे पाठवून दिलें. पुण्यास परत येऊन एक चार रुपये दरमहाची शिकवणी मिळविली व पी. इ. च्या परीक्षेचे पैसे दातार मास्तर-कडून उसनवार घेतले. ते पुढें २५ वर्षांनीं पांगारकरांनीं त्यांच्या मुलास परत केले ! पण कॉलेजचे पहिले वर्षाची परीक्षा पांगारकर पास झाले. खरोखर ही सर्वच धडाडी व ही निश्चयशक्ति वाखा-णण्यासारखीच झाली. पुढच्या शिक्षणासाठीं हा नेट पांगारकरांनीं धरला नसता तर संतवाङ्मयग्रंथकार म्हणून पांगारकर जे महा-राष्ट्रापुढें आले, तसे ते कदाचित् आले नसते. परंतु कॉलेजच्या अभ्यासाचा हा नेट पुढें तशाच स्वरूपांत कायम राहिला नाहीं. कारण १८९१ सालीं मॅट्रिक झालेल्या पांगारकरांना बी. ए. पास होण्यास १८९९ चें वर्ष उजेडावें लागलें. कॉलेजांतील अभ्यासा-पेक्षां इतर पुस्तकें वाचण्याचा व त्यावर लेख, व्याख्यानें देण्याचा नाद त्यांना याच काळांत लागला. त्यांच्या आवडीचे विषय म्हणजे संस्कृत, मराठी, इतिहास व जोडीला इंग्रजी वाङ्मय. कालिदास, भवभूति, बाण, दंडी, भारवी या संस्कृत कवींचे काव्यग्रंथ; ग्रँड

डफ, टॉड, गिबन यांचे इतिहासग्रंथ व ज्ञानेश्वरी, दासबोध व मुक्तेश्वरी भारत इ. अनेक ग्रंथ वाचण्याचा पांगारकरांनीं सपाटा चालविला. भर्तृहरीचें नीतिशतक व भगवद्गीता त्यांनीं कॉलेजमध्यें असतांनाच पाठ केली. “ कालिदास व भवभूति ” यावर १०० पृष्ठांचा निबंध तयार करून कॉलेजमधील वादविवादसभेंत त्यांनीं या विषयावर व्याख्यानें दिलीं. लोककार्य करूं इच्छिणाऱ्या पुरुषार्थी मनुष्याचीं वाणी व लेखणी हीं दोन शस्त्रें तयार पाहिजेत, असा मनाशीं आडाखा बांधून त्याची तयारी त्यांनीं कॉलेजमध्यें असतांपासूनच सुरूं केली. यामुळें १८९४ मध्यें विद्यार्थ्यांनीं डेक्कन कॉलेजमध्यें त्यांचें इतिहासावर व्याख्यान केलें. तें त्यांचें पहिलें व्याख्यान होय. त्याचप्रमाणें पुण्यास ‘ जगद्धि-तेच्छु ’ नांवाचें एक वर्तमानपत्र गोंधळेकर काढीत असत. एकदां पांगारकर पैशाच्या अडचणींत असतां ‘ मूर्तिपूजे ’ वर एक १६ कॉलमी लेख वरील पत्रांत लिहून त्यांनीं १६ रुपये मिळविले. लेखनावर पैसा मिळविण्याचा हा त्याचा पहिला प्रसंग होय. या वेळीं कित्येक दिवसांत पैसा हातीं नसल्यामुळें त्यांची हजामत वाढली होती. १६ रुपये मिळाल्यावर त्यांनीं पहिलें काम हें केलें कीं, हजामत करवून घेण्यासाठीं एक चांगला न्हावीदादा बोलवून आणला. पांगारकरांची वाढलेली हजामत करतांना त्यानें पांगारकरांना विचारलें कीं, “ हजामत फार वाढली आहे. बायको गर्भार आहे काय ? ” तेव्हां पांगारकरांनींही हंसत उत्तर दिलें कीं ‘ अद्याप लग्न झालें नाहीं ! ’

सारांश काय कीं, इतर लेखनवाचन-व्याख्यान-प्रवचनाच्या धडाक्यांत १८९९ पर्यंत बी. ए. पास होण्यास पांगारकरांस सवड झाली नाहीं. टिळक-जिनसीवाले यांचेकडे त्यांचे जाणें येणें असे. १८९८ सालांतील बी. ए. ची परीक्षा नापास झाल्यावर ते एकदां

असेच प्रो. जिनसीवाले यांचेकडे गेले असतां ते त्यांस रागावून म्हणाले, "पांगारकर, तुम्ही माझ्यासमोर अगदीं बोलूं नका! तुम्हांला अकालीं मोठेपणाची हाव सुटली आहे. तुमचे बरोबरचे सोबती M. A. सुद्धां होऊन गेले व तुम्ही अद्याप B A. च्या उंबरठ्याशीं ठोकरा खात बसलां आहांत! परीक्षेचीं पुस्तकें वाचावयाला नकोत. लांब लांब गोष्टी मात्र सांगायला हव्या! कालच टिळकांशीं तुमच्याविषयीं माझें बोलणें झालें. तुमच्याविषयीं आम्हांस मोठी आशा आहे. जा, व पुन: B. A. झाल्याशिवाय तोंड दाखवूं नका." धर्मशील प्रो. जिनसीवाल्यांच्या या बोलण्याचा पांगारकरांच्या मनावर फार परिणाम झाला. प्रो. जिनसीवाले हेही एक पांगारकरांच्या जीवनांतील आदर्श पुरुष होते. त्यांचें विद्वत्व व वक्तृत्व दोन्हीही अफाट असत व पांगारकरांना आवडणारी धर्मश्रद्धा त्यांच्यात अधिक होती. प्रो. जिनसीवालेही M. A. व प्रो. आगरकरही M. A.; पण दोघांच्या आचारविचारांत धर्मदृष्टीनें फारच अंतर होतें. १८९९ सालीं B. A. पास होऊन जिनसीवाल्यांस तोंड दाखविण्यास पांगारकर मोकळे झाले.

संतवाङ्मयाचा अभ्यास कॉलेजच्या या दीर्घ मुदतीच्या काळांतच पांगारकरांनीं सुरू केला होता. भाड्याच्या खोलीच्या बाहेर रद्दींत कोठेंतरी मिळालेली समर्थांची तसबीर साफसूफ करून त्यांनीं आपल्या खोलींत लावली व तीपुढें धूपदीप करून समर्थांच्या दासबोधाचीं पारायणें त्यांनीं सुरू केलीं. ही गोष्ट १८९४ सालचीं आहे. १८९५ सालीं डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर त्यांनीं 'रामदासावर व्याख्यान' दिल्याची नोंद आढळते. यापुढें माघांतील दासनवमीचा उत्सव ते प्रथम खाजगी रीतीनें व पुढें जाहीरपणें करूं लागले. टिळकांनीं गणपती व शिवाजी उत्सव नवीन

पद्धतीनें सुरू केले व दासनवमीच्या उत्सवाची प्रथा महाराष्ट्रांत आपण सुरू केली, असें पांगारकरांनीं लिहिलें आहे. आपल्या सार्वजनिक गणपतिउत्सवांत पांगारकरांस व्याख्यानें देण्यास टिळक बोलावूं लागले होते. पांगारकरांनीं रामदासांचा उत्सव सुरू केल्यावर ते लोकमान्य टिळकास आपल्या उत्सवांत बोलवूं लागले. लोकसंग्रही टिळकांचें होतकरू पांगारकरांवर प्रथमपासून लक्ष होतें व पांगारकरही टिळकांच्या घरीं या ना त्या कारणानें जाऊं बसूं लागले. केसरींतून मराठी कवि व कवितेवर पांगारकरांचे लेख टिळक अगत्यपूर्वक घालूं लागले. संगमनेरास इंग्रजी शाळेवर मास्तर असतांनाच शाळेच्या विद्यार्थ्यांनीं " मोरोपंतांचे ग्रंथ " पांगारकरांस गुरुदक्षिणा म्हणून प्रेमानें दिले होते; व पुढें पंढरपूरच्या इंग्रजी शाळेंत नोकरी धरल्यावर मोरोपंतांच्या वाङ्मयाचा त्यांना एक प्रकारचा ध्यासच लागला. त्यामुळें मोरोपंतांचा वंश, मोरोपंतांचे गुरु, मोरोपंतांचीं रामायणें असे अनेक लेख यांचे केसरींतून येऊं लागले. प्राचीन मराठी कवि, कवि निरंजन माधव, परशुराम शाहीर, तुकारामबुवांचा कालनिर्णय इत्यादि त्यांचे अनेक संशोधनपर लेख केसरींतून एकामागून एक प्रसिद्ध होऊं लागले. पांगारकरांच्या पुढील ग्रंथांचा हा पायाच तयार होत होता व त्यांचे लेख जसे आले तसे छापून लो. टिळकांनीं त्यांच्या पुढच्या कार्यास मोठेंच उत्तेजन दिलें त्यांत शंका नाहीं.

वामन शिवराम आपटे यांच्या प्रत्यक्ष उदाहरणामुळें व प्रो. जिनसीवाल्यांचा आदर्श पुढें ठेविल्यामुळें संस्कृत सुभाषितें पाठ करण्याचा नाद पांगारकरांस इंग्रजी शाळेपासूनच होता. त्या पाठांतरांत आतां दासबोधाची, मोरोपंती आर्यांची व संतकवींच्या अभंगांची भर पांगारकर घालूं लागले. सुंदर पाठांतरासाठीं सुंदर

वेच्यांचा ते संग्रह करूं लागले. पंढरपुरास शिक्षक असतां जुनीं बाडें चाळतांना ज्या भूपाळ्या, आरत्या, पदें त्यांना आवडलीं, त्यांची त्यांनीं एक वहीच तयार केली. या वहींतूनच पुढें त्यांचा अत्यंत लोकप्रिय झालेला ‘ भक्तिमार्गप्रदीप ’ बाहेर आला. भक्तिमार्गप्रदीपांत पांगारकरांचें स्वतांचें असें कांहींच नाहीं. कांहीं असलेंच तर त्यांची सुंदर निवड व वर्गीकरण आहे. इंग्रजी राजवटींत जुन्या कर्मकांडाचा नोकरीपेशामुळें लोप झाल्यानें धार्मिक वृत्तीच्या जनतेस नित्यधर्मपाठासाठीं कांहीं क्रम हवाच होता. तो पांगारकरांच्या भक्तिमार्गप्रदीपामुळें लाभला. भक्तिमार्गप्रदीपाच्या प्रती आजवर लाखानें तरी खपल्या आहेत. मोठी कीर्ति व थोडी संपत्तिही त्यानें पांगारकरांस मिळवून दिली यांत शंका नाहीं.

टिळक आगरकर शिक्षणक्षेत्रांत सुरवातीस एकत्र होते. तरी पुढें सार्वजानिक आखाड्यांत दोघांनीं पाऊल टाकतांच एकानें राष्ट्राचें राजकारण प्रधान मानलें व दुसऱ्यानें समाजसुधारणेस प्राधान्य दिलें. दोघांच्याही छत्राखालीं वाढून पांगारकरांस धर्मप्राधान्य रुचलें व ते मराठी संतांच्या धर्मवाङ्मयाकडे वळले. पांगारकरांचा संतवाङ्मयाभ्यास व संशोधन सुरू होण्याच्या काळांतच राजवाडे हे मराठ्यांच्या इतिहाससंशोधनाकडे वळले. हे सर्व प्रकार अर्थात् ज्याच्या त्याच्या रुचिभेदामुळें घडून आले. देशास या सर्वच गोष्टीची आवश्यकता होती व आहे.

टिळकांनींही आपल्या सक्तीच्या विश्रांतिकाळांत संशोधनकार्य केलें. पण त्यांचें संशोधनकार्य प्राचीन वेदवाङ्मयांतील होतें, व मधून मधून दृग्गोचर होणारें होतें. पण पांगारकर व राजवाडे यांनीं मराठी भाषेंतील संशोधनकार्य अंगिकारलें व त्यांनीं आपल्या आमरणान्त तें चालविलें. परिस्थितिभेदानें व बुद्धिभेदामुळें त्यांत

फरक पडला. शिवाय एकानें मराठी भाषेंतील संतवाङ्मयसंशोधन हातीं घेतलें व एकानें इतिहासवाङ्मयाचें मथन केलें. त्यांतून राजवाडे हें संशोधनकार्यास सर्वस्वी वाहून घेण्यासाठीं सुरवातीसच संसारपाशांतून मुक्त झाले होते. तेव्हां इतिहाससंशोधनाचें कार्य करण्यास त्यांना सारा वेळ व दाही दिशा मोकळ्या झाल्या. त्यांतून त्यांची कार्याविषयीं तडफ मोठी दांडगी व वृत्ति अत्यंत मनस्वी. एकाद्या प्रामाणिक अधिकाऱ्यानें काळ्या बाजारांत लपविलेला माल जसा ठिकाठिकाणीं धाडी घालून बाहेर काढावा, त्याप्रमाणें हातांत कवडीचाही अधिकार नसतां आळशी व असमंजस लोकांच्या घरीं धरणीं धरून इतिहाससाधनाचीं बाडें उन्हातान्हांतून राजवाड्यांनीं आपल्या डोक्यावर वाहिलीं व भूक-तहान न पाहतां ऐतिहासिक एका शब्दासाठीं हस्तलिखितांचीं हजारों चिताडें चाळलीं ! राजवाड्यांची बुद्धिही मोठी भेदक, मुळाचा ठाव घेणारी ! त्यांची चिकित्साही मोठी सूक्ष्म व अनुमानशक्तिही सुतावरून स्वर्गास जाणारी ! त्यामुळें त्यांच्या साधनखंडाच्या प्रस्तावना म्हणजे जुन्या काळावर प्रकाशाच्या झोत टाकणाऱ्या व समाजाच्या गुणदोषावर बरोबर हात ठेवणाऱ्या अशाच झाल्या.

पांगारकरांचें संशोधनकार्य निराळ्या थाटानें झालें. ते बी. ए. झाल्यावर त्यांचें लग्न होऊन संसाराचा भार चार लोकांप्रमाणें त्यांना जन्मभर वाहावा लागला. पण संसारभारापेक्षां आपल्यावरील संतवाङ्मयसंशोधनाची जबाबदारीच त्यांनीं अधिक मानली व यांतच त्यांची ध्येयनिष्ठा दिसून येते. मोरोपंत-तुकारामांच्या चरित्रासाठीं ते पन्हाळगड, बारामती, देहू, पंढरपूर इत्यादि ठिकाणीं हिंडले. मोरोपंत—तुकारामांच्या नातलगांकडे जाऊन त्यांच्या कागदपत्राची जमवाजमव पांगारकरांनींहीं केली. पण

राजवाड्यांच्या मानानें पांगारकरांचे श्रमही परिमित व साधनसामुग्री जमविणेंही आर्जवाचें. राजवाड्यांचे परिश्रम मोठे, पण त्यांची वाणी मोठी द्वाड होती. कोणाकडे कोण्या गांवीं इतिहासाचे कागदपत्र आहेत असें त्यांना कळलें मात्र कीं, राजवाड्यांचा मोर्चा त्याकडे वळावयाचाच ! व तोही अशा थाटांत कीं, जणूं चिमाजी अप्पा वसईचा किल्ला घेण्यास निघाला ! जवळ दूर, ऊन थंडी, तहान भूक, दिवस रात्र या गोष्टी त्यांच्या ध्यानीं मनींही यायच्या नाहींत. त्यानंतर बऱ्या बोलानें कागदपत्र घरवाल्यानें दाखविले तर बरें, नाहींतर राजवाड्यांच्या तोंडाचा जो पट्टा सुरू व्हावयाचा, त्यांत साऱ्या गांवाचीं व समाजाचीं बेचाळीस कुळें उद्धरलीं जावयाचीं व ज्याच्या घरीं राजवाडे जावयाचे त्यास ‘ दे माय धरणी ठाय ’ होऊन “ बाबा, कागदपत्र घे पण तोंड आटप ” म्हणून तो आपलीं बासनें सोडावयाचा ! पांगारकरांच्या हातून असा आततायीपणा कधीं झाला नाहीं. कारण त्यांचा स्वभाव मुदलांतच गरीब होता. कोल्हापूरच्या एका वैद्याकडे मोरोपंतांचा काव्यसंग्रह आहे असें कळल्यावरून पांगारकर त्यांच्या घरीं गेले. वैद्यबुवा मोठा तामसी व खाष्ट असल्याचें आण्णा विजापूरकरांकडून पांगारकरांस कळलें होतें. राजवाड्यांची व या वैद्यराजांची गाठ पडती तर शब्दाशब्दीवरून प्रकरण सरळ मारामारीवर गेलें असतें. पण पांगारकरांची रीत निराळी होती. ते वैद्यराजांच्या घरीं जाऊन त्यांच्या पायां काय पडले, त्यांस त्यांनीं मोठेपण काय दिलें व त्यांचें चित्त प्रसन्न करण्यासाठीं, लहान मुलानें परीक्षा द्यावी त्याप्रमाणें मोरोपंतांच्या आर्याही काय त्यांनीं त्यांच्यापुढें म्हटल्या ! सारांश, सर्वप्रकारची पड खाऊन वैद्यराजांवर त्यांनीं चढ केली व त्यांच्या येथील मोरोपंतांचा काव्यसंग्रह मिळविला ! राजवाड्यांनीं संपादन

केलेल्या प्रचंड साधनसामुग्रींतील एक पानही अशा आर्जवानें मिळविलें नसेल. साधनसामुग्री हाताळतांनाही राजवाडे चिकित्सा अधिक वापरीत व पांगारकर समन्वय अधिक साधीत. पांगारकर अतिवादाला भीत, तर राजवाडे हे वादास लागले तर प्रतिपक्षाच्या सर्व तऱ्हेनें चिंधड्या उडवीत! त्यांना शिष्टाचार माहीत नव्हता. पण वादाच्या भरांतही पांगारकरांनीं मर्यादा कधीं सोडली नाहीं.

आपल्या संसाराचे मदतीसाठीं संगमनेर, पंढरपूर, पुणें व अमरावती अशा चार ठिकाणीं १९०७ पर्यन्त पांगारकरांनीं इंग्रजी शाळांतून शिक्षकाची नोकरी केली. या काळांत नोकरीचे सर्व भलेबुरे अनुभव घेतल्यावर नोकरीचा त्यांना वीट आला. मनुष्याचें सर्व मोठेंपण त्याच्या मालकापुढें व वरिष्ठापुढें पेंड खातें अशी एक म्हण आहे. लेखपुस्तकांच्या प्रकाशनांनीं व व्याख्यानप्रवचनांनीं बाहेर जो पांगारकरांस मोठेपणा लाभे व आनंद लुटावयास मिळे, तो शाळेच्या चार भिंतींत व नोकरीपेशांत मिळणें अशक्य होतें. मुळांत ते लोकप्रिय असत, पण वरिष्ठ शिक्षकाचें व अधिकाऱ्यांचें त्यांशीं सहसा पटत नसे. दुसरी गोष्ट नोकरीमुळें पैसा मिळे, पण पुणें पंढरपूर सोडलें तर इतर कुग्रामांत त्यांचें संशोधनकार्यही या साधनसामग्रीअभावीं खोळंबून बसे. तेव्हां एक आपल्या रुचीचें व आपल्या कार्यास वाहिलेलें वर्तमानपत्र काढण्याची कल्पना त्यांचे मनांत आली; व १९०७ सालीं नोकरी कायमची सोडून स्वतंत्र उद्योग करण्याच्या इर्षेनें त्यांनीं ' मुमुक्षु ' हें धार्मिक वर्तमानपत्र सुरू केलें.

लो. टिळकांचा ' केसरी ' व प्रो. परांजप्यांचा ' काळ ' यांचीं उदाहरणं त्यांचे डोळ्यापुढें होतींच. पण हीं दोन्ही वर्तमानपत्रें राजकीय होतीं व तीं राजकीय स्वरूपाचीं असल्यानें राजकारण-

प्रधान काळांत तीं खपणें साहाजिक होतें. पण धार्मिक स्वरूपाचें व तेंही वर्तमानपत्र काढणें हें खरोखरच पांगारकरांचें साहस होतें. केसरींत लेख लिहून आत्मविश्वास त्यांचे ठिकाणीं आलाच होता. टिळक-आगरकरांचा राष्ट्रीय बाणा त्यांचेत उतरलाच होता. तेव्हां धार्मिक पण राष्ट्रीय अशा थाटांत पहिला 'मुमुक्षु' सुरू झाला. त्यांचे पुढें जप्त झालेले व आतां पुनः मुक्त झालेले 'रामदासी बुवा-' वरचे लेख प्रथम मुमुक्षूंतच प्रसिद्ध झाले. टिळकांच्या काळांत 'धर्म व राजकारण' यांची आजच्या इतकी फारकत झालेली नव्हती. पण 'धर्म श्रेष्ठ कीं देशाचें राजकारण श्रेष्ठ' हा प्रश्न उपस्थित झाला होता. 'धर्मासाठीं राजकारण' कीं 'धर्म बाजूस ठेवूनही राजकारण' असे पक्ष धर्माभिमानी व राजकारणाभिमानी यांत उपस्थित झाले होते. पैकीं पहिला पक्ष घेऊन पांगारकरांनीं केवळ राजकारणवाद्यांशीं दोन हात केले. हा वाद मुमुक्षूंत चांगलाच रंगला.

पण १९०८ सालीं काळकर्त्यांस राजद्रोहावरून शिक्षा झाली, टिळकही सहा वर्षांच्या काळ्या पाण्यावर गेले व पुढें जॅक्सनचा खून नाशिकास होऊन दडपशाहीमुळें सर्वच महाराष्ट्राचा मोहरा पालटला, यामुळें टिळक-परांजप्यांच्या बैठकींत बसण्याच्या व धर्माच्या पडद्याआड गुप्त रामदासी राजकारण करण्याच्या बभ्र्यावर मुमुक्षु-कर्ते पांगारकरही सरकार तुरुंगांत घालणार, म्हणून पुण्याचे लोक बोलूं लागले. पण पांगारकर हे मुदलांत राजकीय असंतोषाची आग फैलावणारे नसल्यानें व ही गोष्ट सरकारास पुरेपूर माहीत असल्यामुळें या ब्राह्मणास सरकारनें हात लावला नाहीं. पण एकंदर सर्वच दडपशाहीचा परिणाम मुमुक्षूच्या संपादनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. जेथें टिळकांच्या गैरहजेरींत त्यांच्या केसरीनेंही

आपली आयाळ खालीं टाकली, तेथें पांगारकरांच्या मुमुक्षूची काय कथा? "काय पांगारकर, मुमुक्षु अद्याप आहे कीं मुक्त झाला?" असा पहिला प्रश्न टिळकांनीं पुढें सुटल्यावर पहिल्या भेटींतच त्यांस टाकला, त्यांतील मतलब तरी हाच होता.

केसरीनें टिळकांना व काळानें परांजप्यांना पैशाची सोय व जोड करून दिली, तसें मुमुक्षूनें पांगारकरांना आर्थिक स्थैर्य कधींच प्राप्त करून दिलें नाहीं. मुमुक्षूचे बाबतींत पांगारकर नेहमीं ओढघस्तींतच असत. मुमुक्षूचें ऑफीस स्वतः पांगारकर आठ पंधरा दिवसांनीं दार लावून स्वतः सारवीत व कारकुनी कामही स्वतःच करीत. टिळकांच्या 'केसरी' ची सुरवातीला हीच स्थिति होती, पण ती देखोदेख सुधारली. पण पांगारकरांचा मुमुक्षु प्रथम साप्ताहिक होता, तो पुढें पाक्षिक झाला. नंतर त्याचें मासिक बनलें, व त्यांचे हयातींतच तो त्यांना कायमचा बंद करावा लागला. उत्तरेंतील गोरखपूरचें 'कल्याण' मासिक शुक्ल पक्षाच्या चंद्राप्रमाणें वाढत जाऊन दरमहा एक लाखाच्या आसपास प्रती खपण्याचा मान त्यास मिळाला, पण महाराष्ट्रांतील धार्मिक नियतकालिकास नेहमीं वद्यपक्षच अनुभवायला आला, ही गोष्ट सत्य आहे.

पण आर्थिक बाबतींत मुमुक्षु जें प्रत्यक्ष करूं शकला नाहीं, तें आर्थिक साहाय्य अप्रत्यक्षपणें मुमुक्षूनें पांगारकरांना मिळवून दिलें. मुमुक्षूमुळें पांगारकरांची कीर्ति दूरवर जाऊन पोंचली. मुमुक्षूमधील उपयुक्त लेखांचीं व वेच्यांचीं पुस्तकें काढून त्यांच्या ऐसपैस जाहिराती त्यांतून येऊं लागल्या. त्यामुळें धार्मिक उत्सवप्रसंगास व्याख्यानप्रवचनाचीं निमंत्रणें त्यांना सगळीकडून येऊं लागलीं व व्याख्यानाच्या दौऱ्याचें वृत्त ते मुमुक्षूंतून देऊं लागले. त्यामुळें त्यांच्या हातून पुढें होणाऱ्या पुस्तकांचा ग्राहक वर्ग मुमुक्षूमुळें वाढत गेला.

आजच्या प्रसिद्धीच्या व जाहिरातीच्या काळांत स्वतांच्या पुस्तकांची व स्वतांच्या कार्याची जाहिरात सहजासहजीं मुमुक्षूंतून पांगारकरांस करितां येऊं लागली व यामुळें त्यांचा आर्थिक व लौकिक दृष्ट्या फायदाच झाला.

पांगारकरांचा ' मोरोपंता ' वरील चरित्रविषयक व काव्यविवेचक ग्रंथ १९०८ सालीं प्रसिद्ध झाला. ' तोरणा ' किल्ला घेऊन मराठी राज्याची मुहूर्तमेढ शिवाजीनें जशी रोवली, त्याप्रमाणें ' मोरोपंतां ' वरील ग्रंथ लिहून पांगारकरांनीं आपल्या वाङ्मयकीर्तिमंदिराचा पाया घातला. या ग्रंथासाठीं आठ वर्षें पांगारकर सारखे खपत होते. खरोखरच पांगारकरांचा हा ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे. या ग्रंथापूर्वी मोरोपंतांच्या चरित्राविषयीं खात्रीलायक अशी फारच थोडी माहिती महाराष्ट्रास होती. त्यांचा समग्र काव्यग्रंथही छापला गेला नव्हता. पांगारकरांनीं मोरोपंतांच्या चरित्राची माहिती फार साक्षेपानें मिळवून अत्यंत सोज्वळ भाषेंत प्रथम सुमारें २०० पृष्ठें दिली आहे व पुढें ४०० पृष्ठें पंतवाङ्मयाचा समुद्र डहुळून त्यांतील माणिकमोत्यांचीं आर्याभरणें पंतकाव्याच्या परिचयासाठीं व विवेचनाकरितां लिहिलीं आहेत. हा ग्रंथ लिहीत असतां व तयार करीत असतां पांगारकर अगदीं ' मोरोपंत- ' मय झाले होते. पंतांच्या २-२॥ हजार आर्या त्यांच्या रसनेवर अक्षरशः नाचत होत्या ! या सुमारास त्यांना झालेल्या मुलाचें नांवही त्यांनीं 'मोरया' असेंच ठेविलें. केसरीनें या ग्रंथाविषयीं लिहिलें कीं, " मराठी कवींच्या कवितेचें अध्ययन किती एकनिष्ठेनें, प्रेमानें, सहृदयतेनें व सततोद्योगानें केलें पाहिजे, तसेंच त्यांच्या चरित्राची सामग्री गोळा करण्यासाठीं किती व कसे प्रयत्न केले पाहिजेत, ह्याचें एक उत्तम उदाहरण पांगारकरांनीं ह्या

पुस्तकाच्या द्वारें महाराष्ट्रीय ग्रंथकारांस घालून दिलें आहे. मराठी कवींचें चरित्र व काव्यविवेचन हीं दोन्ही इतक्या सविस्तर रीतीनें व मनोहर भाषेंत एकत्र गोवल्याचें हें पहिलेंच उदाहरण असल्या-मुळें या ग्रंथास मराठी वाङ्मयांत महत्त्वाचें स्थान मिळेल यांत शंका नाहीं. चरित्रसाधनें गोळा करणें वगैरे कामांत पांगारकरांनीं आपलें तनमनधन शब्दशः अर्पण केलें होतें." काव्यरसिक शिवरामपंत परांजप्यांचें हृदय पांगारकरांचें मोरोपंत-चरित्र वाचतांना अक्षरशः गहिंवरून आलें व पुढें वीस वर्षांनीं 'मयूरकाव्यविवेचन' करतांना नागपूरच्या प्रो. बनहट्टींनीं पांगारकरांचें या विषयावरील ऋण खालील शब्दांत नमूद केलें आहे:

प्रो. बनहट्टी लिहितात, "पंतकवितेच्या उद्धाराच्या बाबतींत पांगारकरांचें कर्तृत्व इतकें महनीय आहे कीं, त्यांतील कांहीं नजरचुका किंवा क्षुद्र दोष, क्षीरसमुद्रांत मिठाच्या कणिका कोठच्याकोठें विराव्या त्याप्रमाणें आहेत. पंतकवितेच्या अभ्यासकांना पांगारकरांचें साहाय्य बिनमोल होऊन राहिलें आहे. पांगारकरांनीं आपल्या पुस्तकांत पंतांच्या काव्यरचनेचा अनुक्रम ठरवून जो सांगाडा तयार केला आहे, तो त्यांच्या नंतरच्या लेखकांचा मूलाधार किंवा पायाच होऊन बसला आहे. पंतांचा पत्रव्यवहार उजेडांत आणण्याचें सर्व श्रेय पांगारकरांनाच आहे. पंतांचें मित्रमंडळ व त्यांशीं झालेला त्यांचा पत्रव्यवहार शोधून काढून अलीकडच्या शिक्षित समाजाला त्याची वर्दी पांगारकरांनीं दिली, याबद्दल पांगारकरांचे धन्यवाद गावे तितके थोडेच आहेत."

आजच्या काळांत पांगारकरांचा हा ग्रंथ मागें पडला, याचें कारण मोरोपंतांची कविताच आजच्या समाजापुढें राहिली नाहीं, हें होय. पण ज्या काळीं पांगारकरांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला त्या काळांत

मोरोपंतांची कविता महाराष्ट्र समाजांत हरिदासकथेकऱ्यांच्या मुखांतून गंगेप्रमाणें वाहात होती. पंतांच्या आर्येवर कीर्तनाचा पूर्वरंग व उत्तररंग करणारे हरिदास सर्व महाराष्ट्रभर विखुरले होते. किंबहुना त्या काळची कीर्तनसंस्था पंतांच्या आर्यांवरच विशेषें-करून रंगत होती. ही गोष्ट आजच्या समाजास फारशी माहीत नाहीं. पण पंतांच्या काव्याविषयीं त्यांतील क्लिष्टपणामुळें व यमक-प्राचुर्यामुळें त्या काळच्या सुशिक्षितांतही फार गैरसमज होते. खुद्द मालाकार चिपळुणकरांनींही अपुऱ्या माहितीमुळें "वामन मोरोपंत वगैरे मंडळींचा संस्कृत कवींपैकीं कितीकांशीं व कितसा परिचय होता?" असा आक्षेप घेऊन पंतांच्या पांडित्याविषयीं शंका घेतली होती. पण अत्यंत परिश्रमानें मिळविलेल्या माहितीच्या जोरावर पांगारकरांनीं या ग्रंथांत बड्याबड्या सुशिक्षितांच्या आक्षेपाचा जो खरपूस व निर्विवाद समाचार घेतला आहे, तो वाचून खरोखरच पांगारकरांच्या त्या वेळच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटतो.

पण या ग्रंथांतील मुख्य चरित्र व काव्याचा विषय बाजूस ठेवून एका गौण मुद्यावरच वादाचा धुरोळा काहीं पुणेकरांनीं उठ-वून दिला. तो मुद्दा असाः—मोरोपंतांचे आश्रयदाते बारामतीकर बाबूजी नाईक, पंतांचे आप्त व मित्र पाध्ये घराणें व मराठ्यांचे आर-माररक्षक आंग्रे यांचेशीं वागण्यांत नानासाहेब पेशवे यांचें कपटाचें व लबाडीचें धोरण होतें व तें राष्ट्रविघातक होतें अशीं विधानें इति-हासाचे आधार देऊन पांगारकरांनीं त्या त्या संदर्भांत केलीं होतीं. पेशवाईचा भलाबुरा अभिमान बाळगणाऱ्या भानु, साने, राजवा-ड्यांनीं टीकेची एकच झोड पांगारकरांवर या विधानाबाबतींत उठ-वून दिली. वादांत मुद्याची थोडी गल्लत करण्यांत आली. एक मुद्दा खोडून दुसरे मुद्दे अजिबात नाकारावे किंवा त्यांस पुरावा नाहीं असें

म्हणून त्यांचें बळ कमी करावें असें झालें.

पंतांचे आश्रयदाते बाबूजी नाईक यांस खुद्द बाळाजी विश्वनाथाची मुलगी दिली होती. बाजीरावास युद्धासाठीं व फौजेच्या पगारासाठीं बाबूजी नाईक नेहमीं कर्ज देत असे. पुढें बाजीराव वारल्यावर पेशवाईचें पद बाबूजीसच द्यावें, असा भोसल्यांनीं बूट काढला. त्यांस आंतून बाबूजीची सल्ला नसेल, असें म्हणतां येत नाहीं. पण हा सर्वच बेत फसून अखेर बाळाजी बाजीरावासच पेशवाई मिळाली. त्यानंतर कर्नाटकचा सुभा मिळविण्यासाठीं बाबूजींनीं खटपट केली व त्यांनीं शाहूमहाराजांपासून ती सुभेदारी मिळविली. पण नानासाहेबांनीं ती सुभेदारी बाबूजीस पचूं दिली नाहीं. कर्नाटकच्या संस्थानिकास व सावनूरच्या नबाबास बाबूजीविरुद्ध फूस देऊन वर सदाशिवभाऊस फौज देऊन बाबूजीस कर्नाटकांतून पिटाळून लावण्यास नानासाहेबांनीं पाठविलें. या प्रकरणांत बाबूजी चांगलाच तोंडघशीं पडला व कर्नाटकचा देणेचा मक्ता तो शाहूस पुरा करूं शकला नाहीं. तेव्हां मक्ता वाढवून नानासाहेबांनीं तो सुभा बाबूजीपासून काढून घेतला. या प्रकरणीं राजवाडे, साने म्हणाले," बाळाजी हा कांहीं तुकोबा नव्हता. तो राजकारणी होता. आपली पेशवाई हिसकूं पाहाणाऱ्या नाइकास त्यानें कर्नाटकचा सुभा जिरूं दिला नाहीं यांत नवल काय ? नानासाहेबानें लबाडीचें कारस्थान केलें असेल. त्यांना स्वतःचा मतलब साधावयाचा होता. ते कांहीं साधू नव्हते. पण बाबूजी नाईक तरी कोठें साधू होता ? त्यांना पेशवाई काय देशहिताकरितां पाहिजे होती ? पण नाईकास पांगारकर वाईट म्हणत नाहींत; कारण काय, तर ते मोरोपंतांचे आश्रयदाते. इतिहासकारांनीं तराजू बरोबर धरला पाहिजे." राजवाडे, साने यांच्या या बोलण्यांत निःसंशय तथ्य आहे. बाबूजी

नाईक काय किंवा नानासाहेब काय, आपल्या मतलबासाठीं राजकारणाचे कुटिल डाव दोघेही खेळत होते. हीच मुख्य गोष्ट भोळ्या पांगारकरांस कळली नाहीं.

पण या मुद्याच्या खंडनांत "सबंध कोकणपट्टी आंग्र्याविरुद्ध इंग्रजांस मोकळी करून दिल्याचा पुरावा पांगारकरांस कोठें उपलब्ध झाला असेल तो असो. विद्यमान इतिहासग्रंथांत तो कोठें नजरेस पडत नाहीं." असें म्हणून नानासाहेबानें आंग्र्याविरूद्ध जी कारवाई केली, त्या मुद्यास मुद्दामच शहाजोगपणें प्रो. राजवाड्यांनीं बगल दिली. पण "Introduction to the Diaries of Peshwas" या आपल्या निबंधांत न्या. रानडे यांनीं "पेशव्यानें समुद्रावरची व जमीनीवरची आंग्र्यांची सत्ता समूळ नष्ट करण्यास इंग्रजास १७५६ मध्यें साहाय्य केलें व मराठ्यांच्या आरमाराचें महत्त्व घालविलें" ही गोष्ट पेशव्याच्या पत्रावरूनच दाखविली होती. तो पुरावा पांगारकरांनीं पुढें करतांच भानु-राजवाड्यांचीं तोंडें गप्प झालीं.

वादाचा तिसरा मुद्दा गळवल्लीकर पाध्यांची संगमेश्वर प्रांताची धर्माधिकारीपणाची वृत्ति नानासाहेबानें अन्यायानें जोशांकडे दिली त्याबद्दल होय. याबद्दल हकिकत अशी कीं, कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांत गोळवली गांव पाध्यांस इनाम होता. ते तेथील मूळचे राहणारे. त्यांचें संगमेश्वरप्रांतांतील ७२ गांवाचें धर्माधिकारीपणाचें वतनही शिवाजी राजाच्या पूर्वीपासून चालत आलेलें. या घराण्यांतील काशी पाध्यानें संगमेश्वरचा कोणी कोंकणस्थ जोशी आपले घरी विद्याभ्यासास ठेवला व त्यासच पुढें आपल्या वृत्तीची व्यवस्था पाहण्यास मदतीस घेतला. ७२ गांवांचा धर्माधिकार चालविण्यास मदतनीस लागत. पुढें ३०-३५ वर्षांनीं काशी पाध्ये मेल्यावर सदर जोशानें वृत्ति माझीच म्हणून वाद उपस्थित केला व तो वाद नाना-

साहेब पेशव्याचे पुढें गेला. जोशी व पेशवे यांचा आंतून थोडा आप्तसंबंध होता. नानासाहेबानें कागद पाहिल्यासारखें केलें व वृत्ती जोशाचे स्वाधीन केली. पण पाध्यांचें तें संसारधन असल्यामुळें व सनदाताम्रपटाचा त्यास आधार असल्यामुळें काशी पाध्याचे दोन चिरंजीव यज्ञेश्वर पाध्ये व अनंत पाध्ये हे पुण्यास वाद धसास लावण्यासाठीं कर्ज काढून राहिले. तेव्हां पेशव्यांचे आप्तसंबंधाचे जोरावर जोशानें पाध्यांचे कागदपत्र काढून घेण्यासाठीं कोंकणांत माणसें पाठवून पाध्यांच्या बराबर चौक्या बसविल्या व कागदपत्र हस्तगत करण्यासाठीं पाध्यांचे नौकरमाणसांस मुसक्या बांधल्या. ही बातमी पाध्यांस कळतांच दोघां पाध्यांनीं पेशव्याचे डेऱ्यापुढें जाऊन बोंब ठोकली व या अन्यायाविरुद्ध अन्नसत्याग्रह केला. वाद इतका वर्दळीवर आणल्याबद्दल नानासाहेब आंतून खवळलेच होते. स्वारीहून परत आल्यावर त्यांनीं जोशास संगमेश्वरच्या धर्माधिकारीपणाच्या सनदा दिल्या व हाच निर्णय पुढें माधवरावसाहेबानें कायम केला. न्यायाबद्दल हताश होऊन पाध्ये परत गोळवलीस गेले व त्यांनीं आपल्या घरास स्वहस्तें आग लावून त्याची राख पेशव्यांचे पालखीवर टाकून बोलले कीं, " तुम्हीं आमच्या घराण्याची राखरांगोळी केली. तुमचेंही असेंच वाटोळें होईल." यानंतर पेशव्याचे राज्यांत पाणी प्यायचें नाहीं, अशी प्रतिज्ञा करून सातारचे हद्दींत पंढरपुरास पाध्ये मंडळी जाऊन राहिली.

ही सारी हकीकत देऊन पांगारकरांनीं जुन्या बखरींचे उतारे देऊन पाध्यांची बाजू घेतली, याबद्दल सान्यांनीं पांगारकरांवर गहजब केला. त्यांची मुदलांत समजूत अशी कीं, पांगारकर कऱ्हाडे म्हणून त्यांनीं पाध्यांची बाजू घेतली, व पांगारकरांच्या जातिपक्षपाताच्या मुद्यावर जोर देऊन म्हटलें कीं, " पांगारकरांना जातीचा अभि-

मान फार, म्हणून त्यांनीं पाध्यांची बाजू उचलून धरली." परंतु येथें साने सपशेल चकले. पांगारकर देशस्थ ब्राह्मण हें त्यांना कळल्यावर चित्पावन जोशांची कड घेतल्याबद्दल तेच खरे जात्यभिमानी ठरले, ही गोष्ट वादांत बाहेर आली. राजवाडे यांनीं माधवराव पेशवे यांचा निवाडा प्रसिद्ध करून पांगारकरांचें मत पाध्येप्रकरणीं कच्चें व निराधार असल्याचें जाहीर केलें. पण पाध्ये विरुद्ध जोशी वादांत दोघेही पेशवे जोशांचे पक्षपाती असा मूळ मुद्दा असतां पेशव्याचें निवाडपत्र प्रसिद्ध करून वादाचा निकाल कसा लागणार होता ? पण पुढें सत्यास वाचा फुटावी त्याप्रमाणें पाध्ये यांचे तर्फेचा पुरावा भा. इ. सं. मंडळाच्या एका सभेंत अचानक पुढें आला. 'शिवकालीन शास्त्री-पंडित' या विषयावर पटवर्धन यांनीं एक निबंध वाचला. त्यांत शेणव्यांच्या जातिधर्मनिर्णयासाठीं शिवाजी राजांनीं जे शास्त्री-पंडित बोलाविले, त्यांची ऐतिहासिक यादीही वाचली. त्यांत काशीच्या गंगाकांठच्या व कृष्णागोदावरीच्या कांठच्या पंडितांबरोबर राजापूर—संगमेश्वराच्या धर्माधिकाऱ्यांचीं नांवेंही स्पष्ट दिलीं होतीं. त्यांत संगमेश्वर प्रांताचे धर्माधिकारी म्हणून गळवल्लीकर• पाध्यांचें नांवही पटवर्धनांनीं यादींत वाचलें. तेव्हां पांगारकराशीं वाद घालणारी चाणाक्ष मंडळी चमकली. इतिहाससंशोधक मंडळाच्या त्या सभेंत पांगारकरही हजर होते. त्यांनीं पटवर्धनांस तो भाग पुनः वाचण्यास सांगितलें. तेव्हां संभावितपणाचा आव घालून परांजपे म्हणाले, "शेणव्यांच्या जातिसंबंधाचा हा निवाडा आहे. बाब क्षुल्लक आहे." मेहेंदळे म्हणाले, "इतिहासास याचा उपयोग नाहीं. हा कागद बाजूस टाकावा." सभेंत गोष्टी येवढ्याच झाल्या. पण मंडळाच्या १८३५ च्या वृत्तांतांत सदर निवाडपत्र सभेंतील संभाविती विसरली जाऊन सरळ छापलें

गेलें व अशा रीतीनें पेशव्यांच्या पूर्वीचा १०० वर्षांपूर्वीचा निः-संदिग्ध पुरावा पाध्ये यांच्या बाजूनें मिळाल्यानें दोन्ही पेशव्यांचीं निवाडपत्रें व साने—राडवाड्यांचे बोल पार फोल ठरले.

बाबूजी नाईक व नानासाहेब दोघेही स्वतःच्या मतलबासाठीं कारस्थानी डाव खेळणारे म्हणून बाबूजी विरुद्ध नानासाहेबांनीं केलेला कारस्थानीपणा समजूं शकतो. पण पाध्ये राजकारण खेळ-णारे नव्हते. मोठ्या विद्वत्तेसाठीं व धर्मबुद्धीसाठीं त्यांचें घराणें प्रसिद्ध होतें. अशा सच्छील घराण्याविरुद्ध पेशव्यांनीं जोशाचा आप्तपणा मनीं धरून जो अन्याय केला, तो माधवरावाच्या मनांतही डाचत होता यांत शंका नाहीं. कारण पुढें पानिपतची ठोकर जेव्हां पेशव्यांचे सर्वच घराण्यास बसली व त्या दुःखाच्या परि-हारार्थ माधवरावानें ज्या अनेक चांगल्या गोष्टी केल्या, त्यांत पाध्यास १२०० रु. दक्षिणा प्रथम ठरवून दिली, ही होय; व अशा प्रकारें झालेला अन्याय निकालांत काढला.

पेशवे काय, पाध्ये काय, आम्ही दोघेही आमचेच समजतों आणि सत्तेवर आल्यावर पेशव्यांनीं ज्या चांगल्या गोष्टी केल्या, त्यांची प्रशंसा प्रांजलपणें करण्यास जशी आमची तयारी आहे, तीच प्रांजलपणाची नीति मनीं धरून त्यांनीं जेथें अन्याय केला तेथें त्यास अन्याय म्हणावा, याच बुद्धीनें वरील गोष्टी आम्हीं दिग्दर्शित केल्या आहेत.

मोरोपंतांवरील ग्रंथ लिहिल्यानंतर इंग्रजींतील Men of letters च्या चारित्रमालेच्या धर्तीवर संतचारित्रमाला लिहिण्याचें कार्य पांगारकरांनीं सुरू केलं. यांत एकनाथ महाराजांचें चरित्र, ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र व इतर अनेक छोटीं छोटीं संतचरित्रें पांगारकरांनीं कांहीं स्वतंत्रपणें व कांहीं मुमुक्षुद्वारा प्रसिद्ध केलीं;

पण ज्यावर त्यांनीं मोरोपंताइतके नाहीं, पण त्याच्या खालोखाल परिश्रम घेतले व संतचरित्रमालेंत नांव घेण्यासारखें जें चरित्र लिहिलें गेलें तें म्हणजे पांगारकरांचें 'तुकारामचरित्र' होय. तुकारामाच्या चरित्राचीं साधनें जुळविण्यांत, त्यासाठीं देहूच्या वाऱ्या करण्यांत, तुकारामाच्या निरानिराळ्या गाथ्यांचीं परीक्षणें करण्यांत, व तुकाराम महाराजांच्या अभंगांतून त्यांचें खरें चरित्र हुडकून काढण्यांत पांगारकरांनीं पांच वर्षें तरी घालविलीं व सुमारें ५०० पृष्ठांचा ग्रंथ त्यांचा जेव्हां लिहून तयार झाला, तेव्हां ते आकंठ कर्जांत बुडालेले होते. तेव्हां या चरित्राच्या प्रकाशनासाठीं कोणाची तरी मदत मिळावी, असें मनांत धरून इंदोरचे श्रीमंत तुकोजीराव होळकरांची माथेरानांत पांगारकरांनीं गांठ घेतली व तुकारामचरित्राचें हस्तलिखित दाखवून त्यांतील कांहीं भाग त्यांचे कानींहि घातला; तेव्हां "तुकारामचरित्राचे छपाईची व्यवस्था आम्ही करूं" म्हणून श्रीमंत बोलले व कर्जांत डुबलेल्या पांगारकरांना हा श्रीमंतांचा शब्द ऐकून मोठाच आनंद झाला.

पण तोंड आणि घास यांत केव्हां केव्हां फार अंतर पडतें या म्हणीचा पांगारकरांना या प्रकरणीं चांगलाच अनुभव आला. त्याचप्रमाणें मनुष्याचें भाग्य केव्हां, कोठून, कसें फळफळेल याचा देवांनाहीं पत्ता नसतो, तर त्याचा त्याला काय अंदाज येणार? या संस्कृत सुभाषिताचाही पांगारकरांना या वेळीं पुरेपूर प्रत्यय आला.

"तुकारामचरित्र छापण्याची व्यवस्था होईल" हे श्रीमंत तुकोजीराव बोलले माथेरानास, पांगारकर आले परत पुण्यास, व कित्येक महिने बोलणें राहिलें मधल्यामध्येंच! तेव्हां पांगारकरांनीं स्मृतिपत्रें पाठविण्यास सुरवात केली. त्यांची दाद तरी कोण घेतो? पण हो ना करितां उत्तर आलें कीं, " ग्रंथकारांना उत्तेजन देण्या-

साठीं कमेटी नेमली आहे. तेव्हां पुस्तकाबाबत काय द्यावयाचें तें कमेटीकडून रीतसर कळविण्यांत येईल. तिकडे विचारणा करावी." श्रीमंतांचें हें उत्तर वाचून पांगारकर थोडे चक्करच झाले. पण गरजवंताला अक्कल नाहीं या न्यायानें पांगारकरांनीं बुककमेटीच्या अध्यक्षास पत्र लिहिलें. बुककमेटीचे अध्यक्ष डॉ. तांबे यांनीं उत्तर दिलें कीं, तुकारामचरित्राची प्रत घेऊन इंदूरला यावें. त्याप्रमाणें काखोटीस हस्तलिखित घालून इंदूरास पांगारकर गेले. बुककमेटीवर माणसें होतीं त्या वेळीं एकंदर तीन. एक डॉ. तांबे स्वतः, दुसरे शाळाखात्याचे इन्स्पेक्टर रानडे व तिसरे पुण्याचे वासुदेवराव आपटे. पांगारकरांची वाङ्मयकीर्ति कमेटीचे मेंबरांस माहीत नव्हती असें नाहीं. शिवाय तुकोजीरावांचें व त्यांचें प्रत्यक्ष बोलणें झालेलें. तेव्हां पांगारकरांस १००० रुपये तरी मदत करावयाची हें डॉ. तांबे यांनीं मनोमन ठरवूनही ठेविलें; पण कमेटीवर बुक पाहाण्याचें नाटक इतर मेंबरांसाठीं तरी करणें त्यांना भाग होतें. तेव्हां त्यांनीं कमेटी बोलावली. मनांत हेतु हा कीं, पुस्तक वरवर पाहून मदतीचा ठराव सर्वानुमतें करावा. त्याप्रमाणें त्यांनीं रानड्यांस ही आपली योजना सांगून ठेविली व त्यांची संमतिही मिळविली. पण प्रत्यक्ष कमेटी जेव्हां बसली, तेव्हां वासुदेवराव आपट्यांत कमेटीच्या मेंबरपणाचा संचार होऊन ते पांगारकरांस म्हणाले, "हें पाहा पांगारकर, हस्तलिखितांतील प्रत्येक वाक्य नी वाक्य आम्हांस तपासलें पाहिजे." तेव्हां पांगारकर उत्तरले "ग्रंथ अजून पुरा झाला नाहीं व त्यांत मी शेवटपर्यंत दुरुस्ती करीत राहणार." तेव्हां सूनबाईस सासूबाईनें मोठ्या ठसक्यानें बोलावें, त्या थाटांत आपटे म्हणाले," अगोदर तुमच्या सर्व दुरुस्त्यांसह ग्रंथ पुरा करून आणा. नंतर योग्य ते फेरफार आम्हीं सुचवूं. ते फेरफार कायम सम-

जून तुम्ही ग्रंथ छापा. मग नियमाप्रमाणें आम्हांला काय मदत करावयाची ती आम्ही करूं." सुरवातीपासूनच आपट्यांचा नूर ठीक नव्हता. त्यांतून हा त्यांचा अतिशिष्टपणा पाहून पांगारकर मनोमन उखडले. उभे राहून ते आपट्यांस ताठ्यानेंच बोलले कीं, "मिस्टर आपटे, मी कांहीं कोणी भाडोत्री सांगकाम्या लेखक नाहीं. माझ्या पुस्तकांतील एक अक्षरही मी कोणास बदलूं देणार नाहीं." तेव्हां बुककमेटीच्या मेंबराची सर्व आढ्यता आपल्या स्वरांत आणून आपटे म्हणाले कीं, "मग या तुमच्या पुस्तकाच्या बाबतींत कमेटीस कांहींच करतां येणार नाहीं." तेव्हां हस्तलिखित परत काखेंत घालून पांगारकरही आपट्यांवर गरजले कीं, "तुमच्या कमेटीस मी कःपदार्थ समजतों. मला जें योग्य वाटतें तेंच मी लिहीन व तेंच छापीन." अशा प्रकारें इंदूर बुककमेटीच्या मदतीचा सर्वच पट उधळला गेला. मोरोपंतांच्या चरित्रांतील नानासाहेब पेशव्यांवरील विधानाचा डंख मनांत धरूनच तुकारामचरित्राच्या बाबतींत आपट्यांनीं आपला इंगा पांगारकरांस दाखविला असावा. पांगारकरांवर श्रद्धा असणाऱ्या तांब्यांना याची कांहींच कल्पना नव्हती. पांगारकरांना दरबारी मदत करण्याच्या त्यांच्या इच्छेवर तरी कमेटींत सारें थंड पाणी पडलें व त्यांना थोडें वाईटही वाटलें.

पण पांगारकरांचा कर्मधर्मसंयोग त्या दिवशीं कांहीं विशेषच होता. हा प्रकार कमेटींत झाला तो कमेटीपुरता. त्याची वार्ता गावास कांहींच नव्हती. उलट ह. भ. प. पांगारकरांचें, संध्याकाळीं टौन हॉलमध्यें व्याख्यान आहे, हीच वार्ता गांवभर विशेष होती व संध्याकाळीं पांगारकरांचें व्याख्यान ऐकण्यासाठीं टाऊन हॉल नुसता फुलून निघाला होता. "मराठी वाङ्मयाचें ऐश्वर्य व सामर्थ्य" या विषयावर वाङ्मयतपस्वी पांगारकरांचें इंदूरच्या जनसंमर्दापुढें दोन

तास भरघोस व्याख्यान झालें व कमेटींतील सर्व प्रकार मनापुढून दूर सारून त्या जातिवंत वाङ्मयभक्तानें संतविचारसुमनांचा जनमनगणावर इतका वर्षाव केला कीं, त्याच्या सुगंधानें व सौरभानें तेथें जमलेलें इंदूर पांगारकरांवर बेहद्द प्रसन्न झालें व पांगारकरांच्या या सुंदर व्याख्यानाची कौतुकवती वार्ता खुद्द श्रीमंत तुकोजीरावांच्या कानावर दरबारी मानकऱ्यांकडून व्याख्यानानंतर लगोलग गेली. व्याख्यान आटोपल्यावर डॉ. तांबेही राजवाड्यांत गेले, तेव्हां श्रीमंत त्यांना म्हणाले, "व्याख्यान इतकें सुंदर होणार हें आम्हांस माहीत असतें तर आम्हीही समक्ष आलों असतों." यावर डॉ. तांबे म्हणाले, "व्याख्यान येथें राजवाड्यांतही होऊं शकतें. त्यासाठीं एवढी दिलगिरी कशाला ?" "आपली ऐकण्याची तयारी आहे. आज रात्रीं राजवाड्यांतच गच्चीवर कार्यक्रम होऊं द्या" म्हणून श्रीमंत म्हणाले. एक क्षणाचाही वेळ न दवडतां डॉ. तांबे यांनीं टेलिफोन करून पांगारकरांस वर्दी दिली व मोटारींतून पांगारकर राजवाड्यांत आले. पांगारकरांच्या वाणीचा रसरंग राजवाड्यांत राजेसाहेबांसमोर पुनः त्याच थाटांत उधळला गेला. वक्तृत्वाची देणगी पांगारकरांजवळ होतीच. तसि त्यांच्या पाठांतरानें अधिकच रंग चढे. प्रत्यक्ष व्याख्यान ऐकून तुकोजीराव निहायत खूष झाले. त्यांना माथेरानची भेट आठवली व त्यांनीं पांगारकरांस विचारलें कीं "तुकारामचरित्र छापण्यास साधारण काय खर्च येईल ?" "३००० रुपये" म्हणून पांगारकर बोलले व आजवर केलेल्या वाङ्मयतपाची सिद्धि म्हणूनच कीं काय किंवा आपट्यांच्या शिष्टतेचा पांगारकरांच्या सुदैवानें सूड घ्यावयाचें ठरविलें म्हणून कीं काय या खेपेस तुकारामचरित्राच्या छपाईसाठीं ३००० रुपये इंदूरास पांगारकरांचे मुक्कामीं

३२७९६ निर्णय १५५५ १२१०

वाट चालत आले. बुककमेटींत झालेला प्रकार डॉ. तांबे यांनीं श्रीमंतांच्या कानावर घातला, तेव्हां श्रीमंत हंसले. त्याचा अर्थ होता, हाय रे आपटे !

पांगारकरांचें सुदैव इतक्यावरच थांबलें नाहीं. Spiritual Teacher या नात्यानें इंदूर राजघराण्याशीं त्यांचा संबंध यानंतर पुढें २।३ वर्षें आला. पांगारकरांचीं अधिक प्रवचनें ऐकण्यासाठीं श्रीमंतांनीं त्यांना ठेवून घेतलें. त्यामुळें पांगारकरांचा राजयोग सुरू झाला.

खुद्द श्रीमंत तुकोजीरावांनीं पांगारकरांचीं प्रवचनें अशीं थोडींच ऐकलीं असतील. पण पांगारकरांच्या सान्निध्याचा ज्ञानदायक उपयोग श्रीमंत सौ. इंदिराराणीसाहेबांनीं मात्र मनापासून करून घेतला. महाराष्ट्रांत अलीकडच्या काळांत होऊन गेलेली थोर संतविभूति प. प. श्रीवासुदेवानंद स्वामीमहाराजांचा राणीसाहेबांचे संस्कारी मनावर बालपणापासून अनुग्रह असल्यानें संतवाणीकडे व अध्यात्मविषयाकडे त्यांचा जात्याच ओढा आहे. पांगारकरांपासून मनाचे श्लोक, त्यानंतर दासबोध त्यांनीं अनुक्रमानें समजून घेतला, व हा शिकविण्याचा काळही पांगारकरांचा मोठ्या आनंदांत गेला. गत आयुष्यांत काढिलेल्या सर्व आर्थिक आपदा बाजूस होऊन राजशाही संपदेचा त्यांस उपभोग मिळाला. त्यामुळें मागल्या दुःखाची या वेळीं भरपाई झाली. दरबारी राहाणें, भरपूर तनखा, दिमतीला मोटार व भोजनाला सुग्रास पक्वान्नें करून घालणारा आचारी व काम काय, तर राणीसाहेबांपुढें एकदोन तास प्रवचन करणें ! असा एकंदर या वेळीं पांगारकरांचा थाट होता. संतवाङ्मयसंशोधनासाठीं आजवर त्यांनीं जीं हाडाचीं काडें केलीं, तें सारें तप या वेळीं जणूं इंदूरच्या रूपानें फळास आलें. महा-

राष्ट्रांत वाङ्मय लिहून श्रीमंत असा कोणी झाला नाहीं. वाङ्मय छापणारे प्रकाशक श्रीमंत झाले. तेव्हां देऊन देऊन महाराष्ट्र असा पांगारकरांस कितीसा श्रीमंत करणार होता ? दिलदार व उदार तुकोजीरावांनीं एकमुठीनें जें पांगारकरांस दिलें, त्यानें आर्थिकरीत्या तरी पांगारकरांच्या वाङ्मय तपश्चर्येचें व वाणी-लेखणीचें चीज केलें; त्याबद्दल श्रीमंत तुकोजीराव निःसंशय प्रशंसेस पात्र आहेत.

एक दिवस पांगारकरांनीं नाशकास जावयाची गोष्ट काढतांच श्रीमंत तुकोजीरावांनीं विचारलें,"नाशकास काय तुमचें घर आहे?" "छे छे" पांगारकर म्हणाले, "नाशकास माझें घरदार कांहीं नाहीं. हा देह उभा राहील तेवढीच त्याची जागा." तेव्हां श्रीमंतांनीं विचारलें, "नाशकास घर घेण्यास साधारण किती रुपये पडतील ?" पांगारकरांनीं उत्तर दिलें, "२५००० (पंचवीस हजार) रुपये" आणि काय आश्चर्य, पांगारकर इंदूराहून नाशकास येतात तों मागाहून पंचवीस हजार रकमेचा इंपीरियल बँकेचा चेक त्यांच्या नांवाचा त्यांचे हातांत पडला ! घर घेऊन स्थाईक व्हावें या सदिच्छेनें श्रीमंत तुकोजीरावांनीं पांगारकरांना रक्कम दिली, पण घर घेण्यास तोंडची रक्कम मिळूनही पांगारकरांच्या हयातींत घर घेणें मात्र त्यांस झालें नाहीं.

पांगारकरांचें इंदुरांत राहणें जसें स्वच्छंद होऊं लागलें, तशा त्यांच्याविरुद्ध नृपांगणगतांच्या कारवायाही सुरू झाल्या. त्याचा सुगावा पांगारकरांस लागून त्यांनीं इंदूर सोडावयाचें आपणहूनच ठरविलें. दुसरें, त्यांचें वाङ्मयकार्यही इंदूरच्या राजोपचारांत मागें पडूं लागलें. याचीही टोचणी त्या वाङ्मयभक्ताच्या मनास मधून मधून होऊं लागली. इंदूर या कारणासाठीं सोडण्याचें ठरविल्यानंतर ते आपल्या घरीं लिहितात, " येथें आतां करमत नाहीं.

कंटाळा आला आहे. वर्षभर बंद केलेला मुमुक्षु पुनः चालू करावा व योजलेलें ग्रंथलेखन पुनः सपाट्यानें सुरू करावें असे विचार मनांत येत आहेत. आपल्या आयुष्याचें मुख्य कर्तव्य ग्रंथरचना, तें येथें राहून साध्य होणें शक्य नाहीं. " वाङ्मयग्रंथरचना करणें हें पांगारकरांच्या जीवनाचें मुख्य ध्येय होतें. तें इंदुरास खुंटलें. हें बरें न वाटून व आपल्या ध्येयकार्यास पुनः लागण्याचा निश्चय करून पांगारकर नाशकास आले.

मध्यंतरींच्या काळांत त्यांचा 'तुकारामचरित्रा' चा ग्रंथ बाहेर पडला. हा पांगारकरांचा ग्रंथ वारकरी संप्रदायाचा रहस्य-ग्रंथच झाला आहे. आधीं तुकाराम म्हणजे महाराष्ट्रांतील बहुजन समाजाचा प्रतिनिधि म्हणून बहुत लोकप्रिय. त्यांत त्यांची अभंग-वाणी म्हणजे त्यांच्या प्रेमळ परमार्थाची प्रत्यक्ष लोकहृदयांत हमखास जाऊन पोंचणारी प्रत्यक्ष मूर्तिच; शिवाय पांगारकरांनीं हें चरित्रही अशा खुबीनें लिहिलें आहे कीं, जणुं तुकारामच स्वतः आपलें आत्मचरित्र सांगत आहेत. विविधज्ञानविस्तारानें या पुस्त-कावर अभिप्राय देतांना लिहिलें आहे कीं, "या ग्रंथांत वारकरी पंथाचीं प्रमेयें व विधिनियम, ज्ञाननिष्ठ सगुणोपासनेचें तत्त्व, चित्त-शुद्धीचे उपाय, नामसंकीर्तनाचें महत्त्व, भक्तिरसाचा आनंद इ. अनेक गोष्टींचा सांगोपांग विचार मुख्यतः तुकोबाच्या अभंगाच्या आधारानें केला आहे. तुकोबाच्या संसाराची होळी झाल्यावर ते एकांतांत भगवद्भजन कसे करूं लागले, त्यांनीं ग्रंथावलोकन कसें केलें, चित्तशुद्धीचे उपाय त्यांनीं एकावर एक कसे योजले, आस्ते आस्ते त्यांच्या जीवनाला भक्तिभावाचा रंग कसा चढत चालला, पूर्वींच्या वैतागाला समाधानाचें व निःस्पृहतेचें स्वरूप कसें आलें व अखेर जीवन्मुक्त स्थितीच्या पराकोटीला तुकाराममहाराज कसे

पोंचले, याचें फार मनोवेधक वर्णन करतांना रा. पांगारकरांचें तादात्म्य झालें आहे. रा. पांगारकरांच्या वाणीचा ओघ अस्खलित असून तींत श्रद्धेची मोहिनी आहे, हें कबूल केलें पाहिजे." न्या. सर नारायणराव चंदावरकरांनाही हें चरित्र आवडून त्यांनीं पांगारकरांस मुद्दाम पत्र लिहून कळविलें कीं, "Your biography of Tukaram is attractive in style and matter. It holds fast the interest and tempts one to read on." मोरोपंतांच्या चरितांतील भाषेपेक्षां तुकारामचरिताची भाषा अधिक ओवेवती व परिणामकारक झाली आहे, यांत शंका नाहीं. तुकारामाच्या जीवनाचे कालनिर्णय ठरवितांना पांगारकरांना फारच श्रम पडले. या चरित्राचे बाबतींत त्यांचें कालनिर्णयाचें संशोधन इतरांच्या मतापेक्षां आजवर बहुतेक साहित्यिकांनीं ग्राह्य मानलें आहे. भक्तिमार्ग-प्रदीपाच्या खालोखाल हा पांगारकरांचा ग्रंथ सर्व महाराष्ट्रजनतेंत पसरला व खपला. तुकोबाच्या अभंगांबरोबर या चरित्राचीं पारायणें करणारे वारकरी निघाले, हा त्या ग्रंथाचा गुण होय. तुकारामाचे चरित्राप्रमाणेंच रामदासांचें चरितही पांगारकराच्या मनांत लिहावयाचें होतें; व रामदासी वाङ्मयाची उपासना त्यांची दोन तपाची तरी झाली होती. पण धुळ्याच्या समर्थभक्त देवांच्या "मी रामदासीचरित्र लिहिणार आहें." अशा जाहिराती फार पूर्वीच्या काळापासून लागल्या असल्यानें पांगारकरांनीं तो विचार सोडून दिला. आळतेकरांप्रमाणें पांगारकरांनींहि आपलें रामदासी—चरित्र लिहून प्रकाशिलें असतें तर बरें झालें असतें, असें आतां देवांचे दोन खंड पाहून वाटतें. तरी पण रामदासी वाङ्मयावर 'सार्थ दासबोध' 'सार्थ मनोबोध' व 'समर्थ संजीवनी' असे साधन-ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केलेच.

पण इंदूर सोडून नाशकास येऊन राहिल्यानंतर पांगारकरांनीं पूर्वायुष्यांतच योजलेले ' मराठी वाङ्मयाचे इतिहास खंड ' लिहिण्याकडे पुढचें आपलें सर्व आयुष्य लावलें. हा वाङ्मयेतिहास मराठी भाषेच्या प्रारंभापासून सुरवात करून आजच्या कालापर्यंत त्यांना आणून सोडावयाचा होता व सुरवातीपासून त्यांची योजना हा इतिहास पांच खंडांत लिहावयाचा अशी होती. त्यांतील शेवटच्या दोन खंडांत आधुनिक वाङ्मयाचा इतिहास येणार होता. पण ज्या संतवाङ्मयाचा अभ्यास व संशोधन हें त्यांनीं आपलें जीवितकार्य म्हणून आयुष्याच्या सुरवातीपासून योजलें होतें, ज्या संतांच्या वाङ्मयासाठीं सुरवातीस त्यांनीं सर्व तऱ्हेच्या आपदा भोगल्या व ज्या संतवाङ्मयाच्या गोडीपुढें इंदूरचा राजोपभोगही त्यांस नीरस वाटला, ते संतवाङ्मयाचे तीन खंड लिहून होतांच पांगारकरांच्या आयुष्यतरूचा जीवनरसच आटला व पुढील दोन खंड लिहिण्याचें कार्य ( जें त्यांना फारसें आवडलें नसतें ) त्यांचें तसेंच अपुरें राहिलें.

पण पांगारकरांच्या दृष्टीनें पहिल्या तीन खंडांचें महत्त्वच अधिक आहे. बहुतेक मराठी वाङ्मय, प्राचीन व अर्वाचीन, गद्य व पद्य नजरेखालून गेल्यावर व मराठी सर्व संतवाङ्मयाच्या समुद्रांत चांगलीं तीन तपें अवगाहन केल्यावर या वाङ्मयेतिहासाच्या कार्यास आपल्या परिपक्व दशेंत पांगारकरांनीं हात घातला. "परिणतप्रज्ञस्य वाणीमिमाम्" असें भवभूतीनें उत्तररामचरित्राला उद्देशून म्हटलें, त्याप्रमाणें माझ्या या इतिहासखंडाविषयीं मी म्हणूं शकतों, असें पांगारकरांनीं या खंडाविषयीं स्वतः लिहिलें आहे.

मराठी वाङ्मयेतिहासाच्या पहिल्या खंडाला ' ज्ञानेश्वर-नामदेवांचा काळ ' असें साभिप्राय नांव पांगारकरांनीं दिलें आहे. यांत

महाराष्ट्र भाषेच्या उत्पत्तीपासून प्रारंभ करून तिच्या चढत्या वाढत्या विकासाचा इतिहास ज्ञानेश्वर-नामदेवांच्या कालाअखेर आणून सोडला आहे व या इतिहासास प्राचीन वैदिक परंपरेपासून उपोद्घात लिहून मधल्या भागांत महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्रीची बनत चाललेली मराठी, तसि मुकुंदराज, महानुभाव व ज्ञानेश्वर यांनीं दिलेलीं वळणें व रूप यांचें साद्यंत विवेचन केलें आहे. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथापेक्षां हा ग्रंथ अनेक दृष्टीनें भरदार झाल्याचे अभिप्राय अनेकांनीं दिले आहेत. या खंडांतील 'ज्ञानेश्वरीचें अंतरंग' या प्रकरणाचें आध्यात्मिकदृष्ट्या व 'ज्ञानेश्वरी-सृष्टि' या प्रकरणाचे साहित्यिकदृष्ट्या अत्यंत मूल्य असल्याचें अनेकांनीं लिहिलें आहे. यांत मराठी भाषेच्या उत्पत्तिविकासाची केवळ जंत्री न घेतां भाषेच्या इतिहासाची फारच पल्लेदार दृष्टि पांगारकरांनीं वापरली आहे. तिचें महत्त्व ध्यानीं न घेऊन कांहीं शुष्क भाषाकोविदांनीं या ग्रंथावर आक्षेप घेतले आहेत; पण ते फारसे विचारांत घेण्याचे लायकीचे नाहींत. दुसरा खंड 'एकनाथ-तुकारामाचा काल' या नांवानें पांगारकरांनीं प्रसिद्ध केला आहे. यांत एकनाथ, तुकाराम व त्यांचे समकालीन यांच्या वाङ्मयाची मुख्यत्वेंकरून ओळख करून दिली आहे; व प्रसंगानें दक्षिणेंतील मुसलमानी राजसत्ता, बेदरची पाच्छाई इ. ऐतिहासिक प्रकरणें लिहून नृसिंहसरस्वतीचा दत्तसंप्रदाय, दासोपंत व त्यांची अफाट कविता, यानंतर एकनाथांचें चरित्र व त्यांचा भागवत ग्रंथ यांचें विवेचन करून तुकारामाच्या काळाचे व त्याच्या समकालीन वाङ्मयाचें दर्शन मोठ्या भाविकपणें पांगारकरांनीं या खंडांत करविलें आहे. तिसरा खंड 'रामदास खंड' या नांवानें प्रसिद्ध झाला आहे. यांत खुद्द रामदासाचें चरित्र व वाङ्मय, रामदासीपंचायतन

व नंतरच्या समर्थभक्तांच्या वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे.

अशा प्रकारें आपल्या वाङ्मयग्रंथाची इमारत पांगारकरांनीं जी उभारली तिच्या मुख्य मुख्य इमल्याची व त्यांतील दालनांची माहिती आहे. (महाराष्ट्रांतील पहिलें मराठी वाङ्मय मुख्यत्वेंकरून धार्मिक स्वरूपाचें व संतांनीं केलेलें असल्यामुळें त्यावर रसाळपणें व भाविकपणें लिहिण्यास पांगारकरांशिवाय दुसरा योग्य पुरुष गेल्या पिढींत झाला नाहीं. त्यांनीं आपलें सर्व आयुष्य हें वाङ्मय अभ्यासण्यांत व बोलून, लिहून दाखविण्यांतच वेंचलें व त्या दृष्टीनेंच पांगारकरांकडे पाहिलें पाहिजे. धार्मिक दृष्टि नसणारांना त्यांचें वाङ्मय रुचणार नाहीं. पण हा त्या वाङ्मयाचा दोष नव्हे. तो दोष धर्महीनतेचा आहे. धार्मिक दृष्टीच्या लोकांनीं त्यांच्या या वाङ्मयाचा सत्कार नेहमीं केला.

ज्या पांगारकरांनीं आपल्या जीवनाच्या सुरवातीपासून मराठी भाषेच्या सेवेचें व्रत वाणीलेखणीनें अंगिकारलें व ज्यांनीं तें आपत्तींत तसेंच संपत्तींत चालविलें, ज्यांनीं मराठी भाषेचे एक हजार वर्षांचे संत व त्यांचें वाङ्मय महाराष्ट्रासमोर आणलें व ज्यांनीं दहा हजार पृष्ठांची भर मराठी भाषेंत आपल्या ग्रंथरचनेनें घातली, त्या मराठी भाषेच्या मानकऱ्यांस महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद मिळणें अत्यंत अवश्य होतें. पण पांगारकरांच्या कुंडलींत काय ग्रहयोग असतील ते असोत ! हा साहित्यिक सन्मान त्यांना हयातींत प्राप्त झाला नाहीं. साहित्यसम्राट् केळकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, शिवराम महादेव परांजपे इ. सर्व साहित्यसूरींना योग्य प्रकारें हा मान दिला गेला. यांच्या पंक्तींत बसण्याची पांगारकरांची निःसंशय योग्यता व तशी त्यांची साहित्यिक कामागिरीही होती. पुढें पुढें तर महाराष्ट्र साहित्य–

संमेलनाचें अध्यक्षपद इतकें सवंग झालें कीं, ज्यांनीं आपल्या चार कादंबऱ्यांची व लघुकथांची पोरसवदा भर मराठी साहित्यांत टाकली, अशा साहित्यिक पोरांसही महाराष्ट्र साहित्य–संमेलनाचें अध्यक्षपद देण्यांत आलें. इतकेंच काय, मराठी साहित्यांत चटोर विनोद पिकविणाऱ्या व थिल्लर गमती लिहिणाऱ्यांसही या गंभीर व प्रौढ आसनावर मानानें बसविण्यांत आलें! पण पांगारकरांस कांहीं हा मान मिळूं शकला नाहीं. मोरोपंतांच्या चरित्रांत पांगारकरांनीं अशी एक गोष्ट दिली आहे कीं, श्रीमंत बाबूजी नाईक बारामतीकर यांच्याकडे मोरोपंत जेव्हां वडिलांसमवेत राहूं लागले, तेव्हां लवकरच मोरोपंतांची कवित्वकीर्ति नाइकांच्या कानावर गेली. नाइकांच्या पंगतींत आतांपर्यंत फार खालच्या नंबरावर पण आपल्या वडिलांच्या शेजारीं मोरोपंत जेवावयास बसत असत. तेव्हां आपल्या या पंडित कवीस मान देण्याच्या इच्छेनें एक दिवस नाइकांनीं मोरोपंतांस आपल्याजवळ वरच्या पाटावर येऊन बसण्यास सांगितलें; पण शालीन मोरोपंत यजमानाचा शब्द ऐकूनही व हेतु समजूनही जागचे उठेनात. तेव्हां एका शहाण्या माणसानें हळूंच नाइकांच्या कानांत सुचविलें कीं, वडिलांस खालीं ठेवून चिरंजीव वरच्या पाटावर बसणार नाहींत. आपण मोरोपंतांच्या वडिलांस वर हांक मारा म्हणजे मग चिरंजीव त्यांचे खालीं पण आपल्या इच्छेप्रमाणें वर येऊन बसतील. नाइकांनीं तसें करतांच कुलीन मोरोपंत, वडील वरच्या पाटावर येऊन बसतांच त्यांचे शेजारीं येऊन बसले. आश्चर्य असें कीं, मोरोपंतांचा हा साधा कुलीनपणा एकाही तरुण साहित्यिक अध्यक्षानें वाङ्मयवृद्ध व वयोवृद्ध पांगारकर हयात असतां, साहित्य–संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारतांना दाखविला नाहीं. ज्यानें त्यानें

मागचा पुढचा विचार न करतां आपलें आसन पटकाविलें. हीं आमची सभ्यता ! व ही आमची साहित्यिक संस्कृति ! ! साहित्य-संमेलन आपल्या गांवीं भरविणाऱ्या कांहीं गांवांनीं आपणास हवा असलेला साहित्यिक इसम अनेक अंतर्गत गट-बाजीच्या कारवाया करून निवडून आणला. पण दुर्दैव पांगार-करांचें कीं, असा अभिमान कोणा साहित्यिक गावानें त्यांचेविषयीं दाखविला नाहीं ! बरें, साहित्यसंमेलनांशीं पांगारकरच फटकून वागत होते असें म्हणावें तर तसेंही नाहीं. साहित्य-परिषद व साहित्यसंमेलनाच्या सुरवातीपासून, नव्हे तर, त्या संस्था स्थापन व्हाव्या असें म्हणणारांत सुद्धां पांगारकर अग्रेसर. अनेक साहित्य-संमेलनांस पांगारकर हजर राहिले व त्यांनीं त्यांतून व्याख्यानें दिलीं. असें सर्व असतां पांगारकर साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष कां होऊं शकले नाहींत, हा एक विचाराचा प्रश्न आहे.

या बाबतींत एक कारण असें दिसतें कीं, ज्या काळांत पांगार-करांच्या वाङ्मयाची समाजांत चहा होती, त्या वेळीं साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदीं इतर मिरासदार बड्या धेंडांचे क्रम लगोलग लागले, व कांहीं तर संमेलनाचे दोनदां अध्यक्ष झाले व या शर्यतींत पांगारकरांच्या नांवाचें घोडें मागें राहिलें; आणि पुढें तर काय ? साहित्यिक म्हणविणारा महाराष्ट्रांतील समाज सर्व-साधारण फैलावत जाणाऱ्या पाखंडानें पांगारकरांच्या धार्मिक वाङ्मयाकडे सरळ पाठ फिरविणाराच बनत चालला ! पांगार-करांच्या ग्रंथावर पद्धतीप्रमाणें पल्लेदार अभिप्राय जरी वर्तमान-पत्रांतून येत गेले, तरी पांगारकरांच्या ‘ धार्मिक वाङ्मयास ’ मुदलांतच ‘ वाङ्मय ’ न समजण्याइतकी दृष्टि ‘ पुरोगामी ’ झाली ! किंबहुना ‘ नाटक, कादंबऱ्या, लघुकथा ’ हेंच फक्त

'वाङ्मय' म्हणून समजणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रांत दिवसेंदिवस अधिक वाढली. पांगारकरांची 'धार्मिकता' आणि त्यांच्या वाङ्मयाचें 'धार्मिक स्वरूप' याच गोष्टी नवीन पुरोगामी साहित्यिक दृष्टीनें गुन्हेगारीच्या ठरल्या. बरें, या ललित वाङ्मयाचें लेखन नाहीं तरी त्याचें स्तवन तरी पांगारकरांकडून घडावें, तर तेंही नाहीं! तर उलट फडक्यांसारख्या भाषेच्या व भावनेच्या कळावंतांच्या कादंबऱ्यांसही 'काऊचिऊच्या गोष्टी' म्हणून पांगारकर हेटाळणी करणारे! या बाबतींत एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांनीं आपल्या आयुष्यांत अनेक लहरी केल्या. एकदां नाटक लिहिण्याची श्रींची लहर लागली. त्याप्रमाणें नाटक लिहून बालगंधर्वांकडून तें करवून घेण्यासाठीं श्रींनीं नारायणरावासही नाशिक मुक्कामीं बोलाविलें. नाटकांचीं वाचनें व पदांचा काथ्याकूट सुरू झाला. या छंदांत श्री असतां एक दिवस पांगारकर श्रींकडे गेले लगेच पांगारकरांपुढेंही नाटकवाचनाचा थोडा कार्यक्रम झाला. नाटक लिहिलें होतें जगन्नाथ पंडितावर व त्याचें नांव श्रींनीं ठेविलें होतें 'गंगार्पण'! हौशीनें वाचन झाल्यावर, उत्सुकतेनें श्री पांगारकरांकडे पाहात होते. तोंच पांगारकर म्हणाले, "आणा तें नाटक इकडे. गोदावरीच्या रामकुंडांत 'गंगार्पण' आतांच करून येतों." श्रींसारख्या पीठस्थ आचार्यांनें नाटक लिहिण्याचा छंद करावा, हें पांगारकरांना आवडलें नाहीं. ही पांगारकरांची ललित वाङ्मयाविषयीं उपहासी वृत्ति! तेव्हां अशा पांगारकरांस, ललितसाहित्यभक्तांचा जेव्हां काळ आला, तेव्हां संमेलनाचें अध्यक्षपद मिळणें सुतरां दुरापास्त दिसूं लागलें. पण मराठी वाङ्मयांत चाळीस वर्षं तपश्चर्या करणाऱ्या पांगारकरांना

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या हक्काचा मान मिळत नाहीं, या गोष्टीविषयींची ओशाळगत कांहीं जातिवंत व मातबर साहित्यिकांस वाटत होती, यांत शंका नाहीं. कारण अशाच साहित्यिकांनीं पांगारकरांच्या वाङ्मयेतिहासखंडाचा दुसरा मोठा ग्रंथ बाहेर पडल्यावर पुण्यास महाराष्ट्र शारदामंदिरातर्फे एक गौरव-समारंभ मुद्दाम घडवून आणला व त्यांत प्रो. माटे, प्रो. वामनराव जोशी इ. पुण्याच्या साहित्यश्रेष्ठींनीं पांगारकरांच्या गौरवार्थ भाषणें केलीं. त्याचप्रमाणें पुण्यास दरसाल भरणाऱ्या शारदा-संमेलनाचेंहि अध्यक्षपद एका सालीं वरील ओशाळगत घालविण्याच्या दृष्टीनेंच पांगारकरांना आवर्जून देण्यांत आलें व पांगारकरांनीं या संमेलनांत आनंदानें भाग घेऊन संमेलनाची संगत-पंगत आपल्यापरी रंगवली. नगर-नाशिकच्या साहित्य-मंडळानें 'ज्ञानेश्वरदर्शनाच्या' दोन खंडात्मक ग्रंथाचा प्रकाशनसमारंभ छोटेंसें प्रादेशिक संमेलन भरवून नेवासें येथें जो केला, त्याचें अध्यक्षपद, ज्ञानेश्वरीची ओवी कुमारिकांच्या हौशीनें गाणाऱ्या पांगारकरांसच दिलें.अशा रीतीनें साहित्यगौरवाचे प्रसंग पांगारकरांस लाभावयाचे ते लाभलेच. याशिवाय ते जातिवंत वक्ते असल्यानें जेथें जात तेथें संमेलनाचा थाट उभा करीत तो वेगळाच.

पांगारकरांचा स्वभाव मुळांतच धर्मश्रद्ध व थोडा भोळा होता. धर्मश्रद्धेमुळें ते संतवाङ्मयाकडे वळले, व भोळेपणामुळें अनेकवार फसले. इंदूरची मोठी रक्कम हातीं आल्यावर घर न घेतां त्यांचे हातून जें मुद्दल खर्चलें गेलें, तें या भोळपणामुळेंच. अशा रकमा आपल्या आयुष्यांत वारंवार मिळतील, या समजुतीवर त्यांनीं इंदूरची रक्कम आगें मागें न पाहतां सरदारी थाटानें खर्चली, व यामुळें साठीनंतर पुनः त्यांस चिंतेचे दिवस प्राप्त झाले. इंदूरच्या

मोठ्या रकमेचा बोभाटा सर्व महाराष्ट्रभर झाला होता. षष्ठ्य-ब्दीची थैली जमविण्याचें जेव्हां ठरलें तेव्हां 'पांगारकरांस मदतीची गरज आहे' ही गोष्ट लोकांस खरी वाटेना व २००० रु. ची थैली जेमतेम त्यांच्या मुंबईच्या मित्रमंडळींनाच आपापसांत उभारावी लागली व ती घेतांना पांगारकरांच्याही डोळ्यांस अपमानाचें पाणी आलें. तरी पण मराठी ग्रंथरचना त्यांनीं उपासना-बुद्धीनें केली व चांगल्या वाईट परिस्थितीचा हर्षविषाद ध्येय-निष्ठेच्या नशेंत कधीं मानला नाहीं. त्यांचा स्वभाव जात्या आनंदी व चांगल्या अर्थानें थोडा रंगेल होता. त्यामुळें रडेपणा असा त्यांनीं आपणहून कधीं केला नाहीं. भक्तिरसांत वाणी गद्गद होऊन त्यांना रडें येई, पण तेंही आनंदाचें व भक्तिप्रेमाचें! त्यांत दुःख नसे. संतवाङ्मयाबरोबर संतसंगतीचीही त्यांना आवड असे. त्यामुळें संतदर्शनाचा व संतसंगतीचा योग ते सहसा चुकूं देत नसत. प. प. वासुदेवानंद सरस्वती, श्रीगुलाबराव महाराज, श्रीशीलनाथ महाराज इ. अनेक साधुसंतांचीं दर्शनें त्यांनीं घेतलीं व त्यांच्या प्रसादांत कृतकृत्यता मानली. संतचरित्रांतील चमत्कार ते खोटे मानीत नसत व त्यांनीं लिहिलेल्या संतचरित्रांत सारे चमत्कार त्यांनीं मोठ्या श्रद्धेनें दिले आहेत. याचा मोठा राग धरून रा. ब. सान्यांनीं एकदां लिहिलें कीं, "पांगारकर इंग्रजी शिकले खरे! पण सावित्रीची कथा, ज्ञानेश्वरांनीं रेडा बोलावल्याची कथा, तुकाराम सदेह वैकुंठांत गेल्याची कथा या सर्वांवर पांगारकरांची आपली श्रद्धा! या त्यांच्या फाजील श्रद्धेमुळें इंग्रजी विद्या या मनुष्यावरून फुकट गेली असा विचार मनांत येतो." पण या टीका ऐकूनही पांगारकरही श्रद्धेचे खमकेच राहिले. सान्यांसारख्या पाखंड्याच्या टीकेस तेही म्हणत कीं, पांच हजार वर्षांची वैदिक संस्कृति

साऱ्यांसारख्या पालथ्या घड्यावर फुकट वाहिली. यांच्या डोक्याचे घडे वैदिक संस्कृतीच्या अमृत-सागरांत बुचकळूनही रिकामेच राहिले! या त्यांच्या धर्मश्रद्धेमुळेंच पांगारकर वारकरी पंथांत सामील झाले व लोक त्यांस पांगारकरबुवा म्हणू लागले. वारकरी पद्धतीप्रमाणें एकमेकांच्या पायांवर डोकीं ठेवण्याचा प्रघात त्यांचे घरीं पडला. त्यांत ग्रंथकार, प्रवचनकार पांगारकरांचें पायां पडणें शिष्टाचाराखातर व वेळीं केलें न केल्यासारखें असे, पण इतरांस आवर्जून त्यांचे पाया पडावें लागे. त्यामुळें महाराष्ट्रीय इतर साहित्यिकांत व पांगारकरांत अंतर पडूं लागले. त्यांच्या संत-चारित्रांतही समन्वय अधिक व चिकित्सा थोडी. त्यामुळें बुद्धि-वादी महाराष्ट्रांत त्यांची चहा कमी असे; पण धार्मिक समाज त्यांचा सत्कार करी. यामुळें आत्मप्रशंसाही त्यांचे स्वभावांत थोडी शिरली व त्यांचें आत्मचरित्र अंतर्मुख दृष्टीनें लिहिलें जाण्या-पेक्षां आत्मगौरवाच्या बुद्धीनेंच अधिक लिहिलें गेलें. त्यांनीं संसार आनंदानें केला व कोणाची कपर्दिकही बुडविली नाहीं. आपलें सर्व जीवन त्यांनीं संतवाङ्मयाभ्यासांत, ग्रंथलेखनांत व संतांचे विचार आपल्या अमोघ वाणीनें सांगण्यांत घालविले. १० नोव्हें-बर १९४१ सालीं पांगारकर वर्धा येथें वारले.

ग्रंथकार पांगारकर म्हणून मराठी साहित्याच्या क्षेत्रांत पांगारकरांची योग्यता निःसंशय मोठी आहे. मराठींतील संतवाङ्-मयोदधि धुंडाळून त्यांतील वाङ्मयरत्नांना घासूनपुसून व पैलू पाडून त्यांनीं मराठी भाषिकांच्या हातीं दिलें. या दृष्टीनें त्यांचीं संतचरित्रें व त्यांत विशेषतः मोरोपंत, तुकाराम, ज्ञानेश्वर, एक-नाथ यांचीं चरित्रें, भक्तिमार्गप्रदीप व त्यांचे मराठी भाषेच्या वाङ्मयेतिहासाचे ३ खंड त्यांचें स्मारक म्हणून कायम राहतील.

चिकित्सेपेक्षां समन्वयावर त्यांच्या बुद्धीचा भर आधिक असल्यानें हातीं आलेलें संतवाङ्मय निसून टिपून एखाद्या सुगृहिणीनें पक्कान्नें करावीं त्याप्रमाणें महाराष्ट्र रासिकांच्या हातीं आपल्या सोज्ज्वळ, प्रसन्न व आल्हादकारक भाषेंत देणें हेंच पांगारकरांचें वैशिष्ट्य आहे. यांतच त्यांचें कौशल्य व बुद्धिसर्वस्व वापरलें गेलें. त्यांनीं लिहिला त्यापेक्षां निराळी दृष्टि वापरून व आधिक नटिनेटका मराठी भाषेचा इतिहास लिहितां येईल, नाहीं असें नाहीं. पण यामुळें त्यांच्या इतिहासखंडाचें महत्त्व कमी ठरत नाहीं. त्यांत झालेलें मराठी वाङ्मयाचें संकलन पुढच्या इतिहासकारास पाया म्हणूनच उपयोगी होईल व वापरतां येईल. आज जवळजवळ सातआठशें वर्षांत झालेलें मराठी वाङ्मय अद्ययावत् मराठी भाषेंत व मोठ्या सोज्ज्वल व रमणीय पद्धतीनें आणलें गेलें. हें पांगारकरांचें कार्य ल्हानसहान नाहीं. पांगारकरांनीं थोडी कविताही लिहिली आहे व ती 'आनंदलहरी' या नांवानें छापली आहे. ज्यानें एवढें अफाट कवितावाङ्मय वाचलें, त्यांना कविता करणें हें काम सहज होतें व पांगारकरांच्या कवितेंत भाषेची सहजता व ठसठशीतपणा आहे. पण त्यांच्या गद्याइतकें पद्य तेजस्वी नाहीं. तरी सुद्धां त्यांचीं कांहीं स्तोत्रें, महाराष्ट्र-महोदय काव्य व उपकृतिस्मरण ही कविता त्यांचें कवितेंतही रसिकत्व दाखविणारी आहे.

वक्ते पांगारकर हे ग्रंथकार पांगारकरांप्रमाणेंच लोकांच्या ध्यानीं राहतील. त्यांच्या लेखणीप्रमाणेंच त्यांची वाणी मोठी तेजस्वी व ओघवती असे. किंबहुना ते जसें लिहीत तसेंच बोलत व जसें बोलत तसेंच लिहीत. त्यांच्या वाणीची शक्ति त्यांच्या लेखणीप्रमाणेंच असे. ते बोलूं लागले म्हणजे प्रतिपाद्य विषयाचा रस

श्रोत्यांच्या अंतरंगांत ताबडतोब उभा करीत व त्यांचा पाठांतराचा घडघडाट सुरू झाला म्हणजे श्रोते अक्षरशः नागाप्रमाणें डोलत. ‘कथा करावी घडघडाटें’ ही रामदासोक्ति त्यांच्या बोलण्यांत प्रतीतीला येई. त्यांच्या वाणीचा ओघ गंगेप्रमाणें २-२ २॥-२॥ तास सारखा चाले व व्याख्यान संपल्यावर श्रोते अतृप्त राहात. पांगारकरांच्या काळांत त्यांच्या बरोबरीचे पुण्यांत वक्तृत्व करणारे शिवरामपंत परांजपे होऊन गेले. पण शिवरामपंतांच्या वक्तृत्वाचा थाट निराळा व पांगारकरांचें वक्तृत्व निराळें ! पद्याचा एक चरणही न उद्धारतां कल्पनेचा काव्यविलास शिवरामपंत करीत; भाषेचे तसेंच कल्पनेचे ते कलाकार व निर्माते होते. पांगारकरांच्या वक्तृत्वांत कल्पनाविलास नसे. त्यांचा विशेष म्हणजे संतकाव्याचें पाठांतर व तें एकदां त्यांच्या व्याख्यानांतून घडघडाट सुरूं झालें म्हणजे श्रोत्यांच्या हृदयांस व पांगारकरांच्या वाणीस बहर येई. बोलण्यांत ते स्वतःही रंगत व श्रोत्यांसही रंगवीत. पांगारकर अधूनमधून लहर आली म्हणजे वारकरी थाटाचीं कीर्तनेंही करीत. पण त्यांना गाण्याचें अंग नवें जुनें कोणचेंच नसल्यामुळें ते अभंग गाऊं लागले म्हणजे सर्व कांहीं बेंगळूर होऊन जाई. वारकऱ्यांच्या फडांत निरूपणी कीर्तन करणारा विष्णुबुवा जोगासारखा कोणी झाला नाहीं. त्यांचे शिष्य ह. भ. प. सोनोपंत दांडेकरांनाही गाण्याचें अंग नसल्यानें कीर्तन साधत नाहीं, पण ते निरूपण चांगलें करितात.

एकंदरींत संतवाङ्मयसंशोधनाची, त्या वाङ्मयाच्या अभ्यासाची, त्यावर ग्रंथलेखन करण्याची व व्याख्यानें देण्याची परंपरा महाराष्ट्रांत पांगारकरांनीं सुरू केली. अशीच परंपरा इतिहासक्षेत्रांत राजवाड्यांनीं सुरू केली. त्यांच्या कार्याचा अभिमान

धरूनच पुण्यास भारत इतिहास—संशोधन मंडळ निघालें व धुळ्यास राजवाडे संशोधनमंदिर उभारण्यांत आलें. समर्थभक्त देवांचे समर्थ-वाग्देवता-मंदिराचें कार्य पांगारकरांच्या क्षेत्रांत पडत असलें तरी त्यांची स्फूर्ति राजवाड्यांपासूनची आहे. पांगारकरांची संतवाङ्मयसंशोधन-अभ्यासाची परंपरा चालविण्याच्या हेतूनेंच नाशकास ‘ पांगारकर मंडळ ’ स्थापन करण्यांत आलें. राजवाड्यांच्या तालमींत दत्तो वामन पोतदार, धुळ्याचे भट व देव हीं मंडळीं प्रथम तयार झालीं व राजवाड्यांच्या कार्यापासून स्फूर्ति घेऊन अनेक मंडळी आतां पुढें येऊं लागली आहेत. देशाच्या राजकीय इतिहासाइतकेंच सांस्कृतिक इतिहासाचें महत्त्व आहे व त्या दृष्टीनें पांगारकरांची ही संतवाङ्मयसंशोधनाची व अभ्यासाची परंपरा पुढें चालविणें इष्ट आहे. पांगारकरांपासून स्फूर्ति घेऊन श्री. गजानन त्रिंबक बगदे यांनीं हें संतवाङ्मयाभ्यासाचें कार्य नाशकास सुरू केलें आहे. त्यांच्या पांगारकर मंडळाच्या द्वाराच सदर निबंध व पुढचा ग्रंथ महाराष्ट्रापुढें येत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

# २. मोरोपंतांचें आर्याभारत

लेखक—**विष्णु हरि निजसुरे**, बी. ए., धुळें.

**भवभूतिकालिदासज्ञानेशांचा कवित्वरस गाढा ।**
**आधुनिकांसहि वंदीं, परि माझा पंतवाङ्मयीं ओढा ॥**—स्वकृत

**रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला ।**
**स्नेहें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ॥** नामरत्न ११२

And this poor flower of poetry
Which, little cared for, fades not yet,
But since it pleased a vanished eye,
I go to plant it on his tomb. —*Tennyson*.

**उठल्या उत्साहाच्या त्या शांत श्रीमदुदधिवरि लहरी ॥**
—वि. पर्व ३-२३

घरंदाज कुटुंबामध्यें पद्धत असते, वर्षांतून विशिष्ट वेळीं घरांतील दागदागिने, वस्त्रप्रावरणें, भांडींकुंडीं, पोथ्यापुस्तकें, घरदार वगैरे सामानसुमानाची तपासणी करावयाची. सरस्वतीच्या ज्ञानभांडारांतील संपत्तीला हाच न्याय लावावा लागतो. राष्ट्राच्या संसारांत स्वतःच्या स्फूर्तीनें, प्रतिभेनें व बुद्धिमत्तेनें शास्त्रीय व ललित अशा दोनही प्रकारच्या वाङ्मयांत वेळोवेळीं भर घालणाऱ्या ग्रंथकारांच्या अमर कृतींचा सादर व सप्रेम परामर्ष घेऊन त्यांची ख्याति व कीर्ति उज्ज्वल राखण्याचें गोड काम त्या त्या ग्रंथकारांच्या भक्तांस व चहात्यांस करावें लागतें. महान् पंतभक्त हरिभक्तिपरायण रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या गौरवपर

ग्रंथनिर्मितीच्या निमित्तानें पंतांच्या आर्याभारतांतील नितांतरम्य स्थळांचें दर्शन रसिकांना करवून तें पांगारकरांचे स्मृतीस अर्पण करावें व तद्द्वारें पंतांसही त्यांच्या कवितेवरील लेखकाच्या प्रेमाचा अहेर करावा असें प्रस्तुत निबंधांत योजिलें आहे.

अहो, पण हल्लींचा काळ पुरोगामी वाङ्मयाचा ना? रचना करावयाची ती पुरोगामी वाङ्मयाची, चर्चा करावयाची ती पण पुरोगामीचीच, वाचावयाचें तेंच, चाखावयाचें तें पण तेंच. भाकरी, नोकरी, चाकरी व मजुरी यांचें तत्त्वज्ञान हवें. भांडवलशाहीचा नंगानाच चव्हाट्यावर उघडा करावयाचा, नोकरशाहीचे कपटप्रबंध फाडून टाकावयाचे, लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करावयाची, समाजसत्तावादाची नीराजना करावयाची, सोव्हिएटशाहीच्या आदर्श राज्यव्यवस्थेंत जनसुखाचें प्रतिबिंब पहावयाचें, असें असतां गाइलेल्या रामचरित्राचेंच पुनःपुनः गान करण्यांत आतां काय राम? तेव्हां सेवानिवृत्त होऊन परमार्थाची झोंप घेणाऱ्या पंतपंडितांना आतां कशाला जागे करतां?

होय, तुम्ही म्हणतां तें खरें. पण पुरोगामी वाङ्मय म्हणजे तरी काय? पण तुमचें उत्तर ऐकण्यापूर्वी आम्हीच पुरोगामी वाङ्मयासंबंधाची एक मौजेची जुनी आख्यायिका तुम्हांस सांगतों.

अतिप्राचीन काळीं--हो, हो, अगदीं फार प्राचीन काळीं बरं कां, पळण्याच्या शर्यतीचा एक विश्वप्रसंग झाला. झाडून सर्व गतिमान् पदार्थ–केवळ प्राणीच नव्हत, ग्रहनक्षत्रांसुद्धां त्या चुरशींत सामील झाले. प्रस्थानरेखेकडे सर्व संघर्षी–चुरशीवाले–चालले असतां एका विचित्र वस्तूनें रेखेंत क्रमांक मागितला. त्याला पहातांच सगळीकडे उपहासदर्शक हास्यरसाचा कल्लोळ उठला. परब्रह्म होतें तें. निर्गुण, निराकार परब्रह्म, सगुण होऊन आलें

०७६४

होतें. ' हें हो काय शर्यत पळणार ?' माणसांनीं छुः छुः करून त्याची हेटाळणी केली. हत्तीनें सोंड उभारून टवाळखोर चीत्कार केला. हा राजराजेश्वर आपलें अगोदरच अभिनंदन करीत आहे, असें म्हणून मृगराजानें आपला पंजा उभारून त्याची संभावित चेष्टा केली. मर्कटांनीं तर त्याच्या मस्तकलंघनाची सुद्धां आपली हौस पुरवून घेतली. पण सर्वांचा उपहास निमूटपणें साहून त्यानें आजिधावनाकरितां कास कसली. यज्ञांतील आजिधावनाचा म्हणजे शर्यतींत पळण्याचा प्रसंग त्यास ठाऊक होता. वेळ भरला. शर्यत सुटली. वेगचमत्कार दिसले. भूमध्यसमुद्राच्या उत्तरतीरावरून आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्याकडे उडणाऱ्या पाकोळ्यांप्रमाणें, उरीं फुटून, कित्येकांनीं, शर्यत नाहीं, पण प्राणपण जिंकले. इलेक्ट्रिकचा वेग व अॅटम बॉंबचा दम (हीट) अनुभवास आले, पण शर्यत कोणीं जिंकिली ? आजिधावनाच्या अवधीशीं म्हणजे जयरेषेशीं धडपडत प्रथम जाऊन तिला शिवूं पाहणारे सामनेवाले बघतात तों ऋषीप्रमाणें प्रशांत, गंभीर मुद्रा करून परब्रह्म सर्वांची वाट पाहत बसलेलें त्यांस आढळलें. सर्वांची निराशा झाली; वीरवरांनीं माना खालीं घातल्या. तेव्हां पंचांमध्यें सुज्ञ ज्ञानी होते त्यांनीं शर्यतीच्या जयाचें रहस्य सांगितलें. ब्रह्मानें शर्यत जिंकली. ब्रह्म पुरोगामी ठरलें. कां, तें ईशावास्योपनिषदांत सांगितलें आहे.

**तद् धावतोऽन्यानत्येति सर्वान्, तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति**

—ईश ४

ब्रह्म हें तिन्ही त्रिकाळीं व सर्व स्थळीं असल्यानें पुरोगामी होय व गतिप्रेरक वायु सर्व प्राणिमात्रांचीं कर्में त्याचे आधारावर चालवितो. मग आतां पुरोगामित्वाचा हा न्याय वाङ्मयास नाहीं

कां लावावयाचा ? जुन्या काव्यांतून, कोणत्याही काळीं कोणत्याही समाजाला पटतील अशीं भावनांचीं, मनोविकारांचीं, सुष्ट-दुष्ट संकल्पांचीं, हृदय हलविणारीं रम्य चित्रें नाहीं कां आढळत ? शंकांकित प्रश्न कशाला ? रोखीचा सौदा. उदाहरणच घ्या. उपमन्यु—गरीब, दीन, तपस्व्याचा मुलगा; श्रीमंतांचीं मुलें दूध पितात हें पाहतो. आई त्याला पाण्यांत पीठ कालवून कढवून पाजते. पंत म्हणतात—

**ठकवी किति दिवस असें, दारिद्र्याचें कपट तीस तें शिकवी।**

—अनु० २।४

उपमन्यूला एका यज्ञांत खरें दूध प्यावयास मिळतें. तो आईला म्हणतो—

**माते क्षीर नव्हे हें; नलगे, ठेवून नांव देतीस।** अनु. २।९

पिठाच्या पाण्याला, दूध हें नांव, आई तूं देतेस.

उपमन्यू पुढें म्हणतो—

**या मद्वचनें कृष्णा, अंबा बहु गहिंवरें असुख पावे।**
**वाटे तीस असें कीं, जन्म विफल, आपुले असु खपावे॥**
**कृष्णा मज आलिंगुनि हुंगुनि मस्तक असें म्हणे माता।**
**मागसि जें दुग्धोदन कैंचें या तापसा जना ताता॥**
**वाताहार करावा, प्यावें जळ, शाकमूळ फळ खावें।**
**सुखभोगविहीनत्वें, बा आम्हां तापसांसि वळखावें॥**

—अनु० २–१० ते १२

तापस या शब्दाचा हीन दीन असाही अर्थ संस्कृतांत प्रसिद्ध आहे. तेव्हां वरील आर्यांत दरिद्रीनारायणाचेंच वर्णन नाहीं काय ? हल्लींच्या एखाद्या गरीब अभिमनूची ( अभिमन्यूची ) बिचारी आई, खाद्यपदार्थांच्या राशींत राबणारी, चहा म्हणून घरीं

निंबाच्या वाळलेल्या पाल्याची पूड पाण्यांत उकळून, चोरून आणलेल्या ज्वारीच्या ओल्या ताटांतील इवलासा गोड रस त्यांत पाडून, आपल्या निष्पाप लेंकरास देऊन नसेल अशी ठकवीत? तिचा अभिमन् प्रौढपणीं वरील आर्यांनीं नाहीं का आपलें दैन्य भाकूं शकणार? सत्याग्रहासारख्या सामन्यांत पुरुषांसही लाजविणाऱ्या धैर्यानें मृत्यूला कवटाळण्यास तयार होत असतांना एखादी वीर-ललना बकासुराच्या आख्यानांतील ब्राह्मणीचे उद्गार आपलें ब्रीद-वाक्य म्हणून पुढील आर्या म्हणूं शकेल.

**जाईन मचि, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे ॥**
**दैवें स्त्री म्हणुनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ॥**

—आदि० ३१–२५

आधुनिक काळांतील हरएक चळवळींत, देहावर उदार होऊन व सर्वस्व पणाला लावून, उडी घेणाऱ्या देशभक्ताच्या मुखांत कर्णानें शल्यापाशीं काढलेले पुढील उद्गार कसे शोभून दिसतील पहाः

**भ्याडासि भेडसावीं, मी भ्याया उपजलों नसे कांहीं ॥**
**विक्रम यश साधाया झालोंसें, चाल पथ, पुढें पाहीं ॥**

—कर्ण० २९–३३

स्वातंत्र्याच्या चळवळीच्या ह्या काळांत परवशतेचा दुःसह जाच वर्णणारी पंतांची पुढील आर्या अशीच भावनेला चेतविणारी आहे. विराटपत्नी सुदेष्णा सैरंध्रीला कीचकाकडे मद्यपात्र पोहोंच-विण्याची आज्ञा करते. द्रौपदी जाईना. ती सुदेष्णेला—

**विनवी ऐसें बहु परि तीस सुदेष्णा म्हणे तरि 'जाच'॥**
**फारचि बरी निरय-गति, परवशता शतगुणें करी जाच ॥**

—वि० १–५६

असो. अशा रीतीनें जुन्या कवींच्या काव्यांतूनही पुरोगामी काव्याचे अंश असे इतस्ततः विखुरलेले असतात व तेहि भावी काळाला चेतना देत असतात. त्यामुळें मधूनमधून त्यांचा परामर्श घेणे इष्ट ठरतें. अशा कवींपैकीं मराठी भाषेला ललामभूत असे एक कवि जे मोरोपंत त्यांनीं रचलेल्या 'आर्याभारत' ह्या ग्रंथाधारें त्यांच्या कवित्वाचें मूल्यमापन प्रस्तुत लेखांत करावयाचें आम्हीं योजिलें आहे.

तत्त्वज्ञान, नीत्युपदेश व काव्य या दृष्टीनें संस्कृत महाभारत व त्याचें प्रतिबिंब जें पंतांचें आर्याभारत यांचें राष्ट्रीय दृष्ट्या काय महत्त्व आहे याची फोड पांगारकरांनीं पंतचरित्रांत पंधराव्या प्रकरणांत मार्मिकपणें व सुंदर तऱ्हेनें केली आहे, तेव्हां तिची आम्ही पुनरुक्ति करीत नाहीं. पंतांच्या सर्व महाकाव्यांपैकीं आर्याभारत हें आकारानें व योग्यतेनेंही मोठें आहे, असा यथार्थ अभिप्राय त्यांनीं तेथें प्रकट केला आहे. तेव्हां तो ग्रंथ लिहिण्यांत व सामान्यतः कवित्वांत पंतांची भूमिका कोणती व कशी आहे याचा आतां थोडक्यांत विचार करूं.

पंतांची भूमिका पारमार्थिक आहे. वेदान्तविवेचक आचार्य, साधुसंत व भक्त यांची जी भूमिका तीच पंतांची. शंकराचार्य म्हणतात, 'मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी।' विवेकचूडामणि, श्लो. ३२ व 'नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्।' षटपदीस्तोत्र ३. तुकोबा याचाच अनुवाद करून म्हणतात, 'वेडें वांकुडें गाईन। परि तुझा म्हणवीन।' ह्या भूमिकेचा प्रतिज्ञालेख शुकाचार्यांनीं भागवतांत 'आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्था अप्युरुक्रमे। कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः॥' व 'परिनिष्ठितोऽपि नैर्गुण्ये उत्तमश्लोकलीलया। गृहीतचेता राजर्षे आख्यानं यदधीतवान्॥ तदहं तेऽभिधास्यामि'

३०; भा. स्क. १–१–९।१०, ह्या श्लोकांत ग्रथित केला आहे. वेदान्तग्रंथांचे संस्कृत टीकाकार हे वाक्शुद्धिद्वारा चित्तशुद्धि साधण्यासाठीं ग्रंथ लिहितात, तर आर्यावर्तांतील सर्व भाषांतील साधुसंत हे भगवद्यशोगानाकारितां व तद्द्वारा भक्तिसुख अनुभवून संसार तरून जाण्याकारितां काव्यें रचितात. पंतांची भूमिका हीच आहे. ते म्हणतात—

**हरि ज्यांचा कैवारी, त्या पांडुसुतांसि वंदितों भावें ।**
**वाटे चरित्र त्यांचें, कांहीं आपण तरावया गावें ॥** आदि० १–८

तात्पर्य, भक्तिरसांत बुड्या मारणें हें प्रधान, कवित्व हें गौण, व्यवहार व पांडित्य हें त्याहून खालच्या पायरीवर. ज्ञानकांडांत ज्याप्रमाणें अनुमान हें श्रुतिपार्षद म्हणजे वेदांच्या सभेंतील सभासद आहे, त्याप्रमाणें भक्तिमार्गांत कवित्व हें भक्तिपार्षद आहे. पांडित्याची पायरी त्याहून खालीं आहे. पंतांची भूमिका ही अशी आहे. पंतांच्या मंगलाचरणाचें वैशिष्ट्य पंतांनीं पहिल्याच आर्येंत,

**श्रीमत्सद्गुरु नारद वाल्मीकि व्यास शुक कवीश मनीं ।**
**आणुनि नमितों भावें, जे मोहतमाचिया रवी शमनीं ॥**

—आदि १–१

असें म्हणून देवतांचे अगोदर सद्गुरूंस नमन केलें आहे. यांत त्यांनीं ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांचाच उपदेश ध्यानीं आणला आहे. संस्कृत ग्रंथकार मंगलाचरणांत ईश्वर व गुरु यांस अभेदानें वंदन करितात. तुकाराम म्हणतात,

**देव सारावे परते । संत करावे आरते ।**

समर्थही म्हणतात,

**सद्गुरुहूनि देव मोठा । जयास वाटे तो करंटा ॥**

पंतांनीं गुरुशिष्यप्रेमा ठिकठिकाणीं आळविला आहे. कौरवसभेंत

द्रोणाचार्यांच्या पराक्रमाचें भीष्माचार्य वर्णन करतांना म्हणतात,

**समरीं ऐरावतही शोणितपूरीं नहात वाहेल ।**
**परि परमप्रिय अर्जुन, त्यावरि याचा न हात वाहेल ॥**

उ. १२-५४

या आर्येंतील अतिशयोक्तीनें व अगदीं सुंदर व सुबोध सहा अक्षरी यमकानें गुरूच्या वात्सल्याचा हृदयंगम परिष्कार पंतांनीं केला आहे. आतां गुरुभक्तीचें उदाहरण:--द्रोणाचार्यांस गुरुदक्षिणा म्हणून एकलव्यानें आपला अंगुष्ठ कापून अर्पण केला असतां त्याचें शब्दचित्र पंतांनीं कसें हृदयद्रावक काढलें आहे पहा—

**साहे छळ आनंदें, वाहे अंगुष्ठ, वरि न तो पाहे ।**
**राहे उगाचि, जाणों देउनि अत्यल्प लाजला आहे ॥**

—आदि, २५–४८

उगा रहाण्याचें कारण अत्यल्पदानानें वाटलेली जणुं काय लाज अशी सुंदर हेतूत्प्रेक्षा करून पंतांनीं गुरुभक्त एकलव्याच्या अंतःकरणाची केवढी विशालता दाखविली आहे ! तसेंच या आर्येंत ‘ आहे ’ या नादाच्या आवृत्तीनें सुंदर अनुप्रास व यमक यांची भावनापरिपोषाकडे सहज चातुर्यानें योजना केली आहे.

प्रस्तुत निबंधांतील विवेचनाचें सूत्र, संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनीं विवेचिलेलीं काव्यतत्त्वें आधारास घेऊन पंतकाव्योदधींतील रत्नांनीं त्यांचा विस्तार करावा, हें आहे. तो विस्तार इतका साधेल कीं, गीर्वाण कवींचे आत्मे पंतकवितेस माना डोलवितील व ‘ कोप्येष संप्रति नवः पुरुषावतारः ’ हा परशुरामासही वीर न म्हणणाऱ्या कुशाविषयींचा उद्‌गार पंतांचे बाबतींत शोभून जाईल. पंत मात्र प्रभु रामचंद्राच्या दर्शनानें विनयावनम्र झालेल्या कुशाप्रमाणें या स्तुतीनें लज्जेनें संतचरणींच आपली भक्तिसंवलित दृष्टि लावतील. भावगीत;

नाट्यगति व सुनीत यांतील ही खुमारी क्वचित आढळेल.

मंख नावाच्या संस्कृत कवीनें आपल्या श्रीकंठचरित नामक काव्याचे प्रस्तावनेंत एका श्लोकांत काव्यांगांचें दिग्दर्शन केलें आहे. तो श्लोक असा—

**अर्थोऽस्ति चेन्न पदशुद्धिरथास्ति साऽपि,**
**नो रीतिरस्ति, यदि सा घटना कुतस्त्यात् ॥**
**साऽप्यस्ति चेन्न नववक्रगतिस्तदेतद्**
**व्यर्थं विनारसमहो गहनं कवित्वम् ॥**

सरस अर्थ, शुद्ध काव्यमय पदें, रीति म्हणजे भाषाशैली, घटना म्हणजे प्रधान व अंगें यांची योग्य जुळणी व मांडणी, वक्रोक्तीचे निरनिराळे प्रकार व शेवटीं रस अशीं काव्याचीं अंगें मंखानें निवेदिलीं आहेत. पदांनीं माधुर्य, ओज व प्रसाद हे गुण घेतां येतात व वक्रोक्तींत अलंकार व कल्पनाविलास यांचा समावेश होतो. मंखानें घटना हें एक स्वतंत्र अंग सांगितलें आहे. नाटकांतील संविधानक हा घटनेचाच प्रकार होय. घटना शब्द इतर साहित्यशास्त्रज्ञांनीं घेतला नाहीं व म्हणून तेवढ्यासाठींच मंखाचा वरील श्लोक निबंधाचें विवेचनसूत्र म्हणून आम्हीं योजला आहे. साहित्यदर्पणकारांनीं रीतीलाच संघटना म्हटलें आहे. पण रीति एका छेदकावरून समजते तर घटना ही समग्र कृतीवरून समजते. असो. आतां वरील अंगांचीं उदाहरणें देत देत आर्या-भारताची माधुरी आपण चाखूं. पण एक मात्र अडचण आहे, ती अशी कीं, भारतीय युद्धांत ज्याप्रमाणें एका प्रसंगीं,

**दशशत बाणांनीं तो एकेकातें रणांगणीं हाणी ।**
**न करीच पंक्तिभेद श्रीकर्णाचा उदारवर पाणी ॥** कर्ण ३०।६९

किंवा भीष्मपरशुरामयुद्धांत—

**प्रथम दिनीं म्यां गुरुच्या धनुची पण करुनि तोडिली कोटी ।**
( तेव्हां ) **मजवरि तीक्ष्णशरांची गुरुनें कोपोनि सोडिली कोटी ॥**
–उ. १३-७५

याप्रमाणें भरपूर उदाहरणें देण्याचें औदार्य किंवा खूपच खूप वृष्टि करण्याचें दूषकांस वाटणारें क्रौर्य दाखविण्यास आम्हांस अवकाश नाहीं. तसेंच

**देवर्षि, मुखीं घालुनि बोट, म्हणे हा सुयोधना कुटिला ।**
**भक्तिबळेंचि पहा हा परमेश्वर आजि अर्जुनें लुटिला ॥** द्रो. १०-४१

या न्यायानें पंतभक्तांस स्वतःचे आवडीनिवडीस वाव द्यावा व आर्यांचीं सुंदर सुंदर उदाहरणें वाचून कर्णाच्या बाणांनीं धर्मास ज्याप्रमाणें,

**खावविले, चावविले लोहाचे शत्रुनें प्रतप्त चणे ।** कर्ण ३९–१

असें झालें तसें दूषकांस वाटूं नये. (अर्थात् दूषक कांहीं शत्रु नव्हेत व उदाहरणेंही प्रतप्त चणे नव्हेत, खडीसाखरेचे खडे आहेत) म्हणून कुंतीनें कर्णाचें वर्णन केल्याप्रमाणें,

**भवदवन करित होता बहुभास्वर थावरूनि हात रणीं ।** स्त्री. ६–५१

याप्रमाणें चौघां पांडवांस राखण्याचे हेतूनें हात थावरणाऱ्या कर्णाचें अनुकरण रसिक वाचकांस आल्हादाचे धक्के देत असतांना आम्हांस करावें लागणार आहे.

काव्यांत अर्थ तीन प्रकारचे असतातः वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ. प्रत्येकाचीं एकदोन, एकदोन सरस उदाहरणें पाहूं. श्रीकृष्ण कर्णाला कौरवांकडून फोडण्याचा प्रयत्न करीत असतां कर्ण म्हणतो —

**धारातीर्थंचि घडे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें ।**
**राज्यपदभोग नलगे, द्यावा देवा, रणांत वध मातें ॥** उ. १०-९१

श्रीकृष्ण कर्णाला मरणाचा धाक दाखवितो:—

**धनदानें अधनांचा, तुमचा तैसांचि काम रणदानें।**
**म्यां पुरविजेल; द्यावीं स्वरगें इतरें न कां मरणदानें?॥**

—उ. १०-९६

स्वरग (स्वर्=स्वर्ग, अग=वृक्ष). कल्पवृक्ष इतर वाटेल ते पदार्थ देऊं शकतो त्याप्रमाणें तो मरणाचें सुद्धां दान देऊं शकतो. तेव्हां कर्ण प्रांजळपणें पण निर्भयपणें पुढील खरपूस उत्तर देतो—

**कर्ण म्हणे, बा वचना मान्य न झालों म्हणों नको; पावें।**
**वध्यें वधाचि म्हणतां, प्रभुनें आग्रह म्हणोनि कोपावें॥**

—उ. १०-९९

**कर्ण म्हणे भेटि अशी परलोकीं मात्र बा द्यालो कीं।**
**कलहीं प्रेम न राहे, दुर्लभ हे म्हणुनि पाद या लोकीं॥**

—उ. १०-१०६

हीं वाच्यार्थाचीं सुंदर उदाहरणें आहेत.

आतां लक्ष्यार्थाचे नमुने पहा.—यमानें दिलेल्या वरामुळें सावित्रीच्या सासऱ्याचें अंधत्व जाऊन त्यास डोळ्यांनीं दिसूं लागलें,

**आला प्रकाश नेत्रीं, अंधत्वाचा वरें नुरे गंध।**
**परि भूप पुत्रमोहें केला पहिल्यापरीसही अंध॥** वन. १३-९३

येथें गंध म्हणजे लवलेश व अंध म्हणजे मोहांध या लाक्षणिक शब्दांनीं अर्थ फार खुलला आहे. बकासुराख्यानांतील ब्राह्मण कुंतीला म्हणतो—

**या राष्ट्रा बकराक्षस, अजयूथा लांडगा, तसा पाळी।**
**तद्वेतन-दानाची आलीसे आज मजवरी पाळी॥**

—आदि. ३१-३६

या आर्येंत पूर्वार्धांतील पाळी या शब्दाचा विपरीत लक्षणेनें, भक्षी, नाश करी, असा अर्थ होतो व त्या व्याजस्तुतीनें दुसऱ्या

अर्थांतील व्यंग्यार्थानें सुचविलेल्या ब्राह्मणाच्या दुर्गतीचा तीव्रपणा दर्शविला आहे. बकासुराकडे जाण्यास तयार असलेली 'सर्वकाळ चिंताचि' अशी कन्या म्हणते,

**बापा कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं ।** आदि. ३१-३०

येथें बकासुर व कन्या यांस लक्षणेनें कांटा म्हटलें आहे. रूपक, अतिशयोक्ति, सहोक्ति, पर्यायोक्ति वगैरे अनेक अलंकारांत लक्ष्यार्थाचीच मौज असते. अलंकारांचे उदाहरणांत ती आणखी लुटूं.

आतां व्यंग्यार्थाचें पुढील उदाहरण पहा:—

**रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली स्वसा रमणी ।**
**जाणों भुजगें प्रेक्षक-जननयनमनोहर स्वसार मणी ॥**

—आदि. ३५-१३

द्रौपदीस्वयंवरांतील या आर्येंत द्रौपदी स्त्री असून तिच्यावर पंतांनीं सर्पाचे मस्तकांतील मनोहर मण्याची उत्प्रेक्षा केली आहे. याचा व्यंग्यार्थ असा कीं, राजेलोकांस तिचें सौंदर्य कितीही उज्वल व स्पृहणीय वाटलें तरी मत्स्यभेदाचा पण इतका कठीण होता कीं, द्रौपदी त्यांस सर्पाचे मस्तकांतील सुंदर मण्याइतकीच दुर्लभ वाटली. पंतांनीं ही कल्पना कालिदासापासून घेतली असावी. बटुरूपधारी शंकर पार्वतीस म्हणतात,

**पराभिमर्शो न तवास्ति कः करं, प्रसारयेत्पन्नगरत्नसूचये ।**

— कुमारसं. स. ५

हे पार्वती, परका पुरुष तुजकडे आपली पापदृष्टि वळवणार नाहीं. कारण सर्पाचे मस्तकांतील रत्नशलाका घेण्यास कोण हात लांबवील ?

व्यंग्यार्थालाच अलंकारशास्त्रकर्ते ध्वनि म्हणतात. त्याचे अनंत भेद आहेत. वरती अलंकारानें वस्तुध्वनीचें उदाहरण दिलें. आतां

ध्वनींत प्रमुख जो रसध्वनि किंवा स्थूलभाषेनें भाव, भावना अथवा निरनिराळ्या मनोवृत्ति यांचीं कांहीं उदाहरणें बघूं. काव्याचें मुख्य स्वरूप दोन प्रकारचें, भावनोल्लास व कल्पनाविलास. कवीनें आपल्या भाषाप्रभुत्वानें दोहोंचा हृदयंगम आविष्कार केला कीं, कवीचें कवित्वांतलें उच्चस्थान आपोआप ठरतें. भावनोत्कर्षाची पंतांनीं भरपूर सामग्री करून ठेविली आहे. तेंव्हां आतां संत व भक्त कवींचा मूर्धाभिषिक्त रस जो भक्तिरस त्याची गोडी चाखूं. याचें आर्याभारतांतलें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे वस्त्रहरणप्रसंगीं द्रौपदीनें केलेला भगवंताचा धांवा होय. सभापर्वांतील पांचव्या अध्यायांतील आर्या ६९ ते ७९ अखेर हा धांवा गायिलेला आहे. पुढील दोन आर्यांत पंतांनीं प्रसंगाचें अवतरण केलें आहे.

**तो दुर्जन आर्धींहि साधूंच्या करुनि हानि रीतीची ।**
**नग्न सभेंत कराया पाहे खळ धरु नि हा निरी तीची ॥**
**जैं दुर्दशा कराया दुर्दैवें सिद्ध नीच हा केला ।**
**तैं दीनबंधुला ती कृष्णा मारी मनींच हांकेला ॥**

एवढ्या त्या भव्य राजसभेंत आपणास कोणी त्राता नाहीं हें पाहून द्रौपदीची दृष्टि अंतर्मुख झाली. दृष्टि अंतर्मुख झाल्याशिवाय ज्ञान काय, भक्ति काय किंवा कर्म काय, साधकास हातीं लागणार नाहीं. त्या शून्य व अगतिक स्थितींत तिनें

**हे नाथ, रमानाथ, व्रजनाथ, हरे, मुकुंद, कंसारे ।**
**गोविंद, कृष्ण, केशव, दीनार्तिहरस्त्वमेव संसारे ॥**

अशा नामस्मरणानें ईश्वराची करुणा भाकण्यास आरंभ केला व

**‘ काळेंही न सख्या तव दासीस पहावयासहि सकावें ॥** (शकावें)
**त्वद्भगिनीवस्त्र खळें नग्न करायासि काय हिसकावें ॥**

असा आक्षेप घेऊन, ‘ सुभद्रेहून मी तुला प्रिय; हे दयाब्धे, धांव.’

भक्तरक्षणाची बिरुदावली राख. होगलिता (ऐश्वर्य घालविणारा) होऊं नकोस' असें म्हणते. पण वरील उद्गारांत दिसणारा अहंकार टाकून पुढील आर्येत म्हणते :—

**भगिनी ऐसें वदल्यें, परि फाराचि लाजल्यें, न हें लटिक।**
**प्रभुजी, रक्षा तुमच्या दासांची मी लहानशी बटिक॥**

पुढें केविलवाणी होऊन म्हणते,

**भागा, या, गाय तशी मी, न धरी अघभयास हा यवन।**

दु:शासन हा यवन आहे व गुरुजनांची ही गजबजलेली (सद्) सभा खरी, पण त्याला ही वनाप्रमाणें निर्भय झाली आहे.

**गुरुजनसत्पालक, परि झालें या निर्दया सहाय वन॥**

मीं रानांत पडल्यासारखी असहाय आहे. पृथ्वीला उद्धरलीस तशी मला उद्धर, मी खळसभेंत उघडी पडलें आहें.

पुन: नामस्मरणानें हांका मारते:

**भो भगवन्भो वत्सल, भो हतचाणूरमल्ल भागावें।**
**विश्वें तुझेंचि, दुसरें न यश श्रीप्राणवल्लभा, गावें॥**

नंतर माझा अपराध तरी काय असें ती विचारते, व मजवर प्रसाद करा असें म्हणते.

**आजि असत्परपुरुषस्पर्श, न अपराध अन्य केला हो।**
**झांका प्रसादपदरें, न कुजनदृक्स्पर्श कन्यकेला हो॥**

या कळवळून केलेल्या धांव्याचा काय परिणाम झाला पहा!

**अवतरला उतराया जो दु:सह दुष्टभार महिवरला।**
**अहिवरलास्यपटु प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गहिंवरला॥**

आतां भक्तींतील अध्यात्मानें या धांव्याची गोडी चाखूं. द्रौपदी प्रथम आपणास देवाची भगिनी म्हणविते. म्हणजे तिची सख्य-भक्ति आहे. नवविधा भक्तींत शेवटची भक्ति आत्मनिवेदन होय.

ज्ञानेश्वर म्हणतात कीं,

**हो कां आत्मनिवेदनातळवटीं । जे पीठिका होय सख्याची ॥**
**पार्थु अधिष्ठात्रीं तेथींची । मातृका गा ॥** —ज्ञा. ६-१२७

भरत, लक्ष्मण, अर्जुन व द्रौपदी हे सख्यभक्तीचे अधिकारी. पण सख्यभक्तींत अहंकाराचा काहीतरी सांका शिल्लक असतोच. म्हणून द्रौपदी स्वतःस देवाची भगिनी म्हणविल्यानंतर आपणास देवाच्या दासांची बटीक म्हणविते व गाईप्रमाणें दीन होऊन अहंकार टाकते. पण मग पुनः देवापासून दुरावल्यासारखें वाटून जवळिकेसाठीं पुनः नामस्मरण करून आपत्तींत परपुरुषाचा केवळ स्पर्श हा कांहीं अपराध नव्हे, असें कळवळयानें स्वतःचें निर्दोषत्व स्थापून देवाशीं कन्यकेचें लडिवाळपणाचें नातें लाविते. ख्रिस्तीधर्मांतील देवभक्तांच्या व पितापुत्राच्या नात्यापेक्षां मातृसुतांचे आमच्या साधूसंतांच्या भक्तिमार्गांतलें नातें कितीतरी गोड आहे ! येथें अहंकार निमाला व आत्मनिवेदनाची, भक्तीची अखेरची पायरी जवळ आली. आत्मनिवेदन म्हणजे आत्म्याचें परमात्म्याला अर्पण ( आत्मनः निवेदनम् ) किंवा ( आत्मनि वेदनम् असा अलुक् समास ) आत्म्याच्या ठिकाणीं स्वतःला पहाणें. पंतांनीं काय मौज साधली आहे पहा. धांव्यांत ‘ कन्यकेला हो ’ हे शेवटचे शब्द उच्चारतांच पुढच्याच आर्येंत ‘ प्रभु करणोक्तें द्वारकेंत गंहिवरला ’ म्हटलें आहे. कवींची प्रतिभा अंतःस्फूर्तीनें गहन अर्थ लिहिते व त्यांतूनच तर्कसंगतिहि निघते. असो. पंतांनीं द्रौपदीचा धावा इतका तन्मयतेनें लिहिला आहे कीं, तें एक कविगीतच आहे व तें भक्तियुक्त असल्यानें भक्तिगीतही आहे. देवभक्तांच्या प्रेमाची भावना ज्यांना श्रद्धेनें आकळितां येईल त्या रसिकांसच याचा मधुररस चाखतां येईल.

आतां सर्वप्रिय शृंगारसाचीं दोन मुग्ध व विदग्ध उदाहरणें पाहूं. सुभद्रेनें एकाच नेत्रकटाक्षानें अर्जुनावर कशी मोहिनी घातली पहा,

**अमृतांशुची अहंकृति सर्व जिच्या नाशिली मुखानें ती।**
**तद्धृतिस होय, हाणुनि हृदयीं नयना शिलीमुखा, नेती ॥**

आदि० ३८-४७

अमृतांशु म्हणजे चंद्र, नयना शिलीमुखा म्हणजे नेत्रकटाक्षरूपी बाणास. कृष्णाच्या लक्षांत ही गोष्ट आल्यावर विनोदानें:—

**जाणोनि भाव भक्तप्रियकर हांसे, म्हणे मन कुलीनें।**
**त्वां न दिलें, परि नेलें करुनि बळ पहा कसें पटु मुलीनें ॥**

-आदि० ३८-४८

तेव्हां अर्जुन गलितगर्व होऊन प्रांजलपणें स्वतःचा पराजय मान्य करून कृष्णाची उलट थट्टा करतो—

**पार्थ म्हणे, तूं चेतश्चोर, तशीच स्वसा तुझी देवा।**
**मोहावा स्मर, हर हर हर! तेथें आमुचा किती केवा ॥**

-कित्ता० ४९

स्मरहर म्हणजे मदनशत्रु शंकर. तेव्हां,

**करुनि कृपा कृष्ण म्हणे अर्जुनजी तरि मुलीस पळवा हो ॥**
**पळ वाहो कोपें बळ (बळराम) हे तनु अतनुज्वरें न पळवा हो ॥**

—कित्ता० ५०

पळवा म्ह. वाळलेला पाला. हा कोकणांतला शब्द आहे. आतां सुभद्रेला घेऊन हस्तिनापुरास आल्यावर द्रौपदीला भेटण्यास त्याला कसें चोरट्यासारखें झालें तें पुढील आर्येंत पहा—

**कुंतीनें नमुनि तिची आज्ञा घेऊनि फार शंकितसा।**
**कृष्णेकडे हळुहळू एकाकी जाय जिष्णु अंकितसा ॥**

—आदि० ३८-७०

आतां अर्जुन-द्रौपदीच्या भेटीची पुढील आर्या पहा—

**प्रणयें प्रिया प्रियातें स्मित करुनि म्हणे तया नरमणीतें ।
दृष्टि निववली, जा जी, स्ववियोगें द्या भया न रमणीतें ॥**

—किरा, ७१

या आर्येतील अनुप्रास, सहजसुंदर सहा अक्षरी यमक, प्रिया-प्रियातें, रमणी, नरमणी या शब्दांनीं साधलेले पर्यायोक्त, 'दृष्टि निवविली' यांतील व्याजोक्ति व शेवटच्या चरणांतील प्रणय-कोपयुक्त गोडवा, कोणत्या कोणत्या म्हणून गोष्टींची प्रशंसा करावी ? मोत्यांच्या लडींतील प्रत्येक मोतीं पारखून घ्यावें, त्या-प्रमाणें प्रत्येक शब्द सहजासहजीं निवडून पडला आहे. कोणत्याहि कवीला गौरव प्राप्त करून देईल अशी ही आर्या आहे. 'प्रेमें द्रौपदि पार्था,' असा नीरस चरण सामान्य कवि लिहिता; पण पंतांनीं 'प्रणय' हा प्रियाराधनांतील ( Courting ) व प्रणयरम्यतेंतील ( Romance ) मूर्धाभिषिक्त शब्द वापरला आहे. व्यासांनीं 'पञ्चा-नामपि भर्तृणां चित्तप्रमथनी रह:' म्हणजे पांचहि भर्त्यांच्या मनाचें एकांतात प्रमथन करणारी, असें जिचें वर्णन केलें आहे, तिचा अर्जुन हा नरमणि प्रियकर! कारण, अर्जुन हा भक्ति, शौर्य, वीर्य व ललितकला यांनीं संपन्न असा खरा पुरुष होता. म्हणूनच द्रौपदी-सारखी रमणी 'यत्रैव रज्यति विदग्धा' या कोटींतील तो होता. द्रौपदीचें भीमावर अधिक प्रेम अशी सामान्य समजूत आहे. पण महाप्रस्थानांत द्रौपदी प्रथम गळून पडली तेव्हां धर्मानें तिचा दोष असा दाखविला आहे—

**बहु पक्षपात विजयीं जो होता, तोचि या फळीं फळला ॥**

—महा. २-५

पण पुरुषाची रमणी या दृष्टीनें अर्जुनाविषयीं दोषरूपही पक्ष-पात तिची शृंगारसुंदरताच दर्शवितो व म्हणून पंतांनीं तिजबद्दल

प्रिया शब्द वापरला आहे. या 'प्रणयें प्रिया प्रियातें' इ. आर्येला उपमाच द्यावयाची तर द्रौपदीला सुभद्रेच्या सौंदर्याचा हेवा वाटू नये म्हणून अर्जुन सुभद्रेला द्रौपदीचे प्रथमदर्शनास पाठविण्याचे अगोदर,

**वेष असा करवी कीं आवृत लावण्य तें तिचें व्हावें ।**
**परि ती फारचि शोभे ॥** —आदि. ३८-७७।७८

या आर्येत वर्णिल्याप्रमाणें साध्या वेषांत झाकलेल्या, तरी पण स्पष्ट प्रतीत होणाऱ्या सुभद्रेच्या सौंदर्याचीच द्यावी लागेल इतका प्रसादगुणही त्या आर्येत आहे. या पुढील दोन आर्यात आपणावरील अर्जुनाचें प्रेम कमी होणार हें द्रौपदी मोठ्या चातुर्यानें सांगते.

**हा प्रेमबंध पहिला, दुसरा तो प्रेमबंध, दृढ अन्य ।**
**भाराचाही बंध प्रथम श्लथ होय, जाणती वन्य ॥**
**मधुप नव्या नलिनीला सोडुनि, पहिलीस काय सेवील ।**
**कीं सद्यः पक्वान्न त्यजुनि, रसिक यातयाम जेवील ॥**
—आदि. ३८-७२।७३

पहिल्या आर्येच्या उत्तरार्धांत मूळ महाभारतांत नसलेला 'जाणती वन्य' हा भाग अधिक जोडून त्या वाक्याला 'टेल ऑफ एपिग्राम' म्हणजे ज्ञानेश्वरांचे शब्दांत 'कुंदकळ्यांचें अगरडें' जोडून त्याला तिखटपणा आणला आहे. दुसऱ्या आर्येतील ताज्या व शिळ्या पक्वान्नांचा लोकप्रिय दृष्टांत प्रसिद्धच आहे. ह्या द्रौपदीच्या गोडव्यावर अर्जुनानेंही तसेंच मार्मिक उत्तर दिलें आहे.

**जिष्णु म्हणे तद्रचितें मज मिळतिल हे न गोडवे दास्यें ।**
**लागति तुझ्या मुखें हे बोल, जसे शब्द गोड वेदास्यें ॥**
--किता, ७४

नंतर सुभद्रेकडे द्रौपदीनें कोणत्या दृष्टीनें पहावें हें पुढील आर्येंतील नितांतसुंदर उत्प्रेक्षेनें सांगितलें आहे:

**दास्यें तुझी सुमति हे निववील सुरसिंधु जेंवि गौरीची ।**
**मूर्ति धरूनि तुजकडे आली हे प्रीति जाण शौरीची ॥**

—किता, ७५

या आर्येंतील उत्तरार्धांत पंतांनीं सुभद्रेवर कृष्णप्रीतीची उत्प्रेक्षा करून फारच बहार केली आहे. इतकी नितांत सुंदर उत्प्रेक्षा शोधावीच लागेल. श्रीकृष्ण द्वारकेंत राहणार, तेंव्हां त्याच्या प्रीतीला एकीकडे द्रौपदीचा विरह व दुसरीकडे अर्जुनाचा विरह या दोहोंवर उपाय म्हणून कृष्णानें आपल्या उभयविध प्रीतीला सुभद्रेसारख्या शृंगारसुंदरीचें रूप देऊन इंद्रप्रस्थीं उभयतांचे सान्निध्यांत कायमची रहावयास पाठविली. अर्थात् सुभद्रा, कृष्णाची लाडकी बहीण, त्याची मूर्तिमंत प्रीतिच असल्यामुळें उभयतांसही सारखीच प्रिय वाटणार व द्रौपदीलाही तिच्याबद्दल सवतीमत्सर वाटूं नये व वाटणारही नाहीं, हें अर्जुनाकडून पंतांनीं मोठ्या चातुर्यानें व्यंग्यार्थानें सुचाविलें आहे. कालिदासाचा ‘आलक्ष्यदंतमुकुलान्’ इत्यादि पुत्रस्पर्शानें होणाऱ्या सुखाच्या वर्णनाचा श्लोक वाचून शेझी नांवाचा फ्रेंच पंडित शाकुंतल डोक्यावर धरून नाचूं लागला, तशाच प्रकारचा प्रचुर काव्यानंद ही उत्प्रेक्षा वाचून आमच्या अनुभवास आला.

महाभारतांत शृंगाररसाचे विशेष प्रसंग नाहींतच. त्यांतील पंतांनीं रंगविलेल्या दोन प्रसंगांची आम्हीं जरा विस्तृत चर्चा केली आहे. आतां वीररसाच्या अशाच एका प्रसंगाची चर्चा करूं, म्हणजे त्यामुळेंही पंतांच्या कवित्वाच्या चातुर्याची आपणांस खूण पटेल. तो प्रसंग म्हणजे भीम-दुर्योधनाचें गदायुद्ध हा होय. रा. पांगारकरांनीं

याचा गर्दीनें उल्लेख केलेला आहे. म्हणून आम्ही हा प्रसंग निवडला आहे. त्याचें वैशिष्ट्य काय तें आतां पाहूं.

आपणाजवळचें धन बहुमोल आहे कीं हीनमोल आहे, हें इतरांच्या सदृश धनांशीं त्याची तुलना केली असतां बरोबर समजतें. गदायुद्ध हें द्वंद्वयुद्ध होतें. त्यांतला एक वीर बळानें व दुसरा कौशल्यानें अधिक असा होता व गदा हें त्यांचें साधें हत्यार होतें. तुलनेसाठीं आपण पाश्चात्यवाङ्मयाकडे नजर टाकूं. इंग्रजी वाङ्मयांतील कवींचा कवि जो स्पेन्सर त्याचे काव्यांत स्त्रिया व दीनदुबळे यांचे कैवारी जे दाक्षिण्ययुक्त वीर व मानवजातीचे शत्रु जे पशुप्राय असुर ( ड्रॅगन्स ) त्यांचीं द्वंद्वयुद्धें वर्णिलीं आहेत. पण या द्वंद्वांत मानव व पशु असें वैषम्य आहे. ड्रॅगन् हे निसर्गविकृत असत. त्यांचे युद्धांत मानववीरांचा जय ठरलेला असे. होमर व मिल्टन यांचे वीरांचे द्वंद्वयुद्धांत देव भलत्याच वेळीं मध्यें पडून व शकुनरूपानें जयपराजय प्रेक्षकांस व योध्यांसही निश्चितपणें अगोदर कळवून युद्धाचा विरस करतात. सोराब व रुस्तुम या इराणी वीरांचे द्वंद्वयुद्धांत सामनेवाले बापलेक आहेत हें वाचकांस माहित असल्यामुळें युद्धाची पृष्ठभूमि अगोदरच कारुण्ययुक्त होते. वरील सर्व युद्धांत, युद्धाचे मौजेंत थोडा तरी कमसरपणा येतो. आतां संकुलयुद्ध--वर्णनांत टेनिसनचें ' चार्ज ऑफ दि लाइट ब्रिगेड ' हें वास्तवयुद्धाचें छान उदाहरण आहे. पण तो हल्ला चुकीनें केला असल्यामुळें जरी तो यशस्कर असला तरी परिणामाचे दृष्टीनें 'शौर्यं श्वापदचेष्टितम् ' अशा तऱ्हेनें क्रोधान्ध पशूंच्या मुसंडीसारखा होता. तो उज्ज्वल यशावह असला तरी ती लढाई नव्हे. It was glorious, but no war असें सहृदय टीकाकार म्हणतात. स्कॉटनें आपल्या ' मार्मिअन ' या काव्यांत मात्र ' फ्लॉडन फील्ड ' च्या

लढाईचें वास्तविक असें उत्कृष्ट वर्णन केलें आहे व तें अगदीं निर्दोष आहे. वास्तविकतेच्या व सचित्रतेच्या दृष्टीनें आपल्या मराठी वाङ्मयांतील मुक्तेश्वरानें केलेलें भीमजरासंधांचें बाहुयुद्धवर्णन व पंतांनीं केलेलें भीमदुर्योधनांच्या गदायुद्धाचें वर्णन हीं केव्हांही सरसतेनें वरील वास्तव युद्धवर्णनाशीं बरोबरीनें अगदीं शोभण्यासारखीं आहेत.

शल्याला पांडवांनीं मारल्यावर दुर्योधन एका डोहांत जाऊन लपून बसला होता. पांडव तेथें गेले. धर्मानें दुर्योधनास डिवचावयास प्रारंभ केला तो असा:—

होता भजत सदा ग्रह मसणा कीं वारुळा जसा सर्प ।
कोठें सोडुनि गेला तुजला तो मान आणि तो दर्प ॥ गदा.१-२४

तेव्हां दुर्योधन म्हणतो 'धर्मा, प्राणिमनीं भय शिरे न हें चित्र' 'जातों तपोवनातें', 'आतां नलगेचि मला, घे तूंचि, दिली तुलाचि मन्माहि म्यां.' तेव्हां धर्म खोंचून म्हणतो कीं, पूर्वीं

अति तीक्ष्णें सूच्यग्रें भेदे तितुकीहि मेदिनी भारी ।
वेड्या सुयोधना, तूं आतां देतोसि ती कशी सारी ॥ गदा.१-४२

धर्मानें या वेळेस मोठा कणखरपणा दाखवून दुर्योधनास म्हटलें,

जें जीवन मरण तुझें, हें आजि मदीय मानसाधीन ।
प्रायश्चित्त तुज वधचि ... ... ... ॥

धर्मानें असें डिवचल्यावर, दुर्योधन,

हें वचन न साहे, मग आला घेउनि गदेसि बाहेर ।
वाहे रक्त, गमे तें धृतिचें, कुरुराजदेह, माहेर ॥
निर्भय परम भयंकर, गमला तो दंडपाणि अंतकसा ।
वाटे करितिल याचा पांडव पांचाल वीर अंत कसा ॥
गदा. १–६९।७०

मध्यें धर्म आपल्या स्वभावावर गेला व ‘ दुर्योधनास पांचांपैकीं वाटेल त्याशीं लढ,’ अशी त्यानें सवलत दिली. तेव्हां श्रीकृष्ण धर्मावर रागावून म्हणाला,

**बापा अजातशत्रो, स्वार्थपरार्थांपुढें तुला नुमजे ।**
**धर्मा, तूं,**
**दाटुनि, वांटुनि, घाटुनि, चाटुनि पीतोसि विष मरायातें ॥**
—गदा. १-९२।९०

पुनः श्रीकृष्ण जशीं बोटें मोडून म्हणतो, धर्मा,

**ज्यांहीं अरिवरिहि दया कीजे ऐसेंचि घातलें कानीं ।**
**केला त्यांहींच नृपा धृतराष्ट्राच्या न घात लेंकांहीं ॥**-किता,९४

व शेवटीं काकुळतीस येऊन म्हणतो,

**हित शत्रुचें करावें, संकट आम्हां श्रितांसि ओपावें ।**
**कोपावें न, विभो, या बंधुजनांसि प्रसन्न हो, पावें ॥** किता ९५

या प्रसंगांतून दुर्योधनाच्या मानीपणानें व दाक्षिण्यानेंच ( Chivalrous Spirit ) त्यांस वांचविलें. त्यानें पांचांपैकीं वाटेल त्यानें यावें असें म्हटलें व भीम पुढें झाला.

गदायुद्धाची पृष्ठभूमि ही इतर द्वंद्वयुद्धांच्या पृष्ठभूमीपेक्षां जास्त युद्धानुकूल आहे. द्वंद्वयुद्धांतील वीर पुष्कळ वेळां परस्परांस वीरोचित आदर दाखवितात. त्यांच्यांत व्यक्तिद्वेष इतका तीव्र नसतो. पण भीमदुर्योधनाचे मनांत परस्परस्नेहादराचा बिंदुही नाहीं. वृंदावन म्हणजे कवंडळाचे फळांत जसा आंतबाहेर एकच कडूरस रसरसलेला असतो, तशीच या दोन वीरांची मनोवृत्ति पूर्ण मत्सरग्रस्त असते. परस्परांच्या पराक्रमाची, कौशल्याची वीरोचित अशी स्तुति ते बिलकूल करीत नाहींत. पांडव पांचाल वीर भीमास उत्तेजन देण्यास होते. दुर्योधनास सहानुभूति दाखविण्यास कोणीहि स्व-

पक्षीय नव्हता. गुरु बळराम हा मात्र त्रयस्थ होता. म्हणूनच पंतांनीं दुर्योधनाचे शौर्याची अशी प्रसंशा केली आहे.

**भीमावरि दुर्योधन आला पाचारितांचि उत्साहें ।**
**वरकड सर्व असो बा, लेशहि साहे न शौर्य कुत्सा हे ॥**

—गदा, अ. १-१२६

दुर्योधनाचें शौर्य हें असें अगदीं निर्दोष होतें.

आरंभीं दोघांचीं परस्परनिर्भत्सनेचीं खोंचदार भाषणें होतात. ( ज्याला इंग्रजींत 'हर्लिंग डिफायन्स' म्हणतात. ) भीम म्हणतो,

**पांडव न हेतु तुमच्या, हे फिरले तेचि अक्ष ( फांसे ) मरणाला ॥**

—गदा. २-९

तसेंच,

**तुज देय फळ दिलें किति, किति उरलें हें मनांत आठवितों ॥**

—गदा. २-१०

दुर्योधनाचें उत्तर याहून किती तरी झणझणीत आहे. तो भीमास म्हणतो :—

**तुज लाविलें स्वतेजें म्यांचि कढी-वरणभात घाटाया ।**
**वांटाया प्राज्य पुरण, पापडपोळ्या प्रभूत लाटाया ॥**
**कौंतेया, त्वां शारद्वारिधरापरि वृथा न गर्जावें ।**
**बळ असल्या दावावें प्रथम, विकत्थन समग्र वर्जावें ॥**

—गदा. २-१६।२०

तेव्हां,—

**त्या वचनातें पूजिति पांडव पांचाळ सर्व बा राया ॥**

—कित्ता. २१

सुरवातीलाच

**दुर्योधनें गदेनें पार्श्वींच प्रथम ताडिला रागें ।**
**परि तो प्रहार नाहीं गणिला कुंतीसुतें महाभागें ॥**

**तद्नंतर कुरुराजें केला आघात मस्तकीं क्रोधें।**
**बोधें भोग, तसा तो, धैर्यें त्या साहिला महायोधें॥**

—गदा. ३-१६।१७

दुसऱ्या अर्धातील वेदांती उपमेनें भीम प्रथमपासूनच कसा कमी पडत चालला हें पंतांनीं मोठ्या चातुर्यानें सूचित केलें आहे. दुर्योधनानें आणखी एक तिसरा फटकारा भीमाचे छातींत मारला. भीम म्हणूनच टिकला. इतर योद्धा त्यानें मरताच.

**मग भीमेंहि क्रोधें पार्श्वींच गदाप्रहार बा केला।**
**पडला गुडघे टेंकुनि ...... ॥**

अर्थात् दुर्योधन. तेव्हां भीमपक्षीयांनीं सिंहनाद केला; त्याचा परिणाम,

**कुरुसिंहाच्या नाकीं झाली, पांचालगर्जना, काडी।**
**धांवोनि शंखदेशीं ( कानशिलावर ) अत्यावेशें वृकोदरा ताडी॥**

तेव्हां भीमही,

**खवळे, शिवला पायें जाणों हरि, कीं खगेंद्र नागानें।**

व नंतर

**कुरुपतिस दिला भीमें उग्र गदेचा असा रपाटा कीं।**
**भीमगदाघातें तो नृप पडिला, जेंवि शालतरु वातें॥**

तेव्हां पांडव पांचाल हंसले.

**जालें तसेंचि, कोणें त्यासि 'म्हणावें उगे रहा, न हंसा'।**

नंतर लगेच,

**डोहांतुनि गजसा नृप, मोहांतुनि निघुनि, दे तडाखा तो।**
**भीमहि पडला, गमला पविपातें देश तो तडा खातो॥**

इतक्यांत श्रीकृष्ण अर्जुनास सांगत होता कीं,

**धर्में भीम न यातें स्पष्ट अधर्में रणांत मारील।**
**वारील व्यसनातें, अनयाचि आम्हांस आजि तारील॥**

त्याच वेळीं भीमानें अर्जुनाकडे दृष्टिक्षेप केला. तेव्हां अर्जुन

**प्रेक्षतो भीमसेनस्य सव्यमूरुमताडयत् ।**

अर्जुनानें मांडीवर थाप मारून भीमास खूण केली. 'भीम पहात असतां ' एवढ्याच मूळ शब्दांवर पंतांची मखलाशी पहा:—

**कार्यव्यग्रा माता सूनुकडे जेंवि दाइला धार्डी ।**
**भीमद्‌या ताशि दृष्टिसि, तों जय सव्योरुतें करें तार्डी ॥**

तेव्हां भीमास स्वत:ची प्रतिज्ञा आठवली. गदा एकमेकींवर आपटत त्यांचें वर्णन पहा.

**वसतां गदा गदेवरि किटळें बहु उसळती अहा त्यांचीं ।**
**तेजें जशीं विजांचीं, झांकिति नयनें नृपा पहा त्यांचीं ॥**

अर्जुनानें भीमास केलेली खूण दुर्योधनाचे लक्षांत आली. तेव्हां दुर्योधन,

**चुकवावया प्रहार, व्योमीं उडतांचि ऊरुवरि ताडी ।**

अर्थात् भीम

**मांड्या मोडुनि मारुति ( भीम ) महिवरि सहसा सुयोधना पाडी ॥**

देवांच्या अश्रुबिंदूंसह दुर्योधन भुईवर पडला. गदायुद्धाचें वर्णन संपलें. पंतांनीं आपल्या कवित्वाचा एक परमोच्च बिंदु गाठलां. (गदा. अ० ३ रा. ) भीष्म-परशुरामयुद्ध, अभिमन्युवध, घटोत्कचवध, दु:शासनवध वगैरे अनेक प्रकरणांत पंतांनीं वीररसाचे पाट वाहविले आहेत.

पंत एकच भावना पात्र व प्रसंग यांच्या भिन्नत्वानें कशी रंगवितात याचीं कांहीं उदाहरणें पाहूं. उत्तर अर्जुनास विचारतो, ' तूं एकटा कौरवांशीं लढून गाई कशा सोडवशील ? '

तेव्हां अर्जुन म्हणतो,

**मागें युद्धें केलीं, म्हणवून जगांत घेतलें धन्य ।**
**तेव्हां गुरुप्रसादाहूनि मज सहाय कोण तो अन्य ॥**

वि. ३–१२३

गुरुभक्तियुक्त विनयानें अर्जुनाचा आत्मविश्वास कसा खुलून दिसतो! आतां कर्णाचा बेदरकार आत्मविश्वास पहा. तो शल्यास म्हणतोः—

**दोघांची काय कथा, जरि कृष्णार्जुन सहस्र येतील ।**
**तरि माझे शर त्यांच्या प्राणधनातें हिरोनि घेतील ॥**

कर्ण. २७-३४

भीष्म स्वतःच्या पराक्रमाविषयीं दुर्योधनास म्हणतात,

**ठावें असेचि तुजला माझें मज न स्वरूप कथवे गा ।**
**गरुड स्ववेग न कथिल कथिल समस्तान्यपत्ररथ** (पक्षी) **वेगा ॥**

उ. १२-४९

अर्जुनाचा पुढील त्वेषयुक्त शोकोद्गार पहाः—मेलेल्या अभिमन्यूस उद्देशून तो म्हणतो,

**संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफळ, तूं मरावा हे ।** द्रो० ७–१६

कीचकानें द्रौपदीस गांजलें असतां भीम त्वेषानें म्हणतो,

**अज्ञातवास नसता तरि अरिचें तैंचि मुरडितों नरडें ।**

वि० १-१०७

दुःशासनास ठार मारल्यावर त्यास उद्देशून तो म्हणतो,

**काय करूं, काळानें अभय दिलें, घेतलास तूं पदरीं ।** कर्ण ४५-२९

मृत्यूनेंच तुला पाठीशीं घातलें, ही कोटी फारच बहारीची आहे. कित्येक प्रसंगीं एकेकच जोरदार भावना केवळ एकेका आर्येत किंवा आर्याधांतच बाटलींत दाबून भरलेल्या वायूप्रमाणें पंत प्रगट करतात. उत्तराचें सारथ्य करण्यास बृहन्नडेला संमति देतांना,

कृष्णा म्हणे बहु बरें, व्हा मारुत (वारा) हो पलाल (पाचोळा) खळबळ तें।
मच्चित्त न अरिसैन्यें तुमच्या दैन्येंचि फार खळबळतें॥ वि. ३-१३

कर्ण श्रीकृष्णास युद्धच होऊं दे असें म्हणतो,

जो नाटोपे पहिला तो आटोपेल काय गा वूत (ऊत)।
जोडा यश, कवि होउनि रोमांचव्याप्त-काय गावूत॥
—उ. १०-९०

विदुराचें कृष्णप्रेम व भक्तप्रेम पंतांनीं एका आर्यार्धांतच कसें सुचविलें पहा,

'आहेत सुखी पांडव, देवा, आलास-काय सामास॥
—उ० ७-४०

कृष्णाच्या भेटीनें कुंतीला कसें भडभडून आलें!

वैकुंठाच्या कंठीं घालून मिठी रडे पृथा आर्या।
ब्रह्मासहि गहिवरवी महिवरवीरेंद्र पांडुची भार्या॥
उ. ७-४४

आभिमन्यु मारला गेला त्या संध्याकाळीं परत येतांना अर्जुनाला होत असलेल्या शोकाच्या गूढ संवेदनेचें स्वभावोक्ति-अलंकारांत काढलेलें चित्र पहा. अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो:—

कण्ठ गहिंवरें भरला, भरली हृदयांत केशवा, धडकी।
येतें रडें वृथा कां, बा माझी प्रकृति काय रे रडकी॥
द्रोण. ७-२

श्रीकृष्णाच्या अस्पष्ट गूढभीतीचें हळुवारपणानें काढलेलें चित्र पहा:

भीष्म द्रोण निमाले, येउनि पडला प्रसंग कर्णाशीं।
गडबडले हृशिकेशी, पार्था सखया, पुढील गति कैसी॥

कर्णाची अशाच प्रकारची भीति पहा,

**कर्ण म्हणे शल्या, गति भीष्माची शत्रुंनीं तशी केली ।**
**गुरुहि अधर्में वधिला, विजयश्री ओढुनी बळें नेली ॥**
**कळलें यावरुनि मला, कीं होणारापुढें न बळ चाले ।**
**विश्वख्यात पितामह गुरु पुरुषव्याघ्र मृत्युवश झाले ॥**

—कर्ण. २५-४।५

भीमाचें मारुतीविषयक बंधुप्रेम पंतांनीं असेंच एका साध्या आर्येत सूचित केलें आहे.

**भीम म्हणे दादाजी, केली दुर्योधनें दया वाटे ।**
**हे पाय पाहतों मी कैसे, जरि लागतों न या वाटे ॥**

—वन. ५—६७

भीष्माचें कर्णाविषयीं, ' मरणांतानि वैराणिं' ( मरणाच्या वेळीं वैर संपावें ) या न्यायानें अन्त्यसमयींचें वात्सल्य पहा:—भीष्म म्हणतात,

**जा, परि पळ पाहूं दे वदन, करीं पूर्ण काम, हा भागें ।**
**ठाक पुढेंचि, धरावी इतुकी त्वां भीड कां महाभागें ॥**
**या भीष्मप्रभुवाक्यें आवरला रविसुतास न गहिंवर ।**
**प्रेमभरचि विकळ करी धीरां, न तसा पडोनि नगहि वर ॥**

——भीष्म ११—७४, ७५

शेवटच्या अर्धांत कसा मार्मिक अर्थांतरन्यास अलंकार घातला आहे.

स्त्रीपर्वांतील स्त्रियांचे अतिकरुण शोकोद्गार असेच हृदयास पाझर फोडणारे आहेत. त्यांतून भीष्मांच्या वर्णनाचा गांधारीचा एकच उद्‌गार पुढें देतों.

**यापुढती धर्मार्थें पांडव पुसतील तत्व कोणातें ।**
**हा! राजनीति विधवा झाली, बैसेल धरुनि कोणातें ॥ १**

—स्त्री ५।३३

१ ही आर्या लोकमान्य टिळकांस कशी छान लागू पडते!

३२७९८ १८८८६७
१४१०   १८८८५


पंतांना वीर, भक्ति व वत्सल रस उत्कृष्ट साधतात, हें पांगारकरांचें मत मान्य करून आपण पुढें चालूं.

पंतांची भाषाशैली:—'रीतिरात्मा तु काव्यस्य,' किंवा style is the man म्हणजे शैली हा काव्याचा व कवीचा आत्मा आहे, या तत्त्वास धरून पंतांची भाषाशैलीही वाखाणण्यासारखी आहे. पंत हे कथानक-कवि होते, म्हणजे गोष्ट सांगणारे होते. गोष्ट सांगणारास ती चटकदार करतां आली पाहिजे. पंतांच्या रचनेंत तें कौशल्य भरपूर आहे. सर्पाचा सूड उगवणाऱ्या रुरूचें वर्णन पहा.

**तो चंड दंडपाणी, सर्प वधी, वारुळें, बिळें शोधी।**

—आदि० ३-४३

इंद्र मेनकेला विश्वामित्राचे तपाचा भंग करण्यास पाठवितांना तिला ह्मणतो,

**भ्रूधनु ओढुनि, कज्जल विषदग्ध कटाक्षशर, वरारोहे।**
**सोडुनि, लुटीं तपोधन, सौभाग्यश्री तुझी भरारो हे॥**

—आदि. १२–२०

पंतांच्या शैलींत ओज व प्रसाद अवश्य तेथें भरपूर आहेत, त्या मानानें माधुर्य कमी आहे. ओजोगुणांत दोन भाग आहेत, वीर व रौद्र रसांचा परिपोष करणारा एक व संस्कृत समासांवर भर दिल्यामुळें अनेक स्थळीं दुर्बोधत्व आणणारा दोषरूप झालेला दुसरा. पुढील उत्कृष्ट उदाहरण पहा:—द्रौपदी विराटाच्या स्वयंपाक घरांत निजलेल्या भीमास म्हणते,

**निजलां काय मृतापरि, जागे व्हा सिंहसे उठा, राहो।**
**निद्रा; कीर्ति वरा हो, हीप्रद हा बाहु भृगुकुठारा हो॥**

—वि० १–८७

आतां अयोग्य ओजाचें उदाहरण पहा—जनमेजयाचे सर्पसत्रांत

गुरुशापविधिकृतदनुमोदनसन्मंत्र मुनिबळें कुंडीं ।
जैसे पतंग दीपीं, पडाति अमित सर्प वन्हिच्या तुंडीं ॥
नानावर्ण, महाबळ, वृद्ध, शिशु व्याळ म्हणति 'हा', रडती ।
पडतां कृशानुवदनीं, दीन महाकाय फार आरडती ॥

—आदि० ७।२।३

येथें पहिल्या आर्येतील ओजानें पुढील तीन अर्यांतील प्रसादगुणास कमीपणा आणला आहे. तथापि प्रसादगुण असलेल्या पंतांच्या उत्कृष्ट आर्या हव्या तितक्या आहेत. गोष्टीला विनोदानें चटकदारपणा आणतां येतो. पंतांच्या काव्यांत सूक्ष्म विनोद ठिकठिकाणीं आहे. पुढील उदाहरण पहा.

होउनि सिद्ध रथावरि, चढतांचि सहोत्तरा तिच्या आली । (सख्या)
म्हणती बृहन्नडे तुज वीरश्री गौरवावया आली ॥

—वि. ३-२१

बृहन्नडेच्या वीरश्रीचा गौरव हें वीरविडंबनाचें छान उदाहरण आहे. दुर्योधनानें अलंबुष नांवाचा राक्षस घटोत्कचावर पाठविला. घटोत्कचानें त्याचा शिरच्छेद केला, व नंतर

कुरुपतिपदीं अलंबुश शिर ठेवुनि भीमसूनु पाय नमी ।
विनयें म्हणे पहाया आलों, आणूनिया उपायन, मी ॥

द्रोण. १५–३०

ह्या आर्येतील नम्र व्याजोक्तीनें घटोत्कचाचा टारगटपणा छान प्रकट झाला आहे. कणिकानें सांगितलेल्या स्वार्थपंडित कोल्ह्याच्या गोष्टींत, हंसकाकीय कथानक, बृहन्नडेचें कवचधारण, वगैरे प्रसंगांच्या वर्णनांत विनोदाच्या चांगल्या छटा आहेत. अर्जुनानें श्रीकृष्णाच्या अंगांतून कर्णानें मारलेले बाण हळुहळु काढले, त्यावरून पुढील आर्येतील कोटी पहा.

**जिष्णुहि शनैःशनैः शर, शरणांगांतूनि साश्रु आकर्षी।**
**ब्रह्म अभेद्य म्हणे त्या श्रुतिसि म्हणति ते नमोऽस्तु नाकर्षि॥**

—कर्ण. ५०-२

श्रीकृष्णरूप ब्रह्म बाणांनीं भेदिलें, तेंव्हां ब्रह्म अभेद्य आहे असें म्हणणाऱ्या वेदाला नमस्कार असो असें देवर्षि म्हणाले.

तथापि अलिकडच्या वाङ्मयांतील विनोदाच्या मानानें संस्कृतांत व जुन्या मराठींत विनोद पुष्कळच कमी व पंतांच्या काव्यांतही तो बेतानेंच आहे. मात्र पंतांच्या आर्याभारतांत खोंचदार, क्रोधयुक्त, बोचक, उपहासपर, तिरस्कारदर्शक व मर्मभेदक भाषणांचीं भरपूर उदाहरणें आहेत व त्यानें काव्याला ठिकाठिकाणीं खमंगपणा, चुरचुरीतपणा व झणझणीतपणा आला आहे. 'पांडवांचा जय' 'पांडवांचा जय' या भीष्मादिकांच्या घोषाला मानी दुर्योधनाचें तिखट उत्तर पहाः—

*** गांधारि म्हणे तज्जय कां ? त्यां आहेत काय बा सिंगें।**
**कीर्तिवर म्हणुनि विधिनें, बांधियलीं त्यांस काय बासिंगें॥**

—उ. ५—५०

ह्या आर्येंत दुर्योधनाचा पांडवांविषयीं मत्सर अगदीं नागडाउघडा आहे व त्यांच्याबद्दल दर्शविलेला तुच्छपणाही तसाच अपमानास्पद आहे व प्रतिपक्ष्यास चूप करणारा आहे. या आर्येत माधुर्य, प्रसाद व सुंदर पंचाक्षरी यमक असून, दुसऱ्या अर्धांतील भव्य कल्पनेनें दुर्योधनाचे भाषणास राजोचित आत्मविश्वासानें भारदस्तपणा आला आहे. पंतांच्या अत्युत्कृष्ट आर्यांपैकीं ही एक आहे. कर्णाला उद्देशून शल्यानें काढलेले व कर्णास फजीत करणारे

---

* गांधारी+इ (अपत्यार्थक प्रत्यय. दीर्घ ईचा लोप व गांधारि=गांधारीचा मुलगा)

उद्गार पहा. घोषयात्राप्रसंगीं चित्ररथानें दुर्योधनास बांधून नेलें, त्याविषयीं शल्य कर्णास म्हणतो:—

**बन्धविमुक्त सुयोधन तेंव्हां त्वां कीं धनंजयें केला।**
**राधेय अन्य तूं तो, अन्यचि जाणों पळोनि जो गेला॥**

तसेंच

**त्या गोग्रहप्रसंगीं, भीष्मद्रोणादि सर्व एकानें॥**
**केले भग्न, दशा ते तुमची क्षण आयकों नये कानें।**
**तेंव्हां त्वां तो अर्जुन राधेया, कां न जिंकिला शस्त्रें।**
**अस्त्रें गेलीं होतीं कोठें, नेलीं हिरोनि जैं वस्त्रें॥**

—कर्ण, २५-२७ ते २९

भाषाशैली आकर्षक होण्याकरितां हुबेहुब वर्णन आटोपशीरपणानें करतां आलें पाहिजे. याही बाबतींत पंत आपलें कार्य चातुर्यानें करतात. वस्तूचें स्वरूप, तिचे गुणधर्म व क्रिया यांवरून स्पष्ट होतें; म्हणून वर्णन, नामें, विशेषणें व क्रियापदें यांनीं चटकदार होतें.

वानर लंकेच्या तटाला खणती लावूं लागले, तेंव्हां त्यांचे सर्व अवयव टांक्या व घण यांहून तीव्र व जबरदस्त होते, असें पंत वर्णितात.

**'टंक घनाधिक त्यांचे खर, कूर्पर, दंत, नखर, गुडघे ते।**

—आदि, १२–३२

सावित्रीनें यमाची उडविलेली धांदल पहा;

**भुलला धर्म द्युतिला, धृतिला, मतिला तिच्या तथा स्तुतिला।**
**न करुनि विचार, जावी मागें म्हणुनी म्हणे 'तथास्तु' तिला॥**

वन. १३-७८

ह्या दोन्ही उदाहरणांत नामांनीं वर्णन सजविलें आहे. परशुरामाचे बाणानें भीष्मास तीव्र वेदना झाली, तिचें वर्णन—

**'बा, ढीग वेदना अनुभवल्या समरीं, परंतु ती गाढी।**—उ.१३-८४

येथें ढीग व गाढी या विशेषणांनीं वर्णन चटकदार केलें आहे. आतां क्रियापदाचें उदाहरण–श्रीकृष्ण दुर्योधनास टोंचतो:—

**कितव शकुनि करुनि पुढें, धर्मात्मा धर्मराज नागविला ।**
**जागविला चिंतेनें, तेरा वर्षं सदैव भागविला ॥**—गदा० ६-३०

जयद्रथाचें शिर उडविण्याकरितां वज्रास्त्रानें मंतरलेला बाण अर्जुनानें सोडला, त्याचें वर्णन पहा.

**अर्जुन म्हणे 'बहु बरें' गाण्डीव गुणीं, सुबाण तो जोडी ।**
**सोडी सणणणणणणण, वध्य जयद्रथ शिरोंबुरुह तोडी ॥**

—द्रो. १४–६६

दुसऱ्या ओळींत बाणाचा विजेच्या वेगासारखा कडाडणारा वेग 'ण' कारांनीं, तसेंच वध्य व जयद्रथ यांतील 'व' आणि 'थ' यांवरील आघातांनीं वेगांतील खटके व तोडी यांतील 'तो' वरील आघातानें शिरच्छेदाचा खटका पंतांनीं कसा हुबेहुब दाखविला आहे!

आतां पंतांच्या शैलीचा व्यापक विशेष म्हणजे तिचा अलंकारिकपणा होय. पंतांच्या आर्याभारतांत व इतर काव्यांतही संस्कृत अलंकारशास्त्रांतील प्रमुख अलंकारांचीं उदाहरणें अनेक ठिकाणीं अत्यंत बहारीचीं आहेत. आतां कांहीं अलंकार पाहूं. 'उपमा कालिदासस्य' हा अर्थवाद आहे. सर्वच थोर कवि सुंदर उपमा योजतात व पंतहि या बाबतींत कमी नाहींत. तेव्हां त्यांच्या उपमांचे कांहीं विशेष पाहूं.:—पहिला विशेष, होमर पद्धतीच्या कांहीं उपमा त्यांच्या काव्यांत आहेत. या उपमाप्रकारांत उपमानाचें विस्तृत व चटकदार वर्णन असतें. पुढील उदाहरण पहा.

शल्य कर्णास म्हणतो,

**श्वान स्वपोषकाच्या सदनाच्या आश्रयें उभा राहे ।**

**जिकडे वनांत गर्जे शार्दूल, तया दिशेकडे पाहे ॥**
**भुंके बळें यथेष्ट, व्यथित करी निकटवर्तिजनकर्णा ।**
**अर्जुन दृष्टि न पडला तोंचि तसा भुंकतोसि तूं कर्णा ॥**

—कर्ण० २७-१०।११

पांगारकरांनीं ज्ञानेश्वरांबद्दल असें म्हटलें आहे कीं, त्यांनीं दृष्टांतांत व्यवहार व सिद्धांतांत परमार्थ शिकविला आहे. तर उलट पंतांबद्दल असें म्हणतां येईल कीं, त्यांनीं वेदान्त, धर्म व नीति यांच्या क्षेत्रां-तील दृष्टांत देऊन व्यवहाराचें वर्णन खुलविलें आहे. त्याचीं कांहीं उदाहरणें पाहूं. मागें पृष्ठ ७२ वर वेदांती उपमेचें एक उदाहरण आलें आहे. आणखी एक पहा. द्रोणाचा वध केल्यावर पांडव वीरांत भांडण लागलें. तेव्हां सात्यकि धृष्टद्युम्नास मारावयास धांवला. तेव्हां भीमानें त्यास आपल्या बाहूंनीं आवळून ठेविलें; तेव्हां सात्यकि,

**भीमभुजांतुनि न सुटे, संसारांतुनि जसाचि संसारी ।**

—द्रोण० २८-८८

भूरिश्रव्याला सात्यकीनें अन्यायानें मारलें, तेव्हां सोमदत्त सात्यकीला म्हणतो,

**त्वत्कृत अधर्म जैसा तापद, तैसा न पुत्रवध मातें ।**

आतां भक्तिमार्गांतील उपमा पहा. अभिमन्यूच्या—

**कर्ण करी चर्मांचे** (ढालीचे) **श्रितविघ्नाचे जसे गणप** (गणपति) **तुकडे ॥** -द्रोण० ३-१३०

नीति-अनीतीच्या क्षेत्रांतील पुढील मौजेची उपमा पहा. कर्णाची वासवी शक्ति घटोत्कचाला मारून फुकट गेल्यामुळें अर्जुनास मारण्यास शिल्लक राहिली नाहीं. तेव्हां धृतराष्ट्र संजयापाशीं फजित होऊन उद्गारतो,

**होतों कृतार्थ, जरि ती गोविंदीं शाक्ति सोडिली असती ।**
**गेली कीं हातींची, सर्वस्वें जेंवि जोडिली असती (वेश्या) ॥**

—द्रोण. २०-४५

अशा तऱ्हेनें वेदांत, धर्म, भाक्ति, कर्मकाण्ड, मंत्रशास्त्र, अभिचार-कर्म वगैरे प्रांतांतील उपमांनीं पंतांनीं वर्णनांत निराळें पण हृदयंगम असें वैचित्र्य आणलें आहे.

रूपकें:—पंतांच्या काव्यांत रूपकांचीहि, विशेषत: सावयव विस्तृत रूपकांची लयलूट आहे. येथें आम्ही एकच देतों.

**दुष्यंतसद्मपद्मीं, ते स्त्रीश्री, कण्वभानुशिष्यकरीं ।**
**नेली पुत्रसुगंधासह धर्मनयांबुपूर्ण नगरसरीं ॥** आदि. १२–६१

कण्वऋषींनीं शिष्यांकरवीं शकुंतलेला पुत्रासह दुष्यंताच्या राजधानींत त्याच्या घरीं पावती केली, हा साधा अर्थ पंतांनीं फारच बहारीचें रूपक करून खुलविला आहे. यांत पुत्र हा मातेचा सुगंध, व धर्म आणि न्याय हें राजधानीरूप सरोवरांतील उदक ह्या कल्पना फारच सरस आहेत.

दृष्टांत, प्रतिवस्तूपमा व निदर्शना हे अलंकार स्थूलदृष्टीनें दृष्टांतच होत. यांचींही भरपूर उदाहरणें आर्याभारतांत आहेत. येथें आम्ही एकच देतों. उत्तर अर्जुनास म्हणतो:—

**दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रोण, भीष्म ज्या कटकीं ।**
**त्यांत मरेनाचि शिरतां, कांट्यावरि घालितां चिरे पट कीं ॥**

—वि० ३–४१

आतां अनेक वस्तूंचा एका क्रियेशीं संबंध असणें अशा क्रियादीपकाचें उदाहरण पहा.

**प्रीति मुनिजनांच्या, ही राजांच्या, कीर्ति सोमवंशाच्या ।**
**घाली कंठीं माळा कृष्णा त्या श्रीमहत्वदंशाच्या ॥**

—आदि. ३५–५२

या आर्येंत, प्रीति म्हणजे आनंद, लज्जा, कीर्ति व द्रौपदी यांनीं मुनिजन (कारण, अर्जुन ब्राह्मणवेषांत होता), राजे, सोमवंश व मरुत्वान् म्हणजे इंद्र याचा अंश अर्जुन यांस माळ घातली असें हें सुंदर दीपक आहे.

आतां पुढील आर्येंतील पर्यायोक्त पहा:—अर्जुन उत्तराला पांडवांची ओळख सांगतो. कंक धर्म, स्वत: बृहन्नडा अर्जुन, बल्लव भीम, ग्रंथिक, तंतिपाळ, नकुळ व सहदेव.

मग म्हणतो,

**सैरंध्री ती, जीचा कैवारी वृष्णिमूर्तमहदेव ॥** —वि. ३—१०८

येथें सैरंध्री ती द्रौपदी असें सरळ न सांगतां यादवांचा मूर्तिमंत आनंद असा जो श्रीकृष्ण तो जिचा कैवारी ती म्हणजे द्रौपदी असें आडवळणानें म्हटलें आहे. कारण, द्रौपदी स्वत:वर आलेल्या संकटांतून केवळ श्रीकृष्णकृपेनेंच बचावली, ह्याची अर्जुनास पुरेपूर जाणीव होती.

आतां एकाच आर्येंत सहोक्ति अलंकाराचीं तीन उदाहरणें पहा.

**साप्ताश्रु शिर वृषाचें** (कर्णाचें) **प्रथम क्षोणीतळीं गळालें हो ।**
**मग सकुसुमवृष्टि तनू, सधर्मभय शत्रुबळ पळालें हो ॥**

—कर्ण. ४९-५३

या आर्येंत कर्णाचें मस्तक, कौरवांचे अश्रु व देवांची पुष्पवृष्टि एकदम गळलीं व धर्माचें भय व शत्रूचें सैन्य एकदम पळालें असें चमत्कृतिजनक वर्णन केलें आहे. तसेंच पूर्वार्धांत शोक, तिसऱ्या चरणांत देवांचा कर्णविषयक आदर व धर्माचा हर्ष आणि कौरवसैन्याची गाळण अशा चार भावनांचें एकदम म्हणून मौजेचें वर्णन आहे.

उत्प्रेक्षेची चारुता लक्षांत घेऊन तिला मेघांतील विजेची चमचम किंवा स्वयंपाकांतील फोडणीचा खमंगपणा असें प्रा. बनहट्टींनीं यथार्थपणें म्हटलें आहे. उत्प्रेक्षेला, कवितावधूचा अर्जुनाला जिंकणाऱ्या सुभद्रेच्या नेत्रकटाक्षाप्रमाणें सहृदय श्रोत्यांकडे फेकलेला विलासयुक्त कटाक्ष असेंही म्हणतां येईल. पंतांनीं उत्प्रेक्षेचींपण गडगंज उदाहरणें दिलीं आहेत. धर्मानें भीमास गदायुद्धाची अनुमति दिली त्या प्रसंगींची आर्या पहा. युद्ध करण्यास

**वदला धर्म, गमे भुज काळव्याळाननांत दे खाया ॥**

—गदा० २-३३

जणूं काळरूपी सर्पाच्याच तोंडांत आपला भीमरूपी हात त्यानें दिला. येथें भीम ह्या पुरुषावर काळसर्पाचे तोंडांत दिलेल्या हाताची म्ह. वस्तूची कल्पना केली आहे. आतां हेतूत्प्रेक्षेचें उदाहरण पहा:

**चुकलों, क्षमा करा जी, अपराधसहस्र घातुका घडले ।**
**या भावें जाणों तें द्वारीं रक्षः क्षमापना पडलें** ॥—आदि. ३१-६७

भीमानें बकासुराचें प्रेत नगराचे वेशीजवळ टाकलें. त्यावर कल्पना:—हजारों अपराधांबद्दल जणूं काय क्षमा मागण्याकरितां त्यानें लोटांगण घातलें. येथें क्षमा मागणें या हेतूची कल्पना केली आहे. यक्षप्रश्नाख्यानांत नकुळाला दुरून सरोवराच्या लाटांची हालचाल दिसली, तेव्हांची आर्या पहा.

**उष्णें झाला होता तप्त तृषित जेविं धेनुसुत डागें ।**
**धांवे, तरंगहस्तें जाणों पाचारिलाचि सुतडागें** ॥ —वन. १५-६

येथें लाटांचे हलण्यावर नकुळास पाचारण्याच्या क्रियेची उत्प्रेक्षा केली आहे. याप्रमाणें वस्तूत्प्रेक्षा, हेतूत्प्रेक्षा व क्रियोत्प्रेक्षा या तीन प्रकारच्या उत्प्रेक्षांचीं वरील तीन सुंदर उदाहरणें आहेत.

आतां आक्षेप अलंकाराचें फारच गोड उदाहरण पहा. श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतो,

**त्या अस्त्रें अभिमंत्रित भगदत्तांकुश तुला न सोसवता।**
**अथवा तुझेंचि उर हें, भाव सख्या अंतरीं नसो रुचता॥**

—द्रोण० २-७४

महावैष्णव भगदत्तानें वैष्णवास्त्रानें मंतरलेला अंकुश अर्जुनास सोसला नसता, म्हणून भगवंतानें तो आपले छातीवर घेतला. अर्जुन कुरकुरला, त्यास हें श्रीकृष्णाचें प्रेमाचें उत्तर आहे. आक्षेपालंकारांत सुनीतांतल्या शेवटच्या दोन चरणांतील कलाटणीप्रमाणें कलाटणी असते व तिनें काव्यास खमंगपणा येतो.

श्लेषालंकार:—श्लेषालंकार करणें हा सामान्य कवींचा पोरखेळ होय, असा थोरल्या चिपळूणकरांचा आक्षेप होता. श्लेषाबद्दल पंतांवर दूषणें देणाऱ्या आक्षेपकांस 'समग्र ग्रंथ पाहिल्याविण' हें समर्थांचें शिफारसपत्रच दिलें पाहिजे. इतर प्रसिद्ध अलंकारांच्या मानानें पंतकाव्यांत श्लेषाचीं उदाहरणें निश्चितपणें थोडीं आहेत व आहेत त्यांतही क्लिष्ट अशीं त्यांहून थोडीं आहेत. पंतांनीं दीपक, पर्यायोक्त, सहोक्ति व व्यतिरेक यांसारख्या अलंकारांचींही श्लेषापेक्षां कितीतरी प्रमाणानें भरपूर उदाहरणें दिलीं आहेत. अलंकारशास्त्र ज्यांच्या डोळ्यापुढें आरशासारखें आहे, त्यांना पंतांच्या श्लेषांच्या संख्येचें प्रमाण किती स्वल्प आहे हें तेव्हांच दिसून येईल. श्लेष सामान्य कवींसच प्रिय असतो हें कृष्णशास्त्र्यांचें मत ठाम चुकीचें आहे. त्यांना हें माहीत नव्हतें असें दिसतें कीं, शेक्सपीअरसारख्या कवीसहि शब्दच्छलाची मनस्वी हौस होती. जवळजवळ तीच गोष्ट बाणभट्टाची. संकृत अलंकारशास्त्रज्ञांनीं श्लेषास मानाचेंच स्थळ दिलें आहे, याचा कृष्णशास्त्र्यांनीं विपर्यास करावा

ही नवलाची गोष्ट आहे. आतां आम्ही पंतांच्या सहज श्लेषाचें एकच सुंदर उदाहरण देतों. जयद्रथाला मारण्याच्या प्रतिज्ञेबद्दल श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतो—

**जाणों वेडे ते, जे स्वगुरुजना सुमतिदायका पुसते।**
**बा तूं एक धनंजय, काय द्रोणादि काय कापुस ते ॥**

—द्रोण० ८--२

येथें धनंजय म्हणजे अग्नि व अर्जुन असा सहज श्लेष साधला आहे. आतां परिवृत्ति म्हणजे मोबदला या अलंकाराचें पुढील सुंदर उदाहरण पहा.

**देउनि सुतरत्न करीं, घेउनि पतिचित्त-वित्त ती गेली।**

—आदि० १३—५

गंगेनें भीष्मास शंतनुराजाचे स्वाधीन केलें व आपण निघून गेली. सुत हें रत्न दिलें व पतीचें चित्त हें त्याबद्दल मूल्य घेऊन गेली.

आतां उदात्ताचीं उदाहरणें पाहूं. उदात्त म्हणजे इंग्रजींतील 'सब्लाइम;' याचीं उदाहरणें मिल्टनचे काव्यांत पुष्कळ आहेत. तशीं तीं कालिदासाचे काव्यांत मात्र आढळतात असें विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या कालिदासावरील निबंधांत म्हटलें आहे. शास्त्रीबोवांचें हें म्हणणें अपुरें आहे. बाणभट्ट वगैरे संस्कृत कवि व ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांचे काव्यांत उदात्ताचीं उदाहरणें आहेत. आदिपर्वांतील गरुडाच्या पराक्रमाचें व सामर्थ्याचें वर्णन, दुःशासनवध, घटोत्कचवध, भीष्मार्जुनयुद्ध वगैरे वर्णनें उदात्ताचीं उदाहरणें आहेत. भीष्मार्जुनयुद्धाचें वर्णन पहा.

**भीष्मश्वेताश्वांचा निरुपम मज वाटला तडाखा तो।**
**कीं ब्रह्मगोल वाटे विशिखांहीं दाटला, तडा खातो ॥**

—भीष्म. ५—४५

ब्रह्मांडकटाह तडा खातो, ही कल्पना फारच विस्मयकारक व उदात्त आहे. मिल्टनचीं स्वर्ग, नंदनवन, केऑस म्हणजे सृष्टीची उत्पत्तीपूर्वीची अव्यक्तस्थिति यांचीं वर्णनें उदात्त आहेत. आपल्या पुराणांतून प्रलयाचीं वर्णनें उदात्त आहेत. पुढील उदाहरण पहा:—

**त्यांत धनंजयरथ तो जैसा प्रलयार्णवांत एक वट ।** –वि.५–१

प्रलयार्णव व त्यांत उरलेला एक वट ही उदात्त कल्पना मराठी काव्यांत अनेक ठिकाणीं आहे. आतां पुढील आर्या पहा.

**कुंडलमंडित, पांड्यक्षितिपातिचें शिर धरातळीं पडलें ।**
**भासे पतन, विशाखामध्यगपूर्णेंदुमंडळा घडलें ॥**

—कर्ण. १४–२८

या आर्येंत विशाखांच्या दोन ताऱ्यांसह पूर्णेंदुमंडळ खचून पडलें, ही कल्पना विशाल व चमत्कृतिजनक आहे. आतां शास्त्रीबुवांनीं उदात्ततेचा एक प्रकार जो नैतिक उदात्त त्याची वास्तपुस्तच केली नाहीं. नैतिक उदात्ताचीं उदाहरणें तर सर्व कवींच्या काव्यांतून पसरलीं आहेत. लोकमान्यांनीं जज्ज व ज्यूरीला उद्देशून केलेलें शिक्षासुनावणीनंतरचें भाषण हें नैतिक उदात्ताचें सुंदर उदाहरण आहे. भीष्मांची ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा हें आर्याभारतांतील नैतिक उदात्ताचें प्रसिद्ध उदाहरण आहे. (आदि. १५–७।९.) आतां भौतिक व नैतिक उदात्ताचें संयुक्त उदाहरण पहा:—

**लोकांत राममहिमा, कीं प्रेमा आपला जसा रामीं ।**
**वाढे, तसाचि योजूं दृष्टांता कां परा असारा मी ॥**

—आदि. ५–६५

मारुतीनें समुद्रोल्लंघनाचे वेळचें आपलें विशालरूप भीमास दाखविलें. त्या रूपाच्या वाढण्याला रामभक्त पंतांनीं, रामाच्या उदात्त महि-

म्याचा व मारुतीच्या उदात्त भक्तीचा दृष्टांत देण्यांत फार मार्मिकता दाखविली आहे. अर्थान्तरन्यास तर पंतांचे घरीं पाणी भरीत आहे. ह्या अलंकारानें पंतांनीं ठिकठिकाणीं कौटुंबिक नीति, व्यावहारिक नीति, सुष्टदुष्ट व्यवहार, मनुष्यस्वभाव वगैरेंचीं उदाहरणें देऊन आपल्या काव्यास फार शोभा आणिली आहे. पांगारकरांनीं आपल्या मोरोपंतचरित्रांत याचीं पुष्कळ उदाहरणें दिलेलीं आहेत. पंतकाव्यांत अलंकार इतके आहेत कीं, केवळ त्यांच्याच पद्यांच्या उदाहरणानें संकृत अलकारशास्त्र सर्वस्वीं शिकवितां येईल.

अर्थालंकार रसाला एकदम उपकारक होतात, तसे यमकानुप्रास हे शब्दालंकार वर्णनास चटकदारपणा आणतात व अर्थद्वारा रसास खुलवितात. आम्हीं उध्दृत केलेल्या आर्यांत यमकांचीं व अनुप्रासाचींही छानछान उदाहरणें आलीं आहेत. पांगारकरांनीं पंतचरित्रांत दोहोंचीं भरपूर उदाहरणें दिलीं आहेत. तेव्हां आम्हीं एकच उदाहरण देतों. वस्त्रें फेडतांना दुःशासनाची फजिती पहा.

**तो शतशः पट झटझट फेडुनि भागे सभेंत, वेडावे ।**
**किति खळबळ? जलनिधिचे किति दुस्तरतर तरंग फेडावे? ॥**

—सभा. ५–८९

फरफर ओढल्या जाणाऱ्या वस्त्रांना तरतरतर येणाऱ्या लाटांची उपमा पंतांना समुद्र पाहिल्यामुळेंच सुचली असली पाहिजे.

एकेकाच शब्दानें आणलेला चटकदारपणाः—अर्वाचीन आंग्ल कवि टेनिसन याचा एक विशेष, त्याचे टीकाकार असा सांगतात कीं, तो एकाच शब्दाच्या चमकेनें सबंध चित्र डोळ्यांपुढें उभें करतो. पंतांनींही असा चमत्कार वेळोवेळीं केला आहे. उदा० दैत्यकन्या शर्मिष्ठा शुक्रकन्या देवयानीचें वस्त्र स्नानानन्तर चुकून नेसली, तेव्हां ती गर्विष्ठ ब्राह्मणकन्या शर्मिष्ठेस एकदम बोलते,

**बहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप हा सांगे** । आदि. १०-२३

मुळांत 'मातलीस' अशा अर्थाचा शब्द नाहीं. 'समुदाचारहीना-या न ते साधु भविष्यति।' असें भारतांत आहे व तें जरा मिळ-मिळीतच लागतें.

अर्जुन हा दुर्जय कां, हें भीष्म कौरवसभेंत सांगतात,

**दिव्य रथ, दिव्य शस्त्रें, दिव्य कवच, दिव्य सूत कंसारी ।**
**साहित्य असें ज्याचें त्यावरि जाईल कोण संसारी ॥**

—उ. १२-८५

पहिल्या अर्धांत दिव्य शब्दानें अर्जुनाचें दुर्जयत्व वर्णिलें आहे. पण त्याहूनही परिणामकारक रीतीनें भगवद्भक्त अर्जुनाचे प्रति-स्पर्ध्यांची हीनता 'संसारी' या एकाच शब्दानें पतांनीं पटविली आहे.

घटोत्कचास मारण्यासाठीं,

**कर्णे शक्तिस, जैसा सुरराजें, घालतांचि कर पविला ।**
**गिरिसा गुरु कठिणहि तो, खचर त्रासें मनांत करपविला ॥**

—द्रोण. १९-४४

या आर्येच्या तिसऱ्या चरणांत घटोत्कचाची उदात्त भीषणता पंतांनीं वर्णिली आहे. पण शेवटच्या 'करपविला' या एकाच शब्दानें घटोत्कचाची गाळण व कर्णाचा शक्तीमुळें दिसलेला अतुल पराक्रम डोळ्यांपुढें हुबेहूब उभा रहातो. येथील पंचाक्षरी यमकही सहजसुन्दर आहे.

टला ट जोडून का कुठें कविता होते? असा प्रश्न विचारणारांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ज्याप्रमाणें 'अमन्त्रं अक्षरं नास्ति।' तसेंच 'अकाव्यं अक्षरं नास्ति।' 'योजकस्तत्र दुर्लभः।' उदा० पहा. अभिमन्यु सारथ्यास म्हणतो,

**...... हटकीन हठें रणांत भीमातें** (शंकराला) । —द्रो. ३-२८

तसेंच भीम गांधारीस म्हणतो,

**बहु काननांत आम्हां कष्टविलें, वैरवन्हि पेटविला।**
**यास्तव ऐसें घडलें, स्वर्गी बंधूस बंधु भेटविला ॥** स्त्री. ३–२९.

नंतर गांधारी त्याला काकुळतीनें विचारते, ' अरे, माझे सर्वच मुलगे दुष्ट होते काय ?' व पुन्हा म्हणते,

**या वृद्धा अंधाची राहों देतासि एक जरि यष्टि।**
**भीमा, मी मानस तरि होऊं देतें कशास बहु कष्टी ॥**
—स्त्री. ३–४६

या उदाहरणांत टला ट जोडूनच कवीनें मौज केली आहे. ' स्वर्गी बंधूस बंधु भेटविला ' ही मृदूक्ति ( युफिमिझम् ) ही कशी डौलदार आहे !

टला ट जोडून रचलेल्या आर्येचें उदाहरण पहा. श्रीकृष्णानें भावास मारूं नये म्हणून रुक्मिणी म्हणते:—

**अभयप्रद पदपद्मीं स्यां तेव्हां घातली मिठी घट्ट।**
**धट्ट क्षणभरि झालें, केली स्वाभाविका तया गट्ट ॥**
—कृ. वि. अ. ८३

घटना:—काव्याच्या रसरूप आत्म्याला ज्याप्रमाणें माधुर्य वगैरे गुणांनीं, अलंकारांनीं व रीतीनें म्हणजे भाषाशैलीनें शोभा येते, त्याप्रमाणें घटनेनेंही काव्यास शोभा येते. शब्दार्थ जर काव्याचें शरीर, तर घटना हा त्याचा बांधेसूदपणा होय. पोप कवीनें तिला ' एक्झॅक्ट डिस्पोझिशन ' म्हणजे ' बिनचूक व व्यवस्थित मांडणी ' म्हटलें आहे. टेनिसनच्या एका टीकाकारानें ' इनॉक् आर्डेन ' या त्याच्या काव्याबद्दल म्हटलें आहे, 'The parts are first of all in perfect subordination to the whole and to one another; secondly are beautiful in themselves.' म्हणजे मुख्य कथानकाचे भाग किंवा अंगप्रत्यंगें स्वतः सुंदर असून

परस्परांस व प्रधानास गुणीभूत म्हणजे पोषक असतात. साहित्य-दर्पणकारानें रीतीलाच संघटना म्हटलें आहे. पण रीतीची कल्पना काव्याच्या एकदोन सर्गांवरून येईल; पण घटनेचें स्वरूप सर्व काव्या-शिवाय समजणार नाहीं. म्हणूनच मंख कवीनें घटनेचा स्वतंत्र उल्लेख केला आहे. ह्या घटनागुणाच्या दृष्टीनेंही पंतकाव्याकडे बघणें इष्ट आहे. घटनेच्या दृष्टीनें वाल्मीकिरामायण बरेंच बांधेसूद आहे व त्या मानानें भागवत तर आहेच. पण महाभारत मात्र त्या मानानें जगड्व्याळ, विस्कळित व कंटाळवाणें आहे. ह्याचा अर्थ त्यांत उत्कृष्ट स्थळें नाहींत असा नव्हे. तर पाल्हाळ, पुनरुक्ति व रचनाशैथिल्य हे दोषही--विशेषत: युद्धपर्व व वनपर्व--यांत मोठ्या प्रमाणांत आहेत. आर्याभारतालाही त्यांचा बराच संपर्क लागलेला आहे. तरी पंतांनीं छाटाछाटीचें चातुर्य दाखवून पुष्कळ आटोपशीर-पणा आणिला आहे. या दृष्टीनें पंतांनीं बहुतेक उपाख्यानांची मांडणी व्यवस्थित केली आहे. या बाबतींत हंसकाकीय आख्यान प्रसिद्धच आहे. वनपर्वांतील दुर्वासाची कथा, तसेंच उद्योग व भीष्म पर्वांतील कृष्ण, कुंती व भीष्म या तिघांबरोबरचे कर्णाचे संभाषणाचे प्रसंग वगैरे घटनेचीं अनेक चांगलीं उदाहरणें आहेत. आम्ही या ठिकाणीं वनपर्वांतील शेवटचें आख्यान जें यक्षप्रश्न त्याचें उदाहरण घेतों. आर्याभारतांतील वनपर्वाचा हा ४४ आर्यांचा छोटासा अध्याय घटनेचें छान उदाहरण आहे. पहिल्या आर्येंत ‘ सरला वनवास ’ म्हणून हर्षाला सुरवात होते, तोंच हरिणानें पळविलेल्या ब्राह्मणाच्या अरणी म्हणजे एकमेकांवर घांसून अग्नि पेटविण्याचीं लांकडें शोधून आणण्याची धावपळ. त्यामुळें झालेल्या कष्टांनीं ‘ पांचहि नरसिंह भागले होते.’ तोंच एका वडाची सावली, लगेच तहानेनें व्याकुळ-पणा, नकुळ धर्माज्ञेनें उदक आणण्यास—

... ... ... तप्ततृषित धेनुसुत डागें।
धांवे, तरंगहस्तें जाणों पाचारिलाचि सुतडागें ॥

नतंर चौघेही यक्षाची अवज्ञा करून पाणी पितात व मरतात. धर्म वाट पहातो. त्या रखरखीत प्रदेशांत धर्म एकटा ( द्रौपदी आश्रमांत ). आपण द्यूत खेळलों म्हणून भाऊ आपल्यास विटले, असा विचार करीत धर्म तेथें आला.

ऐसें म्हणोनि जाणुनि धर्में ते बंधु पाहिले शवसे।
साधूंत अहंताशी ज्यांमध्यें चेतना न लेश वसे ॥

येथील वेदान्ती उपमा किती समर्पक आहे! यापुढील ११ ते २० आर्यांचें धर्माच्या विलापाचें एक हृदयद्रावक शोकगीतच आहे. ह्या शोकगीताची पृष्ठभूमि अति भीषण व उग्र आहे. पराक्रमी चारही भाऊ अकस्मात मरून पडलेले. धीर द्यावयास जवळ कोणी नाहीं. आजपर्यंत सर्व संकटें पांचही भावांनीं एकदम भोगलेलीं. पण आतां सहानुभूति शून्य! तेव्हां धर्म प्रत्येकाचे नांवानें शोक करतो. त्याला पाण्यांत शत्रूंनीं विष कालविल्याची शंका येते. पण,

विष कालविलें असतें, तरि सलिलीं करपतीं न कां नालिनें ।
अलिनें त्यजिलीं असतीं, होतीं तुमचींहि आननें मलिनें ॥

या सुंदर आर्येनें तिचें निराकरण तो करतो. पुढें विचारतो,

गेलां स्वर्गासि, बरें, जा; परि कवणासि हा निरविला हो? ।

पुढें शोक आवरून मरणकारणाविषयीं तर्क करतो. पण म्हणतो,

तर्क न चाले बहुधा, माझी तृष्णाकुळाचि भव्या धी।

आतां पुढील आर्येतील भीषण विनोद ( ग्रिम ह्यूमर ) पहा:—

प्रियबंधुमरणकारण शोधूं, जळपान करुनि तर्कशतें।
जें क्षुत्तृट्प्रतिबंधा न गणी, मुनिचेंचि हृदय कर्कश तें ॥

बंधुमरणाचें दुःखही तृष्णेच्या व्याकुळपणापुढें फिकें पडतें, यावरून

**इंद्रियांचीं दानें । आम्ही केलों नारायणें ॥**

ही तुकारामाची उक्ति धर्मासारख्या थोर विभूतीच्या बाबतींतही कशी सार्थ ठरते ! पाणी प्यावयास लागतांच यक्षानें, हट्टानें कां मरतां, असें विचारलें; व पर्वतप्राय होऊन धर्मास प्रश्न विचारले. 'कळल्या उत्तर देइन' असें धर्म म्हणाला. त्याच्या उत्तरांनीं शहाणे-ही तरतील. प्रश्नोत्तरें गाळून पंतांनीं कथा पुढें चालविली. यक्ष संतुष्ट झाला. एका भावास उठवितों म्हणाला. धर्मानें 'नकुळ उठो' म्हटलें. 'भीम, अर्जुन, कां नको ? ' यक्षानें पुसलें. धर्म म्हणाला,

... ... ... **मज तों माद्री, पृथा समा नांवें ।**
**दोघींचींहि असावीं, म्यां अधिक उणें कदा न मानावें ॥**

यक्षानें चौघांसही उठविलें. जसे झोपेंतून जागे झाले. अरणी सांपडाव्यात या विनंतीस यक्षाचें विनोदी उत्तर—

... ... ... **कैंचा मृग, आमुचीच ती करणी ॥**

पुढें म्हणतो,

**माग दुजा वर बा गा, द्यावें सर्वस्वसें असें नातें ।**

कारण, तो यक्षरूपांत यमधर्मच--धर्माचा बाप-होता. अज्ञातवास निर्विघ्न होवो हा दुसरा वर मागितल्यावर, तिसरा वर माग म्हणतांच

**वंदुनि म्हणे युधिष्ठिर, जिंकावे लोभ, कोप, कामहि म्यां**

येथें धर्माच्या उदात्ततेचा कळस झाला. गीतेंतील 'कामःक्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।' ह्या भूमिकेवर धर्म आरूढ झाला. या छोट्याशा अध्यायांत अनेक भावना, अनेक लहान लहान हकीकती ( Incidents ), कांहीं ठळक अलंकार, खरपूस विनोदी व म्हणीवजा चरण व अखेरच्या वरांतील धर्माचा धर्मराजपणा व शेवटील ब्राह्मणभक्ति वगैरे या सर्व गोष्टी यथायोग्य वर्णून पंतांनीं उत्कृष्ट घटनेचें उदाहरण दिलें आहे.

पंतांची निर्देशपरता व समानार्थक स्थळें:—कवि हा विद्वान्, बहुश्रुत व व्यवहार पाहिलेला असला म्हणजे त्याच्या काव्यांत आलेल्या निर्देशांनीं, अन्य कवि, लेखक, शास्त्रकार व व्यावहारिक प्रसंग यांच्या होणाऱ्या अनुसंधानानें विद्यानंदाची एक विशिष्ट मौज अनुभवास येते. कवीच्या ह्या गुणास इंग्रजींत 'अल्युझिवनेस' असें म्हणतात. इंग्रजी ग्रंथकारांत मेकॉले, कार्लाइल्, इमर्सन, डीन इंग वगैरे लेखक व आपल्याकडील विष्णुशास्त्री चिपळूणकर, गडकरी व इतर अनेक विद्वान् लेखकांच्या लिखाणांत हा गुण आढळतो. आतां ह्या गुणाचीं पंतांच्या आर्याभारतांतील कांहीं उदाहरणें पाहूं. 'संक्षेपविस्तराभ्यां हि कथयन्ति मनीषिणः।' या प्रसिद्ध संस्कृत वचनाचा उल्लेख,

**संक्षेपविस्तरज्ञ श्रोत्यांचें मस्तकाब्ज डोलावें।**

—आदि. ४–२२

या आर्येंत केला आहे. स्वतः कविलेखकाचा हा गुण पंतांनीं विनयानें श्रोत्याचे आंगचा म्हणून वर्णिला आहे. अर्जुन कर्णाहून वरचढ झाला याला उपमा—

**वेदान्तीं परदूषणविरचित पांडित्य जेंवि अधिकरणीं।**

–द्रो. १४–२८

अशी योजिली आहे. येथें

**विषयो विशयः ( संशयः ) चैव पूर्वपक्षस्तथोत्तरम्।**
**निर्णयश्चेति सिद्धान्तः शास्त्रेऽधिकरणं विदुः॥**

येथें अशा वेदान्तग्रंथांतील अधिकरणाचा म्हणजे युक्तिवादाच्या एका पूर्ण भागाचा उल्लेख आहे. धर्म म्हणतो,

**कोप सभेंत दुरुक्तें, त्या द्यूतीं मन्मनांत जो पेटे।**
**त्या कर्णपाद, जेंवि प्रतिबंधक मणि हुताशना भेटे॥** —शांति.२-२४

कर्णाचे पाय कुंतीच्या पायांप्रमाणें असल्यामुळें त्यांचे दर्शनानें धर्माचा राग शांत होई. या आर्येंत प्रतिबंधक मणि अग्निदाहाचा प्रतिबंध करतो हा न्यायशास्त्रांतील दृष्टान्त घेतला आहे. रात्र संपली पण रामसीता एकमेकांशीं सांगत असलेल्या गोष्टी कांहीं संपल्या नाहींत ( अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् । ), ह्या भवभूतीच्या उत्तररामचरितांतील पहिल्या अंकांतील एका श्लोकाच्या प्रसिद्ध गोड चरणाचा पंतांनीं कसा निराळयाच संदर्भात चमत्कृतिजनक उपयोग केला आहे ! शिष्टाईच्या आदल्या रात्रीं

**पंगुहि मेरुवरानिहि न माथां धरितां यदंघ्रिरज निसरे ।**
**त्या दीनबंधुची ती चिंता न सरे, परंतु रजनि सरे ॥**

—उ. ७-८७

असें श्रीकृष्णाच्या चिंतेचें करुणछटायुक्त चटकदार वर्णन केलें आहे. भिन्नसंदर्भामुळें सुनीतांतील शेवटच्या चरणांतील कलाटणी-सारखा अनुभव येथें येतो. अजाची मिरवणूक पहाणाऱ्या स्त्रियांच्या सर्व इंद्रियांच्या वृत्ति त्यांच्या एका नेत्रेंद्रियांत एकवटल्या ( तथाहि शेषेंद्रियवृत्तिरासां सर्वात्मना चक्षुरिव प्रविष्टा । रघु. ७-१२ ) असें कालिदास वर्णन करितो. पंतही ह्या कल्पनेचा कसा उपयोग करतात पहा. दुर्योधनाचे सभेंत

**टकमक पहात होते प्रभुमुखचंद्राकडेचि चातकसे ।**
**नसतील जोडिले श्रवर्णीहि बसाया मनासि हात कसे ॥**

—उ. प. ७-९८

श्रीकृष्णाचें भाषण ऐकण्याकरितां आपल्या कानांत बसण्याविषयीं श्रोत्यांनीं मनास विनविलें. रामसीताविवाहांत दशरथाच्या वऱ्हाडी सैन्यानें मिथिलानगरीस दिलेला प्रेमाचा त्रास 'प्रीतिरोधमसहिष्ट सा पुरी, स्त्रीव कांतपरिभोगमायतम् । रघु० ११-५२' असा

आनंदानें सहन केला. पंतांनीं अशीच कल्पना युद्धवर्णनांत पुढील आर्येंत मांडली आहे.

**उत्साहशक्ति योधा, श्रमभर्त्या जेंविं न कळावि रमणी।**

--द्रोण. १४-७९

तीर्थयात्रेंत व्रतस्थ अर्जुनानें चित्रांगदेस वरिलें. पंत म्हणतात,

**ज्ञात्यासि न व्रतच्युति, विषयांचा वाहवि प्रवाह न ज्या।**

-आदि. ३८-४०

ही कल्पना नैषधीय चरितांतील पुढील कल्पनेशीं जुळते.

**आहृता हि विषयैकतानता ज्ञानधौतमनसं न लिम्पति।**

-नै. १८-२

नळराजा व अर्जुन या दोघांचेंही मन ज्ञानानें शुद्ध असल्यामुळें सामान्य संसारी लोकांसारखेच ते विषयांत गढलेले दिसले तरी त्यांस पाप लागलें नाहीं. गीताप्रसंगाचे अगोदरच वनपर्वांत जय-द्रथाजवळ द्रौपदी, अर्जुन हा ' जितेंद्रिय ' असल्याबद्दल वर्णन करते. अशा तऱ्हेनें पंतांच्या काव्यांतील सर्व निर्देशांचा तलास लावला पाहिजे

संक्षेपविस्तरकुशलता-- शब्दांच्या विस्ताराला संस्कृतांत विस्तर म्हणतात. पंतांच्या या बाबतींतील कौशल्याचें पांगारकर व बनहट्टी या दोघांनींहीं विस्तृत विवेचन केलें आहे. आम्ही पंतांनीं स्वतंत्र प्रतिभेनें केलेल्या विस्तराचें एकच दीप्तियुक्त (ब्रिलिअंट्) उदाहरण देतों. कर्णाला मारून कृष्णार्जुन धर्माला भेटतात. त्या वेळीं पराक्रम तर अर्जुनाचा, पण राजा म्हणून अभिनंदन तर धर्माचें करावयाचें, असा एक गोड पेंच होता. पंतांनीं यांतून कशी चातुर्यानें वाट काढिली आहे पहा. औपचारिकपणाला खुलविणाऱ्या विनययुक्त लाघवानें धर्मास बहुवचनानें संबोधून,

अंजलि करुनि म्हणे प्रभु देवा, सुखहेतुवृत्त परिसा हो ।

आतां मूळ महाभारतांत नसलेली पुढील सरस रूपकपंरपरा पहा !

तुमची आज्ञादेवी निजहस्तधृतार्जुनायुधें आजी ।
कर्ण-महिष मारुनियां, विजयातें पावली रणामाजी ॥
त्वां इन्द्रें प्रेरितसित-वाहाशनिनें वृषाद्रिचें पिष्ट ।
केलें, हें यश देवा, गातील तुझें सदा महाशिष्ट ॥
तूं नरसिंह महात्मा बीभत्सु तुझा नखप्रकर देवा ।
वृष कनककशिपु, महिमा प्रल्हाद, तुझीच ज्या रुचे सेवा ॥
तूं रुद्र, तुझें तिसरें लोचन हें बंधुरत्न वृषकाम ।
तूं राम, कर्ण हा भव, अर्जुन भुजतेज हें तुझें नाम ॥

--कर्ण. १९-२२

एकाहून एक सरस अशा चढत्या रूपकांमुळें रूपकांच्या साराऌंकाराचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. शेवटचें रूपक तर भक्तिमार्गातील रामनाममाहात्म्यावर रचून रामभक्त पंतांनीं फारच बहार केली आहे. आतां धर्माच्या कृतज्ञतेनें थबथबलेल्या पुढील दोन आर्या पहा.

आम्हांसि रक्षिलें त्वां, देसी दीनां जनांसि थोरपण ।
इतरांचें बहुविधपण, परि लघु तें; हा तुझाचि थोर पण ॥

--कर्ण. ५०-३०

हें माझ्या हृदयींचें लीलेनें काढिलें पहा शल्य ।
वर्णूं काय प्रभुजा, मी त्वत्करुणाकटाक्षकौशल्य ॥

--कर्ण. ५०-६६

दोन अगदीं भिन्न कवींच्या कल्पनांमधील भेद व सादृश्य यांनीं काव्यास्वादांत एक निराळीच मौज अनुभवास येते. रणांगणावर पडलेलें कर्णाचें प्रेत पाहून धर्मराज हळहळतो, कर्णाविषयीं अनुकंपेचे उद्गार काढतो व 'मरणांतानि वैराणि' या न्यायानें कर्णास वाखाणतो.

[illegible]



होतासि दानशूर, ब्रम्हण्य, गुणज्ञ वर्णितील गुणा।
सांक म्हणोनि अमृतकर, दे ताप म्हणोनि मित्र काय उणा॥
--कर्ण. ५०-५३

हा प्रसंग वाचतांना शेक्सपीअरच्या ज्यूलिअस सीझर नाटकांतील ब्रूटस हा रोमन थोर पुरुष ( समर्थांचा उत्तम पुरुष ) मेलेला बघून, त्याचा प्रतिस्पर्धी, व्यवहारचतुर, विषयी, पण सहृदय मार्क अँटनी ब्रूटसविषयीं जे धन्योद्गार काढतो, त्यांची आठवण होते. पांडवांच्या हर्षवर्णनाचा हा सर्वच अध्याय ( कर्ण. ५० ) पंतांच्या स्वतंत्र प्रतिभेचें उदाहरण आहे.

पंतांचें आर्यावृत्त:—संस्कृतांतील गीति म्हणजेच पंतांची आर्या. हें मात्रावृत्त आहे. त्याच्या पहिल्या व तिसऱ्या चरणांत १२।१२ मात्रा व दुसऱ्या व चौथ्या चरणांत १८।१८ मात्रा असतात. हें वृत्त आपण पिंगलाचार्यांपासून शिकलों असें ते म्हणतात. प्रा.बनहट्टींनीं संस्कृतापासून या वृत्ताची पूर्वपीठिका दिली आहे. पण त्यांच्या दृष्टींतून कांहीं प्रकरणें निसटलीं आहेत. शंकराचार्यांचे म्हणून जे वेदान्ताचे प्रकरणग्रंथ प्रसिध्द आहेत, त्यांत ‘ स्वात्मनिरूपण ’ या नांवाचें एक सुंदर प्रकरण आहे. त्याच्या आर्या १५४ असून त्या सर्व पंतांच्या आर्यावृत्तांत आहेत. या प्रकरणांत गुरु ह्या अर्थाचा देशिक हा शब्द ५ वेळां आला आहे ( आर्या २,२४,४१, १४६ व १४७ पहा ) हा शब्द इतर ठिकाणीं क्वचित् आला आहे. द्रोणवधानंतर अर्जुन धर्मावर रागावून म्हणतो,

त्वां वधुनि घेतलें यश, गति व्हाया कां न देशिकाकरवीं।
—द्रो. २२—१४

या आर्येंतील देशिक शब्द पंतांनीं वरील आर्येंतून घेतला असावा. निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कारण पांगारकरांनीं

दिलेल्या पंतांच्या संस्कृत ग्रंथांचे यादींत या प्रकरणाचं नांव नाहीं. क्षेमेंद्राचं 'कलाविलास' या नांवाचें ५०० आर्यांचें ( १२।१८, १२।१५ ) एक काव्य निर्णयसागर काव्यमालेंत आहे. त्यांत पंतांच्या प्रकारच्या आर्या ५०।६० असतील. तसेंच तिसऱ्या गुच्छांत कालिदासकृत नवरत्नमाला म्हणून देवीच्या स्तुतीचें, पंतांच्या प्रकारच्या नऊच आर्यांचें एक सुंदर स्तोत्र आहे. तसें ३ऱ्या गुच्छांत 'श्रीदुर्वाससाविरचितं ललितास्तवरत्नं' या नांवाचें सुंदर प्रकरण पंतांच्या प्रकारच्या २१३ आर्यांचें आहे. या सर्व प्रकरणांत पंतांच्या प्रकारच्या आर्यांचें संपूर्ण सौंदर्य दिसून येतें. हीं प्रकरणें पंतांच्या वाचण्यांत आलीं असण्याचा संभव आहे व त्याचा परिणाम पंतांच्या मनावर झाला असावा. एरवीं पंत संस्कृतांतील प्रसिध्द आर्यांची ( १२।१५, १२।१८ ) परंपरा सहसा सोडतेना.

आर्यावृत्त म्हणण्याच्या चालीः—एकाच वृत्तांत लांबलचक काव्यें लिहिलीं म्हणजे वाचावयास कंटाळवाणीं होण्याचा संभव असतो. तसेंच सर्व रसांना अनुकूल अशीं अनुष्टुभ, शार्दूलविक्रीडित, इंद्र-वज्रेचे प्रकार वगैरे संस्कृत वृत्तें व मराठी ओंवी, अभंग व आर्या हीं वृत्तें सर्व रसांस अनुकूल आहेत. अर्थात् रसानुकूल आविर्भावानें तीं म्हणतां आलीं पाहिजेत. शिखरिणी, हारिणी वगैरे कशाही आविर्भावानें म्हटलीं तरी वीर, रौद्र यांना अनुकूल नाहींत. तीच गत मराठी साकी, दिंडी व अर्वाचीन 'उध्दव' वगैरे वृत्तांची. ओवी कंटाळवाणी होऊं नये म्हणून ज्ञानेश्वरांनीं ८ ते १६ अक्षरांपर्यंत चरणाची लांबी ठेविली आहे. आर्येची लांबी ठराविक. प्रत्येक आर्येचे चार तुकडे व पादांतीं यति. तथापि एकच सूर टाळण्या-साठीं मात्रारचनेचे कांहीं प्रकार रचनेचे ओघांत सहज येऊन जातात. उदा.—

(५.९.६४)

सरळ सबळ जवळ द्रुम, दिसतो समयीं कशास कोदंड।

—आदि. ३५-६३

किंवा,

मग आठविला हृदयीं कुशलकर कुशेशयाक्ष कंसारी।
यत्स्मरणें शुचिमतियतिपतिगतिला योग्य होय संसारी॥

—आदि० ३५-४९

या उदाहरणांत बरींच ऱ्हस्व अक्षरें लगोलग आल्यामुळें स्वराची लय बदलून वैचित्र्य येतें.

धृतराष्ट्र म्हणे, ताता, झालों विश्रांत आजि मी धन्य।

या ओळींत दीर्घाक्षरें लगोलग आहेत.

क्रोध, क्षमा, अनुग्रह, विग्रह, भय, अभयदान, आदान।

या ओळींत समासरहित सुटे शब्द असल्यानें म्हणण्यांत वैचित्र्य येतें. भिन्न व्यजनांबरोबर एकाच स्वराचा अनुप्रास मानीत नाहींत. पण पुढील सुंदर आर्या पहा.

जें झांकिलें अनंतें भव्यें दिव्यें सदंबरें सुघडें।
तें साधुकाय काय क्षुद्रमति करील नागवें उघडें॥—सभा.५-८८

तसेंच,

म्हणती हाणा, मारा, पाडा, घ्या, काय पाहतां तोंडा।
कोंडा प्राणव्यसनीं, बाळ बुडो, कर्दमीं जसा धोंडा॥

—द्रो. ३-१२५

या उदाहरणांत ‘एं’ व ‘आ’ या अक्षरांचा भिन्न व्यंजनांशीं संयोग असूनही सुरेलपणांत वैचित्र्य आहे. यति असेल तेथेंच वाक्य पुरें न करतां, त्याहून लहान वाक्याचे तुकडे, किंवा त्याहून मोठीं वाक्यें, एकेरी शब्द, शब्दांच्या जोड्या–जोड्या, सबंध आर्येचें किंवा आर्यार्धाचें एक वाक्य, अशा वाक्यरचनेच्या वैचि-

ऱ्यामुळेंही म्हणण्यांत वैचित्र्य येतें. काव्यवाचन ही एक कला आहे. रसानुकूल आविर्भावानें ज्यांस वाचतां येत नाहीं, त्यांना काव्य रसहीन वाटतें. आतां आर्यांच्या कांहीं प्रसिध्द चालींचा निर्देश करतों. पहिली हरिदासांची कीर्तनांत म्हणण्याची प्रसिद्ध चाल. हींत चारी चरणांस भिन्न स्वर आहेत व खड्या स्वरांत सावकाशपणें श्रोत्यांना आर्येचे शब्द स्पष्ट ऐकवून त्यांना अर्थोन्मुख करण्यास ती योग्य आहे. पण कोमल रसास साजणाऱ्या या चालींत वीर, रौद्र यासारखे कणखर रस मिळमिळीत लागतात, जलद वाचनास निरुपयोगी. डॉ. पटवर्धन हे जी चाल म्हणतात, तींत दोन्ही अर्धांस सारखीच चाल येते, म्हणून वैचित्र्य कमी व तीही चाल कठोर रसास शोभत नाहीं व जलद वाचण्यास निरुपयोगी. खानदेशांतील शाळांतून जी चाल प्रसिद्ध आहे, ती मात्र सर्व रसांस अनुकूल करितां येते. रा. पांगारकर रसाळपणानें साध्या चालीवर आर्या म्हणत. शेवटच्या अर्धाच्या अखेरीस त्यांची म्हणण्याची एक विशिष्ट लकब होती. शिवाय ते तन्मयतेनें म्हणत. म्हणून त्यांचें म्हणणें गोड व परिणामकारक असे. आम्ही स्वतः वरील सर्व चाली जमेस धरून शिवाय भावनाभेदानें भिन्न भिन्न आविर्भावानें वाचतों. अशा तऱ्हेनें शाळेंत विद्यार्थ्यांस व खाजगी रीतीनें स्नेही श्रोत्यांमध्यें आर्याभारताच्या अनेक प्रसंगांचें वाचन करून श्रोत्यांस पंतकाव्याचें हृद्गत समजावून देण्याचा आम्हीं प्रयत्न केलेला आहे. अशा तऱ्हेच्या वाचनानें, हरदासी पद्धतीनें व वारकरी निरूपणपद्धतीनें पंतकाव्य लोकप्रिय झालेलें आहे व आणखीहि करतां येईल. मर्मज्ञ गायक व वाचक आणि सहृदय श्रोते यांनीं आर्यावाचनाच्या पद्धति कायम कराव्या असें सुचवावेंसें वाटतें. काव्य संगीत चालीवर, गळ्यावर

किंवा धांगडधिंग्याच्या चालीवर कां होईना वाचतां येत नाहीं म्हणून गद्यासारखें वाचूनही काव्यरस कित्येकांस चाखतां येतो. ही काय मौज आहे पहा ! पण शृंगाराचे विलास अंधारांतच उरकून घेऊन पुत्रोत्सवाचें सुख अनुवभणारे स्ववल्लभेचे लाल जगांत आहेतच कीं नाहींत ?

रसग्रहणाचे दोन प्रसंग, एक खाजगी व दुसरा सार्वजनिक आहे. पंतांची कविता, दुर्बोध शब्दार्थ सांगणें व अलंकारशास्त्रदृष्ट्या थोडें विवेचन करणें अशा पद्धतीनें श्रोत्यांस वाचून दाखविली असतां तिचें रसग्रहण करणें श्रोत्यांस सोपें जातें. अशा एका प्रसंगीं आमचे एक वृद्ध आप्त आमचे जवळच बसलेले होते. विराट पर्वांतील उत्तरगोग्रहणाचा प्रसंग. अर्जुन उत्तराला गांडीव धनुष्याची ओळख करून देत होता. ब्रह्मदेव, प्रजापति, वगैरे देवांनीं हजारों वर्षें वापरिला असतां 'याणें लागों दिला न दुःशब्द' व शेवटीं,

**राहे पार्थापाशीं सार्ध द्वात्रिंशदब्द हा चाप।**
**राहे चरमापत्या जवळी प्रेमार्द्रधी जसा बाप**॥–वि. ३ १०२

चरम अपत्य=सर्वांत धाकटें मूल, मुलगा. हा दुसरा आर्यार्ध ऐकल्याबरोबर आमच्या त्या वृद्ध आप्तांस मनची खूण पटल्यामुळें अगदीं आनंदाचें मोकळें हंसू आलें. कारण त्यांचे दोन वडील मुलगे नेहमीं त्यांचेजवळ असत; तरी दूर असलेला सर्वांत धाकटा मुलगा जवळ असावा असें त्यास नेहमीं वाटत असे व त्याचे भेटीची ते अगदीं आतुरतेनें वाट पहात असत.

दुसरा प्रसंग तुळशीबागेंतला सरासरी तीस वर्षांपूर्वींचा. कीर्तन चाललें होतें. बुवा रामदासी पंथाचा साधा पोषाख केलेले, पोक्त, प्रेमळ व संभावित वळणाचे होते. रुक्मिणीस्वयंवराचें आख्यान चालू होतें. बोवांच्या डाव्या बाजूस सभामंडपाच्या ठेंगण्या कठ-

ड्याबाहेर सर्व जातींच्या स्त्रिया दाटीनें बसल्या होत्या. बुवांनीं रुक्मिणीनें केलेल्या देवीच्या प्रार्थनेची पंतांनीं रचलेली आर्या म्हणण्यास आरंभ केला.

**पूजुनि धाय, विनविली, कन्यांतें प्रसवतात ज्या माता ।**
**त्या लाटिक्या, तूंचि खरी,** ... ... ... ... ॥

हे तीन चरण खड्या आवाजांत म्हणून त्यांचा अर्थ सांगितला, तो स्त्रियांस किती पटला हें सांगावयास नकोच. आणखी मग

... ... **तुज कृष्णाचि योग्य होय जामाता** ॥

हा चौथा चरण म्हणून 'रामा रामा हरे हरे रामा' हें गायला लागतांच त्या स्त्रियांनीं हर्षाची जी एकच टाळी पिटली, तिची मौज कांहीं निराळीच होती व तिनें देऊळ निनादून गेलें व अभिजात कवि 'अज्ञ हृदयें' हि कशीं हलवून सोडतो हें दिसून आलें.

पंतांचें संस्कृत:--पंतांचें काव्य संस्कृत-प्रचुर असल्यामुळें थोडें दुर्बोध होतें हें खरें. तथापि इतिहासकार रा. सरदेसाई यांनीं हरिवंशाच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें पंतांच्या शेंदीडशें आर्या चांगल्या समजावून घेतल्या म्हणजे मग तितकें कठिण जात नाहीं. मात्र आर्याभारतांतील पंतांच्या संस्कृतांत माधुर्य व पदलालित्य विशेष नाहीं. त्यांच्या निव्वळ साध्या मराठी आर्यांत जो प्रसाद, सफाई व चटकदारपणा आहे, तसा तो संस्कृत रचनेंत नाहीं. तसेंच ते संस्कृतांतलिही अप्रसिद्ध शब्द पुष्कळ वापरतात. त्यांच्या संस्कृत काव्यांत कवित्वापेक्षां शब्दांचाच खेळ जास्त आहे. शिवाय ते संस्कृत शब्दच अशुद्ध वापरतात, एवढेंच नव्हे, तर संस्कृत वाक्यरचनाही चुकीची करतात. या दृष्टीनें त्यांस जगन्नाथ पंडित व अप्पय्या दीक्षित यांचेवर नंबर देणें हें पांगारकरांचें लिहिणें अगदीं हास्यास्पद आहे. संस्कृत गद्यलेखनांत तर या दोघांचेबरोबर त्यांचें

नांवही उच्चारतां येणार नाहीं. मराठी काव्यांत संस्कृतांतील मोठ-मोठे समास योजून त्यांस थोडक्यांत अर्थ आणतां आला आहे. व रूपकेंही पुष्कळ रचतां आलीं आहेत. त्यांस बहुश्रुत या अर्थानें पंडित म्हणतां आलें तरी संस्कृताचे पंडित ही शास्त्रीय पदवी त्यांस देतां येणार नाहीं. आदिपर्व, अ. ३१-२७ येथें त्यांनीं 'अनुष्ठितुं' हें व्याकरणदृष्ट्या चुकीचें संस्कृत रूप योजलें आहे. त्याबद्दल त्यांस पुष्कळ दोष देतात. पण ' अपि माषं मषं कुर्यात् छंदोभंगं न कारयेत् ' या नियमाप्रमाणें अनुष्ठातुं हें शुध्द रूप ओळींत बसेना म्हणून व शोकोद्गारांत एखादें अशुद्धरूप असलें तरी त्यानें खरोखर रसहानि होत नाहीं म्हणून, हा दोष नव्हे.

संकृत वाङ्मयांत स्वभावलेखनाचें काम व्यासांनींच सर्वोत्कृष्ट केलें आहे व पंतांनीं व्यासोक्तीचें प्रतिबिंब वठविण्यांत अमोघ चातुर्य खर्च केलें आहे. द्यूतांत नकुलसहदेवांस जिंकल्यावर दुष्ट शकुनि मोजक्या, मायावी, सूचक अशा दुष्ट भाषणानें धर्माला कशी भुरळ पाडतो पहा. नकुल—सहदेव धर्माचे सावत्र भाऊ व भीम आणि अर्जुन सख्खे, तेव्हां आतां कसें ! व्यास लिहितात,

**गरीयांसौ तु ते मन्ये भीमसेनधनंजयौ ॥**

ह्या साध्या दिसणाऱ्या, पण सर्पाप्रमाणें कुटिल वाक्यावरील पंतांची मखलाशी पहा.

**ग्लह केले माद्रीसुत; परि आतां परम कठिन वाटेल ।**
**सोदरभीमधनंजयपण करितां कंठ फार दाटेल** ॥—स.४-५९

ह्या कुटिल भाषणास धर्म प्रत्युतर करतो.

**शकुने, परुषोक्तीतें भ्याल्या श्रुति कांपतील न सुयांतें ।**

—कित्ता ६०

तसेंच

**परि न वदावें बंधुप्रेमीं जेणें पडेल अंतर तें ॥** –किता ६१

पण असें म्हणत म्हणत, सख्ख्या भावास सावत्र भावांहून ज्यास्त न मानतां भुलून त्यांस पणास लावतो व शकुनीचें कार्य साधतें. येथें शेक्सपीअरच्या लावालावी करणाऱ्या दुष्ट आयागोची आठवण होते. आम्हीं वर ठिकठिकाणीं अवतरलेल्या आर्यांत पंतांचें स्वभावलेखनचातुर्यही दिसून येत आहे. म्हणून या मुद्याचा आतां ज्यास्त विस्तार आम्ही करीत नाहीं.

पंतांचे काव्यदोष:—प्रा. बनहट्टींनीं पंतांनीं केलेल्या अनेक काव्य-दोषांची चर्चा सडेतोडपणें व साक्षेपानें केली आहे. पण काव्याच्या वैपुल्याच्या मानानें दोषांचें प्रमाण मोजकेंच आहे हें सांगितलें आहे. आम्हांस पंतांचे दोन दोष विशेष उद्वेगजनक वाटतात. पंतांनीं उत्कृष्ट यमकें भरपूर साधिलीं आहेत हें खरें, पण अनेक स्थळीं यमकाचे भरीं भरून रसहानि केली आहे. तसेंच, सुंदर मराठी लिहून त्याचे जोडीस बोजड व कृत्रिम संस्कृत बसवून कित्येक स्थळीं हिरमोड केला आहे. हें त्यांना सहज टाळतां आलें असतें किंवा दुरुस्त करतां आलें असतें. तथापि आवडता ग्रंथ पुनःपुनः वाचावयाचा असल्यामुळें प्रथम वाचनांत आढळलेले दोष नंतरच्या वाचनांत वगळून पुढें जातां येतें. पुढें पुढें ते दोष नजरेआड करून गुणांचा आस्वादमात्र ज्यास्त जास्त व वाढत्या प्रमाणांत घतां येतो. यास्तव दोषांचा बाऊ करण्यांत अर्थ नाहीं.

मराठी भाषेची पंतांनीं केलेली सेवा सर्वमान्य आहे. व्याकरण-शुध्द, प्रौढ, भारदस्त, त्याप्रमाणें साधी, बालबोध, वाक्प्रचारयुक्त किंवा घरगुती, जशी पाहिजे तशी मराठी भाषा त्यांनीं लिहिली आहे; मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवूं इच्छिणारांनीं पंतकवितेचा अभ्यास जरूर केला पाहिजे.

पंतांनीं नाटकासारखे नागर प्रबंध किंवा स्वतंत्र एखादें महाकाव्य किंवा अलीकडे विशेष प्रिय असलेले काव्यप्रकार म्हणजे वीणाकाव्यें, सुनीतें किंवा प्रा. लागू ज्यांस कविगीतें असें म्हणतात तशी फुटकळ कवितां कां लिहिली नाहीं ? विशेषतः आत्मनिष्ठ कविता कां लिहिली नाहीं ? परनिष्ठ अशीं कथानक-काव्येंच कशाला लिहिलीं ? असा आक्षेप कित्येकांकडून घेण्यांत येतो. यास उत्तर असें आहे कीं, होमर, शेक्सपीअर, डांटे, मिल्टन असे पाश्चात्य कवि व व्यास, वाल्मीकि, ज्ञानेश्वर इत्यादि आपल्याकडील कवि यांनीं तरी परनिष्ठच काव्यें नाहीं का लिहिलीं ? काव्य परनिष्ठ किंवा आत्मनिष्ठ हा गौण मुद्दा आहे. काव्यांत स्वप्राण घाला कीं परप्राण घाला, या गोष्टीचें महत्व नाहीं. तर कवि, पात्र व रसिक या तिघांचें सामरस्य होत आहे कीं नाहीं, ही महत्वाची गोष्ट आहे. अद्वैत आत्मसाक्षात्कारांत ज्याप्रमाणें ध्याता, ध्येय व ध्यान ह्या त्रिपुटीचा लय होतो, त्याप्रमाणें रसिक, कवि व वर्ण्य विषय या तिहींचा एकजीव झाला पाहिजे. रामास भेटीची उत्कंठा अधिक कीं भरतास अधिक, हा प्रश्न नसून त्या दोघां बंधूंची प्रेममिठी झडली असतां त्या बंधुद्वयास व प्रेक्षकांस झालेला जो आनंद लवकरच रामराज्याभिषेकाचे वेळीं

**शतलक्षकोटि खंड्या कल्पतरूचीं फळें उधळिलीं हो ।**

अशा प्रकारें प्रकट झाला, त्या आनंदाचें महत्व आहे. पंतांचें काव्य वाचतांना अशा तऱ्हेचा उच्च आनंद अनेक स्थळीं अनुभवास येतो. म्हणूनच कवि म्हणून त्यांचा दर्जा फार उच्च आहे. अशा कसोटींत अनुक्रम नंबर लावण्यांत कांहीं स्वारस्य नाहीं.

पंतांनीं राष्ट्राभिमान प्रकट करणारी कविता कां लिहिली नाहीं ? या आक्षेपास रा. पांगारकर व प्रा. बनहट्टी यांनीं असें उत्तर दिलें

आहे कीं, नुकत्याच झालेल्या राष्ट्र-पुरुषांचे पराक्रम त्या काळीं जनतेच्या डोळ्यांत भरत नसत. नजीकच्या वीराचें कौतुक दूरच्या वीराइतकें वाटत नाहीं. वरील आक्षेपास आणखी असें उत्तर देतां येतें कीं, आमच्या साधु, संत व भक्त कवींनीं काव्याचे चिरंतन विषयच निवडले. शेक्सपीअरचीं ऐतिहासिक नाटकें हीं तरी त्याच्या शोकपर्यवसायी नाटकांइतकीं मोठीं कोठें मानलीं जातात ? मिल्टननें तरी क्रामवेलचा पराक्रम न वर्णितां, ईश्वरी लीलेचें समर्थन करण्याचा शाश्वत महत्वाचाच विषय निवडला. शिवाय आमच्या संस्कृतीचे आधारभूत ग्रंथ जे रामायण व महाभारत यांपासूनच आमच्या तरुणांना सर्व प्रकारच्या स्फूर्ति मिळत होत्या.

**झगडें यशोऽर्थ, अरिरथचक्रांहीं स्पष्ट लोष्टसा रगडें ।**

उ. १०-३७

या विदुलेच्या उपदेशाहून राष्ट्राभिमानाचा ज्यास्त तेजस्वी उपदेश कोठें सांपडेल ? तसेंच बकासुराख्यानाप्रमाणें परोपकारासाठीं देह अर्पण करण्यास तयार होण्याचा उपदेश करणारें जास्त सरस आख्यान कोणतें आहे ?

आमच्या जुन्या संत कवींची कविता काय किंवा आधुनिक कवींची कविता काय, पाश्चात्य कवींच्या कवितेपेक्षां कमी प्रिय होते याचें कारण, परकी काव्यें आधीं वाचलीं जातात व मग स्वभाषेंतील अभ्यासिलीं जातात. हा क्रम अजून पूर्ण पालटला नाहीं. अगोदर बिस्किटें खाल्यावर अनारसे एकदम गोड कसे लागणार ?

असो. लिहितां लिहितां निबंधाची मर्यादा केव्हांच संपली. तेव्हां आतां आवरतें घेतों. आम्हांस कांहीं राजारामशास्त्री भागवत किंवा हंस यांचेप्रमाणें पंतांस अद्वितीय कवि असा अतिरिक्त

मोठेपणा द्यावयाचा नाहीं. इंग्रजी, संस्कृत व मराठींतील कवींच्या उत्कृष्ट कृति ज्याप्रमाणें आम्ही प्रेमानें व सहृदयतेनें वाचतों, त्याप्रमाणेंच आमच्या आवडीमध्यें पंतकवितेलाही एक जिव्हाळ्याचें व मानाचें स्थान आहे. कित्येक वेळां पंतांनीं भारतापेक्षां बहार केली आहे, तर कित्येक वेळीं भारतांतील उत्कृष्ट स्थळें त्यांनीं वगळलीं आहेत. पहिल्याचें उदाहरण दुर्योधनाचे अंतकाळचे धन्योद्गार. ते उद्गार नैतिक उदात्ताचें एक सुंदर उदाहरण आहेत, व पंतांनीं ते मुळापेक्षां सुंदर वठविले आहेत. भारतांत 'कोनु स्वंततरो मया' असें पालुपद (चरण) आहे. तर

**स्वंततर कवण मजहुनि, आतां कर्तव्य राहिलें काय।**

असें पंत लिहितात. पण

**युद्धदीक्षां प्रविश्याजौ रणयज्ञं वितत्य च।**
**हुत्वात्मानममित्राग्नौ प्राप चावभृथं यशः॥**

—गदा० ६०-२९

हा बळरामाचे तोंडचा सुंदर श्लोक पंतांनीं गाळला आहे. युद्धाची दीक्षा घेऊन, रणयज्ञांत शत्रुरूप अग्नींत स्वतःचा बळी देऊन दुर्योधनानें यशोरूप जलांत अवभृथस्नान केलें, हें रूपक विशेष चमत्कृतिजनक आहे. 'यशानें अवभृथस्नान', येथें तर व्यासांनीं बहार केली आहे. पंतांच्या काव्यसंपत्तीचें वर्णन आम्हांस 'महारण्यं अरण्यानि' या अमरकोशाच्या शब्दांनीं करावेंसें वाटतें. अरण्यांत फिरून आल्यावर तेथील कांटेकुटे, खाचखळगे, दऱ्यादरकुटे वगैरेंचा ताप विसरून तेथील वृक्षराई, नद्या, ओढे, सरोवरें, टेंकड्या वगैरेंची रम्य शोभाच आपण आनंदानें आठवतों, तशी स्थिति पंतकाव्यवाचनाची आहे. काव्याची गोडी चाखविण्या-

करतां आम्हीं जाणूनच उदाहरणांच्या चर्चेच्या स्वरूपाचा निबंध लिहिला आहे. उदाहरणेंही पूर्व लेखकांहून निराळीं निवडलीं आहेत. तितकेच नमुने ज्यास्त कळतील. निवळ कोऱ्या तात्विक चर्चेनें नवीन वाचकांस कांही खरा परिचय होत नाहीं. असो. आतां आमच्या मतें पंतांचा आम्हांस आवडलेला विशेष सांगतों. पूर्ववयांत हृदयाचे बंध फोडून जाणारी व धोधो वाहणारी कोणतीही उत्कट भावना सहन होते. पण उतरत्या आयुष्यांत 'नकोत ते तीव्र उद्गार' असें होतें. अशा वेळीं एकनवमांश पाण्यावर व आठ नवमांश पाण्याखालीं अशा हिमशैलाप्रमाणें (आइसबर्ग) अपरिस्फुट व व्यंग्यभावनायुक्त अशा पंतांच्या उत्कृष्ट उत्कृष्ट फुटकळ आर्याच आम्हांस फार आवडतात व त्या आम्ही वरचेवर मनांत व जनांतही बडबडत असतों. पंतांच्या अशा आर्या म्हणजे एकसारखे मुखांत विरघळत राहणारे पण कधींहि न संपणारे खडीसाखरेचे खडेच होत. त्यांचें हें स्वरूप दर्शविण्यासाठींच स्त्रीरूपी अर्जुनाचे शरीरांत पंदमंद संचार करणाऱ्या सुंदर शौर्यलहरीचें वर्णन करणारी गोग्रहणप्रसंगींचा

**उठल्या उत्साहाच्या त्या शांत श्रीमदुद्धिवरी लहरी ।**

हा आर्यार्ध लेखाचे मथळ्यावर आम्हीं लिहिला आहे. आतां अखेरीस पंतांच्या आवडत्या वीररसाचा, वात्सल्याचा व भक्तीचा एकएक खडीसाखरेचा खडा वाचकांस अर्पून हा निबंध संपवितों.

द्रौपदी पतीच्या मानहानीनें चवताळून श्रीकृष्णास म्हणतेः—

**यांची शस्त्रें, अस्त्रें दोर्दंडबळें खळें वृथा केलीं ।**
**धिक् कष्ट ! सर्व यशें सुज्ञानें एकदा लया नेलीं ॥** वन. २–२१

भीष्म व कर्ण यांचा अंत्य भेटीचा प्रसंग :—

पुत्रास जसा प्रेमें अनिमिष चंद्राहि परिस बा पाहे ।
एक भुज गळां घालुनि भीष्म वदे, बोल परिस बापा हे ॥
भीष्म. ११–३४

दुर्वासाचे भोजनाचें संकट टळल्यावर धर्म द्रौपदीस म्हणतोः—
देव तुझा कैवारी शुध्दें प्रेमें तुझ्याचि वळला गे ।
दे दुग्ध धेनु धांवुनि वत्सा, इतरां तदर्थ बळ लागे ॥
वन. ८-५५



# ३ ज्ञानेश्वरीची भूमिका

( ले:— डॉ. शं. दा. पेंडसे, एम्. ए., पीएच. डी., नागपूर. )

ज्ञानेश्वरांनीं लिहिलेल्या सर्व ग्रंथांत, भगवद्गीतेवर त्यांनीं लिहिलेली व भावार्थदीपिका, ज्ञानेश्वरी, ज्ञानदेवी, अशा नांवानीं प्रसिद्ध असलेली मराठी टीका अधिक महत्त्व पावली आहे. ज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्र-शारदेला अर्पण केलेला हा अमूल्य अलंकार आपल्या तेजानें सदैव झळकत राहिला आहे आणि नंदादीपाप्रमाणें शांत असणाऱ्या आपल्या तेजानें लक्षावधि लोकांचीं अंतःकरणें हा टीकाग्रंथ आकृष्ट करीत आला आहे. हा ग्रंथ विस्तारानें जसा मोठा, तसाच सुलभतेमुळें त्याचा प्रसारही मोठा आहे.

या टीकाग्रंथाला महत्त्व प्राप्त होण्याचीं अनेक कारणें आहेत. ही टीका ज्या संस्कृत ग्रंथावर लिहिली आहे, तो भगवद्गीता हा ग्रंथच मुळांत लोकादराला व लोकप्रीतीला पात्र झाला असल्यामुळें व ज्ञानेश्वरांसारखा थोर प्रतिभेचा टीकाकार त्या ग्रंथाला लाभल्यामुळें दुधांत साखर पडावी तसा प्रकार होऊन हा टीकाग्रंथ भगवद्गीतेपेक्षांही बहुजनसमाजांत महत्त्व पावला. अनेक शतकांच्या धार्मिक, नैतिक, सामाजिक आणि तात्त्विक विचारांच्या संघर्षानंतर झालेला समन्वय जगद्गुरु श्रीकृष्णानें गीतेमध्यें उपदेशिला आहे. हिंसा आणि अहिंसा, कर्म आणि संन्यास, सगुण आणि निर्गुण, द्वैत आणि अद्वैत इत्यादि द्वंद्वांचा विचारपूर्ण सुंदर समन्वय केल्यामुळेंच श्रीकृष्णाला जगद्गुरु ही यथार्थ पदवी प्राप्त झाली. धर्माधर्माचा व कर्माकर्माचा विवेक करणारा आणि द्वंद्वातीत अशा भूमिकेवरून सर्व द्वंद्वांचा समन्वय करणारा गीता हा

ग्रंथच ज्ञानेश्वरांनीं मराठी टीकेकरितां निवडला, हें मराठी भाषेचें आणि मराठी जनतेचें महद्‌भाग्य होय.

मराठी भाषेच्या नगरीमध्यें ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याकरितां भगवद्गीता हा, अर्जुनाला निष्कामबुद्धीनें कर्तव्यकर्म करावयास लावणारा ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं निवडला, यांत त्यांची योजकता, आजूबाजूच्या परिस्थितीची पूर्ण जाणीव आणि लोकहिताची तळमळ व्यक्त होते. विद्वान् लोक द्वैताद्वैताचा आणि सगुणनिर्गुणाचा काथ्याकूट करण्यांत निमग्न झाले आहेत; धार्मिक म्हणविणारे लोक विधिनिषेधांच्या गोंधळांत सांपडून, यज्ञयागादिक आणि व्रतोपवासादि गोष्टींनाच धर्म समजत आहेत व त्यामुळें वर्णप्राप्त अशीं जीं ब्राह्मण-क्षत्रियांचीं महत्त्वाचीं कर्तव्यें त्याकडे त्यांचें दुर्लक्ष झालेलें आहे आणि अशिक्षित अशा बहुजनसमाजाच्या अंतःकरणाला समाधान देऊन आपआपलीं कर्तव्यें शांतपणें व प्रामाणिकपणें करण्यास प्रवृत्त करणारा व त्यांना समजेल अशा त्यांच्या भाषेंत लिहिलेला कोणताच महत्त्वाचा ग्रंथ नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच श्रीकृष्णाचा संदेश विद्वानांना व बहुजनसमाजाला सांगण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं ही टीका लिहिली. ज्ञानेश्वरांना या टीकेच्या द्वारें ब्रह्मविद्येचा सुकाळ करावयाचा होता; याचा अर्थ तत्त्वज्ञानावर त्यांना तर्ककर्कश आणि रुक्ष ग्रंथ निर्माण करावयाचा होता असा नाहीं, किंवा ब्रह्मविद्येमुळें लोकांना कर्मनिवृत्त करून, आंबट चेहऱ्याचे, नीरस जीवन कंठणारे दैववादी आळशी लोकही त्यांना निर्माण करावयाचे नव्हते. तसें असतें तर भगवद्गीता हा ग्रंथच त्यांनीं टीकेकरितां निवडला नसता. तत्त्वज्ञानाचे आणि व्यवहाराचे सिद्धान्त काव्यरसांत घोळून लोकांना सांगण्याकरितां त्यांनीं ही टीका लिहिली. यज्ञाचें आणि भक्तीचें श्रेष्ठ

स्वरूप कोणतें तें सांगून, लोकांचें वैयक्तिक आणि सामुदायिक जीवन कर्तव्यपूर्ण, रसपूर्ण आणि उन्नत करावें, म्हणून ज्ञानेश्वरीचा अवतार झाला आहे.

ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका असल्यामुळें ज्ञानेश्वरांचें स्वतःचें मत त्यांत व्यक्त झालें नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे; पण तें बरोबर नाहीं. ज्ञानेश्वर स्वतः निर्गुणात्मवादी, मायावादी आणि चिदद्वैती होते. गीतेच्या आधारें त्यांनीं आपले हे तात्त्विक विचार व्यक्त केले आहेत. ज्ञानेश्वरीच्या आरंभींची नमनात्मक पहिलीच ओवी त्यांच्या निर्गुणात्मवादाची निदर्शक आहे. कुठल्याहि सगुण देवतेला त्यांनीं प्रथमतः वंदन केलें नाहीं. तर सर्व सगुण सृष्टीच्या पूर्वी विद्यमान असलेलें, आद्य, वेदप्रतिपादित परंतु शेवटीं स्वानुभवगम्य असें जें आत्मस्वरूप त्यालाच पहिलें नमन केलें आहे. 'आत्मरूपा' या शब्दानें परमात्मा आणि जीव यांचें अभिन्नत्व सुचविलें आहे.

पण ज्ञानेश्वर निर्गुणात्मवादी असले तरी सगुणाचे ते द्वेष्टे होते असा त्याचा अर्थ नाहीं. महेश, राम, कृष्ण, गोविंद, इत्यादि नांवांनीं संबोधिलें जाणारें कोणतेंहि सगुण रूप हें परमात्माच आहे अशी त्यांची भावना असल्यामुळें, त्यानीं कोणताहि सांप्रदायिक आग्रह न धरतां, गणपति आणि सरस्वती यांनाहि ग्रंथारंभीं नमन केलें आहे. वामन पंडितांनीं नांव न घेतां याविषयीं ज्ञानेश्वरांवर टीका केली आहे:—

**वंदिती पूजिती तुझे चरण। तरी अंतरीं इतर देवता शरण। करिती क्षुद्रदेवता मंगलाचरण। इच्छोनि निर्विघ्न कविता स्फूर्तिही॥ (य. दी. ९-२५)**

श्रीकृष्णाविषयीं अनन्य भक्ति नसल्यामुळें ज्यांनीं श्रीकृष्णा-

शिवाय इतर देवतांना निर्विघ्नतेकरितां नमन केलें आहे, त्यांना गीतेचें रहस्य कळणें शक्य नाहीं असें वामन पंडितांचें म्हणणें आहे. पण नांवें भिन्न असलीं तरी सर्वत्र एकच तत्त्व पहाणाऱ्या ज्ञानेश्वरांची भूमिका भिन्न असल्यामुळें त्यांची दृष्टि संप्रदायातीत, उदार आणि व्यापक आहे.

ब्रह्मा, विष्णु, महेश, गणपति इत्यादि सगुण देवता म्हणजे रज, सत्त्व, तमोगुण आणि वाङ्मयप्रविष्ट ज्ञान यांवर अनुक्रमें केलेल्या कल्पना आहेत ही जाणीव ज्ञानेश्वरांना असल्यामुळें काल्पनिक सगुण स्वरूपाविषयीं सांप्रदायिक आग्रह त्यांनीं धरला नाहीं, हें योग्यच झालें. गणपतीचें नमन करतांना सुद्धां, गणपति म्हणजे शब्दब्रह्मावर केलेलें रूपक आहे हें सविस्तर सांगून, सगुण स्वरूपांत गुंतून न जातां, ही सगुण कल्पना ज्या तत्त्वावर केली आहे, त्या तत्त्वाकडे लक्ष देण्यास त्यांनीं सुचविलें आहे. परमात्मस्वरूप हें अव्यक्त आहे, त्याला मनुष्याप्रमाणें हस्तपादादि अवयव आणि देह आहे असें म्हणणें म्हणजे त्याच्या यथार्थ स्वरूपाकडे दुर्लक्ष करणें होय, असें नवव्या अध्यायांत,

**अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ॥**
**परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ ९-११ गीता.**

या श्लोकावरील टीकेंत ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट सांगितलें आहे.

**ना तरी जरें विटाळलें मुख । मग दुधातें म्हणती विख ।**
**तेविं अमानुषा मानुष । मानिती मातें ॥ ९-१४१ ॥**
**तेसें स्थूलाकारीं नाशवंतें । भरंवसा बांधोनि चित्तें ।**
**पाहती मज अविनाशातें । तरी कैसेनि दिसे ॥ ९-१५१ ॥**
**मज आकारशून्या आकारु । निरुपाधिका उपचारु ।**
**विधिविवर्जिता व्यवहारु । आचारादिकु ॥ ९-१५६ ॥**

**जंव आकारु येकु देखती । तंव हा देवो ऐसें म्हणती ।**
**मग तोचि विघडलेया ठाकती । नाहीं म्हणोनिया ॥ ९-१६९ ॥**

निराकार निर्गुण तत्त्वाचें ध्यान किंवा उपासना कठीण असल्यामुळें केवळ सोयीकरितां साकार—सगुणाची कल्पना केली आहे. तेंच परमात्म्याचें खरें स्वरूप आहे असें मानलें तर तो नाशिवंत ठरेल; म्हणून परमात्मस्वरूपाचा 'कल्पनेपैलीकडील ठावो' प्रत्येकानें शोधला पाहिजे असें ज्ञानेश्वरांचें सांगणें आहे. त्यांची निर्भय बुद्धिवादी भूमिका यावरून लक्षांत येईल.

पण ही भूमिका वामनपंडितांना मान्य नसल्यामुळेंच श्रीकृष्णाशिवाय इतर देवतेला ग्रंथारंभीं नमन केल्यामुळें ज्ञानेश्वरांवर त्यांनीं टीका केली आहे व गीतेंतील वरील श्लोकाचा अर्थ ज्ञानेश्वरांपेक्षां वेगळा केला आहे. मनुष्यरूपधारी ईश्वराला सामान्य मनुष्यासारखा समजून लोक अवमान करितात, असा पंडितांच्या टीकेचा निष्कर्ष आहे. सगुणाकडे पहाण्याचा ज्ञानेश्वरांचा दृष्टिकोन पंडितांपेक्षां कसा भिन्न आहे हें यावरून लक्षांत येतें.

शब्दब्रह्मात्मक गणपतीला आणि सरस्वतीला नमन करतां करतांच ज्ञानेश्वरांनीं आपले काव्यविषयक विचार व्यक्त केले आहेत. ज्ञानेश्वरीमध्यें वेदान्ताचें विवेचन असलें तरी त्यामुळें तिच्या काव्यस्वरूपाला बाध येत नाहीं, असें त्यांचें निश्चित मत होतें. कारण स्वतः वेदान्त म्हणजे नीरस वस्तु नाहीं; उलट काव्यांतील रस हा वेदान्तामुळें अधिगत होणाऱ्या 'रसो वै सः' असें ज्याचें वर्णन आहे त्या रसात्मक, 'आनंद ब्रह्म' चा अंशमात्र आहे; त्या काव्यरसाचें श्रेष्ठत्व वर्णन करतांना काव्यशास्त्रकारांना सुद्धां 'ब्रह्मास्वादसहोदर'—ब्रह्मानंदाच्या जोडीचा, असेंच वर्णन करावें लागलें. म्हणून 'वेदान्त महारसु । मोदुकु मिरवे' (१-११)

असें वेदान्तावर महारसपूर्ण मोदकाचें रूपक ज्ञानेश्वरांनीं मुद्दाम केलें आहे व शृंगाराच्या माथ्यावर पाय देणाऱ्या शांत रसानें परिपूर्ण असा ज्ञानेश्वरी हा काव्यग्रंथ त्यांनीं निर्माण केला आहे. अशा या असामान्य कलाकाराचे वाङ्मयविषयक विचार सूक्ष्म आणि सखोल असावे यांत आश्चर्य नाहीं.

वाङ्मयाची मूर्ति सुरेख, रेखीव, प्रमाणबद्ध होण्याकरितां त्या मूर्तीचें शरीर जे वर्ण ते निर्दोष पाहिजेत हा पहिला महत्त्वाचा सिद्धान्त,

> हें शब्दब्रह्म अशेष। तेचि मूर्ति सुरेख।
> जेथें वर्णवपु निर्दोष। मिरवत असे॥ १–२१ ॥

या ओवींत सांगितला आहे. विशिष्ट अर्थ व्यक्त करण्याकारितां शब्दांची निवड किती काळजीपूर्वक केली पाहिजे, मृदु किंवा कठोर वर्णांकडेहि कसें लक्ष पुरविलें पाहिजे, तें या ओवीवरून स्पष्ट होईल. स्वत: ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहितांना हा नियम किती कसोशीनें पाळला आहे व कशी कौशल्यपूर्ण रचना केली आहे हें ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांना निराळें सांगावयास नको.

अनुरूप शब्दाच्या कौशल्यपूर्ण योजनेनें वाङ्मयमूर्ति रेखीव होईल, पण केवळ तेवढ्यामुळेंच वाङ्मय शोभायमान होत नाहीं; तर त्याच्या जोडीला, शब्दांनीं व्यक्त होणारा अर्थहि सुंदर असला पाहिजे, हा दुसरा महत्त्वाचा सिद्धान्त 'तेथ लावण्याची ठेव। अर्थशोभा' ( १–४ ) या ओवींत सांगितला आहे. कलात्मक वाङ्मयामध्येंहि अर्थाला किती महत्त्व आहे हें 'पदपध्दति खेवणें। प्रमेय रत्नांचीं' ( १–५ ) या रूपकांत पुन: सांगितलें आहे. शब्दांची रचना ही सिध्दांतरत्नांना कोंदणा-सारखी झाली पाहिजे. अर्थ किंवा सिद्धान्त मुख्य असून त्याची

शोभा वाढवील अशी शब्दयोजना व रचना पाहिजे, आणि त्या ' नागर पद्यबंधामध्यें ' कवीचें कल्पनावैभव प्रगट करणाऱ्या अलंकारादि साहित्याची जर चमकत असली पाहिजे. ( १–६ )

सरस्वतीला केलेल्या नमनाच्या एकाच ओवींत ललित वाङ्मयाचें अत्युच्च आणि आदर्श स्वरूप ज्ञानेश्वरांनीं सोदाहरण प्रतिपादिलें आहे.

**आतां अभिनव वाग्विलासिनी । जी चातुर्यकलाकामिनी ॥**
**ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ १–२१ ॥**

या ओवींतील प्रत्येक शब्द व त्यांतील प्रत्येक वर्ण काळजीपूर्वक योजिला आहे. थोडक्यांत पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याच्या ज्ञानेश्वरांच्या शैलीचें ही ओवी म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे.

सरस्वतीला ' श्रीशारदा ' या नांवानें नमन करण्यांत ललितवाङ्मयाचें स्वरूप कसें असावें तें सुचविलें आहे. शरदऋतु हा स्वच्छतेचें प्रतीक आहे. शरदऋतूमध्यें पाणी स्वच्छ असतें. शारदीय चंद्रिका स्वच्छ, शीतल आणि तेजस्वी असते. वाङ्मयहि तसेंच स्वच्छ, निर्दोष, तेजस्वी परंतु अंतःकरणाला समाधान आणि आनंद देणारें पाहिजे. अभिनव अशी वाक् हा शारदेचा विलास आहे. अशा अभिनव वाणीच्या द्वारेंच ' नवनवोन्मेषशालिनी ' प्रतिभा व्यक्त होत असते. विचारांचें आणि कल्पनांचें अभिनवत्व सौंदर्ययुक्त नावीन्य आनंदाला कारणीभूत होतें. उच्च ललित वाङ्मयांत अभिनवत्व जसें आवश्यक आहे, त्याचप्रमाणें ' चातुर्य–कला ' हि आवश्यक आहे. या कलेमुळेंच वाङ्मयरूपी शारदा सुंदर दिसते. आणि या सुंदर, कलापूर्ण वाङ्मयांतील भावना आणि कल्पना अशा पाहिजेत कीं, त्यांनीं संपूर्ण विश्वाला मोह पाडला पाहिजे. उत्कृष्ट कलाकृति या देशकालातीत असतात. कोठल्याहि काळीं

जगांतील कोठल्याहि देशांत त्या रसिकांना पराकाष्ठेचा आनंद देतात. अशा स्वच्छ, निर्दोष, शीतलतेजयुक्त, चातुर्यकलापूर्ण आणि विश्वमोहक वाङ्मयाची मूर्ति जी शारदा तिला सहेतुक विशेषणें देऊन नमन करणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेलाहि नमन करावें असेंच प्रत्येकाला वाटेल.

लक्षावधि लोकांच्या अंतःकरणाला अनेक शतकें ज्या ग्रंथानें सात्त्विक आनंद व समाधान दिलें, तो ग्रंथ प्राधान्यानें शांतरसात्मक काव्यग्रंथ आहे, ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां वस्तुतः युक्तिवादाची आवश्यकता नसावी. ती स्वतःसिद्ध अशी गोष्ट आहे. ती अनुभवगम्य करण्याकरितां ज्या रीतीची व दर्जाची रसिकता पाहिजे, ती ज्यांच्याजवळ असेल त्यांना ज्ञानेश्वरीची काव्यमयता सहज कळण्यासारखी आहे. कांहीं थोडे लोक सोडले तर बहुतेक वाचक शुचितेच्या आणि भक्तीच्या उच्च मानासिक भूमिकेवरूनच ज्ञानेश्वरीच्या वाचनाला प्रारंभ करतात. पण ज्ञानेश्वरीची रसमयता प्रतीत होण्याला चित्ताची शुचिता जशी आवश्यक आहे, त्याचप्रमाणें चित्ताचा हळुवारपणाहि आवश्यक आहे, असें ज्ञानेश्वर सांगतात.

**जैसे शारदीयेचिये चंद्रकळे । माजि अमृतकण कोवळे ।**
**ते वेचिती मनें मौआळें । चकोरतलगें ॥ १–५६ ॥**
**तेयापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।**
**अति हळुवारपण चित्ता । आणूनिया ॥ १–५७ ॥**

" चकोरांचीं लहान पिलें ज्या मृदु मनानें शारदीय चंद्रकलेंतील कोवळे अमृतकण वेचतात, तितक्या मृदु अंतःकरणानें श्रोत्यांनीं ही कथा श्रवण करावी. " अन्तःकरणाच्या मृदुतेची पराकाष्ठा, वरील ओंव्यातील उपमेनें व्यक्त झाली आहे. आधींच चंद्रकिरणांच्या चाऱ्यावर जगणारा चकोर हा कविप्रतिभानिर्मित

नाजूक पक्षी, त्याचें लहानसें पिल्लूं हें त्याच्यापेक्षांहि नाजुक, त्याच्या मनाची, शरदृतूंतील चंद्राकिरणांत असलेलें कोवळे अमृतकण वेचतांना होणारी जी मृदुता, ती वाचकाच्या मनानें धारण केली पाहिजे. कोमल भावना व्यक्त करणाऱ्या कोमल शब्दांतील अर्थच केवळ नव्हे, तर त्यांतील कोमल वर्णांचें अनुकरणहि प्रतीत होईल इतकें मन, मृदु व संस्कारक्षम असलें पाहिजे. अशाच रसिकवर्याला श्रेष्ठ काव्यांतील रसाचा आस्वाद घेतां येतो. लावण्यांतील शृंगारापेक्षां कालिदासाचा ध्वन्यर्थपूर्ण सूचक शृंगार प्रतीत होण्याला जसें अधिक रसिकत्व पाहिजे, त्याप्रमाणें शृंगाराच्या माथ्यावर पाय देणाऱ्या शांतरसाचा आस्वाद घेण्याला त्याहीपेक्षां अधिक पात्रता पाहिजे, हें उघड आहे.

ज्ञानेश्वरांचा व्यक्त करण्याचा भाव इतका नाजूक आहे कीं, त्याला शब्दाचा स्पर्शहि सोसण्यासारखा नाहीं. शब्दांनीं व्यक्त करण्याच्या धकाधकींत त्या पराकाष्ठेच्या कोमल भावाला इजा होण्याचा संभव आहे, म्हणून

> हें शब्देंविण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।
> बोलाआदी झोंबिजे। प्रमेयासी ॥ १-५८॥
> जैसे भ्रमर परागु नेती। परि कमलदलें नेणती।
> तैसी परी आहे सेविती। ग्रंथीं इये ॥ १-५९॥

भृंगे कमलदलांतील पराग नकळत हळूच जसा नेतात त्याप्रमाणें शब्दांनीं प्रगट होण्यापूर्वींच ग्रंथांतील नाजूक भाव समजून घेण्याची सूचना ज्ञानेश्वरांनीं वाचकांना केली आहे. त्याकारितां अंतःकरणाच्या मृदुतेबरोबरच स्थिरतेची, अव्यग्रतेची आवश्यकता आहे.

> वैसेनि गंभीरपणें। थिरावलेनि अंतःकरणें।
> आथिला तो जाणे। मानूं इये ॥ १-६१॥

या ग्रंथांतील सर्वश्रेष्ठ काव्य समजण्याला कशा तऱ्हेचें मन पाहिजे तें याप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट केलें आहे, आणि नंतर भिन्न भिन्न शंखांच्या आणि रणवाद्यांच्या प्रचंड कोलाहलाच्या पार्श्वभूमीवर अर्जुनाच्या कारुण्यपूर्ण मनःस्थितीचें चित्र रेखाटलें आहे.

जगांत चाललेल्या जीवनकलहाकडे आणि भिन्नभिन्न मतांच्या कोलाहलाकडे पाहून, ऐहिक सुखाच्या आणि ऐश्वर्याच्या तुच्छतेची जाणीव झालेल्या व सर्वांविषयीं सदयभाव धारण करणाऱ्या तत्त्वज्ञाची जी वृत्ति होते ती अर्जुनाची वृत्ति झाली होती. क्षुद्र स्वार्थाकरितां मनुष्यें व आप्तस्वकीयहि एकमेकांशीं भांडतांना पाहून अर्जुनाला पराकाष्ठेचें वाईट वाटलें आणि त्याच्या डोळ्यांतून ' न धरत अश्रुपात आले ' ( १—२७१ ). प्रतिपक्ष्याविषयींहि कारुण्याची भावना उत्पन्न होणें अंतःकरणाच्या श्रेष्ठतेचें गमक आहे यांत शंका नाहीं. पण जगाच्या व्यवहारांत या भावनेमुळें दुष्टांचें फावतें व सज्जनांचें रक्षण होत नाहीं, म्हणून क्षत्रियाला अवेळीं अशी कारुण्यवृत्ति उत्पन्न होणें योग्य नाहीं, हें अनेक उपमांनीं ज्ञानेश्वरांनीं स्पष्ट केलें आहे. कारण तत्त्वज्ञानाबरोबरच व्यवहाराचीहि शिकवण त्यांना द्यावयाची होती. उच्च कुलोत्पन्न पत्नी ज्याप्रमाणें पतीनें दुसरी स्त्री घरांत आणली तर तें सहन करीत नाहीं, त्याप्रमाणें अर्जुनाची वीरवृत्ति, त्याच्या मनांत दया आली असें पाहतांच त्याला सोडून गेली ( १—१८५।१८६ ), बुद्धिभ्रष्ट तपस्व्याप्रमाणें अर्जुनाची मोहग्रस्त स्थिति झाली (१—१८८) असें वर्णन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे. कारण पुढें ' हातांत कोदंड घेऊन रथांत आरूढ हो, वीरवृत्ति धारण कर ' आणि ' येया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ॥ ३—१८७ ' असा उपदेश करून, शेवटीं ' विहित, वर्णप्राप्त, कर्म करणें हीच सर्वात्मकाची प्रेम-

सेवा आहे ' ( १८–९०२ ) असें सांगावयाचें आहे हें त्यांच्या लक्षांत होतें.

तात्पर्य, अध्यात्मशास्त्रावर आधारलेल्या उन्नत व्यवहाराचा काव्यरसपूर्ण उपदेश करण्याकरितां आवश्यक ती भूमिका ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच अध्यायांत तयार करून, या श्रेष्ठ काव्याचा आस्वाद घेण्याकरितां अवश्य ती मनोभूमिकाहि कशी असावी याचें सुंदर विवेचन ज्ञानेश्वरांनीं केलें आहे व अशा रीतीनें पुढील विवेचनाचा भक्कम पाया पहिल्या अध्यायांत घातला आहे.

ज्ञानेश्वरादि संतांच्या वाङ्मयाची योग्यता आधुनिकांना पटवून देण्याकरितां वै. वा. पांगारकरांनीं आपलें संपूर्ण जीवन वेचलें. त्यामुळें स्वतःस संतचरणरज म्हणविणाऱ्या वै. वा. पांगारकरांचेंहि नांव संतांप्रमाणेंच मराठी वाङ्मयांत अमर होऊन रहाणार आहे.



# ४. महानुभाव-तत्त्वज्ञान

( ले.—प्रा. वि. भि. कोलते, एम्. ए. नागपूर. )

## प्रास्ताविक

शककाल बाराव्या शतकाच्या शेवटच्या चरणांत महानुभाव पंथाची स्थापना झाली, असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी हे शके ११९६ मध्यें आपलें अवतारकार्य संपवून उत्तरापंथें निघून गेले. त्यापूर्वीं स्वतः संन्यस्त होऊन तों आपला अवतार समाप्त करीपर्यंत सुमारें आठ वर्षें त्यांनीं महाराष्ट्राच्या परिभ्रमणांत घालविलीं. त्यांच्याभोंवतीं अनेक विद्वान शिष्यांचा समूह गोळा झाला, तोहि याच कालावधींत. परमेश्वरस्वरूप असलेल्या श्रीचक्रधर स्वामीजवळ विशुद्ध धार्मिक भक्तिभावनेनें एकत्रित झालेल्या या शिष्यसमूहांतूनच महानुभाव पंथ तयार झाला. तेव्हांपासून तों आजतागायत या पंथाचें सातत्य सारखें टिकून राहिलें आहे. आणि विशेष हें कीं, त्याच्यानंतर निर्माण होऊन प्रबलतर बनलेल्या अशा इतर अनेक पंथांचे आघात सहन करूनही प्रस्तुत पंथ आज अस्तित्वांत राहिलेला आहे. महाराष्ट्रांतील लहान थोर सर्व समाजांनीं महानुभाव पंथाविषयीं व त्यांच्या अनुयायांविषयीं केवळ उदासीनतेचेंच नव्हे तर प्रत्यक्ष विरोधाचें व्रतच जणूं स्वीकारलें होतें. हें व्रत इतकें तीव्र होतें कीं, त्याचा परिणाम म्हणूनच कीं काय, या पंथीयांच्या संबंधानें कांहीं अज्ञानजन्य लोकभ्रम बहुजनसमाजांत व त्यांच्या भाषेंत दीर्घकालपर्यंत रूढ होऊन बसले आणि असें असूनहि प्रस्तुत पंथ महाराष्ट्रामध्यें

आज चांगल्या रीतीनें टिकून राहिलेला आहे; इतकेंच नव्हे तर त्याच्या कांहीं शाखा पंजाब, वायव्य सरहद्द इत्यादि प्रांतांकडे पसरलेल्या आहेत.

## पंथाच्या सातत्याचें कारण तत्त्वज्ञान

यावरून साहजिकच असा एक प्रश्न मनांत येतो कीं, हा सर्व विरोध सहन करूनहि महानुभाव पंथ एकसारखा टिकून राहण्याचें कारण काय असावें? याचें उत्तर असें कीं, या पंथाला स्वतंत्र विचारसरणीचें अधिष्ठान आहे. त्याला विशिष्ट तत्वज्ञानाची बैठक आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या व्यक्तिमाहात्म्यानें दिपून जाऊन त्यांच्याभोवतीं लोक गोळा झाले होते असें नाहीं. तसें असतें तर स्वामींचें पार्थिव शरीर अदृश्य झाल्याबरोबर किंवा त्यांचा अवतार संपल्यानंतर हे शिष्य पांगले असते व आज त्यांचा स्वतंत्र असा एक सांप्रदाय दृष्टीस पडला नसता. त्यांच्या भोवतीं गोळा झालेले त्यांचे शिष्य हे नुसत्या भक्तिभावनेनें वेडावलेले भोळे नव्हते. ते अत्यंत विद्वान् होते. त्यांची बौद्धिक पातळी फार वरच्या दर्जाची होती. अशी ही विद्वान विद्वान मंडळी केवळ वैयक्तिक भावनांच्या आहारीं जाऊन स्वामींचा उदो उदो करणारी नव्हती. त्यांच्या बुद्धीला पटेल अशी आध्यात्मिक विचारसरणी, असें तत्वज्ञान स्वामींच्याजवळ होतें, त्यामुळें ते आकर्षिले गेले होते. या वैचारिक किंवा तात्त्विक भूमिकेमुळेंच प्रस्तुत पंथ आजपर्यंत टिकून राहिला आहे. ही तात्त्विक भूमिका कोणती तेंच प्रस्तुतच्या लेखांत संक्षेपानें पहावयाचें आहे.

महानुभाव पंथानें महाराष्ट्राला दोन अमोल देणग्या दिलेल्या आहेत. एक त्याचें स्वतंत्र तत्त्वज्ञान आणि दुसरी त्या तत्वज्ञानाचा आविष्कार करणारें गद्यपद्यात्मक वाङ्मय. यांपैकीं त्यांच्या पद्या-

त्मक वाङ्मयाची ओळख महाराष्ट्राला बऱ्याच प्रमाणांत झालेली आहे; आणि त्यामुळें महानुभाव पंथाविषयीं, त्यांनीं केलेल्या वाङ्मसेवेबद्दल, एक प्रकारची कृतज्ञताबुद्धि महाराष्ट्रीयांच्या मनांत निर्माण झालेली आहे. कांहीं चारित्रग्रंथ सोडून दिले तर त्यांनीं निर्माण केलेलें बहुतेक गद्यवाङ्मय तत्त्वज्ञानपर आहे. महानुभावांच्या धार्मिक समजुतीमुळें, त्यांचें इतर वाङ्मय आज बरेंच उपलब्ध झालेलें असलें तरी हें तात्विक वाङ्मय मूळ स्वरूपांत अजून प्रसिध्द होऊं शकलें नाहीं. तथापि त्यांचें हें तात्त्विक वाङ्मय हस्तलिखित स्वरूपांत वाचूनच या पंथाच्या तत्त्वज्ञानाचा मीं थोडा फार अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. तो विस्तृत स्वरूपांत एका पुस्तकाच्या स्वरूपांत वाचकांच्या समोर आहेच. त्याच्याच आधारें महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचें स्थूल स्वरूप या ठिकाणीं संक्षेपानें लिहिण्याचा प्रयत्न करतों.

## महानुभाव पंथ व कै. पांगारकर

ज्यांच्या स्मरकग्रंथासाठीं प्रस्तुत लेख लिहीत आहें त्यांचा व प्रस्तुत पंथाचा बराच घनिष्ट संबंध आलेला होता हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. कै. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्कृतींत मुरलेले असे एक सनातनी सद्‌गृहस्थ होते, आणि म्हणून इतर सर्व सनातनीयांप्रमाणेंच त्यांची दृष्टि प्रस्तुत पंथाच्या बाबतींत पूर्वग्रहदूषित होती, असें मीं म्हटलें तर तें चुकीचें ठरणार नाहीं. इ. स. १९१४ सालीं उमरावतीच्या कोर्टांत चालू असलेल्या एका अब्रुनुकसानीच्या दाव्यांत त्यांनीं महानुभाव पंथाविरुद्ध जी साक्ष दिली होती, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. कै. वि. ल. भावे यांच्या महाराष्ट्रसारस्वतावर अभिप्राय देतांना 'मानभाव पंथाचें लिगाड' असा शब्दप्रयोग पांगारकरांनीं वापरला

होता, याचेंहि कारण त्यांची या पंथाविषयींची पूर्वग्रहदूषित दृष्टि होय. या त्यांच्या शब्दप्रयोगामुळें त्याच वेळीं या पंथांतील सुविद्य व जागरूक मंडळीमध्यें तीव्र असंतोष निर्माण झाला होता. त्या वेळीं प्रसिद्ध होत असलेल्या महानुभाव पंथाच्या ‘ ज्ञानसिंह ’ या मासिकांत ( आक्टोबर १९२८ ) ‘ महानुभाव पंथाविषयीं मुमुक्षूचा जळफळाट व पांगारकरांचें विषारी ब्राह्मण्य ’ या मथळ्याखालीं आलेल्या लेखांत हा असंतोष अत्यंत कडवटपणानें प्रतिबिंबित झालेला आहे. हें सर्व खरें असलें तरी कै. पांगारकर हे हाडाचे वाङ्मयप्रेमी आणि रसिक गृहस्थ होते आणि म्हणून त्यांनीं प्रस्तुत पंथानें निर्माण केलेल्या वाङ्मयासंबंधीं अत्यंत आदराचे उद्गार काढलेले आहेत, हें विसरतां येत नाहीं. इतकेंच नाहीं, तर पंथाचें वाङ्मय अभ्यासल्यानंतर त्यांचे या संप्रदायाविषयीं जें अनुकूल मत बनलें तें त्यांनीं निर्विकार अंतःकरणानें आपल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत ( खंड १, पानें ४७९–४८० ) प्रतिपादन केलें आहे. त्यांत ते म्हणतात,

“ बौद्ध किंवा जैन मतासारखा महानुभाव पंथ वेदबाह्य तर नाहींच नाहीं; पण भागवत धर्माचा हा एक पंथ आहे, असें या पंथाचें वाङ्मय पाहिलें असतां निभ्रांत वाटतें....वेदाविषयीं महानुभावपंथीय कवींची पूज्यबुद्धि आहे; त्यांचें मुख्य उपास्य कृष्ण आहे, त्यांच्यांत मूर्तिपूजा आहे, ते वेदपुराणांविषयीं आदरानें बोलतात, त्यांचा पूजाविधि, त्यांची गुरुभक्ति, त्यांचे आचारविचार इतर हिंदूसारखेच आहेत; म्हणून कांहीं आचारविचारांतल्या मतभेदांकडे कानाडोळा करून हिंदूसमाजानें त्यांना आपल्यासारखें सनातनधर्मीय समजावें, आपणांत मिसळून घ्यावें.... यांत उभयतांचें व एकंदर हिंदू राष्ट्राचें कल्याण आहे. हें मी सांप्र-

तच्या हिंदुसमाज-घटनेच्या दृष्टीनें बोलतों असें नाहीं, तर या पंथाचें वाङ्मय पाहिल्यावर व त्यांचा व आपला उपासनाभक्तीचा जिव्हाळा पूर्णपणें एक आहे, हें सर्वथा पटल्यावर अंतरात्म्याच्या साक्षीनें बोलत आहें."

## पांगारकरांचा तात्त्विक मतभेद

कै. पांगारकरांनीं ज्या जिव्हाळ्यानें हें लिहिलें आहे तो पाहिला म्हणजे त्यांच्याविषयीं व त्यांच्या निराग्रह भूमिकेविषयीं मनांतला आदर दुणावतो. त्यांचें हें मतपरिवर्तन मान्य केलें तरी एक गोष्ट शिल्लक राहते. ती त्यांच्या द्वैताद्वैतविषयक विचार-सरणीसंबंधींची. कै. पांगारकर हे श्री शंकराचार्यांच्या केवला-द्वैताच्या तत्त्वज्ञानांत मुरलेले आणि रंगलेले होते. त्यामुळें महानु-भावांचें पूर्ण द्वैत त्यांना पसंत पडणें कधींच शक्य नव्हतें. म्हणू-नच ज्ञानप्रबोधकार विश्वनाथ कवीच्या काव्याविषयीं रसिकतेचे उद्गार काढूनही शेवटीं ते म्हणतात, " ज्ञानेश्वरांबरोबर विश्वनाथ कवि अविद्याखंडणापुरते चिदाकाशांत वर उडायला गेले; पण पुढें त्यांना जणूं घेरी येऊन ते खालीं द्वैताच्या खोड्यांत पडले.... ग्रंथसमाप्तीचे समयास कवीनें आपलें दीनपण व रंकपण अगदीं केविलवाण्या सुरांत व्यक्त केलें आहे. तें त्याच्या द्वैतबुद्धीला अनु-सरूनच आहे." ( म. वा. इ. खं. ११ पा. ४७१ ). या व अशाच इतर उल्लेखांवरून पांगारकरांची द्वैतमताची अप्रियता स्पष्ट दिसून येते. त्यांच्या केवलाद्वैतप्रियतेमुळें त्यांनीं महानुभावाचें वच्छहरण काव्य अद्वैताचा पुरस्कार करणारें असल्याचें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तो चुकीचा आहे. पण त्याचें सविस्तर खंडन करण्याचें हें स्थळ नव्हे. महानुभावांचें हें द्वैत पांगारकरांना कधींच प्रिय होणें शक्य नव्हतें. कारण, हा वैचारिक व तात्विक असा

मूलभूत मतभेद आहे. तो लक्षांत येण्यासाठींच आपणांला प्रस्तुत लेखांत महानुभावांचें तत्वज्ञान संक्षेपानें पहावयाचें आहे.

## महानुभाव तत्त्वज्ञान : चार मुख्य पदार्थ

महानुभावांच्या तत्वज्ञानाचें रहस्य समजण्यासाठीं त्यांनीं गृहीत धरलेले मुख्य पदार्थ आधीं लक्षांत घेतले पाहिजेत. उदा:— श्रीशंकराचार्यांनीं सर्व सृष्टींत एकच 'पदार्थ' असल्याचें मानलें आहे. तो पदार्थ म्हणजे 'ब्रह्म' होय. हें एकदां नीट कळलें म्हणजे त्यांच्या केवलाद्वैताचा सिद्धांत आत्मसात् करणें सोपें जातें. महानुभावांनीं असे मुख्य पदार्थ चार मानलेले आहेत. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर हे ते चार पदार्थ होत. हे चारहि पदार्थ स्वतंत्र असून अनादि व अनंत आहेत. मुळापासूनच ते एकमेकां-पासून वेगळे असून शेवटपर्यंत ते तसेच राहणार. अर्थात् सर्वांत किंवा त्यांतील कोणत्याहि दोहोंत ऐक्य होणें कधींच शक्य नाहीं. या दृष्टीनें महानुभाव हे पूर्ण द्वैती असल्याचें दिसून येईल.

मूळ पदार्थ म्हणून उल्लेखिलेल्या वरील चारांपैकीं प्रत्येक पदार्थ जातित्वानें एक असला तरी वस्तुतः त्यांत अनेकांचा अंतर्भाव होतो. उदा:—ईश्वर एक असला तरी ब्रह्माचाहि अंतर्भाव त्यांतच होतो. ब्रह्म आणि ईश्वर या दोहोंनाहि स्थूलमानानें ईश्वर हें एकच नांव आहे. प्रपंच हा एक पदार्थ असला तरी त्यांत पंच-भूतें आणि तीन गुण यांचा समावेश होतो. या आठांना मिळून प्रपंच असें संबोधतात. जीव तर मूळापासूनच अनंत आहेत. पण वर्ग म्हणून तो एकच पदार्थ मानला जातो. 'देवता' नामक पदार्थांत ८१कोटी ११लक्ष ११ देवता मोडतात. या सर्वांचा मिळून 'देवता' हा एक पदार्थ होय. हे सर्व पदार्थ मुळांत अव्यक्त आहेत. पण त्यांचीं हीं अव्यक्त स्वरूपें भावात्मक होत, अभावात्मक नव्हे. तीं सर्व भाव-

रूप असल्यामुळेंच त्यांचें 'अस्तित्व' कल्पितां येतें.

## देवताथोवे : संख्या : स्वरूपमर्यादा

प्रत्येक ब्रह्मांडांत एकूण ८१ कोटी १। लक्ष १० देवता आहेत. त्यांचे एकंदर ९ समूह ऊर्फ थोवे असून, थोवेपरत्वें देवतांची संख्या व त्यांची स्वरूपमर्यादा पुढीलप्रमाणें आहे. (१) कर्मभूमीच्या देवता: संख्या १३ कोटी. प्रत्येक देवतेची स्वरूपमर्यादा ५०० योजनें (२) अष्टौदेवयोनी: संख्या १३ कोटी, स्वरूपमर्यादा ५००० योजनें. (३) अंतराळ: संख्या १३ कोटी, स्व. म. ५० हजार योजनें. (४) स्वर्ग: ३३ कोटी देवता, स्व. म. ५ लक्ष योजनें. (५) सत्य कैलास वैकुंठ: संख्या ९ कोटी, स्व. म. ५० लक्ष योजनें. (६) क्षीराब्धी: संख्या १। लक्ष. स्व. म. ५ कोटी योजनें. (७) अष्टभैरव: संख्या ८, स्व. म. ५० कोटी योजनें. (८) विश्व: संख्या १, स्व. म. ५०० कोटी योजनें. (९) माया: संख्या १, स्वरूपमर्यादा अगणित.

या सर्व थोव्यांत उंचनीच क्रम आहे. सर्वांत खालचा थोवा कर्मभूमीच्या देवतांचा असून सर्वांत उंच थोवा मायेचा आहे. हाच उंचनीचपणा प्रत्येक थोव्यांतील देवतांत आहे. उदा: कर्मभूमीच्या थोव्यांतील १३ कोटी देवता या आपापल्या स्वरूपाच्या सपूरधोष्ठरपणाप्रमाणें उंचनीच आहेत. तथापि सत्य कैलास वैकुंठींच्या थोव्यांतील ब्रह्मा, हर आणि हरि या देवता समान आहेत. त्यांच्यांत उंचनीचपणा नाहीं. तसेंच अष्टभैरव हेंहि सर्व बाबतींत समान आहेत. त्यांच्यांतहि श्रेष्ठकनिष्ठपणा नाहीं.

## देवतास्वरूपींची समृद्धि

अनादिकालापासून हीं सर्व देवतास्वरूपें भावरूप पण अव्यक्त असून ज्ञान, सुख, सामर्थ्य, ऐश्वर्य व प्रकाश या पंचप्रकारांनीं युक्त

आहेत. खालील देवतेच्या स्वरूपापेक्षां वरील देवतेचें स्वरूप ८ पटींनीं घोष्टर म्हणजे जाड आहे. तसेंच खालील देवतास्वरूपांत असलेल्या ज्ञानसुखसामर्थ्यादि पंच प्रकारांपेक्षां वरील देवतास्वरूपांतील पंच-प्रकार १० पटींनीं अधिक आहेत. हीं सर्व देवतास्वरूपें व्याप्यव्यापक भावानें आपल्या सामर्थ्याधारें स्थित आहेत. अर्थात् खालील देव-तास्वरूपाला वरील देवतास्वरूप व्यापून असतें. या दृष्टीनें पाहतां माया ही सर्वांना व्यापून असल्याचें दिसून येईल. खालील देवता-स्वरूप वरील देवतास्वरूपाला पाहूं शकत नाहीं. पण वरील देवता-स्वरूप मात्र आपल्या खालील सर्व देवतास्वरूपें पाहूं शकतें. तथापि या सर्व देवतांना ईश्वराचें अस्तित्त्वज्ञान आहे. इतकेंच नाहीं, तर त्याची प्रवृत्ति त्यानें जाणविल्यास ती जाणण्यासाठीं त्या उत्सुक-तेनें सदैव वाट पहात असतात.

## ब्रह्मांडस्था : पिंडस्था : त्यांचें कार्य

देवतांचीं हीं स्वरूपें नित्यबद्ध आहेत. म्हणजे त्यांत त्यांच्या ठराविक मर्यादेपेक्षां अधिक कांहींहि होणें शक्य नाहीं. अधीनत्व, अज्ञान व अविद्या, या तीन बंधांनीं तीं स्वरूपें कायमचीं बांध-लेलीं आहेत. त्यांतून तीं मोकळीं होणें अशक्य आहे. हेंच त्यांचें वास्तविक नित्यबद्धत्व होय. अर्थात देवता मुक्तीला पात्र नाहींत हें ओघानेंच आलें. तथापि त्यांच्या ठिकाणीं होण्याचा व उरण्याचा भाव मात्र आहे. 'होण्या'च्या भावामुळें त्यांच्या अव्यक्त स्वरू-पांतून त्या ब्रह्मांडस्थांच्या रूपानें व ब्रह्मांडस्थापासून विग्रह, पिंडस्था वगैरेच्या रूपानें त्या विभागूं शकतात. तरीहि मूळ स्वरू-पांत 'उरण्या'च्या भावानें त्या उरलेल्याच असतात. सृष्टिरचनेच्या वेळीं सृष्टीचा व्यापार चालविण्यासाठीं सर्व देवता आपल्या अव्यक्त स्वरूपांतील होण्याच्या भावांतून ब्रह्मांडस्थांच्या रूपानें विभागतात.

सर्व ब्रह्मांडव्यवस्था त्याच चालवितात. या ब्रह्मांडस्थांपासून विभागून जे देवतावतार होतात, त्यांना विग्रह असें म्हणतात. ब्रह्मांडस्थांपासूनच पिंडस्थाहि विभागतात. त्यांचें अधिष्ठान शरीरधारी जीवाच्या देहांत असतें. सर्व देवतांच्या पिंडस्थानीं युक्त असलेला देह हाच धर्मकर्माचरणाला ‘ युक्त ’ असूं शकतो. असा ‘ युक्त ’ मनुष्यदेहच मोक्षाधिकारी होतो.

देवतांचें मुख्य कार्य, सृष्टींतील जीवांना त्यांच्या कर्मांचीं सुखदु:खात्मक फळें देणें हें होय. अर्थात्, ईश्वरविषयक कर्मांचीं फळें मात्र त्या देऊं शकत नाहींत. तीं ईश्वरापासूनच जीवाला मिळतात. ईश्वरविषयक कर्मांव्यतिरिक्त इतर सर्व कर्मांबद्दल देवता जें सुख भोगवतात तें निर्भेळ नसतें; तर सुखदु:खात्मक असतें. त्यांतहि देवता आधीं दु:ख भोगवतात आणि मग सुख भोगवतात. या दृष्टीनें, जीवमात्राकडून जीं कर्में होतात त्यांचे सामान्यत: दोन प्रमुख विभाग आहेत. एक, ईश्वरविषयक कर्मांचा; यालाच दैवराहाटी म्हणून संबोधतात. दुसरा, ईश्वराव्यतिरिक्त इतर सर्व कर्मांचा. अशा सर्व कर्मांचीं फळें देवतांकडूनच दिलीं जातात; म्हणून तीं देवताविषयक कर्में होत. याला कर्मराहाटी असें नांव आहे. जीव या सृष्टींत आल्यानंतर एक तर कर्मराहाटीचा अनुयायी असतो किंवा दैवराहाटीचा असतो. या दोन्ही राहाटींतील जीवाचें कर्तृत्व पाहण्यापूर्वीं आधीं त्याचें मूळ स्वरूप लक्ष्यांत घेऊं या.

## जीवस्वरूप

अनादि आणि नित्य असलेले जीव अनेक आहेत. मायास्वरूपाचा ‘ तम ’ या नांवाचा एक विभाग आहे. त्यांत अनादि काळापासून ते पडलेले होते. जीवस्वरूप भावरूप पण अव्यक्त आहे. विशेष हें कीं, तें अनादिकाळापासून अविद्येनें युक्त आहे. या

अविद्येच्या आश्रयानेंच त्याच्या ठिकाणीं अज्ञान, अन्यथा ज्ञान, जीवत्व व आदिमळ राहतात. त्या सर्वांना मिळून 'पांचपिशी' असें म्हणतात. या पांचपिशीप्रमाणेंच जीवस्वरूपी विकार, विकल्प व स्वभाव हे तीन दोष असून त्यांनाहि मूळ आधार अविद्याच होय. याशिवाय अधमति, अधगति आणि अधरति म्हणून संबोधलें जाणारें मतित्रयहि जीवस्वरूपी आहे. या मतित्रयामुळें जीवाचा एकसारखा अधःपात होत असतो. तथापि हें अधोगामी मतित्रय जर ऊर्ध्व केलें तर जीवाचा उद्धारहि होऊं शकतो.

जीवस्वरूप मूलतः स्फटिकशुभ्र आहे. पण अविद्येच्या युक्तत्वामुळें तें किंचित् काळसर झालें आहे. जीवस्वरूप अविद्यायुक्त असलें तरी तें 'केवळ' होय. तें अविद्येपासून वेगळें झालें म्हणजे 'कैवल्य' होतें. जीवाच्या ठिकाणीं जसे वर उल्लेखिलेले कांहीं दोष आहेत, तसे कांहीं गुणहि आहेत. एखादी बरीवाईट गोष्ट संपादन करण्याचें 'अर्जकत्व' त्याच्या ठिकाणीं आहे. तसेंच संतासंत कर्म अर्जन करण्यासाठीं लागणारें 'सर्वाधिकारित्व' हि आहे. त्यामुळें कोणतीहि चांगली किंवा वाईट क्रिया करण्याची पात्रता त्याच्या ठिकाणीं निर्माण होते. त्याला जिथें ठेवाल तेथें तो राहतो. ही 'सकळांशीं मिळिजे ऐसी शक्ति' त्याच्या ठिकाणीं आहे. पण तो एकदेशी असल्यामुळें एका वेळीं एकाच ठिकाणीं राहूं शकतो. देवतांच्या ठिकाणीं जसा होण्याचा आणि उरण्याचा भाव आहे, तसा जीवांच्या ठिकाणीं नाहीं. तो एकदेशी आहे आणि म्हणून एकाच वेळीं सुखाचा आणि दुःखाचा अनुभव त्याला घेतां येत नाहीं किंवा एकाच वेळीं दोन वेगवेगळ्या प्रापंचिक शरीरांत तो राहूं शकत नाहीं.

एवंगुणविशिष्ट जीव पूर्णपणें निष्क्रिय आणि म्हणून परतंत्र

असतो. सृष्टिरचनेपूर्वी मायास्वरूपांतील तमोभागांत तो जड-भरताप्रमाणें पडून होता. त्याला सक्रिय बनवण्यासाठीं सृष्टिरचनेच्या वेळीं परमेश्वरप्रवृत्तीमुळें मायेनें त्याला आपल्या स्वरूपाचा एक अंश ( चैतन्यांश ) सोबत म्हणून दिला. जीवाला मुक्ति मिळेपर्यंत हा त्याच्या बरोबर लागलेला असतो. म्हणून त्याला संलग्न असें म्हणतात. जीवानें उल्लेखिलेल्या सर्व कर्मांचें त्याला चेष्टकत्व करणें हें त्याचें मुख्य कार्य होय. जीव अनेक संतासंत कर्में करण्याचे उल्लेख करतो. पण त्याला त्यांचें स्मरण राहत नाहीं. संलग्न त्याला त्या उल्लेखांचें स्मरण करून देतो. इतकेंच नाहीं तर त्याजकडून तीं कार्यें तो करवून घेतो. अर्थात् या बाबतींत जीव संलग्नाच्या आधीन म्हणून परतंत्र असतो. तथापि संलग्नाचें हें चेष्टकत्व व पारतंत्र्य जीवाकडून होणाऱ्या कर्मराहाटीच्या क्रियांच्या बाबतींत तेवढेंच असतें. दैवराहाटींतील क्रिया करतांना जीव पूर्णपणें स्वतंत्र असतो.

कर्मराहाटींतील प्रत्येक क्रिया जीव जरी संलग्नाच्या चेष्टकत्वानें करीत असला तरी त्या क्रियेचें वास्तविक कर्तृत्व मात्र फक्त जीवाचेंच असतें; कारण क्रियेचा प्रथमोल्लेख होतो तो जीवाकडून आणि पुढें प्रत्यक्ष कार्य होतें तेंहि जीवाकडूनच. कर्तृत्व जीवाचें असल्यामुळें त्याचें पापपुण्य तेंहि फक्त जीवालाच. त्याबद्दल सुख-दु:खाचा खरा भोग जीवालाच भोगावा लागतो. संलग्नालाहि जीवा-बरोबर सुखदु:ख होतें, पण तें केवळ मानलेपणाचें. अग्नीनें व्याप्त असलेल्या लोखंडावर घणांचे घाव घातले गेले तर ताडनाचे घाव लोखंडावर बसतात, अग्नीवर नाहींत. तद्वत् संलग्न जीवाला व्यापून असला तरी सुखदु:खभोग कर्तृत्वाधिकारी व लेपाधिकारी जीवाला होतो; संलग्नाला नाहीं.

मराठी ... ठाणे.
अनु. 33४९८ दि.

देवतांच्या स्वरूपीं जसें सुख म्हणजे आनंद असतो तसा आनंद जीवस्वरूपीं नसतो. तो 'निरानंद' आहे. तथापि आपल्या ठिकाणच्या सर्वाधिकारित्वामुळें तो इतरांच्या आनंदाला पात्र होऊं शकतो. नित्यबद्ध देवतांच्या ठिकाणीं तो धर्म नाहीं. त्या इतरांचा आनंद उपभोगूं शकत नाहींत. जीव उपभोगूं शकतो. कारण देवतांप्रमाणें जीव नित्य बद्ध नाहीं, तो 'बद्ध-मुक्त' आहे. म्हणजे जीवस्वरूप अनादिकालापासून अविद्येनें 'बद्ध' असलें तरी तें त्यापासून 'मुक्त' होऊं शकतें व ईश्वराचा आनंद अनुभवूं शकतें. हा जीवस्वरूपाचा सर्वांत महत्त्वाचा विशेष होय. तथापि अविद्यायुक्त स्थितींत ईश्वराचा आनंद त्याला मिळणार कसा ? त्यासाठीं त्याची अविद्या नाहींशी झाली पाहिजे. जीवस्वरूपाची ही अनादि अविद्या एक परमेश्वरच नासूं शकतो. अर्थात् त्यासाठीं जीवानें परमेश्वराला प्रसन्न करून घेतलें पाहिजे हें ओघानें आलेंच.

## ईश्वरस्वरूप

जीवदेवताप्रपंचाप्रमाणें ईश्वर हीहि एक अनादिनित्य वस्तु असल्याचें आपण प्रारंभींच पाहिलें आहे. देवताचक्राची स्वामिनी जी माया तिचें अव्यक्त स्वरूप मानवी दृष्टीनें अगणित खरें; पण वस्तुतः तें मर्यादित आहे. कारण त्याच्या पलीकडे ब्रह्मस्वरूप आणि या ब्रह्मस्वरूपापलीकडे ईश्वरस्वरूप आहे. सर्व देवता, मायास्वरूपांतील तमोभागांत असलेले अनेक जीव आणि भैरव स्वरूपाधारें असलेला प्रपंच याला 'अवर' विभाग म्हणतात, तर मायेच्या पलीकडे असलेला तो 'पर' विभाग होय. ईश्वर आणि ब्रह्म यांचा त्यांत अंतर्भाव होतो. स्थूल मानानें ईश्वर आणि ब्रह्म मिळून एकच ईश्वरविभाग होय. पोट आणि पाठ हे जसे एकाच माणसाचे दोन भाग असतात, त्याचप्रमाणें ईश्वर आणि

ब्रज्ञ हे एकाच ईश्वराचे भाग होत. ईश्वरस्वरूप हें पोटाप्रमाणें तर ब्रह्मस्वरूप हें पाठीप्रमाणें आहे.

## ईश्वर व ब्रह्मस्वरूप याचें भिन्नत्व

तथापि सूक्ष्मदृष्टीनें विचार केला असतां ईश्वरस्वरूप व ब्रह्मस्वरूप हीं भिन्न होत. ब्रह्मस्वरूपाच्या पलीकडे त्या ब्रह्मस्वरूपाला व्यापून ईश्वरस्वरूप आहे. अर्थात् ब्रह्मस्वरूप हें मर्यादित आहे तसें ईश्वरस्वरूप नाहीं. तें यथार्थतः अनंत म्हणजे अमर्याद आहे. ईश्वरस्वरूप अव्यक्त, अनादि, नित्य, स्वयंप्रकाश, सर्वव्यापक, सर्वात्मक, सर्वातीत, केवळ, आनंदमय, ज्ञानमय, नित्यमुक्त, शुद्ध, अच्युत, अविक्रिय असून तें सर्वसाक्षी, सर्वकर्ते व निरभिमानी आहे. सर्वकर्तृत्वादि कांहीं गुण सोडले तर हें सर्व कांहीं ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं आहेच. पण ईश्वरस्वरूपाचा विशेष हा कीं, त्याच्या ठिकाणीं विरुद्धधर्मीत्व आहे. म्हणूनच तें अविक्रिय असूनहि सर्वकर्ते आहे; निर्गुण असूनहि मायासंबंधानें सगुण होतें. ब्रह्मस्वरूपाचें तसें नाहीं. तें यथार्थतः अविक्रिय, निर्गुण आणि सर्वधर्मशून्य आहे. ईश्वरस्वरूपांत असलेल्या गुणधर्मांचे दोन प्रकार कल्पितां येतील. एक स्वरूपांग गुणधर्म तर दुसरा शक्तिरूप गुणधर्म. स्वरूपांग गुणधर्म हे मूळ स्वरूपींच काय ते असतात. ते इतरांना देतां येत नाहींत. पण शक्तिस्वरूप गुणधर्म इतरांना देतां येतात व परत घेतांहि येतात. ईश्वर आणि ब्रह्मस्वरूपांत महत्वाचा फरक असा कीं, ईश्वरस्वरूपीं जसे स्वरूपांग आणि शक्तिरूप दोन्ही प्रकारचे गुणधर्म आहेत, तसे ब्रह्मस्वरूपीं नाहींत. ब्रह्मस्वरूपीं फक्त स्वरूपांग गुणधर्म आहेत. शक्तिरूप गुणधर्म नाहींत. याच अर्थानें ब्रह्मस्वरूप गुणधर्मरहित म्हटलेलें आहे. शक्तिस्वरूप गुणधर्माखेरीज ईश्वरस्वरूपी ‘ अन्यत्राचेनि प्रमाणें ’ गुणधर्म

असतात. स्थूलमानानें इतरत्र जें जें आहे तें तें सर्व ईश्वराच्या ठिकाणीं आहेच. पण प्रसंगीं त्याचा त्याला स्वीकार करावा लागतो; एवढेंच या दृष्टीनें देवतांच्या ठिकाणीं असलेले गुणधर्म ईश्वरस्वरूपीं असतातच. त्यांना ' अन्यत्राचेनि प्रमाणें ' असलेले गुणधर्म म्हणून नांव देतात.

## सृष्टिरचना कशासाठीं ?

एवंगुणविशिष्ट ईश्वरस्वरूपींचा आनंद ओसंडून वाहत असतो. तो कुणाला तरी द्यावा अशी ईश्वराची इच्छा असते. पण तो द्यावा कुणाला ? त्याचा स्वीकार करण्यास ' जीव ' च फक्त पात्र आहेत. देवता नित्यबध्द असल्यामुळें त्यांना ईश्वराचा आनंद प्रभवूं शकत नाहीं; आणि प्रपंच तर बोलून चालून जड. त्याच्याकडून आनंदाचा स्वीकारहि होऊं शकत नाहीं. अनादिकाळापासून निरानंद स्थितींत पडून असलेले अनादिअविद्यायुक्त पण बद्धमुक्त जीवांना मात्र हा आनंद घेतां येणें शक्य आहे. पण त्याला तो पात्र होण्यापूर्वी त्याची अविद्या नाहींशी झाली पाहिजे. जी फक्त परमेश्वरच नासूं शकतो. म्हणून, जेणेंकरून परमेश्वर आपल्या अविद्येचा नाश करील अशी त्याची कृपा जोडण्यासाठीं जीवानें त्याला प्रसन्न करणें अवश्य आहे. हें कर्म त्याला तमोभागांतील निराकारतेच्या व निष्क्रियतेच्या स्थितींत करतां येणें शक्य नाहीं. त्यासाठीं जीवाला साकार देहधारी बनवणें अवश्य असतें. हा देहहि सर्वावयांनीं व सर्व लक्षणांनीं युक्त असला पाहिजे. अर्थात् त्यासाठीं सर्व देवतांचीं अधिष्ठानें त्याच्या शरीरांत असणें अवश्य आहे. सर्व देवतांचीं स्वरूपें फक्त कर्मभूमींतच असल्यामुळें जीवाला युक्त देह कर्मभूमींतच मिळूं शकतो आणि असा युक्त देह मनुष्याचाच असतो. म्हणून ईश्वरानें प्रथम सृष्टि निर्माण करून जीवांना कर्म-

भूमींत युक्त मनुष्यदेह दिले. हेतु हा कीं, तेथें त्यानें ईश्वरविषयक कर्मे करून त्याची कृपा जोडावी, त्याच्याकडून आपल्या अविद्येचा नाश करून घ्यावा आणि ईश्वराचा आनंद प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावें. मनुष्य देहधारी जीवांना ईश्वराचा प्रत्यय आणून देण्यासाठीं व त्याचा उद्धार करण्यासाठीं ईश्वरालाहि कर्मभूमींत मनुष्यवेषानें अवतरणें अवश्य असतें. म्हणून ईश्वर अनंत रूपानें कर्मभूमींत अवतार घेतो. परमेश्वराचा हा अवतारहि युक्त मनुष्य देहधारी असला पाहिजे. तरच तो उद्धरणकार्य करूं शकेल.

परमेश्वरावताराचा मनुष्यदेह युक्त पाहिजे म्हणजे तो शरीरानें अव्यंग व सर्व लक्षणांसहित पाहिजे. 'युक्त' मनुष्यदेह हा जसा सर्व देवतांच्या अधिष्ठानांनीं युक्त असतो तसाच परमेश्वरानें धारण केलेला मनुष्यदेहहि असतो, असें मात्र नव्हे. देवता ह्या परमेश्वराच्या शक्ति आहेत. या सर्व शक्तींनीं म्हणजे देवतांनीं तो युक्त असला पाहिजे, हें खरें; पण या शक्तिरूप देवता त्याच्या अवताराच्या शरिरांत असत नाहींत तर त्या बाहेर ओळगण्यांच्या रूपानें असतात. प्रत्येक देवतेच्या स्वरूपांतील उरीच्या भावांतून सृष्टिरचनेच्या वेळीं प्रत्येक परमेश्वरावताराच्या सेवेसाठीं एकेक ओळगणी विभागते. अर्थात् प्रत्येक परमेश्वरावताराजवळ सर्व देवतांची एकेक ओळगणी असतेच. अशा सर्व ओळगण्यांनीं युक्त असलेला परमेश्वरावतारच जीवाचा उद्धार करूं शकतो. कार्यपरत्वें, परमेश्वराच्याच सेवेसाठीं का होईना, पण एकादी ओळगणी जेव्हां अवतारशरीरापासून दूर गेलेली असते, त्या वेळीं त्या अवताराकडून उद्धरणकार्य होऊं शकत नाहीं. या दृष्टीनें जीवोद्धारणकार्य करणारा उभयदृष्ट्या परमेश्वरावतार हा युक्त मनुष्य देहधारी असून देवतांच्या सर्व ओळगण्यांनींहि युक्त असला पाहिजे, हें

दिसून येईल. सष्टि उत्पन्न करून, जीव जीं अनेक कर्में आचरतील त्यांचीं फळें देण्यासाठीं देवताहि ब्रह्मांडस्थारूपानें विभागतात आणि प्रत्येक देहधारी जीवाचा शारीरिक व्यापार चालविण्यासाठीं पिंड-स्थांच्या रूपानें विभागून त्या शरीरांत राहतात.

## सृष्टिरचना—कार्य

हें सृष्टिरचनेचें कार्य अर्थात् 'प्रपंचा'च्या साह्यानें होतें. प्रपंच म्हणजे पंचमहाभूतें आणि तीन गुण मिळून झालेली अष्टधा प्रकृति होय. हीं भूतें आणि गुण भैरव स्वरूपाधारें अव्यक्त स्थितींत होतीं. ईश्वराला सृष्टिरचनेची इच्छा त्र्यंशस्वरूपांत म्हणजे जेथें ईश्वर, ब्रह्म व माया यांचीं स्वरूपें एकत्रित झालेलीं असतात, त्या ठिकाणीं होते. अर्थात् या त्र्यंशांत मायास्वरूप असतें. त्याला व्यापून ब्रह्मस्वरूप आणि या दोहोंनाहि व्यापून ईश्वरस्वरूप असतें. त्र्यंशांत रचनेची प्रवृत्ति होतांच ईश्वर मायेला ती जाणवतो. त्यासरशीं माया सृष्टिरचनेचें कार्य करूं लागते. तशा, तिच्या स्वामित्वाखालीं असलेल्या देवताहि रचनाकार्याला लागतात. मुख्य म्हणजे देवतांचीं अव्यक्त स्वरूपें ब्रह्मांडव्यापारासाठीं ब्रह्मांडस्थांच्या व त्यापासून पिंडस्थांच्या रूपानें विभागतात. या रचनाकार्यांत मायेचें कार्य सर्वांत महत्वाचें होय. ती प्रथम संलग्नाच्या रूपानें विभागते. एकेक संलग्न, तमोभागांतील निष्क्रिय अव्यक्त जीवस्वरूपाला जाऊन लागतो व त्याला सक्रिय करतो. नंतर माया सर्व जीवांना आपल्या तमोभागांतून काढून ब्रह्मांडांत लोटते.

## मळरचना

पण मनुष्यदेह स्वीकारून जीव ब्रह्मांडांत येण्यापूर्वीं एक अत्यंत महत्वाचें कार्य जीवाकडून होतें. तें म्हणजे मळरचनेचें. सृष्टींत आल्यानंतर जीवाकडून होणाऱ्या कर्मराहाटीच्या सर्व कर्मांची

व त्यांच्या फळांची व्यवस्था यथान्याय लावण्यासाठीं जीवस्वरूपाचें दर्शन सर्व देवतांना होणें अवश्य असतें. पण देवतास्वरूपापेक्षां जीवस्वरूप इतकें सपूर व सूक्ष्म असतें कीं, त्यांना तें दिसूं शकत नाहीं. त्यांना तसें तें दिसावें म्हणून जीवाला सर्व देवतांचे मळ लावून घ्यावे लागतात. जीवस्वरूपावर झालेली शुभाशुभ कर्मांची नोंद क्रमानें (ज्या देवतेचें कर्म असेल तिच्या) मळावर प्रतिबिंबित होतें. हेंच देवतेला होणारे जीवस्वरूपाचें दर्शन होय. मायेनें दिलेल्या सामर्थ्यानें जीव प्रापंचिक अष्ट भूतांपासून क्रमाक्रमानें सर्व देवतांचे मळ तयार करतो व ते स्वतःला लावून घेतो. या मळरचनेच्या वेळींच अष्ट भूतांपासून परमाणु तयार होतात व त्यांच्या संघातानें जड सृष्टि, पार्थिव शरीरें वगैरे बनतात. दिव्य प्रपंचाच्या मूर्तींत देवता ब्रह्मांडस्थारूपानें अवतरतात, तर पार्थिव शरीरांत व्यापून जीव मनुष्यदेहधारी बनतो. पुढें ईश्वरकृपा जोडतां यावी म्हणून कर्मभूमींत देहधारी होण्यासाठीं जीव देवतामळ तयार करतो खरे. पण हे मळ बंधनासारखेच असतात. आपलीं हीं मळादि कर्में नाहींशीं केल्यावांचून त्याला ईश्वरकृपा जोडता येणें शक्य नसतें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## परमेश्वरावतार : त्याचे प्रकार

जीवाबरोबर, त्याला चहुपदार्थांचें यथार्थ ज्ञान करून देऊन उद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठीं ईश्वरहि मनुष्यदेह धारण करून अवतरतो. तो फक्त तीन रीतींनीं अवतार घेतो. (१) गर्भः इतर जीवांप्रमाणें मातापित्यांच्या शुक्रशोणिताचा स्वीकार करून मातेच्या उदरांत जन्म घेणें (२) **पातित** : मृत शरीरांत प्रवेश करून; अथवा (३) **दवडणें** : एखाद्या मातेच्या उदरांत असलेल्या जीवाला तेथून घालवून लावून आपण त्याचें शरीर स्वीकारणें. त्यानें कोण-

त्याहि रीतीनें अवतार घेतला तरी त्याच्या अवताराचें संपूर्ण शरीर हें मायेनें व्याप्त असतें. म्हणून त्या शरीराला 'मायापुर' म्हणतात. अशा मायापुरधारी परमेश्वरावताराचे प्रमुख प्रकार तीन आहेत. (१) अवर दृश्यावतार (२) पर दृश्यावतार आणि (३) उभयदृश्यावतार. अवर दृश्यावतारानें फक्त अवरशक्ति स्वीकारलेली असते. परदृश्यानें फक्त परशक्ति स्वीकारलेली असते. उभय-दृश्याच्या ठिकाणीं मात्र पर आणि अवर या दोन्ही शक्तींचा स्वीकार असतो. असा मुक्त मनुष्यदेही उभयदृश्यावतारच जीवो-द्धरणाचें खरें कार्य करूं शकतो.

## आरंभींच्या तीन सृष्टि

मूळ सृष्टीची रचना करून सर्व जीवांना कर्मभूमींत युक्त मनुष्य-देह दिल्यानंतर परमेश्वरावतारांचें मुख्य कार्य त्यांना ज्ञानदान करण्याचें होतें. त्याप्रमाणें अनेक परमेश्वरावतारांनीं सर्व जीवांना चहूं पदार्थांचें ज्ञान त्यांच्या ठिकाणीं असलेल्या सर्वाधिकारित्वाच्या आधारें करून दिलें. देवता, प्रपंच, परमेश्वर व जीव यांच्या स्वरू-पांची जीवांना ओळख करून देऊन त्यांच्या मुक्तीचा मार्ग त्यांनीं त्यांना उपदेशिला. पण परमेश्वरावतारानें ईश्वरप्रतीति आणून दिलेली असूनहि ती त्यांना राखून ठेवितां आली नाहीं. कांहीं काळा-नंतर ते देवतांना किंवा सामान्य जीवांनाच ईश्वर समजूं लागले. ते कर्मोल्लेख करण्यांत स्वतंत्र असल्यामुळें निरनिराळ्या कर्मांचे उल्लेख करूं लागले. अशा स्थितींत, सर्व जीवांना ज्ञानाचें दान झाल्या-नंतर परमेश्वरानें सृष्टीचा संहार केला व लागलीच दुसऱ्यांदा सृष्टिरचना केली. हेतु हा कीं, पूर्व सृष्टींत जीवाच्या ठिकाणीं झालेले संस्कार अधिक दृढ होऊन त्यांना वाचिक स्वरूप यावें. या दुसऱ्या सृष्टींत परमेश्वरावतारानीं पुन्हा सर्व जीवांना ज्ञान

देऊन ईश्वरप्रतीति आणून दिली. पण पूर्वसंस्कारामुळें ती कित्येकांना झाली तर अनेकांना झाली नाहीं. त्यानीं आपल्या पूर्वसृष्टींत केलेल्या जीवदेवताविषयक कर्मांचे उल्लेख वाचिक केले. तेच त्यांचे संस्कार अधिक दृढ झाले. या दुसऱ्या सृष्टींत सर्वांना ज्ञान देऊन झाल्यावर परमेश्वरानें पुन्हा सृष्टिसंहार केला व लागलीच तिसरी सृष्टि रचली. यांतहि ज्ञानदानाचें कार्य पूर्वीप्रमाणेंच झालें. पूर्वसृष्टींत जीवांनीं, जीवेदवता व ईश्वरविषयक कर्मांचे जे उल्लेख केले होते, ते या सृष्टींत कायिक होतात. म्हणजे त्यांचीं तीं कर्में पूर्ण होतात. प्रत्येक कर्म प्रारंभीं मानसिक; मग वाचिक आणि तदनंतर कायिक होऊन पूर्ण होतें. तदनुसार परमेश्वर ज्ञानानंतर जीवांनीं पहिल्या सृष्टींत अनेक संतासंत कर्मांचे नुसते उल्लेख केले; दुसऱ्या सृष्टींत ते उल्लेख वाचिक होऊन तिसऱ्या सृष्टींत कायिक झाले. म्हणजे कर्में पूर्ण होऊन त्यांचे लेप जीवस्वरूपीं लागले. यानंतर सृष्टिसंहार केला व लागलीच चौथी सृष्टि रचली. या चौथ्या सृष्टींत मात्र जीवांना त्यांच्या संतासंत कर्मलेपानें परमेश्वरानें स्वर्ग, नरक, मोक्ष आणि कर्मभूमि या चतुर्विध कर्मफळांत घातलें. स्वर्ग व मोक्षफळें म्हणजे देवताफळें; नरकफळें म्हणजे मनुष्ययोनीखालील सर्व योनि, आणि कर्मभूमि म्हणजे मनुष्यदेह. या कर्मफळांत घातल्यानंतर प्रावाहिक सृष्टि सुप्त झाली. जीवांची कर्ममालिका व तदनुसार फळदातृत्व यांना सुरवात झाली. ज्यांच्या ठिकाणीं ईश्वराविषयक ज्ञानाचा संस्कार टिकून राहिला होता व तदनुसार ज्यांनीं कर्में केलीं होतीं ते दैवराहाटीचे बनून ईश्वरोपासनेला लागले आणि तदितर मनुष्यप्राणी कर्मराहाटीच्या देवताफलदायक क्रिया आचरण करायला लागून देवतामार्गाचे उपासक बनले.

## देवतांचा बहिर्योग ऊर्फ युगधर्म

देवताफलप्राप्तीचे मुख्य मार्ग दोन आहेत. एकाला बहिर्योग म्हणतात, तर दुसऱ्याला अंतर्योग म्हणून संबोधतात. बहिर्योग म्हणजे युगधर्म होय, तर अंतर्योग म्हणजे विद्यामार्ग होय. परमेश्वरानें युगपरत्वें आचरायला सांगितलेला धर्म युगधर्मांत अंतर्भूत होतो, तर परमेश्वरावतार, देवतेची ब्रह्मांडस्था, ज्ञानविग्रह, विद्यावंत इत्यादिपासून एखाद्या देवतेची विद्या कर्मलेपानुसार प्राप्त होणें व त्याद्वारा देवताफळ मिळणें हा विद्यामार्ग होय. बहिर्योग ऊर्फ युगधर्म प्रामुख्यानें आचरणपर आहे. कारण त्यांत कांहीं आचार प्रत्यक्ष आचरावे लागतात. उदा: आत्मोपास्ति हा कृतयुगींचा, भक्ति हा त्रेतायुगींचा, यज्ञयाग हा द्वापरयुगींचा तर तीर्थक्षेत्रव्रतदान हा कलियुगींचा धर्म आहे. त्या त्या युगांत तोच विशिष्ट युगधर्म आचरला पाहिजे, तरच त्याचीं ठराविक फळें मिळूं शकतात. भिन्न युगींचा धर्म आचरल्यानें फार तर त्या भिन्न युगांत मनुष्यदेह मिळून तेथें तो युगधर्म सहज रीतीनें आचरला जातो. कृतयुगाची अधिष्ठात्री देवता माया होय. अर्थात् आत्मोपास्ति हा मायेचा बहिर्योग आहे. त्याच्या आचरणानें मायेचें फळ मिळतें. त्रेतायुगावर सत्यकैलासवैकुंठांतील ब्रह्मा, विष्णु व महादेव यांचें अधिष्ठान असून भक्ति या युगधर्माचरणानें त्यांचीं फळें मिळतात. याच युगांत 'आगम' आचरले तर उत्तम, मध्यम व कनिष्ठ आचरणभेदानें विश्व, अष्टभैरव व शेषशय्या यांचीं फळें प्राप्त घेतात. स्वर्गांतील इंद्रचंद्रादि सर्व देवता द्वापरयुगाधिष्ठात्री असून त्यांचीं फळें यज्ञयागांच्या क्रियांनीं प्राप्त होतात, तर कलियुगाधिष्ठात्री देवता म्हणजे अंतराळ, अष्टौदेवयोनि व कर्मभूमि या स्थानांतील असून तीर्थक्षेत्रव्रतदानांच्या आचरणानें यांचीं फळें मिळतात. हे सर्व युगधर्म

आचरणपर आहेत. फक्त मायेचा आत्मोपास्तिरूप धर्म मात्र आचरणपर नाहीं. देवतांच्या विद्यांप्रमाणें तो संचारी असून त्याचें प्रत्यक्ष असें कोणतेंच आचरण करावें लागत नाहीं. युगधर्माचें आचरण इतर कुणीहि त्या धर्माचा उपदेश केला कीं होऊं शकतें. त्यासाठीं पूर्वजन्मीं किंवा पूर्वसृष्टींत कांहीं विशिष्ट क्रिया घडलेल्या असल्या पाहिजेत असें नाहीं.

## देवतांचा विद्यामार्ग ऊर्फ अंतर्याग

विद्यामार्गाचें मात्र तसें नाहीं. पूर्वसृष्टींत ब्रह्मांडस्था, ज्ञानविग्रह किंवा विद्यावंत यांच्या ठिकाणीं भोजन घातलें गेलें असेल तर त्या देवतेच्या विद्येचा लेप जीवस्वरूपीं लागतो. तो लेप भोगार्ह होतांच तो पाहून एखादा ज्ञानविग्रह किंवा विद्यावंत त्या विद्याधिकारी पुरुषाला ती विद्या दृष्टिद्वारा संचरतो. विद्यासंचार झाल्यानंतर त्या विद्यावंताला देवताफळ मिळविण्यासाठीं विशेष कांहीं करावें लागत नाहीं. जें होतें तें सर्व त्याच्या ठिकाणीं संचरलेल्या विद्येच्या सामर्थ्यानेंच होतें. विद्येचें मुख्य कार्य असें:— जीवाच्या ठिकाणीं एखाद्या देवतेची विद्या संचरली गेली कीं, त्या विद्या-वंताच्या शरीरांत असलेली त्या देवतेची पिंडस्था त्याला प्रकाशित होते, म्हणजे दिसूं लागते. त्या देवतेच्या ब्रह्मांडस्थेची जी आकृति असेल तशीच आकृति त्या पिंडस्थेच्या ठिकाणीं त्याला भासमान होते. या पिंडस्थेला तो विद्यावंत आपला ईश्वर मानतो व तिचीच मानसिक उपासना करतो. त्याला त्या पिंडस्थेचा वेध लागतो. हा वेध त्याच्या ठिकाणीं त्याच्या मृत्यूपर्यंत असतो. त्या पिंडस्थेच्या वेधानें शेवटीं त्याला त्या देवतेच्या ब्रह्मांडस्थाची म्हणजे तिच्या फळाची प्राप्ति होते. मृत्युसमयीं विद्या पूर्ण झाल्यावर देवता-फळाचा जीवस्वरूपी नुसता लेप लागतो. पुढें परवडीप्रमाणें तो जेव्हां

भोगार्ह होतो, तेव्हां त्याला त्या देवतेचें फळ उपभोगायला सांपडतें. बहिर्योगानें व विद्येनें दोहोंनींहि देवताफळच मिळतें. पण त्यांत फरक असा कीं, बहिर्योगानें मिळालेल्या फळापेक्षां विद्येनें मिळालेलें फ़ळ दहापट श्रेष्ठ असतें. अर्थात् तें दहापट अधिक काळ भोगायला सांपडतें.

## देवतांचीं फळें

देवतेचें फळ मिळतें म्हणजे काय होतें ? त्याची थोडक्यांत कल्पना अशी:—देवताफळाचा लेप जेव्हां भोगार्ह होतो, तेव्हां त्या देवतेच्या ब्रह्मांडस्थ मूर्तींत जीवस्वरूप व्यापतें व तेथें त्याला देवता सुख भोगवतात. उदा: शंभर यज्ञ करून जीवानें इंद्रदेवतेचें फळ मिळवलेलें आहे. हें फळ भोगण्याची पाळी जेव्हां येईल तेव्हां इंद्रदेवतेच्या ब्रह्मांडस्थ मूर्तींत तो जीव व्यापून राहील. त्यामुळें आपणच इंद्र आहोंत असें त्याला वाटतें. ती ब्रह्मांडस्थ मूर्ति जे निरनिराळे व्यापार करते ते जणुं आपणच करीत आहोंत असें त्या जीवाला वाटतें, हाच त्याच्या इंद्रफळाचा उपभोग. प्रत्येक देवतेची एकेकच ब्रह्मांडस्था असल्यामुळें ती एका वेळीं एकाच जीवाला आपल्या ठिकाणीं व्याप्त करून फलोपभोग देऊं शकते, हें लक्ष्यांत ठेवावें. यामुळें देवताफळ भोगण्यामध्यें किती अडचणी येतात तें पाहण्यासारखें आहे. पहिली गोष्ट अशी: मनुष्यदेहांत जीव ज्या क्रमानें कर्में करतो त्याच क्रमानें त्याला त्याचीं फळें मिळतात. अनंत जन्मांतील अशा अनंत कर्मांचे लेप त्याच्या स्वरूपीं असतात. जीवानें देवताफळ मिळवून ठेवलेलें असलें तरी त्याचा तावडतोब भोग मिळत नाहीं. मागील सर्व कर्मांचे भोग भोगून पार पडले म्हणजे या देवताफळाचा भोग उपस्थित होतो. म्हणजेच त्या फळाचा लेप भोगार्ह होतो. पण समजा, त्या वेळीं त्या देवतेच्या

देवतेच्या फळांत दुसरा एखादा जीव फळ भोगीत असला तर ? या नवीन जीवाला त्याचा उपभोग त्या वेळीं मिळणें शक्य नसतें. म्हणून तो तेथून टिचतो व पुढील कर्माचा भोग भोगूं लागतो. पुढें जेव्हां त्या देवतेचें फळ रिकामें होईल तेव्हां हा दुसऱ्याच कर्माचें फळ भोगत असतो. तें जर उच्च देवतेचें फळ असेल तर तेथून त्याला काढतांहि येत नाहीं. म्हणून दुसऱ्यांदा त्याचें फळ टिचतें, पण भोगत असलेलें फळ खालील देवतेचें असेल तर ती वरील देवता त्या जीवाला त्या खालील देवतेच्या फळांतून काढून आपल्या फळांत नेते. पण असें केल्यानें त्याचा तो खालील देवतेच्या फळाचा उपभोग अपुराच राहतो. सारांश काय कीं, देवतांचीं फळें पूर्णपणें भोगण्याची वेळ येणें इतकें सुलभ नसतें. पण याहून महत्त्वाची गोष्ट अशी कीं, ज्या देवतेचें फळ त्याला मिळतें, ती देवता आपल्या ठिकाणचा सगळा आनंद त्याला भोगवीत नाहीं, तर पान्हा चोरणाऱ्या गाईप्रमाणें वंचकत्वानें फलोपभोग देते. इतकेंहि करून शेवटीं पुण्य संपलें म्हणजे त्या देवताफळांतून जीव खालीं ढकलला जातो. अर्थात् देवतांचीं फळें हीं क्षणिक होत. तीं शाश्वत नाहींत. त्यांच्या ठिकाणचा आनंद हाहि पूर्णानंद नाहीं. म्हणून या क्षणिक आनंद देणाऱ्या अशाश्वत देवताफळांच्या मागें लागण्यापेक्षां अक्षय आनंद देणारें ईश्वरपद प्राप्त करून घेणें हेंच श्रेयस्कर होय. याच कारणामुळें महानुभाव देवतांचीं उपासना करीत नाहींत.

## ईश्वरप्राप्तीचे उपाय : ज्ञान व प्रेम ऊर्फ भक्ति

आनंदमय ईश्वराचा आनंद हा देवतांच्या ठिकाणीं असलेल्या आनंदापेक्षां अनंत पटींनीं श्रेष्ठ असतो. तो मिळवणें हेंच जीवाचें खरेंखरें साध्य होय. ईश्वरानें सृष्टिरचना करून जीवाला साकार बनवलें, तेंहि आपल्या आनंदाचा त्याला उपभोग देण्याच्या सदि-

च्छेनेंच. पण अज्ञानी जीव अन्यथा ज्ञानानें देवतांनाच ईश्वर मानून त्यांच्या भजनीं लागतो. त्यानें खऱ्या ईश्वराचा आनंद प्राप्त करून घेण्याच्या मार्गाला लागावें म्हणून परमेश्वर स्वत: मनुष्यरूपानें अवतरून त्याला यथार्थ ज्ञानाचा व सन्मार्गाचा उपदेश करीत असतो. ईश्वराचा आनंद प्राप्त होऊन उपभोगतां यावा म्हणून जीवस्वरूपींची अनादि अविद्या नष्ट झाली पाहिजे. त्यासाठीं जीवांनीं ईश्वरोपासना करून त्याची कृपा जोडली पाहिजे. ती जोडण्याचे म्हणजे ईश्वरपदप्राप्तीचे मुख्य मार्ग दोन आहेत. एक ज्ञानमार्ग, दुसरा भक्तिमार्ग. परमेश्वराचा ज्ञानमार्ग हा देवतांच्या बहियोगाप्रमाणें आचरणरूप आहे. तर त्याचा भक्तिमार्ग हा देवतांच्या विद्यामार्गाप्रमाणें साध्यसाधनी सुखरूप आहे. ज्ञानमार्गानें शेवटीं जीव ब्रह्मस्वरूपांत पावन होतो, तर भक्तिमार्गानें तो ईश्वरस्वरूपांत पावन होतो. तेव्हां अर्थात् ज्ञानमार्गापेक्षां भक्तिमार्ग श्रेष्ठ ठरतो. जीवदेवतांच्या ठिकाणीं निर्हेतुक भोजन घातल्यानें परमेश्वराच्या ज्ञानाचा अधिकार जोडला जातो, तर प्रत्यक्ष परमेश्वरावतारांच्या ठिकाणीं भोजन घातल्यानें त्याच्या प्रेमाचा म्हणजे भक्तीचा अधिकार प्राप्त होतो.

## ज्ञानमार्गाचें स्वरूप

ज्ञानाचा अधिकार ज्यानें जोडला असेल त्याला परमेश्वरावतार आपल्या मुखानें अथवा एखाद्या अधिकरणाला निमित्त करून त्याच्या मुखानें ज्ञान देतो. हें ज्ञान देतांना त्याचीं अक्षरें परावाणींत घोळलेलीं असतात. अधिकरणाच्या मुखानें जेव्हां ज्ञान देतात, तेव्हांहि त्या अधिकरणाचीं अक्षरें परावाणींत घोळून निघतात. अर्थात् परमेश्वरच त्यांत परावाणीचा निक्षेप करीत असतो. या ज्ञानदानाच्या वेळीं परमेश्वरावतार जीवाच्या ठिकाणीं बोध-

शक्तीचा संचार करून परमेश्वरावर जीवाला प्रतीति आणून देतात व शाब्दिक ज्ञान निरूपण करतात. म्हणजे जीवदेवता प्रपंच-परमेश्वराचें वास्तविक स्वरूप त्याला सांगतात. प्रपंच जड आहे, देवता नित्यबद्ध आहेत, जीव बद्धमुक्त आहे आणि या सर्वांहून वेगळा असलेला परमेश्वर तोच काय तो नित्यमुक्त आहे. अनादि अविद्येनें बद्ध झालेल्या पण सर्वाधिकारित्वामुळें उद्धरणाला पात्र असलेल्या जीवानें जड प्रपंचाच्या व च्युतिमंत फळें देणाऱ्या जीव देवतांच्या नादीं न लागतां चैतन्यपर परमेश्वराच्या ज्ञानाचे व प्रेमाचे उपाय जोडून ब्रह्मानुभूति मिळवावी. यासाठीं परमेश्वराचें दास्य घडलें पाहिजे. तें घडावें म्हणून जीवेश्वरांमधील भेदाची प्रतीति अधिकारियाला प्रथम आली पाहिजे. हा ईश्वर आणि त्याहून वेगळा मी जीव त्याचा सेवक आहे, हें ज्ञानाधिकारी जीवाला पट-वून देणें व त्याची प्रतीति आणून देणें हे बोधाचें कार्य होय. ही प्रतीति आली म्हणजे तो शाब्दज्ञानी बनलाच.

पण शाब्दज्ञानी झाला म्हणजे तो ज्ञानी मोक्षाच्या मार्गाला लागला असें म्हणतां येत नाहीं. त्यासाठीं त्यानें सर्वसंगपरित्याग करून परमेश्वराला अनुसरलें पाहिजे, संन्यास घेतला पाहिजे. जीवदेवता प्रपंचाच्या नादीं न लागतां नित्यमुक्त परमेश्वराच्या दास्यानेंच आपली अनादि अविद्या नष्ट होऊन आपल्याला परमे-श्वराचें अच्युत पद आणि तेथील शाश्वत निरातिशय सुख प्राप्त होऊं शकेल. हें कळलें असूनहि जो धनपुत्रदारा यांचा त्याग कर-णार नाहीं तो मोक्षमार्गाला लागला असें कसें म्हणतां येईल? संपत्तीचा मोह म्हणजे जड प्रपंचाची सेवा होय आणि स्त्रीपुत्रांची ममता म्हणजे जीवांची भक्ति होय. यानें मुक्ति मिळणार नाहीं. त्यासाठीं त्या बोधवंतानें सर्वसंगपरित्याग करून परमेश्वराला अनु-

सरणें व त्याच्या आज्ञेप्रमाणें विधिनिषेधांचें परिपालन करून निरंतर ईश्वरस्मरण करणें हाच खरा मार्ग होय. हें अनुसरणदेखील वयाच्या ५६ व्या वर्षापूर्वी झालें पाहिजे. नाहींतर तो बोधवंत ननुसरत प्रमादी बनतो. सर्व प्रापंचिक कर्म करून थकल्यावर म्हातारपणीं संन्यास घेणें म्हणजे ईश्वराची फसवणूक आहे. विषयसेवनाला जो काळ अनुकूल तोच काळ ईश्वरोपासनेला अनुकूल होय. म्हणून विशिष्ट वयोमर्यादा ओलांडण्यापूर्वी संसार सोडून संन्यास घेणें व अनुसरणें अवश्य होय. बोधवंतानें तसें केलें म्हणजे तो खराखुरा मोक्षमार्गीचा अनुयायी बनला. त्यालाच शाब्दज्ञानी यथार्थतः म्हणायचें.

## आचारधर्माचा मुद्रितार्थ

या अनुसरणानंतर त्या साधकानें परमेश्वराच्या सान्निध्यांत राहून त्याचें सेवादास्य केलें पाहिजे. असा परमेश्वरावतार विद्यमान नसला तर असन्निधानीचा कडक आचारधर्म पाळला पाहिजे. या आचारधर्माला महानुभाव 'असती परी' ( म्हणजे असण्याची, राहण्याची रीत ) म्हणतात. या आचारधर्माचें उर्फ असती परीचें सार एवढेंच कीं, अनुसरलेल्या ज्ञानियानें विकार व विकल्प सोडून देऊन, आपल्या आहारावर नियंत्रण घालून, एका परमेश्वराखेरीज इतर कुणाच्यावरहि अवलंबून न राहतां परमेश्वराचें निरंतर स्मरण करीत आपला जन्म क्षेपला पाहिजे. विकारशून्यतेसाठीं, ज्या ज्या जडचेतन पदार्थांच्या संबंधानें आपल्या मनांत चलबिचल निर्माण होणें शक्य आहे त्या सर्व पदार्थांचा त्यानें त्याग केला पाहिजे. विकल्प म्हणजे विपरीत कल्पना. एखादा पदार्थ चांगला किंवा वाईट म्हणणें हा विकल्प होय. तसेंच पदार्थाच्या वास्तव स्वरूपाशीं विपरीत अशी कल्पना करणें हाहि विकल्पच होय. उदा:—

जीवदेवतांना ईश्वर समजणें हे दोन्ही प्रकारचे विकल्प ज्ञानियानें आपल्या मनांत निर्माण होऊं देतां कामा नयेत. विशेषत: ईश्वराखेरीज इतर जीवदेवतांवर त्यानें ईश्वरत्व बुद्धि येऊं देणें हें महापाप होय. तसें त्यानें केलें म्हणजे तो विकल्पप्रमादी होऊन कायमचा भ्रष्ट झालाच म्हणून समजावें. इतरांवर ईश्वरबुद्धि येण्याचें टाळावें म्हणून इतरांचा आश्रय त्यानें पूर्णपणें तोडावा. फक्त ईश्वरावर अवलंबून रहावें. त्याचेंच निरंतर स्मरण करावें. तें करतां यावें म्हणून नेहमीं विजनांत वास करावा; म्हणजे जनसंपर्कापासून त्रास होणार नाहीं. केवळ शरीरयात्रा चालविण्यासाठीं परिमित भोजन करावें. तेंहि सर्व वर्णांत भिक्षा मागून मिळवावें. तेवढ्यापुरतें त्यानें गांवांत जावें. एरवीं अरण्यांतच रहावें. भिक्षा एकाच गांवीं नेहमीं मागितली तर विकार आणि आलंबनाचे दोष उद्भवण्याचा संभव असतो. म्हणून साधकानें सदा भ्रमण—अटण करीत असावें. अशा कडक आचारानें वागून सदैव ईश्वरस्मरण केलें म्हणजे तो अपरोक्ष ज्ञानाला पात्र होतो. ही पात्रता त्याला एकाच जन्मांत लाभते असें नाहीं.

## ज्ञानाचे चार प्रकार

ज्ञानाचे एकूण चार प्रकार आहेत. शाब्दज्ञान, अपरोक्षज्ञान, सामान्य ज्ञान आणि विशेषज्ञान. शाब्द ज्ञानानंतर अनुसरण करून त्यानें आचारधर्म पाळला म्हणजे त्याला परमेश्वर अपरोक्ष ज्ञान देतात. या ज्ञानामुळें त्या साधकाला जीवदेवता, प्रपंच व परमेश्वर या चारहि पदार्थांचीं स्वरूपें प्रत्यक्ष दिसूं लागतात. पूर्वी त्यांचें त्याला फक्त शाब्दिक ज्ञान होतें. आतां तीं तो डोळ्यांनीं पाहूं शकतो. आपल्या स्वत:चें स्वरूप त्याला दिसतें. त्यावर असलेले कर्मलेप व मळ तो पाहतो. यांतून सुटून शुद्ध होण्याची आणि लौकर

ईश्वराकडे जाण्याची तळमळ त्याला सुटते. या अपरोक्ष ज्ञानांत साधक आपलीं अनुपभुक्त पूर्व कर्में बहुरूपतेनें व बहुकामनेनें क्षाळतो. त्यानंतर त्याला परमेश्वर सामान्य ज्ञान देतात. या ज्ञानांत चहूं पदार्थांचें स्वरूप त्याला अधिक स्पष्ट दिसूं लागतें. या सामान्य ज्ञानांत त्याचीं सर्व पूर्व कर्में पूर्णपणें नासतात. सृष्टिरचनेच्या वेळीं जे देवतामळ त्यानें लावून घेतले होते, तेहि तो परमेश्वरप्रवृत्तीनें नासतो. अशा रीतीनें तो मळकर्मापासून सुटला म्हणजे परमेश्वर त्याला विशेष ज्ञान देतात. यांत त्याचे राहिलेले अयोग्यतेचे दोष नासावयाचे असतात. म्हणून परमेश्वर त्याचा अव्हेर करतात. त्यामुळें त्याची ईश्वरप्राप्तीची तळमळ अधिकाधिक वाढते. त्या तळमळीच्या आगींत ते दोष जळाले म्हणजे परमेश्वर त्याच्या जीवस्वरूपींचें अज्ञान वगैरे नष्ट करून आपल्या कृपारूप शस्त्रानें त्याची अविद्या छेदतात. पूर्वीं अविद्येनें युक्त असलेलें जीवस्वरूप नुसतें ' केवळ ' होतें; आतां अविद्येपासून मोकळें होतांच तें ' कैवल्य ' रूप बनतें. १०० ब्रह्मांडांएवढें असलेलें जीवस्वरूप अविद्येमुळें किंचित् संकोचलेलें होतें. मळादिकांच्या बंधनांनीं तर तें ५०० योजन मर्यादेइतकें संकोचलें होतें. अविद्यानाशानंतर तें आपलें पूर्ण रूप धारण करतें. अविद्यायुक्त असेपर्यंत जीवस्वरूप मायेच्या आधारानें असतें. पण अविद्यानाशानंतर तें मायास्वरूपाधारें न राहतां ब्रह्मस्वरूपाधारें राहतें. हीच जीवाची मायापारंगतता होय. अशा रीतीनें अविद्येचा नाश होऊन जीव मायापारंगत झाल्यावर तो ब्रह्मस्वरूपाधार राहतो. म्हणजे त्याला ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति होते. पण अजून तेथील आनंद तो उपभोगूं शकत नाहीं, कारण त्याच्या ठिकाणीं अजून साध्याचा अज्ञानबंध शिल्लक असतो. ईश्वर तें अज्ञान नासतो; त्याला अनुभव-ज्ञान देतो, म्हणजे ब्रह्मानंद भोग-

ण्याचें रसनारूप द्वार जीवस्वरूपी करतो. असें झालें म्हणजे त्याला ब्रह्मानंद भोगतां येतो. हेंच त्याचें ब्रह्मस्वरूपांत मिसळणें होय. हाच त्याचा मोक्ष होय. मोक्षपद हें अच्युत असल्यामुळें तेथें तो मुक्त जीव शाश्वत काळापर्यंत ब्रह्मानंद भोगीत असतो. अर्थात् या वेळीं ब्रह्म-स्वरूप आणि जीवस्वरूप आपल्या व्यक्तित्वानें स्वतंत्र व निराळीं असतात, हें सांगायला नको. म्हणजे द्वैत कायम राहून जीव ब्रह्माचा आनंद उपभोगीत असतो. किंबहुना या द्वैतामुळेंच तो तो आनंद उत्तम रीतीनें भोगूं शकतो. ब्रह्माच्या अव्यक्तस्वरूपांत ज्ञान मार्गानें प्राप्तीस पोचलेले अनेक जीव एकाच वेळीं आनंद उपभोगूं शकतात.

मोक्षाच्या ज्ञानमार्गाची स्थिति वरीलप्रमाणें होय. मोक्षाचा दुसरा मार्ग प्रेमाचा ऊर्फ भक्तीचा होय. ज्यानें प्रेमाधिकार जोडला असेल त्याला परमेश्वर प्रेम देतात. विद्या देतांना जीवाच्या ठिकाणीं देवता ज्याप्रमाणें आपल्या विद्येचा संचार करतात तद्वतच प्रेमाधि-कारी जीवाच्या स्वरूपीं परमेश्वर आपल्या ‘ प्रेम ’ नामक शक्तीचा संचार करतात. हा संचार होताक्षणींच साधक सर्वसंगपरित्याग करून परमेश्वराला यथार्थतः अनुसरतो. या प्रेमी भक्ताचा विशेष हा कीं, त्याचा व परमेश्वरावताराचा वियोग कधीं होतच नाहीं. वियोगांत भक्त जिवंतच राहत नाहीं. त्याला परमेश्वराचें निरंतर सान्निध्य लाभतें. एकाद्या कामानिमित्त क्षणकाल दूर जाण्यानेंहि तो तळमळतो. दुसरें असें कीं, विद्यासंचारानंतर देवतेच्या विद्या-वंताला जसा विशिष्ट आचार करावा लागतोच असें नाहीं. तसेंच प्रेमसंचारानंतर भक्ताला ज्ञानियाप्रमाणें ‘असती परी’ आचरावी लागत नाहीं. परमेश्वराचें निरंतर सन्निधान लाभल्यामुळें त्याला सदा ईश्वरदास्य घडत असतें आणि त्यामुळें त्याचा सगळा आचार चरित होतो किंबहुना त्याला ईश्वरस्वरूपांत पोचवीपर्यंत त्याची

सर्व काळजी परमेश्वरच वाहतात.

पण याचा अर्थ, ज्ञानियाप्रमाणें भक्ताच्या पूर्वसंचित मळ-कर्मांचा नाश त्याला करावा लागत नाहीं, असा नाहीं. चारी ज्ञानांत ज्ञानियाच्या ज्या ज्या क्रिया होतात, त्या त्या भक्ताच्याहि बाबतींत होतात. फरक इतकाच कीं, ज्ञानियाप्रमाणें त्याला त्या प्रत्यक्ष कराव्या लागत नाहींत. तर त्याच्या ठिकाणीं असलेल्या प्रेमशक्तीच्या द्वारा त्या आपोआप सिद्ध होत जातात. उदा०— ज्ञानियाचें शाब्दज्ञान एका जन्मांत पूर्ण झालें नाहीं तर परमेश्वर त्याला पुन:संबंधाचा देह देतात. म्हणजे पुनर्जन्मांत त्याला सुखी व श्रीमंत मातापितरांच्या पोटीं जन्माला घालून तेथें बारा वर्षां-नंतर त्याला भेट देतात. ज्ञानियाप्रमाणें कांहीं भक्तांनाहि पुन:-संबंधाचा देह मिळतो. याचा अर्थ त्यांचें शाब्दज्ञान पूर्व देहांत परिपूर्ण झालेलें नसतें. हा पुन:संबंधाचा देह देतांना खास पर-मेश्वरावतार जुळ्या भावाच्या रूपानें त्या भक्ताबरोबर जन्म घेतो. हेतु हा कीं, मातेच्या गर्भांत असतांना देखील भक्ताला परमेश्वराचा वियोग होतां कामा नये. अशा रीतीनें प्रेमशक्तीच्या द्वारा परमेश्वर भक्तांचीं चारहि ज्ञानें परिपूर्ण करून घेतात. म्हणजे त्याच्या मळ-कर्मांचा नाश करून शेवटीं त्याचा अविद्याछेद करून त्याला मायापारंगत करतात व ईश्वरस्वरूपांत लीन करतात. तेथें ईश्वर त्याच्या अनुभव-ज्ञानाचा नाश करून म्हणजे त्याला साध्यानंद जेणेंकरून भोगतां येईल असें अनुभवज्ञान उर्फ रति म्हणजे रमण करतें द्वार देतो. रसना इंद्रियामुळें ज्याप्रमाणें आपण पदार्थ सेवन करूं शकतों, त्याप्रमाणें रतीमुळें भक्त ईश्वरानुभूति अनुभवूं शकतो. ही रति दिल्यावर मग परमेश्वर भक्ताला आपली अनुभूति देतो. म्हणजे ईश्वर जो सुखानंद स्वत: उपभोगतो, तोच भक्ताला

अवंचकत्वानें देतो. हा आनंद म्हणजे एखादा निराळा पदार्थ असून परमेश्वर त्याचा उपभोग घेतो असें नाहीं. त्याचें स्वरूपच आनंद-मय आहे. त्यांत ईश्वर स्वतः रममाण झालेला असतो. साध्य-प्राप्तीनंतर तो भक्तालाही तेंच स्वरूप देतो, त्यांत त्याला पावन करतो. ईश्वरपद अच्युत असल्यामुळें त्यांत पावन झालेल्या भक्ताला तेथें शाश्वत काळपर्यंत सदैव आनंद उपभोगायला मिळतो. मुंगी ज्याप्रमाणें आपली वेगळीक कायम ठेवून साखरेची गोडी सेवन करते, त्याप्रमाणें भक्तहि आपला निराळे-पणा राखून ईश्वरस्वरूपाचा आनंद उपभोगीत असतो. भक्त ईश्वराच्या अव्यक्त स्वरूपांत पावन होत असल्यामुळें प्राप्तीला पोंचलेले असे अनेक जीव एकाच वेळीं त्या स्वरूपांत पावन होऊन आनंद उपभोगीत राहूं शकतात. अशा रीतीनें ज्याच्या त्याच्या अधिकारानुसार व क्रियाकर्मानुसार परमेश्वर जीवांचा उद्धार करीत असतात. म्हणजे ज्ञानियाला त्याच्या अधिकाराप्रमाणें ब्रह्म-स्वरूप तर भक्ताला त्याच्या अधिकाराप्रमाणें ईश्वरस्वरूप प्राप्त करून देऊन त्याचा उद्धार करतात. जीवाचें मतित्रय जर ऊर्ध्व झालें तर परमेश्वराच्या ज्ञानप्रेमानें यथाधिकार त्याचा उद्धार होऊन तो अच्युत पद प्राप्त करून घेतो व तेथें अवंचकत्वानें निरंतर आनंद उपभोगीत असतो. हाच आत्यंतिक मोक्ष होय.

## पूर्ण द्वैताचें तत्त्वज्ञान

महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप स्थूळ मानानें वर वर्णन केल्याप्रमाणें आहे. त्याचें व्यवच्छेदक लक्षण सांगायचें झाल्यास एवढेंच म्हणतां येईल कीं, हें पूर्ण द्वैताचें तत्त्वज्ञान आहे. द्वैत हा शब्द येथें रूढार्थानेंच वापरीत आहें. एरवीं खरें पाहूं जातां महानु-भाव नुसते द्वैती आहेत असें नाहीं, तर ते अनेकवादी आहेत, असें

म्हणणेंच वस्तुस्थितीला धरून होईल. पण स्थूल मानानें तत्त्वज्ञानाचा विचार करतांना जीव आणि ईश्वर यांच्या परस्परसंबंधाच्या सापेक्षतेनेंच तो केला जातो, आणि म्हणून अद्वैत आणि तदितर तें सर्व द्वैत अशी शब्दयोजना होत असते. त्या योजनेला धरूनच महानुभावांचें तत्त्वज्ञान हें पूर्ण द्वैताचें तत्त्वज्ञान होय, असें वर म्हटलें आहे. हें तत्त्वज्ञान महाराष्ट्रांत प्रथम महानुभावपंथसंस्थापक श्रीचक्रधर स्वामींनींच उपदेशिलें. हा त्याचा एक महत्त्वाचा विशेष मानायला हरकत नाहीं. चक्रधरस्वामींच्याच काळांत खालीं दक्षिणेकडे मध्वाचार्यांकडून द्वैतमताचें प्रतिपादन चालू होतें. स्वामींच्या चरित्रावरून या दोन तत्त्वज्ञांच्या परस्पर भेटीगांठी झाल्या होत्या किंवा चक्रधरस्वामी हे मध्वाचार्यांच्या शिष्यांच्या सांनिध्यांत आले होते असें दिसत नाहीं. तेव्हां त्यांनीं हें तत्त्वज्ञान स्वतंत्रपणें प्रतिपादन केलें असेंच म्हणणें योग्य होईल.

**एकेश्वरी पंथ**:—या द्वैताच्या सिंहासनावरून श्रीचक्रधरस्वामींनीं त्या वेळीं जनतेच्या मनांत रुजविलेला अत्यंत महत्त्वाचा ज्ञानबोध म्हणजे देवतापूजेची कनिष्ठता होय असें मला वाटतें. यादव काळांत शेंदऱ्या हेंदऱ्या देवतांच्या पूजेला भरमसाट भरती आली होती. याचें प्रत्यंतर हेमाद्रीनें लिहिलेल्या चतुर्वर्गचिंतामणींतील देवताव्रतांच्या संख्येवरून सहज मिळतें. या क्षुद्र देवतांच्या आराधनेनें अक्षय्य असें सुख मिळू शकत नाहीं, असाच सर्व धर्मशास्त्रांचा कौल आहे. असें असूनहि, श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांतामुळें या क्षुद्र देवतांना एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाल्यासारखें दिसत होतें. कारण कोणतीहि देवता घेतली तरी ती ईश्वरच होय. सामान्य जीव हा देखील ब्रह्मच होय अशा कल्पनेमुळें जीवदेवतांच्या पूजेला अज्ञ समाजांत मानमान्यता व प्रतिष्ठा मिळणें क्रमप्राप्तच

होतें. त्यामुळें अनेक देवतांचें म्हणजेच देवांचें बंड त्या वेळीं फार माजलें होतें. हें मोडून टाकण्यासाठीं ईश्वर एक आहे आणि तो समाजांत प्रतिष्ठा पावलेल्या क्षुद्र दैवतांहून निराळा आहे, इतकेंच नव्हे, तर जीवाहूनहि तो निराळा आहे हें ठासून प्रतिपादन करणें श्रीचक्रधरस्वामींना अवश्य वाटलें. त्या दृष्टीनें पाहतां श्रीचक्रधर-स्वामींचें तत्त्वज्ञान हें खरेंखुरें एकेश्वरी तत्त्वज्ञान होय आणि तें आमच्या आर्यसंस्कृतीला पूर्णपणें धरून आहे, हें विचारवंत वाचकांना मुद्दामहून सांगण्याची आवश्यकता नाहीं. निरनिराळ्या देवतांच्या भजनीं लागून छिन्नविच्छिन्न बनलेल्या अज्ञ समाजाला एकाच पर-मेश्वराच्या छत्रछायेखालीं आणून पाडणाऱ्या श्रीचक्रधरस्वामींच्या या अवतारकृत्याबद्दल कुणीहि झालें तरी कृतज्ञतेनें आपली मान त्यांच्यासमोर नम्रच करील.

**उपसंहारः**—या पंथाच्या वाङ्मयाचा महाराष्ट्रांत आतांपर्यंत बऱ्याच प्रमाणांत प्रसार व अभ्यासहि झाला आहे. पण त्यांच्या तत्त्व-ज्ञानाकडे मात्र विचारवंतांचें जावें तसें लक्ष अजून गेलें नाहीं. हें तत्त्वज्ञान माहीत करून घेण्याचीं साधनें आजपर्यंत फारशीं उपलब्ध नव्हतीं हें खरें आहे. पण तीं आतां हळूहळू अधिकृत स्वरूपांत उपलब्ध होत आहेत. त्यांचा नीट अभ्यास करून तौलनिक दृष्टीनें त्यांच्या तत्त्वज्ञानाचें मूल्यमापन करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य होय. या मूल्यमापनानंतर श्रीचक्रधरस्वामींच्या तत्त्वज्ञानाचें मूल्य जें काय ठरायचें असेल तें ठरो. त्याबद्दल कोणताही दुराग्रह कोणा-सहि धरण्याचें कांहींच कारण नाहीं. तथापि असा प्रयत्न करून महानुभावपंथाच्या व त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या महाराष्ट्रांतील कार्याचें नीट रीतीनें रहस्योद्घाटन झालें पाहिजे यांत शंका नाहीं. या महत्त्वाच्या गोष्टीकडे तत्त्वजिज्ञासु वाचकांचें लक्ष मी वेधूं इच्छितों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.
अनुक्रम 33725 दि:

# ५. निरंजन माधव
## ( व्यक्ति आणि वाङ्मय )

लेखक—दत्तात्रय सीताराम पंगु, एम्. ए. कोल्हापूर.

गेल्या पन्नास साठ वर्षांत प्राचीन मराठी कवींच्या चरित्रांचें व काव्यांचें जें संशोधन, समालोचन व प्रसिद्धीकरण झालें आहे, त्यांत कै. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या कार्याचें महत्त्व विशेष उल्लेखनीय ठरतें. कै. पांगारकरांनीं ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम व मोरोपंत इत्यादि कवींचा निश्चित काल ठरविणारीं व त्यांच्या काव्यांचें विस्तृत विवेचन करणारीं चरित्रें आपल्या सरस रमणीय भाषेंत लिहून आंग्लवाङ्मयानें हुरळून गेलेल्या तत्कालीन सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या संतवाङ्मयाबद्दलच्या औदासीन्याला जसा जोराचा धक्का दिला, तद्वतच निरंजनमाधवासारख्या चिरकाल विस्मृतिगर्तेंत निमग्न झालेल्या पेशवेकालीन एका राजकारणी कवीस उजेडांत आणून संशोधनक्षेत्रांत अभिनव अशी जी कामगिरी केली आहे, त्याबद्दल ते चिरकाल मराठी वाचकवर्गाच्या आदरास पात्र होऊन राहिले आहेत. कै. पांगारकरांनीं प्राचीन मराठी कवितेच्या संशोधनार्थ अपार परिश्रम घेऊन महाराष्ट्रभर जो संचार केला, त्यांतच त्यांना निरंजन माधवाच्या कवितेचीं अस्सल हस्तलिखितें नाशिक येथें एका भिक्षुकाच्या घरीं उपलब्ध झालीं. बुवांनीं ही सर्व कविता प्रथम आपल्या 'मुमुक्षु' मासिकाच्या द्वारा व नंतर स्वतंत्र ग्रंथरूपानें तीन भागांत प्रसिद्ध करून आपल्या संशोधन कार्याचें एक स्मारकच करून ठेविलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

## प्रास्ताविक

ऐन पेशवाईंत मध्वमुनि, अमृतराय, महिपत्यादि जे कवि होऊन गेले, त्यांत निरंजन माधव ऊर्फ बनाजी माधवासारख्या प्रदीर्घ व विविध स्वरूपाची रचना करणाऱ्या मुत्सद्दी कवींचा नामोल्लेखही तत्कालीन किंवा तदनंतरच्या कोणा संतमालाकारानें अथवा कविचरित्रकारानें करूं नये, हें महदाश्चर्यच होय. त्याही-पेक्षां निरंजनमाधवाचा अगदीं समकालीन व वयानें धाकटा अशा मोरोपंतानें देखील आपल्या 'सन्मणिमाले'त मुकुंदराजापासून रामजोशापर्यंत झाडून साऱ्या पूर्वकालीन व स्वकालीन कवींना वंदन करतांना निरंजनमाधवाचेंच नांव तेवढें खड्याप्रमाणें वगळावें हें तर अधिकच विस्मयकारक आहे. निरंजनमाधवाची कविता पंतांच्या अवलोकनांतच आली नसावी, हें संभवनीय दिसत नाहीं. कारण पंतांनीं आपल्या 'मंत्रभागवत' अथवा 'निरोष्ठ रामायण' अशा कृतींत जी अनुक्रमें मंत्ररचना व अवोष्टाक्षररचना साधली आहे, ती त्यांना निरंजन माधवांच्या अनुक्रमें 'ॐ नमो भगवते वासुदेवाय,' 'मंत्ररामचरित्र' व 'निरोष्ठ राघवचरित्र*' या तीन स्तोत्रांवरूनच सुचली असावी असें निःसंशय वाटूं लागतें. कवि म्हणून आपली प्रसिद्धि न व्हावी एतदर्थ आपली काव्यरचना निरंजनमाधवानें गुलदस्तांत ठेविली असावी, हाही तर्क खरा दिसत नाहीं. कारण आपल्या 'सुभद्रा चंपू'च्या+ शेवटीं आपले काव्यग्रंथ वाचण्याबद्दल सर्व कवींना मुळीं ज्यानें प्रार्थनाच केली आहे तो आपले ग्रंथ जाणून बुजून झांकून ठेवील हें शक्य दिसत नाहीं. मग आमच्या कवीच्या व त्याच्या काव्यकृतींच्या प्रदीर्घ-कालीन अज्ञातवासाचें कारण तरी काय असावें? एक गोष्ट मात्र

*निरंजनमाधवांची कविता, भाग १. +निरंजनमाधवांची कविता, भाग २

संभवनीय वाटते ती ही कीं, निरंजनमाधवाची तत्कालीन मुत्सद्दी अथवा परराष्ट्रीय वकील म्हणून जेवढी प्रसिद्धि होती तेवढी कवि म्हणून झाली नसावी. किंबहुना कवित्व व संतत्त्व यांचें समीकरण घालणाऱ्या तत्कालीन लोकांचें लक्ष अशा राजकारणी पुरुष म्हणून गणल्या गेलेल्याच्या काव्याकडे गेलें नसावें हेंच खरें. राजकारण अशा प्रकारें निरंजन माधवाच्या काव्यकीर्तीच्या जसें आड आलें असावें, तसेंच मोरोपंतानें त्यांचें नांव आपल्या 'सन्माणिमालें'तून वगळण्यासही तत्कालीन राजकीय वातावरण अथवा घडामोडीच कारणीभूत झाल्या असाव्या, अशी अटकळ करण्यास इतिहासाचा पुरावा मिळण्यासारखा आहे. पेशवेकालीन इतिहासाच्या अभ्यासकांना ही गोष्ट विदितच आहे कीं, पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर शाहू छत्रपतींच्या दरबारीं पेशवेपदाबद्दल बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब व बाबूजी नाईक बारामतीकर या दोघांत लढा चालू असून, उभयतांच्या पक्षांना भिन्न भिन्न लोकांचा पाठिंबा मिळाला होता. निरंजनमाधवाचें आत्मचरित्र असें समजल्या जाणाऱ्या 'सांप्रदाय-परिमळ' या ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें, आमचा कवि पहिले बाजीराव व त्यांचे सत्पुत्र नानासाहेब यांच्या कृपाछत्राखालीं वाढला असल्यामुळें, साहजिकच तो वरील पेशवे-पदाच्या लढ्यांत नानासाहेबांच्या पक्षाचा म्हणून प्रसिद्ध असावा, व बारामतीकरांचा आश्रित म्हणून असणाऱ्या मोरोपंतांनीही आपल्या यजमानाच्या प्रतिस्पर्ध्याच्या आश्रयास असणाऱ्या निरंजनमाधवास आपल्या 'सन्मणिमालें'त अनुल्लेखानें मारून आपल्या यजमानाच्या व त्याच्या पक्षाच्या रोषांतून सुटण्याचा अथवा पर्यायानें त्यांना खूष करण्याचा हा व्यवहारी प्रयत्न केला असावा. दोन मोठ्या धन्यांच्या जंगी लढ्यांत त्यांच्या दोन आश्रितांत अशा

प्रकारें गैरसमज व वितुष्ट असणें असंभवनीय नव्हतें व निरंजन-माधवासंबंधीं मोरोपंताच्या मूकवृत्तीचें हेंच बहुधा कारण असावें, असें तूर्त तरी धरून चालण्यास हरकत नाहीं.

## कुलवृत्त व प्रथम सांप्रदायग्रहण

आज निरंजनमाधवाची जी थोडी फार माहिती आपणांस उपलब्ध झाली आहे, ती वर उद्धृत केलेल्या 'सांप्रदाय–परिमळ' या त्याच्याच नांवावर आजपर्यंत मोडणाऱ्या ओवीबध्द ग्रंथावरून होय. सदर ग्रंथांत कवीनें आपल्या पत्नीस आपल्या गुरुसांप्रदायाचा वृत्तांत कथन करीत असतांनाच आपल्या कुळाचा वृत्तांत निवेदन केला आहे. गोदावरीच्या दक्षिणेस वरखेडच्या शिवेवर रामडोह म्हणून जो प्रसिद्ध गांव आहे, ती कवींची मातृभूमि असून त्या गांवीं त्यांचे पूर्वज कुळकर्णी होते. हे विश्वामित्र गोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून, त्यांचा कुळदेव गिरीचा व्यंकटेश होय. आदिलशाहींत कवीचे पणजे महादो बनाजी यांनीं आपला गांव सोडून विजापुरांत वस्ती केली, व बादशाहाची सेवा करून मानमान्यता मिळविली. ते मोठे भगवद्भक्त असून त्यांनीं आपल्या चारी पुत्रांना अधिकार दिले व दक्षिणोत्तर यात्रा करून शेवटीं कृष्णातीरीं शूर्पारक्षेत्रीं नृहरीच्या स्थानीं हरिभजनांत काळ घालवीत ते निजधामास गेले. कवीच्या आज्याचें नांव तिमाजीपंत असें असून आजीचें नांव गोदावरी असें होतें. दिल्लीच्या बादशहानें विजापूर घेतल्यावर तिमाजीपंतांनीं तें शहर सोडून व्यंकटेशगिरीचा रस्ता धरला. त्यांना भीमराव, वेंकटराव, माधवराव व हणमंतराव असे चार पुत्र व भगवती नांवाची एक कन्या असून, यांपैकीं माधवराव हेच कवीचे जनक होत. माधवरावांची पत्नी म्हणजे कवींची आई भागीरथीबाई ही महान् पतिव्रता असून तिला कुळदेवता भगवती

स्वप्नांत दर्शन देऊन तिच्याशीं प्रत्यक्ष संभाषण करण्याइतकी प्रसन्न होती. अशा आईच्या पोटीं कंचीप्रांतीं वेगवती नदीच्या तीरीं पक्ष-तीर्थासमीप कवीचा जन्म झाला. कवीचें मूळ नांव बनाजी असूनही या नांवाबरोबरच माधवनंदन, कवि निरंजन, निरंजनयोगी अशा टोपणनांवांचा ज्या अर्थी तो आपल्या काव्यांत उल्लेख करतो, त्या अर्थी आपल्या व्यावहारिक व पारमार्थिक अशा दोन्ही नांवांचा निर्देश करण्याचें धोरण त्यानें स्वीकारल्याचें दिसतें. बनाजी पुढें वडील निवर्तल्यावर सातान्यास बाजीराव पेशव्यांच्या आश्रयास आला, व ते स्वतः गुणी व गुणरत्नपरीक्षक असल्यामुळें, त्यांनीं त्यास व त्याच्या ज्येष्ठ बंधूस आपल्या पदरीं ठेवून घेतलें. सातान्यास अल्प-वयीन अशा बनाजीस संस्कृत शिकण्याची निःसीम इच्छा उत्पन्न झाली. पण पैशाच्या पाठीमागें लागलेल्या तत्कालीन सातान्यांतील ब्राह्मणांत आस्थापूर्वक शिक्षण देणारे त्याला कोणी मिळेनात. शेवटीं विद्वानांचा शोध करतां करतां लक्ष्मीधर बरवे यांचें पुण्यकारक नांव बनाजीच्या कानीं पडून तो त्यांच्याकडे गेला व त्यांनींही अतिशय संतोषानें त्याला संस्कृत शिकविण्याचें कबूल केलें. पाहिल्या प्रथम 'सिद्धांतकौमुदी' नें बनाजीच्या शिक्षणास प्रारंभ झाला, व पुढें सहा महिन्यांत वाढलेल्या या गुरु-शिष्यांच्या संघट्टणांत परस्परांबद्दल अपूर्व प्रेम उत्पन्न झालें. लक्ष्मीधर हे सकलकलानिपुण असून ज्ञानकलेंत तर व्यास-वशिष्ट-वाल्मीकीसारखा त्यांचा अधिकार होता. वक्तृत्वांत ते बृहस्पति असून रूपानें सुद्धां ते मदनसुंदर होते; वीणावादनांत व गानकलेंतही ते प्रवीण असून ज्ञानेश्वरींतील ओंव्या ते गोड स्वरांत म्हणत. त्यांची काव्यरचना पाहून त्यांचे गुरु ब्रह्मानंदस्वामी यांनीं लक्ष्मीधर कालि-दास असें त्यांचें सार्थ नामाभिधान ठेविलें होतें. अशा गुरूंच्या

कृपेनें बनाजीला एके दिवशीं उषःकालीं स्वप्नांत साक्षात् चित्कलेचें दर्शन घडून, तिच्या संभाषणसुखाचाही लाभ घडला व पुढें गुरूंनीं त्याला महाविद्या, पंचाम्नाय, गुरुसंप्रदायपूर्वक वासुदेवविद्या, गुरुपादुका व महावाक्यचतुष्टय इत्यादिकांचा उपदेश केला.

## जन्मसन

बनाजीचें वय उपदेशकालीं बावीस वर्षांचें होतें[1] व याच वेळीं बाजीरावसाहेबांनीं त्याला तंजावरास कामगिरीवर पाठविलें.[2] ही कामगिरी वाकिलातीची असून अशा प्रकारचीं जबाबदारीचीं कामें पार पाडण्याची पात्रता त्यानें आपल्या धन्याजवळ एवढ्या अल्पवयांत सिद्ध करावी हें निःसंशय कौतुकास्पद होतें. इतिहासांत[3] तर असें नमूद आहे कीं, तंजावरास व्यंकोजीच्या वंशांतील सरकोजी भोसले सन १७२१ पासून १७२७ पर्यंत राज्यावर होता, व सन १७२३ च्या पावसाळ्यांत त्रिचनापल्लीकडे निजामचा शह आल्याचें शाहूस कळल्यावरून, सरकोजीच्या बचावासाठीं त्यानें आपली फौज कर्नाटकांत पाठविण्याची सिद्धता केली. इ. स. १७२४ तील साखरखेड्याच्या लढाईनंतर निजाम व मराठे यांचें सडकून वांकडें आलें असतां, कर्नाटकांत उतरण्यास निजामास अवकाश मिळूं नये म्हणून फत्तेसिंग भोसले व प्रतिनिधि यांच्या सल्ल्यानें शाहूनें कर्नाटकांत फौज पाठविली. सन १७२५ व १७२६ त असा दोनदां बाजीराव शाहूच्या हुकुमावरून कर्नाटकांत स्वारीवर गेला होता. यावरून आपण तिकडे जाण्याच्या आधीं म्हणजे सन १७२४ त त्यानें बनाजीस तंजावरास पाठविलें असावें, व तिकडे बनाजीचें वास्तव्य ज्या अर्थीं तीन वर्षें होतें,[4]

१ सांप्रदाय परिमळ ४।१२. २ सां. प. ४।१५. ३ मराठी रिसायत–मध्यविभाग, परिच्छेद ७, गो. स. सरदेसाई. ४ सां. प. ४।२०.

त्या अर्थी सन १७२७ पर्यंत तरी तो तेथेंच होता असें निर्विवाद ठरतें. तंजावरच्या गादीवर सरकोजीही सन १७२७ पर्यंतच होता; या गोष्टीनेंही वरील विधानास पुष्टि मिळते. या हकीकतीवरून सन १७२४ सालीं तंजावरच्या कामगिरीवर जाणारा बनाजी ऊर्फ निरंजन माधव जर २२ वर्षांचा होता, तर त्याचा जन्म सन १७०२ सालीं झाला असावा असें खात्रीनें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

## तंजावरांतील वास्तव्य

तंजावरांत काढलेल्या तीन वर्षांत बनाजीस पुष्कळच गोष्टींचा लाभ घडला. किंबहुना आपल्या काव्योद्यानांतील कीर्तिमंदिराचा पाया त्यानें याच वेळीं घातला. राजकारणाच्या भाराखालीं त्यास प्रथम परतत्वचिंतन करण्यास अवसर मिळेनासा झाला. तरी त्यानें संपादन केलेल्या महाविद्येच्या प्रभावानें नित्याच्या जपांत अंतर म्हणून पडलें नाहीं. सिद्धिदायक स्वप्नें, साधुपुरुषांचीं दर्शनें व त्यांच्याशीं केलेलीं गुह्य भाषणें, यामुळें त्याच्या मनास उत्तेजन मिळे. याशिवाय तंजावरच्या दरबारांत व कर्नाटक प्रांतांत वावरण्याची भरपूर संधि मिळाल्यामुळें, बनाजीच्या अंगीं सभेंत लागणारी निर्भयता, प्रसंगोचित समयसूचक बोलण्याची स्फूर्ति, व प्रतिपक्ष्याचें तोंड बंद करण्याचें चातुर्य इत्यादि गुण प्राप्त झाले, व तिकडील राजेलोकांस यामुळें विशेषच कुतुहल वाटून तो मोठ्या मानमान्यतेस चढला.

देशाटनामुळें सहजीं प्राप्त होणारे गुणही बनाजीनें लवकरच आत्मसात् करून घेतले. पंडितमैत्रीनें त्याला अनेक शास्त्रांचें विलोकन घडलें, तर नट-नकलाकार इत्यादिकांच्या केलेल्या अवलोकनामुळें राजसभेंत त्याच्या चातुर्याची वृद्धि झाली. पंडित लोकांचे सांनिध्यांत भरतमुनींचें नाट्यशास्त्र, गायनकला, व्युत्पत्ति इत्यादि रसिकतावर्धक ललितकलांचेंही त्यास ज्ञान झालें. एकंदरींत व्यावहारिक दृष्टीनें

कर्नाटकांत त्याचा हा तीन वर्षांचा काल उत्तम गेला असला, तरी सद्गुरूवांचून महावाक्यांचें शोधन करावयास त्याचें मन धजेना व सद्गुरु तर लांब राहून आपण मात्र नोकरीपायीं दूर देशांत येऊन पडलों, अशा समजुतीनें तो थोडा खिन्नच झाला. तथापि योगायोग असा कीं, याच सुमारास त्याचे गुरु लक्ष्मीधर बरवे मृत्यु पावले व ही बातमी ज्याअर्थी बनाजीस पुण्यास आल्यावर समजली; त्याअर्थी ती त्याला सन १७२७ सालीं तंजावराहून परत आल्यावरच समजली असावी.

## द्वितीय सांप्रदायग्रहण

ही दुःखदायक बातमी ऐकून तो बाजीरावाच्या परवानगीनें साताऱ्यास आला व तेथें तर गुरुविरहानें त्याची इतकी शोचनीय अवस्था झाली कीं, सात दिवस त्याच्या डोळ्यास डोळा लागला नाहीं! पण पुढें झोंप लागून त्याला त्याच्या गुरूंनीं स्वप्नांत भेट दिली, व ' शोक करण्याचें कारण नाहीं; आजपासून सातवे दिवशीं आमची विभूति भेटेल ' असें आश्वासन दिलें. या स्वप्ना-वर बनाजीचा प्रथम विश्वास बसला नाहीं; पण योगायोग असा आला कीं, बापजी पंडित म्हणून बाजीरावसाहेबांचे कोणी स्नेही असून तेही वकिलातीच्या कामीं फार कुशल होते. बनाजीच्या वडील बंधूंचा व त्यांचाही स्नेह बराच असल्यामुळें, ते पुण्याच्या मुक्कामांत त्यांच्याकडेच उतरत. त्रिंबकराज-परानंद-विज्ञानानंद-कमलानंद-शिवानंद-चिन्मयानंद व बापजी पंडित ऊर्फ महामौळी अशी त्यांची गुरुपरंपरा होती. अशा पुरुषांच्या सहज परिचयानें बनाजीचें त्यांच्याशीं संघट्टण घडून, बाजीरावानें त्या दोघांच्या एकाच कामीं केलेल्या नेमणुकीचीही त्यांत भर पडली. उभयतांच्या या समागमांत ज्ञानकलेची अभिनव गोष्ट जी समाधि अवस्था, ती

बनाजीस प्राप्त झाली. बापजी पंडित पातंजल योगांत निष्णात असल्यामुळें, त्यांनीं आपल्या नूतन शिष्यास त्या शास्त्रांत पारंगत केलें. त्यांच्या सहवासांत बालावबोध, कपिलगीता, पंचीकरण इत्यादींचें ज्ञान तर बनाजीस घडलेंच, पण त्याहूनही कोटी जन्मांत जें साधणार नाहीं, तें बनाजीस पंडितांनीं एका पळांत असें साधून दिलें कीं, त्याचें लक्ष नादानुसंधानीं लागून अर्ध क्षणांत तो मुक्त झाला. पूर्वी मंत्रमार्गांत दत्त-सांप्रदायी लक्ष्मीधर बरवे गुरु होते, तर त्यांच्या मृत्यूनंतर ज्ञानमार्गांत त्यांस सिद्धेश्वर सांप्रदायी बापजी पंडितांचा लाभ घडला. ही गोष्ट बहुधा सन १७२७ मधलीच असून त्यानंतरच बनाजीनें ‘ निरंजन ’ असें मोक्षसिद्धिदर्शक पारमार्थिक नांव धारण केलें असावें.

## आणखी राजकारणी कामगिरी

पेशवे दप्तरांतील* ता. ५ मे १७३३ च्या पत्रावरून बाजीरावानें बनाजीस फिरंगियाकडे आपला वकील म्हणून पाठविल्याचें दिसत असून तंजावरच्या यशस्वी कामगिरीनें आमच्या कवीनें आपल्या यजमानाचा केवढा विश्वास संपादन केला होता, याचें स्पष्ट आकलन होतें. खरें पाहिलें असतां सन १७३१पासून१७४१ पर्यंत फिरंगियाशीं मराठ्यांचें युद्ध चाललेंच असलें, तरी सन १७३७ पावेतों त्याची तीव्रता अल्प प्रमाणांत असून, मधून मधून सलोख्याचें बोलणें चाल्लेंच होतें. अखेर१७३९त झालेल्या वसईच्या तहानें हें प्रकरण निकालांत निघालें. मध्यंतरीं १७३३ च्या सुमारास धार्मिक बाबतींत हिंदु व पोर्तुगीज यांमध्यें मोठा तंटा उपस्थित झाला असून, मालाड येथील हिंदु धर्माचा कट्टा अभिमानी अंताजी रघुनाथ सरदेसाई व इनामदार यांस ता. १३ फेब्रुआरी १७३३

* पेशवे दप्तर, भाग ३०।३६४ पत्र, पृष्ठ ३७८.

रोजीं बाजीरावानें ज्याअर्थी पत्र * लिहिलें आहे, त्याअर्थी अशा संबंधांतच पुढें मे महिन्यांत बाजीरावानें बनाजीस फिरंगियाकडे वकील म्हणून पाठविल्याचें अधिक संभवनीय दिसतें.

बाजीरावाच्या मृत्यूनंतर नानासाहेबांनीं बनाजीस आपल्या पदरीं ठेवून घेतलें, व आपल्या वडिलांप्रमाणें दक्षिणेंतच त्यांस बहुतेक कामगिरी सांगितली. तिकडील राजे देखील बनाजीवर फार प्रेम करीत +. या राजकारणांतून त्याला घटकाभर देखील डोकें वर करावयास फुरसत मिळत नसे, व त्याच्या मनांत तर तीर्थ-यात्रेचा ध्यास लागलेला ! याच वेळीं कांहीं दुष्ट लोकांनीं नाना-साहेबांना बनाजीबद्दल खोट्या गोष्टी सांगून त्यांचें मन कलुषित केलें. सन १७४०-४१ च्या दरम्यान नानासाहेबांचें बाबजी नायकाशीं व रघूजी भोसल्याशीं जें वैमनस्य पडलें होतें, त्यावरून बनाजी या दोघांना पेशव्याविरुद्ध सामील आहे, अशी खोटी गोष्ट कोणीतरी दुष्टाव्यानें नानासाहेबांस सांगितली असणें शक्य आहे.

## 'सुंदर कृष्णा'च्या मूर्तीचा लाभ

पण याच वेळीं एक अद्भुत व विस्मयकारक अशी गोष्ट घडून आली. मागें बनाजीचे गुरु लक्ष्मीधर बरवे यांचा उल्लेख आलाच आहे. हे लक्ष्मीधर ज्या दत्तसांप्रदायापैकीं होते त्याचे श्रीदत्तमहामुनि हे मूळपुरुष होत. त्यांचे शिष्य विमलानंद, त्यांचे अमृतानंद, त्यांचे ब्रह्मानंद, व त्यांचे शिष्य सच्चिदानंद अशी या सांप्रदायाची शिष्यपरंपरा होती. या सच्चिदानंदांनीं गोकर्ण महाबळेश्वराच्या वनांत तपश्चर्या केली होती, व त्यांची समाधि सहा सहा महिने

* मराठी रियासत, मध्यविभाग, ११ परिच्छेद, गो. स. सरदेसाई.
+ सां. प. ३।१८७.

टिकत असे. त्यांना नारद मुनींचें प्रत्यक्ष दर्शन घडून वासुदेव विद्या, महाविद्या, व विष्णुशिवैक्य मुनीपासून प्राप्त झालें होतें. पण कलियुगांत भगवद्भक्तीशिवाय तरणोपाय नाहीं, असें पाहून सच्चिदानंदांनीं नारदाकडे ध्येयमूर्तीची याचना केली व नारदाच्याच सांगण्यावरून ज्या मूर्तीच्या योगानें मुचकुंद राजानें सगुणानिर्गुणैक्य संपादलें, त्या ' सुंदर कृष्णा ' ची मूर्ति त्यांनीं विंध्य पर्वतावर जाऊन राजाकडून मिळविली. याच सच्चिदानंदांचे शिष्य ब्रह्मानंद व त्यांचे शिष्य लक्ष्मीधर बरवे हे होत. ब्रह्मानंदांचे पुत्र शिवानंद हे बैलूर येथें आपल्या मठांत या ' सुंदर कृष्णा ' ची पूजाअर्चा करून असतां, पुढें शिष्य न करतांच परंधामाला गेले. मागें फक्त बायकामंडळीच उरली व दुसऱ्या कोणास देवाच्या पूजेचा अधिकार नसल्यामुळें, सुंदर कृष्णाच्या देवळाचीं दारें आपोआप बंद झालीं. दारें उघडण्याचे पुष्कळांचे प्रयत्न निष्फळ झाले; पण त्या रात्रीं तेथील लोकांना असें स्वप्न पडलें कीं, ' योग्य तो पूजाधिकारी येतांच आपोआप दारें उघडतील. तोंपर्यंत दारांतूनच पूजा करावी. ' याप्रमाणें पुष्कळ वर्षें द्वारपूजाच चालू होती.

अशा संधीला नानासाहेबांच्या गैरमर्जीचें निमित्त करून आमच्या कवीनें दाक्षिणदेशीं पर्यटन केलें व सुंदर कृष्णाच्या दर्शनार्थ तो बैलुरास येऊन दाखल झाला. निरंजनानें देवालयाला नमस्कार करतांच चमत्कार असा झाला कीं, देवळाचें इतके दिवस लागलेलें दार एकदम उघडलें व सर्वांना सुंदर कृष्णाचें दर्शन घडून आनंद झाला. बैलूरास पुराण-कीर्तन करीत निरंजन शंभर दिवस राहिला व या अवधींत तेथील लोकांना सुंदर कृष्णाची मूर्ति निरंजनाला द्यावी असा स्वप्नसाक्षात्कार झाल्यामुळें, ती मूर्ति घेऊन तो पुण्यास आला व नवीन देवालय बांधून त्यांत तिची त्यानें स्थापना केली.

## नानासाहेबांच्या कारकीर्दींतील राजकारण

यात्रेहून आल्यावर नानासाहेबांनीं बनाजीस पुनः अधिकार देऊन मोठ्या सन्मानानें श्रीरंगपट्टणास वकील म्हणून पाठविलें. तत्कालीन पत्रव्यवहारावरून* सुद्धां असें दिसतें कीं, बनाजी माधव सन १७४६ पासून १७५२ पर्यंत श्रीरंगपट्टणास खंडणी-वसुलाच्या वाटाघाटींत होता. मध्यंतरीं सन १७४९ त तेरणातीरीं परगणे ढोकी, मुक्काम जवळें येथून नासिरजंगाच्या चाललेल्या प्रयत्नांचें सविस्तर वर्णन त्यानें आपल्या पत्रांत + केलें आहे. सन १७५१त तो औरंगाबादेस पेशव्यांचा वकील म्हणून काम करीत असून, एवढ्या मुदतींत दमाजी गायकवाडानें चालविलेल्या धामधुमीची बातमी तो पेशव्यांस पाठवीत होता. बापूजी नारायण व दमाजी गायकवाड यांच्या खानदेशांतील बहादुरपूर येथें झालेल्या लढाईचें त्यानें आपल्या पत्रांत सविस्तर वर्णन केलें असून, दमाजीचे दाक्षिणेंतील जे जे बेत त्याच्या कानावर आले, ते ते त्यानें औरंगाबादेहून पेशव्यांस कळविले आहेत. पेशव्यांच्या सैन्यानें दमाजीचा पराभव केल्याचें ऐकून बनाजीनें आनंद व्यक्त करणारें एक पत्रही पेशव्यास तेथून पाठविलें आहे. दमाजीचें प्रकरण १७५१ च्या फेब्रुआरी—मार्चपर्यंत कळविणारा बनाजी माधव त्या सालच्या एप्रिलपासून सलाबतजंग प्रकरणाशीं बराच संलग्न असल्याचें दिसून येतें. तथापि सलाबतजंगाशीं मित्रत्वाचें नातें ठेवण्यास पेशव्यास सल्ला देतांना, २० एप्रिल १७५१ च्या त्रिंबकराव पेशव्यांच्या पत्रांतून ज्याअर्थीं त्यानें पुनः दमाजीच्या हालचालीची ताजी बातमी दिली आहे, त्याअर्थीं दमाजीकडे त्यानें अगदींच कानाडोळा केला होता, असें म्हणवत नाहीं. यानंतर पुढील पत्रांत सलाबतजंग दमाजीविरुद्ध पेश-

* पेशवे दप्तर, भाग २८. + पेशवे दप्तर, भाग २६.

ल्यांस मदत करण्यास कसा तयार आहे हें कळवून, पुढें मे महि-न्यांत उलट सलाबतजंगाच्या धरसोडी वर्तनाचेंहि त्यानें वर्णन केलें आहे. पुनः ७ फेब्रुवारी १७५२ च्या राणोजी नायकानें पेशव्यांस लिहिलेल्या पत्रांतून बनाजीनें म्हैसूरच्या राजाचा सेना-पति दलवाई व हैदर यांच्या बेताबद्दल बातमी पाठविली असून महंमदअल्ली व त्याचा भाऊ माफुजेखान यांच्या हालचालीहि त्यानें कळविल्या आहेत. सदर पत्रांत बनाजी माधवानें दलवायाची गांठ घेऊन त्यांस नजर दिली असून, आपल्या धन्याचें पत्र त्यानें बसून दिलें असा उल्लेख आहे.

सन १७५५ पासून १७५८ पर्यंत बनाजी माधवरावास पुनः श्रीरंगपट्टणास वकिलातीच्या कामगिरीवर पाठविलेलें दिसतें. तारीख १५ जानेवारी १७५५ रोजीं संस्थान श्रीरंगपट्टण येथील संस्था-निकास त्याच्या हस्तें सणगें पाठविण्यांत आलीं असून*, सन १७५६ च्या मार्चांत त्यानें कडूरहून महादोबा पुरंदऱ्यास श्रीरंग-पट्टण संस्थानची आर्थिक अडचण लिहितांना, तुंगभद्रेवर सैन्य पाठविण्यास कळविलें आहे. विसाजी कृष्णानेंही गोपाळराव पट-वर्धनास सैन्यासह पाठविण्यास पेशव्यास लिहिलें असून, २१ जानेवारी १७५८ च्या श्रीरंगपट्टणकराविरुद्ध त्यानें पेशव्यास तक्रारवजा लिहिलेल्या पत्राच्या वेळीं, बनाजी माधवरावाचा मुक्का-मही तेथेंच होता असें दिसून येतें. याच सालच्या २९ एप्रिलच्या पत्रांत, बनाजीनें आपण देवनहळ्ळी मुक्कामीं बळवंतराव मेहेंदळ्यास मिळाल्याचें लिहून, म्हैसूरच्या राजाचा दिवाण नंदराज याचें धोर-णही कळविलें आहे. पण याच वेळीं त्यास पुण्यास परत पाठ-विण्याबद्दल पेशव्यांकडून निकडीचें लिहून आलें असून, त्याचा

* पेशवे दप्तर, भाग २२.

मुक्काम श्रीरंगपट्टणहून नागमुगळीस हालल्यामुळेंच केवळ ही यादी याला पोहचूं शकली नाहीं.

गोपाळराव गोविंद व मल्हार भिकाजी यांनीं बनाजी माधवरावास लिहिलेल्या पत्रांत * म्हैसूरच्या राजाविरुद्ध कडक उपाययोजना करण्यास लिहिलें असून, पेशव्यांची खंडणी व येणें वसूल न झाल्यास राजाचीं कांहीं ठाणीं घेण्यासही कळविलें आहे. पुढील पत्रांत तर वरील दोघांनीं राजास बनाजीमार्फत 'राजा जर आमची मागणी कबूल करीत नसेल, तर ३६ तासांत आम्हीं त्याच्या मुलुखावर स्वारी करूं' असा अगदीं निर्वाणीचा धमकीवजा निरोप कळविला आहे. हैदर केव्हां येईल याचा नेम नसल्यामुळें व राजाही कदाचित् तह न करतां लढाईचीच तयारी करील अशी शंका त्यांना वाटत असल्यामुळें ते बनाजीस म्हैसूरच्या राजाच्या खंडणीचा प्रश्न लवकर निकालांत काढण्यास लिहितात. शेवटीं २१ ऑगस्ट १७५८ च्या पत्रांत म्हैसूरच्या राजास बनाजीमार्फत धमकीवजा निरोप कळवूनही राजा बधत नाहीं असें पाहून, गोपाळराव गोविंद व मल्हार भिकाजी यांनीं अगदीं कंटाळून खंडणीच्या किंमतीचें जवाहिर राजाकडून स्वीकारण्यास आपली कबुली बनाजीस कळविली आहे. इतकें करूनही बंगलोरवर स्वारी करण्याचा प्रसंग त्यांना आला तो आलाच.

वरील हकीकत सन १७५८ च्या ऑगस्ट—सप्टेंबरमध्यें घडली असून पुढें आक्टोबरांतच हैदरनें बंगलोरवर केलेल्या स्वारीस गोपाळराव पटवर्धनास तोंड द्यावें लागलें. पण हैदरशीं गोपाळरावानें 'सलाबत खाऊन' मोर्चे उठविल्यामुळें, म्हैसूरच्या राजानें शिरजोर होऊन आपल्याकडून येणें असलेली एक लक्ष चाळीस हजाराची

* पेशवे दप्तर, भाग २८.

रक्कम दिलीच नाहीं असें दिसतें. बनाजी माधवराव मात्र १७५८ च्या सुमारास पुण्यास आला असावा.

पेशवे दप्तरांत प्रसिद्ध झालेल्या वरील पत्रव्यवहारावरून आमचा कवि, पहिले बाजीराव व नानासाहेब या दोघांच्या कारकीर्दींत तंजावर, फिरंगी, श्रीरंगपट्टण, औरंगाबाद, इत्यादि दरबारीं वकिलातीच्या कामावर असून, आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षापासून म्हणजे अदमासें १७२४ सालापासून १७५८ पर्यंत या कामावर अव्याहत होता असें स्पष्ट दिसतें. तथापि राजकारणांत त्याचीं एवढीं ३४–३५ वर्षें जाऊनही व निरनिराळ्या दरबारांत वावरून पुन: पानिपतच्या घनघोर युद्धाची प्रत्यक्ष परिस्थिति माहित असूनही या प्रसिद्ध घटनेसंबंधीं एकहि उल्लेख त्यानें आपल्या ग्रंथांत कोठें करूं नये हें विस्मयकारक होय! राजकारणांत ज्याचा इतका प्रत्यक्ष हात होता असा मराठी कवि निरंजनमाधवाव्यतिरिक्त दुसरा क्वचितच असून, लिहावयाचें तें पारमार्थिक विषयावरच लिहावयाचें अशा त्याच्या विशिष्ट प्रवृत्तीमुळें, तत्कालीन ऐतिहासिक, राजकीय व सामाजिक घटना ग्रंथनिविष्ट करण्याचें त्याच्या मनांतही आलें नाहीं; हें दुर्दैव होय. अशा रीतीनें सन १७५८ पर्यंत राजकारणांत बहुतेक काळ घालविल्यावर आपलें उर्वरित आयुष्य त्यानें काव्यरचनेंत खर्चण्याचें ठरविलें असावें.

## निरंजनमाधवाचे काव्यग्रंथ

निरंजनमाधवानें आपला पहिला ग्रंथ सन १७३५ त लिहिला असून तो बहुतेक 'कृष्णानंद सिंधु'च असावा. तथापि त्याचा प्रारंभ सन १७३५ त पुण्यास करून पुढें श्रीरंगपट्टण मुक्कामीं सन १७४६ ते १७५२ पर्यंत केव्हांतरी तो त्यानें पुरा केला असावा. या विलंबास बहुतेक त्याचा राजकारणी पेशाच

कारणीभूत झाला असावा. पुढें १७५८ त त्यानें '**चिद्‌बोध रामायण**' म्हणून अध्यात्म रामायणांतील बालकांडावरील टीकात्मक ग्रंथ रचिला. याचीं सातही कांडें कै. सी. रा. गायकवाड यांना उपलब्ध झालीं होतीं, व त्यांपैकीं बालकांड त्यांनीं १८८६ सालीं प्रसिद्धही केलें होतें; पण मध्यंतरीं बाकीचीं कांडें चोरीस गेल्यानें अथवा भस्मसात् झाल्यानें वाचकांना पारखीं झालीं आहेत. सन १७६१ त निरंजनमाधवानें 'वृत्तमुक्तावलि' हा वृत्तशास्त्रावरील आपला पहिला ग्रंथ लिहिला असून, त्याच्या नांवावर मोडणारा, पण ज्याचें कर्तृत्व विवाद्य आहे असा 'सांप्रदाय परिमळ' सन १७६३ त लिहिला गेला आहे. या ओंवीबद्ध ग्रंथांत कवि आपल्या कुलाची, आपल्या दोन सांप्रदायांची, आपल्या राजकारणी व्यवसायाची व शेवटीं आपणास बेल्लूर मुक्कामीं झालेल्या सुंदर कृष्णाच्या लाभाची इत्थंभूत हकीकत आपली प्रियपत्नी गंगावती ईस निवेदन करीत आहे असें कल्पिलें आहे. पतीनें पत्नीला सांगितलेल्या अशा प्रकारच्या संवादरूप ग्रंथाची, वामन पंडिताच्या 'प्रियसुधे' शींच फक्त तुलना करतां येईल. तथापि सदर ग्रंथ बारकाईनें वाचून पाहिल्यास त्याचा कर्ता निरंजन माधवाशिवाय कोणीतरी, विशेषतः त्यांच्या शिष्यांपैकीं कोणीतरी असावा असा दृढ समज झाल्याशिवाय रहात नाहीं. ग्रंथाच्या प्रत्येक उद्गाराच्या शेवटीं 'दास' किंवा 'निरंजनदास' असा कर्त्याचा जो उल्लेख केलेला आहे, तो तर विशेषच विचारणीय आहे. कारण निरंजनमाधव आपल्या ग्रंथांत आपल्या नांवाचा निर्देश 'निरंजनदास' असा कधींच करीत नसून, माधवसुत, कवि निरंजन, निरंजन माधव असाच नेहमीं करतांना आढळतो. पुनः निरंजनमाधव व त्याची पत्नी गंगावती या उभयतांचा संवाद कल्पून या ग्रंथाची रचना झाली

आहे, हें प्रत्येक उद्गाराच्या शेवटच्या ओवीवरूनही[१] स्पष्ट होत असल्यामुळें, निरंजनमाधवाचें व त्यांच्या पत्नीचें असें संभाषण झालें, असें अप्रत्यक्ष वर्णन करणारा व श्रोत्यांना अवधान देण्याची विनंति करणारा कोणी तिसराच गृहस्थ या ग्रंथाचा लेखक असला पाहिजे असें निःसंशय वाटतें. शिवाय, पहिल्या उद्गाराच्या ४३ व्या ओवीपर्यंत निरंजन–गंगावती यांचें प्रत्यक्ष झालेलें संभाषण व अगदीं पुढच्याच दोन ओंव्यांत[२] त्याच संभाषणाचा केलेला अप्रत्यक्ष उल्लेख, यांमध्यें जी विसंगति दिसून येते, ती निरंजन-माधव स्वतः जर या ग्रंथाचा कर्ता असता, तर दिसून आलीच नसती. यावरून सदर ग्रंथ लिहितां लिहितां निरंजनाच्या या शिष्यास मध्येंच आपल्या गुरूची व गुरुपत्नीची स्तुति करण्याचा मोह न आवरल्यामुळें, वरील ओंव्या त्याच्या हातून लिहिल्या गेल्या असून, हा ग्रंथ म्हणजे निरंजनाचें आत्मचारित्रच असें भास-विण्याचा त्याचा प्रयत्न विफल झाला आहे. पुष्कळ वेळपर्यंत पति-पत्नीमधील हा संवाद वाचून निरंजनमाधवच या ग्रंथांचा कर्ता अशी वाचकाची खात्री होते न होते, तोंच अशा अप्रत्यक्ष उल्ले-खाच्या ओंव्या मध्येंच डोकावतात कीं, त्यावरून वरील खात्री तात्काळ जमीनदोस्त व्हावी, अशीं उदाहरणें येथें कितीतरी दाख-वितां येतील[३]. सारांश, आपल्या ग्रंथास महत्व यावें यास्तव आपल्या गुरूचा व त्याच्या पत्नीचा संवाद कल्पून कोणातरी त्यांच्या शिष्यानें अगर भक्तानें हा ग्रंथ लिहिला असावा.

वरील विधानास पोषक अशा आणखी एका स्थळाचा विचार करणें अवश्य आहे. सांप्रदाय परिमळाच्या पांचव्या उद्गारांतील

१ सां. प. २।१९७. २ सां. प. १।४४,४५. ३ सां. प. २।५८, ६२; ३।१, २६१; ४।१, २३, १८६, १८८, २१८, २१९.

१४३ ओंवीपासून पुढील १०।१२ ओंव्यांत निरंजनमाधव आपल्या पत्नीची स्तुति करतात असें दर्शविलें आहे. निरंजनासारखा स्तुति-निंदेपासून अलिप्त असणारा योगी आपल्या पत्नीची व पर्यायानें आपली स्तुति करील हें संभवत नाहीं. निरंजनाचें आपल्या पत्नी-वरील असीम प्रेम पाहूनच गंगावतीच्या अंगच्या गुणांची उत्कटता दर्शविण्यासाठीं कोणा निरंजनदासानें वरील स्तुति आपल्या गुरूच्या तोंडीं घातली, असें समजणेंच येथें सयुक्तिक दिसतें.

भाषेच्या दृष्टीनें देखील पाहतां, निरंजनमाधवाच्या भाषेचा ठसा या ग्रंथावर उमटलेला बिलकुल दिसत नाहीं. आमच्या कवीच्या इतर ग्रंथांत त्याचे म्हणून जे विशिष्ट शब्द व शब्द-प्रयोग आढळतात त्यांचा ' सांप्रदाय परिमळां ' त कोठेंही मागमूस लागत नाहीं. आता ' शकेल ' बद्दल ' सकेल ' असा शब्दप्रयोग करणें किंवा ' महिमा ' हा शब्द स्त्रीलिंगी वापरणें, हे प्रकार जरी आपणांस निरंजनमाधवाच्या इतर ग्रंथांत व प्रस्तुत ग्रंथांत सर्व-साधारण सांपडले, तरी एवढ्यावरून वरील सर्व ग्रंथांचें एककर्तृ-कत्व सिद्ध होत नाहीं.

वृत्ताचा मुद्दाही असाच महत्वाचा आहे. ' सांप्रदाय परिमळ ' हा सर्वच ग्रंथ एकट्या ओंवी वृत्तांत आहे व निरंजनमाधवासारखा छंदःशास्त्रनिपुण व वृत्तशास्त्रावरील ग्रंथाचा कर्ता व आपले काव्य-ग्रंथ अनेक गणवृत्तांत गुंफणारा कवि जर त्याचा कर्ता असता तर असा स्वतंत्र व आपल्या गुरुसांप्रदायाची माहिती देणारा ग्रंथ एकचएक ओवीवृतांत न रचतां, अनेक वृत्तांत रचून आपलें वृत्त-प्रभुत्व त्यानें मोठ्या हौसेनें दृष्टोत्पत्तीस आणलें असतें. 'सांप्रदाय-परिमळ' कर्त्या निरंजनदासाला अशी अनेकवृत्तात्मक रचना पेलण्या-सारखी नसल्यामुळेंच, त्यानें ओंवीसारख्या सोप्या व धांवत्या

वृत्ताचा अवलंब करून आपल्या ग्रंथाचें काम निभावून नेलें आहे. निरंजनमाधव व निरंजनदास यांच्या रचनेंतील वृत्तभेदावरून त्यांचा वृत्तिभेदहि स्पष्ट होत असल्यामुळें, त्या दोघांचें एकत्व मानतां येण्यासारखें नाहीं.

प्रस्तुत ग्रंथ चाकणच्या किल्ल्यावर समाप्त झाल्याचा उल्लेख ग्रंथाच्या शेवटीं आहे. यापूर्वी व यानंतरच्या निरंजन माधवाच्या ग्रंथाच्या शेवटीं ' निरंजनमाधव ', ' श्रीनिरंजनमाधवविरचितम् ' असे स्पष्ट निर्देश असून ' सांप्रदाय परिमळ ' जर खरोखर त्याचाच असता तर आपल्या नांवाचा उल्लेख करण्याचा नित्याचा ठराविक परिपाठ सोडून, एवढ्याच ग्रंथापुरतें ' निरंजनदास ' असें नामाभिधान धारण करण्याचें त्यास काय कारण होतें? या बहि:पुराव्यावरूनही निरंजनाच्या कोणातरी शिष्यानें हा चरित्र-ग्रंथ त्याच्या हयातींतच काय, पण त्याच्या नजरेखालीं रचला असावा असें दृढ अनुमान निघतें. आत्मचारित्र लिहिण्याचा प्रघात तत्कालीं नसल्यामुळें, सांप्रदायवर्णनाचें हें काम निरंजनाच्या एखाद्या शिष्यानें स्वखुषीनें अंगावर घेतलें असल्यास गुरूनेंही आपली अनुमति दिली असणें असंभवनीय नाहीं.

यानंतरची निरंजनाची कृति म्हणजे सन १७६५ मध्यें त्यानें रचलेला ' ज्ञानेश्वर-विजय ' हा श्लोकबद्ध चरित्रग्रंथ होय. याची श्लोकसंख्या १०३८ असून नामदेवाच्या आदि व समाधि या अभंगांच्या आधारें अनुक्रमें पूर्वखंड व उत्तरखंड असे निरंजनानें त्याचे दोन भाग पाडले आहेत. या पूर्वखंडाचे पुन: पांच अध्याय असून उत्तरखंडाचे १७ आहेत. पण उत्तरखंडाच्या पांचव्या अध्यायापासून पुढें शेवटपर्यंत कवीनें आपल्या ग्रंथास 'श्रीज्ञानेश्वर-विजय महाकाव्य ' असें म्हटलें आहे. यावरून ज्ञानेश्वराच्या

अद्भुत चमत्कारांनीं व कुलवृत्तानें व्यापलेल्या पूर्वखंडापेक्षां ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांचा समाधिग्रहणाचा उत्तरकालीन चरित्रभागच त्यास विशेष महत्वाचा वाटला असावा. संस्कृत साहित्यशास्त्रांतील महाकाव्याच्या काटेकोर व्याख्येप्रमाणें सदर ग्रंथास महाकाव्य म्हणतां येणार नाहीं, पण कवीची आध्यात्मिक वृत्ति लक्षांत घेतां पारमार्थिक गोष्टींचें वर्णन करणारा हा भाग त्याला महाकाव्य वाटणें साहजिकच होतें.

आणखी दोन वर्षांनीं म्हणजे सन १७६७ त 'वृत्तवनमाळा' या नांवाचा वृत्तशास्त्रावरील आणखी एक प्रबंध रचून लगेच त्याच्या पुढील वर्षीच 'सुभद्राचंपू' नांवाचा मराठी वाङ्मयाला एकमेव चंपूग्रंथ निरंजनानें निर्माण केला. संस्कृत काव्याच्या धर्तीवर याचे ७ सर्ग असून त्यांत ३०३ श्लोक व ७७ चूर्णिका आहेत. चंपू म्हणजे गद्यपद्यमिश्रित काव्य. पण यांतील गद्यभाग जो चूर्णिका त्या देखील अर्थाप्रमाणेंच इतक्या नादमधुर आहेत कीं, त्यांवरून बाणभट्टाच्या मनोहर शैलीची थोडीफार कल्पना यावी. सदर काव्यग्रंथ कवीनें महाभारत, भागवत व इतर पुराणें यांच्या आधारें रचला असून, सुभद्राहरण हा त्याचा प्रमुख विषय आहे.

स्फुट प्रकरणांपैकीं स. १६६९ त वशिष्ठ-सुशर्मा-संवाद व रामकर्णामृत अशा दोन कृतींना; तर १७७२ त पुनः 'वृत्तावंतस' अशा वृत्तशास्त्रावरील आणखी एका ग्रंथाला जन्म देऊन निरंजनानें आपली वाङ्मयसेवा आमरणांत चालल्याचें लोकानिदर्शनास आणलें आहे. आज उपलब्ध असलेल्या त्याच्या ग्रंथांतील हा शेवटचा ग्रंथ त्यानें आपल्या ७० व्या वर्षीं लिहिला असून, त्याशिवाय मध्यंतरीं हनुमंत, श्रीराम, महालक्ष्मी, मल्हारी, व्यंकटेश, सांबशिव, भवानी, विठ्ठल, तुलसी, भागीरथी, गोदावरी, बनशंकरी,

सद्गुरु इत्यादि देवदेवतांवर एकंदर २१ स्तोत्रांचा व अष्टकांचा बराच मोठा संग्रह त्यानें रचला आहे. ज्या देवाचें अगर देवतेचें स्तोत्र गावयाचें त्यास अगर तिला एकदम उच्चतर कोटीस बसवून त्या मानानें इतर देवदेवतांना थोडें कमी लेखावयाचें, ही पद्धति प्रस्तुत संग्रहांत कवीनें ठिकठिकाणीं अंगिकारली आहे. राजकारणी कामगिरीवर जात असतां कवीस ज्या क्षेत्रांना जाण्याची संधि मिळाली ती त्यानें न दवडल्यामुळें वास्तविक येथें प्रत्यक्ष त्या त्या देवस्थानाचें व देवतामूर्तीचें वर्णन स्वाभाविकपणें येणें युक्त होतें; पण कवि या स्तोत्रसंग्रहांत चमत्कृतीला व अलंकारिक वर्णनांना बळी पडल्यामुळें देवदासाच्या व्यंकटेशस्तोत्राचा जिव्हाळा यांत उतरला नाहीं. तथापि प्राचीन मराठी कवींत निरानिराळ्या देवदेवतांवर एवढा मोठा स्तोत्रसंग्रह रचणारा अन्य कवि सांपडणें मुष्कील हें मात्र खरें.

याशिवाय शंकराचार्यांच्या 'स्वात्मानन्दप्रकाश' या ग्रंथावर निरंजनमाधवानें प्राकृत गद्य टीका केली असून, पेशवे दप्तर नं. २२, २६, २८ व ३० यांतील त्याच्या अस्सल पत्रव्यवहारानें तर त्याच्या गद्य दरबारी भाषेचा लाभ आपणांस होऊन चुकला आहे. निरंजनाच्या सडेतोड व तडफदार पण प्रसंगविशेषीं यजमानास योग्य तो सल्ला देणाऱ्या स्वभावाची या पत्रव्यवहारांत ओळख पटून, मुत्सद्दी व राजकारणी पुरुष कवित्वास कांहीं पारखे नसतात, याचें रघुनाथ नारायण हणमंत्याप्रमाणेंच तोही एक स्पष्ट प्रतीक मानण्यास सर्वथैव योग्य आहे, अशी कल्पना होते.

## निरंजनमाधवाचें कवित्व व व्यक्तित्व

निरंजनमाधवाच्या 'स्तोत्रसंग्रहा' वरून व 'सुभद्रा चंपू'-वरून त्याच्या कवित्वाचा व व्यक्तित्वाचा मात्र चांगला कयास

बांधतां येतो. या दोन्ही ग्रंथांत यमकानुप्रासात्मक व संस्कृत समासप्रचुर अशा त्याची वाणी आपल्या नादमाधुर्यानें वाचकांच्या मनाला मोहनी घालते[1]. संस्कृत पंचमहाकाव्यांचा तर त्याच्यावर एवढा परिणाम झाला आहे कीं, त्यानें केलेलीं देवदेवतांच्या अंगसौष्ठवांचीं वर्णनें निव्वळ सांकेतिक म्हणून कायम ठशाचींच वाटावीं! तथापि एवढ्यावरून आमचा कवि परप्रकाशित किंवा निव्वळ भाषांतऱ्या असें म्हणण्याचें धाडस मात्र कोणी करूं नये. निरंजनमाधवाजवळ त्याला स्वयंप्रभ कवि म्हणण्याइतकी नसली तरी बऱ्याच उच्च दर्जाची प्रतिभा असून,ती त्यानें प्रस्तुत 'स्तोत्रसंग्रहां'त व 'सुभद्राचंपू'त अनेक स्थलीं निदर्शनास आणली आहे. 'सांबशिवस्तुतिध्यानां'तील श्रीमुखाचें[2] अथवा 'रामकर्णामृत' स्तोत्रांतील रामाच्या कीर्तीचें[3] अनुक्रमें व्यंग्योत्प्रेक्षा व व्याजस्तुति अशा अर्थालंकारांच्या आधारें आमच्या कवीनें केलेलें वर्णन इतकें मनोज्ञ व चमत्कृतिजनक आहे कीं, त्यावरून सामराज-रघुनाथपंडिताप्रमाणें एकादें महाकाव्य अगर खंडकाव्य रचण्याची आपली पात्रता त्यानें सहजच सिद्ध केली आहे. 'सुभद्राचंपू'तील त्याची रैवतकवर्णनासारखीं[4] स्थळवर्णनें व शरत्कालवर्णनासारखीं[5] ऋतुवर्णनें, मुक्तेश्वराच्या तशाच प्रकारच्या वर्णनांची आठवण करून देत असलीं, तरी स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पण एकंदरीनें पाहतां निरंजनमाधव भावनाप्रधान असण्यापेक्षां बुद्धिप्रधानच अधिक. कोणत्याही देवदेवतेचें अगर स्थलाचें वर्णन करीत असतां, तो बाह्यवर्णनांत जसा रमतो

(१) तुलसीस्तोत्र ३१, ४६. (२) निरंजनमाधवांची कविता, भाग १ पृ. २५ श्लोक २६. (३) रामकर्णामृत, श्लोक ४१, ४७, ४९. (४) सुभद्राचंपू, सर्ग ३. (५) सुभद्राचंपू, सर्ग ६.

तसा अंतरंगवर्णनांत रमत नाहीं. त्यामुळें स्तोत्रसंग्रहासारख्या भक्तिभावान्वित काव्यकृतींत देखील ठराविक अलंकारिक वर्णना-पलीकडे त्याच्या अंतःकरणाची आर्तता कोठेंच प्रत्ययास येत नाहीं. स्तोत्रांत वास्तविक त्या त्या देवदेवतेबद्दल स्तोत्रकाराच्या मनांत वागत असलेला भक्तिभावच अगदीं साध्या व उचित शब्दांत व्यक्त व्हावयाचा असून, बाह्यांगवर्णनांत उडणारा अलंकारांचा थाटमाट तेथें अनुचित व स्तोत्राची मूळ भूमिकाच बिघडून टाक-णारा म्हटला पाहिजे. निरंजनमाधवाच्या काव्यांत हीच गोष्ट नेमकी झाली आहे. त्याच्या काव्यांत कल्पनाचातुर्य अथवा कृति-वैचित्र्य भरपूर असलें, तरी वाचकांच्या हृदयाची तार छेडली जाईल असा एकही उत्कट भावनेचा हृत्कंपक प्रसंग सांपडत नाहीं. भावनेच्या उत्कटतेचा अथवा सखोलतेचा कविमनांतच जेथें अभाव तेथें ती वाचकांच्या मनांत प्रतिबिंबित होणार तरी कशी ?

तथापि निरंजनमाधवाची कविता बहुतांशीं परनिष्ठ असूनही त्याच्या व्यक्तित्वाचे अस्पष्ट पडसाद तेथें वाचकांना ऐकावयास सांपडतात. कवीनें आपल्या गुरुजवळ काव्य व कौमुदी वगैरेचा अभ्यास करून पांडित्य संपादन केलें होतें; हें आपणास जसें ' सांप्रदायपरिमळा ' वरून समजतें, तसेंच तें कांहीं स्तोत्रांतील[1] निवळ संस्कृत रचनेवरूनही निदर्शनास येतें. संस्कृत कवींचें सूक्ष्म अध्ययन करून व त्यांतील वेंचक रत्नें आपल्या वाङ्मुक्ताप्रसरा-मध्यें गुंफून तीं सहृदय वाचकांचीं हृदयाभरणें करण्याचा कवीचा उद्देश असल्यामुळें, आपल्या कांहीं स्तोत्रांत मेघदूत[2], रघुवंश[3],

(१) नारायणाष्टक, तुलसीस्तोत्र ३१,४६. (२) निर्वैाष्टराघवचारित १५, सांबशिवस्तुति ध्यान ३. (३) भागीरथी स्तोत्र १२.

काव्यप्रकाश[१] व भगवद्गीता[२] इत्यादि ग्रंथांतील वचनांचा त्यानें सुंदर अनुवाद केला आहे. पुढें व्यंकटेशस्तोत्रांत[३] कृष्णावताराचा उल्लेख करतांना भगवद्गीतेबद्दलची आपली दृढभक्ति व परिचय त्यानें असाच सिद्ध केला आहे. याशिवाय पुष्कळ वेदांतविषयक ग्रंथांचाही त्याचा अभ्यास गाढा असावा. रामाच्या 'वैषम्यनैर्घृण्यपरिहारा' चें वर्णन[४] देतांना साहजिकच कवीनें आपलें ब्रह्मसूत्रांचें व शांकरभाष्याचें अध्ययन व्यक्त केलें असून ब्रह्मसूत्राच्या द्वितीयपादांतर्गत प्रथमोल्लासांत 'वैषम्यनैर्घृण्यप्रसंगा'त या सूत्राच्या व शंकराचार्यांच्या त्यावरील भाष्याच्या अनुरोधानें त्या सूत्राचेंच नांव वरील प्रकरणास त्यानें देऊन टाकलें आहे. पण एकंदर प्रकरणाचा मथितार्थ पाहतां त्यांत वरील सूत्राचा आशय दिला नसून परमेश्वर सुष्ट-दुष्टांस समतेनेंच वागवितो या तत्त्वाचेंच प्रतिपादन केलेलें आढळतें.

वर वर्णन केलेल्या पांडित्याबरोबरच निरंजनाजवळ रसिकताही भरपूर होती. त्याचा स्तोत्रसंग्रह नुसता वरवर चाळला तरी 'रामकर्णामृता-' सारख्या एकाच स्तोत्रांत परिसंख्या, अधिक, परिवृत्ति, व्यतिरेक, काव्यलिंग, अपन्हुति, परिकर, अतिशयोक्ति, व्याजस्तुति, रूपक, निदर्शना, समुच्चय, मालोपमा, अनुप्रास इत्यादि अर्थालंकार व शब्दालंकार मुक्त हस्तानें विखुरलेले आढळतात. कवीला सदर स्तोत्रांत नवरसांचा आविर्भाव दाखवावयाचा असल्यामुळें या रसांच्या आधारानें रामाच्या चरित्राचें वर्णन करतांना कवीनें रामभक्तीबरोबरच आपलें रसविषयक ज्ञान स्पष्ट केलें आहे. आमचा कवि छंदःशास्त्रांत किती प्रवीण होता हें

(१) सांबशिवस्तुतिध्यान ३५. (२) भागीरथीस्तोत्र १०, श्रीविठ्ठलस्तोत्र २२. (३) व्यंकटेशस्तोत्र ८५. (४) रामकर्णामृत १३.

वृत्तशास्त्रावरील त्याच्या तीन ग्रंथांनीं समजून येण्यासारखें आहे. तथापि त्याच्या स्तोत्रसंग्रहांत येणाऱ्या स्रग्विणी, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, वसंततिलका, इंद्रवज्रा, मालिनी, भुजंगप्रयात, पंच-चामर, अनुष्टुभ् अशा नित्याच्या अक्षरगणवृत्तांव्यतिरिक्त इंदु-वदना व कुसुमशर या अपरिचित वृत्तयोजनेनें सदर शास्त्रांतील त्याची मौलिकताही डोळ्यांत भरल्याशिवाय राहात नाहीं. या अक्षरगणवृत्तांच्या कौशल्यदर्शनांत निरंजनाचें मात्रावृत्ताकडे दुर्लक्ष झालेलें नसून अष्टक, आर्या व पदें अशी थोडीफार जाति-रचनाही त्यानें करून दाखविली आहे. त्यानें रचलेलें ' ज्ञानेश्वरा-ष्टक ' हें मात्रावृत्तांत असून त्याच्या २२ मात्रा आहेत. आपल्या 'लक्ष्मीस्तोत्रां'त तर उपजाति वृत्ताचे १४ प्रकार सहज लीलेनें दाख-वून त्यानें आपलें वृत्तप्रभुत्व जसें सिद्ध केलें आहे, तशीच रसानुकूल वृत्तवैचित्र्यानें आपली योजकताही त्यानें प्रत्ययास आणली आहे.

या आनुषंगिक गुणांच्या जोडीला निरंजनांत आत्मिक गुणही बऱ्याच प्रमाणांत होत. आपल्या स्तोत्रसंग्रहांत व इतर काव्यांत त्यानें केलेल्या अलंकार व पक्वान्नवर्णनावरून* तो चांगलाच बहुश्रुत व चौकस असावा हें निर्विवाद ठरतें. त्याची गुरुभक्तिही उत्कट असून आपले गुरु लक्ष्मीधर बरवे यांच्याप्रमाणेंच ज्ञाने-श्वराबद्दलचा नितांत भक्तिभाव, त्यानें त्यांच्यावर एक स्वतंत्र चरित्र-ग्रंथ व अष्टक रचून जसा व्यक्त केला आहे, तसाच आपल्या ' श्रीसद्गुरुस्तवां'त गुरुविहीन माणसांचा प्रखर शब्दांत तीव्र निषेध व्यक्त केला आहे. गिरीचा व्यंकटेश हें कवीचें कुलदैवत असलें तरी अनेक देवदेवतांवर व विशेषतः शिवपार्वतीवर रचलेल्या स्तोत्रांनीं स्वकालीं बोकाळलेल्या शैववैष्णव वादाला भीक न

* निरंजनमाधवांचा स्तोत्रसंग्रह, गोदावरी मानसपूजा.

घालतां त्यानें आपलें सर्वोपासना--सहिष्णुत्व निदर्शनास आणलें आहे[1]. निरंजनमाधवानें आपल्या काव्यग्रंथांतून सर्वत्र ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार केला असून जगाकडे विश्वकुटुंबाच्या दृष्टीनें पाहण्याइतकी त्याची वृत्ति व्यापक बनली होती[2]. राजे लोकांकडून सरंजाम अथवा इनामें उपटणाऱ्या भोंदू गुरूंचा व बुवांचा तर त्याला इतका तिटकारा होता कीं, तशा दांभिक गुरूंची स्पष्ट शब्दांत हजेरी घेऊन त्यानें आपला निस्पृहतेचा बाणा राखला आहे[3].

वेदांताच्या बाबतींत आमचा कवि साहजिकच अद्वैतवादी असून मोक्ष हें ध्येय मानतांना भगवद्गीतोक्त ब्राम्ही स्थितीचें पसायदान त्यानें भागीरथीजवळ मागितलें आहे. याशिवाय इष्ट लक्ष्याच्या ठिकाणीं अनुसंधान लागण्यासाठीं ज्या पातंजल योगाची अत्यंत जरूरी असते त्यांतही निरंजनाची उत्तम गति असून अनाहत ध्वनि, षट्चक्रभेदन, कुंडलिनीशक्ति इत्यादि योगमार्गांतील पारिभाषिक शब्दांच्या त्यानें केलेल्या स्पष्टतेवरून[4] तो आपलें नित्याचें अनुभवजन्य ज्ञानच आपणास सांगत आहे अशी खात्री होते. ज्ञानदेवाप्रमाणेंच हटयोगाच्या अभ्यासानें 'योगी' ही पदवी जशी त्यानें प्राप्त करून घेतली आहे तशी ती त्यानें आपल्या नांवापुढें मोठ्या आत्मविश्वासानें लावलीही आहे. संतकवींच्या प्राचीन परंपरेस अनुसरून आमचा कवि शांकरमतानुयायी असल्यामुळें गीता व उपनिषत्प्रणीत अद्वैत तत्त्वज्ञानाची व अनासक्ति योगाची ओझरती शिकवण त्यानें आपल्या काव्यद्वारां वाचकांना दिली आहे.

पण लौकिक दृष्ट्या निरंजनाचा कवि म्हणून आपण कितीहि

(१) सांप्रदाय परिमळ, ५।११६-११९. (२) सां. पं. ५।७२, ७३. (३) सां. प. ४।१३९-१४१. (४) सद्गुरुस्तव.

वरचा अगर खालचा क्रमांक लावला, तरी त्याचा खरा आत्मा परमार्थसाधकाचा आहे, हें समजण्यास त्याच्या ग्रंथाबाहेर पाहण्याचें कारण नाहीं. एवढा मोठा उलाढालीचा राजकारणी व्यवसाय करीत असतां, ज्यानें आपल्या नित्याच्या महामंत्राच्या जपांत अंतर पडूं न देतां, दत्त व सिद्धेश्वर अशा दोन सांप्रदायांचें पालन मोठ्या निष्ठेनें केलें, तो जागतिक व्यवहारापेक्षां अध्यात्माला केवढें महत्त्व देत असेल हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. असें असूनही मध्यंतरीं नानासाहेब पेशव्यांची थोडी इतराजी झाली असतां, इंगितज्ञ अशा आमच्या कवीनें तीर्थयात्रेच्या मिषानें पुण्यांतून पाय काढला. यावरून व्यवहार सांभाळण्याचें त्याचें चातुर्य चटकन डोळ्यांत भरतें. 'सांप्रदाय परिमळां'त आलेल्या कांहीं उल्लेखावरून निरंजन हा सदाचारसंपन्न[1], परधर्मसहिष्णु[2], व उदारमतवादी[3] असून ढोंगी वर्तनाचा त्याला मोठा तिटकारा होता असें दिसून येतें.[4] आपल्या कुलाबद्दल व मातापितरांबद्दल त्याला निस्सीम आदर असून आपल्या पत्नीची योग्यता जाणून तिच्याशीं अभिन्नत्वाचें नातें ठेवणारा[5] प्राचीन मराठी कवींत तरी त्याच्याहून दुसरा कोणी दिसत नाहीं. एकंदरीनें पाहतां आमचा कवि अंतर्बाह्य समता पावलेला, प्रपंच साधून परमार्थ साधणारा, भगवद्भक्त, योगारूढ व शेवटीं सिद्धावस्था पावलेला असा महापुरुष होता याबद्दल संशय राहात नाहीं.

निरंजनमाधवासारख्या दीर्घकाल राजकृपेच्या छत्राखालीं वाढलेल्या चतुर मुत्सद्याचा वृद्धापकाल द्रव्यदृष्ट्या निश्चिंत व सुखाचा

(१) सां. प. ५।५५–७५. (२) सां. प. ५।४३-४४. (३) सां. प. ५।११९, १२१, १२७–१२८. (४) सां. प. ५।९७–९९,१३५ (५) सां. प. ५।१४४–१४८.

गेला असेल अशीच कोणीहि अपेक्षा करील. पण दुर्दैवानें ती फोल ठरविण्याचा प्रयत्न दक्षिण हैद्राबादचे प्रो. चिंतामण नीळकंठ जोशी यांनीं केल्याचें दिसून येतें.[1] कवीचा राजाश्रय नानासाहेबांच्या मृत्यूनंतर थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींतहि सन १७६९ पर्यंत चालला व यापुढें मात्र तो सुटून त्याची अगदीं दैन्यावस्था झाली असें अनुमान कवीच्याच बनशंकरी स्तोत्रांतील व विठ्ठल स्तोत्रांतील कांहीं उद्गारावरून[2] प्रोफेसरसाहेबांनीं काढलें आहे. त्यांचें पुढें म्हणणें असें आहे कीं, कवीनें सन १७६९ सालीं लिहिलेल्या श्रीरामकर्णामृत स्तोत्रांत 'झाली मद्भाग्यभाग्यसीमा तव गुणगणनीं' असे सुस्थितीचे उद्गार[3] काढून पुढील बनशंकरी, तुलसी[4] व श्रीविठ्ठल स्तोत्रांत ज्याअर्थीं हे दैन्यावस्थेचे उद्‌गार काढले आहेत त्याअर्थीं कवीला हे जे दुर्दिन आले ते १७६९ सालीं म्हणजे त्यांच्या वृद्धावस्थेंत होत. येथें प्रोफेसरसाहेबांची ही विचारसरणी पाहिल्यास, कवीनें आपल्या रामकर्णामृत स्तोत्रा-नंतर क्रमानें श्रीतुलसी, बनशंकरी व श्रीविठ्ठल हीं स्तोत्रें एकामा-गून एक लिहिलीं, असें त्यांनीं गृहीत धरल्याचें दिसून येतें. वास्तविक असें गृहीत धरण्यास कालक्रमाचा जसा आधार नाहीं, तसाच कवीची वृद्धावस्था व दैन्यावस्था यांचा प्रोफेसरसाहेब घालतात तसा मेळ बसण्यास 'सांप्रदाय परिमळा'सारख्या चरित्रपर ग्रंथांत पुरावाही सांपडत नाहीं. आज तुलसी-स्तोत्राच्या रचना-कालीं कवीला वृद्धत्व येऊन त्याच्या इंद्रियांना शिथिलता आली होती व त्याच्या इष्टमित्रांनीं त्याला टाकलें होतें असें आपणास

(१) निरंजन माधवाच्या स्तोत्रसंग्रहावर टीकात्मक निबंध (१९३५) पृ. १४, १५, १६, २६. (२) बनशंकरी स्तोत्र ३, श्रीविठ्ठलस्तोत्र ५४. (३) रामकर्णामृत १०८. (४) श्रीतुलसीस्तोत्र ४४.

समजलें, तरी त्याच वेळीं कवि पैशाला महाग झाला होता असें आपणास पाहिजे तें अनुमान, श्रीतुलसीस्तोत्राचा वरील इतर दोन स्तोत्रांतील मजकुराशीं कशी तरी सांगड घालून काढतां येईल असें वाटत नाहीं. तसें पाहिलें तर 'बनशंकरी' व 'विठ्ठल स्तोत्रां'त व्यक्त झालेल्या कवीच्या अकिंचनत्वाच्या उद्गारास निरंजनाच्या चरित्रांतील एक घटनाच कारणीभूत झालेली आहे. 'सांप्रदाय-परिमळा'वरून आपणास हें समजून चुकलें आहे कीं, नानासाहेबांच्या कारकीर्दींत कवीला राजकारणांतून थोडा देखील अवसर मिळत नसे, व त्याच्या तर मनास तीर्थयात्रा करावी असा ध्यास लागला होता. याच वेळीं कांहीं दुष्ट लोकांनीं नानासाहेबांस त्याच्या-बद्दल खोटया गोष्टी सांगून त्यांचें मन कलुषित केलें होतें. नानासाहेबांचें बाबूजी नायकाशीं व रघूजी भोसल्याशीं वैमनस्य पडल्याचा १७४०–४१ हा काल असून निरंजनमाधव वरील दोघांना पेशव्याविरूद्ध सामील आहे, अशी खोटी गोष्ट कोणी तरी दुष्टाव्यानें नानासाहेबांस सांगितली असावी. पुढें हा संशय दूर होऊन कवीविषयीं नानासाहेबांची वृत्ति पुनः निवळली असली तरी त्याच्या मनाची उद्विग्नता कायमची राहिली. यावरून माझी अशी समजूत आहे कीं, धन्याच्या गैरमर्जीच्या कालांत म्हणजे १७४०–४१ च्या सुमारास थोडे दिवस कवीची नोकरी सुटून त्याला अकिंचनत्व आलें असावें व या उद्विग्नतेच्या कालांतच 'श्रीबनशंकरी' व 'श्रीविठ्ठलस्तोत्रां'त उल्लेखलेले खिन्नतेचे उद्गार त्याच्या तोंडून निघाले आहेत. त्याला यात्रेचा ध्यास लागला होता; पण बादामी अगर पंढरपूर या स्थलीं त्याला द्रव्याभावीं जाणें शक्य नव्हतें. अशी परिस्थिति या वेळींच संभवते, हें येथें लक्षांत घेणें जरूर आहे. निरंजनमाधव बराच वृद्ध झाला होता. ७० वर्षें वयापर्यंत त्याची

वाङ्मयसेवा चालू होती असें सांगणारा पुरावा आहे. पण त्याच्या जीवनाच्या अस्तमानकाळीं त्याला दैन्यावस्था येऊन तो निर्धन झाला होता हें पुराव्याच्या अभावीं पटण्यासारखें नाहीं.

शेवटीं निरंजनमाधवाच्या भाषेबद्दल दोन शब्द लिहिणें जरूर आहे. संस्कृत भाषेवर त्याचें एवढें प्रभुत्व आहे कीं, 'मारीचांगजरक्त आसव, एणां बुसी कांचनी मायाभ्रांति' अशासारख्या दुर्बोध सामासिक शब्दाबरोबरच शैलूष, रोलंब, कीकस, क्ष्वेड, इन, मिहिर, द्रुहिण, इत्यादि अपरिचित शब्द त्यानें अगदीं सहजासहजीं योजले आहेत. वृत्तसुखार्थ एकाद्या शब्दांतील मूळच्या अक्षरांत बदल तर न व्हावा पण मूळचा अर्थ मात्र कायम रहावा, असें करतांना निरंजनाचें गीर्वाणभाषाप्रभुत्व त्याच्या मदतीस धावलें आहे.* आमच्या कवीचा मराठीचा व्यासंगही कांहीं कमी नसून, तां (त्वां), कृपा (कृपेनें), माज, गिवसणें, आरोपणें, तुकणें, दिठी, आतुडणें अशा जुन्या शब्दांवरून त्यानें ज्ञानेश्वरापासून शिवकालापर्यंत बहुतेक प्राचीन काव्य डोळ्याखालून घातलें असणें शक्य आहे. वृत्तसौकर्यार्थ भाषेच्या शुद्धाशुद्धतेकड वामनपंडिताप्रमाणेंच, त्याच्या झालेल्या दुर्लक्षाची भीवोनि, हंमति, वीभूती, अनूप, अजहरा, असे अशुद्ध शब्दप्रयोग व संसार, आपांपती, तापत्रयअंधकार मानअपहा, अशी संधीची मुद्दाम केलेली टाळाटाळ, या गोष्टी चांगलीच खातरजमा करणाऱ्या आहेत. त्याशिवाय 'समुदे' हा शब्द; 'झाला' या अर्थीं 'घडला' या शब्दाची योजना, 'महिमा' शब्दाचा स्त्रीलिंगी उपयोग, हे प्रकार निरंजनमाधवाचे इतके सर्वसाधारण होऊन बसले आहेत कीं, एवढ्यावरूनही त्याच्या इतर काव्याची आप-

* उदाहरणार्थः—कल्पतरु या अर्थीं कल्पशाखी, अमराग, सुराग, स्वर्भूरुह, कल्पाग, असे शब्द त्यानें योजले आहेत.

णास निश्चिति करतां यावी ! निरंजनाच्या भाषेला अस्सल मराठी वळण तर नाहींच; उलट, तूं सारिखा, मीहुनी, तूं विना, असे प्रयोग व हावतार (हा+अवतार), नुपमा (न+उपमा) असे नको तेथें संधीही मराठीला मान्य होण्यासारखे नाहींत. आमच्या कवीला हिंदुस्थानी, कानडी, गुजराथी अशा इतर भाषाही येत होत्या असा प्रवाद आहे. पण असा प्रत्यय मात्र त्याच्या कोणत्याच ग्रंथांत वाचकाला येत नाहीं. निरंजनमाधवाची भाषा प्रौढ व सुश्लिष्ट असली, तरी संस्कृतभाषानभिज्ञास तिची माधुरी कळणें मात्र दुरापास्त आहे.

आमच्या कवीचे ग्रंथ श्रीरंगपट्टण, बेलूर किंवा रामडोह येथें सांपडण्याचा संभव आहे अशी आशा प्रो. पोतदार यांनीं प्रदर्शित केली आहे. निरंजनमाधवाचे वंशज हल्लीं पुण्यास राहात असून, पारसनीस असें आडनांव लावतात असें रा. रा. आबा चांदोरकर यांजकडे केलेल्या चौकशीवरून समजतें. वकिलातीच्या कामगिरीवर असतांना कवीला फारशी भाषेंत जो पत्रव्यवहार करावा लागला असेल त्यावरून त्यास वरील आडनांव मिळालें असावें. निरंजनमाधवास बेलूर मुक्कामीं प्राप्त झालेली सुंदर कृष्णाची मूर्ति त्याच्या वंशजाकडे असून तिची पूजाअर्चा त्यांच्याकडून चालत आहे. कै. ह. भ. प. पांगारकर यांना नाशिकास ज्या भिक्षुकाच्या घरीं कवींचे ग्रंथ सांपडले, त्याचें नांव समजल्यास निरंजनाच्या इतर ग्रंथांचा सुगावा लागण्याचा बराच संभव आहे. कदाचित् हे भिक्षुकच निरंजनमाधवाचे कोणी ऋणानुबंधी अथवा लांबचे आप्तसंबंधी निघावयाचे !

# ६. सांप्रदाय परिमळाचा कर्ता कोण ?

## अर्थातच निरंजन माधव !

लेखक—**प्रा. चिंतामण नीळकंठ जोशी,** एम. ए., हैदराबाद दक्षिण.

छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे
शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा ॥ – कालिदास

### पूर्वेतिहास

प्रस्तुत विषय वादग्रस्त आहे. महाराष्ट्र सारस्वतकार[१] भावे, कविचारित्रकार[२] म. भा. भू. ज. र. आजगांवकर, निरंजन[३] काव्यप्रकाशक ह. प. पांगारकर व कवि नाथ निफाडकर[४] यांनीं सां. प. चें कर्तृत्व निरंजनाकडे दिलें आहे. तर प्रो. पोतदार[५], प्रो. पां. शि. सबनिस[६], व प्रो. पंगु[७] यांनीं तें निरंजनदासाकडे निःसंशय जातें असें प्रतिपादिलें आहे. हा वाद सन १९२८ पासून चालू असून म. सा. पत्रिका, प्रतिभा मासिक व केसरी[८] यांमधून त्याची चर्चा झाली आहे. सन १९३४ सालीं बडोदें येथील म. सा. संमेलनांत पाहिल्या पक्षास अनुसरून मी एक सारांशरूप निबंध वाचला. त्यां वेळीं प्रो. पोतदारच त्या शाखेचे अध्यक्ष होते. माझ्या मुद्यावर त्यांनीं जीं त्रोटक उत्तरें दिलीं त्यांचा उल्लेख या निबंधांत जागोजाग केला आहे. माझा समग्र निबंध विविधज्ञान विस्ताराकडे-छाप-

(१) म. सा. आ. २ री, पा. ३१५. (२) क. च. पा. ३३६. (३) नि. मा. क. भा. २।३ प्रस्तावना. (४) मा. सा. पत्रिका, वर्ष ३ अं. ४. (५) म. सा. पत्रिका, १९२८ वर्ष१ अं. १. (६) वि. ज्ञा. वि. वर्ष ५९, अं. ८. (७) प्रतिभा १४।९।३४. (८) केसरी ५।७।३४ व २७।७।३४.

ण्यास दिला होता. त्यापैकीं कांहीं भाग वर्ष ६६ स. १९३५ अंक १ ते ६ मध्यें प्रसिद्ध झाला. परंतु पुढें तें मासिक बुडालें व माझें परिश्रमपूर्वक लिहिलेलें हस्तलिखितही त्याबरोबर बुडालें. तो समग्र प्रसिद्ध झाला असता तर सां. प. व निरंजनाचे इतर ग्रंथ यांतील साहश्यें विद्वानांपुढें विपुलतेनें आलीं असतीं. कै. पांगारकरांच्या या स्मारकग्रंथांत तीं संपूर्णपणें देण्यास वाव नसल्यामुळें पुष्कळ उदाहरणांस संक्षेप देणें भाग पडलें आहे, त्यास नाइलाज आहे.

प्रो. पंगु यांनीं आपल्या ‘ प्राचीन मराठी कविपंचक ’ या सन १९४४ मध्यें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांत ‘ निरंजनमाधवा’ वरील निबंधांत या विषयावरील आपलीं मतें पुनः एकत्रित करून दिलीं आहेत. त्या सर्वांचा परामर्श या निबंधांत यथावकाश घेतला आहे.

प्रस्तुत विषयाचें विवेचन मी तीन भागांत करण्याचें योजिलें आहें. पहिल्यांत निरंजनदासाचे कर्तृत्वाआड येणाऱ्या गोष्टींचा विचार केला आहे, दुसऱ्यांत निरंजनाचे कर्तृत्वाविरुद्ध भासणाऱ्या गोष्टी सांगितल्या आहेत आणि तिसऱ्यांत या विरोधाचा परिहार कसा करितां येईल हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. आतां पहिल्या भागाकडे वळतों.

## भाग १ ला,

## निरंजनदासाचे कर्तृत्वाआड येणाऱ्या गोष्टी.

(१) मथळा व समर्पणः—( अ ) सांप्रदाय परिमळ ग्रंथ उघडल्याबरोबर जी पहिली गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते, ती त्यांतील मथळे ही होय. यांत ग्रंथारंभापूर्वीं एकंदर सात नमनें आहेत. त्यांतील पहिलें श्रीसुंदर कृष्णास आहे, या मूर्तीच्या मागें मोठा महत्त्वाचा इतिहास आहे. सांप्रदाय परिमळाचे अभ्यासकांस तो

सांगितला पाहिजे असें नाहीं. गुरुद्वयाच्या इतकीच महत्त्वाची व पारमार्थिक आयुष्यक्रमाशीं अत्यंत निगडित अशी जर कोणती गोष्ट निरंजनाची असेल तर ती ही मूर्ति होय.

**सांति अत्यंत माझिया मना । उच्चार वाटे जाइजे श्रीपाददर्शना ।**
**दाक्षिणयात्नाभ्रमणा । जाऊं गोकर्णा सुतीर्था ॥ ३-१८४ ॥**
**पाहूं वेलूर मूळस्थान । जेथें विराजे सुंदर कृष्ण ।**
**सर्वजनमनमोहन । मदनमोहन जो होय ॥ ३-१८५ ॥**

या ओव्यांत या मूर्तिदर्शनाची त्याची आतुरता स्पष्ट दिसून येत आहे. तेव्हां त्या मूर्तीला निरंजनानें नमन करणें जितकें स्वाभाविक व उचित आहे तितकें ‘ दासा’ च्या बाबतींत खास नाहीं. त्याचाही निरंजनासारखाच या मूर्तीशीं जिव्हाळ्याचा संबंध होता हें निदान अद्यापि तरी सिद्ध झालेलें नाहीं. केवळ गुरूची प्रिय मूर्ति म्हणून त्यानें नमनांत उल्लेख केला असें म्हणतां येईल. पण त्यात औचित्य खास नाहीं. या मूर्तीसच उद्गार एक, दोन व पांच यांत अर्पण केलेलें आहे. तेव्हां जो कोणी या काव्याचा कर्ता असेल त्याचा या मूर्तीशीं अगदीं घनिष्ठ संबंधच असला पाहिजे आणि तो निरंजनदासाचा नसून निरंजनाचाच होता. एवढेंच नव्हे तर असें समर्पण करण्याची निरंजनाची पद्धतीच होती. कारण ८, ९ व १० या स्तोत्रांत त्यानें असेंच समर्पण केलें आहे. त्याचप्रमाणें त्याच्या ‘ ज्ञानेश्वरविजय ’ ग्रंथाचे प्रारंभीं नमन व अखेरीस समर्पण याच सुंदर कृष्णास त्यानें केलेलें आढळतें. सुभद्राचंपू या त्याच्या ग्रंथांतही श्री सुंदर कृष्णासच नमन आहे. तेव्हां अशी पद्धति निरंजनदासाची होती हें सकारण सिद्ध होईतों सांप्रदाय परिमलाचें कर्तृत्व त्याजकडे देतां येत नाहीं. तें निरंजनाकडेच राहतें.

( ब ) दुसरें नमन श्री शैलनिलयास म्हणजे वेंकोबास आहे. व्यंकटेश हा निरंजनाचा कुलस्वामी होता. त्यानें त्यावर एक स्वतंत्र सुंदर स्तोत्र रचलें आहे (१५ वें स्तोत्र). त्यांत ' कुळस्वामी मादूत्त त्रिभुवनपति वेंकटपती । ' असें म्हणून ' तदा ये श्रीशैलीं, धरणि धरिली अंकफळकीं ' त्याच्या श्रीशैलपर्वतावरील निवासाचा उल्लेख केला आहे. तेव्हां ग्रंथारंभीं त्यास नमन करणें हें निरंजनाचे बाबतींत जेवढें समुचित तेवढेंच निरंजनदासाचे बाबतींत अनुचित दिसतें. त्यानें आपल्या गुरूचें म्हणजे निरंजनाचें कुळ-दैवत स्वीकारलें असेल असें जर कोणी समर्थन करूं पाहील, तर त्याला तसा अन्य पुरावा हुडकावा लागेल. आजपर्यंत तरी तसा पुरावा पुढें आलेला नाहीं.

( क ) हीच गोष्ट ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' या तिसऱ्या नमनासंबंधीं आहे. या मंत्रावर निरंजनाची मंत्रयुक्त रचना प्रसिद्ध आहे ( स्तोत्र १६ वें ). पण ' दासा 'चा या मंत्राशीं अशा प्रकारें किंवा अन्य रीत्या निदान तूर्त तरी संबंध जोडतां येत नाहीं; कारण त्याची कृतिच अद्यापि कोणास ठाऊक नाहीं. यापुढील दोन नमनें सामान्य आहेत व त्यांचे पुढचीं दोन निरंजनाचे गुरूंस आहेत. तीं निरंजनानेंच करणें स्वाभाविक. दासाचा आजेगुरूंशीं संबंध दूरचाच !

( ड ) दुसऱ्या उद्गाराच्या मथळ्यावर ' श्रीमत् तुळजापुर-निलयायै नमः ' असें आहे. तुळजापूरच्या भवानीस निरंजनाचें ' भवान्यष्टक ' असून त्या स्तोत्रांत तिचा ' तुकाई आई ' असा उल्लेख त्यानें केलेला आहे. अशाच प्रकारचा उल्लेख भवानीच्या आरतींतहि सांपडतो. पहा:— ' अष्टभुजा आई तुकाई । तुळजा स्वभक्त-वरदाई ॥ ' इ. त्याचप्रमाणें तिसऱ्या उद्गाराचे प्रारंभीं

' श्री शाकंभर्यै नमः ' असें आहे. या शाकंभरीचा उल्लेख निरंजनानें ' बनशंकरी स्तोत्रा'त ' नाहीं अन्य पदावलंब मजला तूंवीण शाकंभरी ॥ ३ ॥ ' असा केला आहे. त्याचप्रमाणें ' श्रीमत् त्रिपुरसुंदर्यै अर्पणमस्तु ॥ ' असें पांचव्या उद्गाराच्या अखेरीस समर्पण आहे. यांतील त्रिपुरसुंदरीचा उल्लेख निरंजनानें त्याच स्तोत्रांत ७ व्या श्लोकांत व ज्ञानेश्वरविजयांत पान २२, श्लोक १ मध्यें केला आहे. ( तूं विद्या त्रिपुरा शिवादि जननी माया जगन्मोहिनी । श्लो. ७ र. जे वैष्णवी त्रिपुरभैरवि भव्य काया । )

अशा रीतीनें प्रत्येक मथळ्यांतील नमन किंवा अखेरचें समर्पण यांचा प्रत्यक्ष संबंध अत्यंत समर्पकपणें निरंजनाशींच लावितां येतो. निरंजनदासाचे बाबतींत असें कांहींच नसल्यामुळें, त्याजकडे ग्रंथ-कर्तृत्व देऊं लागल्यास त्याला या निरर्थक व अभूतपूर्व उसन-वारीचे दोषास पात्र व्हावें लागेल. यावर प्रो. पोतदारांचें असें म्हणणें आहे कीं, निरंजनदास, निरंजनाचा मुलगा अथवा शिष्य असेल आणि तसें असेल तर, त्यानें हें सर्व उसने घेणें स्वाभाविक आहे. पण ह्या ' जरतरी ' संकेतार्थाचें प्रामाण्य किती मानावयाचें हें सूज्ञ जाणतातच ! शिवाय अशा उसनवारीचें एक तरी उदाहरण आहे काय ?

( २ ) ग्रंथारंभः—( अ ) मथळ्याकडून ग्रंथारंभींच्या पहिल्या ओवींकडेच दृक्षिक्षेप केल्यास आपणास पुनः ' श्रीसुंदरकृष्णाचेंच ' दर्शन घडतें.

**आधीं श्रीइष्टदैवत श्रीकृष्णनाथ । सुंदर सुंदरीप्राणनाथ ।**
**तोचि माझा सद्गुरुनाथ । शारदागणनाथ तो नमिला ॥१॥**

या मूर्तीविषयीं वरती उल्लेख आलाच आहे. मथळ्यांतील सात देवतांपैकीं ग्रंथारंभीं याच देवतेस नमनासाठीं निवडून काढण्यांत

कांहीं तरी रहस्य आहे. तें हेंच कीं, ती मूर्ति मोठ्या दैवी चमत्कारानें मिळाल्यावर निरंजनानें तिला आपलें ‘ इष्टदैवत ’ केलें होतें. म्हणून त्यानें तिचा नमनांत आपल्या गुरुशीं अभेद कल्पून उल्लेख करणें अत्यंत साहजिक आहे. पण निरंजनदासाचे बाबतींत मात्र तें तितकेंच अस्वाभाविक आहे. निदान त्यानें निरंजनाचें ‘ इष्ट-दैवत ’ हीं आपलें ‘ इष्टदैवत ’ मानिलें होतें याबद्दल अन्य पुरावा पुढें येईतों या शंकेचें समाधान योग्य झालें असें म्हणतां येणार नाहीं. यावरही प्रो. पोतदारांचा ‘ असेल ’वरच हवाला. त्यापलीकडे आधार मात्र कांहीं नाहीं !

( ब ) याच ओवींतली दुसरी ठळक गोष्ट म्हटली म्हणजे ‘ शारदागणनाथ ’ यांचे नमनाची असून त्यांसही गुरुरूप मानिलें आहे ही होय. हीच पद्धति निरंजनाचे इतर ग्रंथांतही आढळते. पहा:—

**या लोकीं गणनाथ बोधमय या भावोनियां पूजिजे ।**
**किंवा यासचि शारदा म्हणुनिया विद्यात्मिका भाविजे ॥**
**शुद्धानंद विलास यासचि गुरू हें नामही ठेविजे ।**
**तें मद्दैवत हृत्सरोजभुवनीं सर्वात्मका ध्यायिजे ॥**

—ज्ञा. वि. अ. १. २.

यांत अभेदवर्णनांतच साम्य आहे असें नसून ‘ शारदागणनाथ ’ हे शब्दही जसेच्या तसेच दोहींकडे आढळतात. निरंजनदासाचें कर्तृत्व मानिल्यास निरंजनानें ते जसेच्या तसेच उचलून घ्यावे हें विलक्षण दिसतें ! नाहींतर गुरूनें शिष्याची चोरी केली असें म्हण-ण्याचा प्रसंग येणार ! कारण ज्ञानेश्वरविजय दोन वर्षांनंतरचा आहे. पण सन १७५८ तल्या चिद्बोध रामायणांतील मंगलाचरणांतही ‘ श्रीगणनाथ व शारदा ’ याच शब्दांनीं त्यांचा उल्लेख करून

यांस नमन केलें आहे; व पुढें लागलीच ‘ सकलदेवतारूप ’ सद्गुरूस नमन केलें आहे. त्याचप्रमाणें ‘ सुभद्राचंपूत ’ही आरंभीं ‘ श्रीगणेशगुरुशारदाभ्यां नमः ’ असेंच नमन आहे. तेव्हां ही पद्धति खास निरंजनाचीच होती हें सिद्ध होतें. अशी पद्धत निरंजनदासाची होती असें अद्यापि सिद्ध झालेलें नाहीं.

( क ) त्याचप्रमाणें पुढील ओंवींतील ‘ एकाचि अनेक नामें धरी ’ या चरणांतील अद्वैत कल्पना साभिप्राय असून निरंजनानें आपल्या गुरुद्वयाचा ऐक्यभाव सूचित करण्यासच मुद्दाम घातलेली आहे असें वाटतें. इतकेंच नव्हे तर ‘ श्लोकः काव्यार्थसूचकः ’ या नांदीच्या व्याख्येप्रमाणें काव्यांतर्गत गुरुद्वयाचा स्वीकार एकरूपच आहे हेंही सूचित केलेलें आहे असें मला वाटतें. आतां या सर्व गोष्टी निरंजनाचे बाबतींत जशा तंतोतंत जुळतात, तशा निरंजनदासाचे बाबतींत जुळतात असें कोणीं दाखविल्यास त्याचेकडे या ग्रंथाचें कर्तृत्व देण्यास आमची मुळींच हरकत नाहीं. यावरही प्रो. पोतदारांजवळ साधार उत्तर नाहीं !

## ( ३ ) नमनांत निरंजनाचा अनुल्लेख

निरंजनदासाचा हा ग्रंथ आहे असें घटकाभर मानिल्यास नमनांत त्याच्या गुरूचा म्हणजे निरंजनाचा उल्लेख नसावा ही गोष्ट अत्यंत विस्मयकारक आहे. हा मुद्दा ह. प. पांगारकरांनीं मांडला असून माझे मतें फारच महत्वाचा आहे ! प्रो. पोतदारांनीं तर याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. प्रो. पंगूंनीं त्यास उत्तर दिलें आहे, पण तें अगदींच असमाधानकारक आहे. ते म्हणतात कीं; “ हा ग्रंथ शिष्यानें निरंजनाचे सांनिध्यांत लिहिला असल्यास त्यानें आपलें नांव घालूं दिलें नसेल. ” पण तें कां, हें ते सांगत नाहींत. पण कोणत्या तरी कारणानें तें घालूं

दिलें नसेल असें जर गृहीत धरलें, तर मग त्यानें तें अखेरीस तरी कसें घालूं दिलें ? कारण ' श्रीनिरंजन नमो नमो ' असें अखेरीस नमन आहे. तेव्हां यांत ' वदतो व्याघात ' हा दोष येत नाहीं काय ? विनयानें घालूं दिलें नसेल असें म्हटल्यास, ' योगीनाथ, दीनवत्सल ' इत्यादि पदांनीं दासानें केलेला समक्ष स्तव किंवा गंगावतीकडून ग्रंथभर केलेला स्तुतिवर्षाव तरी त्यानें शिष्यास कसा करूं दिला असता ? पण वस्तुतः निरंजन स्तुतिप्रिय किंवा यशः-प्रिय नव्हता असें नाहीं. ही गोष्ट शेकडों उदाहरणांनीं सिद्ध करतां येण्यासारखी आहे. पहाः—

**१ केली माधवनंदनें कविवरें मंत्राघहारावली ।**
**...पावला गुरुकृपें धन्यत्व सन्मंडळीं** ॥ स्तो० १–१५ ॥
**२ कवी निरंजन कीर्ति रची । कविवर संतां तोष करी ॥**
—स्तो० २–४४.
**३ पूजा हे रचिली निरंजन अशा नामें कवीनायकें** ॥ स्तो. ७
**४ सेवा घेउनियां प्रसिद्धि घडवा लोकांत या किंकरा ॥**
—ज्ञाने०वि.पा. ९४–२२.
**५ येथें काव्यकलाकलाप विलसे सौरभ्य ज्या सर्वदा ॥**
—ज्ञाने. वि. पा. ९५–२३
**६ केला मान्य जगांत या मिरविला हीनास्त जैसा रवी ॥**
—ज्ञाने. वि. पा. ९६–३५
**७ झाली म्हणोनि रसिका कविराजवाचा** ॥ सु.चं.पा. ६७–९
**८ सर्वालंकरणी रसासह वसे हे काव्यगी रंगभू ॥**
**येथें तांडव शारदा करितसे पाहा तुम्ही हे प्रभू ॥**
—सु. चं. पा. १०८–९७

अशा प्रकारें आत्मप्रशंसापर, आणखी किती तरी दाखले देतां येतील. तेव्हां निरंजनदासानें नमनांत गुरूचें नांव कां गाळलें याचें

अन्य समर्पक कारण दाखविलें पाहिजे हें उघड आहे. पुढें चवथ्या मुद्याचे विवेचनांत प्रो. पंगु म्हणतात कीं, ' आपले ग्रंथास महत्व यावें म्हणून आपले गुरूचा व त्याच्या पत्नीचा संवाद कल्पून कोणा निरंजनदासानें हा ग्रंथ लिहिला असावा.' हें जर खरें तर ग्रंथारंभीं गुरुस नमन केल्यानें त्या महत्वांत भरच पडली नसती काय ? पण तसें न केल्यामुळें मात्र त्यास न्यूनता आली आहे. एवढेंच नव्हे तर त्यामुळें त्याचे सच्छिष्यत्वासही डाग लागला आहे. पुनः सांप्रदायांत पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें परंपरेस फार महत्व आहे आणि परात्पर अगर आजे-गुरूचा उल्लेख करून प्रत्यक्ष गुरूचा न करणें हें तिच्याविरुद्ध आहे. एवढेंच नव्हे तर सामान्य व्यवहारांतही तें दोषास्पद आहे आणि तर्पणांत पित्याचें नांव गाळून पितामह—प्रपितामहांचा नामोच्चार करण्याइतकें तें हास्यास्पद आहे. आणखीही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, सां. परिमळांत वर्णिलेली सांप्रदायाची शिस्त फारच कडक होती. गंगावती ही शासनकर्ती नेमिली गेली होती, व शिष्यांकडून नियमांचें पालन योग्य तऱ्हेनें व्हावें म्हणून तिला जागोजाग सूचना दिलेल्याही आढळतात. निरंजनानें स्वतःच्या गुरूविषयीं अत्यंत उच्च प्रकारचा आदर व्यक्त केला आहे. स्तोत्र ११ मध्यें तो म्हणतोः—

---

(१) पण याविरुद्ध ते आपल्या प्रा. म. क. पंचक या ग्रंथांत ( पान १२६ ) असें म्हणतात कीं, ' या ओवीबद्ध ग्रंथांत कवीनें......इत्थंभूत हकीगत आपल्या प्रियपत्नी गंगावतीस निवेदन केली असून, पतीनें पत्नीला सांगितलेल्या या संवादरूप ग्रंथाची, वामनाच्या 'प्रियसुधे'शींच फक्त तुलना करितां येईल.' यांत खरें कोणतें ? मग कवि निरंजनदास आहे असें त्यांस कसें म्हणतां येईल ? तो असेल तर ही तुलनाच फोल होईल.

सुजारिणी-सुतास बाप-नांव ठाउकें नसे।
तयापरी गुरूविहीन तत्त्व जाणती कसे॥...
...गुरूविना अणीक तत्त्व दुष्ट मानिती।
तयां नरांसि निश्चयें पहा घडे अधोगति॥ इ. इ.॥

अशी शिकवण ज्यानें लोकांस स्वतःच्या आचरणानें व उपदेशानें शिकविली, तो निरंजन आपले शिष्यास शिस्त मोडण्यास सांगेल व अशा शिस्तींत तयार झालेला शिष्य गुरूनें औपचारिक रीत्या नको म्हटलें तरी ती मोडण्यास धजेल अशी कल्पना करणेंच अशक्य आहे. तेव्हां निरंजनदासाचे पदरांत सां. परिमळाच्या कर्तृत्वाचें श्रेय टाकावयाचें असेल तर त्याबरोबरच गुरूचें नांव नमनांत गाळल्याबद्दल झालेलें गुरुद्रोहाचें पातकही त्याचे माथीं मारणें भाग पडेल! एवंच, सां. परिमळाचें कर्तृत्व निरंजन दासाकडे देण्यांत 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' असें होतें.

हा अनुल्लेख नमनांतच आहे असें नाहीं, तर पांचव्या उद्गाराच्या शेवटच्या समर्पणांतही आहे. तेथेंही निरंजनाचे दोन गुरु व सुंदर कृष्ण यांसच समर्पण आहे, निरंजनास नाहीं!

पण येथें प्रो. पोतदार असें सुचवितात कीं, हा प्रमाद लेखकाचे हातून घडला असेल. म्हणजे येथेंही संकेतार्थच!

## (४) निरंजनदासाची भूमिका

प्रो. पोतदाराच्या मतें ग्रंथकाराची भूमिका अशी आहे कीं, निरंजन कवीनें स्वीकारलेल्या दोन संप्रदायांचा सविस्तर वृत्तांत खुद्द निरंजन व त्याची स्त्री गंगावती यांच्या संवादाच्या मिषानें द्यावा व प्रश्नोत्तरांत परस्परांनीं परस्परांवर स्तुति व प्रेम यांचा वर्षाव करावा इ. परंतु अशी भूमिका करिपण्यांत दासाचा कोणता हेतु होता हें मात्र प्रो. पोतदारांनीं सांगितलें नाहीं. प्रो. पंगूंनीं

दिलेल्या हेतूविषयीं विचार नुकताच वरती झाला आहे.

पण ही भूमिका कल्पिल्यावरही कांहीं अडचणी उत्पन्न होता-तंच. त्या अशा:—

(१) पहिल्या दोन ओंव्यांसंबंधींची अडचण वरती दाखविली असल्यामुळें तिची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं.

( २ ) पुढें ७ व्या ओवींत निरंजनदास असें म्हणतो कीं, 'स्वामी बहुतें शिष्यकुळें आकुळाचिरों गुरुसांप्रदाय कळावयातें येती,' इ. यांतील शिष्यकुळें कोणाचीं ? निरंजनाचीं कीं दासाचीं ? निरंजनाचीं असल्यास त्यांचा उल्लेख ' गुरुबंधु ' म्हणून करावयास पाहिजे होता. प्रस्तुतचा उल्लेख अनादरयुक्त वाटतो. शिवाय त्याचे शिष्यास दासाची मध्यस्थी कशास ? कारण सांप्रदायाचें शासन-कर्तृत्व त्याजकडे नसून गंगावतीकडे होतें.

( ३ ) पुनः दासानें इतरांची शिफारस सच्छिष्य म्हणून जी केली आहे ( ओ. ८ ते १३ ) हीही थोडी आढ्यतेची भासते.

( ४ ) बरें, हा दास ' सां. परिमळ ' रचावयाला परवानगी मागतो खरी, तरी पण तो इतिहास त्याला एकट्यालाच निरंजना-कडून कधीं समजला होता, हें त्यानें सांगावयास नको काय ? प्रो. पोतदारांनीं यासंबंधीं कांहींच खुलासा केला नाहीं. प्रो. पंगूंनीं मात्र पांगारकरांच्या चवथ्या मुद्यास उत्तर देतांना असें म्हटलें आहे कीं, तो इतिहास त्यास निरंजनाचे तोंडून कळला असला पाहिजे, व सर्व ग्रंथच त्याचे देखरेखीखालीं त्यानें ( दासानें ) लिहिला असेल, इ. पण अशी जर वस्तुस्थिति असेल, तर दासानें प्रस्तावनेंत असा स्पष्ट खुलासा करावयास हवा होता कीं, मीं या पतिपत्नींचा संवाद ऐकला व तो मी जसाच्या तसा श्रोत्यांना सांगत आहें. अशा आश्वासनाच्या अभावीं ग्रंथास प्रामाण्य कसें येणार व त्यावर

विश्वास तरी कोण ठेवणार? सामान्यत: अशी रीत आहे कीं, जेव्हां कवि कोणत्याही भूमिका पुढें आणून त्यांचे तोंडून एखादें कथानक संवादरूपानें कथन करतात, तेव्हां ते तसें स्पष्टपणें लिहितात. खुद्द निरंजनानेंच चिद्बोध रामायणांत हीच पद्धति स्वीकारली आहे. तो सांगतो:—

**मृडानीवल्लभें प्रेमें बोधिली स्वप्रिया उमा ॥ ६३ ॥**
**योगी निरंजनें भावें यथामति बलोदयें ।**
**चिद्बोधरामायण हें वर्णिलें भक्तिनिश्चयें ॥ ६४ ॥**

पण दासानें या पद्धतीचा अवलंब केला नसल्यामुळें त्याच्या कल्पिलेल्या भूमिकेस बाध येतो हें उघड आहे.

( ५ ) त्याचप्रमाणें सां. परिमळ प्रकाशन करण्याची अनुज्ञा मिळाल्यावर 'शिष्य प्रकाशवी' असें दासानें तृतीयपुरुषी व मोघमपणें कां म्हणावें? मी किंवा निरंजनदास, असें ठसठशीतपणें कां म्हणूं नये? या मुग्धतेमुळें त्याचें ग्रंथकर्तृत्व संशयित होतें.

( ६ ) आणखी असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, सां. परिमळांत जर निरंजनाच्या दोन्ही सांप्रदायांची सविस्तर व सरहस्य माहिती आली आहे, तर निरंजनाची व त्याच्या दोन्ही गुरूंची अनुज्ञा त्याच्या प्रकाशनास नको होती काय? पण तसें नसल्यामुळें या सर्व प्रस्तावनेचा (उद्गार १०) संबंध दासाकडे न लावतां निरंजनाकडे लावल्यास सर्व सुसंगत जुळतें.

( ७ ) या सर्वांहून महत्त्वाची गोष्ट ही कीं, जर सां. परिमळाचा कर्ता दास आहे, तर निरंजनाचे दोन्ही सांप्रदाय सांगून झाल्यावर स्वत:स अनुग्रह कसा मिळाला ही हकीकत त्यानें अवश्य सांगावयास पाहिजे होती. असें केल्यानें परंपरेचें सूत्र त्याचेपर्यंत पोहोंचलें असतें व ग्रंथास पूर्तता येऊन त्याचे नामास

सार्थकता आली असती. प्रस्तुत स्थितींत त्यानें ग्रंथास ‘ निरंजन सांप्रदायपरिमळ ’ असें तरी नांव द्यावयास पाहिजे होतें. पण त्यानें यांपैकीं कांहींच केलें नसल्यानें त्याची काल्पित भूमिका अगदीं फसली आहे असें म्हणणें भाग पडतें. परंतु ही अडचण निरंजनाचें ग्रंथकर्तृत्व मानल्यास येत नसल्यामुळें तें त्याचेकडेच ठेवणें योग्य आहे.

( ८ ) जर निरंजनदास हा आपला गुरु व त्याची पत्नी यांच्या काल्पनिक संवादाचा ‘ रिपोर्ट ’ करीत आहे असें मानलें, तर त्याचे ‘ रिपोर्टमध्यें ’ पुढील ओवी[1] विसंगत दिसते:—

**तुझ्या अर्थीं जाण । म्यां पूर्वीं ग्रंथ रचले पावन ।**
**आतां सांप्रदायप्रकाशन । करणें वल्लभे तुजसाठीं ॥ १-५३ ॥**

कारण या ‘ रिपोर्टरला ’ वल्लभेमागें तुझेसाठीं ग्रंथ लिहिले हें सांगण्याचें प्रयोजन काय ? पांगारकरांनींही या गोष्टीचा उल्लेख आपल्या पांचव्या मुद्यांत केला आहे. दासोंची भूमिका फसल्याचें प्रो. पंगूही कबूल करितात.

( ९ ) एकीकडे महादो बनाजीचें वर्णन करण्याची आतुरता व दुसरीकडे ग्रंथविस्ताराची भीति ही मनःस्थिति ‘ रिपोर्टराचे ’ बाबतींत असंभवनीय. त्यास निरंजनाचे बापाचा एवढा पुळका कोठून येणार ? ( उ० १-६४ )

( १० ) मी रंक काय ते गुण गातां । होईन समर्थ एकमुखें ॥१-१२३॥ हे स्वयंस्फूर्तीचे उद्गार निरंजनासच शक्य आहेत.

---

(१) उ० ५-५९-१६० ह्या ओव्यांत अशीच पुनरुक्ति असल्यामुळें त्याही दासाच्या विरुद्ध जातात अथवा ह्या सर्व निरर्थक ठरतात.

(२) ‘यावरून......निरंजनाचें आत्मचरित्रच भासविण्याचा त्याचा प्रयत्न विफल झाला आहे’ ( प्रा. म. क., पान १३१ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
33255 दि: 1.1.94

(११) ग्रंथविस्ताराचे भयानें ज्ञानसुधेचा हवाला 'रिपोर्टर' नें देणें अप्रयोजक वाटतें. तो पूर्वानुभवानें निरंजनच देऊं शकेल. (उ० २-३६). ह्यावरून दासाची कल्पिलेली 'रिपोर्टरची' भूमिका किती असंभाव्य आहे याची सहज खात्री पटेल.

(१२) गुरु व गुरुपत्नी यांचे सात्विक प्रेमानें उचंबळणारे कोमल भावनापूर्ण संवाद, घराण्याचा बारकाईचा व संगतवार इतिहास, निरंजनाचे स्वानुभवाचे बोल, दोन्ही सांप्रदायांची संपूर्ण व सरहस्य माहिती, गुरुभक्तीची उत्कटता, गुरुविरहाची तीव्रता, स्वप्नदृष्टांत, यात्रानुक्रम व त्यांतील अनुभव, किंचित् अप्रस्तुत पण व्यक्तिविषयक गोष्टींचा पाल्हाळ, सांप्रदायरक्षणार्थ केलेल्या कळकळीच्या सूचना, आणखी अशा कितीतरी गोष्टी या ग्रंथांत आल्या आहेत, व त्या इतक्या सरस वठल्या आहेत कीं, त्या खुद्द निरंजनाच्याच प्रतिभेंतून अवतरल्या असल्या पाहिजेत. हें कार्य दासाच्या भूमिकेकडून घडलें असावें असें वाटत नाहीं किंवा निरंजनाची नुसती देखरेख व सान्निध्य कल्पूनही त्यास तें साध्य करतां आलें असेल असें म्हणवत नाहीं.

(१३) प्रो. पंगूंनीं आपल्या प्रतिभेंतल्या लेखांत एक नवीन मुद्दा सुचविला आहे. ते म्हणतात:—" उद्गार ५ मध्यें १४३ ते १५१ ओव्यांत निरंजन माधव आपल्या पत्नीची स्तुति करितात, असें दर्शविलें आहे. निरंजनमाधवासारखा संत व योगी आपल्या पत्नीची व पर्यायानें आपली स्तुति व तीहि आपल्याच ग्रंथांत स्वमुखानें करील हें संभवत नाहीं. कोणा निरंजनदासानेंच वरील स्तुति आपल्या गुरूच्या तोंडीं घातलेली *आहे. याचें उत्तर पूर्वींच (पान ५-३) सोदाहरण येऊन गेलें आहे. त्यावरून निरंजन संत

* ही दासाची भूमिका विफल झाल्याचेंहि तेच सांगतात. पान ९ टीप पाहा.

योगी असूनहि स्तुतिप्रिय होता याची खात्री होईल. बरें, जी स्तुति स्वतः निरंजनानें करणें गौण, तीच स्तुति त्याच्याकडून निरंजनदासानें करविणें अधिक गौण नाहीं काय ? मी तर म्हणतों कीं, पहिली जिवंतपणानें व स्वाभाविकपणानें श्रेष्ठ तर दुसरी कृत्रिमतेनें हीन होय. पुनः या ओंव्यांत पतिपत्नींच्या अभिन्नत्वाचें जें तात्त्विक पण काव्यमय गोड वर्णन केलें आहे, तें कोणासही दूषणावह न होतां भूषणावहच होईल. एवढेंच नव्हे, तर असेंच वर्णन जवळ जवळ याच शब्दांत निरंजनानेंच आपल्या सुभद्राचंपूंत केलें आहे.

या दोन्ही वर्णनांत इतकें सादृश्य आहे कीं, तेवढ्याच पुराव्यावरून सांप्रदाय परिमळ दासाचा नसून निःसंशय निरंजनाचाच आहे असें कोणाही विचारी माणसास कबूल करणें भाग पडेल. पण हें पुढें येणारच आहे.

## ( ५ ) भाषासादृश्य.

सां. परिमळ, व निरंजनाचे इतर ग्रंथ यांत सादृश्य आहे ही गोष्ट प्रो. पोतदारांस मान्य आहे. पण त्यांचें अनुमान मात्र विरुद्ध आहे. ते म्हणतात कीं, निरंजन व दास ह्यांचें गुरुशिष्याचें नातें असल्यामुळें त्यांच्या भाषेंत सादृश्य असणें स्वाभाविक आहे. म्हणून हा मुद्दा आमचे पक्षास पुष्टिकारकच आहे. याच्या उलट प्रो. पंगू निरंजनाच्या भाषेचीं कांहीं वैशिष्ट्यें देऊन असें प्रतिपा करतात कीं, 'हे प्रकार निरंजनमाधवाचे इतके सर्वसाधारण होऊन बसले आहेत कीं, एवढ्यावरूनही त्याच्या इतर काव्याची आपणांस निश्चिति करितां यावी !' व पुढें म्हणतात[२] कीं, 'निरंजनमाधवाच्या भाषेचा ठसा या ग्रंथावर ( सां. परिमळावर ) उमट-

(१) प्रा. म. क. पं, पान १३०. (२) सदर पा. १३२.

ळेला बिलकुल दिसत नाहीं. स्तोत्रसंग्रह, ज्ञानेश्वरविजय, अथवा सुभद्राचंपू, इत्यादिकांत जे वर उद्धृत केलेले विशिष्ट शब्द व शब्दप्रयोग आढळतात, त्यांचा सां. परिमळांत कोठेंही मागमूस लागत नाहीं.' एकाच पक्षांतील दोन वकिलांचीं हीं परस्पर-विरुद्ध विधानें पाहून कोणासही मौज वाटेल. असो. पुढील विवेचनावरून त्याचा निर्णय आपोआपच लागेल. उभय ग्रंथांत भाषा वगैरे सादृश्याचीं अनेक उदाहरणें मिळालीं आहेत; परंतु प्रस्तुत ग्रंथांत स्थलावकाश नसल्यामुळें हीं देतां येणें शक्य नाहीं; म्हणून प्रारंभीं उल्लेखिलेल्या वि. ज्ञा. वि.चे अंकाचा हवाला देण्याशिवाय गत्यंतर नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. येथें केवळ सां. परिमळांतील वैशिष्ट्यांचें दिग्दर्शन केलें आहे. यास जाब देणारीं सादृश्यें आधारांसह वि. वि.त दिलीं आहेत.

[अ] बहिरंगः---(१) आवडते शब्दः---घडे ( झाला ); अति, अतिशय; या शब्दांची निरर्थक जोड, मात्र ( केवळ, फक्त ); कोटि ( अनेक ), निगुती ( यथार्थ ), भरंवसोनि ( भरंवशानें ) वेंकोबा ( व्यंकोबा—व्यंकटेश ); कमंडल, ( कमंडलु ), महिमा ( स्त्री० पु० ) गाथा; अवर ( धाकटा )

[ २ ] जुने शब्दः---वोजा, नातळतां, नातुडे, विंदाण, मागुती; नुबगोन, कैशानां, बिर्दीबिर्दी, न वोळला.

[ ३ ] शब्दसमूहः—अष्टभावपुरस्सर, निरंजनप्रेमपुरस्सर, तीर्थचर.

[ ४ ] शब्दांवर कोट्याः---हरला कंदर्पाचा दर्प; गोकर्णप्रमाण शिवलिंग म्हणून गोकर्ण; वर घडे शासन म्हणोन वरशासन; अर्जुना

(१) नि. स्तोत्र. टी. निबंध ( चिं. नी. जोशी ) पा. ३१।३१ यांतही अनेक उदाहरणें आहेत

अर्जुनवर्दे[1] गणोति; परि न येतो मृत्यु मृत्युंजयां[2]; चतुर चतुराननें[3].

[ ५ ] प्रतिनामें:—सूर्य-तरणी, सहस्रकिरण, अर्क, सूर्यनारायण, इ; ब्रह्मा—विधाता, चतुरानन, सृष्टिकर्ता, विश्वाद्य, सत्यलोकपति.

[ ६ ] वाक्प्रचार:—पुत्र उत्पन्न केले; येर नाममात्र धरितां अजागळ.

[ ७ ] द्विरुक्तिवाचक शब्द:—तेणें सावध घडीनें घडी; नारद कथा कथी; तो कथनीं कथी.

[ ८ ] संस्कृती वळण:—अस्मिन्नवसरीं; एवं विनवितां; अवश्यमेव; मोठे समास—स्वानुभवसुखानंदपरमीं; सव्यापसव्यविद्याप्रचुर; विशेष्याप्रमाणें विशेषणाचीं रूपें:—सर्वा सिद्धि, भाक्तिमती नारी, कृष्णरूपिणी मूर्ति; संस्कृत श्लोक वा वाक्यांशांची योजना:—'अनन्याश्रितयंतो मां', 'वासुदेव: सर्वमिति', 'विष्णुर्योनिं कल्पयतु' इ. मथळे व समर्पणें संस्कृतांत उभयत्र आहेत.

[ ९ ] व्याकरणविशेष[4]:—पर्यायवर्णयोजना:—श-स-ची उलटापालट; ष=ख, त्स=छ, ऋ = र, ड = ट, क = ग. रासी, निरशन, प्रवेषतां, हरिख, निर्भेछन, ०रणानुबंधें, देवरुषी, मंटप, अनेग, देयील, होयील इ.; सर्वनामें:—त्वां, तां; यांनीं, त्यांनीं—येहीं, तेहीं.

सदोष संधि:- धराइंदिरा; तमहरण; जगदोद्धार, संकटबेर्डा, पापधुणी, हावतार; ( हा+अवतार ).

विकृत रूपें:—अल्पवयसा, साकल्यवृत्तांत, सर्वेंपरी.

सामान्य रूपें:—सहस्रां जन्मांची, बाविसां वर्षीं, कुटुंबसाहित, अवलंबनाविना.

---

(१) अर्जुन=वृक्षाविशेष; मोर सु. चंपू. पा. ९२. (२) स्तोत्र १७. (३) सु. चंपू, पा.७२. (४) आणखी उदाहरणें माझा नि.टि.नि.पा.३३ ते ३५

क्रियापदें:—आहेसी, आहेतीं, जिणोनि, जिंतोनि, जिंतले, तुष्टला इ.

( ब ) अंतरंगसादृश्य:—( १ ) अन्यग्रंथांचा निर्देश:—ज्ञानेश्वरी, योगवासिष्ठ, भारत, भागवत, गीता, अष्टादशपुराणें, सर्वोपनिषदें, वेदांतग्रंथ, गीता, श्रुति इत्यादि अवतरणांवर मराठी टीका करण्याची संवय. (२) पौराणिक कथा:— ध्रुव, गजेंद्र, अजामिळ, पिंगळा वगैरे. (३) तत्त्वज्ञान व योग:—ज्ञानोत्तरभक्ति व तुर्या, उन्मनी, षट्चक्रभेदन, राज, हट, मंत्र व लययोग, शिवतारकोपदेश. (४) अलंकार, कल्पना व वर्णनें. पुढील उताऱ्यांत यांतील साम्य दिसेल:—

**सां. परिमळ**

(१) गौरी शंकराची वल्लभा। किंवा सूर्याची प्रभा। अग्निशक्ति शुभा। स्वाहा जैशी ॥१-१४४॥ किंवा चंद्राची दीप्ति। किंवा वायूची सदागति। कुवेराची संपत्ति। तैशी तूं मम प्रिया।२-१४५। किंवा ब्रह्मणी ब्रह्मयाची। इंदिरा जैशी विष्णूची। प्राणप्रिया आत्मयाची। चित्कळा जेवीं ॥१४६॥

(२) समुद्रींचीं निधतीं रत्नें। ते होतीं श्रीमंता आभरणें॥ ५-१८१ ॥ पाणबुडे मोतीं काढणार। त्यांचे गळां मुक्ताहार।...। देखिले कोणी ॥ १८२ ॥

**निरंजन ग्रंथ**

(१) शोभे सुभद्रा गुणरत्नखाणी।
लक्ष्मी तशी पावुनि चक्रपाणी ॥
—सु.चंपू,पा. १०६-६८

किंवा शशी अर्जुन रोहिणी हे।
सूर्यप्रभा साम्य ययासि लाहे।
शची सुरेंद्रासह संपदेशीं।
विराजणें त्या घनदें सुखेशीं ॥६९॥

प्रताप कीर्तीसह वर्तताहे।। धर्म क्रियेशीं अतिशोभताहे॥ साजे जसा तो ऋतु दक्षणेशीं। तैसा विराजे जय यादवींसीं॥७०॥

(२) काढी पाणबुडया बुडोनि सलिलीं मुक्ताफळें चांगलीं। त्यासाठीं धरिताति काय नृपती या सर्व भूमंडळीं॥ रत्नाचे गुण पाहुनि करिती कीं सद्भूषणांकारणें। मीही किंकर त्यापरीच

दूरस्थही श्रीमंत जन।...। तयांसी भाग्यसागरजन्म। रत्नप्राप्ति अनायासें ॥ ५-१८४॥

समजा घ्या श्लोकरत्नें मनें ॥ ज्ञा. वि. पा.२४-२०

नारदवर्णन, सां. प.

(३) मस्तकीं जटाजूट। तप्तजांबूनद समवर्ण।...। शुभ्रवर्ण अतिविलसे ॥२-५१॥ ब्रम्हवीणा स्कंधीं शोभत।...। सामगानपूर्वक मुकुंद हरि, नारायण, वासुदेव, संकर्षण।...। दशरथनंदन रघुपति। गोपीरमण मदनमूर्ति। कृष्ण, विष्णुपरंज्योति। नृसिंह इ.॥

नारदवर्णन, निरंजनग्रंथ

(३) जटातप्तजांबूनदाकार माथां दिसे। सूर्यचंद्राहुनी तेजधर्ता॥ चि.रा.१४-९

महती वीणा वाहोनि स्कंधीं। गर्जे हरि, कृष्ण, गोविंद, माधव, वासुदेव,... नृसिंह, राम, यादवाधीश. ऐशा सुंदरनामप्रबंधीं गाय स्वच्छंदी॥सु.चं.पा.७४-१७

श्रीराम, नारायण, वासुदेव। मुकुंद, विष्णू, विभु देव देव। श्रीरुक्मिणीनायक दीनबंधु। स्वच्छंद मी गायिन हा प्रबंधू॥ ज्ञा. वि. पा. ४९-१९.

श्रीकृष्णवर्णन

(४) सकळ लक्षणीं लक्षित..। श्रीवत्सकौस्तुभें मंडित। पीतांबरपरिधान। पदक कुंडलें विराजमान। मकराकृति सूर्येंदुसमान! कपोलयुगलमुकरायमान। तेजें सघन शोभती॥

श्रीकृष्णवर्णन, चि.रा.पान.१०-११

विशाळ हृदयावरी द्विजपदांक ते साजिरे॥(पा.१० ११)..धरी कौस्तुभा॥ सुवर्णरुचि साजिरा सुपट कांसिला जो कटीं॥ सुरम्य मकराकृती श्रवणिं कुंडलें हीं तया॥ पा.११-१५॥ कपोल अति शोभती मुकुरबिंबयुग्मावरी॥ पा. ११-१२॥ प्रभा गल्लद्वंद्वे सहज अरशाची हरितली॥ सु. चं. पा. ६८-१६॥ द्विकपोल ते मिरविती आदर्श बिंबापरी॥ स्तो. १०-५५

पहिल्या उताऱ्यांत निरंजन-गंगावती यांचें अद्वैत प्रेम व संतत साहचर्य ९ उपमांनीं वर्णिलें आहे. तर सु. चंपूंतील अर्जुन-सुभद्रेचें वर्णन हुबेहुब याच थाटाचें झालें आहे. एव-

ढेंच नव्हे तर त्यांतील उपमा दोहींकडे शब्दशः किंवा थोडेशा फरकानें अवतरल्या आहेत. त्याचप्रमाणें दुसऱ्यांतील मोतीं काढणाऱ्या पाणबुड्याचा दृष्टांत दोहींकडे आला आहे. तिसऱ्यांतील नारदवर्णन जवळ जवळ शब्दशः चि. रामायण व सु. चंपूंत दिसत आहे. चवथ्यांतील कृष्णवर्णनांतही ऐक्य दिसत आहे. एवंढेंच नव्हे तर 'कपोलयुगलमुकुरायमान' ही कल्पना चि. रामायण, सु. चंपू व स्तोत्र १० वें या तीन ग्रंथांत आढळते. तेव्हां हा कल्पनाविलास एकाच व्यक्तीच्या प्रतिभेंतून जन्मला असला पाहिजे हें काय सांगावयास पाहिजे? एकाच पित्याच्या अपत्यांत जसें व जितकें दृढ साम्य असतें तसें व तितकेंच साम्य प्रस्तुत ग्रंथांत दिसून आलें असल्यामुळें ते निरंजनाचेच आहेत. गुरुशिष्यांच्या कृतींत इतकें साम्य कधींच आढळत नाहीं. शिवाय गुरूच्या उत्तरकालीन ग्रंथांचें अनुकरण शिष्यास आपल्या पूर्वकालीन ग्रंथांत करतां येणें अशक्य असल्यामुळें गुरुनेंच शिष्याचें वाङ्मयचौर्य केलें असें म्हणण्याची आपत्ति येणार! यास्तव प्रो. पोतदारांचें मत अग्राह्य ठरतें. वर दर्शविलेला वस्तुस्थितीचा पुरावा प्रो. पंगूंच्या विधानाच्या इतका विरुद्ध आहे कीं, त्याचें निराळें उत्तर देण्याचें आतां प्रयोजनच उरलें नाहीं. कारण 'सूर्ये तपत्यावरणाय दृष्टेः कल्पेत लोकस्य कथं तमिस्रा।'

## (६) तीर्थयात्रांचा उल्लेख

सां. परिमळांत* निरंजनानें केलेल्या दक्षिण यात्रांचा उल्लेख आला आहे. यांत ३४ तीर्थक्षेत्रांचें सुसंगत रीतीनें व त्या त्या स्थळाच्या वैशिष्ट्यासह वर्णन आलें आहे. उ० 'सुब्रह्मण्य अन्नदानशोभा;

---

* सां. प. उ० ३—१९१ ते २०४ व २१७ ते २२१. उ० ४-९१

उडपी कृष्ण तो उभा वैष्णवा मोक्षदायक', असें वर्णन स्वानुभवानेंच करतां येणें शक्य आहे; म्हणून तें निरंजनाचेंच असलें पाहिजे. दासानें या सर्व यात्रा केल्याचा पुरावा नाहीं. तेव्हां त्याला नुसत्या कल्पनेनें तें करतां येणें शक्य नाहीं. निरंजनानें हें वर्णन त्यास क्रमवार सांगितलें व त्यानें तें लिहून घेतलें असें म्हटल्यास त्यास केवळ लेखकाचें श्रेय मिळेल.

पण आणखी एक चमत्कारिक गोष्ट आढळते; ती ही कीं, ज्ञानेश्वरविजयांत विठ्ठलपंतांच्या दक्षिण यात्रा वर्णितांना निरंजनानें या ३४ स्थळांपैकीं १८ स्थळांचा नामनिर्देश बहुतेक त्याच अनुक्रमानें केला आहे. विठ्ठलास साक्ष ठेऊन मी नामदेवाच्या प्रबंधानुसार हें वर्णन करीत आहें, अशी तो ग्वाही देतो; पण मुळांत फक्त ६-७ च स्थळें असतां येथें १८ आलीं आहेत. ह्याचें कारण असें उघड दिसतें कीं ह्या प्रसंगीं त्यास सां. परिमळांत पूर्वी वार्णिलेल्या इतर स्थळांची आठवण झाली आणि मुळांत भर घालण्याचा मोह त्यास आवरतां आला नाहीं. हें साम्यहा निरंजन पक्षास पुष्टि देतें.

येथवर या भागांत [१] मथळे, नमनें व समपर्णें [२] ग्रंथारंभ [३] नमनांतीऊ निरंजनाचा अनुल्लेख, [४] निरंजनदासाची काल्पित भूमिका [५] भाषाव्याकरणांचें वैशिष्ट्य, अन्यग्रंथनिर्देश, पौराणिक कथा, तत्त्वज्ञान व योग, अलंकार, कल्पना व वर्णनें यांतील अनेक प्रकारचें साम्य [६] आणि सरतेशेवटीं सांगितलेला समान तीर्थ-यात्रांचा उल्लेख या सर्व गोष्टी निरंजनदासाचे सां.परिमळकर्तृत्वाचे कशा आड येतात व त्याच निरंजनाचे बाबतींत कशा अनुकूल व

(१) ज्ञा. वि. अ. २, पान १४–१६ (२) ना. गा. तु.तात्या, पान ४२२ अ. १८१०.

सुसंगत आहेत हें सोदाहरण स्पष्ट केलें आहे. या बलवत्तर पुराव्यावरून आपोआप एकच एक निर्णय कोणता निघतो हें सूज्ञास सांगितलें पाहिजे असें नाहीं. यानंतर दुसऱ्या भागाकडे वळूं.

## भाग २ रा,

## सांप्रदाय-परिमळाचें कर्तृत्व निरंजनास देण्याचे आड भासणाऱ्या गोष्टी.

सां.परिमळाचे कर्तृत्वाविषयीं ज्या गोष्टींमुळें प्रथमतः शंका उद्भवली त्यांचा येथें निर्देश करावयाचा आहे. त्यांत कांहीं नवीन शंकांचाही अंतर्भाव केला आहे. तेव्हां आतां त्यांकडे वळणें बरें.

[१] शंका १ ली :—प्रस्तावनेंतील पहिल्या २२ ओंव्या यांत शिष्यानें गुरुपासून ग्रंथरचनेची परवानगी मागितली आहे. यासंबंधीं प्रो. पोतदारांची अशी शंका आहे कीं, ' खुद्द निरंजनानेंच गंगावतीस ग्रंथ सांगितला असता तर ह्या २२ ओंव्यांचें प्रयोजन काय ?' सकृद्दर्शनीं ही शंका जरी खरी वाटली तरी निरंजनाचें ग्रंथकर्तृत्व हिरावून घेण्यास ती पुरेशी निर्णायक नाहीं असें मला वाटतें. याचें कारण पुढें यावयाचेंच आहे.

[२] शंका २ रीः—ग्रंथांत आलेला दासाचा उल्लेख. ह्या ओंव्या अशा :—

(अ) प्रो. पोतदारांनीं दाखविलेल्या पुढील ओंव्या शंकार्ह नाहींत असें मला वाटतें. त्या ओंव्याः—उ. २–१, उ. ३–१ व उ.५.–१

(ब) ऐसें गंगावतीप्रती । योगी निरंजन स्वकथा कथी ।
दास विनवी संतांप्रती । महिमा पुढती परिसावी ॥१॥ उ० १–१५१
एशी निजसुंदरीप्रती । निरंजनयोगी कथा कथी ।
दास विनवी संतांप्रती । श्रवणीं प्रीति असावी ॥२॥ उ० २–१९७

ऐसें निरंजन निजसतीतें। कथन करी प्रेमें बहुतें॥
दास विनवी सज्जनांतें। पुढें कथा परिसावी॥३॥ उ० ३-२६१
दास म्हणे संतीं। ऐकावी कथा पावन अती।
पुंसे भावें गंगावती। निरंजना सांप्रदाय॥ ४॥ उ० ४-१
इति श्रीनिरंजनदासविरचित। सांप्रदायपरिमळ महाग्रंथ।
येथें षट्पद साधुसंत। रमतां तृप्ति घडेल॥ ५॥ उ. ४-१६४
निरंजनदास विनवी संतां। हे गुरुसंततिसंतानलता उ. ५-१८८
तो सद्गुरु गणपती कोटिनमनीं। निरंजनदासें प्रार्थिला ,, २१५
नमो नमो सद्गुरुमूर्ति। स्फूर्ति देवोनि दासा सांभाळी ८,, २१७
श्री निरंजन नमो नमो निर्गुणरूपा। नमो नमो ज्ञानदीपा।
नमो नमो करोनि कृपा। पाददासा सांभाळीं॥ ९ उ. ५-२१८
निरंजनदासरचित। सांप्रदायपरिमळ महाग्रंथ।
आजि पूर्ण होतां यथास्थित। सद्गुरुचरणीं अर्पिला १०उ.५-२१९

वरील उताऱ्यांवरून असें दिसून येईल कीं, 'दास' या पदाचा उल्लेख १,२,३ उद्गारांच्या शेवटीं व ४ थ्याच्या प्रारंभीं असा ४ वेळां आला असून या सर्व स्थळीं तीन व्यक्तींचा स्पष्ट बोध होतो. पुढील ओंव्यांत 'निरंजनदास' या पदाचा उल्लेख ४ वेळां व 'पददास व दास' मिळून २ वेळां आला आहे. म्हणजे सर्व ग्रंथांत 'दासाचा' उल्लेख १० वेळां आला आहे. दासाच्या या दशावतारामुळें ग्रंथकर्तृत्वाबद्दल शंका उत्पन्न झाली आहे आणि दशावतारांत जसे चार प्रमुख, तसेंच दासाचे पहिले ४ अवतार येथें प्रमुख आहेत आणि यामुळें उत्पन्न झालेली शंका खरोखर अडवणारी भासते, परंतु तिच्या निरसनाचा विचार पुढें केला आहे.

[ ३ ] शंका ३ रीः—भिन्न पुरुषवचनांचा उपयोग. ग्रंथांत कांहीं ठिकाणीं प्रथम पुरुषाचा तर कांहीं ठिकाणीं तृतीय पुरुषाचा उपयोग केलेला असल्यामुळें ती व्यक्ति एकच आहे कीं भिन्न आहे, अशी

शंका उद्भवण्यासारखी आहे. म्हणून तिचाही विचार पुढें केला आहे. अशीं कांहीं स्थळें पुढें दिलीं आहेत. उ. १ मध्यें पहिल्या २० ओंव्यांत प्रथम-पुरुषाचा उपयोग केलेला आहे, तर २१।२२ ओंव्यांत तृतीय-पुरुषाचा उपयोग केलेला आहे. तेव्हां या व्यक्ति भिन्न कीं अभिन्न ? त्याचप्रमाणें ग्रंथाचे शेवटीं तृ. पु. चा उपयोग 'दास विनवी संता' असा करून पुढें 'सुमुख, सुप्रसन्न मन असो' असा प्र. पुरुषाचाही उपयोग केलेला आहे. त्याचप्रमाणें एकवचन व अनेकवचन यांचा उपयोगही सरमिसळीनें केलेला आहे.

[ ४ ] शंका ४ थी:—'निरंजन-माधव व निरंजनदास यांच्या रचनेंतील वृत्तभेदावरून त्यांचा वृत्तिभेदही स्पष्ट होत असल्यामुळें त्या दोघांचें एकत्व मानतां येण्यासारखें नाहीं,' असें प्रो. पंगु म्हणतात. ( प्रा. म. क. पं. पा. १३३ ) अशा या चतुर्विध शंकांचें निरसन कसें करावयाचें ह्याचा विचार पुढील भागांत करावयाचा आहे.

---

## भाग ३ रा, शंकानिरसन

सां. परिमळाचें कर्तृत्व 'दासास' देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत कशा अनेक अनुल्लंघ्य अडचणी उपस्थित होतात, हें पहिल्या भागांत सविस्तर व सप्रमाण दाखविलें आहे. त्यापैकीं एकएक प्रमाणही हा ग्रंथ त्याचा असणें शक्य नाहीं हें सिद्ध करण्यास समर्थ आहे. भाषासादृश्य व कल्पनासादृश्य यांचें प्रमाण तर इतकें बलवत्तर आहे कीं, हा ग्रंथ दासाचा म्हणणें झाल्यास त्यानें

१ निरंजन म्हणती प्रेमवती । उ. २ प्रारंभीं ॥ व पुढें 'निरंजन उत्तर देती मुदित मनें ॥' २-६२ असें अनेकवचन आहे, तर पुढें २.१९७ एकवचन आहे व ४–१६२ मध्यें तर दोन्ही वचनांचा उपयोग एकाच ओवींत केला आहे.

इथून तिथून सर्वत्र निरंजनाच्या भाषापद्धतीची चोरी केली आहे असें म्हणणें भाग पडेल. परंतु ग्रंथाचा कालानुक्रम पाहतां तो आरोप गुरूवरच येण्याचा प्रसंग ओढवणें अधिक संभवनीय आहे. तेव्हां ग्रंथकर्तृत्वाचा मान गुरूकडेच ठेवणें कोणासही इष्ट वाटेल

दुसऱ्या भागांत तें ग्रंथकर्तृत्व निरंजनास देण्यांतही कोण-कोणत्या अडचणी भासतात हेंही दाखविलें आहे. त्यापैकीं चार तर खरोखरी बिकट आहेत. त्या सुसंगतपणें कशा दूर करतां येतील हें आता पहावयाचें आहे. तर आतां तिकडे वळणेंच बरें.

(१) शंका १ ली:—प्रस्तावना व निरंजनाची भूमिका:—

प्रो. पोतदारांनीं कल्पिलेली 'दासाची' भूमिका कशी असंभवनीय आहे हें पूर्वीं स्पष्ट केलेंच आहे. तेव्हां निरंजनाची भूमिका कोणती व पहिली प्रस्तावना तिच्याशीं कशी सुसंगत आहे हें दाखविणें क्रमप्राप्तच आलें. ह्यासंबंधीं माझें म्हणणें असें आहे कीं, निरंजनानें प्रारंभींच्या ओवींत आपल्या इष्टदेवतेची म्हणजे सुंदर कृष्णाची आपल्या गुरूशीं एकरूपता कल्पून नांदीद्वारा कथ्यमान गुरुद्वयाचें अद्वैत मोठ्या खुबीनें ग्रंथारंभीं सूचित केलें आहे. पुढें उभय सांप्रदायांचें सरहस्य प्रकाशन आपल्या आतुर शिष्यसमुदायास व तद्द्वारा इतरांसही करावयाचें असल्यामुळें, तदर्थ त्यानें आपल्या गुरूची अनुज्ञा मागितली आहे. आणि असें करणें अवश्य व उचितही आहे, म्हणून त्यानें आपल्या मनश्चक्षूं-पुढें आपल्या गुरुरायाची मूर्ति कल्पून अनुज्ञेची याचना केली आहे, व ती मनोमय मिळाली असें वाटल्यावर हर्षातिरेकानें वाचून व गर्जून सांप्रदायकथा सांगण्यास त्यानें सुरवात केली आहे. या समयीं सां. प. चा इतिहास गंगावती विचारीत आहे व तिच्या प्रश्नास निरंजन उत्तर देत आहे व त्यांचा हा संवाद कविनिरंजनच

शिष्यांस व तद्द्वारा श्रोत्यांस व वाचकांस विदित करीत आहे अशी दुहेरी भूमिका त्यानें स्वीकारिली आहे. म्हणजे आपल्या पत्नीशीं झालेला आपला संवाद निरंजन आपणच 'रिपोर्ट' करित आहे; असें या ग्रंथाचें स्वरूप आहे. आतां हा संवाद कदाचित काल्पनिक असेल किंवा तो अगोदर प्रत्यक्षही घडला असेल आणि नंतर तो निरंजनानें कवितावद्ध केला असेल. पण एकंदर ग्रंथाचें स्वरूप, त्यांतील भावनामय व प्रेमळ वातावरण व त्यांत सर्वत्र दिसून येणारा मनाचा मोकळेपणा यावरून हा पतिपत्नी-संवाद प्रथम एकांतांत प्रत्यक्ष घडला असावा व मग तो निरंजनानें पद्यनिबद्ध केला असावा असेंच अधिक सयुक्तिक वाटतें.

आतां अशी गुरूची मानसपूजा करून त्यांची मनोमय अनुज्ञा मिळविण्याचा प्रकार कांहीं चिकित्सकांस जरी चमत्कारिक वाटला तरी तो निदान मराठी कवींच्या सांप्रदायाविरुद्ध नाहीं. विठोबानें माझा हात धरून स्वर्गारोहणपर्व लिहूं नको असें सांगितल्यामुळें मी तें लिहिलें नाहीं, असें श्रीधर म्हणतो. तर ' वामनात्मा मुरारी ' माझे ग्रंथ मजकडून लिहवितो असें वामन पंडित सांगतो. आणि निरंजनही या बाबतींत त्यांच्याचपैकीं आहे.

> **नोहे मत्पुरुषार्थ काव्यरचनीं श्रीविठ्ठलें अन्तरीं।**
> **केला बैसुनि हा प्रबंध बरवा तैं चालली वैखरी ॥**
>
> —ज्ञा. वि. पा. १५२५

अशी निरंजनही आपल्या ज्ञानेश्वरविजयांत ग्वाही देतो. तेव्हां ही कल्पना अशक्य कोटींतली खास नाहीं.

मीं वर सुचाविलेल्या निरंजनाच्या भूमिकेविरुद्ध आणखी एक आक्षेप येण्यासारखा आहे. तो हा कीं, निरंजनासारखा निस्पृह योगी, ' शिष्यमाणि ' ' परोपकारिणी तुझी बुद्धि ' वगैरेसारखी

आपली स्तुति गुरूनें केली हें आपणच होऊन कसें सांगेल ? किंवा ' कृपासुधाकरा ' वगैरेसारखी आपलीच स्तुति आपल्या पत्नीचे तोंडीं कशी घालील ? पहिल्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, निरंजन योगी होता व निस्पृह होता खरा, तत्रापि त्यास स्तुतीची किंवा आत्मश्लाघेची आवड नव्हती असें मात्र नाहीं; आणि ही गोष्ट अनेक उदाहरणांनीं ' नमनांत निरंजनाचा अनुल्लेख ' या विषयाची चर्चा करितांना पूर्वींच सिद्ध केली असल्यामुळें येथें पुनरुक्तीचें प्रयोजन नाहीं. दुसरें असें कीं, सां. प. वरून असें समजतें कीं, निरंजनावर गुरूचें विशेष प्रेम होतें. त्यास अंतरंग, बहिरंग गुरु सांगत. तेव्हां 'शिष्यमणि' हें वर्णन वस्तुस्थितीस धरूनच होतें. त्याचप्रमाणें गंगावतीचे तोंडीं घातलेली निरंजनाची स्तुति तिच्या भूमिकेला सुसंगतच आहे, एवढेंच नव्हे, तर तिचें प्रतिप्रेम वास्तविक त्या श्रेष्ठ दर्जाचें होतें असेंच प्रत्ययास येतें. एवंच या दृष्टीनें प्रस्तावनेकडे पाहिल्यास ती निरंजनाचे कर्तृत्वाशीं समुचित व सुसंगत दिसते असें मला वाटतें.

[ ३ ] शंका ३ री :—भिन्न पुरुषवचनांचा उपयोग.

" भिन्न पुरुषवचनांचा उपयोग" ही शंका सहज निरसन करितां येण्यासारखी असल्यामुळें तिचा विचार अगोदर करीत आहे. निरंजन कवि आपल्या पत्नीशीं झालेला संवाद आपणच सांगत आहे अशी भूमिका काल्पिली असल्यामुळें वाचक सर्वत्र तृतीय पुरुषाची साहजिकपणें अपेक्षा करितो; परंतु मागें शंकास्थानें सांगतांना दाखविल्याप्रमाणें हा नियम सां. प. त पाळलेला दिसत नाहीं. प्रथमपुरुषी काव्यास आरंभ करून मधेंच स्थळस्थळीं तृतीय पुरुषाचा उपयोग केला असल्यामुळें वाचकास बुचकळ्यांत पडल्यासारखें होतें. परंतु हा आक्षेप जसा निरंजनास तसाच तो दासासही लागू

आहे. म्हणून हा उभयपक्षांस समान असलेला आक्षेप उभयपक्षांनीं-ही विचारांत न घेणेंच बरें. निरंजनांचे वतीनें मात्र एवढें म्हणतां येण्याजोगें आहे कीं, अशा भिन्न पुरुषांचा सळमिसळीनें उपयोग करण्याची त्याची प्रथाच होती. उ.—

**भावें किंकर मी निरंजन करी वंदोनिया प्रार्थना** ॥ ज्ञा.वि. १–१३
**ज्ञानेश्वरविजयाभिध सुंदर योगी निरंजनें केला** ॥ ज्ञा.वि.१–५३

श्रीधरादि मराठी कवींतही हा प्रकार आढळतो. तेव्हां हें शंका-स्थान विचारणीय नव्हे. भिन्नवचनाचे बाबतींतही अशाच प्रकारचें स्पष्टीकरण देतां येण्याजोगें आहे. मागें दाखविल्याप्रमाणें दुसऱ्या उद्गारांत प्रारंभींच 'निरंजन म्हणती' व 'उत्तर देती' असें अनेकवचन योजिलेलें आहे. येथें हें कबूल केलें पाहिजे कीं, निरंजन आपला तृतीयपुरुषीं उल्लेख करितांना अनेकवचनाचा प्रयोग इतरत्र करतांना आढळत नाहीं. तेव्हां त्यानें या ग्रंथांतच तो कां करावा हें सांगणें कठीण आहे. पण नक्कलकारानें निरंजन योग्याबद्दल, हें आद-रार्थी बहुवचन घातलें असण्याचा पुष्कळ संभव आहे आणि प्रस्तुत प्रतीचा नक्कलकार 'दास' च असल्यास तो संभव त्याहून-ही अधिक आहे. दुसरें असें कीं, हा आक्षेप 'दासावर' ही येऊं शकेल. कारण येथें जर त्यानें गुरूबद्दल आदरार्थी बहुवचन घातलें म्हणावें, तर प्रथमोद्गारांतच त्यानें तीनेचार वेळां एकवचनीं केलेला प्रयोग याशीं विसंगत दिसणार नाहीं काय ? एवढेंच नव्हे तर येथें शिष्यमण्यानें गुरूचा अनादर व उपमर्द केला असें म्हणावें लागेल. पण हा दोष निदान निरंजनाचे बाबतींत तरी नाहीं. शिवाय कित्येक लेखक अनवधानानें आपला उल्लेख उभय वचनीं करतांना

१-३५,४३,४४,४५ ओव्या पहा.

आढळतात. तेव्हां वचनाभिन्नतेची बाब निरंजनासच अनुकूल आहे.

[ ४ ] शंका ४ थी—ओंवी छंदाची. या शंकेचाही विचार अगोदर करणें सोईचें आहे. मागें सांगितल्याप्रमाणें ही शंका प्रो. पंगूंनीं नव्यानेंच पुढें मांडली आहे व असें करतांना त्यांनीं पुढील दोन विधानें केलीं आहेत:—

( अ ) निरंजन माधवासारखा छंद:शास्त्रनिपुण, वृत्तशास्त्रावरील तीन ग्रंथांचा कर्ता व आपले सर्व काव्यग्रंथ अनेक वृत्तांत गुंफणारा कवि....आपल्या गुरुसांप्रदायाची माहिती एकच एक ओंवी वृत्तांत न रचतां, अनेक वृत्तांत रचून आपलें वृत्तप्रभुत्व त्यानें मोठ्या हौसेनें दृष्टोत्पत्तीस आणलें असतें.

( ब ) निरंजनदासाला अशी अनेक वृत्तात्मक रचना पेलण्यासारखी नसल्यामुळेंच, त्यानें ओंवीसारख्या धांवत्या वृत्ताचा अवलंब करून आपल्या ग्रंथाचें काम निभावून नेलें आहे.

पाहिलें विधान भ्रामक व हेत्वाभासयुक्त आहे. कारण छंद:-शास्त्रावर ग्रंथ लिहिणें ही गोष्ट निराळी आणि त्याचा निर्दोष रितीनें उपयोग करितां येणें ही गोष्ट निराळी आहे. एकीस शास्त्रीय ज्ञानाच्या पद्धतशीर मांडणीची जरूरी आहे, तर दुसरीस भाषाप्रभुत्वाची. म्हणून निरंजनानें जरी या विषयावर उत्तम ग्रंथ-निर्मिति केली आहे, तरी त्यास वृत्तें निर्दोष रीतीनें रचण्याचें साधलें नाहीं. वृत्तसुखार्थ त्यास शब्दांची व भाषेची वाटेल तशी ओढाताण करावी लागली आहे. ही गोष्ट प्रा. पंगूनींही मान्य केली आहे ( पान १३० ). म्हणूनच सां. परिमळांतील ओंवी छंदाचा ओघ अधिक गोड व निर्मळ दिसतो. दुसरें असें कीं, अक्षरगण-वृत्तांत रचना करणारा कवि ओंवी छंदांत रचना करणार नाहीं हें

१ आणखी माहिती माझा नि॰ टी. नि. पान ३० व ३१ पहा.

विधानही खरें नाहीं. याच्या उलटसुलट अनेक उदाहरणें मराठी वाङ्मयांत आहेत. मुक्तेश्वरास अक्षरगणवृत्तें मानवतना म्हणून त्यानें ओंवीछंद स्वीकारून सर्व मराठी कवींत अग्रस्थान मिळविलें. आर्यापति मारोपंतानें अनेक वृत्तांत व ओंवीछंदांतही रचना केली आहे. याशिवाय लोलिंबराज, शामाराध्य, रामदास, वामनपंडित, श्रीधर, शिवदिनकेसरी वगैरे अनेक लहानमोठ्या कवींनीं दोन्ही प्रकारची रचना केल्याचें विश्रुत आहे. तेव्हां सां. परिमळ ओंवीछंदांत आहे म्हणून तो निरंजनाचा नाहीं हें म्हणणें अयुक्त आहे. दुसरें विधान तर अगदींच पोकळ आहे. कारण ज्या निरंजनदासास ह्या संशयित ग्रंथाव्यतिरिक्त वाङ्मयसृष्टींत कोठेंच अस्तित्व नाहीं, त्यास अक्षरगणवृत्तरचना पेलण्यासारखी नव्हती असें कोणत्या आधारावरून गृहीत धरण्यांत आलें आहे ? मुक्तेश्वराच्या संक्षेप-रामायणासारखा एखादा अयशस्वी प्रयत्न त्यानें केल्याचा कांहीं पुरावा आहे काय ?

आतां क्रमानें दुसरी पण वस्तुतः जी मुख्य आहे त्या शंकेकडे वळतों. या शंकेनें ज्या दासपदानें गोंधळ माजविला आहे एवढेंच नव्हे तर जें दासपदच सर्व शंकांचें आदिकारण आहे, त्या पदाकडे लक्ष देणें अवश्य आहे. प्रो. पोतदार म्हणतात कीं, " कोठेंही स्वतःस निरंजनदास किंवा दास असें निरंजनानें म्हटलेलें आम्हांस आढळलें नाहीं. " यापैकीं ' निरंजनदास ' असें समस्त पद निरंजनाचे ग्रंथांत कोठेंही नाहीं हें मलाही कबूल आहे. पण ' दास ' या पदाचा उपयोग निरंजनानें आपल्या ग्रंथांत आपल्यास उद्देशून अनेक वेळां केला आहे. त्याचप्रमाणें ' दास ' पदाशीं समानार्थक असलेले इतर शब्द त्यानें अनेकवेळां योजिले आहेत. उ. 'दासानुदास' ' दीनें, ' ' किंकर ' ' पामर ' व ' भिकारी ' हे शब्द त्याचे ग्रंथांत अनेक वेळां आलेले आहेत.

## ' दास '

१ या लोकीं निजदास रूढउनियां सर्वांसि त्वां दाविलें ॥
—ज्ञा. वि. पा. २–१०

२ श्रीकृष्णभक्तिविभवें गुरुदास्यलेशें विघ्नांसि भंगुनि ॥
—भा. ३ पा. ६७-८

३ द्यावें दर्शन पूर्ण भक्ति हृदयीं त्वद्दास्यकर्मीं मती ॥
—भा. १ ला, ६०–९

४ जो दास तूझ्या चरणासि लागे ॥ —भा.१ ला, ६१–११

५ ऐसा दुष्ट कृतघ्न मी परि तुझ्या दासानुदासीं गणी ॥
—भाग १ ला, ५८–४३

६ दासातें भय काय यावरि असें प्रत्यक्ष म्यां देखिलें ॥
—स्तो. १०–६७

## इतर शब्द

१ बनाजी–किंकर सदंतर रचोनि पद पूजी ॥ —भा.१ ९–११

२ मी तों दीन अनन्य किंकर तुझा आतां न सोडीं पदां ॥
—भाग १ १५–१७

३ भावें किंकर मी निरंजन करी वंदोनियां प्रार्थना ॥
—ज्ञा. पा. २–१३

४ सेवा घेउनियां प्रसिद्धि घडवा लोकांत या किंकरा ॥
—ज्ञा. पा. ९४–२२

५ तेव्हां पामर मी तरेन भव हा एका क्षणाभीतरीं ॥
—भा. १ ६०–५

६ आहे दीन तुझ्या समर्थ सदनीं द्वारीं भिकारी तऱ्ही ॥
—भाग १, ६५–८

७ रक्षीं म्हणे किंकरा ॥ —स्तो. १३–८

८ आहे दीन तुझा म्हणोनि सदयें तारी भवाच्या पुरीं॥ —स्तो.१४-१

९ दीनातें करुणाकटाक्ष करुनी तां पाहिजे पाहिलें ॥—स्तो.१७-२९

या एकंदर १५ उदाहरणांवरून निरंजनानें सां. त आपणास 'दास' असें म्हटलें आहे, असें म्हटल्यास तें अशक्य किंवा असंभवनीय असें कोणास वाटण्याचें कारण नाहीं व हीं अनेक उदाहरणें पुढें असता निरंजन आपणास 'दास' असें कोठेंही म्हणत नाहीं, हें विधानही टिकावयाचें नाहीं आणि त्या विधानाचा उपयोग त्याचें सां. प.चें कर्तृत्व हिरावून घेण्याकडेही करतां येणार नाहीं हेंही उघड आहे. आतां किंचित याच्यापुढें जाऊन जो निरंजन आपणांसबंधीं निरंजन व दास किंवा 'दासानुदास' अशीं एकेरी पदें आपल्या इतर ग्रंथांत योजतो तो हीं दोन्हीं पदें समस्त करून आपणांस 'निरंजनदास' या पदानें उल्लेखिणार नाहीं असें कसें म्हणतां येईल ? येथेंही 'दास' व 'निरंजन दास' असा दुहेरी प्रयोग आलेलाच आहे. रामदासांच्या स्फुट अभंगांत 'रामदास' किंवा नुसता 'दास' असा दुहेरी उल्लेख सळामिसळीनें आढळतो. तसाच येथेंही आहे. आतां यावर कोणी अशी शंका घेईल कीं, तसें घटकाभर मानलें तर मग 'निरंजनदास' या पदाचा अर्थ कसा लावावयाचा ? निरंजन हा काय निरंजनाचाच म्हणजे स्वतःचाच दास कीं काय ? हें कसें संभवेल ? तर त्या शंकेच समाधान अगदीं सोपें आहे. तें असें:— निरंजन म्हणजे मायारहित शुद्ध ब्रह्म असा अर्थ घ्यावा. निष्कळ निरंजन असें उपनिषदांत ब्रह्माचें वर्णन आहे. शिवाय 'निरंजन' पदाचा असा उल्लेख निरंजनानेंच अनेकवार केला आहे व तें पद त्यानें गुरूसही लावलें आहे. 'गुरुः साक्षात् परब्रह्म' हें वचन सुविदित आहे. कांहीं उतारे:—

**१ ज्ञानानंदें साम्य निरंजनपद पावा** ( ज्ञानेश्वराष्टक ९ )

**२ विषय टाकि तूं ध्याननिष्ठ भज । निरंजनाला रे ॥** पद सं. ३–४

**३ नमो गुरू घनाघना नमो गुरू निरंजना ॥** —स्तो. ११–३६

४ लाहें तत्पद जें निरंजन असे जें ध्यायिलें सत्तमीं ॥ स्तो. ११-२५
(आणखी उतारे–पद. सं. ३; स्तो. १०–७०; ज्ञा. वि. पान ७६–२२)

हे वरील उल्लेख इतके आरशासारखे आहेत कीं, त्यांत 'निरंजन' या पदाचा उपयोग निरंजनानें कोणत्या अर्थीं केला आहे हें स्पष्ट दिसेल. तिसऱ्या अवतरणांत 'नमो गुरू निरंजना' यांतील जो गुरु निरंजन त्याचाच निरंजन कवि दास होय आणि तोच 'निरंजनदास' या पदानें लक्षित आहे, हें यावरून खात्री-लायक सिद्ध होत आहे.हा उल्लेख निरंजनानें आपल्या 'सद्गुरुस्तवांत' केला आहे; व लगेच या श्लोकाचे पुढें त्यानें आपल्या निरंजन नांवाचाही 'षट्त्रिपद्यमालिका कवी निरंजनें निका' असा उल्लेख केला आहे. हा पुरावा इतका निःसंदिग्ध आहे कीं, त्यापुढें निरंजन आपणांस 'निरंजनदास' अगर 'दास' कोठेंही म्हणवीत नाहीं. अतएव सां. परिमळाचें कर्तृत्व त्यास देतां येत नाहीं. हा मुद्दा पुढें मांडण्यास कोणी धजणार नाहीं असें वाटतें. वरील पुराव्यानें निरंजन माधव आपल्या गुरूसही 'निरंजन पदानें' उल्लेखित असे, हें सिद्ध झालें असल्यामुळें सां. परिमळाचे शेवटीं 'श्री निरंजन, नमो नमो निर्गुणरूपा। नमो नमो ज्ञानदीपा।' असें जें नमन आहे तें निरंजनमाधवानेंच आपल्या गुरुचें केलेलें आहे, असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.एवढेंच नव्हे तर 'गुरुस्तवां'त* त्यानें समानार्थक विशेषणांनीं असेंच वर्णिलें आहे. तेव्हां दोहीं-कडील कवि एकच असला पाहिजे हें सहज सिद्ध होत आहे.

येथपर्यंत जें 'दास' व 'निरंजनदास' या पदांचें विवेचन केलें आहे त्यावरून 'दास' पदावरून उद्भूत झालेल्या १० शंकांपैकीं 'निरंजनदास' पदाच्या चार व 'दास व

* उतारे देण्यास स्थलावकाश नसल्यामुळें नाइलाज आहे.

पाददास' या दोन मिळून सहा शंकांचें निरसन झालें असें समजण्यास मुळींच हरकत नाहीं. आता ज्यांत 'दास' या पदामुळें तीन व्यक्तींचा बोध होत आहे अशा राहिलेल्या चार स्थळांचा विचार करावयाचा आहे.

(१) या ४ स्थळांतील पहिली ओवी म्हटली म्हणजे पहिल्या उद्गाराच्या अखेरची १५१ वी होय. पहिल्या उद्गारातील विषयकथन १५० व्या ओवींत संपूर्ण झालें आहे. कारण तींत 'म्हणोनि सुंदरि। एकभावें। श्रवणीं सादर असावें। जें श्रवण करितां स्वभावें। भुक्ति मुक्ति सात्सिद्ध ॥' अशी फलश्रुतिही सांगून झाली आहे. त्याच्या पुढें 'ऐसें गंगावतीप्रती' इत्यादि १५१ ओवीनें केलेला समारोप कथासंगतीस अनवश्यक आहे. एवढेंच नव्हे तर पुन: लागलीच दुसऱ्या उद्गाराच्या पहिल्याच ओवींत याच अर्थाची पुनरुक्ति झाली आहे. तेव्हां ही ओवी मूळची निरंजनाची नसावी. ती नक्कलकारानें नक्कल करितांना समारोपादाखल पदरची घातली असावी, असा तर्क करणें गैरवाजवी होणार नाहीं. हा तर्क निराधार नाहीं. कारण प्रस्तुत प्रत जी छापली गेली आहे ती कवीची मूळ प्रत नव्हे, तर कोणा लेखकानें ती शके १६८५ आश्विन शुद्ध द्वितीयेला 'लेखनं समाप्तम्।' असें ह्मणून संपविली आहे आणि मूळ काव्य कवीनें भाद्रपद शुद्ध चतुर्थीस पूर्ण केल्याचें ग्रंथांत सांगितलें आहे. तेव्हां ही ओवी प्रक्षिप्त मानल्यास 'तीन भिन्न व्यक्ति' मानून दासाकडे ग्रंथकर्तृत्व देण्यासंबंधींचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

(२) याचप्रमाणें हुबेहुब दुसऱ्या उद्गारांतील अखेरच्या १९७ व्या ओवीची गत आहे. कथाभाग मागच्या उद्गाराप्रमाणेंच येथेंही १९६ व्या ओवींतच संपून 'हे मुक्तिफलदातार' वगैरे शब्दांनीं फलश्रुतिही सांगून झाली आहे आणि म्हणूनच 'ऐसी निज-

सुंदरीप्रती ' इ. समारोप नक्कलकाराचा आहे. म्हणून ही ओवी पण प्रक्षिप्त मानावी, म्हणजे मागल्याप्रमाणेंच तीन व्यक्ति मानण्याची आपत्ति टळेल.

(३) तिसऱ्या उद्गाराचे अखेरीसही थेट तीच परिस्थिति आढळते. तेथेंही, 'पुढती आवड असे मनीं । तें तूं पूस प्रियतमे ॥ ' अशी २६० व्या ओवीनेंच या उद्गाराची समाप्ति झाली आहे. तेव्हां मागल्याप्रमाणें येथीलही समारोपाची २६१ वी ओवी (' ऐसें निरंजन निजसतीतें ' ) प्रक्षिप्त मानणें अवश्य आहे.

(४) पुढील शंकास्थळ चौथ्या उद्गाराच्या प्रारंभींच आहे. येथें उपोद्घातातच लेखकानें तीन व्यक्तींचा उल्लेख आणला आहे. तिसऱ्याच्या शेवटीं 'तें तूं पूस प्रियतमे' असें आलें असतां चौथ्याच्या आरंभीं गंगावतीच्या प्रश्नासच सुरुवात व्हावयाला पाहिजे होती. ती पुढें दुसऱ्या ओवींत ढकलून ' पुसे भावें गंगावती ' चरणांत अनवश्यक अशी पुनरुक्ति केली आहे. तेव्हां हिची विल्हेवाट मागल्याप्रमाणेंच लाविली पाहिजे. या उद्गारांत मागल्याप्रमाणें समारोप आहेच. येथेंही तो ' एवं निरंजन योगी ' वगैरे ठराविक शब्दांनीं १६२ व्या ओवींत करून १६३ ओवींत पुढील अध्यायावतार '....गंगावती । विनयें आचार झाली पुसती ॥ ' असें म्हणून केला आहे. पण ५ व्या उद्गाराच्या आरंभींच ' गंगावती । विनयनम्रा । सदाचार झाली पुसती ॥ ' इत्यादि पहिल्या ओवींत तो मजकूर असल्यामुळें येथें त्याची आवश्यकता दिसत नाहीं. येथें शब्दांची व अर्थाचीही पुनरुक्ति झाली आहे. तेव्हां या ४ थ्या उद्गारांतील पहिली व या दोन मिळून ३ ओव्या मागल्याप्रमाणेंच प्रक्षिप्त मानल्या पाहिजेत.

सारांश, पहिल्या तीन उद्गारांतील शेवटली एकएक व चौथ्यां-

तील पहिली व शेवटलीच्या अगोदरच्या दोन मिळून ३, अशा एकंदर ६ ओव्या प्रक्षिप्त मानाव्या म्हणजे सगळ्या शंका व आपत्ति आपोआप टळतात. या ६ ओव्या गाळल्यानें कथासूत्र यत्किंचित-ही त्रुटित होत नाहीं व त्या उगीच समारोपादाखल मागून घातलेल्या दिसतात. या ६ ओव्यांची बांधणी व शब्दरचना अगदीं एका घाटाची दिसते. या कारणावरूनही लेखकानें त्या पदरच्या घातल्या असाव्या या विधानाला पुष्टि येते.

पण या ६ ओव्या गाळल्यास ग्रंथांतील सहस्र पद्यकमळांच्या ( उ. ५-२०८ ) संख्येंत तूट येईल अशी शंका कोणी काढल्यास त्यास उत्तर असें कीं, या धरून तरी सहस्र संख्या पुरी कोठें होत आहे ? सर्व ओव्यांची संख्या ९९२ च आहे. हें ग्रंथाचे शेवटीं लेखकानें बेरीज करून दाखविलें आहे. म्हणजे ती मुळांतच ८ नीं कमी आहे. ती आतां या ६ कमी केल्यास १४ नीं कमी होईल एवढेंच; कवीनें 'सांप्रदाय परिमळ सहस्र ओवी ॥५-२०६॥' यांतील सहस्र शब्द सहस्रपद्यकमळांतील रूपक साधण्यासाठीं मोघमपणें घातला आहे. ' वाक्पुष्पें हरिपादपंकजयुगीं लक्षावळी वाहिली । ' असें निरंजन ज्ञानेश्वरविजयांत (९५-२८) सांगतो. पण पद्यसंख्या सारी १०३० आहे. तसाच येथेंही मोघम अर्थ घ्यावा म्हणजे झालें.

आतां अशा रीतीनें प्रक्षिप्त पद्यें घुसडून देण्याचा प्रकार कांहीं विलक्षण वा अद्भुत नाहीं. संस्कृत मराठी वाङ्मयाच्या तो चांगलाच परिचयाचा आहे. महाभारत, रामायण, ज्ञानेश्वरी व तुकाराम यांच्या अभंगांच्या गाथा हे ग्रंथ याची चांगलीच साक्ष देत आहेत. ज्ञानेश्वरीसारख्या पूज्य ग्रंथाच्या दोन प्रतींत १००० ओंव्यांची तफावत आहे. तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं एकंदर ग्रंथाच्या सुसंगत मांडणीस वर निर्दिष्ट केलेल्या ६ ओंव्या अनव-

श्यक आहेत म्हणून त्या प्रक्षिप्त मानाव्या ही माझी सूचना विचारवंतांस स्वागतार्ह वाटेल असा भरंवसा आहे.

## उपसंहार

असो. पूर्वी संकल्प केल्याप्रमाणें या विषयाचें सांगोपांग विवेचन तीन भागांत केलें आहे. प्रथमतः निरंजनदासाचें ग्रंथकर्तृत्व कल्पिल्यास त्याविरुद्ध किती अनुल्लंघ्य अडचणींची परंपरा आपल्यापुढें उभी राहते हें अनेक रीतींनीं विशद केलें आहे. ग्रंथांतील मथळे, नमनें, समर्पणें, ग्रंथारंभ व नमनांतील निरंजनमाधवाचा अनुल्लेख वगैरे गोष्टी निरंजनास अनुकूल असून त्या दासाचे विरुद्ध कशा आहेत व त्यायोगें तो 'गुरुद्रोहास' कसा पात्र होतो हें दाखविलें आहे. पुढें निरंजनदासाची कल्पिलेली भूमिका कशी फसली आहे हें अनेक कारणें देऊन सिद्ध केलें आहे. नंतर सां. परिमळ व निरंजनाचे ग्रंथ यांतील सोदरसादृश्य अनेक प्रकारांनीं व अनेक उदाहरणांनीं स्थापित केलें आहे. मात्र येथें स्थलावकाश फार मर्यादित असल्यामुळें उदाहरणांचा हवाला वि. ज्ञा. वि., वर्ष ६६, अंक १ ते ६ वर द्यावा लागला आहे, त्याबद्दल फार दिलगिरी वाटते. दोहींकडील विशिष्ट लकबी इतक्या एकरूप आहेत कीं, त्या एकाच व्यक्तीशिवाय साधणें शक्य नाहीं. तत्वज्ञान, कल्पना व अलंकार यांत तर अगदीं बिंबप्रतिबिंबभाव दिसतो. श्रीकृष्ण व नारद यांचीं वर्णनें अगदीं सारखीं आहेत, तर निरंजनगंगावतीच्या अद्वैत प्रेमाचें प्रतिबिंब अर्जुनसुभद्रा यांच्या वर्णनांत पहावयास मिळतें. त्यांतच मोती काढणाऱ्या पाणबुड्याचा दृष्टांत दोहोंकडे दिसला कीं हा सर्व खेळ एकाच प्रतिभेचा असला पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. त्यानंतर दुसऱ्या भागांत सर्व शंका नमूद केल्या असून त्या सर्वांचें निरसन तिसऱ्या भागांत

केलें आहे, तें कोणाही निर्विकार वाचकास पटावें असेंच झालें आहे. विवाद्य सहा ओंव्या प्रक्षिप्त मानाव्या ही केलेली सूचना, युक्ति व परंपरा यांस धरून असल्यामुळें व त्यायोगें निरंजनाच्या कर्तृत्वावरील सर्व आपत्ति टळत असल्यामुळें ती सर्वांस ग्राह्य होईल अशी उमेद आहे. कारण निरंजन काय वा निरंजनदास काय, ह्यांविषयीं कोणाचाही शत्रुमित्रभाव नसून केवळ सत्यान्वेषण हेंच एकमेव ध्येय आहे. तेव्हां प्रारंभींच्या कव्युक्तीप्रमाणें आतां निरंजन-माधवाची सां. परिमळाची कृति ' शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा । ' अशी होऊन ती त्याचीच आहे अशी खात्री पटेल. आणि ' तुटे वाद संवाद तो हीतकारी । ' असें झाल्यास श्रमसाफल्यही होईल.

इति शम् ॥

# ७ कविवर्य मुक्तेश्वर

( लेखक—पां. जि. सबनीस, एम्. ए. एल्एल्. बी. नासिक )

पांगारकर-स्मारक-ग्रंथाकरितां मराठी भाषेला ललामभूत असणाऱ्या कविवर्य मुक्तेश्वरावर निबंध लिहिण्याचें काम मजवर सोंपविण्यांत आलें. महाराष्ट्रभाषारसिकांचा मुक्तेश्वर हा अत्यंत आवडता कवि असून केवळ काव्यगुणांचाच विचार केल्यास महाराष्ट्रांत असा कवि पूर्वीं झाला नाहीं, इतकेंच नव्हे, तर पुढेंही होणार नाहीं असें सत्यास फारसें सोडून नसलेलें विधानही कित्येकांनीं केलेलें आहे. हरिभक्तिपरायण पांगारकरांनीं तर जगांतील परमश्रेष्ठ महाकवींच्या पंक्तीसच मुक्तेश्वराला बसविलें आहे. चिपळुणकर पितापुत्र, राजवाडे, भिडे, भावे, आजगांवकर, पांगारकर, प्रो. पंगू इत्यादिकांसारख्या साहित्यधुरंधरांनीं कविवर्य मुक्तेश्वरांच्या काव्यावर विविध, सुगंधी व सुमनोहर पुष्पांच्या सुमनांजलींचा अत्यंत उत्साहानें वर्षाव केलेला आहे, व मुक्तेश्वराच्या उपलब्ध चरित्रांतील कांहीं अनिर्णित स्थलांबद्दलही मोठी मार्मिक व संशोधक बुद्धीला चालना देणारी चर्चा केली आहे. अशा परिस्थितींत कांहीं नवीन माहिती संपादन केल्याशिवाय नवीन लेखकानें लिहावयाचें तरी काय, हा प्रश्न साहजिकपणेंच उद्भूत होऊन, हा लेख लिहिण्याचें अंगीकारण्यांत आपल्या हातून अविचार तरी घडला नाहीं ना, असा संशय मनाला ग्रासूं लागला. तथापि अविचार झाला तर झाला, परंतु उपरोक्त पूर्वसूरींच्या विचारांचें संकलन करून आपण आपला निबंध तयार केला तर 'अनारंभो हि कार्याणां' या प्रसिद्ध श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें प्रथम नाहीं तर नाहीं, निदान

द्वितीयबुद्धिलक्षण तरी आपल्या पदरांत पडेल, या एकमेव विचारानें या निबंधलेखनास मी उद्युक्त झालों आहें.

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या मुक्तेश्वरावरील प्रमुख निबंधांत प्रथमतः जी चर्चा वाचावयास मिळते, ती त्याच्या मातापित्यांचीं नांवें केवळ गोदुबाई अथवा गंगाबाई व चिंतामणि अशीं होतीं, कीं त्यांनाच आणखी लीला व विश्वंभर अशीं ऊर्फ नांवें देण्यात आलीं होतीं, व मुक्तेश्वर आपल्या मातापित्यांना गुरुस्थानीं मानून त्यांचा आपल्या काव्यांत ठिकठिकाणीं लीलाविश्वंभर असा उल्लेख करतो, अथवा 'लिलाविश्वंभर' या पदानें कवि दत्तप्रार्थना करतो या कोड्याविषयीं आहे. अशा कोड्यांचा उलगडा करण्यासाठीं बहुधा अंतःसाधनें व बाह्यसाधनें अशा दोन प्रकारच्या साधनांचा उपयोग केला जातो. आजगांवकर, पांगारकर वगैरे विद्वान साहित्यिकांनीं या दोन्ही प्रकारच्या साधनांचा उपयोग करून मुक्तेश्वराच्या मातोश्रीला गोदा ऊर्फ गंगा ऊर्फ लीला असें संबोधीत असत व वडिलांना ' चिंतामणि ऊर्फ विश्वंभर ' असें संबोधीत असत, आणि मुक्तेश्वराच्या ग्रंथांत अनेक स्थळीं ' विश्वंभर ' अथवा ' लीला-विश्वंभर ' असा जो उल्लेख आहे, तो मुक्तेश्वरानें आपल्या मातापित्यांना उद्देशूनच केलेला आहे असा निष्कर्ष काढलेला आहे.

आपणही पुनः एकदां या दोन्ही प्रमाणांचा विचार करूं. सर्व उपलब्ध बाह्यसाधनें पुढें दिलीं आहेत.

१ " **विश्वंभर लीलायोगो मुक्तेशभूतिमातनुते ।**
**या हि महाभारतरणसमुद्यमे प्राकृतान्सतृष्णयति ॥** "

हा सुश्लोकलाघवांतील सुप्रसिद्ध श्लोक विठोबाअण्णा दप्तरदारां-सारख्या कविचारित्रकारानें वर्णन केलेला ' विश्वंभर ' व ' लीला ' यांचा विवाहसंबंध मुक्तेश्वराच्या जन्मास कारणीभूत झाला हा

परंपरागेत समज दाखवितो.

२. मुक्तेश्वराच्या वंशजांपाशीं त्यांच्या घराण्याचा जो वंशवृक्ष आहे त्यात मुक्तेश्वराच्या तीर्थरूपांचें नांव ' चिंतामणि ऊर्फ विश्वंभर-गोसावी ' असें दिलेलें आहे[२].

३. एकनाथाचे एक चरित्रकार केशवदास पुढील माहिती देतातः—

" श्रीनाथकृपेशीं सत्पात्र । गिरिजाबाईसुक्षेत्र प्रसवली ते पुत्र । कन्या विचित्र पैं दोघी ॥ पुत्राभिधान ठेविलें हरी । गोदूबाई ज्येष्ठ कुमरी । चिंतोपंत प्रतिष्ठानपुरीं । त्याचे घरीं ते अर्पिली ॥ कनिष्ठ गंगाबाई । कर्नाटकप्रांतीं दिधली विवाहीं ।..."

४. नाथांचे दुसरे एक चरित्रकार महीपति म्हणतात.:—

" गिरिजाबाई सुक्षेत्र जाण । प्रथम प्रसवली कन्यारत्न गोदूबाई नामाभिधान । तिजकारणें ठेविलें ॥ तिचे पाठीवर पुत्र जाहला । हरिनाम ठेविलें तयाला । थोर होतांचि व्रतबंध केला । पढों लागला ब्रह्मशाळे ॥ तयाचे पाठीवर कन्या पाहीं । तिचें। नाम गंगाबाई । दिधली असे कवणे ठायीं । वृत्तांत तोहि अव-धारा ॥ एक चिंतोपंत नामें निर्धारीं । गृहस्थ होता प्रतिष्ठान क्षेत्रीं । गोदूबाई ज्येष्ट कुमरी । तयाचे घरीं दिधली ॥ आणिक कर्नाटक देशांत । जुना सोयरा नांदे गृहस्थ । गंगाबाई त्याच्या पुत्रातें । देवोनि त्वरित लग्न केलें ॥ "

५. गोदूबाईचेंच नांव लीलाबाई हें होतें, असें रा. धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे ह्यांच्या एकनाथचरित्रांतील नाथांच्या वंशावळींत लिहिलें आहे.[३]

६. कवि मुक्तेश्वरापासून चवथे पुरुष मुक्तेश्वरबुवा यास कोल्हा_

१. प्रो. पंगु, कविपंचक. पृ. २. आजगांवकरमहाराष्ट्रकविचरित्र पृ. ३७।३८
३. नवनित पृ. १५७. ४. आजगांवकर, महाराष्ट्र कविचरित्र पृ. ६३

पूरचे छत्रपति संभाजीमहाराज यांनीं शके १६४९ मध्यें तेरवाड गांवची सनद दिली, तींत खालील उल्लेख आहे:—'...आपले पणजे राजश्री थोरले मुक्तेश्वर गोसावी हे श्रीएकनाथ स्वामीची कन्या गंगाबाईचे पुत्र यांचें वृंदावन मौजे तेरवाड, प्रांत रायबाग येथें आहे.'

७. मुक्तेश्वरांचे गुरु 'लीलाविश्वंभर' हे एखादे प्रसिद्ध साधु असते तर महिपतीच्या संतचरित्रविषयक ग्रंथांत त्यांचा उल्लेख खाचित आला असता. परंतु त्या ग्रंथांत हें नांव मुळींच आढळत नाहीं. शिवायें उद्धवचिद्घन, शिवराम, रंगनाथ, उद्धवसुत व सिद्ध-चैतन्य यांच्या ज्या संतनामावळी प्रसिद्ध आहेत, त्यांत 'लीला-विश्वंभरा' चा कोठेंही उल्लेख नाहीं.

८. नाहीं म्हणावयास, पंताच्या सन्मणिमालेंत व जयरामसुत-कृत संतमालिकेंत 'लीलाविश्वंभर' हें नांव आढळतें.

मोरोपंतांच्या सन्मणिमालेंत पुढील आर्या आढळते:—

**श्रीलीलाविश्वंभर पदनतिहेतुध्रुवाचि यागाला।**
**स्पर्शे शिष्या यत्कर जेवीं हरिहर ध्रुवाचिया गाला॥**

९. शुभानंद नामक दुसऱ्या एका कोंकणच्या राहाणाऱ्या कवीनें 'विश्वंभर' या नांवाचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केलेला आढळतो.

१०. 'लीलाविश्वंभरें' हें पद दासोपंतांच्या पदांत श्रीदत्ताला लाव-लेलें वारंवार आढळतें. शके १४७३ ते १५३७ असा दासोपंतांचा काल व शके १४९५ ते १५६० असा मुक्तेश्वराचा काल पांगार-करांनीं अनुमानिलेला आहे.

१. आजगांवकर—महाराष्ट्रकविचरित्र (पृ.३८) २. प्रो. पंगु भा. म. कविपंचक, पृ. २. ३. पांगारकर—मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २ रा, पृ. ४७०.

११. भिमाजीबावाकृत भक्तलीलामृत ग्रंथांत पुढील अभंग दिला आहे:-

एकनाथकन्या नाम लीलाबाई। प्रीति तिचे ठायीं बहु असे ॥

... ... ... ... ... ... ... ... ... ...

विश्वंभरनामें विप्र एक आला। कोणी नाहीं त्याला मागेंपुढें ॥
भोजना बैसतां विचारिती स्वामी। दीन हे जी मी म्हणे मुखें ॥
आली दया म्हणती काय इच्छा आहे। लग्न करावें हें मनीं वाटे।

... ... ... ... ... ... ...

मोठमोठे आले न देवोनि त्यांसी। देवोनिया यांसी लग्न केलें ॥
घरींच ठेविलें भजनकीर्तन। अनुग्रह जाण दिला तया ॥
जाला पुत्र त्याचें नांव मुक्तेश्वर। भारत अपार केलें ज्यांनीं ॥

दीर्घव्यासंगशील विद्वान् चिकित्सकांनीं संकलित केलेलीं अन्तःसाधनें पुढीलप्रमाणें आहेत:—

१ सुचिरसहजवासें गौतमीच्या तटाकीं।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टाकी ॥
द्विजवर कविनामा मुद्गल् अत्रिगोत्रीं।
विमळवचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं ॥ ४७० ॥

—संक्षेपरामायण, उत्तरकांड.

२ विश्वंभर श्रीगुरूच्या प्रसादें। आनंदवाचा वदलों विनोदें ॥
भक्तीनें मुक्तेश्वर सार बोले। आकर्णितां सज्जनचित्त डोले ॥

—रामायण, शेवटला श्लोक.

३ आदिपर्वाच्या उपसंहारांत कवि म्हणतो—

प्रसिद्ध महाराष्ट्र देशीं। गोदावरीतटनिवासी ॥
अत्रिगोत्र पवित्रवंशीं। जन्म जाहला जयातें ॥ ६ ॥
तो चिंतामणिभूदेवकुमर। श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर ॥
श्रोतयां विनवी मुक्तेश्वर। क्षमा कीजे समस्तीं ॥७॥

१. आजगांवकर—महाराष्ट्र-कविचरित्र, पृ. ४८५

करवीर लक्ष्मी विष्णुभाजा । भैरव सुवर्णपुरीचा राजा ॥
उभय कुळदैवतीं माजा । मस्तक पायीं स्पर्शिला ॥८॥
तेणें बळें परमसुखी । श्लाघ्यता पावलों उभयलोकीं ॥
सद्‌गुरुकृपा-मातृअंकीं । योग्य झालों बैसावया ॥९॥

४. चिन्मूर्ति लीलाविश्वंभरु । दत्तात्रेय जगद्‌गुरु ॥
त्याचेनि नामें मुक्तेश्वरु । कथा बोले भारती ॥
—आदि. अ. ३३

५. लीलाविश्वंभर सद्‌गुरु । सकळ सिद्धांचे ईश्वरु ।
बोलती तितुकें मुक्तेश्वरु । निरूपीत भारतीं ॥
—आदि. अ. ४९

६. मुक्तेश्वराचा श्रीगुरु । दत्तात्रेय हा अवतारु ॥
—सभा. ८-१६८

७. पवित्र मुक्तेश्वराचें वदन । विश्वंभर गुरुनामें ॥
—सभा. १४-१७१

सभापर्वाच्या उपसंहारांत कवि म्हणतो:—

गोदावरीतटनिवासीं । अत्रिगोत्री पवित्र ऋषी ॥
चिंतामणि गुणैकराशी- । पासाव जन्म जयाचा ॥ २ ॥
तो मुद्‌गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ॥
व्यास-भारतीचा अर्थ । महाराष्ट्रं बोलिला ॥ ३ ॥

९. श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर । विनवी कवि मुक्तेश्वर ॥
ग्रंथ चाले तो बडिवार । संतमहंतकृपेचा ॥
—आदि. अ० ११

१०. विश्वंभरांघ्रिपदभ्रमर । विनवी मुक्तेश्वर कवि किंकर ।
कथा चाले तो बडिवार । संतसज्जनसंगतीचा ॥
—सौ० ३-९८

( वरील सर्व प्रमाणें ह. भ. प. पांगारकरांनीं आपल्या मुक्तेश्वर-चरित्रांत संकलित केलेलीं आहेत. ‘ मुक्तेश्वराविषयीं साक्षात्

त्याच्याच ग्रंथांत जी माहिती मिळते ती एवढीच आहे.' असा ह. भ. प. पांगारकरांनीं निर्वाळा दिलेला आहे.)

११ विश्वभराची आरती ( कवि मुक्तेश्वरकृत )

( चाल—आरती ज्ञानराजा )

**आरती विश्वंभरा । पूर्णसाक्षी ओम्कारा । सद्‌यन व्यापुनिया । योगिवृंदमाहेरा ॥ ध्रु० ॥ निर्गुण निरामया । निर्विकार अद्वया । सच्चिदानंदरूपा । निरंजना अव्यया ॥ १ ॥**

**...उद्दालका तापीतीर । जयासंनिध अवतार । प्रगटोनी धर्मासि तूं । पापी तारीयेले थोर ॥ ५ ॥ शरण मी तुज आतां । पायीं ठेविला माथा । संतोषें सुत रक्षी । गुरु विश्वंभर नाथा ॥ ६ ॥**

( यांतील शेवटच्या चरणाचा पांगारकरांनीं आधार घेतला आहे. मुक्तेश्वरचरित्र, पृ. १४ )

आतां वरील सर्व बाह्य व अन्तः प्रमाणांवरून कोणते निष्कर्ष काढतां येतात तें पाहूं.

पहिल्या बाह्य प्रमाणांत दिलेल्या विठोबाअण्णा दप्तरदारांच्या सुप्रसिद्ध श्लोकावरून मुक्तेश्वराच्या आईचें एक नांव ' लीला ' असें होतें व त्याच्या वडिलांचें एक नांव ' विश्वंभर ' असें होतें, असा एक परंपरागत समज होता अथवा फार लांबवर पसरलेली व संत-समाजांत विषेश चिकित्सेविना मान्यता पावलेली एक आख्यायिका होती यांत कांहीं संदेह दिसत नाहीं. हा समज किती बलवान होता हें प्रत्यक्ष मुक्तेश्वर आपल्या वडिलांचें नांव ' चिंतामणि' असें सांगत असतांही अकराव्या बाह्य-प्रमाणांत त्याच्या पित्याचें ' विश्वंभर ' हें एकच नांव दिलेलें आहे यावरून कळून येईल. तसेंच उपलब्ध सनदांवरून मुक्तेश्वराच्या मातेचें नांव ' गोदा ' किंवा ' गंगा ' असल्याची साधार व निश्चित माहिती मिळत असतां, आणि तिसऱ्या व चौथ्या बाह्य प्रमाणांत मुक्तेश्वराचे चरित्रकार केशवदास

व माहिपति हे मुक्तेश्वराच्या मात्यापित्याचीं नांवें, ‘ लीला ’ व ‘ विश्वंभर ’ या नांवांचा उल्लेखही न करतां, ‘ गोदूबाई ’ व ‘ चिंतोपंत ’ अशीं असल्याचें स्पष्टपणें सांगत असूनही अकराव्या बाह्य प्रमाणांत ‘ गोदूबाई ’ व ‘ चिंतोपंत ’ या नांवांचा पूर्ण लोप होऊन ‘ लीला ’ व ‘ विश्वंभर ’ हींच नांवें शिल्लक राहिल्याचें आपणांस आढळून येतें. नवनीतकर्त्यांनीं सुद्धां प्रारंभीं मुक्तेश्वराची ओळख करून देतांना त्याच्या मातापित्यांचीं ‘ लीला ’ व ‘ विश्वंभर ’ हींच नांवें दिलीं आहेत, व केशवदास आणि माहिपति यांचे वरील उतारे अर्थात् कमी महत्वाचे समजून पायटिपणींत दिले आहेत. ‘ शास्त्राद्रूढिर्बलीयसी ’ या म्हणीचें इतकें प्रबल उदाहरण क्वचितच सांपडेल. केशवदास व महिपति, अथवा त्यापैकीं कोणीतरी एकानें, कांहींतरी साधार माहिती मिळवण्याचा शक्य तितका प्रयत्न खास केला असला पाहिजे. म्हणून त्यांचें प्रमाण ग्राह्य मानणेंच सयुक्त आहे. पांचव्या बाह्य प्रमाणावर नवनीतकर्त्यांनीं भर दिलेला आहे. परंतु त्यांनीं हा मुद्दा विशेष चिकित्सेचा विषय केलेला दिसत नाहीं. ह. भ. प. पांगारकरांनीं स्वतःच्या अनुमानांनीं तयार केलेली वंशावळ जशी प्रमाण म्हणून मानतां येणार नाहीं, तशीच रा. सहस्रबुद्धे यांनींही उपरोक्त परंपरागत आख्यायिकेच्या दडपणाखालीं अनुमानिलेल्या वंशावळीलाही प्रमाणभूत मानतां येणार नाहीं हें उघड आहे. सहाव्या प्रमाणांत मुक्तेश्वराच्या आईचें नांव ‘गंगाबाई’ असें दिलें आहे. नाथांच्या कनिष्ठ कन्येचेंही नांव ‘ गंगाबाई ’ असें होतें, व मुक्तेश्वर हे ‘ ज्येष्ठ कुमरी गोदूबाई ’ चे पुत्र होते हें महिपति व केशवदास यांच्या वरील उताऱ्यांवरून निश्चितपणें म्हणतां येतें. पण या उताऱ्यांत व सहाव्या प्रमाणांतील उल्लेखांत दिलेल्या मुक्ते-

१ पांगारकर–मुक्तेश्वरचारित्र, पृ. २२.

श्वराच्या आईच्या नांवांत विरोध दिसून येतो. ह. भ. प. पांगारकरांनीं गोदूबाईचें सासरचें नांव ' गंगाबाई ' असें असावें असा जो निष्कर्ष काढलेला आहे तो विचारणीय आहे. गोदावरीसारख्या सर्व पवित्र नद्यांना ' गंगा ' नावानें संबोधण्याचा भाविक हिंदूंत प्रघात आहे. गोदावरीतीरस्थ नाशिक क्षेत्रीं गोदावरीवर स्नानास गेले असतां ' मी गंगेवर स्नानास गेलों होतों ' असा सार्वत्रिक वाक्प्रयोग ऐकू येतो. ही रीत लक्षात घेतां बोलण्याचालण्यांत विशेष कसोशी न बाळगणारे कोणी कोणी गोदूबाईनाच ' गंगाबाई ' या नावानें संबोधीत असण्याचाही संभव आहे.

सातव्या व आठव्या प्रमाणांचा विचार महाराष्ट्रकविचरित्रकार आजगांवकरांनीं प्रामुख्यानें केलेला आहे. आजगांवकर म्हणतात.

" मुक्तेश्वरांचे गुरु 'लीलाविश्वंभर' हे एखादे प्रसिद्ध साधुपुरुष असते तर महिपतीच्या संतचरित्राविषयक ग्रंथांत त्यांचा उल्लेख खचित आला असता. परंतु त्या ग्रंथांत हें नांव मुळींच आढळत नाहीं. नाहीं म्हणावयास पंतांच्या सन्मणिमालेंत व जयरामसुतकृत संतमालिकेंत ' लीलाविश्वंभर ' हें नाव आढळतें; परंतु पंतांनीं व जयरामसुतांनीं मुक्तेश्वरांच्या काव्यांतूनच हें नांव घेतलें असावें असें मानण्यास हरकत दिसत नाहीं."

आजगांवकरांचा हा वरील युक्तिवाद फारच मोठा गंमतीचा आहे. महिपतीच्या ग्रंथांत लीलाविश्वंभरांचा उल्लेख नाहीं, या अभावरूप प्रमाणाचा उपयोग करून त्यांनीं, ज्या अर्थीं लीलाविश्वंभर या नांवाचे कोणी साधुपुरुषच झाले नाहींत, त्या अर्थीं मुक्तेश्वरानें ' लीलाविश्वंभर ' पदानें आपल्या मातापित्यांचाच उल्लेख केलेला आहे, असें अत्यंत तर्कदुष्ट अनुमान काढलेलें आहे.

१ मुक्तेश्वरचारित्र, पृ. १४; २. महाराष्ट्र कविचरित्र पृ. ३८

दुसरें असें कीं, पंतांनीं व जयरामसुतांनीं केलेला 'लीलाविश्वंभरा-'चा उल्लेख या दोघांनीं तें नांव मुक्तेश्वरापासूनच घेतलें असावें या विधानानें आजगांवकरांनीं खोडून काढला आहे. उल्लेख केला तर एक पाप ! केला नाहीं तर दुसरें पाप ! विवादाच्या भरांत आपलींच विधानें परस्परांना मारक ठरतात, याचें भान आजगांवकरांना राहिलेलें दिसत नाहीं. महिपतींनींही लीलाविश्वंभराचा उल्लेख केला असतां तर तोही उपरोक्त विधानानेंच खोडून काढण्यास कोणता प्रत्यवाय आला असता, तें एका आजगांवकरांनाच माहित ! मग महिपतीनें लिलाविश्वंभराचा उल्लेख केला नाहीं या म्हणण्यांत अर्थ तो काय राहिला ?

पंढरीच्या वाळवंटांत प्रेमपडिभरानें लोळण घेत असतां आपल्या चिकित्सकपणा वगैरे अनेक बुद्धिगुणांचा संपूर्ण लय व्हावा असें मनापासून वाटणाऱ्या भगवद्भक्त पांगारकरांनीं व थोड्याफार अंशानें त्याच मनोवृत्तीच्या आजगावकरांनीं संतमहंत-वृंदांत मान्यता पावलेल्या आख्यायिकेला उचलून धरण्याचा प्रयत्न करावा यांत कांहीं नवल नाहीं. परंतु चिकित्सकतादि बुद्धिगुण हेंच ज्यांचें मानस्थान आहे, अशा प्राध्यापक पंगूसारख्या विद्वानानेंही आजगांवकरांच्या वरील विधानांची परस्परनाशकता लक्षांत न घेतां आजगांवकरांचीच री ओढावी हें मात्र खचित विस्मयास्पद आहे. महिपतीबरोबरच उद्धवचिद्धन, शिवराम, रंगनाथ, उद्धव-सुत व सिद्धचैतन्य यांच्या ज्या संतनामावळी प्रसिद्ध आहेत, त्यांत 'लीला-विश्वंभराचा' कोठेंही उल्लेख नाहीं, अशी आजगांव-करांच्या विधानांचा पुरस्कार करतांना प्राध्यापक पंगूंनीं आणखी एक पुस्ती जोडली आहे. उपरोक्त संतनामावळींत 'लीलाविश्वं-भरा'चा उल्लेख असताच तर त्याचीही वाट पंतांच्या उल्लेखा-

प्रमाणेंच लावतां आली असती असें प्राध्यापक पंगूंना म्हणावयाचें आहे काय ?

दुसरें असें कीं, विवाहसमारंभांत नवरा मुलगा सांदीकोपऱ्यांत पडावा व इतरेजनांचा मात्र खूब बडीवार माजावा अशीच कांहींशी स्थिति या वरील प्रकरणांत झालेली दिसते. खुद्द मुक्तेश्वराला बिचाऱ्याला काय सांगावयाचें आहे त्याची विचारपूसच कोणी करीत नाहीं. तो बिचारा टाहो फोडून सांगत आहे कीं,

**चिन्मूर्ति लीलाविश्वंभरू[1] । दत्तात्रेय जगद्गुरु ।**
**त्याचेनि नामें मुक्तेश्वरु । कथा बोले भारती ॥**

पण त्याचें ऐकतो कोण ? महाभगवद्भक्त पांगारकरांनींही 'मुक्तेश्वरानें कोठें विश्वंभर व कोठें लीलाविश्वंभर या नांवानें गुरूला जागजागीं वंदन केलें आहे व तें दत्तभावनेनें केलें आहे[2]' असें अत्यंत चिकित्सापूर्ण व स्पष्ट वाक्य लिहिलें आहे. दहाव्या बाह्य प्रमाणावरून श्रीदत्ताचें 'लीलाविश्वंभर' हें अनेक नांवांपैकीं एक नांव मुक्तेश्वराच्या काळीं पुष्कळ प्रचारांत असल्याचेंही स्पष्टपणें दिसतें. श्रीदत्ताला उद्देशूनच विश्वंभर व लीलाविश्वंभर या दोनी पदांचा मुक्तेश्वरानें उपयोग केला असल्याचेंही स्पष्टपणें दिसून येतें. असें असतां, श्रीदत्त अथवा दत्तावतारी साधुपुरुष ज्या 'श्रीपाद' 'श्रीवल्लभ' 'अवधूत' वगैरे नांवांनीं प्रसिद्ध आहेत, तीं नांवें संतनामावळींत न शोधतां जर आपण 'लीलाविश्वंभर' हें नांव शोधूं लागलों तर तें आपल्यास न आढळणें साहजिक आहे. युद्ध थांबविण्याची खूण आपणास दिसूं नये म्हणून नेल्सननें आपल्या अंधनेत्रास दुर्बीण लावली, तशांतलाच हा प्रकार झाला. आपल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत, दुसऱ्या खंडांत, पृ. ६४ वर पांगार-

१ अंतःप्रमाण ४. २ मुक्तेश्वरचरित्र पृ. १४.

करांनीं एक संतनामावळी दिली आहे, त्यांत 'अवधूत' हें नांव आढळतें. नवव्या बाह्यप्रमाणांत शुभानंद कवीनें 'विश्वंभर' या नांवाच्या केलेल्या उल्लेखाविषयीं शुभानंद हा कदाचित् मुक्तेश्वराचा गुरुबंधु असावा, किंवा 'विश्वंभर' या नांवाचा कोंकणांत एखादा साधु होऊन गेला नसेल असें म्हणतां येत नाहीं; असा धांवता शेरा मारून आजगांवकर मोकळे होतात. त्यांना त्या पुराव्याचा विशेष विचार करण्याचें कारण दिसत नाहीं. एवंच, बाह्य पुराव्यांपैकीं अनुकूल पुराव्यांवर तेवढा विशेष भर देऊन आजगांवकरांनीं परंपरागत आख्यायिकेचाच पाठपुरावा केला आहे, असें स्पष्टपणें प्रचीतीस येतें.

आतां फक्त दुसऱ्या बाह्य प्रमाणाचा विचार करावयाचा राहिलेला आहे. या प्रमाणांत उल्लेखिलेल्या वंशावळीचा आधार विश्वसनीय मानण्यापूर्वी ती वंशावळ केव्हां तयार झाली, ती मुक्तेश्वराच्या हयातींत अस्तित्वांत असून त्याच्या अवलोकनांत आली होती काय ? इत्यादि प्रश्नांचा प्रथम निर्णय लागला पाहिजे. उपरोक्त परंपरागत आख्यायिकेच्या बळावर 'ऊर्फ विश्वंभर गोसावी' हे शब्द मागाहून कोणीं तरी तेथें प्रविष्ट केले असल्याचा संभवही विचारांत घेतला पाहिजे. या सर्व विचाराअंतीं आजगांवकरांनीं या प्रमाणास जितकें महत्व दिलें आहे तितकें तें देणें युक्त आहे कीं नाहीं, अशी स्वाभाविक शंका वाटूं लागते.

'लीला-विश्वंभर' हीं पदें आपल्या पारमार्थिक गुरूबरोबरच आपल्या मातापित्यांचींही निदर्शक म्हणून मुक्तेश्वर उपयोजितो कीं नाहीं, हें ठरवावयाचें झाल्यास बाह्य प्रमाणांपेक्षां अंत:प्रमाणांवरच विशेष भर दिला पाहिजे, हें कोणालाही कबूल करावें लागेल. भगवद्भक्त पांगारकरांना व आजगांवकरांना सुद्धां

स्वतः मुक्तेश्वराचें याबाबत जें म्हणणें असेल तेंच सर्वांत अधिक महत्वाचें समजलें पाहिजे, हें मान्य असल्याचें स्पष्टपणें प्रचीतीस येतें. म्हणूनच त्यांनीं दोन वेगवेगळ्या अंत:प्रमाणांवर विशेष भर दिला आहे. आपणही या दोन प्रमाणांचाच प्रथम विचार करूं.

तिसऱ्या व अकराव्या अंत:प्रमाणांचा आधार घेऊन आपल्या मुक्तेश्वरचारित्रांत पृ. १४ वर पांगारकर म्हणतात:—

" आदिपर्वाच्या उपसंहारांत मुक्तेश्वरानें आपणास 'चिंतामणि-भूदेवकुमर' असें म्हटलें आहे व विश्वंभराच्या आरतींत शेवटल्या चरणांत,

**शरण मी तुज आतां । पायीं ठेवियेला माथा ।**
**संतोषें सुत रक्षी । गुरु विश्वंभरनाथा ॥**

असें स्पष्ट सांगितलें आहे. या दोन्ही उल्लेखांवरून चिंतामणि तेच विश्वंभर व तेच मुक्तेश्वराचे गुरु होते याविषयीं संदेह राहत नाहीं."

वर, अकराव्या अंत:प्रमाणांत या आरतीचे पहिला, पांचवा व सहावा म्हणजेच शेवटला असे तीन चरण दिले आहेत. त्यांपैकीं पांचव्या चरणांत,

**उद्दालका तापी तीर । जयासंनिध अवतार ।**
**प्रगटोनि धर्मासि तूं । पापी तारियेले थोर ॥**

अशी आपल्या विश्वंभरनामक गुरूची विशिष्ट माहिती मुक्तेश्वरांनीं दिली आहे. या चरणावरून मुक्तेश्वराचे वडील चिंतामणि व गुरु विश्वंभर या दोन भिन्न व्यक्ति होत्या, हें नि:संदेह सिद्ध होतें. तापीतीराचा व मुक्तेश्वराचे वडील चिंतामणि यांचा संबंध जोडण्याचें व चिंतामणींना अवतारी पुरुष मानण्याचें कोणाच्या मनांतही येणार नाहीं. मग शेवटल्या सहाव्या चरणाचा आधार घेतांना पांगारकरांच्या शोधक दृष्टींतून त्याच्याच वरचा पांचवा चरण

कसा निसटला असावा, हा प्रश्न पुढें उभा राहतो व सदर पांचवा चरण पांगारकरांनीं पाहिलेल्या आरतींत दिला आहे कीं नाहीं, याचाच संशय वाटूं लागतो. परंपराप्रिय पांगारकरांनीं परंपरागत आख्यायिकेला बाध आणूं नये म्हणून सदर पांचव्या चरणाकडे कानाडोळा केला असण्याचाही संभव आहे. एकदां चिंतामणि व विश्वंभर या दोन भिन्न व्यक्ति होत्या असें ठरलें कीं ' संतोषें सुत रक्षी ' या वाक्यांतील ' सुत ' हें पद मुळींच आडवें येत नाहीं. ' त्वमेव माता, पिता त्वमेव ' असें देवाला अथवा गुरूला अहर्निश आळविणाऱ्या भाविक हिंदुसमाजांतील एका कवीनें आपल्याला आपल्या पारमार्थिक गुरूचा सुत म्हणवावें यांत अनर्थदर्शक असें कांहींही नाहीं. आरतींतलि पहिल्या चरणावरून मुक्तेश्वर योगिवृंदमाहेर, निर्गुण, निरामय श्रीदत्ताची प्रार्थना करीत आहे, हेंही निःसंदिग्धपणें दिसून येतें.

आजगांवकरांनीं आपल्या महाराष्ट्रकविचरित्रांत पृ. ३८ वर आठव्या अंतःप्रमाणांतील पुढील ओवीचा आधार घेतला आहे.

**तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात ।**
**यानें व्यास भारतीचा अर्थ । महाराष्ट्रें बोलिला ॥**

म. भा. भूषण आजगांवकर पुढें म्हणतातः—

" या ओवींत, ' जगविख्यात लीलाविश्वंभर ' जो चिंतामणि मुद्गल त्याचा मुलगा ( मुक्तेश्वर ) यानें भारत लिहिलें असें स्वतःच मुक्तेश्वरांनीं सांगितलें आहे."

वरील अर्थात सदर ओवींतील ' जगविख्यात लीलाविश्वंभर ' या विशेषणवाचक पदांचें विशेष्य ' चिंतामणिसुत ' या सामासिक शब्दांतील ' चिंतामणि ' हें पद असल्याचें आजगांवकरांनीं हीत धरलें आहे. मुक्तेश्वराची वाक्यरचना केव्हां केव्हां अत्यंत

शिथिल असते, हें सर्व टीकाकारांना मान्य आहे. परंतु ती शिथिलता इतक्या पराकोटीस मुक्तेश्वर नेतो असें म्हणणें धाडसाचें होईल. ' जगविख्यात लीलाविश्वंभर ' या विशेषणवाचक पदांचें वरील ओवींत कोणतें विशेष्य असलेंच तर तें ' चिंतामणिसुत ' हें सबंध सामासिक पद होय. त्याचा परिणाम असा होतो कीं, ' जगविख्यात ' व ' लीलाविश्वंभर ' हीं चिंतामणिसुताचीं म्हणजे मुक्तेश्वराचीं विशेषणें होतात. हा अर्थ अर्थातच अनर्थकारक आहे. मुक्तेश्वराच्या वाङ्मयाशीं परिचित असलेल्यांना वरील ओवीचा स्वतः मुक्तेश्वराला अभिप्रेत असलेला अर्थ सहज समजूं शकेल. चिंतामणीचा मुलगा जो मुक्तेश्वर मुद्गल ( ज्याचा गुरु ) लीलाविश्वंभर जगविख्यात आहे, त्यानें भारताचा अर्थ मराठींत सांगितला; असा या ओवीचा स्पष्ट अर्थ आहे. परंपरागत आख्यायिकेला धक्का पोंचूं नये या सूक्ष्म अंतःप्रेरणेनेंच आजगांवकरांना कदाचित् तसा अर्थ करावयास लावलें असेल. या अंतःप्रेरणेचें अस्तित्व खुद्द आजगांवकरांना सुद्धां भासमान न होण्याइतकी ती सूक्ष्म असणें संभवनीय आहे.

इतर अंतःप्रमाणाचा विचार करतां, मुक्तेश्वराच्या वडिलांचें नांव फक्त चिंतामणि एवढेंच होतें. मुक्तेश्वराच्या हयातींत त्यांना विश्वंभर हें उर्फनांव मुळींच प्राप्त झालें नव्हतें; दहाव्या बाह्यप्रमाणांत सूचित झालेल्या तत्कालीन परिपाठाप्रमाणें ' लीलाविश्वंभर ' व ' विश्वंभर ' या पदांनीं मुक्तेश्वर आपल्या दत्तात्रेय श्रीगुरूचेंच निदर्शन करीत आहे, मातापित्यांचें निदर्शन करीत नाहीं, इतक्या कथा स्वतः मुक्तेश्वर स्पष्ट शब्दांत सांगत असल्याचें निःसंदेहपणें आढळून येईल.

आतां, अशा परीस्थितींत उपरोक्त परंपरागत समजाचा

अथवा आख्यायिकेचा उदय तरी कसा व कां झाला, या प्रश्नाचा थोडा विचार करणें क्रमप्राप्त आहे. मुक्तेश्वराच्या काळीं श्रीदत्तभक्ति फार प्रकर्षावस्थेंत होती. त्यामुळें साहजिकपणेंच उपास्यदैवताचें अगर सद्गुरूचें नांव सहजासहजीं मुखीं यावें म्हणून श्रीदत्ताच्या अनेक नांवांपैकीं एखादें नांव, मूळनांव नसल्यास निदान ऊर्फनांव म्हणून तरी, दत्तोपासक आपल्या मुलांना ठेवीत असत. तेव्हां उपास्यदैवत श्रीदत्त असून श्रीदत्ताच्या अनेक नांवांपैकींच एक नांव वडिलांचेंही असल्यास त्या कवीला त्या विशिष्ट नांवानेंच श्रीदत्ताचा उल्लेख करून उपास्यदैवत व तीर्थरूप या दोघांच्याही नांवाचा उल्लेख केल्याचें श्रेय मिळवितां येत असे. या बाबतींत मुक्तेश्वराच्या पूर्ववयांत हयात असलेल्या गीतार्णवकर्त्या दासोपंतांचें उदाहरण देण्यासारखें आहे. दासोपंतांच्या वडिलांचें नांव दिगंबरपंत असें होतें व उपास्यदैवत श्रीदत्त हें होतें, व दासोपंतांनीं, ' दिगंबरानुचरु म्हणे, ' ' येई दिगंबरा, माझिया माहेरा ! ' इत्यादि अनेक वाक्यांत आपल्या उपास्यदैवत श्रीदत्ताचा उल्लेख ' दिगंबर ' या पदानें करून पितृभक्ति व उपास्यदैवतभक्ति या दोन्ही भक्तींचें श्रेय मिळविलें आहे. दहाव्या बाह्य प्रमाणांत सांगितल्याप्रमाणें, स्वतः दासोपंतांनीं दिगंबर या पदाचा सहेतुक उपयोग केला आहे यांत शंका नाहीं. दासोपंतांनीं ' लीलाविश्वंभर ' हें पदही श्रीदत्तनिदर्शक अर्थानें वारंवार उपयोजिलें आहे. ' लीलाविश्वंभर ' अथवा 'विश्वंभर' या पदांचा श्रीदत्तनिदर्शक अर्थानें उपयोग करण्याचा प्रघात त्या काळीं विस्तृतपणें रूढ असावा असें दिसतें. लीला व विश्वंभर हीं पदें पुढें आपल्या मातापित्यांना अनुक्रमें चिकटवलीं जातील ही कल्पना सुद्धां न येतां मुक्तेश्वरानें श्रीदत्ताला तत्कालीन प्रघाताप्रमाणें ' विश्वंभर ' वा ' लीलाविश्वंभर '

या दिव्यार्थवाहक पदांनीं वारंवार आळविलें. हें त्याचें करणें दासोपंताप्रमाणें सहेतुक असावें असा संशय मागाहून झालेल्या संतमहंतांच्या भाविक मनांत उदित झाला असणें संभवनीय आहे आणि हा संशय पुढें पसरत जाऊन अखेरीस त्या श्रद्धाळु कालांत त्याला निश्चिततेचें स्वरूप प्राप्त होणें हेंही शक्यतेच्या कोटींतलें आहे. या विचारांच्या दिशेनें प्रतिकूल बाह्यप्रमाणांचा विचार केल्यास त्यांचा उलगडा होण्यास अडचण पडणार नाहीं.

मुक्तेश्वराची उत्तम कवी म्हणून प्रसिद्धी आहे. तेव्हां त्याच्या काव्याचा रसास्वाद घेण्याऐवजीं वरील प्रकारच्या चर्चेंत नमनासच धडाभर तेल खर्च करणें अयुक्त आहे, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. मुक्तेश्वरी काव्याचा रसास्वाद घेणें हीच सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट आहे यांत कांहीं शंका नाहीं; परंतु प्रस्तुत लेख लिहिण्याकारितां नाशिक येथें उपलब्ध झालेले तत्संबंधीं कांहीं थोडे ग्रंथ चाळत असतां वरील विषयाच्या पूर्वीं झालेल्या चर्चेंत मला थोडा एकांगीपणा आढळून आला. म्हणून वरील ग्रंथांतच मांडलेल्या पुराव्यावरून जीं स्पष्ट अनुमानें मला काढतां आलीं तीं आरंभीं दिग्दर्शित करण्याचा मोह मला आवरला नाहीं. ' संतसज्जनीं क्षमा कीजे.'

मुक्तेश्वराच्या जन्म व निर्याणशकाविषयींही स्पष्ट अशी माहिती उपलब्ध नाहीं. तत्संबंधीं सर्व उपलब्ध पुराव्याची उत्तम छाननी करून कोल्हापुरचे विद्वान प्राध्यापक पंगु यांनीं ' मुक्तेश्वर इ. स. १५७३–७४ सालीं जन्मले असावे. त्यांनीं आपलें भारत इ. स. १६४० पर्यंत रचलें असावें, व ते इ. स. १६४५ –४६ च्या सुमारास स्वर्गवासी झाले असावे ' असा मुक्तेश्वराच्या

१ कविपंचक पृ. २३.

कालनिर्णयविषयक विवेचनाचा समन्वय केलेला आहे. तो मान्य होण्यासारखा आहे.

आतां आपण विद्वानांनीं चर्चिलेले इतरही कांहीं बारीकसारीक मुद्दे सोडून देऊन मुक्तेश्वरी काव्याच्या रसास्वादाकडेच प्रथम वळूं.

मुक्तेश्वरी काव्याची सर्व विद्वानांनीं एकमतानें व मुक्तकंठानें स्तुति केलेली आहे.

भगवद्भक्त कै. पांगारकर आपल्या मुक्तेश्वरचरित्रांत पृ० ३४ वर लिहितात:

" मुक्तेश्वराचे वाणींत जें अद्भुत ओज व जी वीररसाची दीप्ति इतक्या उत्तमत्वानें चमकतांना दिसते त्याचें कारण तरी हेंच कीं, त्याची कल्पना अति विशाल होती. सत्कवीला लागणारे प्रतिभादि लोकोत्तर गुण त्यांत होते. सभोंवारच्या परिस्थितीकडे व समाजघटनेकडे राष्ट्रीय अभिमानानें पाहण्याचें सामर्थ्य त्यांत होतें. दहावीस वर्षांनीं होणाऱ्या गोष्टी त्याच्या दिव्य प्रतिभेला दिसूं लागल्या होत्या. महाराष्ट्राला पडत असलेलीं स्वराज्याचीं स्वप्नें त्याच्या भारतांत प्रतिबिंबित झालेलीं आहेत. एकनाथाचें रक्त त्याच्या अंगांत खेळत असल्यामुळें जाज्वल्य नीतिमत्ता व ईश्वरभक्ति हे गुण निसर्गतः त्याला प्राप्त झाले होते. अशा सर्वांग-सुंदर कविश्रेष्ठ मुक्तेश्वराच्या तोलाचा दुसरा मराठी कवि म्हणजे मुक्तेश्वरच होय."

कै. हरिभाऊ आपटे आपल्या ' मराठी वाङ्मयाचा अभ्यास ' या व्याख्यानांत मोरोपंत व मुक्तेश्वर यांची तुलना करून मुक्तेश्वराचें श्रेष्ठत्व ठरवितांना म्हणतात,

" रसपरिपाक, वर्णन, सौंदर्य व भाषेची अव्याजमनोहरता ज्यांस हवी असेल, त्यांचें मन रंजविण्यास मुक्तेश्वर तयार आहेत.

मुक्तेश्वरांचें महाभारत वाचतांना त्यांच्या वर्णनशैलीमुळें ते ते देखावे व त्या त्या व्यक्ति आपल्या डोळ्यापुढें दिसत आहेत असेंच वाटतें. त्यांच्या भाषेंत कृत्रिमता बिलकुल नाहीं. त्यांच्या उपमा अगदीं सहज ! निसर्गमनोहर अशा युवतीच्या दर्शनानें जो आनंद होतो तो आनंद मुक्तेश्वराच्या काव्यापासून होतो. मुक्तेश्वरांचा भर शब्दचमत्कारावर मुळींच नाहीं, अर्थावर फार. यामुळें त्यांचीं महाभारतांतील आख्यानें पंतांच्या आख्यानांपेक्षां सहृदय वाचकांस अधिक आल्हादकारक होतात. ''

महाराष्ट्र-भाषा-भूषण आजगांवकरांनीं रा. भिडे यांचा मार्मिक व वाचनीय अभिप्राय आपल्या महाराष्ट्र-कविचारित्रांत उध्दृत केला आहे तो असा, " मुक्तेश्वरांची रचना जशी प्रसंगविशेषीं कठोर व सणसणीत आहे, तशीच प्रसंगानुरूप ती कोमल, प्रेमळ व नाजूकही आढळते. अक्षरगणवृत्तांचीं बंधनें सहन करण्यापुरता जरी त्यांच्या वाणीच्या अंगीं लवचीकपणा नाहीं, तरी ती उणीव रसभावांचा विचार करितांना नजरेस येत नाहीं. रसभेदाप्रमाणें त्यांच्या शब्दसरणींत तत्काळ भेद झालेला प्रत्ययास येतो. जो वाक्प्रवाह एका ठिकाणीं नायगाऱ्याच्या प्रचंड धबधब्याप्रमाणें भूमंडळ दणाणीत आवर्तशतानें खळबळत गंभीर गर्जनेनें अंतराळ धुमधुमवीत, प्रचंड आवेशानें भेडसावीत जातो, तोच दुसऱ्या ठिकाणीं लहानशा झऱ्याप्रमाणें मंजुळ स्वरानें गात, लतातृणाशीं खेळत, सुमदलांना कवळीत व पशुपक्ष्यांना हंसवीत झुळुझुळू वाहतांना पाहिला, म्हणजे कोणास बरें कौतुक वाटणार नाहीं ? कालभैरवाचें अकांडतांडव व अप्सरेचा नाजूक नाच हीं दोन्हीं एकाच व्यक्तीला साधलेलीं पाहून मन चकित झालेंच पाहिजे. मुक्तेश्वराची भाषा जितकी एके ठिकाणीं कर्कश, तितकीच दुसरे ठिकाणीं प्रेमळ;

जितकी एके ठिकाणीं खणखणीत, तितकीच दुसरे ठिकाणीं लुसलुशीत; जितकी एके ठिकाणीं आवेशी, तितकीच दुसरे ठिकाणीं संथ; अशी अनुभवास येते व याच गोष्टीनें त्यांचें वाक्प्रभुत्व सिद्ध होतें."

महाराष्ट्र-भाषाभूषण आजगांवकर आपल्या महाराष्ट्र-कविचरित्रांतील मुक्तेश्वरावरील निबंधाच्या सुरवातीच्या परिच्छेदांत म्हणतात, "महाराष्ट्र देशांत आजपर्यंत पुष्कळ कवि होऊन गेले; परंतु खऱ्या कवित्वाच्या दृष्टीनें पाहिल्यास, त्या सर्वांत मुक्तेश्वरांचीं योजना प्रमुख स्थानीं करणें अगदीं बरोबर आहे, असें त्यांचीं काव्यें ज्या भाग्यवान् व रसिक पुरुषांनीं मननपूर्वक वाचून पाहिलीं असतील, त्यांस खचित वाटल्याशिवाय राहणार नाहीं. मुक्तेश्वरांची आज उपलब्ध असलेली कविता फार थोडी आहे; तथापि ती इतकी चांगली आहे कीं, मराठी भाषेंतील उत्तम कवितेचा नमुना जर कोणास पहावयाचा असेल, तर त्याला मुक्तेश्वराचें महाभारत पहिल्यानें वाचावयास द्यावें. ओवीसारख्या सुलभ वृत्तांत व अगदीं साध्या भाषेंत जर अंगीं खरी कविताशक्ती असेल तर, पाहिजे तो रस कसा खुलवून देतां येतो हें मुक्तेश्वरी भारतावरून वाचकांच्या ध्यानांत येईल."

"मुक्तेश्वराची कविता प्रासादिक, प्रौढ, रसाळ व सृष्टिसौंदर्यवर्णनयुक्त असून नाना प्रकारचे अलंकार व रस तींत ठिकठिकाणीं आहेत" असें सांगून आजगांवकरांनीं पुढील दोन अभिप्राय नमूद केले आहेत.

कविचरित्रकाराचा अभिप्राय:—

"मुक्तेश्वराप्रमाणें रसाळ ओंव्या कोणत्याही कवीच्या नाहींत. त्यानें आपल्या कवितेमध्यें शृंगार, वीर व करुण हे रस चांगले साधले आहेत. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादि अर्थालंकार हे

त्याच्या कवितेंत फार सांपडतात. त्याचें वर्णन प्रौढ असून चमत्कारिक ( चमत्कृतिजनक ? ) आहे. त्याच्या वाणींत मार्दव आणि माधुर्य हे गुण विशेष असून ती प्रासादिक आहे. "

कै. वामन दाजी ओक या विद्वान् व रसिक गृहस्थांचा अभिप्रायः-

" नूतन व उदात्त विचारांमुळें मुक्तेश्वरांच्या काव्याला विशेष शोभा आली आहे व शब्दचमत्कारापेक्षां अर्थमाधुर्याकडे लक्ष देणाऱ्या सर्व विद्वानांना मुक्तेश्वराचीं काव्यें विशेष आवडतील यांत संशय नाहीं. कवीला आवश्यक जें पूर्ण व्यवहारावलोकन त्यांत इतरांपेक्षां मुक्तेश्वर श्रेष्ठ होता असें म्हणावें लागतें. "

प्राध्यापक पंगु आपल्या कविपंचकांत लिहितात—

" काव्य रचावयाचें तें भक्ति किंवा अध्यात्म यांच्या विवेचनासाठींच रचावयाचें हा काव्याचा परंपरागत पारमार्थिक हेतु बदलून मुक्तेश्वरानें आपल्या सगुण सालंकार वाणीनें काव्यानंद चाखण्याची चटक आपल्यासारख्याच रसिक वाचकांना लावली; इतकेंच नव्हे तर भक्ति किंवा वेदांत यांची बैठक न सोडतां, अनेक आख्यानोपाख्यानांवर आपली स्वतंत्र कल्पनाशक्ति चालवून मराठी भाषेची सेवा करण्याची स्फूर्ति त्यानें अनेक कवींना दिली. मुक्तेश्वराचें महाभारत हा त्याच्या परिणत प्रज्ञेचा विलास होय. या ग्रंथांत मुक्तेश्वराच्या अंगच्या रसिकतेस व स्वतंत्र प्रतिभेस विहार करण्यास पूर्ण मुभा मिळाली असून त्याची वाणहि प्रसन्न, सहज व ओघवती बनली आहे....प्राचीन मराठी कवींना 'भाषांतरे' असें हेटाळणीनें अभिधान देणाऱ्यांचे डोळे, मुक्तेश्वरी भारतांतील कल्पनेच्या नवीनतेनें व विशालतेनें आणि रसांच्या अथवा भावनांच्या उत्कटतेनें व सखोलतेनें दिपून गेल्याशिवाय राहणार नाहींत. मुक्तेश्वराचीं व्यक्तिवर्णनें जशीं उदात्त व डौलदार

आहेत, तशीं त्याचीं स्थलवर्णनेंही भरघोस व संपन्न आहेत. कोणत्याही प्रसंगाचें वर्णन करतांना, तो प्रसंग जसा तो वाचकापुढें हुबेहूब उभा करतो तसेंच कोणत्याही कालाचें अथवा ऋतुचें वर्णन करतांना वाचकांना विशाल कल्पनेच्या विमानांत बसवून प्रसन्न वातावरणांत विहार करावयास नेतो. ”

या सर्व अभिप्रायांचा थोडक्यांत खालीलप्रमाणें सारांश काढतां येईल.

मुक्तेश्वरापूर्वी काव्यरचनेचा परंपरागत हेतु पारमार्थिक होता. परंतु मुक्तेश्वरानें काव्यानंद निर्माण करण्याच्या हेतूनें काव्यरचना केली. त्याची वाणी ओजस्वी, सगुण, सालंकार, प्रसन्न, सहज, ओघवती व अव्याजमनोहर असून तिच्यांत ओज, मार्दव व माधुर्य हे गुण आहेत. त्याचा शब्दचमत्कारापेक्षां अर्थमाधुर्यावर विशेष भर असल्यामुळें विविध शब्दालंकार, विशेषत: उपमा, उत्प्रेक्षा व दृष्टांत हे सहजतेनें उपयोजिलेले शब्दालंकार त्याच्या लिखाणाला अनुपम माधुर्य देतात. मुक्तेश्वर रसोत्पत्तीच्या कलेंतही कुशल आहे. विशेषत: शृंगार, वीर व करुण या रसांची निर्मिती तो उत्कृष्टतेनें करूं शकतो. रसभेदानुकूल शब्दसरणी उपयोजून तो उत्तम रसपरिपाक निर्माण करतो. त्याची वर्णनशैली त्याच्या कवित्वाची साक्ष देते. त्याच्या वर्णनांवरून खऱ्या कवीला आवश्यक असणारें त्याचें सूक्ष्म व्यवहारावलोकन प्रतीत होतें. त्याचीं व्यक्तिवर्णनें उदात्त व डौलदार असून स्थलवर्णनें भरघोस व संपन्न असतात. हुबेहुब वर्णन करण्याच्या हातोटीमुळें मुक्तेश्वरानें वर्णिलेले ते ते देखावे आपल्या डोळ्यापुढें उभे राहतात. त्याचे विचार नवीन व उदात्त; कल्पना हृदयंगम व विशाल आणि भावना उत्कट आहेत. त्याची जाज्वल्य नीतिमत्ता, दृढ ईश्वरभक्ति व संपन्न प्रतिभा त्याच्या लिखाणांत

पदोपदीं अनुभवास येतात. एकंदरींत, मुक्तेश्वराच्या काव्यानें मराठी भाषेला अत्यंत अभिमानास्पद अशी संपन्नता प्राप्त करून दिली आहे असें विनाप्रत्यवाय म्हणता येईल.

आतांपर्यंत विद्वानांनीं केलेली मुक्तेश्वराच्या काव्याची स्तुती आपण ऐकली. आतां प्रत्यक्ष मुक्तेश्वरी काव्यरसाचाच थोडासा आस्वाद घेऊं म्हणजे झालें.

प्रथम, मुक्तेश्वरानें आपली वाक्सुंदरी ज्या विविध अलंकारांनीं नटविली आहे त्यांपैकीं तज्ज्ञांनीं प्रयत्नतः पारखून प्रशंसिलेल्या कांहीं अलंकारांचें तेज व रचनाचातुर्य पाहूं.

दमयंतीचा त्याग करून नळराजा निघून गेल्यानंतर ती चैद्य राजाच्या नगरांत आली. तेथें राजमातेनें तिला आपली भगिनी सुनंदा इच्या स्वाधीन केलें. त्या प्रसंगाचें कवीनें एका ओवींत खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

**सुनंदा आपुली भगिनी । तीतें म्हणे हे तुझी भागिनी ।**
**दोघीं असावें एक मिळणीं । गंगायमुनेसारिख्या ॥**

या ओंवींतील उपमालंकारासंबंधानें कै. ओक यांनीं काव्य-संग्रहांत केलेलें विवेचन आजगांवकरांनीं समग्र उध्दृत केलें आहे. गंगा व यमुना या बहिणी नव्हेत, तथापि दोन मैत्रिणींचा एकजीव झाल्याचें गंगा व यमुना यांच्या संगमासारखें दुसरें उत्तम उदाहरण नाहीं. त्याचप्रमाणें दमयंती व सुनंदा या जरी बहिणी नसल्या तरी त्यांनीं एका जिवाभावानें राहावें असें राजमाता सुनंदेला सांगत आहे. याप्रमाणें वरील ओंवीचें विवेचन करून कै. ओक पुढें म्हणतात,

" दुखः, प्रवासप्रयास, रस्त्यांतली व खोडकर मुलांनीं फेंकलेली माती इत्यादिकांमुळें दमयंती काळसर व मळकट दिसत होती.

म्हणून तिला सांवळ्या यमुनेची उपमा व गौरवर्ण सुनंदेला शुभ्र गंगेची उपमा फारच शोभते. या शब्दरचनेबद्दल वाचकांना आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं व या द्राक्षारसपाकाबद्दल कोण काव्य-लोलुप कवीची तारीफ करणार नाहीं?"

वरील उपमा परिपूर्णतेनें समजण्याकरितां इतक्या कल्पना-शक्तीची आवश्यकता असल्यास याला द्राक्षारसपाक म्हणावयाचें किंवा नारिकेल पाक म्हणावयाचें हा प्रश्नच वाचकांना पडेल. 'माझ्या मित्रापासून माझें रक्षण करा' अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे. प्रत्येक मोठ्या कवीला ही म्हण थोडी बदलन 'माझ्या मनांत नसलेला अर्थ माझ्या काव्यपंक्तीवर लादणाऱ्या सुबुद्ध टीकाकारापासून माझें रक्षण करा' असें म्हणण्याची पाळी येते. वरील उपमा परिपूर्ण करण्याच्या भरांत त्रिभुवनसुंदरी दमयंती-च्या गौरवर्णयुक्त लावण्याची ख्याती चैद्य राजमातेच्या कानापर्यंत पोंचली नव्हती असा वरील विवेचनावरून अर्थहानीकारक ध्वनी निघतो हें कै. ओकांच्या लक्षांत आलें नसावें. गंगायमुनेप्रमाणें एका जीवाभावानें राहा, एवढेंच केवळ सांगण्याचा स्वतः मुक्ते-श्वराचा हेतु असला पाहिजे हें उघड आहे.

कै. ओकांनीं प्रशंसिलेली दुसरी एक उपमांनीं सजलेली ओंवी अशी आहे.

नलोपाख्यानांत नलराजाचें वर्णन करतांना मुक्तेश्वर म्हणतात,

**सुरमंडळीं सहस्रनयन। ग्रहमंडळीं सहस्रकिरण।**
**पाताळभुवनिं सहस्रवदन। तेवीं तो मान्य भतळीं॥**

कै. ओकांनीं या ओंवीची प्रशंसा पुढील शब्दांत केली आहे:—
"या ओंवींत कवीनें शब्दालंकार व अर्थालंकार मोठ्या खुबीनें साधिले आहेत. पहिल्या तीनही चरणांत 'सहस्र' शब्द

आणून यमक साधिलें आहे. ‘ सहस्रनयन ’, ‘ सहस्रकिरण ’ व ‘ सहस्रवदन ’ या उपमांनीं कथेचा नायक जो नळ त्याचे अप्रतिम सद्गुण ध्वनित केले आहेत.

“ वरील तीनही उपमांनीं, न्यायानें प्रजापालन करण्याचें नलाचें सामर्थ्य, त्याचें अप्रतिम राजतेज, त्याची अप्रतिम विद्वत्ता व त्याची ईश्वराविषयींची दृढभक्ति इतके सद्गुण ध्वनित होतात. अशा रीतीनें शब्दचमत्कार करूनही कवीनें थोडक्यांत पुष्कळ अर्थ आणला आहे. या ‘ बह्वर्थजनमनोहरस्वल्पाक्षरत्वा ’ बद्दल मुक्तेश्वराची कोण तारीफ करणार नाहीं ? ”

‘ सहस्र ’ या एकाच शब्दाची पुनरुक्ति करून ‘ यमक ’ अथवा दुसरा कोणताही स्तुत्यर्ह शब्दालंकार कसा होतो ? न्यायानें प्रजापालन करण्याचा गुण कोणाचा ? इंद्राचा, सूर्याचा कीं शेषाचा ? तसेंच अप्रतिम विद्वत्ता कोणाची ? इंद्राची, सूर्याची कीं शेषाची ? माझ्या मतें सर्व मनुष्यामध्यें नळाचें तेजवैभवयुक्त श्रेष्ठत्व वर्णन करणें एवढाच कवीचा उद्देश आहे.

श्री भारतकथारूपी नर्मदेच्या

**तटीं श्रवणसुखाचे आर्ती । तपश्चर्या करितां श्रोतीं ॥**
**भुक्ति मुक्ति आयती । स्वधर्मपत्नीसारिखी ॥**

असें मुक्तेश्वरांनीं एका सुंदर रूपकांत त्याहूनही अधिक मनोहर असलेल्या उपमेचा उपयोग करून सांगितलें आहे. ‘ नर्मदाकांठच्या साधूंना, पतिव्रता स्त्रियांना व भारताच्या श्रोत्यांना ‘ भुक्ति मुक्ति आयती मिळते ’ असा या ओंव्यांचा माधुर्यहानीकारक अर्थ पांगारकरांनीं दिला आहे. संगमेच्छा होतांच स्वतःच्या धर्मपत्नीची जशी अत्यंत सुलभतेनें प्राप्ती होते, त्याचप्रमाणें भारताच्या श्रोत्यांना ‘ भुक्तिमुक्ति ’ ची प्राप्ती तितक्याच सुलभतेनें होते हा

मुक्तेश्वराचा उद्दिष्ट अर्थ निःसंशय अधिक सरस आहे.

मुक्तेश्वरी वाङ्मयांत रूपकांची व दृष्टांतांची रेलचेल आहे.

स्तवनानें देवीला प्रसन्न करून घेऊन तिचा प्रसाद मिळविल्या-नंतर कवि म्हणतो—

**त्या कारुण्यवसंतवातें। मूढमानसशुष्कलते।**
**स्फूर्तीचे पल्लव फुटले; तेथें। कवित्व फळें फळभारें॥**

वरील ओंवींतील रूपक हृदयंगम आहे.

कोणत्या नरास नारायण म्हणावें तें मुक्तेश्वर सांगतो—

**कामक्रोधाच्या भूतसंचारीं। न चळे सुविचार-पंचाक्षरी।**
**परधनपरस्त्रीपासोनि दूरी। तो नारायण नररूपें॥**
**स्वधर्मकर्पूरगृहा आतौती। जिव्हा लिंग प्रदीप्त वाती।**
**रक्षुनी राहटे सावधमती। तो नारायण नररूपें॥**
**हरिहर नामाचे जीवनीं। जिव्हा तळपे होवोनि मीनी॥**
**कुतर्क शिमग्यासमान मानी। तो नारायण नररूपें॥**

वरील ओंव्यांत कामक्रोधांना दिलेली भूतांची उपमा, सुविचाराला दिलेली पंचाक्षऱ्याची उपमा, स्वधर्मपालनाला दिलेली कर्पूर-गृहाची उपमा, जिव्हा व जननेंद्रिय यांना दिलेली जळत्या वातींची उपमा इत्यादि सर्व उपमा अत्यंत समर्पक असल्यामुळें हीं सर्व रूपक रसिकांना अत्यंत आल्हाददायक वाटतील.

नररूप नारायणाचें वर्णन करणाऱ्या अनेक ओंव्यांपैकीं तीनच वर दिलेल्या आहेत. या सर्व वर्णनासंबंधीं महाराष्ट्रभाषा-भूषण आजगांवकर लिहितात,

" या वेंच्यांत कितीतरी उदात्त विचार भरलेले आहेत आणि ते मूळ भारतांतील नसून मुक्तेश्वरांचे आहेत. मुक्तेश्वरांनीं कुतर्काला शिमग्याची उपमा दिली आहे; यावरून शिमग्यांत घडणारे बीभत्स

प्रकार त्यांना तिरस्करणीय वाटत असत असें दिसतें. ”

दुष्यंत व शकुंतला यांच्या गांधर्वविवाहाच्या निमित्तानें मुक्तेश्वरानें खालीलप्रमाणें गांधर्वविवाहाचें रूपकात्मक वर्णन केलें आहे—

**आतां पंचभूतें हृदयवासी । पंचप्राण इंद्रियेसी ।**
**दोहीं मंडपीं दों प्रदेशीं । आदिदैवत स्थापिलें ॥**
**सूर्य साक्षी काळ सुकाळे । घटिका प्रतिष्ठिली सुवेळें ।**
**चढों लागलीं पळोपळें । प्रीतिजीवनें भरिताहे ॥**
**नेपुरें कंकण झणत्कार । योजिलासे वाद्यगजर ॥**
**संवाद तोचि मंगलमंत्र । आरंभिला सौरसें ॥**
**मर्यादा तोचि अंतःपट । वाढवेळ धरिलासे बळकट ।**
**ब्रह्मसूत्र लग्न वरिष्ठ । अतिसमयो वर्तत ॥**
**तोचि सारुनिया धीटपणें । आवडीं पुढारां सरकणें ॥**
**ऐक्यभावें ओपणें । लग्न लावीं सुंदरी ॥**
**सोलणें, कांडणें, पाक करणें । शर्करा-भक्षणीं न लगे जाणें ।**
**तैसें सुगम गंधर्वलग्नें । सुख भोगणें तात्काळ ॥**

मंगलाष्टकें केव्हा संपतात व परस्परांना पुष्पमाला अर्पून प्रेमपूर्ततेचें साफल्य आम्ही केव्हां मिळवितों, असें वाटणाऱ्या वधूवरांच्या आड जसा आंतरपाट येत असतो, तसेंच संगमोत्सुक परंतु विनयशील तरुणतरुणींच्या आड मर्यादा येत असते; म्हणून मर्यादेला दिलेल्या आंतरपाटाच्या उपमेनें रसिकमनें सुरंजित झाल्याशिवाय राहाणार नाहींत. तसेंच सोलून, कांडून शिजविल्यानंतर भक्षणसुख देणाऱ्या साळीसारख्या धान्याची, अनेक कंटाळवाण्या सोपस्कारांनीं भरलेल्या लौकिक विवाहाला दिलेली उपमा व तात्काल भक्षणसुख देणाऱ्या साखरेची गंधर्वविवाहाला दिलेली उपमा या दोन्ही अत्यंत चित्तवेधक आहेत.

दुष्यंतानें झिडकारलेली क्रुद्ध शकुंतला म्हणते—

आतां असत्यपर्वतातळा । उभा न राहे कुंभिनीपाळा ।
वर पडेल वज्रशीळा । परम अकीर्तिदोषाची ॥

मुक्तेश्वर श्रोत्यांना विचारतो—

व्यास-ग्रंथगिरीचें सोनें । संस्कृत खोटिये गाळूनि मनें ।
देशभाषा घडिलें लेणें । साहित्यरानीं सुजाडित ॥
तें लेववितां कर्णभूषण । कांहो ! परते करावे कान ?
श्रोते हो ! तुम्ही विचक्षण । निर्मत्सर विचारा ॥

खालील श्रीकृष्णोक्ति पहा—

सरला सुकृताचा तंतु । आयुष्यतैला झाला अंतु ।
माझिये हस्तीं व्यजनवातु । भीमरूपें उदेला ॥
तो झडपतां सत्वरगती । प्राणदीपक पंचज्योती ।
मालवोनी पडेल क्षितीं । गात्रपाल पालथें ॥

वरील सर्व वेंच्यांतील रूपकें हृदयंगम आहेत. भारतकथा श्रवण करणें श्रोत्यांच्या कानांना भूषणास्पद आहे हें सांगण्याकारितां भारतार्थरूपी सोन्याचा कानांत घालण्याचा एक दागिना बनवून मी तुम्हांला देत आहे, तो तुम्ही धारण करा; अशी सुंदर श्लेषात्मक उपमा मुक्तेश्वरानें ठिकठिकाणीं योजिलेली आहे. ती अत्यंत चमत्कृतिजनक असून कवीच्या कल्पनाविलासाचीही उत्तम साक्ष देते.

खालील प्रदीर्घ रूपकेंही वाचनीय आहेत.

पांडवांचें निर्मूलन करण्याच्या हेतूनें कौरव पांचाळपुरावर चालून गेले त्या प्रसंगीं पांडवांनीं कौरवसेनेची कशी स्थिति केली त्याचें शृंगारात्मक वर्णन खालील ओंव्यांत दिलें आहे.

पांडवप्रताप पुरुष तरणा । नव वधू कौरवसेना ।
शृंगारिली परी संघटना । युद्धसुरता न थारवे ! ॥
गळालें अभिमानाचें वास । अधैर्याचे मोकळे केस ।

रणशय्यासनीं त्रास । पावोनिया पळाली ॥
कर्णसैंधव पयोधर पीन । मर्दितां झाले आरक्तवर्ण ॥
शकुनी कंचुकी आवरण । पाडिलें कोठें नेणवे ! ॥
शस्त्रधारा तीक्ष्ण दांतीं । चुंबितां मुख आंतलें क्षिती ।
झाली रूपाची उपहती । कौरवसेनावधूची ॥

' माझ्या मांडीवर बैस ' असें निर्लज्जपणें सांगणाऱ्या दुर्योधनाला द्रौपदीनें क्रोधावेशानें केलेलें वाक्ताडन व्याजोक्तिगर्भ प्रदीर्घ रूपकाचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

पापशब्द पडतां कानीं । हृदयीं धडकला क्रोधाग्नि ।
म्हणे, ' दुरात्मिया ही वाणी । जळो तुझी पापिष्ठा ! ॥
प्रळयवीज माथां पडो । दृष्टी जळोनि जिव्हा झडो ।
कायेपासूनि प्राण विघडो । तात्कालिक पैं तुझा ॥
भीमाकरीं जे केळवली । गदा नोवरी सुगुणाथिली ॥
वाग्निश्चयें तुज नेमिली । गोत्रघटित निर्धारें ॥
बाहुलें योजिलें रणतळवट । आयुष्य अवधीचा अंतपाट ॥
हातें सारूनि बळी वरिष्ठ । लग्न लावील स्वहस्तें ॥
रक्त हरिद्रा तनुलेपनीं । माथां अक्षता पायपिटणी ॥
स्त्रियाप्रलाप वाद्यध्वनी । सुखसोहळा भोगिसी ॥
ते गदा घेऊनि मांडीवरी । रणमंचकीं निद्रा करी ॥
प्राण पारखे दवडूनि दूरी । मग एकांतीं पहुडे कां ॥ '

वरील वेंच्यांतील भाषा अत्यंत ओजस्वी असून उपमा समर्पक व सर्वांगसुंदर आहेत. " वरील रूपकालंकाराची बहार खऱ्या रसिकांस किती आल्हाददायिनी आहे ! " असे धन्योद्गार रसिकमान्य आजगांवकरांनीं आपल्या महाराष्ट्र-कविचरित्रांत लिहून ठेवले आहेत.

मराठीची तरफदारी करतांना मुक्तेश्वर म्हणतो—

" वेदशास्त्रस्मृति पुराणें । नाना इतिहास व्याकरणें ॥

**गाळुनि विचार-रसायणें । द्वैपायनें कुशलत्वें ॥**
**सुरस सुंदरी पवित्र सृष्टि । पक्वान्नें निपजवुनी पाठीं ॥**
**संस्कृतशब्द सुवर्णताटीं । श्रेष्ठ श्रेष्ठां वोगरिलीं ॥**
**तेंचि रसायण दुर्बलपणीं । महाराष्ट्रभाषा रंभापर्णीं ॥**
**वाढिलें तरी भुकाळु जनीं । न सेविजे किमर्थ ? ॥**

वरील वेंच्यासंबंधानें भगवद्भक्त पांगारकर म्हणतात—

“ संस्कृत भाषेचें महत्व संभाळून प्राकृत भाषेंत ग्रंथरचना करणें त्या काळीं आवश्यक असल्यामुळें वरीलप्रमाणें समर्पक दृष्टांत (रूपक) योजिले आहेत. वेदशास्त्रपुराणांचें रहस्य महाभारतांत ग्रथित करून गीर्वाण भाषेच्या सुवर्णताटांत थोरथोरांना ( संस्कृतज्ञांना ) जीं स्वादिष्ट पक्वान्नें व्यासांनीं वाढलीं, तींच म्यां दुर्बळानें महाराष्ट्र-भाषारूप केळीच्या पानांवर वाढलीं तर भुकाळू जनांनीं ( भारतकथा-जिज्ञासूंनीं ) कां सेवूं नयेत ? अवश्य सेवावींत हा भाव. भाषाभेदानें अर्थहानि होते असें नाहीं. ”

वरील रूपक हृद्य असून उत्कृष्ट अर्थगौरववाहक आहे. मुक्तेश्वराचा आत्मविश्वास व्यक्त करणारें खालील रूपक पहा.

**मुक्तेश्वराचीं सुढाळ वचनें । परमार्थचंपकांचीं सुमनें ॥**
**तेथें अभक्तचंचरीकांचीं मनें । योग्य न होती परिमळा ॥**

वरील ओंवीवर कै. पांगारकरांनीं पुढील टीका केली आहे:

“ चंचरीक म्हणजे भ्रमर. भ्रमर गुणज्ञ खरा, पण चांफ्याचा गंध त्याला आवडत नाहीं, म्हणून तो त्याच्याजवळ जात नाहीं; त्याप्रमाणें मुक्तेश्वराचीं सुंदर वचनें हीं परमार्थाच्या परिमळानें दरवळलीं आहेत, म्हणून तीं भाविकांना जशीं प्रिय होतील तशीं अभाविकांना प्रिय होणार नाहींत. कवीला हें भय वाटत होतें खरें, पण मुक्तेश्वराची कविता इतकी सर्वांगसुंदर झाली आहे कीं,

ती भाविकांना तशीच अभाविकांनाही प्रिय झाली आहे; इतकें खरें कीं, मुक्तेश्वराच्या काव्याचा रसास्वाद म्हणजे परिमळ पुरा उपभोगण्यास भक्तभाविक हेच जास्त अधिकारी आहेत."

मुक्तेश्वराची वरील भीति मात्र पुढील इतिहासानें कै. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें अस्थानीं ठरविली आहे, इतकेंच नव्हे तर पुढील इतिहासाची साक्ष अगदीं विपरीत पडली आहे. कै. पांगारकरांची एक गोष्ट सोडून द्या. पण अभाविक रसिकांचीच मांदी मुक्तेश्वरी काव्यावर मुग्ध होत असते व भाविक जनता त्या काव्याचा आस्वाद घेण्यास उत्सुक नसते आणि हें असें होणेंच स्वाभाविक आहे. चमत्कार दाखवून मुक्तेश्वरानें आपलें संतत्व कधींच प्रस्थापित केलें नव्हतें. काव्यरचनेचा त्याचा हेतुही 'एकनाथ-ज्ञानदेव-तुकारामां' प्रमाणें पारमार्थिक नसून, सत्काव्य-निर्मिति हा होता. महाभारत या पुराण ग्रंथावर काव्यरचना केल्यामुळें एकदोन संतमालिकेंत मुक्तेश्वराच्या नांवाला स्थान मिळालें असलें तरी त्याला संतपदवी पूर्णत्वानें कधींही प्राप्त झालेली नव्हती आणि म्हणूनच ज्ञानेश्वरीप्रमाणें अथवा एकनाथी भागवताप्रमाणें मुक्तेश्वराच्या भारताचें एकही ठिकाणीं पारायण झालेलें ऐकूं येत नाहीं. याला मुक्तेश्वराचें वर्तन जबाबदार आहे हें कै. भावे यांचें विधान खोडून काढतांना प्राध्यापक पंगु यांनीं "त्याची सगुण-सालंकार व बव्हर्थनिर्भर कविता समजण्याची पात्रता नसणारा निरक्षर बहुजनसमाज अथवा भोळ्या बायाबापड्याच याला अधिक जबाबदार आहेत" असें म्हटलें आहे. सदर प्राध्यापकांचें हें विधानहि बरोबर नाहीं. ज्ञानेश्वरीची अथवा एकनाथी भागवताची भाषा मुक्तेश्वरी भारताच्या भाषेपेक्षां अधिक सुलभतेनें आमच्या निरक्षर बहुजन समाजाला अथवा भोळ्या बायाबापड्यांना समजते

असें म्हणणें धाडसाचें होईल. निरक्षर बहुजनसमाजाकडून अथवा भोळ्या बायाबापड्यांकडून ज्ञानेश्वरीचीं अथवा एकनाथी भागवताचीं नित्यशः हजारोंनीं पारायणें झालेलीं जीं आढळतात त्याचें कारण ज्ञानदेव व एकनाथ हे दोघेही संतपदवीप्रत पोंचले होते हेंच होय, आणि मुक्तेश्वराच्या भारताचें एकही पारायण होत नसल्यास त्याचें कारण वर सांगितल्याप्रमाणें मुक्तेश्वरांना संतपदवी कधींही प्राप्त झाली नव्हती हेंच होय. समजो अथवा न समजो, संतवाणीचें श्रवणपठन करण्यांतच अद्भुत पुण्य सांठविलें असतें असें मानणाऱ्या भाविक जनतेकडून मुक्तेश्वरासारख्या सत्कवींची अशीच संभावना व्हावयाची. असो. शेवटीं एक विनोदगर्भ रूपक देऊन हें रूपकप्रदर्शन आटोपतें घेऊं. विषयत्यागाशिवाय मोक्षप्राप्ति नाहीं हें सांगतांना मुक्तेश्वर म्हणतो,

**विषयत्यागाविणें मोक्षू । मानूनि म्हणविती ज्ञानी दक्षू ॥**
**ते मूर्खसभेचे अध्यक्षु । माझे मतीं मानले ॥**

"मुक्तेश्वरानें 'मूर्खसभेचे अध्यक्ष' मात्र खूप निवडून काढले आहेत !" असें उद्गारचिन्हांकित वाक्य या ओवीसंबंधानें लिहिणारे मोकळ्या मनाचे पांगारकर ही ओंवी प्रथम वाचतांना खूप पोट धरधरून हंसले असावेत ! जातां जातां सूर्यास्ताचें खालील रूपकात्मक नितांत मनोरम वर्णन आस्वादूं.

**वरुणदिग्वधूचें वदन । चुंबिता झाला सहस्रकिरण ॥**
**हें देखोनि अति उद्विग्न । म्लानमुख पद्मिणी ॥**

दुष्यंत राजानें निर्भर्त्सना करतांच

**पवित्र विश्वामित्र बाळा । शकुंतला अलिकुंतला ॥**
**म्हणे, 'कुंतळमंडळपाळा । तूंचि अविचारें जल्पसी ॥'**

या ओवींतील 'प्रास' व 'श्लेष' हे शब्दालंकार रसिकमनरंजन करणारे आहेत.

गडद अंधकाराचें वर्णन करणाऱ्या अपन्हुति अलंकाराचें उदाहरण पाहा.

**कीं निशा नव्हे ते भद्रकाळी । पूजिली नक्षत्रमुक्ताफळीं ।**
**आरती उजळावया करतळीं । दीप अर्जुनें लाविला ॥**

शकुंतलेच्या अप्रतिम लावण्याचें वर्णन करणारी खालील उत्प्रेक्षाही मनोहर आहे.

**कनकलतिका सौदामिनी । कीं चंद्रकला तनुधारिणी ।**
**सुवर्ण-केतकीपत्रवर्णी । सुगंधखाणी हरिणाक्षी ॥**

या ओवींतील श्रुतिमनोहर पदरचना रसिकहृदयें आनंदानें निःसंदेह मुग्ध करील.

दृष्टांताचा उपयोग कवीच्या मनांतील उद्दिष्ट अर्थ श्रोत्यांच्या मनांवर अधिक सुलभतेनें बिंबविण्यास होत असल्यामुळें ज्ञानेश्वरादि संतकवींनीं या अलंकाराची सर्रास खैरात केलेली आहे. मुक्तेश्वरी वाङ्मयांतही सुंदर दृष्टांतरत्नें चोहोंकडे विपुलतनें विखुरलेलीं आढळतात. परोपकाराशिवाय मोठेपणा मिरविणाऱ्या पुरुषांविषयीं मुक्तेश्वर लिहितो,

**परोपकारा वरिलें नसतां । विधवा संतति नाशवंता ।**
**जैसी नाकावीण वनिता । श्लाघ्यता मानी सौंदर्य ॥**

वैधव्यांत झालेल्या संततीची हत्या होणें, नाश होणें जसें अपरिहार्य आहे, अथवा नकटेपणामुळें स्त्रीच्या सौंदर्याचा जसा नाश होतो त्याचप्रमाणें परोपकारी नसलेल्या पुरुषाच्या कीर्तीचा नाश होतो. लादलेल्या वैधव्याचे दुष्परिणाम मुक्तेश्वराच्या सूक्ष्म नजरेंतून निसटणें शक्य नव्हतें. एका प्रचंड अरण्याचें वर्णन कर-

तांना मुक्तेश्वर सांगतो—

**अर्क निवडुंग सदा मस्त । मोडितां दिसे दुग्ध श्रवत ।**
**जैसे प्रपंचीं विवेकरहित। सुख बोलती विषयातें ॥**

अविचारी लोक विषयोपभोगालाच सुख मानतात, तसेंच मूर्ख लोक निवडुंग मोडला असतां स्रवणाऱ्या पांढऱ्या रसाला दूध समजतात. हा तत्कालीन पारमार्थिक वातावरणांत मुक्तेश्वरांना सहज सुचलेला दृष्टांत मोठा रम्य आहे.

वर गांधर्व विवाहाच्या रूपकांत विवेचिलेला खालील दृष्टांतही मनोरम आहे.

**सोलणें, कांडणें, पाक करणें । शर्कराभक्षणीं नलगे जाणें ।**
**तैसें सुगम गंधर्वलग्नें । सुख भोगणें तत्काळ ॥**

वनिता पतिगृहींच सुरक्षित असते हें सांगतांना कण्व दृष्टांत देतात—

**यत्नें शर्करा ठेविजे जेथें । परी पिपीलिका लागती तेथें ।**
**विश्वासस्थलीं ठेवितां वनिते । तेथोंचि विपरीत उद्भवें ॥**

प्रत्यक्ष लक्ष्मीसारख्या आपल्या अंगनेचा त्याग करण्यास प्रवृत्त झालेल्या दुष्यंताला शकुंतला म्हणते,

**सकल ऐश्वर्य घेऊनी भेटी । पद्मा पावल्या पायें लोटी ।**
**तो सभाग्य कीं अभाग्य सृष्टीं । काय लागे सांगणें ? ॥**

स्वतःच्या रूपगुणसंपदेची आत्मविश्वासयुक्त प्रौढी, आपला अवमान करणाऱ्या दुष्यंताला तसेंच झणझणित उत्तर देणाऱ्या मानिनी व लावण्यखाणी शकुंतलेला शोभत नाहीं असें कोण म्हणेल?

शकुंतलेच्या उदात्त विचारयुक्त भाषणाचा दुष्यंताच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं हें श्रोत्यांच्या मनावर बिंबविण्याकरितां कवीनें खालील समर्पक दृष्टांत उपयोजिले आहेत.

ऐसे शकुंतलेचे बोल। रायें मानिले निरस फोल।
जैसा क्षपणक निरोधी झोल। पिकल्या मधुमोहळाची॥
चंपकपुष्पांचे सुवासशोभे। ग्राहि न होईजे जेविं रोलंबें।
कोकनदांचीं चारु कदंबें। कुंजर सारी परौतीं॥
नाना वेदांचे विधिवाद। चार्वाक म्हणती सर्वाबद्ध।
उपनिषदांचा गुह्यार्थभेद। वादी जेवीं अव्हेरिती॥
तैसीं प्रियेचीं पवित्र वचनें। दुष्यंतें दूषिलीं आपुल्या मनें।
म्हणे ' हे बहुभाष कत्रणें। जिंकिली न वचे बोलतां॥ '
मातला हस्ती, क्षोभला सर्प। भ्रष्टला ब्राह्मण, पेटला दीप।
अमर्याद स्त्रियांचा जल्प। आवरूं न शके विधाता॥

आजगांवकर लिहितात, ' हीं राजमुर्खांचीं मुक्ताफळें कानीं पडतांच महासती शकुंतला रागानें केवळ वेडी होऊन गेली. ' तें वर्णन करणारा दृष्टांत पाहा—

मंत्रबीजाक्षरांच्या ओळी। अबद्ध जपतां, भद्रकाळी।
क्षोभे, तैसी क्रोधानळीं। अंगार टाकी शब्दांचे॥

स्वतःचे दोष लक्षांत न घेतां दुसऱ्याचे दोष काढणाऱ्या दुष्यंताला शकुंतला सांगते—

कुरूप न पाहे आरसीं वदन। तोंवरी वाहे रूपाभिमान।
देखिल्या म्हणे ' अपार जन। रूपें विशेष मजहुनी॥ '

असत्य भाषण करणाऱ्या दुष्यंताला शकुंतला बजावते—

कोटी पुण्यें जोडिलीं यत्नीं। तीं जळती एके असत्य वचनीं॥
जैसी पावकस्फुलिंगकणी। नाशी कर्पूरगिरीतें॥

तेजोनिधि दिनकर अस्तास गेल्यानंतर हीनतेज तारका झळकूं लागतात. त्याचें वर्णन खालील समर्पक दृष्टांतानें केलें आहे.

पवित्र स्पर्शेला देखोनि दोषा। कलंकी उजळी आपुली दशा।
क्षुद्र पावती संतोषा। तेंवि तारा झळकती॥

लाक्षागृह बांधून त्यांत पांडवांना जाळून मारावें असें दुर्योधनानें पुरोचनाला सांगितलें. तेव्हां त्या दुष्टबुद्धि पुरोचनाला जो आनंद झाला त्याचें वर्णन कवीनें खालील सुंदर दृष्टांतांनीं केलें आहे.

**ऐसीं दुर्योधनाचीं वचनें । येरें झेलिलीं अंतःकरणें ।**
**जेवीं कां वांती होतां श्वानें । त्वरें चाटून जाइजे ॥**
**माडवृक्षापासूनि देखा । अळुमाळ स्रवतां मद्योदका ।**
**मद्यपानी ओढवी मुखा । धांवोनियां लगबगा ॥**
**आदींच शंखध्वनींचा उल्हास । त्यावरी पातला फाल्गुनमास ।**
**कीं व्यभिचारिया मल्याळ देश । दैवयोगें लाधला ॥**
**तेवीं साधूंचा उच्छेद । करावया दुर्जना अति आल्हाद ।**
**मृगसमुदाय देखूनि व्याध । हांव बांधी वधावया ॥**

वरील वेंच्यासंबंधानें आजगांवकर लिहितात—

"वरील दृष्टांतबाहुल्य मूळ भारतांत नाहीं. तें मुक्तेश्वराच्या पदरचें असून त्यांत त्यांचें प्रावीण्य दिसून येतें. मुक्तेश्वरांनीं कथा-भाग विशद व विशेष मनोरम करण्याकरितां आपल्या कल्पनाचातुर्यानें जेथें साध्या व व्यावहारिक दृष्टांतांचा उपयोग केला आहे, अशीं स्थळें त्यांच्या भारतांत बहुत आहेत."

फारच थोडे मल्याळी लोक मराठी भाषा जाणत असावेत, व जे थोडे मराठी जाणतात त्यांच्या हातांत मुक्तेश्वरी भारत क्वचितच पडत असावें म्हणून बरें! नाहीं तर एव्हांना मल्याळी बांधवांच्या वरील बदनामीबद्दल त्यांनीं मुक्तेश्वरी भारताची जाहीर होळी केव्हांच करून टाकली असती!

कौरव पांचाळपुरावर गर्जना करीत चालून गेले त्याचें वर्णन मुक्तेश्वर करतो:

**बांधिला, माथिला, वरी लंघिला । एकें प्राशूनि निर्मळ केला ।**

तरी निर्लज्ज गर्वाथिला । गर्जना करतो जलानिधी ॥
तेवीं पांडवहस्तीं सकळ । अवमान पावले बहुत वेळ ।
तरी गर्वाचा गोंधळ । घालीत आले युद्धार्थी ॥

रामानें सेतुबंधनानें बांधिलेला, देवदैत्यांनीं मंथन केलेला, मारुतीनें उल्लंघिलेला व अगस्तीनें पिऊन टाकलेला सागर पुन: निर्लज्जपणें जसा गर्जना करतो, तशीच पांडवांनीं अनेकवेळां अवमानिलेली कौरवसेना निर्लज्जपणें गर्जना करते, हा दृष्टांत सर्वांगपरिपूर्ण असून अत्यंत मनोरम आहे. सागराचा सर्व पौराणिक इतिहास मुक्तेश्वरानें एका लहानशा ओंवींत ग्रथित केला आहे. तें कौशल्य कौतुकास्पद आहे.

आतां अलंकारविवेचन पुरें करून मुक्तेश्वराच्या उदात्त विचारप्रणालीनें ओथंबलेले कांहीं वेंचे खालीं देतों.

कोणत्या प्रसंगीं असत्य भाषण करणें दूषणीय होणार नाहीं तें मुक्तेश्वर सांगतो—

असत्य वदोन पुढिलाचें हित । करितां जोडे सर्व सुकृत ।
सत्यें घडे पराचा घात । त्याहुनि पाप असेना ॥
जेणें प्रकारें परोपकार । घडे तोचि गा पवित्राचार ।
परातें पीडाकारक थोर । तोचि अधर्म जाणिजे ॥
असत्यें चुकविजे मरणा । असत्यें घडविजे अनाथलग्ना ।
असत्यें संकटीं आत्मरक्षणा । कीजे, हा तव महाधर्म ॥

द्रुपद राजाला कैद करून पांडवांनीं त्याला गुरु द्रोणाचार्यांसमोर आणलें तेव्हां द्रुपद व द्रोण यांमधील पुढें दिलेला संवाद वाचनीय आहे.

म्हणे, ‘ राया ! आशीर्वचन । तूं भूपाळ मी ब्राह्मण ।
तूं दाता सर्वसंपन्न । दीन आम्ही मागते ॥

अराजा मित्र नव्हे रायातें । ऐसें बोलिला तें यथार्थतें ।
आतां जरी मानेल तूतें । तरी मित्रत्व मानी कां ॥ '
द्रुपद म्हणे, ' द्रोणाचार्या । करणें न लगे येथें आश्चर्या ।
हारी अथवा जय ऐश्वर्या । पुरुष पावे प्रारब्धें ॥
काळें लाभ, काळें हानि । याचा विचार कायसा मनीं ? ।
तोष, लाभ, परदूषणीं । चित्त न घाली जाणता ॥
अवगुणासी करणें गुण । हें उत्तम पुरुषाचें लक्षण ।
उचिता चुकला अज्ञान । तें सज्ञान स्मरेना ॥
दैवापुढें न चाले बळ । ऐसें बोलती विवेककुशल ।
कुबेर सखा सर्वकाळ । दैन्य भोगी शंकर ॥
असो; सुकृतबळोपायें । समर्थ करिती काय नोहे ? ।
तुजसारिखा इच्छिलें लाहे । हें काय नवल सांगणें ॥ '

" दमयंतीचा नळराजाशीं विवाह कसा होऊं दिलास ? " असे कलीनें इंद्राला विचारलें असतां इंद्र उत्तरतो,

दमयंती पातली शरण । म्यां होऊनि सुप्रसन्न ।
कृपेनें देउनी दान । हें सुलग्न लाविलें ॥
यथायोग्य पुण्यवंता । हृदयशुद्ध शरणागता ।
इच्छिलें फळ तें न देतां । ईश्वरत्व केउतें ? ॥
नित्य स्मरे त्याचें योगक्षेम । जरी न वाहे पुरुषोत्तम ।
शरणागताचा न दवडी श्रम । तरी तो देव कासया ? ॥
न करूं दीनाचें रक्षण । तरी आमुतें देव म्हणे कोण ? ।
हा भाव नेणती अज्ञान । तुजसारिखे कलिपुरुषा ॥

" इंद्र व कलि यांच्या भाषणांत मुक्तेश्वराच्या उदात्त विचारशक्तीची कमाल झाली आहे " असा आजगांवकरांचा अभिप्राय आहे. मुक्तेश्वराची रसपरिपोषाबद्दलही ख्याति आहे. त्याचीं

कांहीं उदाहरणें देतों.

कण्व महामुनि आश्रमीं परत आले तेव्हां 'पुरुषसंगें शंकान्वित व लज्जाभरित' झालेली शकुंतला बाहेर येईना. त्या वर्णनांतील वत्सलरस हृदयंगम आहे.

( कण्व ) म्हणे माझिये निजात्मजे । बाहेर येई सांडूनि लाजे ।
कर्तव्य होतें पैं सहजें । सिद्धी नेलें प्रारब्धें ॥
जें झालें तें बहुत बरवें । मान्य केलें माझिये जीवें ।
कष्टीं न मिळे तें स्वभावें । पूर्व दैवें जोडिलें ॥
ऐकोनि पित्याची अभयवाणी । कन्या येवोनि लागली चरणीं ।
म्हणे, 'म्यां वरिला भूपाळ गुणी । तो त्वां मान्य करावा ॥
कृपानुग्रह वरप्रसादें । गौरवी आशीर्वचनशब्दें' ।
ऋषि बोले परम आल्हादें । 'चिरंजीव तव भर्ता ॥
शची सुरेशासारिखे । दोघे असा अक्षयसुखें ।
विष्णुशक्ती समान तुकें । ऐसा पुत्र पावसी ॥'

वीररसाचा पुढील दणदणाट वाचा–

गदा घेऊनि उतावीळ । पुढां धाविन्नला भीम सबळ ।
जेवीं मांडिल्या प्रळयकाळ । दंडपाणी भूतांतें ॥
पादचारी रणवेताळ । घोषें गर्जवी ब्रह्मांडगोळ ।
वर वळला देखोनि विकळ । रणोत्साह वीरांचा ॥
तिमिंगल निघे समुद्रजळीं । तैसा भीम पांचाळदळीं ॥
बळें मिसळतां खळबळी । सेना यज्ञसेनाची ।
असंख्यात कुंजरथाट । स्रवती मदोदकाचे पाट ।
त्यावरी उठावला बळिष्ट । गदाघायीं ताडित ॥
कुंभस्थळापासूनि धरणीं । रक्तप्रवाह ताम्रवर्णी ।
मुक्ताफळांचिया श्रेणी । उभयभागीं विखुरल्या ॥

गदाघायीं कुंभस्थळें। फुटती जैसीं सुपक्व फळें।
कीं मृद्घटपंक्ति लोहमुसळें। जेंवि फुटती फटफटा॥
अशुद्ध नदीचे खळखळाट। पुसती सागराची वाट।
मार्ग दावावया नीट। अपार प्रेतें चाललीं॥

शृंगार रसात्मक वर्णनाची खुलावट अत्यंत बहारीची आहे.

वाजी वारण पदाती रथ। ठायीं ठायीं उतरले वनांत।
ययाती पातला त्वरित। शर्मिष्ठेच्या मंदिरा॥
तीतें जाहला बहु आनंद। नमिलें नृपतीचें पदारविंद।
सहस्र दासींचें वृंद। नमस्कारी नृपातें॥
उदक ठेविलें दासीजनीं। शर्मिष्ठेनें स्वहस्तेंकरोनि।
नृपतीस अभ्यंग घालोनि। क्षीरोदक, नेसविला॥
षड्रस अन्नें निपजवून। दिधलें रायासी भोजन।
दिव्य मंचकीं आरक्त सुमन। वरी निजवी राजेंद्रा॥
वेळा कर्पूर सुगंधयुक्ता। तांबुल अर्पी धरित्रीनाथा।
मग संतोषोनि अवलोकिता। राजा वदन तियेचें॥
जैसी सुवर्णचंपककळी। कीं ओतिली मन्मथपुतळी।
अत्यंत तारुण्यभरें लवली। परी विनत सुकुमार॥
विराजे राजवदनचंद्रिका। भाळीं रेखिला कस्तुरी टिका।
आकर्णपर्यन्त कज्जलरेखा। नयन तेणें शोभती॥
दृढ बिल्व पीन स्तन। वरी मुक्तजाळी विराजमान।
हृदयीं पदक दैदीप्यमान। तेज फांके हृदयाब्जीं॥
करिशावक शुंडादंड। तैसे सरळ भुजदंड।
कंकणें रुणझुणती प्रचंड। मदनातें चेतवावया॥
हरिकटिवरी शोभे घटी। उभी राहे सन्मुख गोरटी।
नृपासी व्यंकट दृष्टीं। लक्षीतसे वेल्हाळी॥

महाराष्ट्र-भाषा-भूषण आजगांवकर म्हणतात,

"वरील ओंव्या वाचून, एखाद्या नूतन परमहंसदीक्षाधारीची सुद्धां लटपट उडून जाईल. मग ययाती राजाची काय अवस्था झाली असेल हें काय सांगितलें पाहिजे ? मुक्तेश्वराच्या अंगीं,जो जो रस घ्यावा तो तो अगदीं उत्तम प्रकारें खुलवून दाखवावा, अशी अद्भूत शक्ति होती, आणि खरें कवित्व म्हणजे तरी हेंच होय कीं, मनांत उत्पन्न झालेले निरनिराळे मनोविकार, शब्दांत इतके हुबेहूब उठवून द्यावयाचे कीं, ते शब्द वाचीत असतां वाचकांच्या मनांत त्या त्या मनोविकारांचें केवळ काहूर उत्पन्न झालें पाहिजे; म्हणजे कवीच्या व काव्यवाचकाच्या मनाची एकात्मता झाली पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यास मराठी कवींत मुक्तेश्वरांना बरेंच उच्च स्थान द्यावें लागेल यांत संशय नाहीं."

मुक्तेश्वराच्या कल्पनाविलासाचीं सुंदर उदाहरणें म्हणून खालील दोन वेंचे देतां येतील. मेल्याशिवाय स्वर्ग कोणाला दिसत नसल्यामुळें स्वर्गाचें खालील वर्णन करतांना तर मुक्तेश्वरांना आपल्या प्रतिभाशालिनी कल्पनाशक्तीवरच भर द्यावी लागली आहे.

**शतयोजनें विस्तारें । रत्नखचित सहस्रद्वारें ।**
**जांबूनदाचीं कनकागारें । भास्करोपम झळकती ॥**
**दिव्यांबरें, दिव्याभरणें । दिव्यगंधें तनुलेपनें ।**
**दिव्य स्त्रियांचीं आलिंगनें । भोग चुंबन सुरतादि ॥**
**कल्पद्रुम पारिजात । कामधेनु असंख्यात ॥**
**चैत्य सोपानें सुमंडित । चिद्रत्नीं बांधिले ॥**
**अमृतफळें फळभक्षण । अमृतरसाचें रसपान ॥**
**गंधर्व अप्सरा नृत्यगायन । क्रीडाविहार पुष्पकीं ॥**
**उच्चैःश्रवा ऐरावती । विमान यांनीं स्वेच्छागती ॥**

पूजा त्रिदशांचे हातीं । ईश्वरतुल्य पावलों ॥

या वर्णनाविषयीं प्राध्यापक पंगु लिहितात,

" स्वर्गाचें त्यानें केलेलें वर्णन जितकें वैभवसंपन्न आहे, तितकेंच तें त्या स्थलाबद्दल वाचकांच्या पवित्र भावना व आकांक्षा वाढविणारें आहे. "

आमच्या आकांक्षा वाढतील, पण पवित्र भावना वाढतील कीं नाहीं याबद्दल मात्र थोडी शंका वाटते.

दु:शासनानें रजस्वला असलेल्या द्रौपदीला राजसभेंत वेणी धरून ओढून आणली त्या वेळच्या तिच्या आकांताच्या प्रळयाचें भव्य अतिशयोक्तिपर वर्णन थरारून सोडणारें आहे.

हांक मारितां याज्ञसेनी । कंपें थरारली मेदिनी ।
खचोंन पडों पाहे तरणी । चंद्र-तारांसहित ॥
आंदोळला गिरि कैलास । ढळला वैकुंठींचा कळस ।
देवांगना मानुनि त्रास । शोक करिती आक्रोशें ॥
उमा रमा रेणुका सती । लोपामुद्रा अरुंधती ।
क्षोभोनि उदक घेती हातीं । शाप मुखें वदावया ॥
शंकरनयनींचा प्रळयाग्नी । उसळोनि स्रवों पाहे धरणीं ।
कौरव कुळाचिया काननीं । बीज निर्मूळ करावया ॥
कपिलादिक सिद्ध पुरुष । तयां नावरे अद्‌भुत रोष ।
म्हणती क्षमा करील ईश । परी आमुतें न करवे ॥

सूक्ष्म निरीक्षण व व्यवहारावलोकन या गुणांबद्दल मुक्तेश्वरावर रसिकांनीं स्तुतिसुमनें वाहिलीं आहेत.

दुष्यंतराजा नगरांतून मिरवत जात असतां त्याला पाहण्याकरितां आलेल्या शतानुशत नारींच्या अगदीं आंतल्या सूक्ष्म विचारांचें वास्तवदर्शी चित्र मुक्तेश्वरानें कसलेल्या चित्रकाराच्या

अत्यंत नाजुक हातानें रंगविलें आहे.

सेनेसहित सेनानाथ । नगरगर्भी जात मिरवत ।
हें देखोनि नारी शतानुशत । माडिया गोपुरीं वळघल्या ॥
कनककुसुमें कनकताटीं । आवडीं धरुनि करसंपुटीं ।
अवलोकुनी राजमुगुटीं । पुष्पांजुळी सांडिती ॥
एकीं अवलोकितां नयनें । म्हणती निवालीं अंतःकरणें ।
एकी म्हणती पंचबाणें । चित्तकुरंग वेधिला ॥
एकी भाविती निजमानसीं । समर्थां घरीं होइजे दासी ।
गृहिणी होवोनि दरिद्र्यासी । राहटी करणें जळो तें ॥
एकी घरच्यारमाझारी । म्हणती पुसोनि शंकरगौरी ।
ऐसा भ्रतार स्वकीय जन्मांतरीं । पावोनि स्वेच्छा भोगावा ॥
एक पवित्र पतिव्रता । ईश्वर मानुनी स्वकीय भर्ता ।
ऐश्वर्येंसीं अमरनाथा । भणंगप्राय अवगणिती ॥

गांधर्व विधीनें विवाह करूं असें दुष्यंतानें सांगितल्यावर " अनुरक्त जरी याच पदीं, विनय सोडुं का ? " असें प्रत्युत्तर देऊन विनयशालिनी शकुंतला म्हणते,

यालागीं नावेक धरी धीर । आश्रमा येईल ऋषीश्वर ।
वचन मान्य करूनि अत्यादर । मज ओपील तुज हातीं ॥

पण दुष्यंताला कुठला धीर ! मीलनोत्सुक पण विनयवती कामिनीला वश करून घेण्याची एक युक्ति म्हणजे तिच्या सौंदर्याचें खुलवून वर्णन करणें. त्याच युक्तीचा अवलंब करण्यांत जसें दुष्यंताचें तसेंच मुक्तेश्वराचेंही सूक्ष्म व्यवहारचातुर्य दिसून येतें. या पार्श्वभूमिकेवरून वाचल्यास शकुंतलेच्या सौंदर्याचें दुष्यंतानें केलेलें पुढील अतिशयोक्तिपर वर्णन अधिक मनोज्ञ वाटेल.

मंदहासिनी, कुंददशनें । कर्पूरगर्भरंभाजघनें ॥
फलाहार वल्कलवसनें । तुज अयोग्य काननीं ॥

शिरीषपुष्पसुकुमारे ! । कनकचंपकदाम गौरे ॥
तिळतरुकुसुमनासाकारे । धरी सुपाणी निजकरें ॥
गंधर्वी, अप्सरा, मिश्रकेशी । रंभा, तिलोत्तमा, उर्वशी ।
तुज लावण्यमाणिक्यराशी । तुळितां गुंजा तैसिया ॥
सुकेशी, चार्वंगी, सुश्रेणी । कंबुग्रीवा, पीनस्तनी ।
तुझिया ऐशी चौदाभुवनीं । अंगना आन असेना ॥
सम निगूढ रत्नव्रणें । उन्नत नेटकीं साही स्थानें ।
लक्षितां तुझीं शुभलक्षणें । मन वेधलें, परतेना ॥

इतकें सांगितल्यानंतर व्यवहारचतुर दुष्यंताची मन:कामना तत्काळ सुफलित झाली असल्यास नवल नाहीं.

कण्व मुनींनीं वर्णिलेलीं ' कुलवंतेचीं कुलक्षणें ' मुक्तेश्वराचें सूक्ष्म व्यवहारनिरीक्षणच प्रगट करितात.

स्वयें नर्तन गायन । गीत नृत्य अवलोकन ।
शृंगार कामशास्त्रश्रवण । हींचि दूषण कुलवन्ते ॥
परघरअटण, परघरवस्ती । जारजारिणींची संगती ।
एकट शय्या, एकट पंथी । हें कुलक्षण कुलवंते ॥
हृदय दाऊनि घाली पदर । पुरुष अवलोकूनि वाढवी हार ॥
परकियासी एकांत विचार । हें कुलक्षण कुलवंते ॥
क्षणक्षणा चंचलपणें । चिरानिरिया सरसावणें ।
कच्छ फेडण घालणें । हें कुलक्षण कुलवंते ॥
बहु हांसणें बहु बोलणें । सदां हांसत गोष्टी करणें ।
परत परतोनि पाहणें । हें कुलक्षण कुलवंते ॥
आणिका वर्णी, निंदी भर्ता । पति त्यागूनि धांवे तीर्था ।
पुरुष अव्हेरूनि देवता । भजतां दूषण कुलवंते ॥
उपेक्षूनि पति ईश्वर । आणिक महानुभाव करी गुरु ।
भजनीं लोकनिंदेचा सोर । माजे थोर अभिशापें ॥

खालील वेंचेही मुक्तेश्वराच्या व्यवहारनिपुणतेची उत्तम साक्ष देतात.

आपला त्याग करूं इच्छिणाऱ्या नळाला दमयंती म्हणते,

**तापत्रयनिवारणाचें छत्र । भार्येपरता नाहीं मित्र ।**
**पतिव्रता मी सुपवित्र । कशी त्यागूं भाविशी ? ॥**
**भार्या सकळ श्रमांतें हर्ती । भार्या सकळसुखातें कर्ती ।**
**भार्या पवित्रवंशधर्ती । यशकीर्ती स्त्रीसंगें ॥**
**स्त्रीसंगें धर्म निर्दोष । पुरुष कुमार्गीं न पवे भ्रंश ।**
**भार्या नसतां महादोष । कामादिक पीडिती ॥**

आपल्या माहेरीं विदर्भदेशीं जाऊं असें नळाला दमयंतीनें सुचविलें असता नळ सांगतो,

**नळ म्हणे विचारनिष्ठे । आपत्काळीं न वचिजे कोठें ॥**
**विशेष सन्मानहानी, मोठें । परम दुःख अंतरीं ।**
**राज्य हारवूनियां पणीं । भार्येसहित एकवसनीं ॥**
**श्वशुरगृहीं जातां व्यसनीं । विश्व ठेवील मूर्खता ॥**
**दारिद्र्यकाळामाजी देख । नीच श्रेष्ठांतें म्हणती मूर्ख ॥**
**उपहासिती सकळ लोक । आप्तवर्ग विशेषें ॥**

इंग्रजी राज्याच्या पहिल्या अमदानींत आंग्लविद्याविभूषितांचे डोळे इंग्रजी सरस्वतीच्या अपरंपार वैभवानें दिपून गेले. तिच्यापुढें महाराष्ट्र सरस्वतीचें तेज त्यांना अगदीं फिकें दिसूं लागलें. महाराष्ट्र वाङ्मयाला तुच्छ मानण्याचा लंबक त्यांनीं अगदीं एका टोकाकडे जितका चढवतां येईल तितका चढवला. निसर्गाच्याच नियमाप्रमाणें या क्रियेची प्रतिक्रियाही लवकरच सुरू होऊन मराठी प्राचीन काव्यवाङ्मयाच्या अभ्यासकांनीं त्या लंबकाला इतकी जोराची उलट गती दिली कीं, त्यांनीं तो स्तुतीच्या दुसऱ्या टोकाकडे चढवतां येईल तितका चढवला. आतां इतके दिवस इकडे तिकडे हेलकावे घेऊन तो लंबक मध्यबिंदुवर स्थिर होण्याचा समय प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र प्राचीन काव्याभिमानी रासिकांनीं मुक्तेश्वराच्या वर्णन-शैलीबद्दल त्याचा अत्यंत गौरव केलेला आहे. त्याचीं व्यक्तिवर्णनें, स्थलवर्णनें व प्रसंगवर्णनें ते ते वर्ण्यविषय हुबेहुब वाचकांच्या डोळ्यासमोर उभे करतात; आंग्लविद्यालोलुपांनीं वाखाणिलेल्या इंग्लिश वाङ्मयांतील निसर्गवर्णनांना श्रेष्ठतेचें नाहीं तर नाहीं, पण निदान बरोबरीचें तरी आव्हान देऊं शकतील, अशीं मुक्तेश्वराचीं निसर्गवर्णनें असतात. 'स्थलवर्णनांत * तर मुक्तेश्वराचा हात धरील असा मराठींत दुसरा कवि दिसत नाहीं.' असें या प्राचीन मराठी काव्याच्या अभिमान्यांचें म्हणणें आहे.

पांगारकर, आजगांवकर, पंगु हे सर्व विद्वान् चिकित्सक व रासिकाग्रणी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सूक्ष्म दृष्टींतून मुक्तेश्वरी वर्णनांतले दोष सुटले नाहींत हें खरें आहे. 'युद्धप्रसंगाचीं* त्याचीं वर्णनें अगदीं कायम ठशाचीं असतात' हें प्रा. पंगुंना मान्य आहे. परंतु माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें मुक्तेश्वराचीं सर्वच वर्णनें कायम ठशाचीं असतात. "वर्णनौघांत+ वनोपवनांचा संबंध आला कीं चार दोन सुरस ओंव्या बोलल्याशिवाय त्याला राहवतच नाहीं. 'गगगचुंबित तरुवर। माजी तुंबळ सरितापूर।' हे यायचे. 'पीयूषा-तुल्य शीतलोदकें। अक्षोभ तडागें अनेकें।' हीं त्याला दृष्टीसमोर दिसायचींच. अरण्य म्हटलें कीं, 'नाना वनें, नाना द्रुम। नाना सरितांचे संगम। नाना श्वापदें, विहंगम,। नाना वर्ण भासती॥' (वन० १०–३२) ही सारी सृष्टीची रम्यता त्याच्या दृष्टी-समोर उभी राहते." या गोष्टी सांगतांना कै० पांगारकरांचा उद्देश मुक्तेश्वरांची स्तुति करण्याचा आहे हें स्पष्ट आहे. परंतु कळत वा न कळत मुक्तेश्वरांचीं निसर्गवर्णनें कायम ठशाचीं असतात,

* प्राचीन मराठी कविपंचक पृ. ११. + कविवर्य मुक्तेश्वर पृ. ९३.

अशीच गर्भित कबुली पांगारकरांनींहि दिली आहे.

आतां आपण मुक्तेश्वरी वर्णनाचे प्रत्यक्ष कांहीं नमुनेच पाहू. पुढील दुष्यंतवर्णन पाहा.

> कौरववंशीं विख्यातकीर्ति । दुष्यन्तनामा गुणैकमूर्ति ।
> श्रेष्ठ भूपाळ चक्रवर्ती । वीर्यें शौर्यें आगळा ॥
> प्राची प्रतीची दक्षिणोत्तर । चारी दिशा चतुःसमुद्र ।
> आक्रमूनि मही महेंद्र । सुरेंद्र तैसा भूलोकीं ॥
> रोग दारिद्र्य कीं बंधन । दुःख दुर्भिक्ष अकाळ मरण ।
> सर्प वृश्चिक तस्कर जाण । दुष्यंतराज्यीं असेना ॥
> विष्णुसमान सत्ताबळ । प्रतापें जैसा सूर्य तेजाळ ॥
> धरातुल्य सहनशीळ । अक्षोभ जैसा सागरु ॥
> निपुण शस्त्रास्त्रप्रहरणीं । आरूढों जाणें सर्व वहनीं ॥
> ऐसा भूपाळचूडामणी । दुष्यंतराजा भूलोकीं ॥

या वर्णनाशीं खालील नळराजवर्णनाची बारकाईनें तुलना करा.

> सुरमंडळीं सहस्रनयन । ग्रहमंडळीं सहस्रकिरण ।
> पाताळभुवनीं सहस्रवदन । तेवीं तो मान्य भूतळीं ॥
> अक्षय्य तारुण्य रसाळा । कोटिकंदर्प सौंदर्यपुतळा ।
> चतुर्दश विद्या चौसष्ट कळा । विश्रामल्या त्या देहीं ॥
> आशिष्ठ द्रढिष्ठ बलिष्ठ । चक्रवर्तींमाजी श्रेष्ठ ।
> ज्याचे आज्ञेचा अखंड पट । वेष्ठुनी मिरवे मेदिनी ॥
> अक्षहृदय अश्वहृदय । जाणे वीरसेन तनय ॥
> जगीं सर्वज्ञतेचा सूर्य । प्रतापकाळीं प्रकाशे ॥
> न्यायें प्रजांचें पालन । प्रतापें शत्रुकुलाचें दमन ।
> विनयें साधूंचें संरक्षण । शीलवर्तन सर्वदा ॥

अक्षविद्या व अश्वविद्या या दोन विद्यांत नळराजाच्या निपुणतेची खास ख्याति होती; म्हणून तेवढा उल्लेख वगळला तर फक्त नांवें बदलून नळाचें वर्णन दुष्यंताचें म्हणून देतां येईल, अथवा

दुष्यंताचें वर्णन नळाचें म्हणून देतां येईल. दोघेहि चक्रवर्तींमध्यें श्रेष्ठ, दोघेहि इंद्रसूर्याप्रमाणें वरिष्ठ व तेजवान्, दोघांचेंहि राज्य चतुःसमद्रान्त पृथ्वीवर पसरलेलें, दोघेहि निष्णात वीर, शूर व प्रजापालनीं दक्ष. दुष्यंतवर्णनांत त्याच्या रूपाचें वर्णनच केलेलें नाहीं. नाहींतर त्यालाहि 'कोटिकंदर्प-सौंदर्य-पुतळा' याच अर्थाचें विशेषण उपयोगांत आणतां आलें असतें. एखादी दुसरी उपमा कमी अथवा अधिक, शब्द थोडे निराळे, पण वर्णन सामान्यतः तेंच.

एका प्रचंड अरण्याच्या मुक्तेश्वरी वर्णनाचा पुढील नमुना पहा·

देखे प्रचंड महागिरी । विशाळ पर्वतांचिया दरी ।
जळें तुंबिलीं सरितासरीं । समुद्रतुल्य अगाध ॥
तेथें आम्र निंचोल बेल । कवंठ कदंब मधु पिंपळ ।
सिरस पलाश विशाळ । न्यग्रोधवृक्ष वाढिन्नले ॥
ताळ हिंताळ सरसशाळ । मंदार कांचन तमाळ निर्मळ ॥
पिचुमंद देवदार निर्मळ । अर्जुनवृक्ष अपार ॥
अर्क निवडुंग सदा मस्त । मोडितां दिसे दुग्ध स्रवत ॥
जैसे प्रपंचीं विवेकरहित । सुख बोलती विषयांतें ॥
बदरी श्लेष्मातकी आळसी । शाल्मली करवंदी आंभुळी ।
चारी भल्लातकी गुग्गुळी । शमी वेरुकळी चिंचणिका ॥
ऐसिया वृक्षांचीं अचाट । डांगें लागलीं घनदाट ।
माजीं निर्झरोदकाचे पाट । सैरावैरा धांवती ॥
मस्तकें उचलोनी दिनकर । छाये रक्षिला अंधकार ॥
माजी श्वापदगणाचे भार । सुखावले सुखवस्ती ॥
हरिण करी सिंह शार्दूळ । चिते चितळे तरस तरळ ॥
रिक्ष रोही गवे मासाळ । अरण्य सारें माजलें ॥
नूतनभाग्य पाताळियां नष्टा । श्रीमदें वाकुल्या दाविती श्रेष्ठा ॥
तैसे दांत खिंचकुनि चेष्टा । मर्कट करिती बहु वृक्षीं ॥

वरील वर्णन वाचलें असतां एका अरण्याचें अत्यंत विशाल असें चित्र आपल्या अंतःचक्षूंसमोर उभें राहतें खरें. पण तें चित्र एखाद्या विशिष्ट अरण्याचें आहे का? हाहि प्रश्न सोडला तरी मुक्तेश्वरी निसर्गवर्णनाचा नमुना म्हणून जो आपल्यासमोर ठेवला जातो त्यांतलें वर्णन नैसर्गिक तरी आहे का? हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुस्थानांत वाढणारे जे सर्व प्रसिद्ध वृक्ष आहेत किंवा पशुपक्षी आहेत ते एका ठिकाणीं जमविले म्हणजे तें नमुनेदार निसर्गवर्णन होतें असें म्हणणें चुकीचें होईल.

वरील प्रतिकूल टीका मुक्तेश्वरावर नसून मुक्तेश्वराच्या काव्याचें मूल्यमापन करतांना चुकीचें मार्गदर्शन करणाऱ्या टीकाकारांवर आहे हें सांगावयास नको. जीं जीं दृश्यें मुक्तेश्वराच्या प्रत्यक्ष नजरेखालून गेलीं त्यांचें वर्णन त्यानें कुशलतेनें केलें आहे. परंतु जेथें मुक्तेश्वराला आपल्या कल्पनेवरच विसंबून राहावें लागलें आहे, तेथें मुक्तेश्वरी वर्णनाचा थाट असा: दोनचार भडक रेषा रंगवून आणि अतिशयोक्तीची खूब खैरात करून एक अत्यंत विशाल, भव्य, पण तितकेंच अस्पष्ट असें चित्र वाचकांसमोर उभें करावयाचें. त्याच्या भव्यपणामुळेंच वाचक इतका स्तिमित होऊन जातो कीं त्याच्या चिकित्साबुद्धीचा क्षणभर लोप झाल्याशिवाय राहात नाहीं. वरील उताऱ्यांतील 'जैसे प्रपंचीं विवेकरहित' आणि 'नूतन भाग्य पातलियां नष्टा' या ओळींतल्याप्रमाणें मुक्तेश्वर आपल्या वर्णनांत मधून मधून असे एकदोन सुंदर दृष्टांत किंवा रूपकें पेरून देतो कीं त्या वर्णनांतील दोष त्या दृष्टांतांची वा रूपकांची गोडी चाखण्यांत धुंद झालेल्या वाचकाच्या लक्षांत मुळींच येत नाहींत.

पण, ज्यांना 'आंग्लविद्यालोलुप' म्हणून हिणविलें जातें ते ज्या

सृष्टिवर्णनावर मुग्ध होतात तें हें नव्हे. त्या प्रकारच्या सृष्टिवर्णनांत कवी दोन-चार विशिष्ट पण महत्वाच्या रेषा रंगवून त्यानें स्वत: पाहिलेल्या विशिष्ट दृश्याचें चित्र वाचकासमोर हुबेहूब उभें करतो. इंग्लंडमध्यें रानावनांत सरोवराच्या कांठीं हजारों लाखोंनीं फुलणारें एक घंटिकाकृति तेजस्वी वर्णाचें पिवळ्या रंगाचें 'डॅफोडिल्' नांवाचें फूल आहे. या फुलावरील वर्ड्स्वर्थनें लिहिलेली कविता सुविख्यात आहे. "सरोवराच्या कांठावर, झाडांच्या छायेंत, वाऱ्याच्या झुळकीबरोबर हलणाऱ्या आणि नाचणाऱ्या या कनककांती फुलांचे थवेच्या थवे मला दिसले." एवढ्या वर्णनानेंच कवीला जें दृश्य दिसलें तेंच हुबेहूब वाचकांच्या मन:चक्षूंसमोर उभें राहतें, आणि वाचकांची कवीशीं तन्मयता होते. इंग्रजी वाङ्मयांतील ज्या सृष्टिवर्णनावर रासिक लुब्ध होतात तें सृष्टिवर्णन अशा प्रकारचें असतें. मुक्तेश्वराच्या सृष्टिवर्णनाचा प्रकार निराळा. इंग्रजी वाङ्मयांतील सृष्टिवर्णनाप्रमाणें सृष्टिवर्णन मुक्तेश्वरी काव्यांत नाहीं म्हणून मुक्तेश्वरी काव्याची महति वा सौंदर्य कमी होतें असें मुळींच नाहीं. इंग्लंडांतली पुष्पसृष्टि हिंदुस्थानांत आढळत नाहीं म्हणून हिंदुस्थानांत पुष्पसृष्टीचें सौंदर्यच नाहीं असें म्हणणें अयुक्त होईल. परंतु त्याबरोबरच या दोन्ही सौंदर्यांचे प्रकार निराळे असतात हेंहि कबूल केलें पाहिजे. सृष्टीच्या सूक्ष्म निरीक्षणावर व विशेष प्रतिभासंपन्नतेवर अवलंबून असणारा हा प्रकार आंग्ल वाङ्मयांत विपुलतेनें आढळतो. आधुनिक मराठी काव्यांतहि हा प्रकार क्वचित् ठिकाणीं आढळतो. कै० माधवराव पटवर्धनांची 'माळवारा' ही कविता त्या दृष्टीनें अप्रतिम आहे. एक ओसाड माळरान तें काय! एक अत्यंत रुक्ष स्थळ! पण, "खुरट चेपलीं गवतें; त्या अफाट माळावर पडलेले असंख्य गोटे, ओसाडीचें राज्य चालविणारा एकटा

नागफणी निवडुंग, तद्रूप शिळेवर निर्भय बसलेला पिवळा करडा सरडा, आणि त्या माळावर अखंड भिरभिर करीत वाहणारा वारा ', अशीं दोनचार विशिष्ट अंगें वर्णून कवीनें त्या रुक्ष व ' मरुशान्तीचें माहेर ' असलेल्या त्या माळाचें सुंदर शब्दचित्र रंगविलें आहे. हें विशिष्ट दृश्याचें हुबेहूब चित्र उभें करणारें वर्णन कांहीं रसिकांना वरील प्रकारच्या मुक्तेश्वरी स्थलवर्णनापेक्षां अधिक सरस वाटण्याचा संभव आहे. पण त्यामुळें मुक्तेश्वराच्या गौरवांत लेशाहि कमतरता न येतां, अध्यात्माच्या कांटेरी रानांतून काव्यसुमनाला बाहेर आणण्याचा प्रयत्न करून मुक्तेश्वरानें आधुनिक काव्याची मुहूर्तमेढ रोंवली याबद्दल तो विशेषच गौरवास पात्र आहे. प्राध्यापक पंगुंनीं उपयोजिलेल्या एका सुंदर व युक्तार्थवाही शब्दाचा उपयोग करून, मुक्तेश्वर हा मराठी वाङ्मयांतला पहिला व फारच श्रेष्ठ दर्जाचा ' कलाकवि ' आहे असें निश्चयानें म्हणतां येईल.

# ८ सन्त-कवयित्रींचें ओझरतें दर्शन

( लेखक—ग. वि. अकोलकर, एम्. ए. नाशिक )

महाराष्ट्र संत-कवयित्रींचें सांगोपांग चरित्रविवेचन आज उपलब्ध असलेल्या सामुग्रीच्या साह्यानें महाराष्ट्र-भाषा-भूषण ज. र. आजगांवकर यांनीं केलेंच आहे. कै. ह. भ. प. पांगारकर, तसेंच महानुभावी वाङ्मयाचे अभ्यासक श्री. देशपांडे व संतचरित्र-विवेचक डॉ. ग्रामोपाध्ये यांनीं व इतर लेखकांनीं प्रसंगोपात्त या कवयित्रींच्या काव्यांची रसपूर्ण चर्चा केली आहे. तेव्हां त्या सर्वांची शक्य तों पुनरुक्ति टाळून या कवयित्रींच्या जीवनकथेच्या व काव्याच्या वाचनानें मनांत उद्भवलेले कांहीं विचारतरंग येथें व्यक्त करण्याचा अल्पसा यत्न करीत आहें. त्यांत संशोधनाचें नाविन्य वा विदारक टीकेचा प्रखर प्रकाश कोणीं अपेक्षूं नये, अशी सुरुवातीसच सूचना करावीशी वाटते.

संत-कवयित्रींची चरित्रमाला दृष्टीपुढून सरकतांच प्रथमच जो विचार मनांत येतो तो, त्यांची संख्या, त्यांचा जीवनकाल आणि त्यांच्या काव्यकृतीची जपणूक यासंबंधीं होय. या कवयित्रींची संख्या अद्याप तरी दहाच्यावर गेलेली नाहीं. त्यांत आद्य कवयित्रीचा मान महानुभावपंथीय चक्रधरशिष्या महदाईसा अथवा रूपाई हिला मिळतो. तिच्या मागोमाग अध्यात्मविद्याकलापिनी ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाई हिचें नांव डोळ्यापुढें झळकतें. तिच्याच पलिकडे भक्तमंडळांत नामदेवशिष्या जनाबाई एखाद्या प्रशांत नंदादीपाप्रमाणें उभी असलेली आढळते. त्या दोघींच्या आसपास चोखापत्नी सोयराबाई व भगिनी निर्मळा वावरतांना दिसतात. या-

नंतर बऱ्याच कालानें संत दामाजींच्या पुण्यचरितानें पावन झालेल्या मंगळवेढ्यांतील गणिकाकन्या वारकरी मेळ्याबरोबर पंढर-पुरास जाऊन पांडुरंगचरणीं विलीन होतांना दिसते. तिच्या मागोमाग साधुसंतांच्या सेवेंत काळ कंठणारी, वीतरागी पण प्रेमळ अशी प्रेमाबाई कृष्णकथा ऐकतां ऐकतां कृष्णभेटीसाठीं धांव घेतांना आपण पाहातों. एखाद्या दीर्घप्रवासाच्या वाटेवर कोठेंतरी एकदोन झोपड्या आढळाव्या, त्यांतील मिणमिणत्या प्रकाशानें मनाला आपण वाटेवर असल्याचा धीर यावा, तेथें क्षणादोक्षणाचा विसावा लाभून पुढें जाण्यास उत्साह मिळावा अशीच या दोघींच्या काव्याची स्थिति आहे. पुन: कांहीं काळ लोटला कीं, चंद्रभागेच्या वाळवंटीं आणि आळंदीच्या तटाकीं तुकोबारायांचा विठ्ठलगजर आपणांस गुंगवूं लागतो, रामदासांची ' जय जय रघुवीर समर्थ ' अशी ओजस्वी धीरगंभीर वाणी आसमंतांत घुमूं लागते, आणि त्याच वेळीं जन्मपरंपरेचे टप्पे ओलांडीत आलेली, सवत्स धेनूच्या सांगातीं उभी असलेली बहिणाबाई, तसेंच मातापित्यांनीं दिलेला विषाचा पेला पचवूनही समर्थप्रभावळींत आपल्या सेवापरायणतेनें प्रकाशणारी वेणाबाई आणि रानोमाळ कांट्याकुट्यांत रामप्रभूचा ध्यास घेऊन फिरत असतां प्रभु रामचंद्रांनीं रस्त्याला लावलेली, हिन्दी-मराठींतून सारख्याच आर्ततेनें रामचंद्रास आळवणारी बया-बाई या त्रिमूर्तींचें आपणास दर्शन घडतें. सुमारें शके ११९० पासून ते सुमारे शके १६३० पर्यंतच्या चारसाडेचारशें वर्षांच्या काळांत तीन चार प्रसंगींच कवयित्रींची काव्यनिर्मिति व्हावी, अवघ्या दहाच कवयित्री जन्मास याव्यात, हें मनास असंभवनीय वाटतें. मुक्ताई--जनाई किंवा बहिणाबाई--बयाबाई यांच्या भजन-कीर्तनांतून रसाळ अभंग, ओव्या वा मधुर पदें ऐकून इतर स्त्री-

जनांना स्फूर्ति झालीच नसेल, कोणी त्यांचें अनुकरण केलेंच नसेल हें अशक्य वाटतें. पण या कवयित्रींना भक्तकंदंबाचा आधार लाभला तसा इतरांना न लाभल्यानें आणि 'वाङ्मय' लेखनिबद्ध करण्याची साधनसामुग्री स्त्रीजनांना तरी सुलभ नसल्यानें किती तरी कुटुंबवत्सल वृद्धांची, पतिभक्तिपरायण गृहिणींची आणि वात्सल्यशील मातांची कृष्णकथारूपानें गुणगुणलेली पण सांसारिक हर्षखेदाच्या विविध भावांनीं फुललेली गीतगंगा त्यांच्या ओठावरच विराम पावली असेल. 'विनाश्रयाः न शोभन्ते।' इतकेंच नव्हे तर 'न जीवन्ति कवितालताः।' हेंच खरें!

वरील पृथक्करणावरून दुसरी एक गोष्ट चटकन् लक्ष्यांत येते; ती ही कीं, ज्या ज्या वेळीं इतर थोर संतांच्या उज्ज्वल कार्यानें महाराष्ट्राचें वातावरण उजळलें, त्यांच्या अभंग—ओव्यांनीं सारें वातावरण धुंद झालें, त्याच काळांत कवयित्रींच्या काव्याला कमनीय बहर आला. पण याचा अर्थ सन्तकवींच्या काव्यांतील पडसादच कवयित्रींच्या काव्यांत उमटले असा कोणी करील तर तो साफ चुकीचा आहे. कारण यांतील एखादा दुसरा अपवाद सोडला तर साऱ्या कवयित्री ब्रह्मवेत्त्या, साक्षात्कारी होत्या. कोणी ध्यानानें तर कोणी भक्तीनें भगवद्दर्शनाचा सोहळा अनुभवला होता; असेंच त्यांच्या जीवनकथेकडे पाहिलें म्हणजे दिसून येतें. तेव्हां सन्त-कविकवयित्रींच्या साहचर्याचें स्पष्टीकरण करावयाचें झालें तर तें चन्द्र-चंद्रिका न्यायानें करावें असें वाटूं लागतें. हेंच तर्कबुद्धीला पटणाऱ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे पूर्वजन्मांचें व पूर्वसंस्कारांचें महत्त्व मान्य करूनही असें म्हणता येईल कीं, सामाजिक मनाच्या विकासाचे कांहीं विशिष्ट टप्पे इतिहासांत आढळतात. त्या वेळीं जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांत आणि समा-

जाच्या वेगवेगळ्या थरांत चैतन्य स्फुरूं लागतें आणि त्या वेळीं स्पृश्यास्पृश्य, स्त्रीपुरुष, श्रेष्ठकनिष्ठ अशा कोणत्याच भेदाची तमा न धरतां जीवन आपलें स्वरूप प्रगट करीत असतें. असो.

सन्त-कवयित्रींची बरीचशी रचना आत्मपर व अध्यात्मप्रवण आहे. बोलून चालून तिचा उगम आत्मोद्धाराच्या व परमेश्वर-भेटीच्या तळमळींतून झालेला. तथापि कांहीं आख्यानक कविताहि त्यांनीं रचलेली आहे. तसेंच निव्वळ वृत्तवैचित्र्याच्या इच्छेनें नव्हे तर स्त्रीस्वभाववैशिष्ट्यामुळें कृष्णचरित्रावर मधुर प्रासादिक पदेंही त्यांनीं रचलीं आहेत. प्रथम ह्यांचें दर्शन घेऊन मग ओवी, अभंग वाङ्मयाकडे वळूं.

## १ महदाईसा उर्फ महदंबा

मराठी कवयित्रीची प्रथम काव्यकृति निर्माण झाली, ती श्रीकृष्ण-जीवनांतील रुक्मिणीविवाहाच्या प्रसंगावर. हा निव्वळ काक-तालीय न्याय नाहीं. स्त्रीस्वभावाची एक सुंदर छटा त्यांत व्यक्त होते. एकतर स्त्रीजीवनांत विवाह हा मोठाच आनंदोत्सवाचा प्रसंग; त्यांतच कृष्णरुक्मिणीविवाह ही कथा त्यांतील रुक्मिणीच्या मधुर अभिसारवृत्तीनें आकर्षक झालेली. महदाईसेनें गोविंदप्रभूच्या मंगल विवाहकाळीं हा विषय निवडला तर त्यांत आश्चर्य नाहीं. कथेचा धागा मुळांतून घ्यावयाचा, सद्य:कालीन वातावरणांतील आचार-विचारांच्या तंतूंनीं त्याभोंवतीं पट विणावयाचा, आणि स्वत:च्या अंत:करणांतील भावनांची झिलई त्यावर चढवावयाची हीच बहुतेक प्राकृत कवींची रीत आहे. महदाईसेचे ‘ धवळे ’ वा ‘ रुक्मिणीस्वयंवर ’ यास अपवाद नाहीं.

या काव्यांत रुक्मिणीचा शिशुपालाशीं विवाह ठरल्याच्या प्रसंगा-पासून सुरवात केली आहे. ‘ शिशुपाल वरु ऐसें आइकलें........

बाळा, श्रमु पावली नोऱ्हा जाली व्याकुळ.' ' हृदा धाक लागला ' तिनें मनोमय कृष्णाची प्रार्थना केली, ' शिशुपाळ-बंदिशाळ चुकवा. ' प्रेमहीन विवाह म्हणजे तुरुंगवासच नव्हे तर काय ?

पत्रिकेचा प्रसंग मात्र टाळला आहे. पण सुदेव-कृष्णाच्या भेटीचें वर्णन सविस्तर दिलें आहे. कृष्णाची स्वारी आल्यावर विद्याधरींनीं त्याजकडे रुखवत पोहोंचविलें. आपल्या सखीच्या प्रियकराच्या देखणेपणाची त्यांनीं तोंडभरून स्तुति केली. पण लगेच आपल्या भावनेविषयीं रुक्मिणीला संशय येऊं नये म्हणून लगेच त्यांनीं पुस्ती जोडली, ' तुझा पति आम्हां पिता, नाठवे दुजा विचारू. '

रुक्मिणीला कृष्णदर्शन घडलें त्या वेळचें वर्णन अत्यंत बहारीचें आहे.

> **अंबिके रायांगणी उभी ठेली बाळी ।**
> **सांवळा कमळनयन देवी पाहे पां लावण्यसिंधु ।**
> **तंव तीया रुक्मिणि दोन्ही करीं जोहारिले गोविंदु ॥**
> **हंसगति चाले बाळा ।**
> **आनंदें आंसुवें कांहीं न देखेचि डोळां ।**
> **कंपित सासंकित अंगीं रोम स्वेद ललाटीं ॥**

यानंतर विवाहविधीचें वर्णन विस्तारानें आलें आहे. रुक्मिणीहरणामुळें झालेल्या युद्धाचेंही वर्णन आहे. रुक्मिणीनें कृष्णाला वरलें, तें ' अमूर्त ब्रह्म कैसें रूपासी आलें ' या भावनेनें.

धवळ्यांचें काव्यदृष्ट्या मूल्यमापन करतांना एक गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. ती म्हणजे ही रचना एका अव्युत्पन्न स्त्रीची आहे. मराठींतील स्त्रीची आद्यकृति या दृष्टीनें या काव्याकडे पाहिलें म्हणजे तिच्यांतील सरसत्व निःसंशय अधिक ठरतें. पण काव्य-मूल्यापेक्षांही महाराष्ट्रीय समाजांतील आचारविचारांचें प्रतिबिंब

त्यांत जें उमटलें आहे त्या सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनेंही या धवळ्यांचें महत्त्व कांकणभर अधिक आहे.

यानंतर श्रीकृष्णचरित्रावर रचना करणारी कवयित्री म्हणजे प्रेमाबाई हीच होय. तिचीं चारपांचच पदें उपलब्ध आहेत. त्या सर्वांची सुरवात 'गडे हो, कृष्ण गडी अपुला' अशा पदांनीं झाली आहे. एकांत, कृष्ण यमुनाडोहीं बुडाल्यानें माजलेल्या हलकल्लोळाचें वर्णन आहे. 'दहि दुध लोणी म्यां हरिलें, हरिला ताक बळें दिधलें........वृक्षीं बळकट बांधियलें, म्हणोनी तो मजवर रुसला' व यमुनेच्या डोहांत त्यानें उडी घेतली. अशी पुत्रवत्सल मातेच्या हृदयाला व्याकुळ करणारी शंका त्यांत आहे. तर कृष्ण मथुरेचा राजा झाला, त्यानें आतां काळा कांबळा टाकला, पितांबर कसला, मयूरपिच्छें टाकलीं, मुगुट घातला इ० विरोधी वर्णन करून बाह्यवेष बदलला, त्याचें अंतरंग बदललें असेल; 'अतां काय ओळखिल अपुल्याला' अशी कांहींशी विनोदानें, कांहींशा गंभीरतेनें भीति प्रकट केली आहे. तिसऱ्यांत अक्रूर कृष्णाला नेत असतांना माजलेल्या आकांताचें गहिंवर आणणारें वर्णन आहे. दुसऱ्या एका पदांत सुदाम्याला लागलेल्या कृष्णभेटीच्या तळमळीचें वर्णन आहे. प्रेमाबाईच्या सर्व पदांत करुणाचीच छटा अधिक आहे. वात्सल्याशीं त्याचा मिलाफ झाल्यानें सारींच पदें वाचकांना गहिंवरून टाकतात. अभंग वा ओवी या छंदांची रुळलेली वाट सोडून तिनें पदांचा आश्रय केला आणि गेयतेची जोड भावनेला मिळाल्यानें रसवत्ता कशी वाढते याचा अजाणतेपणें तिनें प्रयोग केला. हेंच तिचें वैशिष्टय. महदंबेचे धवळे स्त्रियांना जरी सहजतया थोड्याशा आरोहावरोहानें गळ्यावर म्हणतां येणें शक्य असले तरी पदांची सुरेलता गाण्याचा हव्यास असणाऱ्या स्त्रियांना अधिक

मोह पाडणारी असल्यानें प्रेमाबाईचीं पदें अधिक लोकप्रिय व्हावींत व अण्णा किर्लोस्करांसारख्या रसिकवरांना त्या चाली उचलण्याचा मोह व्हावा हें अगदीं स्वाभाविक आहे.

बयाबाई रामदासी हिच्या विविध पद्यांतही कृष्णाच्या कुंजवनातील लीलेसंबंधीं एक पद आहे. त्याची रचना या जातींत आहे. पदाचें ध्रुपद ' काय सांगूं बाई तरी कपटी मोठा कान्हा ' असें असून यमुनातीरावर जाणाऱ्या गोपींना तो अडवतो, त्यांचा ' घुंगटपट ' काढून त्यांच्या कानाशीं लागतो वगैरे नेहमींचें वर्णन पण साध्या भाषेंत संयमपूर्वक केलेलें आहे. शृंगाराची यत्किंचितही छटा त्यांत नाहीं. श्रीकृष्णचरित्रावरील या व वर उल्लेखिलेल्या पद्यांत स्त्रीकवयित्रींनीं शृंगाराला मुळींच थारा दिला नाहीं, हें पाहिलें म्हणजे ऐहिक पतिव्रताधर्म व परमेश्वरभक्ति यांचा किती उदात्त भूमिकेवरून त्यांनीं समन्वय साधला हें लक्षांत येईल. बहिणाबाईनें तर उत्कृष्ट संक्षेप व परंपरारूपक यांची मर्यादा गांठणाऱ्या साऱ्या कृष्णजीवनाची आध्यात्मिक लीलाकैवल्यता वर्णिली आहे.

**अष्टधा प्रकृति वोव्रि या गोपिका । अष्टभाव देखा गोपाळ हे ॥**
**क्रीडती गोकुळीं सदा या शरीरीं । स्वानंदें निर्भरीं परमानन्द ॥**
**इंद्रियगोधनें विषयतृणचरें । दुभती अपारें निजसत्त्वें ॥**
**गोरसाचे डेरे अखंड संचले । सुखें सुखावलें स्वानुभवें ॥**
**तेणें सुखानंदें नाचती गोपाळ । करिती गदारोळ गोपिका त्या ॥**
**बहेणी म्हणे जेथें कृष्णाचा अवतार । तेथें व्यभिचार स्वप्नीं नाहीं ॥**

कृष्णजीवनांतील कथांना आध्यात्मिक अर्थ पुष्कळ कवींनीं दिला आहे. पण शृंगारवर्णनाची हौस पुरविण्यालाहि या कथा त्यांना तितक्याच उपयोगीं पडल्या आहेत. या बाबतींत कवयित्रींचा विशुद्ध व सात्त्विक दृष्टिकोण पुढील कवींनीं स्वीकारला असता तर

अधिक बरें झालें असतें. जनाईची सारी रचना ओवी व अभंगांतच आहे. पण त्यांतील कृष्णवर्णनाचा पुढील अभंग स्वभावोक्तीचा व वात्सल्यरसाचा तसेंच दृश्य चित्रांचा उत्कृष्ट नमुना म्हणून उध्दृत करण्याचा मोह टाळवत नाहीं.

**वैकुंठींचा हरि । तान्हा यशोदेच्या घरीं ॥**
**रांगतसे हा अंगणीं । माथां जावळाची वेणी ॥**
**पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ॥**
**धन्य यशोदा माय । दासी जनी वंदी पाय ॥**

कथनात्मक काव्याचा विचार करतांना वेणाबाई रामदासी हिच्या श्रीसीतास्वयंवराचा परामर्श येथेंच घ्यावयास पाहिजे. या ग्रंथाचे १४ समास असून १५६८ ओंव्या त्यांत आहेत. एवढी प्रदीर्घ रचना कोणत्याच प्राचीन कवयित्रीनें केलेली नाहीं. तिच्या भाषाप्रभुत्वाबद्दल व लेखनशैलीबद्दल श्री. शंकरराव देव यांचा पुढील अभिप्राय सर्वांस मान्य होण्यासारखा आहे. ते लिहितात, "लौकिक दृष्टीनें पाहिलें तर वेणाबाई थोर विदुषी होत्या. भारत, भागवत, रामायण इत्यादि ग्रंथ त्यांना चांगले अवगत होते." अन्यत्र ते म्हणतात, "सीतेचें स्वयंवर वेणाबाईच्या पूर्वी व नंतर पुष्कळांनीं वर्णिलें आहे. पण वेणाबाईच्या ग्रंथाची योग्यता कांहीं निराळी आहे....वेणाबाईच्या स्वयंवरांत प्रत्येक लहानमोठ्या प्रसंगाचें जसें यथासांग वर्णन आहे, तसें दुसऱ्या एकाद्या ग्रंथांत असल्याचें माझ्या पाहण्यांत नाहीं." त्यांतील काव्यगुणाबद्दल श्री. आजगांवकर म्हणतात, "स्त्रीस्वभावसहज मार्दव आणि सहृदयता या दोन गुणांच्या बाबतींत ही कविता दुसऱ्या कोणत्याहि कवीच्या कवितेस हार जाणार नाहीं." शिवाय त्यांतील चालीरीतींच्या व पक्वान्नादिकांच्या वर्णनामुळें त्यास

सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व आहे तें वेगळेंच. हीं प्रत्यक्ष उदाहरणेंच पाहा ना! विश्वामित्रानें यज्ञरक्षणार्थ रामलक्ष्मणांस पाठविण्याबद्दल दशरथास विनंति केली. तेव्हां दशरथाच्या अनुकंपनीय स्थितीचें पुढील वर्णन पाहा.

तनु कांपती थर्थरा । नेत्रीं लागल्या अश्रुधारा ॥
कांहीं धरूनिया धीरा । राजा बोलता जाला ॥
म्हणे माग स्वर्गींचें बरवें । माग पातालींचें आघवें ॥
देईन पुरुषार्थवैभवें । दिशावलयांकित हे धरा ॥

श्रीरामचंद्राचें स्वरूपही मोठे मनोहर रीतीनें वर्णिलें आहे.

सकळ पाहाती स्वानंदघन । दिव्यांबरें परिधान ॥
मुगुट किरिटी विराजमान । कुण्डलें कर्णीं झळकती ॥
चरणीं नेपुरांचा गजर । अंदु तोडराचा झणत्कार ॥
पृष्ठीं भाते मनोहर । अमोघ शरीं दाटले ॥
चित्रविचित्र रत्नमणी । चापीं झणत्कारिती किंकिणी ॥
आजानुबाहो चूडामणि । करीं कोदंड मिरवत ॥

श्रीरामचंद्राचें स्वरूप पाहून जनकाच्या मनाची झालेली द्विधा स्थिति सांगतांना त्या लिहितात,

थोर पस्तावला मनीं । म्हणे नसत्या साभिमानीं ॥
कैसा पडलों जाउनी । धनुष्यपण वेर्थ केला ॥
त्रिभुवनसुंदर हें रूपडें । माझी कन्या त्याच्या पाडें ॥
परंतु पणास न मोडे । सत्यप्रतिज्ञा माझी ॥
असेल माझी क्रिया बरी । भक्ति वैराग्य तपें खरीं ॥
विदेह नाम सत्योत्तरीं । राम जावाई जोडेल ॥

त्यानंतर रावणाची दर्पोक्ति व फजिती मोठ्या कौशल्यानें वर्णिली आहे. रामाचा धनुर्भंगाचा प्रसंगही तसाच भव्योदात्त आहे.

ध्वनि दाटलें ब्रह्मांड । नभ कर्कश गर्जतसे ॥
मेरुमांदारसिखरें । घडघडिलीं तें अपारें ॥
सप्तपाताळ दिगंतरें । नादें डोले वसुमति ॥
खळबळिले सप्तसागर । चंद्रागीर द्रोणागीर ॥
तेव्हां खचले अपार । नक्षत्रझडी बैसली ॥

पण कन्यादानाच्या प्रसंगींची जनकाची व जनकपत्नीच्या मनाची वियोगव्याकुल मनःस्थिति रेखाटतांना कोमलवर्णराजींच्या कुशल उपयोजनेनें नादमाधुर्य व अर्थसौंदर्य अपार साधलें आहे. त्यांत स्वकन्येच्या गुणाचा यथार्थ अभिमान तर फारच सुरेख वर्णिला आहे. जनक व्याह्यास म्हणतो,

माझ्या प्राणाची प्राणकळा । सुखदायक सुसीळा ॥
परमस्नेहें भूपाळा । ईचें पाळण करावें ॥
सकळ कीर्तीची गजगजा । निरोपता हे अवलिजा ॥
ईचें पाळण राये वोजा । बहु प्रकारें करावें ॥
माझ्या प्राणाची आवडती । जीवनकळा हे सुमति ॥
ईचें पाळण बरव्या रीती । वडिलें केलें पाहिजे ॥

या काव्यांतून असे आणखी कितीतरी उतारे देतां येतील.

* * * *

संत-कवयित्रींच्या अंतरंगाची खरी ओळख त्यांच्या ओव्या-अभंगांनीं होते. आधींच कवयित्रींची वृत्ति आत्मनिवेदनाची, त्यांत ओवी-अभंगासारख्या छंदाची त्याला जोड मिळालेली. जातां जातां या छंदाबद्दल दोन विद्वानांचीं मतें उद्धृत करून त्या छंदांचे मराठीवर जे बहुमोल उपकार झाले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. ह. भ. प. लक्ष्मणरावजी पांगारकर म्हणतात, " अभंग-पदात्मक वाङ्मय म्हणजे प्रायः कवीचा एकांतांतला विलास होय.

देवाभक्तांच्या एकांतांत, प्रेमांत, रुसव्याफुगव्यांत, आत्मरंगांत स्फुरलेली हीं कोमल भावनांचीं सुमनें दिव्य प्रेमानें दरवळलेलीं असतात." तर "भक्तवाणी अंभगांतच वक्तृत्वपूर्ण होऊन स्वत:च्या सोळाही कला व्यक्त करते." असा अभिप्राय रसिकश्रेष्ठ आचार्य कालेलकर यांनीं प्रगट केला आहे. हीं दोन्ही विधानें यथार्थत्वानें संत-कवयित्रींच्या काव्यसंभाराच्या बाबतींत अनुभवास येतात. या कवयित्रींची काव्यगंगा केवळ स्फूर्तीनें प्रगट झालेली. इतर संत-कवींचा काव्यौघ गोदा-गंगेप्रमाणें लोकोद्धारार्थ अवतरला, तर कवयित्रींच्या काव्यकृति रानोमाळ झिरपणाऱ्या निर्झरिणींप्रमाणें आहेत. कीर्तनपुराणाचा, ज्ञानप्रसाराचा, संस्कृत-मराठी वादाचा असा कसल्याच लौकिक विचारांचा त्यांना स्पर्श झालेला नाहीं. जनसंमर्दापासूनच्या अलिप्ततेची, एकान्तांतील शांततेची, निरागस रम्यतेची व भक्तिप्रेमाच्या अथांगतेची त्यांत उत्कटत्वानें प्रतीति येते.

या अभंगवाङ्मयाचें वरवर निरीक्षण केलें तरीहि एक गोष्ट चटकन नजरेस येते कीं, त्यांत गंगायमुनेच्या ओघांप्रमाणें अध्यात्म आणि भक्ति अशा द्विविध प्रवाहांचा सुंदर मिलाफ आहे. बुद्धीची चमक आणि हृदयाचा जिव्हाळा, आत्मानात्मतेचें विवेचन करणारी पृथक्करणशील ज्ञानदीप्त बुद्धि आणि परमेशाशीं संगमोत्सुक हळुवार आणि कोमल अन्त:करणवृत्ति यांचें सुरेख मिश्रण आहे. थोडक्यांत ज्ञानरवीची तमोविनाशकच नव्हे तर सर्वतोगामी सर्वप्रत्ययदा उज्ज्वल प्रभा आणि त्याचबरोबर अत्यंत शीतल, आल्हादक अशी चन्द्रकांति, दोन्ही कधीं एकाच कविकवयित्रींची तर कधीं भिन्नप्रकृति पण समकालीन कव-

(१) म. वा. इ. भाग २, पृ. १६३ (२) अ. गीतांजलि.

यित्रींच्या काव्यांत पाहावयास सांपडतात. विशेषत: ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई आणि नामयाची दासी जनी या दोघींच्या वाङ्मयाचा तुलनात्मक अभ्यास करतांना ही गोष्ट चांगलीच अनुभवास येते. पांगारकरांच्या शब्दांत " दोघीहि समान वयाच्या, समान अधिकाराच्या, भक्तिज्ञानवैराग्यादि गुणालंकारांनीं नटलेल्या;" पण मुक्ताबाईच्या अभंगांत ज्ञानेश्वरांची योगानुभूति व अव्यक्तोपासना यांवर भर अधिक दिसतो, तर जनाबाईच्या अभंगांत भक्तीची माधुरी व सगुणोपासना यांना बहर आला आहे. या दोघींनीं एकत्र बसून गाईलेल्या म्हणून ज्या ओंव्या श्री. पांगारकरांनीं दिलेल्या आहेत, त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला तरी ही गोष्ट चटकन् कळून येईल.

| मुक्ताबाई | जनाबाई |
|---|---|
| पहिली माझी ओवी । परतूनी पाहिलें । दृष्टीनें देखिलें । निजरूप ॥ दुसरी माझी ओवी । दुजें नाहीं मनीं ॥ लक्ष तुझे चरणीं । लागियेलें ॥ तिसरी माझी ओवी । लाभे सायुज्यता । हात तुझा माथां सद्गुरुनाथा ॥ चवथी माझी ओवी । शून्य जेथें आहे । वस्तु घनदाट । मार्गेपुढें ॥... ... ... ... | पहिली माझी ओवी । ओवीन जगत्र । गाईन पवित्र । पांडुरंग ॥ दुसरी माझी ओवी । दुजा नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे । पांडुरंग ॥ तिसरी माझी ओवी । तिजा नाहीं ठाव । अवघाची देव । पांडुरंग ॥ चवथी माझी ओवी । वैरिलें दळण गाईन निधान । पांडुरंग ॥... ... |
| आठवी माझी ओवी । आठव नाहीं जरा । निर्गुण सोयरा । पाणियेला ॥ नववी माझी ओवी । नांदूं मी लागलें । परपुरुषा रतलें । जीवें भावें ॥ दहावी माझी ओवी । घालें | आठवी माझी ओवी । अठ्ठावीस युगें । उभा चंद्रभागे । पांडुरंग ॥ नववी माझी ओवी । संपलें दळण चुकवी मरण । पांडुरंग ॥ दहावी माझी ओवी । दहा अवतारीं । यावें संवसारीं । पांडुरंग ॥ |

माझें मन । डोळा दिसे ऊन । रात्रीमाजी ॥ म्हणे मुक्ताबाई । निवृत्तीचें देणें । योगियाचे खुणे । योगी जाणे ॥

दोघींचे जरी एकएक अभंग वाचले तरी तीच गोष्ट पटते.

मुक्ताई—

**सर्वरूपीं निर्गुण संचलें पैं सर्वदा । आकारसंपदा नाहीं तया ॥**
**आकारिती भक्त मायामय काम । सर्वत्र निःसीम अंतरीं आहे ॥**
**निवृत्तीचा उच्छेदु निवृत्ती तत्त्वता । सर्वेही समता सांगितली ॥**
**मुक्ताई अवीट मुक्तपंथरंत । जीवीं शिवीं अनंत तत्त्वविद ॥**

आतां जनाईचा एक अभंग पाहा.

**माय तूं माउली । आम्हां कृपेची साउली ॥**
**तुझें नाम वाचे गातां । नाहीं जन्ममरणाचिंता ॥**
**नको योग याग तप । पाहे तिकडे तुझें रूप ॥**
**सर्व व्यापुनी भरला । जनी म्हणे उभा ठेला ॥**

मुक्ताबाईचा कोणताही अभंग वाचला तरी तिच्या योगाभ्यासाची व थोर अधिकारत्वाची साक्ष पटल्यावांचून राहात नाहीं. मुक्ताबाईची जीवनकथा सर्वविश्रुत आहे. त्यांतील कोणताहि प्रसंग पाहिला तरी त्यांत तेजस्विता, जाज्वल्यता हीच अनुभवास येते. आदिमायेच्या, विश्वशक्तीच्या उग्र, चंड तेजाचा हा आविष्कार असावा असें वाटूं लागतें. तिच्या अभंगांतही हीच ज्ञानाची, प्रखर बुद्धिनिष्ठेची डोळे दिपविणारी माध्यान्हींच्या सूर्याची तेजोमयता आहे. नाममंत्राचें माहात्म्य मुक्ताबाई गाऊं लागली तरी ' दिननिशीं प्रश्न मुक्तिमार्गु ' म्हणूनच त्याचा विचार करिते. ' इच्छिलें पावती भक्त सदा ' हें वर्णितांनाहि ' सहस्रदळीं हरि, आत्मा हा कुसरीं, नांदे देहाभीतरीं अलिप्त सदा । ' म्हणून आरंभ करिते. व्यक्त आणि अव्यक्त, निवृत्ति-तटाक, निर्गुण आणि निराकार,

निजतत्त्व, निजतेज, यांना विसरून मुक्ताबाई बोलूंच शकत नाहीं. तिच्या भक्तीलाहि ज्ञानाचेंच कोंदण लाभलें आहे. त्यामुळें मुक्ताबाईची सारी रचना प्रौढ, योगपरिभाषेनें नटलेली आणि अनुभवाधिष्ठित बोलामुळें दुसऱ्यावर अधिकारीपणाची छाप बसविणारी अशी झाली आहे.

याउलट जनाबाईची रचना व अभंगवाणी आहे. तिची सारी रचना साध्या भोळ्या भक्तीभावानें ओथंबलेली आहे. त्यातील प्रेमळपणाला उपमा द्यावयाची झाली तर अशीच द्यावी लागेल. पांगारकर जनाबाईच्या वाणीला कृष्णनाथाच्या मुरलीची उपमा देतात. ती सार्थ वाटते. हृदयाला हलवून सोडणारी आर्तता व आर्द्रता त्यांत आहे. मग प्रसंग कोणता का असेना, परमेश्वराशीं आपलें नातें ती सांगते, तेंच पहा किती मातृवत्सलतेनें !

**पक्षी जाय दिगंतरा । बाळकासि आणी चारा ।**
**घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिलापाशीं ।**
**माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापाशीं ।**
**वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधूनी उदरीं ।**
**तैसी आम्हां विठ्ठलमाये । जनी वेळोवेळा पाहे ।**

विठ्ठलाच्या दर्शनाची तिची तळमळ पाहिली

**कां गा न येसी विठ्ठला । ऐसा कोण दोष मला ।**
किंवा **गंगा गेली सिंधुपाशीं । त्यानें अव्हेरिलें तिसी ॥**
**तरि तें सांगावें कवणाला । ऐसें बोलें बा विठ्ठला ॥**
किंवा **माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ।**
**मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहे वास ।** आणि

'ये ग ये ग विठाबाई, माझे पंढरीचे आई ।' अशी तिची करुण हांक ऐकली कीं कुणासही गहिंवर यावा असा जिव्हाळा त्यांत आहे.

एकाच कालांत होऊन गेलेल्या, एकत्र वावरलेल्या या दोन

कवयित्रींच्या रचनेंतील, वृत्तींतील असें महदंतर पाहिलें म्हणजे घटकाभर मन स्तिमित झाल्याशिवाय राहात नाहीं. हा फरक केवळ ' व्यक्ति तितक्या प्रकृती ' या न्यायानें झाला आहे कीं जन्मांतर-संस्काराचें हें फलित आहे, कीं आत्म्याच्या चित्कलेच्या या दोन बाजू अभ्यासकांसमोर मांडण्यासाठीं परमेश्वराचाच हा लीलाविलास आहे, हें कूट उलगडणें कठिण आहे. एवढें खरें कीं दोघींचें काव्य वाचून शारदीय दिवाकर जनीचीच आठवण होते. निरभ्र आकाशांतील दिवाकराचा चंड आतप व लगेच प्रशांत चंद्रिकेची सुधाधवल आल्हादक प्रभा यांची मधुर शोभा अविच्छिन्नपणें उपभोगावयास मिळते आणि ' सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पंडिताः । ' या भगवदुक्तिचें याथार्थ्य पटतें.

पुढील संत—कवयित्रींच्या काव्याचेही असे कांहीं कांहीं पैलु निरीक्षकांच्या नजरेंत सहज भरतील. पांडुरंगाच्या पायाशीं प्रेमसमाधी घेणाऱ्या कान्होपात्रेचे करुणालाप कोणाला पाझर फोडतील, तर बहिणाबाईची पुनर्जन्माची कथा, तिनें केलेलें स्वतःच्या मृत्यूच्या सोहाळ्याचें सांगोपांग वर्णन अध्यात्मप्रवण वीतरागी वृत्तीला चालना देतील. वेणाबाईची रामभक्ति कोणाला मोहवील तर बयाबाईची अपरंपार गुरुभक्ति आणि भाषाप्रभुत्व, रचनाचातुर्य, अध्यात्मज्ञानाची उंच झेप कोणाला दिग्मूढ करील. पण विस्तारभयास्तव त्यांत मी शिरत नाहीं.

शेवटीं समारोपादाखल एवढेंच म्हणावेंसें वाटतें कीं, ज्या कालांत मराठी भाषेचें स्वरूप बनत होतें, ज्या कालांत बहुजन समाज ज्ञानाला, साक्षरतेला पारखा होता आणि ज्या कालांत 'संस्कृत भाषा देवें केली तरी प्राकृत काय चोरें निर्मिली ?' म्हणून मराठीचे अभिमानी कंबरा कसून मराठीची शक्ति आव्हान-

पूर्वक प्रकट करीत होते, त्या काळांत, या वेगवेगळ्या अवस्थांच्या काळांत, चार भिंतींच्या आंत वावरणाऱ्या कुळवधूंच्या मुखांतूनही मराठी गिरा अखंडपणें स्रवून काव्यरूप धारण करीत होती, हें पाहिलें म्हणजे सानन्द अभिमान वाटल्यावांचून राहात नाहीं. ही महाराष्ट्र कवयित्रींची काव्यवधू महाराष्ट्र कुळवधूंइतकीच विनयशील आहे, अंतःकरणानें भाविक आणि प्रेमळ आहे आणि वेळप्रसंगीं त्यांच्याइतकीच स्वाभिमानी, तेजस्वी आणि वृत्तीनें प्रखर आहे. तिच्यांत मतामतांच्या गलबल्यापेक्षां मनाची तल्लीनता अधिक प्रत्ययास येते; पांडित्यप्रकर्षापेक्षां भावनेची आर्द्रताच अधिक मनास हलविते. ब्रह्म आणि माया, जीव आणि शिव, कामक्रोधादि षड्रिपु इत्यादींचें तात्त्विक चर्वण तिनें कधींच केलें नाहीं असें नाहीं. पण ती बहुधा अध्यात्माची उच्च सीमा पुरुषच गांठूं शकतात. त्यांचा अभिमान उतरवण्यासाठींच तिला खरा प्रेमा भक्तीचा; तिचा आवडता रस वात्सल्य. तिच्या साजशृंगारांत अस्सल मराठी वळणाचींच लेणीं आहेत. पांडित्याचा संपर्क नसल्यानें त्यांना कृत्रिमतेचा गंध नाहीं. प्रचाराचा अभिनिवेश नसल्यानें त्यांत सहजतेची परमावधि आहे. पण त्यांतही स्त्रीसुलभ मर्यादाशीलतेचा संयम आहे. श्रीकृष्णभक्तीनें त्यांच्या अपत्यप्रेमाला पूर आला. पांडुरंगप्रीतीनें त्यांची गानसरिता दुथडी भरून वाहूं लागली. संतकवयित्रींच्या काव्यलेखनानें मराठी काव्याला पूर्णता आली. परमार्थाचा मार्ग स्त्रियांना सुकर आहे. आध्यात्मिक प्रगतीच्या प्रवासांतही स्त्रिया पुरुषांच्या परिपंथिनी तर होत नाहींतच; झाल्याच तर सहप्रवासिनीच होऊं शकतात, हें जगाच्या निदर्शनास आणलें. संसार आणि परमार्थ यांची सांगड किती उत्तम होऊं शकते याचा आदर्श जगापुढें ठेवला आणि आत्मोद्धाराबरोबरच संसारोद्धाराचें श्रेय संपादलें.

# ९ अपौरुषेय वाङ्मय
## अर्थात्
# अर्वाचीन श्रुति*

( लेखिका—डॉ. कमळाबाई देशपांडे, पीएच. डी. पुणें )

आज ज्या विषयावर मी बोलणार आहें तो जुना असला तरी नव्यानें पुढें येणारा आहे. या विषयावर मी एकदां लिहिलें होतें व कोठें कोठें त्याबद्दल बोललेंहि आहें. विषय अभ्यासूंच्या पुढें नवीन आहे व रमणीय असल्यानें प्रत्येक वेळीं त्याची कांहीं कांहीं 'नवता' डोळ्यांसमोर येते. अजून त्याचा सांगोपांग अभ्यास झालेला नाहीं व म्हणून पुन्हा एकदां विवेचनास घेतल्यास सहजच चर्चा होऊन, इतरांकडून जास्त उपयुक्त माहिती पुढें येऊं शकेल आणि याच दृष्टीनें थोडासा पुनरावृत्तीचा दोष पत्करूनहि मी आज त्याबद्दल बोलणार आहें. आपणहि याच दृष्टीनें त्याकडे अवधान द्याल अशी मला उमेद आहे.

विषयाचें नांव ऐकतांच प्रथम आपण गंभीर झालां असाल व आतां वेदाभ्यासजड होऊन तासभर रुक्ष चर्चेंत घालवावा लागणार म्हणून संत्रस्त झालां असाल. पण प्रत्यक्ष विषयाला सुरवात करतांच एकदम हंसूं लागाल व म्हणाल, " हेंच का अपौरुषेय वाङ्मय !" मग यापेक्षां याला 'दळूं बाई दळूं' हेंच नाव कां दिलें नाहीं ?

* ता. २३ जुलै १९४५ रोजीं मुंबईस साहित्यसंघाच्या वाढदिवसाचे निमित्तानें व्याख्यानांत प्रस्तुत विषयाचा उपन्यास केला होता. त्यांत बरीचशी भर घालून हा निबंध पुरा केला आहे. भाषा मात्र व्याख्यानाचीच कायम ठेविली आहे.

आपल्या आक्षेपांत कांहीं तथ्य आहे हें मला नाकबूल नाहीं. विषयाचें नांव निश्चित करतांना मानवसुलभ अशा मोहाला मी बळी पडलें व स्वतःच्या 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे' हें आपणास दाखविण्यास शक्य तेवढें 'भडक' नांव दिलें असेंच ना आपण म्हणणार? होय; तो मोह यांत नसेलच असें नाहीं. पण पुण्यांत अगर मुंबईत राहून एकादी गोष्ट करावयाची व त्याला 'अखिल भारतीय' किंवा त्याहूनहि मोठें विश्वव्यापी 'जागतिक' असें स्वरूप द्यावयाचें ही आजकालची सर्वमान्य प्रथा आहे, नाहीं? 'जागतिक सुपारी' आणि 'जागतिक मसाला' ह्या जाहिराती वाचून मला फार हंसू येत असे; पण त्या दृष्टीनें पाहतां मीहि आज एका जागतिक प्रश्नाचा उपक्रम केला आहें, असें मी मानलें तर काय बिघडलें? अशा नांवामुळें आपण कांहीं तरी फार मोठें मूलगामी विवेचन करतों आहोंत असें वाटून जरा बरें वाटतें. पण जाऊं द्या. माझ्याहि चर्चेतील निम्मी जागा ओवीच्या पहिल्या दोन चरणांप्रमाणें म्हणजे पूर्वार्धाप्रमाणें भरताडभरती व्हावयाची.

जुन्या संस्कृत भाषेंतील वेदवाङ्मयाला 'श्रुति' अगर 'अपौरुषेय' हें नांव दिलें जातें. पण प्रस्तुत प्रसंगीं 'अपौरुषेय' हा शब्द त्याहून वेगळ्या अर्थानें योजण्यांत आला आहे. जें वाङ्मय पुरुषकृत नव्हे अगर पुरुषांचे उपयोगासाठीं निर्माण केलेलें नव्हे तें 'अपौरुषेय वाङ्मय' अर्थात् 'स्त्रीवाङ्मय.'

(१) तेव्हां अपौरुषेय वाङ्मय म्हणजे स्त्रियांकडून त्यांच्या जीवनक्रमांत उपयोगांत आणलें जाणारें वाङ्मय. हें मुख्यतः स्त्रियांनींच रचलेलें आहे. कांहीं ठिकाणीं त्यांत पुरुषांनीं भर घातली नसेलच असें नाहीं. उदा० झोंपाळ्यावर बहिणी ओव्या

म्हणत असतां भावानें त्यांना कांहीं ओंव्या जोडून दिल्या असतील. कांहीं ठिकाणीं आलेल्या दृष्टांतावरून संस्कृत वाङ्मयाशीं त्यांचा जो दाट संघर्ष दिसतो त्यावरूनहि एकाद्या व्युत्पन्न व पंडित भावाची त्यांत ओवाळणी पडली असल्याचा भास होतो. तरी तें वाङ्मय स्त्रियांच्या दृष्टिकोनास धरूनच रचलें गेलें आहे यांत संशय नाहीं. तेव्हां स्त्रियांच्या जीवनावर आधारलेलें, स्त्रियांचेकडून खेळ, सण, उत्सव इत्यादि प्रसंगीं उपयोगांत आणलें जाणारें, स्त्रियांच्या दृष्टिकोनांतून व प्रामुख्यानें स्त्रियांनीं रचलेलें वाङ्मय ह्मणजे 'अपौरुषेय वाङ्मय.' मराठी भाषेंत अशा तऱ्हेचें जें वाङ्मय आज आहे त्याचाच या ठिकाणीं विचार प्रस्तुत आहे.

(२) दुसऱ्याहि एका अर्थानें हा शब्द सार्थ आहे. या वाङ्मया-पैकीं प्रत्येक वाक्यसमूह, कडवें अगर ओवी कोणी गुंफली आहे हें कळणें शक्य नाहीं व म्हणून ज्या कृतीची निर्माता-व्यक्ति म्हणजे पुरुष, निश्चित नाहीं तें अपौरुषेय वाङ्मय.

(३) स्त्रीजीवनविषयक वाङ्मयांत साहजिकच वीररसावर भर दिलेला नसणार. यावरूनहि यास पुरुषार्थविरहित व म्हणून 'अपौरुषेय' असेंहि विनोदानें म्हणावें हवें तर!

(४) ज्याला अगर जिला जें सुचेल तें रचून त्याची भर यांत घालावी. गाणाऱ्या स्त्रीवर्गाला ती आवडल्यास त्याचीं आपोआप आवर्तनें होऊन तें मुखोद्गत होई व टिकलें जाई. अशा तऱ्हेनें जुन्या संस्कृत अपौरुषेय वाङ्मयाच्या पाठीशीं असलेलें ईश्वरप्रणीत-तेचें आवरण, गूढ पावित्र्याचें संरक्षण व नव्या लेखनमुद्रणादि शक्तींचें अवलंबन जरी मिळालें नाहीं, तरी आवडीनिवडीच्या नैसर्गिक चाळणींतून गळत गळत खालीं उरलेलें व म्हणून एक प्रकारें हें 'अक्षरवाङ्मय' आहे असें म्हणतां येईल.

(५) एकीला जसें स्फुरलें अगर सुचलें तसें जोडून तिनें गायिलें. दुसरीनें तें श्रवण करून श्रुतिगत केलें व आवडीनें तोंडीं खेळवत वाचागत केलें. अशा तऱ्हेनें केवळ श्रुतिसाहाय्यानें संरक्षिलेलें म्हणून वेदवाचक ' श्रुति ' या वाचकाचेंहि तें वाच्य होतें.

(६) हें वाङ्मय कागदावर लेखगत झालें नाहीं; पण वाणीवर खेळलें; त्याचप्रमाणें भूर्जपत्रें, शिला इत्यादिकांवर खोदलें गेलें नाहीं; पण स्त्रीहृदयावर कोरलें गेलें व त्यामुळें विस्मृत न होतां दंत-कथांप्रमाणें वाणीवर खेळत खेळत पिढ्यान्‌पिढ्या चालत आलें. म्हणून ' वाङ्मय '—वाचायुक्त—हा शब्द येथें यौगिक अर्थानें लागू पडतो. हें सांगितल्यावर असें ह्मणावेसें वाटतें कीं नांव मोठें असलें तरी हें लक्षण अगदींच का खोटें आहे ?

या श्रुतिपठणाची पद्धति ही वेदपठणाचे पद्धतीप्रमाणें गुरूकडून एकेक शब्द घेऊन संथा घेणें व त्याचें आवर्तन करण्याचीच आहे. जुन्या स्त्रीसमुदायांत—ज्यांना लिहितां वाचतां येत नसे अशा—याच पद्धतीनें वाङ्मयप्रसार होई. जुन्या काळची सासुरवाशीण सकाळीं आपल्या शेजारणीकडून अगर मैत्रिणीकडून गाण्याचा एकादा शब्दसमूह घेई, काम करतां करतां तोंडानें हळुहळू त्याचीं आवर्तनें करी व दुपारीं शेजारणी एकत्र जमल्या म्हणजे तें एकमेकींस म्हणून दाखवून पुढचा शब्द घेई. बायकी भाषेंत या पद्धतीस गाण्याचा ' शब्द घेणें ' व गाणीं रचण्याबद्दल ' गाणें जोडणें ' हे वाक्प्रचार रूढ असत अशी माझी स्मृति आहे.

हाच रूपकालंकार पुढें चालवून बोलावयाचें झाल्यास आपण असें म्हणूं कीं, गाणीं हे ' स्त्रियांचे वेद ', ' दळण्याचें जातें ' हें त्यांचें यज्ञकुण्ड व प्राचीन ऋषि ज्याप्रमाणें यज्ञकुण्डांमध्यें हवि-र्भाग अर्पण करून त्यांचे जोडीला परमेश्वराचे स्तुतिपर सूत्रें म्हणत

व मनोवांछिताची याचनाहि करीत, त्याचप्रमाणें या जात्याच्या यज्ञकुण्डांमध्यें ' दाण्याचा घांस ' हा हविर्भाग अर्पण करून त्याचेबरोबरच ईश्वरस्तुति व वांछित प्रार्थना ओव्याचे रूपानें करीत. परंतु या रुपकालंकाराचे मोहांत गुंतून हें साद्दश्य जास्त वाढवीत नाहीं. कारण एकादे वेळेस व्याख्यागत सामान्यत्व मान्य करूनही त्यांतील सामान्य महत्त्व आपणांस पटणार नाहीं व आपण म्हणूं लागाल, ' धिक् सामान्यमचेतनं प्रभुमिवानामृष्टतत्त्वान्तरम् । '

तेव्हां मीहि सांगून टाकतें कीं, व्याख्येमुळें एका पंक्तीला बसविलें तरी वेदांचें प्रामाण्य यांना आहे अगर मानावें असा माझा दावा नाहीं. पागोटें व चष्मा घालून नातवानें वृद्धपणाची कितीहि ऐट आणली तरी जीर्ण पागोट्यांतून व सैल झाल्यामुळें नाकावरून ढळणाऱ्या चाळिशीमागून त्याच्या तोंडाचा कोंवळेपणा झाकत नाहीं व ' कदर आजोबांची, तरी नदर नातवाची ' असेंच शेवटीं होतें. तेव्हां हिंदुसमाजाचे दृष्टीनें ' धर्माचा मूलाधार ' म्हणून आणि एकूण मानवी संस्कृतीच्या इतिहासांत जगांतील पहिलें ' ज्ञात वाङ्मय ' म्हणून पहिल्या ' अपौरुषेय वाङ्मयाचें ' म्हणजे वेदांचें जें स्थान आहे तें जरी या दुसऱ्या अपौरुषेय वाङ्मयाचें आहे असें म्हटलें नाहीं, तरी मराठी भाषेच्या प्रपंचांत या अलिखित ' अपौरुषेय वाङ्मयाचें ' एक विशिष्ट स्थान आहे; तें उपेक्षणीय नाहीं, इतकेंच नव्हे तर विचारणीय आहे; नव्हे आदरणीय आहे असेंच मला अभ्यासांतीं वाटलें व जें मला वाटलें तेंच जर सर्वांना वाटलें तर आजच्या माझ्या भाषणाचें प्रयोजन पार पडलें असें मी समजेन.

पहिली जिज्ञासा अशी निर्माण होते कीं हें वाङ्मय आहे तरी कसें ? यांत काय काय येतें ? तेव्हां या वाङ्मयाची व्याप्ति या

माझ्या भाषणांत काय मानिली जाईल ? इकडे दृष्टिक्षेप करून मग त्याच्या स्वरूपाबद्दल जास्त बोलणें बरें.

प्रकार ( अ )

अपौरुषेय वाङ्मय

- दुय्यम स्वरूपाचें
  - उखाणे
  - खेळांतील गाणीं
  - फेराचीं गाणीं
  - म्हणी
- प्रमुख स्वरूपाचें
  - कहाण्या
  - ओव्या
  - बैठकींतील गाणीं

याच वाङ्मयाचें पुन्हा गद्य व पद्य या तत्वावर वेगळ्या तऱ्हेनें पुढीलप्रमाणें वर्गीकरण होईल.

प्रकार ( आ )

अपौरुषेय वाङ्मय

- गद्य वाङ्मय
  - कहाण्या
  - म्हणी
  - उखाणे
- पद्य वाङ्मय
  - खेळांतील गाणीं
  - फेराचीं गाणीं
  - ओव्या
  - बैठकींतील गाणीं

संतोषाची गोष्ट अशी कीं, या वाङ्मयाकडे लोकांचें दिवसेंदिवस जास्त जास्त लक्ष लागूं लागलें आहे. कै. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या प्रचंड संशोधन–कार्यांत याची थोडी दखल घेतली व ' भोंडल्याचीं गाणीं ' भारत इतिहास संशोधक मंडळाच्या एका अहवालांत छापून प्रसिद्ध केलीं. स्त्रियांना धार्मिक दृष्टीनें उपयुक्त म्हणून ' कहाण्यांचे भाग ' व इतर दृष्टीनें उपयुक्त म्हणून ' सावित्रीचें गाणें ', ' स्त्रीगीत-रत्नाकर ' हीं बैठकींतील गाण्यांचीं पुस्तकें,

भोंडला, भुलाभाई इत्यादि फेरांचीं गाणीं, उखाणे व म्हणी छापून वेळोवेळीं प्रसिद्ध झाले. पण निव्वळ करमणुकीपलीकडे त्यांचें महत्त्व मानलें गेलें नव्हतें. अलिकडे पंधरा वर्षांत मात्र ‘ लोकवाङ्मय ’ या नात्यानें त्याचें वेगळेंच एक महत्त्व अभ्यासकांना वाटूं लागून अशा तऱ्हेचें जें जें वाङ्मय मिळेल तें प्रसिद्ध करण्याकडे प्रवृत्ति वळली आहे आणि सर्वांत भरदार जें ग्राम्य ओवी-वाङ्मय तें या पंधरा वर्षांत पुष्कळच प्रसिद्ध झालें आहे. साने गुरुजी यांनीं ‘ स्त्री–जीवनाचे ’ भाग प्रसिद्ध करून महाराष्ट्रांतील मुख्यतः ब्राह्मण व पुढारलेल्या समाजांतील, गायिल्या जाणाऱ्या ओव्यांचें संकलन केलें, तर कु. अनुसयाबाई भागवत यांनीं ‘ मराठा, महार, व मांग ’ अशा तऱ्हेच्या मागासलेल्या जातींतील, तसेंच मुंबईतील मजूर-वर्गाच्या स्त्रियांच्या पाठांतील व पुणें जिल्ह्यांतील लोणी, काळभोर इत्यादि खेड्यांतील स्त्रियांचे तोंडीं खेळणारीं गीतें एकत्र करून आपणांस ‘ जानपद ’ ओवीचा वानवळा दाखविला आहे. ‘ वऱ्हाडच्या लोकगीतांत ’ उच्चवर्गीय मराठमोळा स्त्रियांच्या तोंडीं असणारीं, तसेंच कास्तकार व मजूर इत्यादिकांच्या स्त्रीवर्गाचे तोंडीं खेळणारीं गीतें आलीं आहेत, तर रा. जोशी व रा. चोरघडे यांनीं अनुक्रमें चांदा व नागपूर प्रांतांतील गीतें आपल्या दोन पुस्तकांत म्हणजे ‘ लोककथा व लोकगीतें ’ आणि ‘ साहित्याचें मूळधन ’ यांत छापिलीं आहेत. बऱ्याच मासिकांत या तऱ्हेच्या वाङ्मयास हल्लीं आवर्जून स्थान मिळतें व त्यामुळें आधींच झालेल्या संग्रहांत प्रत्यहीं भर पडत आहे. वेगळ्या बोलभाषांतील ओव्या, प्रांतांतील ओव्या तशाच वेगवेगळ्या धर्मांतील स्त्रियांनीं गायिलेल्या ओव्याहि प्रसिद्ध होत आहेत. नमुनाच दाखवावयाचा तर या एप्रिल १९४५ च्या साहित्यपत्रिकेंत आलेल्या ख्रिस्ती समाजांतील स्त्रियांच्या

तोंडीं खेळणाऱ्या ओव्या 'गाणारी पहांट' या शीर्षकाखालीं आल्या आहेत व धर्मानें वेगळ्या झालेल्या या समाजांतील ओव्या पाहतां त्या हिंदु स्त्रियांच्या ओव्यांहून भिन्न वाटत नाहींत. फार तर 'दिवाळी' च्या ऐवजीं 'नाताळ' च्या सणाचा उल्लेख येईल व रामाच्या ऐवजीं ख्रिस्त येईल. धर्मानें बहुपत्निकत्वाची मनाई होऊनसुद्धां दोन बायकांच्या दादल्याचीं वर्णनें गायिलीं गेलेलीं पाहून मौज वाटते. 'दोन बायकांचा धनी, बसला पारावरी। काय पाहतो भिरीभिरी, घरीं तुझ्या मारामारी ॥' इत्यादि धर्म बदलला तरी मूळ संस्कृतीचा पाया ही ओवी चमत्कारिक वाटण्याइतका फारसा दुरावला नाहीं असें मनांत येतें. या प्रसिद्ध झालेल्या संकलनाखेरीज नगर व नाशिक जिल्ह्यांत गोळा झालेले दोन अप्रसिद्ध ओवीसंग्रहहि माझ्या पाहण्यांत आलेले आहेत.

एकंदरींत बरेंचसें संकलन झालें असून त्याचें परीक्षण करून त्याच्या स्वरूपाबद्दल चार शब्द बोलले तर अगदींच कच्च्या पायावर बोलल्याप्रमाणें होणार नाहीं.

## अपौरुषेय वाङ्मयाचा काल

पण स्वरूपवर्णनाकडे वळण्यापूर्वीं या संचित झालेल्या अपौरुषेय वाङ्मयाचा कालखंड आतां पाहिला पाहिजे. याचा काल निश्चित ठरवितां जरी आला नाहीं तरी तो ठरविण्याचा प्रयत्न करणें फार मनोरंजक आहे. या वाङ्मयापैकीं बहुतेक वाङ्मयाचीं बैठकींतील गाणीं सोडून रचना, त्यांतील प्रत्येक कडवें, ओवी, उखाणा इत्यादि सर्व वेगवेगळ्या व्यक्तींनीं केलेलीं असणें शक्य आहे. निदान त्यांपैकीं अमुक एक सर्व भाग एकाच व्यक्तीनें रचिला आहे असें मानण्यास साधन नाहीं व तसें मानण्याचें कारणही नाहीं.

**मोठे मोठे केस सोडिले न्हायाला। लिंबू गेला आणायाला ॥**

**भाईराया ॥ १ ॥ मोठे मोठे केस माझ्या मुठींत माईना । लिंबा-वांचुनी न्हाइना ॥ उषाबाई ॥ २ ॥**

या ओव्यांत प्रथम अमुक रचिली गेली व मागाहून अमुक दुसरी रचिली गेली असें सांगतां येत नाहीं किंवा एकाच व्यक्तीनें त्या रचल्या असेंही मानण्याचें कारण नाहीं. या ओव्यांचें संकलन करून छापतांना त्या विषयवार वांटणी करून मांडल्या व लिहितांना पुन्हा त्यांतील वर्णनानुरूप पुढें मागें लिहिल्या तरी रचनाक्रम तो नव्हे. तेव्हां इतर पुरुषकृत वाङ्मयाप्रमाणें याचा कथानकानुसार काल सांगतां येणें शक्य नाहीं. काल ठरविण्याचा प्रयत्न झाला तर तो प्रत्येक कडव्याचा अगर ओवीचा फार तर अंदाजें सांगतां येईल. उदा.

**काय बाई पुण्याची तारीफ । लवंगा निघाल्या बारीक ॥**
**टोपीवाल्याचा मुलुख । आगिनगाडिला कुलुप ॥**
**साहेब बसले घरांत । मडमा निघाल्या दारांत ॥**

हें खेळांतील गीत घेऊं या. पुणें शहरांत स्त्रियांनीं सोन्याच्या जाड जाड बुगड्या घालावयाचें सोडून त्यापेक्षां नाजुक अशा सोन्याच्या लवंगा कानांत घालावयास सुरवात केली. अर्थात ही एक भलती सुधारणा अगर फॅशन वाटून त्यावर तत्कालीन जुन्या स्त्रीसमाजांत टीका झाली व ती या गाण्यांत आली. इंग्रजी राज्य आलें, आगगाडी सुरू झाली, या घटना यांत असून शिवाय स्त्रिया शिकायला लागल्या, त्या आतां नोकरी करणार व पुरुष घरांत स्वयंपाक करीत बसणार इत्यादि टीका स्त्रीशिक्षणाचे सुरवातीस होत असे, तीहि यांत येते. यावरून या गाण्याचा काल इंग्रजी राज्य सुरू होऊन, आगगाड्यांना व स्त्रीशिक्षणाला सुरवात होत होती अशा सुमाराचा आहेसें दिसतें. पण याच खेळाच्या गाण्या-

बरोबर खेळांत म्हटलीं जाणारीं दुसरीं गाणीं

**सरसर गोविंद येतो ग । मजवर गुलाल फेकीतो ॥**

**त्याच गुलालाचा मार । माझी वेणी झाली लाल ॥**

**येश्वदेला जाऊन सांग । कृष्ण झिम्मा खेळतो ॥**

हीं गाणीं इंग्रजी अमदानीच्या सुरवातीनंतरचींच आहेत. तत्पूर्वकालीन नाहींत, असें मानण्यास साधन नाहीं.

हें वाङ्मय प्रवाहस्वरूपी आहे. त्यांतून जुन्या गोष्टी व गाणीं परंपरेनें चालत येत असतात. कांहीं रुचिनुसार मागें पडतात, कांहीं नवीन गोष्टी व गाणीं त्यांत मिळतात व पुन्हा त्यांत समरस होऊन एक वाटूं लागतात. वेगळेपणा शोधायचाच झाला तर त्रिवेणी संगमांतील जलप्रवाहाकडे पाहून येथें गंगेच्या पाण्याची शुभ्र छटा आहे, येथें यमुनेच्या पाण्याची काळी छटा आहे असें दिसतें. पण संगमांतून ओंजळ भरून पाणी वेगळें काढणें व हें गंगेचें म्हणून दाखविणें शक्य होणार नाहीं. तद्वतच या वाङ्मयप्रवाहाची स्थिति आहे. अगदीं ढोबळ व बिनचूक विधान करावयाचें तर असें म्हणावें लागेल कीं, मराठी भाषेच्या सुरवातीपासून तों आजच्या घटकेपर्यंत हा या वाङ्मयाचा काल होय. पण मग जगाच्या सुरवातीपासून या क्षणापर्यंत असाच याचा कालखंड कां मानूं नये असाही कोणी आक्षेप घेणें शक्य आहे. तेव्हां याहून जास्त निश्चित सांगतां आलें तर इष्ट. हें सर्व वाङ्मय दंतकथांप्रमाणें तोंडातोंडीं चालत आलेलें आहे. अर्थात् सर्वच्या सर्व व तसेंच येतें तर आज मराठी भाषेंतील सर्वांत जुन्या ओव्या व इतर वाङ्मयप्रकार जसेच्या तसेंच मिळते. अकराव्या शतकांतील अभिलषितार्थ चिंतामणि ग्रंथांत सोमदेवानें स्त्रियांनीं कांडतांना ओव्या म्हटल्याचा उल्लेख केला आहे. त्याच प्रकारें संगीत

रत्नाकरामध्येंहि ओवी हा एक गेयप्रकार असून स्त्रिया दळतांना त्या म्हणत, असें आहे. परंतु दळतांकांडतांना ओंव्या म्हणण्याची चाल तेंव्हांपासून आहे असें म्हटलें, तरी त्यां वेळची ओवी परंपरेनें चालत आलेली आज स्त्रियांच्या तोंडांत शिल्लक नाहीं. रा. रा. य. खु. देशपांडे यांनीं तत्कालीन मराठी ओवीचा नमुना म्हणून एक ओवी वऱ्हाडच्या लोकगीतांतील प्रस्तावनेंत उध्दृत केली आहे. पण ती लेखगत झाली म्हणून टिकली. नुसत्या पठणानें टिकली नसती. हें वाङ्मय अपौरुषेय असलें तरी पावित्र्याचें गूढ आवरण याचेभोवतीं नसल्यामुळें यांतील शब्द बदलतात. त्यामुळें मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे येतांना कांहीं मागें पडतें. कांहीं भर नव्या परिस्थितीप्रमाणें त्यांत पडते. आईकडून मुलीस मागील गाणीं कळतात, आजीकडून नातीस कळतात; फारतर पणजीकडून पणतीस कळतील; म्हणजे फार फार तर शंभर-सवाशें वर्षें त्याचें सातत्य टिकेल. या वर्षांत होणाऱ्या चारपांच पिढ्यांतहि परिस्थिति बदलत असते. अगदीं अजाणतां परिस्थिति कशी बदलत असते याचें एक मौजेचें उदाहरण मला घरांतच पहावयास मिळालें.

आमचा धाकटा अशोक—अजून अडीच वर्षें त्याला व्हावयाचीं आहेत—एकदां धुळाक्षराचा तक्ता पहात बैठकीवर बसला होता व खेळतां खेळतां पलिकडील चेपल्या त्यानें त्यावर आणून ठेविल्या. मी समोर बसलें होतें. मी सांगितलें, ‘ तक्त्यावर जोडे ठेवूं नकोस.’ एकदां म्हटलें, दोनदां म्हटलें; पण तो कांहीं ते उचलीना. शेवटीं मला राग आला. मी म्हटलें, ‘ ऐकत नाहींस का ? मगापासून सांगतें आहें जोडे तक्त्यावर ठेवूं नको म्हणून.’ माझ्या सांगण्याप्रमाणें करण्याचें दूरच राहिलें. मजकडे रागानें पहात त्यानेंच मला विचारलें

कीं, ' हे जोडे आहेत काय ? ' ' मग काय आहे तर ? ' मी त्याच्यापेक्षां रागानें विचारलें.' ह्या चेपल्या आहेत.' त्यानें सांगितलें. माझा राग जाऊन हंसूं आलें व मनांत आलें, जोडे व चेपल्या असा शब्दानें श्लेष करून मला आतांच अडविणारा हा कोटीभास्कर होणार कीं काय ? मग पण विचारानें लक्षांत आलें कीं चेपल्या आहेत आणि त्याला आक्का जोडे म्हणते, तेव्हां तिला शब्दानें आडवावें हा इतका शब्दश्लेषाचा उपयोग त्याला कळत नव्हता. खरोखर त्याला ' जोडा ' हा शब्दच कळला नाहीं. कारण त्याच्या अडीच वर्षांच्या आयुष्यांत त्यानें जोडा पाहिलेलाच नाहीं. त्याला बूट, वहाणा, चेपल्या माहीत. मी लहानपणीं जोडाच वापरलेला; तेव्हां आज जरी मी जोडा न वापरतां वहाण, चेपली वापरतें तरी पादत्राण ह्या अर्थी जोडा शब्द माझे तोंडांतून येतो. इतर ठिकाणीं तो कळून कामही भागतें. पण या मुलाच्या आयुष्यक्रमांत त्यानें जोडा पाहिला नाहीं. म्हणून त्याच्या शब्दकोशांतून तो शब्द गळला व पुढेंही येईलसें वाटत नाहीं. माझ्या शब्दकोशांत जुने वाक्प्रचार कायम आहेत. मी जोड्याऐवजीं वहाणा घालतें व वेणी-ऐवजीं अंबाडा बांधतें, तरी ' जोडा घालणें ', ' वेणी घालणें ' हे वाक्प्रचार माझे तोंडांत आहेत. एकाच घरांत भोंवतालीं एकाच परिस्थितींत आम्हीं दोघे—माझा नातू अशोक व मी—राहातों. मी त्याला शिकवितें. तरी माझ्या व त्याच्या जाणिवेचें क्षेत्र काल-भेदामुळें असें भिन्न होतें. त्याचा व माझा शब्दकोश यांत फरक पडलेला आहे व तो वाढणार. उपयोग संपला तरी पूर्वीच्या संव-यीनें तो वाक्प्रचार माझे तोंडीं कायम राहतो. त्याच्या तोंडाला ती संवय लागत नाहीं व त्यामुळें ' जोडा ' हा शब्द त्याचे शब्द-कोशांतून गळतो. हीच स्थिति इतर वाङ्मयाबद्दल. आजीकडून

आईला मागच्या ओव्या व गाणीं मिळालीं तरी आईकडून नातीला त्यांतलीं कांहीं येतील, कांहीं अजाणतां गळून जातील. वेदाप्रमाणें देवकृतकत्वाचें संरक्षण यास असतें, तर सर्व वाङ्मय तसेंच्या तसें टिकतें. तें येथें नाहीं व म्हणून तेंच तें स्वरूप न रहातां या वाङ्मयाचें प्रवाह—स्वरूप रहातें.

भाषेच्या दृष्टीनेंही असाच फरक होत असतो. उदाहरणार्थ, भोंडल्याच्या पुढील गाण्यांत पहा.

**सून म्हणते, ' सासुबाई, सासुबाई मला आलं मूळ । '**
**सासू म्हणते, ' मला काय पुसतेस, बरीच दिसतेस,**
**पुस जा आपुल्या कंथाला ॥**

या ठिकाणीं ' कंथ ' हा शब्द ' नवरा ' या अर्थी आहे. तीसपस्तीस वर्षांपूर्वीं मुलींच्या तोंडून गाण्यांत हा शब्द ऐकूं येई. अलिकडे त्या ठिकाणीं ' पुस जा आपल्या नवऱ्याला ' असें मुली म्हणतांना ऐकूं येतें. ' कंथ ' शब्द मागें पडला, अपरिचित वाटूं लागला व त्या जागीं प्रचालित शब्द नकळत आला. कारण तेथें शब्द बदलल्यानें गाण्याच्या चालींत फारसा बदल होत नाहीं. या गाण्यांत ' मूळ ' म्हणजे बोलावणें, हा शब्द असाच जुना म्हणजे आज प्रचारांतून गेलेला आहे. पण त्या ठिकाणीं ' सासुबाई, सासुबाई मला आलं ' आमंत्रण ' किंवा ' बोलावणं ' असें म्हणावयास ते शब्द तितके सहज गाण्यांत बसत नाहींत व म्हणून ' मूळ ' शब्द तसाच राहिला.

याप्रमाणें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं परंपराप्राप्त चालत आलेल्या गाण्यांत सुद्धां भाषेच्या दृष्टीनें थोडा फरक होतच असतो आणि हें सर्व लक्षांत घेऊन असें म्हणावेंसें वाटतें कीं, हें सर्व अपौरुषेय वाङ्मय फार फार तर तीनचार पिढ्यांतील किंवा

शंभरसवाशें वर्षांतील असावें. वऱ्हाडी लोकगीताच्या प्रस्तावनेंत नमुना म्हणून दिलेलें जुनें स्त्रीगीत लेखगत न होतां नुसतें टिकतें तर एक त्याचें स्वरूप बदलत आजच्या भाषेशीं सदृश झालें असतें किंवा पठणांतून मागें पडल्यामुळें अजिबात विसरलें गेलें असतें; तेव्हां हें सर्व आज अपौरुषेय म्हणून गोळा होत असलेलें वाङ्मय एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपूर्वीचें नसावें व याच कालखंडाचें दुसरें म्हणजे अलिकडील टोंक वा मर्यादा अशीच म्हणजे चालू क्षणापर्यंत ठरवावी लागते. एकदां लेखबद्ध झालें म्हणजे याचें अस्थिर स्वरूप संपून तें निर्जीव—असंस्कारक्षम झालें असें म्हटलें पाहिजे. हल्लीं लेखनाची, छापण्याची सोय यामुळें नवीन कोणतेंही वाङ्मय--गाणीं, ओव्या वगैरे तयार झाल्या कीं त्या छापल्या जाऊं शकतात. या दृष्टीनें सुशिक्षित समाजांत याची नवी उत्पत्ति होणें कठीणच.

या वाङ्मयाकडे विहंगम दृष्टीनें पाहूं लागल्यास असें दिसतें कीं पद्याच्या प्रारंभावस्थेपासून परिणतावस्थेपर्यंत सर्व अवस्था येथें साकल्यानें गोळा झाल्या आहेत. पद्यनिर्मितीचा इतिहासच झरझर डोळ्याखालून जातो म्हणाना !

माणसानें शब्दांची भाषा आपल्या व्यवहारासाठीं निर्माण केली व पद्यगत नाद वा स्वर करमणुकीसाठीं आला या दृष्टीनें गद्य हें पद्यापेक्षां वडिल ठरतें. पण वाचागत होऊन स्मृतिगत झालेल्या सारस्वतांत वा वाङ्मयांत प्रथम पद्य व मागाहून गद्य असाच क्रम लागावयाचा. मनुष्यप्राण्यांत स्वाभाविक असलेल्या नादप्रियतेमुळें त्याला नादयुक्त अक्षररचना सुचूं लागली व वारंवार आळवावी असें वाटूं लागलें. लयबद्धता त्यांत अजाणता सामावली होती; कारण लयबद्धतेमुळें आंदोलन निर्माण होतें व या आंदोलनामुळेंच

वाणीला नादवती स्थिती येते. विशिष्ट तऱ्हेनें म्हटल्यास वाक्य जास्त गोड लागून, स्मरणांतहि टिकतें* असा अनुभव आला व म्हणून पुन्हा त्याच तऱ्हेनें रचना होऊं लागली. सुरवातीला नादावर सर्व लक्ष केंद्रित झालें असणार पण पुढें अर्थ असेल तर जास्त बरें असें वाटूं लागलें व पुढें पुढें अर्थाला महत्त्व प्राप्त होऊन कांहीं अर्थ असेल तरच तुमच्या नादवती वाणीचें कौतुक असें जणुं मनुष्य मनुष्याला म्हणूं लागला. हा मध्यंतरींचा काळ म्हणजे अर्थासाठीं गाणें कीं गाण्यासाठीं अर्थ अशी चढाओढ होती व शेवटीं अर्थासाठीं गाणें असा मनुष्याच्या मनानेंच निर्णय घेतला.

वाल्मिकी ऋषींचें सामर्थ्य विशेष; त्यामुळें दुःखानें अंतःकरण पिळवटल्याबरोबर तोंडून येणारे शब्द एकदमच नादयुक्त व अर्थप्रचुर निघाले व त्यांच्या शोकाचा श्लोक होऊन तो संस्कृत वाङ्मयांतील कवितेचा श्रीगणेशा ठरला. पण सामान्य मानवांचे बाबतींत 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति' असें होत नाहीं. उलट 'लौकिकानां हि साधूनां अर्थं वागनुवर्तते' असें असल्यानें नादयुक्त अक्षरसमूहांत अर्थ भरेपर्यंत त्यांना आपली उमेदवारी चालूं ठेवावी लागते व यामुळेंच साष्टांग नमस्कारांतील भद्रायु

* याचें एक गमतादार उदाहरण म्हणजे पूर्वी वर्तमानपत्रांतून एक जाहिरात येत असे. एका औषधाच्या जाहिरातींत एक औषध घेण्यापूर्वींची स्थिति व औषध घेतल्यानंतरची स्थिती अशीं दोन चित्रें असून वर लिहिलेलें असे, 'मी जसा होतों, तसा मला पहा, नि आतां मला पहा!' हें वाक्य वाचून इंग्लिश वाक्याचें कसलें हें भाषांतर असें मनांत येऊन हसूं आलें; तरी त्यांतील अंतर्गत आंदोलनामुळें तें वारंवार म्हणावेसें वाटे व अजूनहि आठवण झाली म्हणजे आवर्तन करण्यांत मौज वाटते.

झाडघरप्रमाणें ' डडडड ' ' डडडड ' अशा अर्थशून्य ओळी बडब-डाव्या लागतात.

या अर्थशून्य ओळी वाङ्मयांत कोणी टिकवून ठेवीत नाहीं. प्रत्येकाला—ज्यानें थोडीफार कविता रचिली आहे त्यास—हें पटावयास हरकत नाहीं कीं प्रत्येक वेळीं अर्थ व नाद जमून येतातच असें नाहीं. प्रथम एखादी चाल मनांत घोळते किंवा त्या चालीबरहुकूम कांहीं शब्दसमूह एकदम जुळून येतो व मागाहून त्या चालीनुसार सर्व रचना होते. स्वानुभवाच उदाहरण सांगावयाचें म्हटल्यास सहज बोलतांना, मुलाला जेवावयास हांक मारतांना, ' चल चल चल आतां श्रीधरा जेवण्याला। उशिर बहुत झाला भात वाटे निवाला ॥ ' अशा ओळा आपोआप जमल्या व मग पहिल्या दोन ओळी जमल्या म्हणून पुढच्या दोन पुऱ्या केल्या. कांहीं वेळेला शेवटचा चरण वा ओळ प्रथम जमते. एका प्रसंगीं लिहिलेल्या मंगलाष्टकांतील ' आहे मंगल आज काय विबुधीं हें माडिलें गोरजीं । ' हा चवथा चरण प्रथम सुचला व मग त्याला पोषक असे पहिले तीन चरण लिहिल्याचें मला आठवतें. बाल्यावस्थेंतील मानवी समाजाच्या मनाची वाढ व लहान मुलांच्या मनाची वाढ एकाच दिशेनें होत असते तेव्हां लहान मुलांचे बाबतींत हीच स्थिति म्हणजे प्रथम नादयुक्त अक्षरसमूहाचें आवर्तन व मागाहून अर्थाच्या गोडीचें आकलन अशी दिसून येते.

या बाबतींत मला दोनतीन मौजेचीं उदाहरणें पहावयास मिळालीं. ( अ ) आमचा पांच वर्षांचा अभिजित् कांहीं तरी ' ललला ललललला ' असें म्हणत स्वतःशींच गुंगलेला असतो व काय म्हणतोस विचारतां म्हणतो, ' पण अर्थ तूं सांग कीं ! ' गातां गातां मध्येंच येऊन विचारतो, ' आक्का, मी आतां म्हटलं याचा अर्थ

काय ?' अर्थाशिवाय गाणें जमत नाहीं अशी शंकाच त्याला येत नाहीं. गाणें तो म्हणतो व अर्थ मी समजायचा असतो.

( आ ) कन्याशाळेंतलि इंग्रजी पहिली-दुसरींतली एक विद्यार्थिनी एकदां मजकडे एक कागद घेऊन आली व म्हणाली, 'बाई, माझी कविता पाहतां ?' मी वाचूं लागलें तों त्यांतून कांहींच अर्थ सुसंगत निघत नव्हता. मी म्हटलें, 'एकाखालीं एक ओळी आहेत हें खरं; पण याचा अर्थ होत नाहीं. कवितेंत तुला काय म्हणावयाचें आहे ?' ती म्हणाली 'बाई, आधीं तुम्हीं कविता म्हणतां येते का नाहीं तें पाहा. त्याचा अर्थ काय होतो तें मी मागाहून ठरविणार आहें.'

( इ ) याहूनहि गमतीचें उदाहरण सातार्‍यास आमचेच घरीं मी पाहिलें. घरीं एक कोणतेंसें कवितेचें पुस्तक आलें.त्यांत सुरवातीस कांहीं प्रास्ताविक श्लोक होते व त्यांचा शेवट होता :

**अर्पी पदीं हा नवपुष्पहार । गोपाळ गंगाधर पोतदार ॥**

घरांतल्या मुलांनीं ते प्रास्ताविक श्लोक वाचले. पण त्यांना सर्व श्लोकांत शेवटच्या ओळीचीच मौज वाटली. 'सबंध नांव कसें कवितेंत घातलें आहे ?' असें म्हणत म्हणत त्या सर्वांनीं मिळून एक सामुदायिक कविता रचिली ती अशी:

**नरसिंह चिंतामण केळकर**
**वाग्भट नारायण देशपांडे**
**खरी आर्यकन्या, खरी आर्यकन्या**
**मनी आणि मोत्या, मनी आणि मोत्या**

हा श्लोक त्यांना इतका पसंत पडला कीं दोन दिवस त्याचेंच पठण चालू होतें व 'पहा, आम्ही सुद्धां सबंध नावें घालून कविता केली' असें त्यांचें कौतुक चाललें होतें. पुढें दोन दिवसांनीं

दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष वेधलें व ही कविता मागें पडली. या श्लोकांत अर्थाची सुसंगतता नाहीं, इतकेंच नव्हे, प्रत्येक चरणालाही कांहीं अर्थ नाहीं. याकडे त्यांचें लक्षच नव्हतें. आपणांस चालीवर कविता म्हणतां आली, म्हणजे कांहीं लयबद्ध नादयुक्त रचना करतां आली येवढाच आनंद त्यांना पुरेसा होता. मी विचार केला कीं कांहीं तरी शब्द घालावयाचे! मग हेच शब्द त्यांना कां सुचले? सबंध नांवासाठीं कविता, तेव्हां पाहिलीं दोन घरांतलींच नांवें त्यांना सुचलीं. पण 'खरी आर्यकन्या' व 'मनी आणि मोत्या' हें काय? मग उलगडा झाला कीं आनंद मासिकाच्या तत्कालीन अंकावर आनंद ग्रंथमालेच्या जाहिराती असत व त्यामध्यें 'मनी आणि मोत्या' व 'खरी आर्यकन्या' हीं पुस्तकांचीं नांवें देत. सारखीं डोळयांखालून गेल्यामुळें तींच सुचलीं व चरणांत बरोबर बसलींही! चरणांत सुसूत्र अर्थ असला तरी त्यांत कांहीं औचित्य व सरसत्व असावें लागतें, नाहींतर ती कविता न होतां कवितेची थट्टा होते. उदा.

पुणें गांव आहे नदीकांठ आहे ।
मढीं जाळिताती तिथें पाल वाहे । यांत औचित्य नाहीं व
मेंढीवरी लोंकर दाट भारी
थंडीस त्याच्या बहुधा निवारी । यांत सरसत्व नाहीं.

मुलांनीं कविता केली पण त्यांना चार ओळींत सुसूत्र अर्थ असावा लागतो, याचीही जाणीव नव्हती; तर मग त्यांत कांहीं औचित्य व सरसत्व आहे कीं नाहीं याची त्यांना शंका तरी कुठून येणार?

अपरिणत मनाला अर्थाशिवाय नुसत्या चालीनें समाधान वाटतें; पण जों जों परिणतावस्था येत जाते तों तों नुसती चाल, नुसती लय-बद्ध (आंदोलनयुक्त) शब्दरचना मनाला आनंद देऊं शकत नाहीं,

व अर्थ हाच गाण्याचा आत्मा याची जाणीव होते.

याप्रमाणें पाहतां पद्यनिर्मितीच्या तीन अवस्था ठरतील.

प्रथमावस्था — लयबद्ध शब्दरचना

द्वितीयावस्था — लयबद्ध शब्दरचनेला अर्थाची जोड.

तृतीयावस्था — अर्थप्रधान लयबद्ध शब्दरचना.

अपौरुषेय वाङ्मय पहात असतां या तीनहि अवस्था झरझर डोळ्यांसमोरून जातात हें मागें म्हटलेंच आहे.

* * *

सुरवातीला दुय्यम स्वरूपी व प्रमुख स्वरूपी असे दोन भाग वाङ्मयाचे वर्गीकरणांत दाखविले आहेत. त्यांपैकीं दुय्यम स्वरूपी वाङ्मयांत पहिल्या दोन अवस्था पहावयास सांपडतात व तिसरी म्हणजे पद्यास काव्यपदवीप्रत नेणारी अवस्था प्रमुख वाङ्मयांत पहावयास सांपडते.

उखाणे, खेळांचीं गाणीं यांत कांहीं ठिकाणीं अर्थहीन पण लयबद्ध शब्दरचना सांपडते. उदा. ' धिन्क धिन्क धिन्नाडे । गवर नाचे आम्हांपुढें । ' या गोफाच्या पद्यांतील ' धिन्क धिन्क धिन्नाडे ' ही ओळ, दुसऱ्या एका गोफाच्या प्रकारांतील ' शालु की शाल की । तुझी माझी पालखी । पगडा फू बाई पगडा फू । ' यांतील ' शालु की शाल की, पगडा फू बाई पगडा फू ' ह्या ओळी, त्याचप्रमाणें ' आगोटा पागोटा ' ' आडवळ घुम्, पडवळ घुम् ' ' किकींचं पान बाई की की ' 'सांगड मासा सूं सूं' या सर्व ओळी अर्थहीन परंतु लयबद्धतेमुळें गाण्यांत आलेल्या वाटतात. खेळाच्या सर्व गाण्यांत बहुधा एकादी पहिली अगर शेवटची ओळ अशी येते.

दुसऱ्या अवस्थेंत लयबद्ध शब्दरचनेला अर्थाची जोड मिळते.

निदान एकेका ओळीपुरता तरी सुसंगत अर्थ त्यांत असतो व ह्या ओळीही पहिल्या अवस्थेंतील अर्थहीन ओळींप्रमाणेंच खेळांतील ज्या शारीरिक हालचालींबरोबर त्या म्हटल्या जातात त्या हालचालींना लागणाऱ्या वेळायेवढ्या वेळांत पुऱ्या होणाऱ्या असतात. थोडक्यांत त्या पार्श्वसंगीताचें काम करतात. उदा.

आगोटा पागोटा । घाली झिंगोटा ।
सीता बोलते ।
पान हालतें ।
मथुरेच्या बागेंत ।
जाईन म्हणते ।
लाल साडी ।
आणीन म्हणते ।
आगोटा पागोटा । घाली झिंगोटा ।

किंवा
भाले भा । खजुरी खा ।
दंडावरची चोळी ।
माझ्या गुजरिला । गुजरिला इ०

किंवा
गरे घ्या गरे । पोटाला बरे ।
न खाईल त्याची । म्हातारी मरे ॥

हीं सर्व गाणीं खेळांत होणाऱ्या शारीरिक हालचालींना साथ करणारीं असलीं तरी त्यांतील अर्थाचा कृतीशीं संबंध असतोच असें नाहीं. पिंगा खेळतांना गायिलें जाणारें पुढील गाणें

अशी लवे, तशी लवे,
कर्दळीचा खांब लवे
तसं माझं अंग लवे
गोडंबे सई गोडंबे

यांपैकीं पहिल्या तीन ओळी शारीरिक हालचालींचें वर्णन

करतात व चवथी ओळ सूर धरल्याप्रमाणें पूरक होते. पण येवढी कृती वर्णन करणारीं गाणीं विरळा आणि पुढील गाण्याप्रमाणें भावनादर्शक गाणें क्वचितच सांपडतें.

सीता— माझ्या रे लक्ष्मणा दीरा ।
मला बा नेतोसि कुठें ।
लक्ष्मण— तुझ्या ग माहेरच्या वाटे ।
सीता— ही नव्हे माहेरची वाट ।
पोफळी वन बहु दाट ।
नारळी वन बहु दाट ।
आला बा दाक्षिणी वारा ।
आला बा उत्तरी वारा ।
रथ तो चाले झराझरा ।
सीता ती रडे खळाखळा ॥

बहुतेक गाणीं अर्थासाठीं रचिलेलीं दिसत नाहींत किंवा रचिलीं असल्यास त्यांतही औचित्यभंग होतो कीं काय हा विचार नसतो. उदा. गौरीपुढें आसनमांडी घालून बैठा पिंगा घालावयाचा त्या-वेळचें गाणें:—

ये गौरी ये ।
माझ्या अंगीं ये ।
येशिल तर ये ।
लौकर ये ।
( चाल ) दादा रे मला ।
चमेली दे । चमेली दे ।
( चाल ) वहिनी ग मला ।
बकुळी दे । बकुळी दे ।

यांतील अर्थाकडे पाहूं लागलें तर ‘ ये गौरी ये ’ म्हणून केलेल्या देवीच्या आळवणीवर, पुढील

येशील तर ये। लवकर ये।

या शब्दांनीं पाणी पडून औचित्यभंग होतो व भक्तिरसाचा परिपोष न होतां हास्यरसाची निर्मिती * होते. पण खेळांतील गाण्यांत याला फारसें महत्त्व नाहीं, कारण हीं केवळ पार्श्वसंगीतें व तींही नादापुरतींच आहेत. अर्थाचा विचार तेथें अभिप्रेत नाहिं.

परंतु खेळाचीं गाणीं संपवून आपण झोपाळ्यावरील गाणीं व भोंडला; हादगा, भुलाबाई इत्यादि फेर धरून म्हणणाऱ्या गाण्याकडे वळलों तर अर्थाला महत्व येऊ लागलेलें दिसतें. या प्रकारांत शारीरिक हालचाल मंदावते व त्यामुळें संथपणा येऊन गाण्यांतील अर्थाकडे लक्ष देण्यास जास्त वेळ मिळतो.

रुणझुण पांखरा। जा माझ्या माहेरा।
कमानी दरवाजा। त्यावर बसा जा।
सांग माझ्या आईला। न्या मला माहेरा।

हें झोपाळ्याच्या कड्या धरून म्हटलेलें गाणें नुसत्या करमणुकीपेक्षां नव्या सासुरवाशिणीच्या मनाची आर्तताच व्यक्त करते व ' माझ्या रे लक्ष्मणा दीरा ' या गाण्याप्रमाणें भावनापूर्ण गाण्यांत मोजावें लागतें.

पण पुढचें गाणें केवळ करमणुकीकरितां आहे. मुली झोपाळ्याच्या चार कड्यांना धरून उभ्या राहतात. दोन मुलांकडच्या व

---

* टीप—यावरून पूर्वी ऐकलेल्या एका पद्याची आठवण होते. नायक आपल्या प्रियेचें कुशल वर्तमान तिच्या मैत्रिणीला विचारीत आहे असा प्रसंगः ' **सारिके गे ! चंद्रिकेचें कुशल आहे ना ! असलें तर होय म्हण, नसलें तर नाय म्हण. झडकरि सांग ना ॥ १ ॥** ' यांतील ' असलें तर होय म्हण ! नसलें तर नाय म्हण ! ' या शब्दांनीं कुशलपृच्छेतील आर्तता नाहींशी होऊन श्रोत्याच्या मनांत कारुण्याऐवजीं हास्यनिर्मिति होते.

दोन मुलीकडच्या होऊन मुलगी मागणी घालण्यापासून लग्न ठरून दागिने घडविण्यापर्यंतचा जणुं खेळ खेळतात.

वरपक्ष म्हणतो– **पावशेर कोंडा घ्याहो विहिणी।**
**बरव्या लेकी द्याहो विहिणी।**
वधूपक्ष म्हणतो– **पावशेर कोंडा घेत नाहीं।**
**बरव्या लेकी देत नाहीं।**

वरपक्ष शेर, पायली, चार पायली इत्यादि आपल्याला माहीत असलेल्या मापापर्यंत वधूदक्षिणा वाढवितो व शेवटीं वधूपक्षाला तें पटून त्या मुली सांगतात,

**मणभर कोंडा घेतों।**
**बरव्या लेकी देतों।**

हा वधूनिश्चय झाला कीं लागलीच दागिने घडविण्यास सुरवात होते.

वरपक्ष– **हिरवी लवंग भाजकी लवंग।**
**जैनापुरी कीं,**
**आमचा सोनार कारागिरी कीं,**
**तुमच्या मुलीला काय पाहिजे। काय पाहिजे।**
वधूपक्ष– **आमच्या मुलीला तोडे पाहिजेत। तोडे पाहिजेत।**
वरपक्ष– **तोडेबिडे भार करूं। कंगणी तार करूं।**
**तुमच्या मुलीला काय पाहिजे। काय पाहिजे॥**

अशा तऱ्हेनें जितकीं दागिन्यांचीं नांवें माहीत असतील तितकी दागिन्यांची मागणी व त्यांचा पुरवठा होत असतो. खेळणाऱ्या मुलींच्या वयोमानानुरूप त्यांना ‘ वधूदक्षिणा ’ व ‘ दागिने ’ येवढेच विषय लग्नांत महत्त्वाचे वाटतात, हें सरळच आहे.

यापुढची पायरी म्हणजे हादगा, भुलाबाई इत्यादि फेर धरून म्हणण्याचीं गाणीं. या गाण्यांतून अर्थाला प्राधान्य येऊं लागतें.

अर्थ पाहिजेच असें बंधन मात्र नाहीं. पण अर्थ असला तर बिघडत नाहीं, चालतो, इतकेंच.

आथूला मथूला, बाई चरणीं घातीला ।
चरणीच्या सोंडें, हातपाय खणखणीत गोंडे ॥ इ०
( चाल ) एक एक गोंडा विसाचा ।
साडे नांगर नेसायचा ।
नेसा ग नेसा बाहुल्यांनो ।
वर्सन वरिस पावल्यानो ॥

अशीं सुसंगत अर्थ सांपडण्यास कठीण अशीं गाणीं यांत आहेत. तशींच ' वईवरचं कारलं ' ' झिपरं कुतरं सोडा ग बाई ' अशीं एकादें लहानसें कथानक पूर्ण सांगणारीं गाणीं हीं यांत येतात.

त्याचप्रमाणें ज्याला आज सृष्टिवर्णनपर गाणें म्हणतां येईल असेंही कांहीं वर्णन क्वचित सांपडतें. उदाहरणार्थ :

गुंज घ्या बाई गुंजवळा ।
दारीं सूर्य उगवला ।
उगव उगव बाप्पा, सूर्यकांता !
गाईचीं बिरडं सुटलीं ।
गाई निघाल्या वनीं रिघाल्या ।
आम्हीं खेळूं धाकुल्या ॥ इ०

उखाणे:—पद्यनिर्मितीची ही दुसरी अवस्था खेळांतील उखाण्यांतही सांपडते. खेळतांना पार्श्वसंगीतासारखा उपयोग; रचनेनें गद्य पण यमकाचें महत्त्व अनिवार्य. त्यामुळें म्हणीप्रमाणेंच गद्यपद्यांतील असले तरी पद्याला जास्त जवळचे वाटतात.

( १ ) आपुटपु आले, घाटावरनं गेले ।
काचेचे पेले माझे फुटून गेले ॥

( २ ) फुगडी खेळूं दण्णादण्णा, रुपये मोजूं खण्णाखण्णा ।
बाभळीची साल, माझा कंबरपट्टा लाल ॥

हे उखाणे अर्थापेक्षां यमक व पावलांच्या टपटप आवाजाशीं साथ करणारे 'दण्णादण्णा, खण्णाखण्णा' शब्द यामुळें पार्श्वसंगीतेंच होत.

परंतु उखाण्याचा उपयोग अर्थ सांगण्यासाठींही फार चांगला होतो. खेळाच्या सार्थीतून याचा जन्म झाल्यामुळें अर्थपूर्णतेचें बंधन यावर नाहीं. निम्म्या ओळींत अर्थ नसला व पहिल्या ओळीचा दुसरीच्या अर्थाशीं संबंध नसला तरी हरकत नसते. पण असें असूनहि रागलोभ आदि मनाच्या भावना ठसकेदारपणें यांतून व्यक्त करतां येतात. याखेरीज दुसऱ्यावर टीका करणें, टोंचून बोलणें, उणेंपुरें काढणें, उखाळ्यापाखाळ्या काढणें या गोष्टी उखाण्यांच्या मदतीनें फार सुलभतेनें व परिणामकारकपणें होतात. लहान जीव व भलताच तिखटपणा यामुळें ' लवंगी मिरची ' म्हणून या विभागाचें वर्णन करण्यास हरकत नाहीं.

( १ ) चहा बाई चहा, रानोमाळीं चहा ।
मैत्रिणी-मैत्रिणींची फुगडी पहा ॥ दुसऱ्या ओळींतच अर्थ.

( २ ) आमच्या चुलीवर उपकरणीं ।
ठकूचा नवरा कुलकर्णी ॥ ठकूच्या नवऱ्यावर टीका.

( ३ ) पाठीवर शेपटा लडबडतो ॥
म्हातारा नवरा बडबडतो ॥

पाठीवर लोळणाऱ्या शेपट्यावर टीका. आज पाठीवर शेपटा हीच रूढ केशरचना झाल्यानें हा उखाणा निरुपयोगी होईल हें वेगळें.

( ४ ) साळ्यांच्या मुली तुम्ही, अशा ग कशा ।
हातांत बुकं मास्तरणी जशा ॥

मुलींच्या शाळेंत जाऊन शिकण्यावर टीका. 'मास्तरीण' ही जवळजवळ शिवीच होती. अविवाहित मुलीची कोणी नांव घे म्हणून चेष्टा केल्यास,

समोरच्या कोनाड्यांत ठेवलं तिखट ।
आईबापांनीं लग्न केलं नाहीं ।
तर नांव कुणाचं घेऊं फुकट ॥

हा उखाणा घेऊन ती ठसकेदारपणें उत्तर देऊं शकते. नव-विवाहित वधू वरातीनंतर गृहप्रवेशाच्या वेळीं पुढील उखाणा घेईल:

चंदनाच्या मांडवावर जाईची वेली ।
इतके दिवस आईबापांनीं जतन केली ।
पण यशवंतरावांनीं एका घटकेंत नेली ॥

आणि विवाहामुळें होणाऱ्या माहेराच्या व आईबापांच्या ताटा-तुटीचें सहृदयतेनें वर्णन करील.

युवती आपल्या प्रियपतीच्या अद्वितीयत्वाचें वर्णन पुढीलप्रमाणें करील.

बहु शोधिली वसुंधरा, अशा पुरुषाची वाण ।
सासुबाईच्या पोटीं, नारायणराव नवरत्नांची खाण ॥
(किंवा) अत्तर अत्तर धा, त्याचं कत्तर कत्तर पान ।
शोधलं हिंदुस्थान, त्यांत नारायणराव मिळाले छान ॥

पण अनुरागवती प्रौढा शाब्दिक वर्णन करण्याच्या भानगडींत न पडतां नुसतेंच म्हणेल-

काळी गळसरी गळाभर ।
नारायणरावांना पाहीन डोळाभर ॥

उपरोध, मानापमानाचे झटके, टोंचून बोलणें, यांचा आविष्कार विहिणी व करवल्या यांनीं परस्पर घातलेल्या उखाण्यांत होतो व त्यामुळें पूर्वींच्या लग्नकार्यांत हे उखाणे पुष्कळदां मोठे कलह लाव-

णारे होत व घरांत एकादें कार्य ठरल्याबरोबर उत्साही करवल्यांना 'उखाणे घालूं नका' अशी समज देणें वडील माणसांना पूर्वी भाग पडे. कारण विहिणी-विहिणींची पंगत बसली असतां त्यांचा दिल खूष करण्यासाठीं एखादी पोक्त बाई उखाणा म्हणे,

**समोरच्या कोनाड्यांत ठेवला तवा**
**गोडबोल्यांच्या विहिणींनो, सावकाश जेवा ॥**

तोंच एकादी बोलघेवडी करवली पुढें येऊन मुलाकडच्या जेवणावळींत कांहीं कमी पडलं असेल तेवढेंच उखाणा घालून सांगे कीं,

**वांगीभात खाल्ला तुपाशीं,**
**गोडबोल्यांच्या घरीं लेल्यांचे गडी राहिले उपाशी ॥**

व मग मोठ्या माणसांना क्षमा मागतांना पुरेवाट होई. ही उखाण्यांत बोलावयाची संवय स्त्रियांना फार मानवते असें दिसतें. कारण साध्या गोष्टी बोलतां बोलतांही भरभर तोडून त्याला उखाण्याचें स्वरूप येतें.

नवी सासुरवाशीण सासरीं आली तेव्हां आईनें उपदेश केला होता कीं, सासरीं सर्वांना अहो जाहो म्हणावें. मुलगी जरा जास्तच आज्ञाधारक होती. सकाळीं सडा घालतांना अंगणांत कुत्रें आलें तेव्हां बिचारी म्हणूं लागली,

**अहो अहो हडा, येऊं नका पुढां, मी घालतें सडा,**
**उडेल शिंतोडा, आणि सासुबाई बोलतील फडाफडा ॥**

मुलगी मोठी होऊं लागली म्हणजे तिला स्थळ कसें शोधावयाचें याचें मनोराज्य आई करीत असते. आपली मुलगी चांगली याबद्दल तिला शंकाच नसते व डोक्यावर दुधाच्या घागरी घेऊन मनोराज्य करीत चालणाऱ्या गवळणीप्रमाणें मुलीला मागणी आली अशी कल्पना करून झटक्यांत नकारहि देऊन मोकळी

झाल्याचें वर्णन पुढील उखाण्यांत येतें.

**मुंबईसारखं शहर, पुण्यासारखं घर,**
**नवरा प्रथम वर, सासरा बालिष्टर,**
**डागिने परातभर, येवढी बोली करा,**
**नाहींतर आपला रस्ता धरा.**

नवरा बालिष्टर असून प्रथमवरहि असेल तर कदाचित् परातभर दागिने मिळणें जड पडेल, म्हणून 'प्रथमवर नवरा' व 'बालिष्टर सासरा' अशी व्यावहारिक तडजोड सुचली असावी.

दुसरा असाच उखाणा मी सातारप्रांतीं ऐकला. आई सांगते, मुलीला घर कसं पाह्यचं, तर —

**भात भाजी दह्याची कढी**
**बाई ब्राह्मण शिवाय गडी**
**नळाचं पाणी पत्र्याचं घर**
**जावयाला देणगी ? नारळाचं फळ !**

गांवोगांवीं नळ नव्हते. रहाटानें पाणी काढतां काढतां सासुरवाशिणीची कंबर मोडे; तो जुना काळ; शिवाय सातारला पाऊस फार. तेव्हां पत्र्याचं घर असल्यास कौलारू घराप्रमाणें गळण्याची भीति नाहीं. या दृष्टीनें त्या काळची ही इच्छा योग्य होती. पण धान्यनियंत्रण, दूधदुभत्याचा दुकाळ व नोकरमाणसांची टंचाई असणाऱ्या हल्लींच्या दिवसांतहि 'भात भाजी, दह्याची कढी' जेवावयास घालून वर 'बाई, ब्राम्हण, शिवाय गडी' पुरविणारें स्थळ केव्हांहि विलोभनीयच वाटेल. आईची अपेक्षा ऐकून शेजारणीनें साहजिकच विचारलें, "स्थळ चांगलें खरें ! पण जावयाला देणगी ? " आई म्हणते, "नारळाचें फळ !" मुलगी व नारळ हवालीं करीन. माझ्या मुलीसारखी चांगली मुलगी असल्यावर हुंडा बिंडा काय करायचा हा भावार्थ ! महत्वाकांक्षी पण चिक्कू मुलीच्या

आईचं हें छान वर्णन आहे.

कुणबी, माळी तसेंच शेतकरी, कामकरी यांच्या स्त्रियांमध्यें 'नांव घेण्याचे' जे उखाणे आहेत त्यांचें एक वेगळेंच वैशिष्ट्य आहे. पांढरपेशा वर्गातील स्त्रियांत रूढ असणारे उखाणे शक्य तों लहान व चटकदार असतात. परंतु या स्त्रियांचे उखाणे शक्य तितके लांबलचक असतात. शेवटच्या दोन ओळींत नवऱ्याचें नांव व त्याला पोषक अशी एकादी ओळ असली तरी पहिल्या आठ-दहा ओळी म्हणजे एक लहानसें फेराचें गाणें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांत शहरांचीं वर्णनें, पोषाखाचीं वर्णनें, सणांच्या याद्या, कांहींहि येऊं शकतें. सामाजिक पाहणीच्या दृष्टीनें हे उखाणे जास्त महत्त्वाचे ठरतील. उदाहरण :-

झुणझुण झुण्यांत, बसले मेण्यांत ।
खण चोळी अंगांत, शेंदूर भांगांत ।
जायफळ वटींत, लवंगा मुठींत ।
सोन्याची किल्ली, चांदीचं कुलुप ।
हातीं दिली किल्ली, उघाडली खोली ।
खोलींत होत हांडं सात ।
हांड्यांवर परात, परातींत भात ।
भातासारखं तूप, तुपासारखं रूप ।
रूपासारखा चिरबंदी वाडा ।
चंद्रभागेला पडला वेढा ।
'शंकरराव' काम सोडा, पण मला माहेराला धाडा ॥

किंवा

झुनझुंबराचें, फूल उंबराचें ।
कळी चाफ्याची, लेक बापाची ।
सून सासऱ्याची, राणी भ्रताराची ।

भ्रतार भ्रतार म्हटलें नाहीं ।
नांव अजून घेतलें नाहीं ॥
नांवासाठीं जुन्नरला गेले ।
शेले पटके उडवीत आले ॥
गेले समोरच्या खोलीं ॥
समोरच्या खोलींत होतें चोळी पातळ ।
चोळी पातळाच्या पोटीं फणी ।
अशी 'पार्वती' शहाणी तर करते 'शंकररावांच्या' रागाचं पाणी ॥

किंवा चांदीचें घंगाळ अंघोळीला, जरिकांठीं धोतर नेसायला ।
चंदनाचा पाट बसायला ॥
सहाण येवल्याची, खोड बडोद्याचें ।
विलायती आरसा पाह्याला, केशर गंध ल्यायाला ॥
चांदीचे गडवे, सोन्याचे पेले ।
आंत भागीरथीचें पाणी ॥
उदबत्तीचीं झाडें, रांगोळी पुढें ।
समई मोराची, तबक बिलवराचं ॥
पानपूड वजनीचं, आडकित्ता कोल्हापूरचा ।
डबे सोलापूरचे, कातगोळ्या आलेगांवच्या ।
सुपारी धारवाडची, चुना गोकुमचा ॥
पानें रामटेकचीं ।
छपरी पलंग सोन्याचा, जाई सेवंतीसुगंधी वासाची ॥
हांड्या झुंबरांचा लकलकाट, बसायला पिढेपाट ।
समया तीनशें साठ
'शंकररावांचे' नांवावर हळदीकुंकवाचा थाट ॥

या उखाण्यांत ठराविक अक्षरगण, मात्रागण, अक्षरावलि वा मात्रावलीचें बंधन दिसत नाहीं, ठराविक ओळींचें बंधन दिसत नाहीं, यमक असलें तरी बंधनात्मक नाहीं. मुक्तछंदाच्या वाद-विवादांत मी आतां जाऊं इच्छित नाहीं; पण हे उखाणे वाचून यांना

'मुक्तछंद' म्हणण्याचा मोह मला होत आहे. आतांपर्यंत वर्णन केलेल्या वाङ्मयप्रकारांत आपण पद्यनिर्मितीच्या दोन अवस्था म्हणजे 'लयबद्ध निरर्थक शब्दरचना' व 'अर्थयुक्त पण लयबद्ध शब्दरचना' या पाहिल्या. यापुढील पद्यप्रकारांत आपणांस पद्याचें परिणत स्वरूप म्हणजे 'अर्थप्रधान लयबद्ध शब्दरचना' पहावयास सांपडेल. पण या वाङ्मयांत समाविष्ट झालेल्या 'म्हणी' व 'कहाण्या' या दोन गद्यप्रकारांचा पुसटता परामर्ष घेऊन मग स्वस्थपणें काव्याचा गाभा जो 'ग्राम्य ओवी-वाङ्मय' तिकडे वळणें बरें !

म्हणीः— या शरीरानें उखाण्यासारख्या दिसतात. खेळांत पार्श्वसंगीताचें काम करावें न लागल्यानें त्यांचें गद्य स्वरूप राहिलें. पण स्मरणीय होण्यासाठीं यमक त्यांत आलें. गद्यमय रचना व अंतीं यमक पाहून यांचा व उखाण्यांचा तोंडवळा सारखा वाटला तरी स्वभावांत महदंतर आहे. निरर्थक शब्द म्हणींत खपावयाचे नाहींत. उलट थोड्या जागेंत जितका अर्थ सामावेल तितका सामावून घेणें व मुरलेल्या लोणच्याप्रमाणें मुरलेलें अनुभवाचें शहाणपण लोकांना सांगणें हें म्हणीचें काम. येथें 'शहाणपण' अभिप्रेत असतें, मनोरंजन नव्हे. म्हणींचा विचार इतरत्र झालेला आहे. त्यांत अमुक म्हणी बायकांनीं म्हणाव्या अगर अमुक पुरुषांनीं म्हणाव्या असें बंधन नाहीं व असण्याचें कारण नाहीं. पण त्यांतल्या त्यांत कोणच्या म्हणी स्त्रियांच्या बोलण्यांत येत असतील हें थोडें सुचवितां येईल. उदा०

**( १ ) सवत साहिना व मूल होईना.**

**( २ ) जिकडे गेली वांझ तिकडे आली सांज.**

पुरुषांच्या बोलण्यांत जास्ती म्हणी कोणत्या येऊं शकतील

असें पाहिलें तर वाटतें,

**रिकामा न्हावी भिंतीला तुमड्या लावी ।**

या म्हणींतूनहि एक प्रकारचें आंदोलन म्हणजे लयबद्धता प्रत्ययास येते.

उखाण्यांची परंपरागत चालः—या वेळीं उखाण्यांच्या परंपरागत चालीकडे लक्ष वेधणें स्वाभाविक आहे. स्त्रीनें व पुरुषानें नेहमींच्या व्यवहारांत एकमेकांचें नांव उच्चारावयाचें नाहीं; परंतु प्रसंगविशेषीं तें घ्यावयाचें व घेतांना उखाणा या शब्दानें सूचित होणारी कांहीं गमतीदार शब्दरचना करून त्यांत समाविष्ट करून तें उच्चारावयाचें अशी रूढी दिसते. पुरुषांतील हा उखाण्यासह नांव घेण्याचा प्रचार पुष्कळ कमी झाला आहे. सुशिक्षित, विशेषतः विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांतही ही चाल मागें पडली आहे. तरी देखील महाराष्ट्रीय समाजांत अजून फार मोठ्या प्रमाणांत या चालीचें अस्तित्व आहेच.

स्त्रीनें पतीचें नांव उच्चारावयाचें नाहीं. उच्चारल्यास त्याचें आयुष्य कमी होतें अशी एक कल्पना त्या बाबतींत रूढ आहे.* त्याचप्रमाणें पहिला मुलगा, पहिली सून यांचींही नांवें स्त्रिया घेत नसत. त्याऐवजीं नुसतें ‘ मुलगा ’ ‘ मुली ’ असें संबोधून काम चाले. ‘ आयुष्कामो न गृण्हीयान्नामपुत्रकलत्रयोः ’ । या स्मृतिवचनानें कांहीं त्याची संगति लावतात. गुजराती, हिंदी समाज यांच्यामध्येंही स्त्रीनें नवऱ्याचें नांव प्रत्यक्ष न उच्चारतां कांहीं सूचक नांवानें त्याजसंबंधीं ( उदा. बच्चुना बाप ) बोलून निर्वाह करावा अशी प्रथा असल्याचें कळतें. याप्रमाणें पतिनांवाचा उच्चार न करण्याची प्रथा सार्वत्रिक दिसते; पण उखाण्यांमध्यें गोंवून

* कृ. पां. कुलकर्णी ‘मराठी भाषा, उद्गम व विकास’, पृष्ठ २८०.

नैमित्तिक प्रसंगीं तें घेण्याची पद्धति ही केवळ महाराष्ट्रीय दिसते. महाराष्ट्रांतील बहुतेक जातींत ही पद्धति सांपडते.*

महाराष्ट्रामध्यें तरी ही पद्धति किती जुनी असावी या दृष्टीनें पाहतां ज्ञानेश्वर कालापर्यंत हिचा माग लागतो. नवी नवरी नवऱ्याचें नांव न उच्चारतांच जसें तें अकर्तेपणें सुचविते, तसेंच ब्रह्माचें वर्णन कांहीं न बोलूनच करतां येतें, अशा अर्थाची ओवी ज्ञानेश्वरींत× सांपडते. ' गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्या विच्छिन्न-संशयाः । ' या न्यायानें इतर नांवें उच्चारीत असतां विशिष्ट नांवाचे जागीं मौन धारण केलें तर मुलीच्या या मौनानें इतरांचा तिच्या नवऱ्याच्या नांवाबद्दलचा संशय विच्छिन्न व्हावा यांत संशय नाहीं. नैमित्तिक कारणांसाठींच नवऱ्याचें नांव घेणें व तेंहि उखाण्याची योजना करून घेणें ह्याचा स्पष्ट उल्लेख एकनाथाच्या वाङ्मयांत येतो. एकनाथांनीं आपल्या वाङ्मयांत प्रसंगानुसार सामाजिक चालीरीती विस्तारानें वर्णन केल्या आहेत. रुक्मिणी-स्वयंवरांत त्यांनीं विवाहप्रसंगाचें जें वर्णन अध्याय १५ ते १८ या चार अध्यायांत केलें आहे, त्यावरून तत्कालीन विवाह-सोहळ्याची कल्पना येते व आज प्रचलित असलेली विवाहपद्धति त्यापेक्षां फारशी बदललेली नाहीं असें दिसतें. रुक्मिणीस्वयंवरांत पुढील वर्णन आहे.

**लग्न लागल्या येरे दिवसीं । सोहळा मांडिला वोहरासी ।**
**मूळ पाठविलें हळदीसी । यादवांसी भीमकें ॥ ४० ॥**
**नकळे भीमकीचें लाघव । सकळही म्हणती धन्य भाव ।**
**आतां घेऊनिया नांव । पाय मागे कृष्णाचे ॥ ५४ ॥**

---

* विवाह व सोहळे, श्री. अळेनी.

× जैसें न सांगणे वरी । बाळा पतीसी रूप करी । बोल निमालेपणें विवरी । अचर्चातें ॥ –ज्ञानेश्वरी अ. १५।४६८ ( साखरेप्रत )

एकोनी जनांचिया गोष्टी । भीमकी दचकली पोटीं ।
काय आतां बोलूं होटीं । न दिसे दृष्टी नांवरूप ॥ ५५ ॥
पाहतां नामरूपाचा दुकाळ । घालतां साकारतेचा आळ ।
लावितां नामाचा विटाळ । तेणें गोपाळ क्षोभेल ॥ ५७ ॥
सर्वांचि म्हणे कळलें चित्ता । गोइंद्रियां नियंता ।
यासीं गोपाळ म्हणतां । दोष सर्वथा मज नाहीं ॥ ५८ ॥
ऐसें विचारुनि वेल्हाळा । लक्ष लाविलें चरणकमळा ।
वेगीं पाय दे गोपाळा । भीमकबाळा बोलिली ॥ ५९ ॥

हें झालें रुक्मिणीच्या नांव घेण्याचें वर्णन. तसेंच पुढें कृष्णाबद्दल,

रेवती म्हणे जा यादवा । आधीं घ्या इचिया नांवा ।
हळदी मग इसी लावा । देवाधिदेवा श्रीकृष्णा ॥ ८८ ॥
कृष्ण म्हणे हळदीनिमित्तें । मजचि लावूं आल्याति पिसें ।
नांवरूप मज दिसे । काय मीं कैसें म्हणावें ॥ ८९ ॥
नांवरूपाची व्यवस्था । रुक्मिणी जाणे तत्त्वतां ।
माझ्या अंगीं नाहीं सर्वथा । नांव घेता मी नव्हे ॥ ९० ॥
कृष्ण म्हणे रुक्मिणी देवी । नामरूपें तूंचि अघवी ।
मजपरिस तूंचि बरवी । हांसिजे सर्वीं ऐकोनी ॥ ९३ ॥

एकनाथरचित ‘ हळदुली ’ म्हणून छोट्याशा काव्यभागांत या हळदप्रसंगाचेंच वर्णन आहे. एका वृद्धेनें नांव घे म्हणून सुचविलें तेव्हां कृष्ण नामरूपातीत आहे—‘ जेथें रूपाचा दुकाळु । नामाचा विटाळू ’ तेव्हां त्याचें नांव कसें घ्यावें हा प्रश्न रुक्मिणीस पडला. तेव्हां तो गो-( इंद्रिय- )-नियंता आहे हें आठवून तिनें ‘ गोपाळा पाय द्या ’ असें म्हटलें. पुढें कृष्णाला नांव घेण्यास सर्वांनीं सांगतांच त्यानेंही ‘ नामा हे रूपाची, गुणमयी गुणाची । रुक्मिणीचें नांव घेण्याची, मला लाज कशाची’ इत्यादि अर्थाचें नांव घेऊन वेळ पार पाडली.*

*पांगारकरकृत वाङ्मयाचा इतिहास, भाग २ रा-एकनाथ खंड, पान ३०४.

वरील दोन्ही ग्रंथांचें उद्दिष्ट कथानकाबरोबर वेदांत--परिचय हेंही आहे व त्यामुळें नामरूपांचा व्याकर्ता, गो म्हणजे इंद्रियांचा नियंता अशा तऱ्हेच्या परिभाषेनें सर्व वर्णन गुंफलें आहे. परंतु वधुवरांनीं एकमेकांचीं ' नांवें घेणें ', तीं घेतांना विशिष्ट तऱ्हेची शब्दरचना करून त्यामध्यें तीं नांवें गुंफणें ह्या पद्धतीचें अस्तित्व यावरून स्पष्ट कळतें. वेणीस्वामीकृत सीतास्वयंवरांत पुढील उल्लेख येतो:

**तव कौसल्येच्या वऱ्हाडणी । म्हणती गे सुलक्षणी ।**
**नमस्कारितां चापपाणी- । नाम-उच्चार करावा ॥ ४२ ॥**
**काय बोले मनोरमा । प्राणवल्लभा रघोत्तमा ।**
**उटणें करूं दे सुखधामा । म्हणोनि पाऊल वंदिलें* ॥ ४३ ॥**
**जनकनंदिनी नमस्कार । करितां नामाचा उच्चार ।**
**ते समईं जयजयकार । सकळांचे दाटले ॥ ४४ ॥**

प्रस्तुत काळांतील नांव घेऊन पाय मागण्याच्या या उखाण्याचें स्वरूप पुढील प्रकारचें असतें.

**अंधाऱ्या रात्रीं चमकला काजवा, शंकरराव पाय द्या उजवा ।**

वरील उदाहरणावरून पुढील गोष्टी प्रत्ययास येतात.

( अ ) नित्याच्या व्यवहारांत नवराबायको परस्परांचे नांवाचा उल्लेख करीत नसत.

( आ ) नैमित्तिक प्रसंगीं उत्सवसमारंभांत नांव घेत असत.

( इ ) परंतु तें घेतांना कांहीं चमत्कृतिजन्य, लयबद्ध व सयमक अशी वाक्यरचना करून त्यांत त्या नांवाची गुंफण करीत.

या विशिष्ट तऱ्हेनें रचलेल्या शब्दगुंफेचा निर्देश ' आहणा '

---

* " उटणें करावया सुखधामा । प्राणवल्लभा रघोत्तमा ।
द्यावें पाऊल उत्तमा । विनवी भाजा आपुली ॥ "
अशा तऱ्हेचा कांहीं उखाणा असावा. --शं. कृ. देवकृत टीप.

व ' उखाणा ' या दोन शब्दांनीं केला जात असावा. ' उखाणा' हा शब्द आज प्रचलित आहेच. 'आहणा' शब्द जुन्या वऱ्हाडी बोलींत प्रचलित होता.* हे दोन्ही शब्द इतर अर्थानेंहि भाषेंत रूढ आहेतच.

आहणा ( आह = बोलणें ) हा शब्द म्हण, वचन, उक्ति, कूटप्रश्न, दृष्टांत अशा अर्थीं वापरलेलाहि जुन्या वाङ्मयांत सांपडतो. त्याचप्रमाणें उखाणा ( उत्-खन् = खणून काढणें ) हा शब्दहि कोडें, कूटप्रश्न, दृष्टांत, म्हण या अर्थीं उपयोजिलेला आहे.

धात्वर्थास धरून पाहतां ' आहणा ' हा शब्द म्हण, वचन, उक्ति या अर्थाचा वाचक होणें स्वाभाविक वाटतें. त्याचप्रमाणें ' उखाणा ' हा शब्द कूटप्रश्न, कोडें या शब्दांचा वाचक व्हावा हें स्वाभाविक वाटतें. कारण कूटप्रश्नांत उत्तर लपलेलें असून तें श्रोत्यानें शोधून म्हणजे उत्खनन करून काढावें लागतें. उदाहरणार्थ: ' बत्तिस चिरे, त्यांत नागीण फिरे ' हा उखाणा म्हणजे कूटप्रश्न असून त्यांतून अर्थानुरोधानें तोंडांतील बत्तीस दांत व त्यांमधील जीभ हा अर्थ ओळखून काढावा लागतो. तेव्हां कोड्यांना ' उखाणा ' हा शब्द समर्पक वाटतो. तशाच प्रकारें ' उखाणा ' हा शब्द म्हण, लोकोक्ति, वचन, सुभाषित अशा अर्थीं जुन्या स्त्रियांच्या बोलींत वापरलेला मीं ऐकलेला आहे. उदाहरणार्थ:— एकाद्या बाईच्या तोंडीं म्हणी फार असतील--आणि अशा पुष्कळदां असतात - तर तिचें वर्णन करतात, " काय ती बाई सारखे उखाणे घालीत बोलते. म्हणे 'मला न्हाणा व विहिणीला खंगाळा' किंवा ' अहो नंदी कशाचे, तर आपण देव पाषाणाचे.' "

---

* तो आहणी मधुर बोलुन नांव साचें । बोले मधूर रचना रद-कांति हांसे ॥ (कै. वा. गो. पाटील यांची अप्रसिद्ध कविता--विविधज्ञानविस्तार, वर्ष ५९, अंक ३४, पृ. ३ )

'आहाणा' व 'उखाणा' या शब्दांतील धात्वर्थावरून प्रत्येक शब्दाचें क्षेत्र स्वतंत्र असलें तरी रूढीनें ते दोन्ही शब्द एकमेकांचें काम करतात असें दिसतें. शिवाय नवराबायकोंनीं परस्परनामनिर्देश करतांना उपयोगांत यावयाच्या शब्दगुंफेचा निर्देश या दोन्ही शब्दांनीं केला गेलेला दिसतो. 'आहणा' हा शब्द जास्त जुना, वऱ्हाडकडील भाषेंत शिल्लक राहिलेला, व 'उखाणा' शब्द सध्यां प्रचलित असलेला. तरीपण प्रथम सरसकट 'आहणा' शब्द प्रचारांत होता व मागून त्या जागीं 'उखाणा' शब्द आला कीं काय हें निश्चित सांगणें कठीण आहे. तरीपण हे शब्द प्रथम या शब्दगुंफेस कां लागूं लागले याची उपयोगावरून थोडी कल्पना येते.

'आहाणा' म्हणजे म्हण. म्हणींमध्यें अंत्य यमक व लयबद्धता असते, तशी या 'उखाण्यांतहि' असते. त्यावरून म्हणीप्रमाणें म्हणून 'आहणा' शब्द इष्ट वाटला असावा. नवऱ्याचें नांव तर घ्यावयाचें नाहीं पण लोकांस कळेल असें करावयाचें. तेव्हां अशी कांहीं रचना असावी कीं त्यांतून तें पर्यायानें, वक्रोक्तीनें, दृष्टांतानें ऐकणाराला कळावयाचें म्हणजे नांव गुंफणारीचा चतुरपणा त्यांत दिसावा. शिवाय शोधून काढणारालाहि त्यांत कोडें ओळखण्याप्रमाणें खटपट पडावी व म्हणून या रचनेस 'उखाणा' हेंहि नांव योग्य वाटून तें उपयोगांत आलें असावें.

रुक्मिणीहरणांत रुक्मिणीला नांव कसें घ्यावें हा प्रश्न पडला व तिनें प्रत्यक्ष कृष्ण नें म्हणतां गो-इंद्रियांचा नियंता या अर्थी 'गोपाळ' हा शब्द उच्चारला व पर्यायानें 'कृष्ण' हा अर्थ लोकांना कळला असें वर्णन येतें. अशाच प्रकारचें दुसरें उदाहरण म्हणून जरी नव्हे तरी उखाण्याचें स्वरूप कसें असूं शकेल ही कल्पना

-येण्यास ' औषध नल गे मजला ' ही ओळ पाहण्यास हरकत नाहीं.

ती शीतलोपचारीं जागी झाली, बरें म्हणुन बोले ।
' औषध नलगे मजला ' परिसुनि जननी बरें म्हणुनि डोले ॥

या रघुनाथ पंडिताचे सुप्रसिद्ध श्लोकांत 'नल' हें नांव श्लेषाचे मदतीनें सुचविलें आहे व तें उकलून समजून घेण्याचें काम दमयंतीच्या मैत्रिणींचें आहे. उखाणा हा शब्द रूढ होतांना ही कल्पना असावी. परंतु आज व्यवहारांत प्रचलित असलेल्या

शब्द-गुंफाचें स्वरूप आहे आहाणा*
पण म्हणतात त्याला उखाणा

कहाण्या:—स्त्रीवाङ्मयांत कहाण्या हा बराच मोठा विभाग आहे व तो लोककथांत सामावतो. व्रतवैकल्याचे वेळीं कोणतेंहि व्रत कां करावयाचें याचा पौराणिक दाखला देण्यासाठीं या कथा रचिल्या असतात. ' हा वसा पुरुषांनींहि वसावा ' असें कहाण्यांत सांगितलेलें असतें. पण असे वसे पुरुषांनीं वसलेले फारसे ऐकिवांत तरी नाहींत. लहान लहान, सोपीं सोपीं वाक्यें, आंदोलन निर्माण करणारे लयबद्ध अक्षरसमूह, ठरीव वाक्यांची पुनरावृत्ति व मनाची पकड घेणारें एकादें शेवटचें वाक्य अशी लोककथांत आढळून येणारी सामुग्री यांतहि आढळते. लेखनकलेच्या अभावीं सर्वच स्मरणांत ठेवावयाचें व त्यासाठीं ह्या पद्यांत आढळणाऱ्या या वैशिष्ट्यांची मदत साहाजिक कहाण्यासारख्या लोककथांना घ्यावीशी वाटली. उदा. सोमवारच्या कहाणींत ' शिवा, शिवा, महादेवा, ज्योतिर्लिंगा, कोटिलिंगा, सासु-सासऱ्यां दिराजावां नावडती आहे ती आवडती कर रे ऽऽऽ देवा !'

---

* उखाण्याचें अर्वाचीन वाङ्मयांत समाविष्ट झालेलें उदाहरण सौ. आनंदी-बाई कर्वे यांच्या 'माझें पुराण' या आत्मवृत्तांत सांपडतें. (पृ. २७) **सदनाचे मजवर उपकार झाले फार । आनंदीनें फेडायला असावें तयार ॥**

मंगळागौरीच्या कहाणींत मुली कळ्या तोडीत होत्या. एकीनं दुसरीला खांडगाळी शिवी दिली. दुसरी म्हणाली, 'मला अशी शिवी देऊं नको. आमच्या कुळांत असं कुणी झालं नाहीं.' मुलींचें हें बोलणं ऐकून मामा तिला म्हणाला, 'अग अग मुली, तुझं घर कुठं ?' मुलगी म्हणाली, ' ब्राह्मण पोथी वाचतात, आकाशीं धोतरं वाळतात, घंगाळीं पाणी तापतं, तें माझं घर.'

त्यानंतर उत्तरार्धांत मामा आपल्या भाच्यास व सुनेस घेऊन गांवीं परत जातो. त्या वेळचें वर्णन लोक सांगूं लागले. "उठा उठा भटजी, तुमचा लेक आला, तुमची सून आली. " भटजी उठतात. भटजी पाहिनात, म्हणूं लागले. "आम्हांला कुठला मुलगा, आम्हांला कुठली सून?" सर्वांची भेट झाली. सासू उठली, सुनेचे पाय धरले. सून म्हणाली, " उठा उठा सासुबाई, वळचणीचं पाणी कधीं आढयाला गेलं आहे का ? गंगा कधीं उलटी वाहते का ? " सासू म्हणाली, " असं म्हणूं नको, तुझ्यामुळं माझं बाळ वाचलं. "

बैठकींतील गाणीं अमुकच एका प्रसंगीं म्हणावयाचीं असें नव्हे; पण स्त्रिया एकत्र जमल्या म्हणजे, विशेषतः मंगळागौरीसारख्या प्रसंगीं, रात्रीं जाग्रण करीत असतां हीं गाणीं म्हटलीं जातात. यांत कथानकाला महत्त्व असून सुरस चाल, अनुरूप शब्दरचना इत्यादि काव्याच्या सर्व अंगोपांगांकडे लक्ष दिलेलें असतें व रसपरिपोषहि चांगल्या तऱ्हेनें झालेला सांपडतो. उदा.—

**शरद् ऋतू उदय चंद्राचा । वनीं वृंद उभा गौळणींचा ।**
**सुगंध सुटत पवनांचा । ये पवन मलयगिरीवरचा ।**
**हा थाट उभा रासाचा । धरूनिया हस्त राधेचा ।**
(चाल) **श्रीरंग कुठें आजि दावा ।**
**हृदयींचा तो प्राणविसावा ।**

(चा.प.) **मुरलीधर कुणी तरी दावा !**
**हृदयिंचा तो प्राणविसावा ॥ ध्रु० ॥**

हें सुंदर गाणें रचणारी व्यक्ति नुसती कविच नसून संस्कृत काव्यशास्त्रांतहि पारंगत असल्याचा भास होईल. कवींची स्त्रीगीतांना फार मोठी मदत झालेली आहे. उदा.

**कृष्णा धांव रे लवकरी ! संकट पडलें भारी ॥**
**हरि तूं आमुचा कैवारी । आलें विघ्न निवारी ॥**

हें उद्धव चिद्घनाचें पद.

भक्तिरसपूर्ण गाण्याचा समुदायहि मोठा आहे. पुष्कळ ठिकाणीं कवयित्रीनें वा कवीनें शेवटीं आपलें नांवहि गुंफलें आहे. तेव्हां याला अपौरुषेय म्हणावयाचें तर तीं स्त्रियांच्या समुदायांत प्रामुख्यानें गाइलीं जातात म्हणून. डोहाळे, दृष्ट, धावे हीं सर्व गाणीं यात येतात. बैठकींतील गाण्याकडे धांवता दृष्टिक्षेप करून आपण 'अपौरुषेय वाङ्मयाचा' गाभा जो श्राव्य ओवी-वाङ्मय तिकडे येऊन पोचलों. आंतील विषय घेऊन ओव्यांचे दोन प्रकार होतात. लहान मुलींच्या म्हणण्यांत येणाऱ्या झोपाळ्यावर बसून म्हणतांना व इतर वेळींही मनोरंजनार्थ हीं आवर्तनें होतात. दुसरा प्रकार म्हणजे मोठ्या स्त्रियांनीं,तसेंच सासुरवाशिणींनीं व माहेरवाशिणींनीं दळणाचे वेळीं जात्यावर बसून म्हटलेल्या, मुलांना निजवितांना म्हटलेल्या व मंगल प्रसंगीं गायिलेल्या ओव्या. या वेळीं म्हटली गेलेली ओवी मनोरंजनार्थ तर खरीच, परंतु त्यांत बाल्यसुलभ अवखळपणापेक्षां भावदर्शन जास्त होतें. येथेंहि अमक्या वेळीं अमुक ओवीच म्हणावी, हें बंधन नसलें तरी गाणारीच्या मानसिक अवस्थेमुळें आपोआप फरक होतो.

पद्यरचनेंतील ही अर्थप्रधान तिसरी अवस्था. प्रत्येक ओवींत

कांहीं तरी निश्चित 'वक्तव्यं' यांत असतेंच. पण पूर्वपरपरा अगदींच सुटत नाहीं. ओवीच्या चार चरणांपैकीं पुढच्या दोन चरणांत म्हणजे उत्तरार्धांत अर्थ हवाच व पहिल्या दोन ओळींत म्हणजे पूर्वार्धांत कांहीं अर्थ असला तरी त्याची पुढच्याशीं सुसंगतता हवीच असें मात्र नाहीं. किंबहुना पूर्वार्धाचा व उत्तरार्धाचा अंत्य यमकापुरताच संबंध. उदा.

**मुंबईची मुंबादेवी, तिची सोन्याची कंबर ।**
**निरी पडली शंभर, पैठणीची ॥**

किंवा **काळी चंद्रकळा, ठेविली बाकावरी ।**
**रुसली काकावरी, यमूताई ॥**

यामध्यें 'सोन्याची कंबर' असणें व 'शंभर निरी पडणें' यामध्यें कार्यकारण भाव नाहीं किंवा 'बाकावरी' चंद्रकळा ठेवण्याचें कारण 'काकावरी' या शब्दाशीं यमक जुळविण्यापुरतेंच आणि अशा तऱ्हेची संवय पूर्वपरंपरेनें पडली तरी ती रुढी होऊन टिकण्यास ओव्या म्हणतांना—विशेषतः झोपाळ्यावर--ज्या शीघ्रकवित्वाची मदत घ्यावी लागते तेंहि थोडेंबहुत कारणीभूत झालें असावें. झोंपाळ्यावर बसून मुली ओव्या म्हणतात व दोन बाजूचे दोन पक्ष करून एक ओवी एका पक्षानें व त्यापुढची दुसऱ्या पक्षानें म्हणावी अशा चढाओढी चालतात. या वेळीं एकाच तऱ्हेच्या ओव्या कोण जास्त म्हणतें याबद्दल चढाओढी लागतात. एकदां 'काळी चंद्रकळा'या प्रतीकानें ओवी सुरू झाली कीं त्याच सारख्या म्हणावयाच्या. ज्या बाजूला अशा ओव्या म्हणतां येणार नाहींत त्या बाजूवर दुसऱ्या बाजूचा चढ लागतो. तेव्हां भराभरा ओव्या बनूं लागतात व

**काळी चंद्रकळा, ठेविली जाईवरी ।**
**रुसली आईवरी, उषाबाई ॥**

**काळी चंद्रकळा, ठेविली दारावरी ।**
**रुसली दीरावरी, उषाबाई ॥**

अशा विटाळ्याच्या काव्याला सुरवात होते. नाहींतर ओवी आठवण्यास जरा वेळ लागला कीं विरुद्ध बाजूच्या मुली ओवी म्हणत,

**चांदीच्या ताटांत, डाळिंबाचा दाणा ।**
**आतां तरी म्हणा, मनूताई ॥**

ही ओवी म्हणून होईपर्यंतहि जर ओवी आठवली नाहीं, तर पुढें म्हणत असत,

**चढावरी चढ, असा चढ घालूं नये ।**
**बिजवराला देऊं नये, मनुताईला ॥**

यामुळें पहिली ओळ छापील ठशाची फक्त सोयीप्रमाणें अंत्य-यमकाचा शब्द बदलून घ्यावयाची व पुढच्या ओळींत आपलें मनोगत व्यक्त करावयाचें अशी रूढी पडली. कोल्हटकर व गडकरी यांनीं, यंत्राचे मदतीनें काव्याच्या बाजारांत विकाऊ घाऊक घाट दागिन्याच्या घाटाप्रमाणें मिळतील म्हणून चेष्टा केली; पण अपौरुषेय वाङ्मयांत ओवी विभागांत हे काव्याचे घाट तयार असून लोकप्रिय झाल्यानें त्यांना मागणीहि फार असे असें दिसतें. 'काळी चंद्रकळा' या लोकप्रिय घाटाप्रमाणेंच 'लांब लांब केस' 'उंचेच्या ओसरीला' 'रामकुंडावरी' 'आधीं नमन करूं' इ. अनेक घाट तयार असून उपयोगांत आहेत. ठराविक सांचा, प्रत्येक ओवी वेगळ्या व्यक्तीनें रचिलेली, ओवीचा चिमुकला जीव, प्रथम कोणती म्हणावी, मागून कोणती म्हणावी, असेंहि बंधन अर्थात् नसतें. कारण तें एक आख्यान नव्हे. पण असें असूनहि केंव्हां केंव्हां एकादें वर्णन फार सुरस होतें. पुढील उदाहरण या दृष्टीनें पाहण्याजोगें आहे. बायकांच्या ज्या कांहीं विशिष्ट आवडीनिवडी ओव्यांवरून कळतात

त्यांपैकीं 'मोठे मोठे डोळे' 'लांब लांब केस' 'गोरीचं गोरेपण' 'काळी चंद्रकळा' या कांहीं होत. 'काळी चंद्रकळा' प्रत्येकीला हवीच. पुढील ओव्या एकामागून एक म्हटल्यास या आवडींची कल्पना येते.

## 'काळ्या चन्द्रकळे' चें आख्यान

**काळी चंद्रकळा, रुइफुली कांठाची । बुधवारपेठेची खरेदी केली ।**
**काळी चंद्रकळा पदरीं रामसीता । नेसली पतिव्रता, उषाताई ।**
**काळी चंद्रकळा पदरीं रामबाण । नेस तुला माझी आण उषाताई ।**

अशी चन्द्रकळा विकत आणली पण कुणी तरी योग्य ठिकाणीं ठेविली नाहीं तर नेसणारीला राग आला.

**काळी चंद्रकळा, ठेविली जाईवरी । रुसली आईवरी, उषाताई ।**
**काळी चंद्रकळा ठेविली बाकावरी । रुसली बापावरी, उषाताई ।**
**काळी चंद्रकळा ठेविली पारावरी । रुसली दीरावरी, उषाताई ।**
**काळी चंद्रकळा धूधुऊनी झाली मऊ ।**
**रुपये दिले साडेनऊ, दादारावांनीं ।**

**काळी चन्द्रकळा, धूधुऊनी झाला कात ।**
**रुपये दिले साडेसात, दादारावांनीं ।**

**काळी चन्द्रकळा धूधुऊनी झाला बोळा ।**
**रुपये दिले साडे सोळा, दादारावांनीं ।**

इतके पैसे दिले तरी शेवटीं विटली म्हणून नेसणारी म्हणते,

**काळी चंद्रकळा, धूधुऊनी विटली ।**
**नाहीं हाउस फिटली, माझ्या मनिंची ।**

तेंव्हां मैत्रिणीनें सांगितलें ' धूधुवून ' विटते तर ' ठेवून ठेवून ' नेसत जा.

**काळी चंद्रकळा, ठेवू ठेवून नेसावी ।**
**आपल्या जन्माला असावी, उषाताई ॥**

जन्माला काळी चंद्रकळा पुरावी इतकी आवड.

एकादी नवीन गोष्ट पाहण्यांत आली तर नवलाईनें त्याचें वर्णन करणें, एकादी नवी न पटणारी गोष्ट दिसली तर त्यावर टीका करणें, हा मनुष्य-स्वभाव स्त्रियांतहि* उत्कटतेनें प्रतीत होतो. आगगाड्या, तारायंत्रें, पाण्याचे नळ, मुलींच्या शाळा, इंग्रजी शिक्षण इ. गोष्टी नव्यानें सुरू झाल्या त्या वेळीं वाटलेलें कौतुकहि ओव्यांत सांपडतें.

## आगीनगाडीचें आख्यान

आगिनगाडी सुरू झाली, पुण्याला ऐकू गेली ।
मुंबईला सुरू केली, इंग्रजांनीं ॥
आगिनगाडी बिगिनगाडी, आगिनगाडीला कप्पे कप्पे ।
आंत बसले माझे सख्खे, भाईराज ॥
आगिनगाडी, बिगिनगाडी, आगिनगाडीला डब्बे डब्बे ।
बैलावीण चाले निघे, रुळावरी ॥

या ओव्यांवरून श्री. लक्ष्मीबाई टिळक यांचें स्मृतिचित्रांतील वाक्य आठवतें. 'आगगाडी पाहिली नव्हती. माझी आपली कल्पना कीं, आगगाडीचे डबे लाडवांच्या डब्यासारखे असतात आणि आंत माणसें बसवून वरून झांकण लावतात,' अशा अर्थाचे त्यांचे उद्गार आहेत. त्याची आठवण येऊन आगिनगाडीचे कप्पे व त्यांत बसणाऱ्या भावाचें कौतुक किती वाटत असेल त्याची कल्पना येते !

पुढें मात्र आगगाडीचा सराव होऊन नवल जातें; पण कौतुक राहतेंच. सिग्नल पाडणाऱ्याची बहीण कौतुकानें म्हणते,

---

* पुढील गाणें या दृष्टीनें पहाण्याजोगें आहे. "काय बाई पुण्याची तारीफ । लवंगा निघाल्या बारीक ॥ टोपीवाल्याचा मुलुख । आगिनगाडीला कुलुप ॥ साहेब बसले घरांत । मडमा निघाल्या दारांत ॥"

आली आगिनगाडी, दिसती काळी निळी।
बंधून ढासळली, शिनगळा, तुझी फळी॥

आतांपर्यंत 'अपौरुषेय वाङ्मया'च्या बहुतेक विभागांचें सामान्य निरीक्षण झालें. आतां या विभागांत पद्याच्या परिणतावस्थेला पोचलेला जो विभाग त्याचें म्हणजे मुख्यतः ओवी विभागाचें काव्यशास्त्राच्या मदतीनें परीक्षण करून पाहणें मनोरंजक होईल. इतर विभागांतील म्हणजे फेरांच्या गाण्यांतहि जेथें कसोटी लावतां येणें शक्य होतें तीं गाणींही येथें विचारांत घेतलीं आहेत.

मराठी भाषेचें स्वतंत्र असे काव्यालोचनशास्त्र अजून निर्माण झालें नाहीं; तेव्हां संस्कृत काव्यशास्त्राचे मदतीनें याचें परीक्षण करणें आहे. सर्व भाषांतील साहित्यशास्त्राचीं मूलतत्त्वें एकच असल्यानें असें परीक्षण अगदींच टाकाऊ होणार नाहीं. शिवाय त्या चर्चेत मराठी भाषेचा विशिष्ट स्वभाव व्यक्त होऊन संस्कृत भाषेंतील कोणत्या गोष्टी तिला मानवतात, कोणत्या गोष्टी तिच्या छत्राखालीं फुलून येतात व कोणत्या गळून पडतात हेंहि त्यांत स्पष्ट होऊन आगामी शास्त्ररचनेला तें उपयुक्त होऊं शकेल. संस्कृत साहित्यशास्त्रांत मम्मटाचा काव्यप्रकाश ग्रंथ जरी सर्वमान्य असला, तरी काव्याची व्याख्या मात्र साहित्यदर्पणकार विश्वनाथ याचीच योग्य आहे. कारण व्याख्या करतांना नुसतें काव्यशरीराचें वर्णन करून त्यानें आत्म्याचा उल्लेख केला नाहीं व म्हणून निर्जीव ठरलेल्या व्याख्येला विश्वनाथाच्या व्याख्येचे मदतीनें जीवन पुरवावें लागतें. दोनही व्याख्या एकदम घेतल्या म्हणजे मात्र काव्यदेवतेच्या जागरूक मूर्तीचें दर्शन होतें.

१. तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि। (मम्मट) व
२. वाक्यं रसात्मकं काव्यम्। (विश्वनाथ)

या दोन व्याख्यांचे अनुषंगानें या वाङमयाचे गुण, दोष, अलंकार व रस यांचें परीक्षण होणें इष्ट आहे.

गुणः—मम्मटानें मानिलेल्या गुणांपैकीं प्रसाद व माधुर्य हे गुण या ओवी-विभागांत भरपूर आहेत. ओजस् हा गुण वीर, रौद्र, भयानक व बीभत्स या रसांस अनुकूल असतो. प्रस्तुत वाङ्मयांत या गुणांचा प्रकर्ष नाहीं. तेव्हां ओजस् गुणाचा अभाव स्वाभाविक वाटतो.

अपुष्टार्थतेचा ठळक दोषः—दोषांबद्दल एवढेंच तूर्त म्हणतां येईल कीं, एकदम डोळ्यांत भरणारा दोष म्हणजे अपुष्टार्थता. पहिल्यां ओळीचा व दुसऱ्या ओळीचा संबंध अर्थासाठीं नसून यमकासाठींच आहे असा जणुं संकेत ठरल्यानें पहिल्या ओळीचा उपयोग भरताडासारखा वाटतो. उदाहरणार्थः

**पंढरपुरीच्या माळिणी ठेंगण्या ।**
**फुलांच्या कंगण्या रुक्मिणीला ।**
**पंढरपुरीच्या माळिणी उंच काट्या ।**
**फुलांच्या चिंचपेट्या रुक्मिणीला ।**

या ठिकाणीं पंढरपूरच्या माळिणींच्याबद्दल कांहीं सांगणें अभिप्रेत नाहीं. पहिल्या ओवींतील ठेंगण्या माळिणी दुसऱ्याच ओळींत एकदम उंच कां होतात ? तर 'ठेंगण्या कंगण्या' 'उंच काट्या व चिंचपेट्या' हें यमक जुळावें म्हणून. अर्थव्यक्तीसाठीं आंखून घेतलेल्या प्रदेशापैकीं असा निम्मा भाग भरताडाखालीं खर्च करणें इतर काव्यांत खपणार नाहीं. पण या वाङ्मयांत हा अलिखित संकेत ठरल्यानें हा ओवीचा स्वभाव मानून दोषांत त्याची गणना करतां येणार नाहीं. सांगणारीच्या मनांत सांगावयाचें पुष्कळ असलें म्हणजे, मागच्या जागेंतील हें भरताड दूर करून आपो-

आप ती जागा अर्थव्यक्तीसाठीं उपयोगांत येते. उदा.

> बाप पुसे लेकी, सासुरवास कसा ।
> वळचणीचा वासा, लागतो ठसाठसा ॥

या ठिकाणीं एकहि शब्द निरर्थक नसून अर्थ कसा ठेचल्यासारखा वाटतो. अशा ओव्यांचे ठिकाणीं वाटल्यास ‘ अर्थप्रकर्ष ’ हा वेगळाच गुण मानावा.

## सादृश्याधिष्ठित अलंकार

वर्णन करतां करतां चमत्कृति निर्माण होऊन घडलेले अलंकार येथें पुष्कळ, मुद्दाम पांडित्यदर्शनासाठीं घडविलेले अलंकार क्वचित व ओवीच्या चिमुकल्या घटनेंत ते बसण्यालाहि फारसा वाव नाहीं. सादृश्याधिष्ठित अलंकार फार; विरोधगर्भ, शृंखलाबंध, तर्कन्याय, वाक्यन्याय, लोकन्याय आदि, न्यायमूलक म्हणजे विभावना, विशेषोक्ति, श्लेष, समासोक्ति, काव्यलिंग, प्रत्यनीक, समाधि असले अलंकार दुर्मिळ. उपमा, दृष्टांत विपुल. रूपक, उत्प्रेक्षा, प्रतिवस्तूपमा, अर्थान्तरन्यासहि आढळतात. नमुन्यादाखल पुढील उदाहरणें पुरेशीं होतील.

उपमा:—साधर्म्यं उपमा भेदे ।

> मोठे मोठे डोळे । हरीण पाडसाचे ।
> तसे माझ्या राजसाचे । बाळुरायाचे ॥
> आपण बोलूं गुज । डाळिंबीसमान ।
> तूं भाऊ मी बहिण । जडे नातें ॥

रूपक:—तद्रूपकं अभेदो य उपमानोपमेययोः ।

> तुझ्या जीवासाठीं । उभी राहिलें वनांत ।
> माझ्या बंधुराया । तूंच शेला मी बनात ॥
> माझे पांच भाऊ । देवळाच्या भिंती ।
> गिलावा देऊं किती । आयुष्याचा ॥

आम्ही तिघी बहिणी । तीन गांवांच्या तीन पेठा ।
माझा बंधुराया । मला सातारा दिसे मोठा ॥

उत्प्रेक्षा:–संभावनमथोत्प्रेक्षा प्रकृतस्य समेन् यत् ।

गोऱ्या गालावर । मुलामा लाल लाल ।
जणुं गुलाबाचें फूल । शोभिवंत ॥
वनदेवताचे । काजवे जणुं डोळे ।
बघाया बाळ माझें । त्यांनीं रातीं उघडिले ॥

प्रतिवस्तूपमा:–सामान्यस्य द्विरेकस्य यत्र वाक्यद्वये स्थिति: ।

दूरच्या देशींचा । शीतळ वारा आला ।
सुखी मी आयकीला । भाऊराया ॥
आधणाचें पाणी । ओतीतें विसावण ।
पतीच्या रागांत । मिसळतें प्रेमगुण ॥

दीपक:–सकृद् वृत्तिस्तु धर्मस्य प्रकृताप्रकृतात्मनाम् ।

नक्षत्रीं आकाश । फुलांनीं फुलवेल ।
भूषणीं शोभेल । उषाताई ॥

निदर्शना:–अभवन्वस्तुसंबंध उपमा परिकल्पक: ।

पाठच्या बहिणीवरी । भाऊ कां संतापेल ।
चंद्र आग कां ओकेल । कांहीं केल्या ॥

अप्रस्तुतप्रशंसा:–अप्रस्तुतप्रशंसा या सा सैव प्रस्तुताश्रया ।

शेवंती फुलली, वास कोणाला ग आला ॥
उद्दाम केवड[1], विंदीं दरवळत गेला ॥

( मुलींचे खेळ नाजूक व मुलांचे दांडगाईचे असतात. हें शेवंती व केवडा या अप्रस्तुत गोष्टींच्या वर्णनानें सुचाविलें.)

दृष्टांत:–दृष्टान्तस्तु सधर्मस्य वस्तुत: प्रतिबिंबनम् ।

पाउस कीं पडे । मृगाआधीं रोहिणीचा ।
भावाआधीं बहिणीचा । संवसार ॥

वळवाचा पाउस । पडून ओसरला ।
भावाला झाल्या लेकी । मग बहीण विसरला ॥
बहिण भावंडाची । त्यांच्या पोटामधीं माया ।
फोडिलं सिताफळ । आंत साखरेची काया ॥

अर्थांतरन्यासः—सामान्यं वा विशेषो वा तदन्येन समर्थ्यते ।

फोडिलं चंदन । त्याच्या केल्या बारा फोडी ।
स्त्रियांची जात वेडी । पुरुषांना माया थोडी ॥
भांडते झगडते । एकाचें एक होतें ।
मारून कां कधीं काडी । पाणी तुटतें वहातें ॥

एकंदरींत गम्यसादृश्य असे अलंकार फार. सर्वच अलंकार देणें शक्य नाहीं.

येथें दिसून येणाऱ्या उपमानविषयांकडे दृष्टि टाकणें मनोरंजक आहे. एक प्रकारें संस्कृत साहित्यशास्त्रीय विद्वत्तेपासून हें स्वतंत्र वाढल्यासारखें वाटतें. कारण संस्कृत काव्यांत अडखळण्याइतक्या विपुलतेनें सांपडणारी कमळाची व चंद्राची उपमा येथें क्वचित् सांपडते. तशाच इतर कविसंकेतामुळें ठरलेल्या हरिण, भ्रमर इ. उपमाहि थोड्याच. पुढील ओव्यांतील उपमान, विषय व प्रसंग अस्सल स्त्रीसाम्राज्यांतील आहेत असें म्हणतां येतें.

आपण बोलूं गुज, डाळिंबीसमान ।
तूं भाऊ मी बहीण, जडे नातें ॥
आधणाचें पाणी, त्यांत भात शिजवीतें ।
रुसवे, फुगवे, त्यांत सुख पिकवीतें ॥
आधणाचें पाणी, ओतीतें विसावण ।
पतीच्या रागांत, मिसळतें प्रेमगुण ॥
दूध वर येतां, पाणियानें खालीं जाई ।
कंथाचा ग राग सखी, हंसण्यानें नष्ट होई ॥

**कस्तुरींत पडली हिंगाची चिटी ।**

फेराच्या गाण्यांतील दृष्टांत ( चिटी—चिमूट )

## रसाविष्कार

येथपर्यंत काव्यदेवतेच्या बाह्य स्वरूपाचें वर्णन झालें. आत्मा जो रस त्याचें दर्शन आतां घ्यावयाचें.

**शृंगारहास्यकरुणरौद्रवीरभयानकाः ।**

**बीभत्साद्‌भुतसंज्ञौ चेत्यष्टौ नाट्ये रसाः स्मृताः ॥**

भरतानें आठ रस मानले. परंतु त्याचे मागून येणाऱ्या साहित्यशास्त्रज्ञांनीं—कांहींनीं 'शांत' व कांहींनीं 'वात्सल्य' हा नववा रस मानला. मराठी वाङ्‌मयांत 'भक्ति' रसाला स्वतंत्र स्थान दिलें पाहिजे, असें हल्लींचे साहित्यशास्त्रज्ञ डॉ. जोग, वाटवे, केळकर इ. मंडळींना वाटतें व तें मत मान्यता पावत आहे. रससंख्या किती मानावी हा आजचा प्रश्न नाहीं; फक्त प्रस्तुत वाङ्‌मयविभागांत आपणांस कोणते रस सांपडतात येवढेंच पाहणें आहे. उपरिनिर्दिष्ट रसांपैकीं रौद्र, वीर, भयानक, बीभत्स या रसांचा येथें अभाव दिसतो. शृंगार रसांत उत्कटता आहे, पण उत्तानता नाहीं. हास्य, अद्‌भुत हे लहान मुलीकडून म्हटल्या जाणाऱ्या ओव्यांत जास्त प्रमाणांत सांपडतात. कारुण्य, वात्सल्य व भक्ति यांनीं भरलेल्या ओव्या फार.

भोंडल्याच्या गाण्यांत हास्य व अद्‌भुत रस विशेष सांपडतो. वानवळाच पहायचा तर पुढीलः—

### झिपरं कुतरं

**झिपरं कुतरं सोडा ग बाई ।**
**दारिं कोण पाहुणा आला ग बाई ॥**
**चारी दरवाजे लावा ग बाई ॥ ध्रु० ॥**

**सासु पाहुणी आली ग बाई । सासुनं काय आणलन् ग बाई ।**
**सासुनं आणल्या पाटल्या ग बाई ।**
(चा.) **पाटल्या मी घेत नाहीं । संगं मी येत नाहीं ।**
(चा.प.) **झिपरं कुतरं सोडा ग बाई ॥**
**चारी दरवाजे लावा ग बाई ।**
**दारिं कोण पाहुणा आला ग बाई ॥ १ ॥**

सासरहून बोलावणें घेऊन येणाऱ्या सासरा, दीर, जाऊ, नणंद इत्यादि सर्वांची याप्रमाणें बोळवण झालेली पाहून या अभिनव झांशीवालीमुळें हा वीररस निर्माण झाला. असें जों ऐकणाऱ्याच्या मनांत येतें, तोंच पति स्वत: बोलवावयास पाहुणा येतो. त्याबरोबर

**पती पाहुणा आला ग बाई ।**
**पतीनं काय आणलन् ग बाई ।**
**पतीनं आणला चाबूक ग बाई ॥**
(चाल) **चाबुक मी घेतें । संगं मी येतें ।**
(चा.प.) **झिपरं कुतरं बांधा ग बाई ।**
**चारी दरवाजे उघडा ग बाई ।** असा स्वर बदलतो

त्राटिकेचा अवतार संपतो आणि आज्ञाधारक पत्नीच्या भूमिकेला सुरवात होऊन आणि निर्माण होणाऱ्या वीररसाचें हास्यात रूपांतर होतें.

**नणंदा भावजया खेळत होत्या ।**
**भावजयांवर डाव लागला ।**
**गोठ्यांत जाऊन रुसून बसली ।**
**सासूरवाशी सून रुसून बसली कैशी ।**
**यादवराया ! राणी रुसून बसली कैशी ॥ ८८० ॥**

या गाण्यांतही वरच्याच प्रकरणाची पुनरावृत्ति आहे. सर्वांनीं केलेली समजूत पुरी पडली नाहीं, तेव्हां शेवटीं नवरा समजूत घाल-

ण्यास अगर समज देण्यास म्हणावें हवें तर, जातो. त्याबरोबर दर वेळीं प्रत्येकाला,

**तुमचा संसार नको माला ।**
**मी नाहीं यायची तुमच्या घराला ।**

असें सांगणें बंद होऊन एकदम

**उठलि ग बाई घाबरून । ओचा घेतला सावरून ।**
**पतिशीं बोले अदबीनं ।** अशी स्थिति झाली; व पतीनें सांगितलें.

**उठ राणी चल घराला । लाल चाबुक देतों तुला ।**

त्याबरोबर **लाल चाबुक नको माला । मी येते तुमच्या घराला ।**

अशी समजूत पडते.

अल्पवयी माहेरवाशिणी; तेव्हां सासरीं आलेल्या भावजयीला बोलणें, तिची चेष्टा करणें, उणेदुरें काढणें हा त्यांचा हक्कच. " तुझ्या ग माहेरच्यांनीं काय काय दिलं ? " या गाण्यांत हें वर्णन सांपडतें.

**तुझ्या ग माहेरच्यांनीं काय काय दिलं ।**
**माझ्या ग माहेरच्यांनीं दिल्या मला पाटल्या ।**
**अशा कशा पाटल्या बाई हाताला दाटल्या ॥ इ.**

सासुरवाशीणहि कांहीं कमी नसते. सासरीं बोलतां येत नाहीं याचा वचपा माहेरीं आल्याबरोबर ती काढते. सासरचा गबाळेपणा, चिक्कूपणा, ' आतां माझ्या सासरचा वैद्य आणा बाई वैद्य आणा ' इ. गाण्यांत नमुनेदारपणें तिनें वर्णन करून सांगितला आहे.

सासरीं मुलीच्या हातून थोडेंसें तेल सांडलें. सासू वाजवीपेक्षां जास्त बोलली. या प्रसंगाचें अतिशयोक्तिपूर्ण वर्णन मुलगी माहेरीं करते आहे.

**पायांत पैंजण नाचूं कशी । गळयांत हार वाकूं कशी ।**

बाहेर मामंजी बोलूं कशी । दमडीचं तेल आणूं कशी ।
दमडीचं तेल आणलं । सासूबाईचं न्हाणं झालं ।
मामंजींची दाढी झाली । भाओजींची शेंडी झाली ।
वन्सबाईची वेणी झाली । उरलेलं तेल झाकून ठेवलं ।
लांडोरीचा पाय लागला । वेशीबाहेर ओघळ गेला ।
उंट आला वाहून गेला । हत्ती आला पोहून गेला । इ.

अतिशयोक्त वर्णनानें अद्भुतता निर्माण करते. पण शेवटीं

सासूबाई, सासूबाई अन्याय झाला ।
चार चाबुक जास्ती मारा । पण दूधभात खायला घाला ॥

असें म्हणते. या सर्व वर्णनांनीं हास्यरसच निर्माण होतो. कारण, सर्वांचा सारांश,

अस्सं सासर द्वाड बाई कोंडूनी मारीतं ।
अस्सं माहेर गोड- बाई खेळाया मीळतं ।

शृंगाररसांत उत्कटता असते. वऱ्हाडी लोकगीतांतील ‘ काय वहिनी मनांत ’ किंवा ‘ सूर्य डोलला दिवसा ’ हीं प्रकरणें व इतरहि कित्येक प्रकरणें त्याचीं उदाहरणें म्हणून सांगतां येतील. याखेरीज प्रत्येक रसाचें उदाहरण देत न बसतां नमुन्यादाखल शृंगार, करुण, इ. रस ज्यांत सामावले आहेत असें एक लहानसें प्रकरण सांगून मग या वाङ्मयाच्या कांहीं वैशिष्ट्यांकडे वळणें बरें.

## मैत्रिणींचें हितगुज

मिळाल्या भेटल्या, गुजाच्या गुजराणी ।
लहानपणींच्या मैत्रिणी ताईमाई ॥
आपण बोलूं गुज, कशाला हवा दिवा ।
आहे चांदण्याची हवा, उषाताई ॥

तिन्हीसांजा झाल्या, दिव्यांतील वात डोले ।
सखी माझी गोष्ट बोले, हृदयांतील ।
किती ग वरसांनीं, भेटलों दोघीजणी ।
सांठलें किती मनीं, बोलूं आतां ॥

पहिली मैत्रिणः– शत ग जन्मांची पुण्याई आली फळा ।
माझ्या कुंकवाची कळा, सूर्यासारी।
लाखांत एकादा, तसा माझा पती ।
अनुरक्त परीप्रति भाग्य माझें ।
पुरविती हौस मैत्रिणी विचारून ।
आम्ही ग नांदतों, दोघे हंसून खेळून ॥
काय विचारीशी, कधीं ना सखी तंटा ।
जीवेंभावें ओवाळीन, प्रेमरंगा माझ्या कंथा ॥
काय विचारीशी, आहें हो खरी सुखी ।
तुझ्या गळ्याची शप्पथ, कसें खोटें बोलूं सखी ॥

दुसरी मैत्रिण आपल्या प्रेमळ पण तापट नवऱ्याचें वर्णन करते—
काय तूं पुसशी, पळसा तीन पानें ।
संसारीं समाधानें, नांदूं सखी ॥
काय विचारीशी, होते का धूसफूस ।
मैत्रिणी येते घूस, घरा कधीं ॥
कधीं रागावती, बोलती कधीं गोड ।
मैत्रिणी. अशी खोड, कंथा माझ्या ॥
कधीं फुले ग वसंत, तुझी सखी तेव्हां खुले ।
कधीं वैशाख वणवा, सखी तुझी होरपळे ॥
आधणाचें पाणी, त्यांत भात शिजवीतें ।
रुसवे फुगवे, त्यांत सुख पिकवीतें ॥
आधणाचें पाणी, ओतितें विसावण ।
पतीच्या रागांत, मिसळतें प्रेमगुण ॥

दूध वर येतां, पाणियानें खालीं जाई ।
कंथाचा ग राग माझ्या, हंसण्यानें नष्ट होई ॥
कंथ रागावतां सखी, हंसून बघते ।
क्रोधी मुद्रा मोहावते, क्षणामाजी ॥

तिसरी सखी आपल्या दुर्दैवाचें वर्णन करते,

रूप ना लावण्य एक नाहीं गुण अंगीं ।
संसार त्याच्या संगीं, करणें दैवीं ॥
रूप ना लावण्य, सोडीना कधीं माडी ।
करितो नासाडी, जीवनाची ॥
रात्र ना दिवस, चंदनवेलीला ।
विळखा देऊन राहिला, नाग जेवीं ॥
समुद्राच्या कांठीं सखी, मोतींपोवळयाच्या वेली ।
दैवाची उणीव, कडू वेल हातीं आली ॥
जीवाला जीव देत्यें, जीव देऊन पाहिला ।
पाण्यांत पाषाण, अंतीं कोरडा राहिला ॥
फोडिलं चंदन, त्याच्या केल्या बारा फोडी ।
स्त्रियांची जात वेडी, पुरुषांना माया थोडी ॥
सेवेला करित्यें, झटून झिजून ।
चीज त्याचें करी कोण, मैत्रिणी गे ॥
हंसेना बोलेना, कोणी सासरीं ग मशीं ।
मैत्रिणी जीवाशीं, कंटाळल्यें ॥
गळा घालूं गळा, ये ग रडूं पोटभरी ।
पुन्हा जायाचें सासरीं, चारा दिशीं ॥

पहिली मैत्रीण सांत्वन करते—

नको ग रडूं गडे, होईल सारें भलें ।
अवसेचें काळें कोठें राहे ॥
नको रडूं गडे, होईल तुला सुख ।

प्रार्थीन गजमुख, तुजसाठीं ॥
नको रडूं गडे, होईल सारें भलें ।
चिखलीं कमळें फुलतात ॥
नको रडूं गडे, जरी वरून पाषाण ॥
झिरपे आंतून, फुटतील ॥
मैत्रिणी भेटती, हांसती रडती ।
फिरुन दूर जाती, संसारांत ॥
मैत्रिणी भेटती, जीवींचें बोलती ।
फिरून दूर जाती, संसारांत ॥

## वैशिष्ट्य

साहित्यशास्त्रकारांनीं मानलेल्या रसांपैकीं शृंगार, करुण, हास्य, अद्भुत, वत्सल व भक्ति हे रस यांत आहेत. परंतु तुसतें येवढें म्हणून या श्रुतिवाङ्मयाचें बरोबर वर्णन होणार नाहीं. भाऊ व बहीण यांचें परस्पर प्रेम, आईबाप व मुलगी यांचें परस्पर प्रेम यांचीं इतकीं रसाळ वर्णनें येथें आहेत कीं, तीं वरील रसांत सामावत नाहींत व पूर्वी कोणी म्हटलें नाहीं म्हणून येथें त्यांचेकडे डोळेझांक करणें व त्यांना रसप्रपंचांत स्थान न देणें योग्य नव्हे. शृंगार, वात्सल्य इत्यादि विशिष्ट व्यक्तिगत प्रेमाचें वर्णन करणाऱ्या नांवापेक्षां स्नेह या नांवानें त्या सर्व उत्कट जिव्हाळ्याचें वर्णन करणें या वाङ्मया-पुरतें तरी योग्य होईल.

स्नेह

मायलेकी | भाऊबहीण | पतीपत्नी | मायलेकरूं | देव व भक्त

पोवाड्यांत जसा वीररस, लावणींत शृंगार, तसा या श्रुति-

वाङ्मयांत हा ‘ कौटुंबिक जिव्हाळा ’ होय.

सर्व वाङ्मय स्त्रीच्या दृष्टिकोनांतून निर्माण झालेलें. त्यामुळें तिला येणाऱ्या अनुभवाभोंवतींच सर्व वाङ्मयनिर्मिति जणुं रंगण धरीत आहे. बालविवाहाच्या चालीमुळें मुलगी फार लहानपणीं सासरीं जाई. त्यामुळें तिला विरहाचा पहिला चटका बसतो तो आईबाप व भावंडें यांचेपासून दुरावण्याचा. बरोबरचा खेळगडी भाऊ परका होतो. भूक लागेल हें ओळखून त्यापूर्वींच खाऊ घालणारी आई, खेळ देऊन कौतुक करणारा बाप दुरावतात. नवऱ्याची ओळखच नसते. मग त्याचेबद्दल जिव्हाळा उत्पन्न होणें व नव्या कुटुंबांतील तो आपला आधार आहे असें वाटणें दूरच असतें. ‘ अमक्याच्या जिवासाठीं आईबाप सोडले. ’ असा उखाणा ती घेते तो केवळ वडील माणसें शिकवितात म्हणून ! प्रियकराचा सहवासच घडलेला नसतो. तेथें विरह कुठचा ? पहिला विरह जाणवतो तो माहेरचा व म्हणून पहिल्या स्फूर्तीनें येणाऱ्या ओंव्या इतक्या जिव्हाळ्यानें येऊन स्वतंत्र रसपदवीस पोंचतात.

सासर वाईट मिळालें, सासू जाच करूं लागली, तर यांत आणखी करुण रस निर्माण होतो. कालक्रमानें नवऱ्याचा सहवास मिळून त्याचेबद्दल जिव्हाळा उत्पन्न होतो. मागून अपत्यप्रेमाचा अनुभव येतो व ती स्वतःच्या संसारांत रंगून जाते. तरी पण माहेरचा हक्काचा आपलेपणा मनांत असतोच. भाऊ सत्तेचा वाटतो; भावालाहि उलट तसेंच वाटतें. पण भावजय येऊन तो स्वतःच्या संसारांत गुंतूं लागला म्हणजे आपलेपासून कांहीं तरी दुरावत असल्याची जाणीव तिला येते. पण भावाच्या सुखाचा विचार करून ती भावजयीशीं प्रेमानें वागण्याचा प्रयत्न करते. पण भावना अशी कीं,

**भावा ग परीस, भावजय ग रतन ।**
**सोन्याच्या कारणें । चिंधी करावी जतन ॥**

भाऊ स्वत:च्या मुलींत बहिणीला थोडा विसरला तर तिला वाटतें.

**वळवाचा पाउस, पडून ओसरला ।**
**भावाला झाल्या लेकी, मग बहिण विसरला ॥**

सासरीं समाधान असलें तरी एक दिवस तरी माहेरपण मिळण्याची आशा उरते.

**बहिणीला भाऊ, एक तरी तो असावा ।**
**पावल्याचा खण, एका रात्रीचा विसावा ॥**

भ्रताराच्या राज्यांत सारें मिळालें तरी माहेरचें घराणें चालू रहावें. एक तरी भाऊ असावा असें वाटतें; नाहींतर दु:ख वाटतें.

**भ्रताराच्या राज्यीं, सारं मिळालं अटीचं ।**
**नाहीं देवा दिलं, सख्खं भावंड पाठीचं ॥**

पुढें तिच्याच मुली मोठ्या होऊन त्यांच्या विरहाचा अनुभव येतो. मातृहृदय कळवळतें व त्यांचें माहेरपण करण्याच्या काळजींत तिचें स्वत:चें माहेर मागें पडतें. मुलाबद्दल वात्सल्य, कौतुक, अभिमान सर्व असलें तरी हा विरहाचा अनुभव येत नाहीं. विरहाच्या अनुभवानें मायलेकींचा परस्परजिव्हाळा काव्यांत जास्त आर्ततेनें ओतला जातो. जर पूर्वीच्या रूढ पद्धतीप्रमाणें भावाची मुलगी तिचे मुलास दिली गेली तर त्या निमित्तानें तिचा माहेरचा संबंध जास्तच जवळ येतो. जसें,

**चला आत्याबाई, माहेराला जाऊं ।**
**न्यावयाला आला, माझा बाप तुमचा भाऊ ॥**

नमुन्यादाखल एकदोन उदाहरणें पुढें दिलीं आहेत. मुलीचें

आईबद्दल प्रेम—

जेवण जेविलें खिरीवरी केळं, माझ्या वयाचं राज्य भोळं
केलं साखरेचं आळं, आंत तूप डळमळ ॥
माझ्या आईनं न्हाणीलं, कसं कसोकेसीं लोणी।
सारी उकलली वेणी, गेला वास द्वारकोणीं ॥
उभ्या चिंचीची साउली, चिंचीच्या ते बरोबर।
काय माउलीची सर, करील ते सावतर ॥
बाई चिंचीची साउली, राहे चिंचीच्या पुरती।
सग्या माउलीची सर, कशी करील चुलती ॥
गणगोतांनीं भरून, मायेविना सारा गांव।
कंठ पाण्यानं सुकतां, घेते विहिरीची धांव ॥
जन्मली मी तुझ्या पोटीं, कशी म्हणूं तूं ओंगळ।
गंगेपरीस निर्मळ, तूं ग केळी मी कंवळ ॥

आईचें मुलीबद्दल प्रेमः—


माझ्या जीवाला जड भारी,
नका सांगूं एकाएकीं।
व्याकूळ होईल ती यमूबाई।

बहिणीचें भावावरील प्रेमः—

बहिणभावंडाची, जोडी बसली बावरी ॥
राघू मारीत भरारी, मैना झालीया बावरी ॥
बहिण भावंडांचा, झगडा रानींवनीं।
बहिणीच्या डोळा पाणी, भाऊ चिंतावला मनीं ॥
सुपभर सोनं, नार लेतिया कवाबवा।
माझा बंधुराया, चंद्रहार केला नवा ॥
शेजीच्या बंधवाला, दादा म्हणायची चोरी।
मांडीला देतें मांडी, सख्या बंधूची गोष्ट न्यारी ॥
लोकाच्या लग्नांत, नाहीं कुंकवाचं बोट।

बंधूच्या लग्नांत, घोळ पातळाची अट ॥
आम्ही तिघी बहिणी, जशा वनींच्या बारवा ।
माझ्या बंधुराया, माझा सुकेशा गेला गांवा ॥
सोयऱ्याचे बोल, कडुलिंबयाची वाटी ।
माझ्या बंधुराया, घोटावं बहिणीसाठीं ॥
एकुलता एक, नको म्हणूं शेजी नारी ।
माझा बंधुराया, मला हजाराला भारी ॥
माझ्या गळयावरं सुरी, जीव माझा जाऊं राहू ।
माझ्या बांधवाची आण, कशासाठीं वाहूं ॥

एकंदरींत स्त्रीजीवनांतील काव्यस्फूर्तींचा झरा बालविवाहामुळें होणाऱ्या माहेरच्या ताटातुटींतून बाहेर पडतो व म्हणून आई, भाऊ इत्यादि माहेरच्या माणसांबद्दलची ओवी इतकी कळवळून बाहेर पडते. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचें हें वाङ्मयाला देणें असेल काय ?



# १० संतचरित्रकार पांगारकर

(ले.–अवधूत महादेव जोशी, एम्.ए., व्हिक्टोरिया कॉलेज, ग्वाल्हेर.)

'शूर मर्दांचा पोवाडा। शूर मर्दांनें ऐकावा ॥

—शाहीर तुलसीदास

तुळसीदास शाहीरानें 'तानाजीच्या पोवाड्यां'त घातलेले हे उद्गार थोड्या फरकानें संतचरित्रकार पांगारकर यांस सर्वतोपरी लागू पडतात. 'शूर मर्दांचा पोवाडा, शूर मर्दांनें ऐकावा–आणि गावा' अशी पुस्ती जोडावी आणि पांगारकरांच्या संतचरित्रांकडे पाहावें, म्हणजे या म्हणण्याची सार्थता पटेल. महाराष्ट्रांतील सन्तकवि काय किंवा पंतकवि काय, सर्वच भाविक भगवद्भक्त होते. मुक्तेश्वर-वामन–मोरोपंतादि पंडितांनींहि आपली आख्यानक कविता 'अळवण हरिविण कविता' हें तत्त्व सतत डोळ्यांसमोर ठेवून लिहिली आहे. 'वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें' अशी त्यांची परमार्थदृष्टि असे. अशा भगवद्भक्तांचा चरित्रकारहि तसाच भाविक असावा; तसाच प्रेमळ, भक्तियुक्त अंत:करणाचा असावा, हाच तुळसीदास शाहीराच्या उद्गारांचा अर्थ आहे. अंत:करणांत खरी भक्ति व श्रद्धा असल्याशिवाय संतांच्या वाङ्मयाचें व चारित्र्याचें मर्म समजावयाचें नाहीं. ही गोष्ट अमान्य करतां येत नाहीं. "पूर्वपरंपरागत विचारसरणी आपलीशी होऊन धर्मविचारांचें यथार्थ स्वरूप त्याच्या (संतचरित्रकाराच्या) ध्यानांत आलें पाहिजे. बहुतेक महाराष्ट्रसंत भागवतधर्मानुयायी म्हणजे वारकरी असून पंढरीच्या वारकरी सांप्रदायांत मिसळून गेल्या-

शिवाय त्या सांप्रदायाचें शुद्ध स्वरूप व परंपरागत अर्थसंगति हीं त्यांच्या ध्यानांत येणार नाहींत." असें पांगारकरांनीं एकनाथ-चरित्राच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. 'अलीकडील इंग्रजी शिकलेले विद्वान् संतांचे ग्रंथ नवीन विचाराच्या चष्म्यानें लावण्याचा प्रयत्न करतात. पण सांप्रदायिक लोकांप्रमाणें या स्वतंत्र विचारांच्या लोकांना पूर्वापार भासणारे विरोध मोडून ग्रंथांतील अनेक उद्गा-रांची एकवाक्यता करतां येत नाहीं.' असा त्यांचा ठाम समज असे. ज्ञानेश्वरींतील एखाद्या विवाद्य ओवीचा अर्थ पांगारकरांस विचारावा, व भिडयांनीं असा असा अर्थ दिला आहे असें सांगावें, म्हणजे पांगारकर उसळून म्हणत, "तें मला सांगूं नका! या इंग्रजी पढि-कांना ज्ञानेश्वरीचें मर्म काय दगड समजणार?" हा प्रकार आम्हीं स्वतः अनुभविलेला आहे. यांत कोणाला सांप्रदायिकाचा दुरभिमान दिसो, किंवा व्यक्तिशः पांगारकरांचा दर्प दिसो. फडा काढणाऱ्या नागाप्रमाणें सात्त्विक क्रोधानें उसळणाऱ्या पांगारकरांच्या म्हणण्यांत अगदींच तथ्य नाहीं असें नाहीं, असें त्यांच्या प्रतिपक्षीयांसही पटावें असा आत्मविश्वास त्या ठिकाणीं दिसे. प्रसिद्ध गायक रहिमतखाँ यांस गावयास लावावयाचें म्हणजे कुणातरी बेसूर गाणाऱ्याला आधीं गावयास सांगावयाचें; म्हणजे मग खाँसाहेबांस चेव येऊन ते गाऊं लागत असें सांगतात. तद्वत् अशा एकाद्या 'इंग्रजी पढिकानें' संतकाव्याचा लाविलेला अर्थ पांगारकरांसमोर ठेविला, कीं पांगारकरांचें जें भाष्य सुरू व्हावयाचें तें ऐकलें म्हणजे खरो-खरीच असें वाटे कीं, संतवाङ्मयोदधींतील रत्नें हातीं लागण्यासाठीं त्यांत दीर्घकाल निमज्जन करणारा पाणबुड्याच पाहिजे; केवळ वरवर डुबक्या मारणाऱ्याच्या हातीं तीं लागणें कठीण! आणि असें निमज्जन करण्यासाठीं केवळ पढिकपणा उपयोगी पडावयाचा

नाहीं, तर त्यास भाविकपणाची जोड मिळाली पाहिजे; 'तेथें पाहिजे जातीचें' हेंच खरें. मराठी पोवाड्यांचें इंग्रजी भाषांतर एकादा ऑक्वर्थसाहेब करूं शकला तरी त्यांतील खरें स्वारस्य जसें एकाद्या मराठ्याला कळेल तसें साहेबमजकुरास थोडेंच समजणार ? पोवाडे-लावण्यांतील मराठमोळ्याची खूण मराठ्याला चटकन् पटेल, त्याच्या श्रवणानें मराठ्याचें अंतःकरण हेलावेल, त्यांत मराठा रंगूं शकेल; तो अवर्णनीय अनुभव परकीयांना येणें कठीण !

पांगारकरांचें अंतःकरण मूलतःच भक्तिप्रवण होतें. त्यानें त्यांस संतवाङ्मयाच्या अभ्यासास स्फूर्ति दिली व वाढत्या अभ्यासाबरोबर हा भक्तिभाव वाढत गेला. देवापुढें कीर्तन करतांना तुकारामबोवा भान हरपून नाचूंबागडूं लागत, असें आपण वाचतों. भजनाच्या रंगांत आले म्हणजे पांगारकरांनाहि स्थलकालाचें भान रहात नसे. 'कुतना, थमाल ले थमाल अपुल्या गाई', 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' यांसारखीं आपलीं आवडतीं गीतें पांगारकर गुणगुणत आहेत, गुणगुणतां गुणगुणतां हळुहळू आवाज चढूं लागला आहे आणि थोड्या वेळानें टाळ्या वाजवीत मोठ्या स्वरानें पांगारकर गाणीं गातां गातां डोलताहेत; आणि त्यांचे मित्र हळूच त्यांच्या कानाशीं लागून 'अहो पांगारकर, तुम्ही रेल्वेच्या फलाटावर उभे आहांत—लक्षांत आहे ना ?' असें त्यांस स्मरण करून देत आहेत;—हा प्रकार आमच्या पहाण्यांतला आहे आणि अनेकांच्या असेल ! याला पुष्कळ लोक ढोंगीपणा म्हणत व पांगारकरांची कुचेष्टा करीत. पांगारकरांना आपल्या निंदकांची दखल नव्हती असें नाहीं. 'धार्मिकतेमुळें मला जुन्या वळणाच्या सर्व लोकांपासून सर्वत्र प्रेमादरच मिळाला, तथापि नवीन विचाराच्या लोकांपासून त्यामुळेंच पुष्कळशी उपेक्षा, छल व निंदाहि सहन करावी लागली.' हें त्यांनीं आपल्या

आत्मचरित्रांत नमूद करून ठेविलें आहे. तथापि ' गाडी उलटली आहे, काळ बदलला आहे, विचारांत क्रांति झाली आहे...पूर्वी धर्म-लंडपणावर टीका होत असे, आतां धर्म्य आचरणाची कुचाळी होत आहे, ' याची जाणीव ठेवून ' लाभालाभ समान मानून आपलें कर्तव्य करीत राहण्याचें शिक्षण मिळत आहे हेंहि कांहीं वावगें नाहीं,' असें त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें आहे. खरा प्रकार काय असेल, कोण सांगूं शकणार ? एवढें मात्र खरें कीं, संतवाङ्मयाचा एवढा गाढ व्यासंग करून तत्संबंधीं इतकें प्रचंड वाङ्मय निर्माण करावयाचें, व्याख्यान-प्रवचन-कीर्तनांत हजारों विद्वान व बुद्धिप्रधान श्रोत्यांस तासन्तास रंगवून डोलावयास लावावयाचें, ही किमया अंतःकरणांत भक्तीचा खरा जिव्हाळा असल्याशिवाय साधणें असंभवनीय वाटते !

पांगारकरांच्या मनोभूमींत हें भक्तिप्रवणतेचें बीज बालपणींच पेरलें गेलें असें त्यांच्या आत्मचरित्रावरून दिसतें. वयाच्या तिसऱ्या वर्षी आजीच्या मांडीवर डोकें ठेवून निजलेल्या ' बाळा ' च्या कानांत आजीनें गायिलेलें समर्थांचें ' अंजनीगीत ' शिरलें, व ' त्या वेळच्या चालीसकट तें माझ्या कानांत भरलें तें अद्याप मला आठवतें. ' तदनंतर विद्यार्थिदशेंत आगरकरांसारखे नास्तिक गुरु भेटले असतांहि पांगारकरांची आस्तिक्य बुद्धि आणि भक्तिप्रवणता कमी न होतां उत्तरोत्तर वाढत गेली. " राम, कृष्ण व दत्त यांच्या मूर्ति पाहून चित्त एकाग्र होत नाहीं काय ? " असें पांगारकरांनीं वर्गात विचारावें, आणि आगरकरांनीं तात्काल " अरे, या देवधर्माच्या खुळया कल्पना डोक्यांतून आधीं काढून टाक पाहूं ! " असें ठासून सांगावें ! तरी आगरकरांविषयींची त्यांची आदरबुद्धि तिळमात्र कमी झाली नाहीं. ' आगरकरांसारखा

नास्तिक लक्षावधि आस्तिक म्हणविणाऱ्या रसशून्य माणसांपेक्षां अधिक श्रेष्ठ होय ' असें ते म्हणत. सतत सातआठ वर्षें गुरुशिष्य-संबंध आल्यामुळें आगरकरांच्या नास्तिक मतांचा परिणाम शिष्याच्या मनावर कदाचित् झालाहि असता; परंतु त्यापासून ' देवानें आपला बचाव केला ' असें त्यांनीं आत्मचरित्रांत म्हटलें आहे. मनाच्या उदासीन अवस्थेंत खेड येथें राहत असतां ' एके दिवशीं नारायणानें कृपा केली. ' सहज सृष्टिसौंदर्याचें अवलोकन करीत असतां समाधि लागून जीवभाव हरपला आणि

**पूर्वीं कधिंही नाहीं देखिलें कोठें नच ऐकिलें ।**
**हरिचें प्राप्त गूज जाहलें ॥**
**मार्ग उजळला पूर्वजपुण्यें आवडले हरिगुण ।**
**हरीनें सावरिला ' लक्ष्मण ' ॥**

हरीनें लक्ष्मणाला आत्मसाक्षात्कार घडविला. परमार्थसाधनाची उत्कंठा दुणावली. ज्ञानेश्वरी, नाथभागवत, तुकोबाची अभंगवाणी, दासबोध इत्यादि ग्रंथांचीं पारायणें होऊं लागलीं. भक्तिभावाचा प्रवाह दुथडी वाहूं लागला. पांगारकर संतवाणीशीं समरस झाले व स्वतः संत झाले.

परमार्थाच्या मार्गावर सत्संग, सच्छास्त्राध्ययन, गुरुकृपा व साक्षात्कार हे चार टप्पे आहेत. हे चारी टप्पे पांगारकरांनीं प्राचीन संतांच्या संगतींत गांठले. त्यांच्या आयुष्यांत त्यांना कांहीं संतांचा प्रत्यक्ष सहवास घडला. उमरावतीचे गुलाबराव महाराज, पंढरपूरचे सीताराम महाराज, माहुलीचे ब्रह्मानंदस्वामी, पुण्याचे ज्ञानेश्वरभक्त केशवराव देशमुख, यांसारख्या पारमार्थिकांचा सत्संग घडला असला तरी, सत्संगाचा खरा आनंद त्यांनीं ज्ञानेश्वर-एकनाथ-तुकाराम-समर्थ यांच्या संगतींतच लुटला. विद्यार्थिदशेंत त्यांनीं इतर शास्त्रांचें अध्ययन केलें असलें तरी ज्ञानेश्वरी-नाथभागवतादि ग्रंथां-

नच त्यांना सच्छास्त्राध्ययनाचें खरें समाधान लाभलें. विद्यालयीन गुरूंची कृपा त्यांना लाभली असेल, परंतु "मला दासबोधानें अध्यात्माची दिशा दाखविली, ज्ञानेश्वर-नाथांनीं स्वसुखानुभव घेण्यास शिकविलें, व तुकोबांनीं नामरंगानें चित्त रंगविलें." तेव्हां आपल्यावर खरी कृपा या गुरूंचीच झाली अशी त्यांची श्रद्धा होती. आपल्या संतांना ईश्वरसाक्षात्कार झाल्याचें आपण वाचतों, तशा प्रकारचा साक्षात्कार पांगारकरांना कदाचित् झाला नसेल; परंतु "अध्यात्मशास्त्राचा सतत अभ्यास, संतसमागम व अनुभवपदीं चढण्याची तळमळ, या तीन प्रतीति येत चालल्या कीं परमार्थ सिद्ध होतो. ...पदोपदीं नारायणाची भावना होते... भाविकाला देव पावलोंपावलीं सांभाळीत असतो, आपल्या प्रेमाचें साजुक सुख देतो. हा अनुभव घेऊन पहातां भक्ताला देवाचा भ्रम होतो असें अनतुभवी म्हणतात... पण... देव प्रत्यक्ष आहे, आंतबाहेर तोच एक आहे." ही भावना प्रत्यक्ष अनुभवानें दृढ झाली म्हणजे याहून निराळा साक्षात्कार तो काय घडावयाचा? असे कांहीं अनुभव पांगारकरांनीं आपल्या आत्मचरित्रांत सांगितले आहेत. ज्या प्रकारांस प्राकृत जन योगायोग किंवा धर्मभोळ्या मनाचे खेळ समजतात, त्यांस भाविकजन ईश्वरसाक्षात्कार मानतात. त्यांत योगायोगाचा भाग असला तरी तो योगायोग परमात्म्याच्या कृपेनें घडून आला ही भावना चित्तांत दृढ होऊन देवावरील श्रद्धा दुणावते. हा भाविकांच्या दृष्टीनें साक्षात्काराचा भाग होय. स्वप्नांत तुकारामबोवांचें दर्शन घडल्याचा पांगारकरांचा अनुभव प्राकृत जनांच्या दृष्टीनें स्वप्नसंभ्रम ठरत असला तरी पांगारकर त्यास साक्षात्कारच मानतात. येथें तर्कापेक्षां भावनेचें महत्त्व अधिक आहे. "देवाभक्तांच्या कृपादृष्टींतला मी आहें असें मला मनापासून वाटतें, व

मी या श्रद्धेच्या बळावर सदाफुलीसारखा प्रसन्न असतों." असें पांगारकर सांगत. ही श्रद्धा उत्पन्न होऊन चित्ताची शुद्धि व प्रसन्नता प्राप्त होणें हा भाविकांच्या दृष्टीनें साक्षात्कार होय.

पांगारकरांच्या अंतरंगाचा एवढा प्रपंच करण्याचें कारण असें कीं संतचरित्रें लिहिण्यास त्यांची मनोभूमि सर्वस्वीं योग्य होती हें ध्यानांत यावें. "संतचरित्रकार भाविक, रसिक व चिकित्सक असला पाहिजे अशी माझी समजूत आहे. परंपरा, उपासना व भक्तिभाव यांच्या उत्कटतेशिवाय संतांचीं रहस्यें समजून त्यांचे ग्रंथ उलगडत नाहींत" असें पांगारकरांनीं वेळोवेळीं सांगितलें आहे. कलावन्ताचा चरित्रकार स्वतः कलाभिज्ञ असला, क्रीडापटूचा चरित्रकार स्वतः क्रीडाभिज्ञ असला, राजकारणी पुरुषाचा चरित्रकार स्वतः राजकारणज्ञ असला, तर चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें व कार्याचें खरें मर्म त्याला उलगडून दाखवितां येईल. तद्वत् संतचरित्रकार स्वतः भाविक भक्त असला तर हा 'समसमां संयोग' चरित्रलेखनाला पोषक होतो. यासंबंधीं थोडेंसें विवेचन सुरवातीला केलेंच आहे. अर्थात् त्याबरोबर चिकित्साबुद्धिहि पाहिजे याची जाणीव पांगारकरांना आहे. "पूर्वपरंपरा आंधळेपणानें घ्यावी आणि स्वबुद्धीनें विचार करूं नये असें माझें म्हणणें नाहीं; तथापि पूर्वपरंपरा नीट समजून घेतल्याशिवाय स्वबुद्धीचें प्रस्थ माजवीत बसूं नये एवढेंच माझें म्हणणें आहे." केवळ चिकित्सक बुद्धि असून भागावयाचें नाहीं एवढाच त्यांच्या म्हणण्याचा अर्थ. संतचरित्रें लिहिण्यासाठीं आपली मनोभूमिका योग्य आहे ही जाणीव पांगारकरांना होती. "परंपरेचें साहाय्य व श्रवणमनननिदिध्यास या दोन्ही प्रकारांनीं तुकोबांचा संग दीडदोन तपांचा झाला आहे असें स्पष्ट सांगण्यास मला

कांहीं भय वाटत नाहीं.'' असें तुकारामचरित्र लिहावयास घेतांना त्यांनीं मोठ्या आत्मविश्वासानें म्हटलें आहे. तथापि आपण अंगिकारिलेलें कार्य अत्यंत कठीण आहे, तें पार पाडण्याची योग्यता आपल्या ठिकाणीं नाहीं, हा आपल्या प्राचीन कवींनीं व्यक्त केलेला विनम्र भावही त्यांच्या ठिकाणीं आढळतो. ''महात्म्याच्या चरित्राचें रहस्य जाणणें किती कठीण आहे हें काय सांगायला पाहिजे? महात्म्यांच्या चरित्राला हात घालणें हें खचित आकाशाला गवसणी घालण्यासारखें अत्यंत धाडसाचें आहे. महात्म्यांचें चरित्र महात्म्यांनींच लिहावें. संत होऊन संताला जाणावें. आपण अंगें संत झाल्याशिवाय संतचरित्राचें वर्म ठावें होत नाहीं. तुकोबासारख्यांचें चरित्र तुकोबासारख्यांनींच लिहावें; तथापि मी हें चरित्रलेखनाचें साहस करीत आहें... साधुसंतांच्या कृपाशीर्वादाच्या बळावरच मीं हें काम हातीं घेतलें आहे. पार पाडणारे तेच समर्थ आहेत. भक्तचरित्र गाणारेहि भगवंताला प्रिय होतात. ... हें पुण्यकार्य भगवंताच्या प्रीतीला पात्र होण्याचा सर्वोत्कृष्ट उपाय आहे अशी दृढ श्रद्धा चित्तीं बाळगून श्रीपांडुरंगस्मरणपूर्वक या वाग्यज्ञास प्रारंभ करितों.'' तुकारामचरित्राच्या सुरवातीस काढलेले हे उद्गार ज्ञानेश्वरीच्या प्रास्ताविक भागांतील ज्ञानेश्वर महाराजांच्या उद्गारांची आठवण करून देणारे आहेत. 'ऐसें जें अगाध। जेथ वेडावती वेद। तेथ अल्प मी मतिमंद। काय होय॥' असें म्हणूनहि ज्ञानेश्वर गीतार्थ सांगण्यास प्रवृत्त होतात याचें कारण जें 'सानुकूल श्रीगुरु। ज्ञानदेवो म्हणे॥' तसेंच 'एऱ्हवीं जरी मी मूर्ख। जरी जाहला अविवेक। तऱ्ही संतकृपादीपक। सोज्वळु असे॥' असा नम्रभाव ज्ञानेश्वरांनीं प्रकट केला आहे. 'क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः। तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्।'

हे कविकुलगुरूचे ‘ रघुवंशा- ’ च्या प्रारंभींचे उद्गार ह्याच नम्रभाव दाखवितात. यांत आत्मविश्वासाचा अभाव नाहीं, तर अभिजात विनयशीलता आहे. आत्मविश्वास आणि विनय यांच्या योग्य मर्यादा सांभाळून संतचरित्रलेखनाचें कठीण कार्य पांगारकरांनीं पार पाडलें आहे.

काव्य, इतिहास, चरित्रें इत्यादि वाङ्मयाचा व्यासंग पांगारकरांनीं विद्यार्थिदशेंतच आरंभिला. शास्त्रीबोवांच्या ‘ निबंधमालेनें’ त्यांचे ठिकाणीं वाङ्मयप्रेम व ग्रंथकर्तृत्वाची महत्त्वाकांक्षा उत्पन्न केली हें त्यांनीं स्वत: नमूद केलें आहे. इतर वाङ्मयप्रकारापेक्षां संतवाङ्मय व चरित्रें यांची आवड स्वभावत:च त्यांस अधिक होती. “ सत्संगांत, संतांच्या ग्रंथांत व चरित्रांत आपण रंगावें व रंगवावें, भक्त्यानंद चाखावा आणि चाखवावा, आणि ‘ एकमेकां करूं साह्य । अवघे धरूं सुपंथ ॥ ’ या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें वक्ते, श्रोते, लेखक व वाचक या सगळ्यांनीं मिळून हरिप्रेमानंद घ्यावा आणि द्यावा- ” ही सदिच्छा संतवाङ्मयाच्या अध्ययनानें उत्पन्न झाली व त्यांतूनच संतचरित्रांचा जन्म झाला. १९०० ते १९०८ पर्यंतचीं आठ वर्षें मोरोपंतांच्या वाङ्मयसंगतींत गेलीं व याचा परिपाक १९०८ सालीं सुमारें साडेसहाशें पृष्ठांच्या ‘ मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन ’ या ग्रंथाच्या रूपानें महाराष्ट्रासमोर आला.

यापुढें दोन वर्षांनीं १९१० मध्यें ‘ एकनाथचरित्र ’ आणि १९१२ मध्यें ‘ ज्ञानेश्वरचरित्र’ हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. या पुढचीं सातआठ वर्षें ‘तुकारामचरित्रा’ची सामुग्री जमविण्यांत गेलीं. १९२० सालीं प्रसिद्ध झालेल्या ‘ तुकारामचरित्रा ’ नें पांगारकरांच्या कीर्तींत मोठी भर टाकिली. यानंतर दोन वर्षांनीं ‘मुक्तेश्वरचरित्र’ प्रसिद्ध झालें. याशिवाय नामदेव, रामदास, श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादिकांचीं चरित्रें

लिहून संतचारित्रमाला महाराष्ट्र-वाचकांस अर्पण करण्याचा त्यांचा मानस होता. परंतु तो पूर्ण झाला नाहीं. १९३८ सालीं 'चरित्र-चंद्र' हा आत्मचरित्रात्मक ग्रंथ प्रसिद्ध करून पांगारकरांनीं आपल्या चारित्रलेखनावर कळस चढविला. या ग्रंथानें मराठी आत्मचारित्र-वाङ्मयांत उत्तम भर घातली आहे. रामदासांचें चारित्र स्वतंत्र चरित्रग्रंथाच्या स्वरूपांत प्रसिद्ध न होतां पुढें 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या वाङ्मयेतिहासग्रंथाच्या तिसऱ्या भागांत प्रसिद्ध झालें. त्यांत रामदासाव्यतिरिक्त तत्कालीन इतर कवींचाहि परामर्ष घेतला असून रामदासांचें चारित्र व वाङ्मयविवेचन हा त्यांतील एक भाग आहे. अतएव स्वतंत्र चारित्रग्रंथांत त्याची गणना करतां येत नाहीं.

'मोरोपंतचरित्रा' च्या प्रस्तावनेंत पांगारकरांनीं आपली चारित्र-लेखनविषयक भूमिका स्पष्ट केली आहे. संतचरित्रें लिहिण्यास आपण कां प्रवृत्त झालों तें सांगतांना पांगारकर म्हणतात, "थोर मनुष्य कसकसा तयार होत जातो; आपत्तींतून व अनेक अडचणीं-तून पार पडून तो लौकिकाला व यशाला कसा चढतो; साधु, कवि, योद्धा, मुत्सद्दी, ग्रंथकार हे आपलें शील कसें बनवितात, व रावाचे रंक अगर दगडाचे देव कसे होतात, हें बारकाईनें पाहण्यांत मोठें आत्माशिक्षण आहे व याच कारणासाठीं चरित्रग्रंथवाचनाइतकें बोधप्रद व आनंददायक वाचन दुसऱ्या कोणत्याच ग्रंथाचें नाहीं असें माझ्या मनानें पक्कें घेतलें....पाश्चात्य देशांत लोक शेक्सपिअर-सारख्या थोर पुरुषांचे ग्रंथ मोठ्या शोधक बुद्धीनें वाचतात, त्यांच्या ग्रंथाची, त्यांतील प्रत्येक पद्याची, फार काय पण प्रत्येक शब्दाची बारीक छाननी कारितात; त्याच्या ग्रंथांतील निरनिराळ्या तऱ्हेचे सुंदर वेचे काढून लोकांस त्यांची गोडी लावतात; त्याचें चरित्र, त्याचे इष्टमित्र, त्याचे आचारविचार, त्याचें स्वभाववर्णन, त्याच्या

ग्रंथाचा अनुक्रम, त्यावरून व्यक्त होणारे त्याच्या वृत्तींतील फेरफार; त्याच्या काळची सामाजिक स्थिति, व त्याच्या जिवंतपणीं आणि पश्चात् त्याच्या विचारांचे समाजावर झालेले परिणाम; समकालीन थोर पुरुषांचा व त्याचा अन्योन्यसंबंध; राष्ट्रीय प्रगतीच्या इतिहासांत कवि म्हणून, साधु म्हणून, तत्त्ववेत्ता म्हणून, राष्ट्राचा नेता व शिक्षक म्हणून, त्याला थोर पुरुषांच्या मालिकेंत कोणतें स्थान द्यावें, या या विषयांचा उहापोह करितात. हे प्रकार आमच्याकडे बहुधा अश्रुतपूर्व आहेत. अशा तऱ्हेचे चरित्रग्रंथ मराठींत निघाले पाहिजेत व आपल्या मायभाषेंत गद्यग्रंथांची भासणारी उणीव भरून निघाली पाहिजे असें इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथ वाचतांना मला नेहमीं वाटे ! " या उताऱ्यावरून पांगारकरांची चरित्रविषयक दृष्टि ध्यानांत येते. " मराठी वाङ्मयोद्धाराच्या कार्यांत मी जो पहिल्यापासून पडलों तो केवळ भाषासेवक म्हणून पडलों असें नसून परमार्थबुद्धीच्या तळमळीनें पडलों आणि महाराष्ट्रीयांनीं पारमार्थिक वाङ्मयाच्या अभ्यासानें आत्मोद्धार करून घ्यावा या सार्वलौकिक हिताच्या दृष्टीनें पडलों. " असें त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. म्हणजे मराठी भाषेंत इंग्रजीप्रमाणें उत्तम चरित्रग्रंथ निर्माण करून मराठीचें वैभव वाढविणें हा संतचरित्रें लिहिण्यांत त्यांचा एक हेतु असला तरी ' थोर पुरुषांच्या चरित्रापासून बोध घेणें ' व ' आत्मोद्धार करून घेणें ' हा त्यांचा प्रमुख हेतु होता यांत शंका नाहीं. त्यांची दृष्टि उघडउघड बोधवादी आहे. आपल्याकडे चरित्रें बहुतांशीं याच दृष्टीनें लिहिलीं गेलीं आहेत. चरित्रलेखनांत कलादृष्टि पाश्चात्य देशांतहि अलीकडेअलीकडेच उगम पावली आहे. मराठी चरित्रवाङ्मयांत अद्यापि ती आढळत नाहीं. अर्थात् तीसचाळीस वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत ती आढळेल अशी अपेक्षा कर-

ण्याचें कारण नाहीं. तेव्हां त्या दृष्टीनें पांगारकरांच्या चरित्राचा विचार करणें योग्य नाहीं. पांगारकरांच्या मतें ' राष्ट्रांतील थोर पुरुष म्हणजे मुख्यतः आमचे संतकवि होत, ' आणि संतांच्या चरित्रांपासून लोकांनीं बोध घ्यावा अशीच पांगारकरांची अपेक्षा आहे. संतचरित्रांपैकीं चरित्रात्मक भागापासून वाचकांना योग्य तो बोध मिळवून द्यावा, आणि काव्यविवेचनात्मक भागापासून त्यांस संतकाव्याचा आस्वाद मिळवून द्यावा अशा हेतूनें त्यांनीं आपल्या संतचरित्रांचें ' चरित्र आणि काव्यविवेचन ' असें दुहेरी स्वरूप ठरविलें.

चरित्रलेखनविषयक वरील दृष्टि 'मोरोपंतचरित्रां'त पूर्णपणें अंमलांत आणलेली आढळून येते. 'चरित्र' आणि 'काव्यविवेचन' असे दोन भाग स्पष्ट केले आहेत. पूर्वार्धांत पंतांचा कुलवृत्तांत, बालपण, विद्यार्थिदशा, त्यांचे गुरु व सहाध्यायी यांची माहिती दिली आहे; ती सर्व साधार दिली असून पुढें ' पंत हे पंडित नसून केवळ पुराणिक होते. ' हें मालाकारांचें मत खोडून काढलें आहे. पंतांचा गृहस्थाश्रम, त्यांचा आप्तवर्ग व मित्रपरिवार, विठोबादादा चातुर्मासे, मैराळबोवा, बाळंभट काजळे यांसारखी पंतांची भक्तमंडळी, या सर्वांचें वर्णन मोठ्या प्रेमळपणानें केलें आहे. पंत आणि रामजोशी यांच्या संबंधींचा भागहि गोड उतरला आहे. या विभागापैकीं पंतांचे आश्रयदाते बाबूजी नाईक बारामतीकर यांचा पेशव्यांशीं झालेला झगडा, जोशी आणि पाध्ये यांच्या संगमेश्वर येथील धर्माधिकारीपणाच्या वृत्तीसंबंधींचा वाद, यासंबंधीं पांगारकर यांनीं जें विवेचन केलें आहे, तेंहि ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें केलें आहे. त्यावर पुढें कशीं रणें माजलीं याचा इतिहास पांगारकरांनीं 'चरित्रचंद्रा'त दिला आहे. प्रो. भानू, साने, राजवाडे यांसारखे खंदे

इतिहासज्ञ या वादांत पडले होते. या वादांत साने यांनीं पांगार-करांवर जातीयतेचा ( चुकीचा ) आरोप केल्याचें 'चरित्रचंद्रां'त नमूद आहे. अखेरीस अकस्मात् योगायोगानें एक सबळ पुरावा पुढें आल्यामुळें 'भानू-सानेप्रभृतींचे बोल पार पालथे पडले. पाध्ये खरे ठरले. पांगारकर पक्षपातदोषापासून मुक्त झाले.' पंतांच्या कौटुंबिक जीवनासंबंधींची माहिती देतांनाही पंतांच्या खाजगी पत्रव्यवहाराचा व त्यांच्या मित्रमंडळींनीं लिहून ठेविलेल्या माहितीचा लेखकानें चांगला उपयोग केला आहे; व या आधारें चरित्रनायकासंबंधीं निरनिराळ्या आख्यायिका सांगून वृत्तांतकथनांत रंग भरला आहे. दुसऱ्या भागांत मोरोपंतांच्या कवितेचें मार्मिक विवेचन केलें आहे. कुशलवाख्यान, कृष्णविजय, सीतासावित्रीचीं गाणीं, आर्याभारत, रामायणें, केकावली इत्यादि मोरोपंतांच्या काव्यसंपदेचें योग्य मूल्य-मापन करून त्यांतील सौंदर्यस्थळें मोठ्या मार्मिकपणें दाखविलीं आहेत. शेवटीं मोरोपंतांच्या काव्यांतील कांहीं दोषांचाही उल्लेख केला आहे, परंतु ते 'पंतांच्या काव्यगुणराशीपुढें गिरिकुहरांतील अंधकारासारखे दूरच्या कोपऱ्यांत कोणाच्या दृष्टीसही न येण्या-सारखे विरळ आहेत.' अतएव ते दोष जगानें विसरून गेले पाहिजेत असा पांगारकरांचा आग्रह आहे. खरी गोष्ट अशी आहे : मोरोपंतांचें पुष्कळसें काव्य अति उच्च प्रतीचें असलें तरी काहीं ठिकाणीं तें इतकें गचाळ उतरलें आहे (याकरितां पांगारकरांनीं दिलेलीं दोष-स्थळें पहावीं ) कीं, पहिल्या दर्जाच्या कवीच्या काव्यांत अशीं स्थळें यावीं याचा खेद वाटतो, आणि त्याकडे पांगारकरांच्या आदेशा-प्रमाणें दुर्लक्ष करणें अशक्य होऊन बसतें ! पांगारकर हे हाडाचे भक्त आहेत आणि आपली उपास्यदेवता जे संतकवि त्यांच्या चरित्राचा आणि काव्याचा विचार करतांना त्यांना प्रेमाचें विल-

क्षण भरतें येतें. त्यांच्या काव्यांतील दोष दाखविणाऱ्या अर्वाचीन विद्वानांवर ते रागावतात आणि ' दृष्टि विकृत झाल्यामुळें व स्वदेशी संस्कार ढिले झाल्यामुळें आमच्या कवीचे गुणसुद्धां कित्येक विद्वानांना दोषरूप दिसूं लागले आहेत ' असा त्यांजवर आरोप करतात. मोरोपंतांच्या काव्यांतील दोषांचा उल्लेख स्वतः पांगारकरांनीं तरी केला आहे म्हणजे काय,तर केवळ ' अलीकडच्या लोकांना थोडे तरी दोष दाखविले नाहींं, तर सारें विवेचन अपुरें झालें असें वाटतें म्हणून त्यांच्या संतोषार्थ...' इतकेंच। याउलट आपल्या दैवताचें गुणगान करूं लागल्यावर पांगारकर देहभान विसरून अतिशयोक्त विधानें करतात हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. पंतांच्या संस्कृत रचनेचा विचार करतांना पांगारकर त्यांना जगन्नाथपंडित व अप्पयादीक्षित यांजपेक्षांहि श्रेष्ठ ठरवितात व " संस्कृत भाषा पंतांइतकी त्यांनाहि वाकवितां आली नाहीं " असें कोणाहि रसिकाला न पटण्यासारखें विधान करतात. "कालिदासादिकांनीं प्रणयीजनांचीं हृद्गतें जाणलीं, शेक्सपिअरप्रभृतींनीं मनुष्यस्वभावाच्या भिन्नभिन्न छाया दाखविल्या पण कुलीन हिंदु कुटुंबांतल्या भिन्नभिन्न व्यक्तींच्या निरनिराळ्या मनोवृत्ति जशा मोरोपंतांनीं व्यक्त केल्या आहेत, तशा त्या व्यक्त करणारा अन्य कवि कोणी झाला असेलसें वाटत नाहीं." यांतहि एका विशिष्ट बाबतींत का होईना, कालिदासशेक्सपिअरपेक्षां उच्च स्थान मोरोपंतांना दिलेलें एकाद्या कट्टर महाराष्ट्र-भाषाअभिमान्यालाहि कितपत योग्य वाटेल याची शंका आहे ! परंतु हा पांगारकरांचा स्वभावविशेष आहे, त्याला इलाज नाहीं. असो. एकंदरींत पाहतां हें समग्र चरित्र अतिशय रसाळ उतरलें आहे व त्यांत कांहीं बारीकसारीक चुका सांपडण्यासारख्या असल्या तरी त्यांनीं या ग्रंथास कमीपणा खचित येत नाहीं.

१९१० सालीं प्रसिद्ध झालेल्या ‘ एकनाथचरित्रां’तहि पांगारकरांनीं आपली चरित्रलेखनविषयक कल्पना पुन्हा सांगितली आहे. “संतांचे ग्रंथ सांप्रदायपरंपरेनें नीट समजून घेतल्याशिवाय त्यांतील विचारांची खरी ओळख होणार नाहीं...अर्थात् संतचरित्रकार भाविक ऊर्फ सांप्रदायिक, काव्यमर्मज्ञ ऊर्फ रसिक, व इतिहासज्ञ ऊर्फ चिकित्सक, असा गुणत्रयसंपन्न असेल तर संतचरित्रकाराचें काम तो सर्वोत्कृष्ट करील.” या चरित्रग्रंथास मुख्य आधार केशवबुवा आणि महीपति यांनीं लिहून ठेवलेल्या नाथचरित्राचा आहे. याशिवाय स्वतः एकनाथांनीं आपल्या ग्रंथांतून स्वतःविषयीं लिहून ठेवलेल्या गोष्टींचाहि उपयोग केला आहे. सुरवातीस नाथांचे पणजे भानुदास यांची थोडक्यांत माहिती देऊन नाथांना झालेला दत्तप्रसाद, त्यांचा आदर्श प्रपंच, त्यांच्या तीर्थयात्रा, त्यांना झालेलें ज्ञानेश्वरदर्शन, इत्यादि भाग अतिशय रसाळ पद्धतीनें सांगितला आहे. शेवटीं एकनाथांच्या वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. मोरोपंतचरितांत वाङ्मयपरिचय जितका विस्तारानें केला आहे तितका या चरित्रांत केला नाहीं. यांतील चरित्रपर भागांतहि मोरोपंतचरित्राइतकीं साधनें लेखकाला उपलब्ध नव्हतीं असें दिसतें. त्यायोगें हा ग्रंथ मोरोपंतचरित्राच्या मानानें बराच लहान झाला आहे. यानंतर दोन वर्षांनीं प्रसिद्ध झालेल्या ‘ ज्ञानेश्वरचरित्रांत’हि चरित्रविषयक भाग मोठा असून ग्रंथविवेचन शेवटीं थोडक्यांत केलें आहे. सुरुवातीचें ‘ ज्ञानेश्वरकालीन महाराष्ट्र ’ हें प्रकरण उपयुक्त असून लेखकाच्या व्यासंगाचें निदर्शक आहे. प्रत्यक्ष चरित्राचा भाग नामदेव, महीपति, निरंजनमाधव इत्यादि ग्रंथकारांच्या ज्ञानेश्वरविषयक ग्रंथांच्या आधारें लिहिला आहे. ‘ग्रंथविवेचन’ लेखकाच्या नेहमींच्या पद्धतीनें अतिशय मार्मिकपणें व रसाळपणें केलें आहे.

यांतच ' ज्ञानेश्वर एक कीं दोन ' या वादाचा थोडक्यांत परामर्ष घेतला आहे. ज्ञानेश्वरी व अभंग यांतील भाषाभेद व उपास्य या विवाद्य मुद्यांचा थोडक्यांत विचार करून ज्ञानेश्वरी व अभंग यांचा कर्ता एकच असें मत प्रस्थापित केलें आहे. ' एकनाथ ' व ' ज्ञानेश्वर ' या दोन्ही चरित्रांच्या शेवटीं त्या त्या संतांस इतर संतकवींनीं वाहिलेली ' स्तुतिसुमनांजलि ' दिलेली आहे ती ' हरिभक्तांविषयीं आपल्या वाचकांच्या मनांत प्रेमादर वाढावा ' या उद्देशानें दिली आहे हें उघड आहे. पांगारकरांच्या चरित्रलेखनविषयक भूमिकेचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

यानंतर आठ वर्षांनीं म्हणजे १९२० सालीं 'तुकारामचरित्र' हा विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध झाला. ' मोरोपंतचारित्र उत्कृष्ट झालें आहे; परंतु श्रीतुकारामचरित्रानें त्यावरहि ताण केली यांत संशय नाहीं.' असे उद्गार हें चरित्र वाचून विद्वानांनीं काढले. ' वारकरी सांप्रदायाचा रहस्यग्रंथ ' असें एका प्रसिद्ध टीकाकारांनीं याचें वर्णन केलें. रसाळ व मार्मिक विवेचनपद्धति, भक्तीचा ओलावा, भाषेचा आकर्षकपणा व जोरदारपणा, इत्यादि पांगारकरांच्या लेखनपद्धतीच्या सर्व गुणांचा या ग्रंथांत परमोत्कर्ष झालेला आढळतो. तुकाराम महाराजांच्या चरित्राला हात घालतांनाच, देवाच्या मूर्तीला स्पर्श करतांना मनुष्य बावचळावा, तसे पांगारकर बावचळलेले दिसतात. तुकाराममहाराजांसारख्या ' मरणाला मारून उरलेल्या व काळाच्या माथां पाय देऊन जगत्कल्याणार्थ स्वेच्छेनें या भूलोकीं संचरणाऱ्या महात्म्यां ' च्या आयुष्यांतील प्रसंगांचा कालानुक्रम निश्चित करण्याचा प्रयत्न करणें त्यांना विलक्षण धाडसाचें वाटतें. अशा महात्म्यांना 'जन्म कोठचा आणि मृत्यु कोठचा ?' असा प्रश्न पडून ते क्षणभर बावरल्यासारखे होतात. परंतु परमार्थ-

दृष्टीनें अशा कालगणनेची अनावश्यकता दिसत असूनहि इतिहास-दृष्ट्या तिचें महत्त्व आहे ही जाणीव ठेवून पांगारकरांनीं या प्रश्नास हात घातला आहे. तुकोबांचा जन्मशक व प्रयाणकाल यासंबंधीं निरनिराळीं मतें सांगून त्यांनीं आपला स्वतःचा निर्णय विविध प्रमाणांच्या आधारें दिला आहे. त्यांत मतभेदाला जागा असली तरी लेखकाची चिकित्सक दृष्टि व परिश्रम यांची त्यांत साक्ष मिळते. तुकोबांच्या जीवनचरित्राव्यतिरिक्त वारकरी संप्रदायाचा साधनमार्ग, तुकोबांचें ग्रंथाध्ययन, चित्तशुद्धीचे उपाय, सगुणभक्ति व सगुणसाक्षात्कार, इत्यादि सांप्रदायिक विषयांचें अत्यंत रसाळ भाषेंत वर्णन केलें आहे. म्हणूनच 'वारकरी सांप्रदायाचा रहस्य-ग्रंथ' हें या ग्रंथाचें वर्णन सार्थ वाटतें. तुकोबांना संस्कृत येत होतें कीं नाहीं याहि प्रश्नाचा लेखकानें उहापोह केला आहे. गीता, भागवत, महिम्नस्तोत्रादि संस्कृत ग्रंथांतील तुकोबांचीं समानार्थक वचनें उध्दृत करून व 'पाहिलीं पुराणें धांडोळलीं दरुशनें' अशा तुकोबांच्या कांहीं वचनांचा आधार घेऊन, संस्कृत भाषेंतील शास्त्र-पुराणग्रंथ स्वतः वाचून त्यांचा भावार्थ समजण्याइतकें संस्कृत तुकोबांना येत असावें असें आपलें मत दिलें आहे. शेवटीं 'उरलों उपकारापुरता' अशी बोवांची वृत्ति झाल्यावर त्यांनीं शिष्यांना 'मेघ-वृष्टी'नें उपदेश कसा केला आहे याचें विवेचन केलें असून, पुढें तुकोबांचें शिष्यमंडळ, तुकोबा आणि जिजाई, व तुकोबांचें प्रयाण इत्यादि वर्णन आलें आहे. यांपैकीं बराचसा भाग स्वतः तुकोबांच्या वचनांच्या आधारेंच लिहिला आहे. तुकोबांच्या समकालीन व उत्तर-कालीन कवींनीं त्यांच्यासंबंधीं ज्या आख्यायिका लिहून ठेवल्या आहेत त्यांचा उपयोग लेखकाला झाला असला तरी स्वतः तुकारामबोवांचे अभंग हाच त्यांच्या चरित्राचा प्रमुख आधार होय हें

उघड आहे. " आधींच बोवांची वाणी म्हणजे त्यांच्या प्रेमळ अंतरंगाची प्रत्यक्ष मूर्तीच आहे; आणि त्यांच्या वाङ्मयाची विस्तारपूर्वक फोड करण्याची कामगिरी रा. पांगारकरांसारख्या जिव्हाळ्याच्या भक्ताकडे आलेली, मग एकंदर विवेचन बहारीचें झालें असेल हें सांगणेंच नको." असे उद्गार पांगारकरांचे एक चिकित्सक व तर्कनिष्ठ टीकाकार श्री. बा. अ. भिडे यांनीं काढले आहेत !

१९२२ सालीं 'मुक्तेश्वरचरित्र आणि काव्यविवेचन' हा छोटा ग्रंथ पांगारकरांनीं प्रसिद्ध केला. मुक्तेश्वरी भारताचीं चार पर्वें यापूर्वीं उपलब्ध असून छापून प्रसिद्ध झालीं होतीं. पांचव्या 'सौप्तिक' पर्वाच्या संशोधनाचें श्रेय पांगारकरांकडे जातें. याशिवाय मुक्तेश्वरकृत कांहीं पदें व आरत्या त्यांनीं शोधून काढल्या. १९०४ सालीं 'महाभारताचे मराठी अवतार' हा निबंध पांगारकरांनीं 'सरस्वतीमंदिर' मासिकांत प्रसिद्ध केला होता व त्यांत मुक्तेश्वरी भारताचें समीक्षण केलें होतें. पुढें मुक्तेश्वराचें चरित्र व समग्र काव्यविवेचन यासंबंधीं स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें योजून १९२२ सालीं त्यांनीं हें कार्य पूर्ण केलें. मुक्तेश्वराच्या चरित्रासंबंधीं त्याच्या स्वतःच्या ग्रंथांत जी थोडी माहिती मिळते त्याव्यतिरिक्त म्हणण्यासारखी माहिती उपलब्ध नाहीं. एवढ्याच माहितीच्या आधारें थोडक्यांत मुक्तेश्वराचें चरित्र सांगून पुढें मुक्तेश्वरी भारताच्या रचनाकालासंबंधीं विवेचन केलें आहे. पुढें भारताचें व इतर मुक्तेश्वरी आख्यानांचें समीक्षण केलें आहे. मूळ महाभारतापेक्षां मुक्तेश्वराचीं कांहीं वर्णनें अधिक सरस आहेत; त्यांचा उल्लेख करून मुक्तेश्वराच्या काव्यांतील इतर सौंदर्यस्थळांचा निर्देश केला आहे. शेवटीं मुक्तेश्वराच्या काव्यांत ठिकठिकाणीं आढळणारीं नीतितत्त्वें एकत्र दिलीं आहेत. एकंदरींत या ग्रंथांत लेखकाची चिकित्साबुद्धि व रसिकता यांचा चांगला प्रत्यय येतो.

पांगारकरांच्या संकल्पित चारित्रमालेचें हें शेवटचेंच पुष्प म्हणतां येईल. रामदासचरित्र ' मराठी वाङ्मयाचा इतिहास ' या वाङ्मयेतिहास ग्रंथांत प्रसिद्ध झाल्याचें मागें सांगितलेंच आहे. नामदेव, श्रीकृष्ण आणि श्रीराम यांचीं चरित्रें प्रसिद्ध होण्याचा योग आलाच नाहीं. पांगारकरांच्या चारित्रग्रंथांपैकीं अखेरचा ' चरित्रचंद्र ' हा आत्मचरित्रात्मक ग्रंथ इ. स. १९३८ सालीं प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचा विचार करण्यापूर्वीं त्यांच्या संतचरित्रासंबंधीं एकदोन गोष्टींचें स्वल्प विवेचन करावेंसें वाटतें.

पांगारकरांचीं सर्वच संतचरित्रें अतिशय लोकप्रिय झालीं; परंतु त्यांवर प्रतिकूल टीका झाली नाहीं असें नाहीं. टीकाकारांचा मुख्य रोख पांगारकरांची आत्यंतिक श्रद्धाशीलता व ( त्यांच्या मतें ) तज्जन्य चिकित्साबुद्धीचा अभाव यांवर आहे. रा. साने यांनीं यासंबंधीं काढलेले उद्गार या टीकेचें स्वरूप दर्शविण्यास पुरे होतील म्हणून ते देतों. " मनुष्य कितीही शिकलेला असला तथापि एकदां श्रद्धेच्या सपाट्यांत सांपडला म्हणजे काय बरळेल याचा नेम नाहीं. श्रद्धा ही आंधळी आहे. पांगारकरांनीं दिलेल्या चमत्कारांच्या गोष्टी व त्यांचे सिद्धांत पाहून वाटतें कीं, या मनुष्याला इंग्रजी विद्येचा यत्किंचितही विटाळ झाला नसावा !...ज्ञानेश्वर रेड्याकडून वेद बोलवितात व भिंत चालवितात, ज्ञानेश्वर महाविष्णुचा अवतार, तुकाराम नामदेवाचा अवतार, तुकाराम सदेह वैकुंठाला जातो, नाथांचे घरीं देव चाकरी करतो... वगैरे गोष्टींवर आपली पांगारकरांची श्रद्धा ! या फाजील श्रद्धेमुळें इंग्रजी विद्या या मनुष्यावरून फुकट गेली असें वाटतें !" ज्ञानेश्वरचारित्र प्रसिद्ध झाल्यावर रा. भारद्वाजांनीं असाच आक्षेप घेतला. आजपर्यंत संतचरित्रें चिकित्सा दृष्टीनें कोणीं लिहिलीं नाहींत. पांगार-

करांपूर्वीं रा. भिंगारकर व बळवंत खंडूजी पारख यांनीं ज्ञानेश्वर-चरित्रें लिहिलीं तीं केवळ अंधश्रद्धेनें लिहिलीं आहेत; पांगारकरांच्या ज्ञानेश्वरचरित्रांतहि चिकित्सक बुद्धीपेक्षां सांप्रदायाचा अभिमान अधिक आढळतो; असें त्यांच्या आक्षेपाचें थोडक्यांत सार आहे. तुकारामचरित्राचे टीकाकार श्री. बा. अ. भिडे यांच्या म्हणण्याप्रमाणें पांगारकरांनीं संतांच्या दैवी चमत्कारांचें वर्णन दिलें आहे; एवढेंच नव्हे, तर या अलौकिक चमत्कारांचें सोपपत्तिक समर्थन करण्याचा आव आणून लोकभ्रमामध्यें भर घालण्याचें पुण्य संपादन केलें आहे. हे आक्षेप स्वीकारण्यापूर्वीं आपण पांगारकरांची यासंबंधींची दृष्टि पाहिली पाहिजे. संतचरित्रकार भाविक व चिकित्सक असला पाहिजे हें त्यांनीं वेळोवेळीं सांगितलें आहे. एकच मनुष्य भाविक आणि चिकित्सक असूं शकत नाहीं हें पांगारकरांना मान्य नाहीं. 'चरित्रकाराला इतिहासदृष्टि पाहिजे; स्थलकालांचा पूर्वापारसंबंध त्याला कळला पाहिजे' इतक्यापुरती इतिहासदृष्टि त्याच्या ठिकाणीं आवश्यक आहे असें पांगारकर मानतात. 'नवीन मन्वंतरांत वावरणाऱ्या माणसाला संशोधनाकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं' याची जाणीव त्यांना चांगली आहे. परंतु परंपरा, उपासना व भक्तिभाव यांच्या उत्कटतेशिवाय संतांचीं रहस्यें समजून येत नाहींत, असाहि त्यांचा दृढ विश्वास आहे, व इतक्यापुरता संतचरित्रकार भाविक असला पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत आहे. चिकित्सक बुद्धीची त्यांची जी कल्पना आहे तिच्याशीं आपली भाविकता विसंवादी आहे असें ते मानीत नाहींत. कालनिर्णय, पाठ-अपपाठ इत्यादि संशोधनक्षेत्रांतील बाबींसंबंधानें त्यांनीं परिश्रमपूर्वक चिकित्सा केली आहे हें कोणी अमान्य करूं शकणार नाहीं. त्यांनीं काढलेल्या अनुमानासंबंधीं मतभेद होऊं शकेल; ती गोष्ट निराळी आहे. परंतु या बाबतींत त्यांनीं आपली भाविकता आड

येऊं दिली नाहीं. दैवी चमत्कारांवर ते विश्वास ठेवतात एवढ्याचसाठीं त्यांच्या चिकित्सक बुद्धीवर आक्षेप घेतलेला त्यांस मान्य होणारा नाहीं. संतांच्या दैवी चमत्कारांविषयीं त्यांचें म्हणणें असें: दृश्य सृष्टीच्या पलीकडील गोष्टी मानावयाच्याच नाहींत ही वृत्ति योग्य नाहीं; आपलें ज्ञान मर्यादित आहे व त्याच्या बळावर अध्यात्म-योगांतील गोष्टी सर्व खोट्या व साधूंचे चमत्कार खोटे असें धडाक्यानें म्हणणें धाडसाचें आहे. योगबलानें 'असाध्य तें साध्य' होऊं शकतें याचीं उदाहरणें आजहि थोडीफार मिळण्यासारखीं आहेत. तेव्हां संतांचे चमत्कार आपण डोळ्यांनीं पाहिले नाहींत व ते आपल्या मर्यादित ज्ञानाच्या कक्षेंत येऊं शकत नाहींत; म्हणून त्याबद्दल अविश्वास प्रकट करूं नये. प्रत्यक्ष प्रमाणाच्या अभावीं शब्दप्रमाण मानतात व तें या बाबतींत भरपूर मिळतें. ज्या ठिकाणीं संतचमत्कारांचें वर्णन आलें आहे, त्या ठिकाणीं शक्यतों पांगारकरांनीं तत्कालीन संतांचे तत्संबंधीं भरपूर आधार दिले आहेत. ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली, रेड्याकडून वेद वदविले, ही हकीकत सर्व संतांनीं मानिली आहे. इतकेंच नव्हे तर ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधु व गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांनींहि 'चालविली भिंत एका अभंगानें' असें लिहून ठेविलें आहे. 'एकनाथाघरीं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी' ही गोष्ट महीपति, केशवबुवा, निळोबा, अमृतराय इत्यादि नाथांच्या उत्तरकालीन कवींनीं वर्णिली आहे. इतकेंच नव्हे तर नाथांचे समकालीन दासोपंत यांनींहि वर्णिली आहे. तुकोबा सदेह वैकुंठाला गेला यासंबंधींचा स्पष्ट उल्लेख तुकारामाचे समकालीन रामेश्वरभट्ट यांनीं केला आहे, तुकोबाचे शिष्य निळोबा यांनीं केला आहे व पुढें मोरोपंतांनीं केला आहे. हे सर्व कवी अंधश्रद्ध होते काय? असें पांगारकर टीकाकारास विचारतील! "अद्भुत चमत्कारांवर

अर्वाचीनांचा विश्वास नसळा तथापि अनेक समकालीन व नंतरच्या संतांनीं त्या वर्णिल्या असल्यामुळें त्या सांगणें अवश्यच आहे.... ....त्या ज्यांना पटत नसतील त्यांनीं त्या बाजूला ठेऊन त्यांच्या ग्रंथांचा सूक्ष्म तऱ्हेनें अभ्यास करावा व पटेल तेवढें घेऊन समाधान पावावें." असें या बाबतींत त्यांचें म्हणणें आहे व तें रास्त आहे.

"त्यांच्यांत ( पांगारकरांत ) चिकित्साबुद्धि नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे. श्रद्धा व चिकित्सा हे दोन्ही गुण त्यांच्यांत आहेत, दांडी थोडी श्रध्देकडे अधिक झुकलेली आहे इतकेंच " असें पांगारकरांचें वर्णन प्रो. वाटवे यानीं केलें होतें, तें अधिक समर्पक वाटतें. चिकित्साबुध्दीसंबंधीं त्यांची जी कल्पना आहे त्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं जी खबरदारी घ्यावयास पाहिजे ती घेतली आहे. परंतु मूळची वृत्ति श्रध्दाशील असल्यामुळें कांहीं गोष्टींची चिकित्सा अगदीं नाइलाजानें त्यांनीं केली असावी असा भास होतो. तुकारामासारख्या संतांच्या काळानिर्णयावर आपली बुध्दि खर्च करणें त्यांच्या अगदीं जीवावर आल्यासारखें वाटतें. परमार्थ दृष्टीनें त्याची आवश्यकताच नाहीं असें ते मानतात; परंतु इतिहासदृष्ट्या तसें करणें प्राप्त आहे म्हणूनच नाइलानें ते या भानगडींत पडले असावे असें भासतें. " तर्कटी व संशयांनीं खाल्लेले पुरुष अभागी होत " असें मानून ते त्यांची कींव करतात, आणि म्हणून " सर्व प्रकारचे संशय व कुतर्क टाकून संतांच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवावा व आपल्या हिताचा मार्ग त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्यांतच आहे असें निभ्रांत मानून चालूं लागावें, ही सर्व मुमुक्षूंच्या हिताची गोष्ट आहे " असें ते बजावून सांगतात. 'ज्ञानेश्वर एक कीं दोन' या प्रश्नाची चर्चा त्यांनीं केली आहे, नाहीं असें नाहीं. परंतु ज्ञानेश्वरमहाराजांबद्दल अशी शंका उपस्थित

करणें म्हणजे कांहीं तरी मोठें पातक आहे अशी भावना झाल्या-गत ते या वादाबद्दल बोलत आहेत असें भासतें. चरित्रकारानें चरित्र–विषयाचें गुणदोषांसहित चित्र काढावें हा वास्तविक चरित्र-लेखनाचा दंडक. परंतु संतांचे दोष दाखविणें, किंबहुना त्यांच्यांत दोष असूं शकतील ही कल्पना करणेंहि पांगारकर पातक समजत असावे. मोरोपंताला ते जगन्नाथपंडित, कालिदासादि कवींपेक्षां श्रेष्ठ ठरवितील; तर ' नाथांसारख्यांचें सर्वच चरित असामान्य कोटींतील असल्यामुळें त्यांचीं बाल्यापासूनचीं सर्वच लक्षणें असा-मान्य कोटींतील असल्यास त्यांत अशक्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं ' अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे. इतकेंच नव्हे तर ज्ञाने-श्वरांसारख्या महात्म्यांच्या ग्रंथांचें गुणदोषविवेचन करणें त्यांस अशक्यप्राय वाटतें ! कारण " महात्म्यांच्या ग्रंथांत दोषांचा संभव नसल्यामुळें दोष काढतां येत नाहींत, व गुणांचें माप घेण्याइतकी अक्कल कोणाहि प्राकृत जीवांत असणें अशक्य असल्या-मुळें गुणांचा योग्य गौरवहि करतां येत नाहीं व यामुळें ' गुणदोषविवेचन ' हें प्रकरण त्यांच्या चरित्रकाराला लिहितांच येत नाहीं. " अर्थात् मोरोपंतांच्या कवितेंतील दोषदर्शनाप्रमाणें हें कार्यहि त्यांनीं केवळ लौकिकदृष्ट्या केलें असावें असें दिसतें. संत हे देवाचे अवतार, त्यांचें चरित्र पामर मानवांनीं काय गावें असें वाटून त्यांची मति कुंठित होते, त्यांचें गुणवर्णन करूं लागतांच त्यांना प्रेमाचें भरतें येतें, आणि ' विचारांचे कल्लोळ उठून लेखणी काम करण्याचें विसरते. ' अशी स्थिति झाल्यावर चरित्र-विषयाचें दोषदर्शन करण्याची कल्पना तरी चरित्रकाराला सहन होईल काय ? यामुळें पांगारकर संतांविषयीं बोलतांना नेहमीं तमभावाच्या ( Superlative ) भाषेंतच बोलतात. ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरि-

त्रांत ‘ धर्मसंस्थापनेसाठीं अवतरलेल्या परमेश्वरी विभूतीचे सर्व गुण ’ त्यांना स्पष्ट दिसतात; ‘ नाथासारखें मनोहर चरित्र नाथांचेंच, त्याला दुसरी तोड नाहीं ’ अशी त्यांची ठाम समजूत होते, ‘ तुकोबासारखे संतवीर हे एका जन्मांत तयार होत नाहींत; ते अनेक जन्मसंसिद्ध असतात ’ आणि या जन्मीं त्यांनीं केलेलें पुण्यकार्य ‘ मागील अनेक जन्मांत ते करीत आले असल्या’बद्दल त्यांना दृढ विश्वास आहे. अशा ठिकाणीं पांगारकरांच्या चिकित्साबुद्धीवर त्यांच्या श्रद्धेनें कुरघोडी केली असल्याची जाणीव होते. चिकित्साबुद्धीच्या पारड्यापेक्षां श्रद्धेचें पारडें अधिक खालीं गेलेलें दिसतें.

एकेकाचें एकेक वर्मस्थान ( Weak Point ) असतें. त्याला जरासुद्धां धक्का लागलेला त्याला सहन होत नाहीं. देव आणि संत हे पांगारकरांचे Weak Points आहेत. त्यांच्या बाबतींत ते पराकाष्ठेचे असहिष्णु आहेत. त्याविरुद्ध कोणी ‘ब्र’ काढला कीं ते नागाप्रमाणें फणा काढतात, व प्रतिपक्षीयाला कडकडून दंश करतात. संतांच्या अलौकिक सामर्थ्यावर ज्यांचा विश्वास नसेल त्यांनीं त्यांच्या चमत्कारांविषयींच्या गोष्टी सोडून द्याव्या आणि त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करावा, अशी उदार मनानें सूचना ते करतील; परंतु पुढच्याच क्षणीं अश्रद्ध आणि तर्कनिष्ठ ‘अर्वाचीन विद्वानां’वर यथेच्छ तोंडसुख घेतांना दिसतील. वादविवादांत प्रतिपक्ष्याविषयीं मन कलुषित करून न घेतां त्यांच्या म्हणण्यांत अविचाराचा भाग जेवढा असेल तेवढ्याचें खंडन करणें जरूर असल्यास तें विचारानेंच केलें पाहिजे, असा स्वतः उपदेश करून ही समतोल बुद्धि त्यांनीं स्वतः मात्र ठेविली नाहीं, असा श्री. भिडे यांनीं त्यांच्यावर आक्षेप घेतला आहे तो सर्वस्वीं खोटा नाहीं. ‘ ज्ञानेश्वरीची भाषा कठीण आहे ’ असें कोणी म्हणायचा अवकाश,

पांगारकर म्हणणार असा मनुष्य ‘ सत्संगतीनें वेदांत व अध्यात्म या विषयांत प्रवेश न झालेला, परंपराशून्य ’ आहे; आणि जुने मराठी शब्द याला कठीण वाटल्याचें खापर ‘ अलीकडच्या शिक्षणपध्दती ’च्या माथ्यावर त्यांनीं फोडलेंच म्हणून समजावें. मोरोपंतांच्या कवितेविरुध्द तुम्हीं एक शब्द बोला. पांगारकर उसळून म्हणतील, “ अलीकडे आमच्या इंग्रजी पंडितांच्या ठिकाणीं मोरोपंतांच्या कवितेविषयीं विलक्षण प्रकारची अढी बसलेली आहे ! संस्कृत व मराठी भाषांचा अभ्यास तुटला, मागल्या विचारपरंपरेची ओळख राहिली नाहीं, स्वधर्मश्रद्धा पार ढांसळून गेली, आपल्या आचारविचारांविषयीं तिरस्कार वाटूं लागला, याप्रमाणें हिंदुत्वाला पारखे होत चाललेले आमचे कित्येक देशबांधव आपल्या राष्ट्रीय महापुरुषांची अवहेलना करण्यांत भूषण मानूं लागले आहेत !....अलीकडच्या भिन्न परिस्थितींत वाढलेल्या विद्वानांस पंतांच्या विचारसरणींत जे कांहीं दोष आढळतात ते वस्तुत: दोष नसून तो अर्वाचीन विद्वानांच्या विकृत दृष्टीचा दोष आहे !” पंतविरोधी कुंटे यांजवर पांगारकर कोण हिरिरीनें तुटून पडतात ! त्यांचा भक्तिभाव इतका उत्कट आहे, स्वमताभिमान इतका तीव्र आहे कीं त्याला विरोधाचा वाराही सहन होत नाहीं. आपलीं मतें दुसऱ्यावर लादूं पहावयाचीं व तीं त्याला पटलीं नाहींत म्हणजे त्याची टर उडवावयाची ही वृत्ति संतचरित्रकाराला शोभणारी नाहीं. ‘A biographer must not impose but only expose’ हें तत्त्व पांगारकरांनीं पाळलेलें नाहीं.

‘ चरित्रचंद्र ’ हा आत्मचरितपर ग्रंथ पांगारकरांच्या चरित्रग्रंथांपैकीं अखेरचा होय. या ग्रंथांत पांगारकरांची नेहमींची रसाळ वर्णनपद्धति, ओघवती भाषापद्धति इत्यादि गुण प्रकर्षानें आढळ-

तात. यामुळें हा ग्रंथहि संतचरित्राप्रमाणें लोकप्रिय झाला. विशेष म्हणजे या ग्रंथांत पांगारकरांचें व्यक्तिमत्व त्यांच्या गुणदोषांसह प्रतिबिंबित झालें आहे. म्हणजे पांगारकरांनीं आपल्या दोषांचाहि उल्लेख केला आहे असें नव्हे; तर ग्रंथाच्या लेखनांतच त्यांच्या गुणदोषांसह पांगारकरांचें व्यक्तिमत्व प्रतीत होतें. आत्यंतिक श्रद्धाशीलता, परमतासहिष्णुता इत्यादि पांगारकरांच्या ज्या स्वभावविशेषांचा मागें उल्लेख केला आहे, त्यांव्यतिरिक्त आत्मश्लाघा व स्तुतिप्रियता यांचाहि पांगारकरांवर पुष्कळदां आरोप करण्यांत येतो. यासंबंधीं प्रस्तावनेंत पांगारकरांनीं उल्लेख केला आहे व तो आरोप त्यांनीं मान्यहि केला आहे. परंतु ते म्हणतात, " स्तुति कोणाला आवडत नाहीं ? देवांनासुद्धां स्तुति आवडते.... माझे ग्रंथ, माझीं व्याख्यानें, प्रवचनें व माझी कामगिरी यांविषयीं बहुतेक सर्व वर्तमानपत्रांनीं व प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध पुरुषांनीं अनेकवार प्रशंसोद्गार काढले आहेत त्यांतील बरेच उतारे प्रस्तुत ग्रंथांत मी दिले आहेत, असें करण्यांत हेतु आहे:--माझ्या ग्रंथांविषयीं व व्याख्यानांविषयीं जाणत्यांचे अभिप्राय काय आहेत ते समजून यावे....दुसरें असें कीं, त्यामुळें मला प्रिय असलेल्या मराठी वाङ्मयाच्या आणि धर्माच्या कार्याकडे लोकांचें लक्ष वेधलें जावें." या हेतुकथनांतहि तो आरोप खरा असल्याचें प्रत्ययास येतें. स्तुति सर्वांना आवडते हें कांहीं खोटें नाहीं; परंतु लोकांकडून मिळालेल्या स्तुतिरसाचे घुटके घेतल्यावर त्यांवर मिटक्या मारीत बसणें किंवा जिभल्या चाटीत बसणें हें जनदृष्टीला बरें वाटत नाहीं. पांगारकरांनीं फार मोठें कार्य करून ठेविलें आहे. महाराष्ट्रानें त्यांचें चीजहि केलें आहे व त्यांना भरपूर कीर्ति आणि अर्थ मिळवून दिला आहे, याचा सर्वांनाच आनंद आहे. परंतु 'चरित्रचंद्र'

वाचल्यानंतर या स्तुतिमुळें पांगारकरांना अगदीं गुदगुल्या झाल्या आहेत. नार्सिसरप्रमाणें पांगारकर स्वतःच्याच रूपावर बेहद्द खुष होत आहेत आणि प्रेमभरानें स्वतःलाच गाढालिंगन देत आहेत, असा भास होतो. त्यामुळें त्यांच्यावर स्तुतिप्रियतेचा आरोप होतो. केवळ कलादृष्टीनें पाहिलें तर त्यांत गौण कांहीं नाहीं. कारण हा पांगारकरांचा स्वभाव आहे आणि त्याचें प्रतिबिंब आत्मचरित्रांत उतरलें आहे, हें ठीकच आहे. प्रतिपक्षीयांवर आडून मारा करण्याची प्रवृत्ति या ग्रंथातहि आढळते. ' मी माझ्या निंदकाचीहि निंदा केली नाहीं, ' असें एकीकडे म्हणतांना कोठें ' अपटुडेट पोषाख घातलेल्या अलीकडील कॉलेजतरुणाची; ' कोठें ' १९३७ सालीं धर्माचें वाटोळें करायला निघालेल्या भाई लोकांची ' तर कोठें ' घरच्या बायकोला लाथा मारून फुकट प्रेमगीतें गाणाऱ्या ' कविबुवांची टवाळी करण्याचा मोह त्यांना आवरला नाहीं.

पांगारकरांच्या भाविकपणाचीं उदाहरणेंहि या ग्रंथांत पुष्कळ आहेत. त्यांच्या आयुष्यांत त्यांना अनेक साधुसंतांचा प्रत्यक्ष संग घडला व त्यांपैकीं बहुतेकांच्या ठिकाणीं त्यांना कांहीं तरी अलौकिक शक्तीचा प्रत्यय आल्याचें त्यांनीं नमूद केलें आहे. आपल्या आयुष्यांत कित्येक वेळां संकटप्रसंगीं देव साहाय्यास धावून आल्याचा आपल्याला प्रत्यय आला आहे असें ते सांगतात. ' त्रेपन रुपयांची गोष्ट ' (पृ. २३६–३७) त्यांनीं सांगितली आहे. तींतहि योगायोगापेक्षां ईश्वरी कृपेचाच भाग पांगारकरांना दिसतो. अर्थात् यांत आक्षेपार्ह कांहीं नाहीं. हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. ' परमार्थबुद्धि हा माझ्या स्वभावांतील स्थायीभाव आहे ' असें त्यांनीं स्वतः सांगितलें आहे. एवढ्यामुळेंच त्यांच्यांत चिकित्सक बुद्धीचा अभाव आहे असें मानण्याचें

कारण नाहीं; उलट आत्यंतिक तर्कनिष्ठतेनें ईश्वरविषयक श्रद्धा नष्ट होत असेल व भक्तिसुखाच्या रंगांत भंग होत असेल तर ती तर्कनिष्ठा आपल्याला नको असेंच ते म्हणतात. "धर्मभोळेपणा व चिकित्सक बुद्धीचा अभाव यांबद्दल माझा उपहास करणारे तेव्हां होते व आज आहेत. मला मात्र माझ्यांत हा भोळसरपणा अजून पुरा बाणला नाहीं, याबद्दलच खेद असून चिकित्सक बुद्धि वगैरे अनेक बुद्धिगुणांचा-पंढरीच्या वाळवंटांत प्रेमपडिभरानें लोळण घेत असतां—पूर्ण लय व्हावा असें मनापासून वाटत आहे. भक्ति-भावाच्या पूर्णोदयांत बुद्धिगुणांचीं नक्षत्रें लोपावींत यापरतें दुसरें देवापाशीं कांहींच मागावयाचें उरलें नाहीं," अशी त्यांची विचार-सरणी आहे आणि खरोखरच अशा ईश्वरविषयक श्रद्धाशीलतेनें चिकित्सक बुद्धीला हरताळ फासला जातो असें मानण्याचें काय कारण ? उलटपक्षीं मनुष्याची दृढ श्रद्धा त्याला अधिकाधिक कार्य-प्रवृत्त करीत असेल तर ती इष्टच कां समजूं नये ? पांगारकरांनीं या श्रद्धेच्या बळावरच संतवाङ्मयाभ्यासाचें प्रचंड कार्य करून ठेवलें आहे. ज्या ठिकाणीं चिकित्सक बुद्धि आवश्यक असते त्या संशोधनकार्यांत पांगारकरांनीं जे परिश्रम केले आहेत त्यांचाहि इतिहास 'चरित्रचंद्रां'त दिलेला आहे. पांगारकरांचा भाविकपणा या परिश्रमांच्या आड कधीं आला नाहीं.

पांगारकरांची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. गडकरी यांच्या भाषेवर शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासाचा परिणाम स्पष्ट दिसतो, त्याप्रमाणें पांगारकरांच्या भाषेंत संत वाङ्मयाच्या अभ्यासाची स्पष्ट छाप दिसते. आंग्लविद्याशिक्षित असूनहि त्यांच्या भाषेला इंग्रजीचा वास येत नाहीं. तिचें वळण शुद्ध मऱ्हाटी आहे. प्राचीन संतकवींची भाषा त्यांनीं आत्मसात् केली आहे. ज्ञानेश्वर—एकनाथांच्या भाषेचा

भारदस्तपणा, तुकारामाच्या भाषेचा साधेपणा, प्रेमळपणा, व प्रसंगोपात्त सणसणीतपणा, मुक्तेश्वर–श्रीधरांचा डौलदारपणा व गोडवा पांगारकरांनीं आपल्या भाषेंत बाणविला आहे. प्रातःकर्म आटोपणें न म्हणतां पांगारकर प्रातःकर्म सारणें असा मुक्तेश्वरी प्रयोग घालतील. संतांचें वाङ्मय पांगारकरांच्या रक्तांत जाऊन भिनलें आहे. संतवाङ्मयाचा पांगारकरांइतका दीर्घ व्यासंग महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणीही केला नाहीं. त्यांच्या संतचरित्रांनीं त्यांना मराठी वाङ्मयांत अढळ स्थान प्राप्त करून दिलें आहे. संतचरित्रें लिहितांना त्यांनीं विशिष्ट धोरण डोळ्यांसमोर ठेविलें आहे. त्या दृष्टीनेंच त्यांच्या संतचरित्रांकडे पाहिलें पाहिजे. पांगारकरांच्या लेखनांत दोष असतील; आहेत. परंतु With all thy faults, I love thee still असेंच त्यांचे ग्रंथ पाहून म्हणावेसें वाटतें !

# ११. भागवत-धर्म

( लेखक—शंकर वामन दांडेकर, एम. ए. पुणें. )

कै. लक्ष्मणरावजी पांगारकर यांची कीर्ति सन्त--चरित्र--लेखक म्हणून महाराष्ट्रीय वाङ्मयांत अमर अशी राहील यांत शंका नाहीं. त्यांनीं जीं महाराष्ट्रीय साधूंचीं चरित्रें लिहिलीं आहेत, त्यांतील प्रमुख जे श्रीज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, त्यांनीं ज्या भागवत-धर्माचा प्रसार केला त्याचें स्वरूप काय, त्यानें काय कार्य केलें, याचा थोडक्यांत विचार करण्याचें या लेखांत योजिलें आहे. कै. पांगारकरांनीं मराठी वाङ्मयाचा इतिहास व वेगवेगळीं चरित्रें हीं मुख्यतः वर्णनात्मक लिहिल्यानें त्यांत याचा एकत्र सविस्तर असा विचार झाला नाहीं, म्हणून तो विचार पण थोडक्यांत करण्याचें येथें योजिलें आहे. जातांजातां एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे, कीं भागवतधर्माचा हा विचार मांडण्यास प्रस्तुत लेखकाजवळ पांगारकरांच्यासारखें साधन नाहीं. कै. पांगारकरांच्या अंतःकरणांतील भक्तीचा जिव्हाळा व त्यांची रसाळ भाषा, यामुळें त्यांनीं लिहिलेलीं चरित्रें वाचून सात्त्विक वाचकाच्या अंतःकरणांत द्रव उत्पन्न झाल्या-शिवाय रहात नाहीं. प्रस्तुत लेखकानें हें काम अंगिकारलें, यांतील हेतु एवढाच कीं, आपल्या स्नेह्यावर वाहिल्या जाणाऱ्या स्मृति-कुसुमांजलींत आपलेंहि एक कुसूम असावें.

आपण आपल्या देशांतील तत्त्वज्ञान व धर्म यांच्या इतिहासाकडे पाहिलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, ज्यावेळीं वैदिक धर्मास शिथिलता येते त्यावेळीं देशकालानुसार ह्या धर्माच्या रक्षणार्थ श्रम करणाऱ्या लोकांनीं त्या धर्मांतील वेगवेगळ्या अंगांवर जोर

दिला. वैदिक धर्मांत कर्म, उपासना, ज्ञान अशी साधनांची त्रयी आहे. वेद त्रिकांडात्मक आहे हें प्रसिद्धच आहे. वैदिक धर्मावर बसलेली धूळ झाडून त्याला उजाळा देणाऱ्या थोर महात्म्यांपैकीं कोणीहि यांपैकीं एकाचा संपूर्णतया त्याग केला नाहीं; पण काल-परत्वें वेगवेगळ्या भागावर जोर देऊन वैदिक धर्माची रक्षा केली असेंच आपणांस आढळून येईल.

जैमिनीच्या काळांत कर्ममार्गावर जोर दिलेला आढळून येतो, तर शंकराचार्यांच्या काळांत ज्ञानावर भर दिलेला दिसतो. तद-नंतरचा काळ, ज्याला मध्ययुग म्हणतात, त्या काळाकडे जर आपण नजर टाकली, तर आपणास आढळून येईल कीं, सर्व हिंदुस्थानभर भक्तिमार्गाचा प्रसार करणारे भक्त निर्माण झाले. या भक्तमंडळींनीं प्रसृत केलेला भक्तिमार्ग हा वैदिक धर्माविरुद्ध बंड नव्हे, वैदिकधर्माला उजाळा देण्याचा व त्याची रक्षा करण्याचा तो युगपरत्वें केलेला प्रयत्न आहे. अगदीं दक्षिणेंत रामानुजाचार्य व मध्वाचार्य, उत्तरेंत चैतन्य, मध्यभागांत नरसीमेहता व मीराबाई आणि महाराष्ट्रांत ज्ञानदेवादि संत यांनीं जो भक्तिसंप्रदाय वाढविला त्यांत त्या सर्वांचा हेतु वैदिक धर्माची रक्षा असाच सांगतां येईल. हा जो सर्वांनीं प्रसृत केलेला धर्म त्यास व्यापक अर्थानें भागवतधर्म म्हणतां येईल.

या भागवतधर्माच्या सामान्य स्वरूपाबद्दल प्रथम थोडी माहिती देऊन, त्याला आपल्या प्रांतांत जें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें त्याची माहिती देण्याचा विचार आहे. नदीचें पाणी तेंच पण तें ज्या जमिनीवरून वहात जातें तसे त्यांत वेगवेगळे गुण उत्पन्न होतात. तसेंच भक्ति ही जरी ईश्वरविषयक प्रेमस्वरूपाची असली, तरी तिला व्यक्ति व समूह यापरत्वें वेगवेगळें स्वरूप प्राप्त होतें. आपल्या प्रांतांतील या भागवत धर्माच्या स्वरूपाचीं काहीं

विशेष लक्षणें आहेत. त्यांचा विचार, वर सांगितल्याप्रमाणें भागवत धर्माचीं सामान्य लक्षणें सांगून मग करूं.

आतां प्रथम भागवत धर्माच्या सामान्य स्वरूपाकडे वळूं. भागवत धर्म हा भक्तिप्रधान वैष्णव धर्म आहे; तो एक वैदिक धर्मपंथ आहे. तो एकेश्वरी असून ईश्वराची ( ईश्वर, परमात्मा, भगवान् अथवा पुरुषोत्तम हे सर्व शब्द एकाच अर्थानें वापरतात ) प्राप्ति प्रेमलक्षणात्मक भक्तीनें होते असें मानतो. या धर्मास सात्वत, नारायणीय, पांचरात्र अशीं सुद्धां नावें दिलेलीं आपणांस पुराण ग्रंथांतून आढळून येतात. या धर्माचे मुख्य ग्रंथ वेद, श्रीमद्भागवत, गीता, नारद व शांडिल्य सूत्रें, पंचरात्रागम हे होत. कित्येकांच्या मतें या भक्तिमार्गाचा उगम येशूख्रिस्तानें स्थापिलेल्या ख्रिस्तिधर्मांत आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरींत येणाऱ्या 'वैकुण्ठीचें राज्य' याचें मूळ Kingdom of God या बायबलमधील कल्पनेंत आहे, असें रेव्हरण्ड डॉक्टर मॅकनिकोलसारख्या पाद्र्याचें मत आहे. कित्येकांची मजल तर श्रीकृष्णाच्या बाललीला येशूच्या कथांवरून बसविलेल्या आहेत, असें म्हणण्यापर्यंत गेली आहे. या गोष्टीवर आतां फारसा कोणी विश्वास ठेवीत नसल्यानें व या लेखांत ऐतिहासिक पद्धतीनें चर्चा न करण्याचें ठरविल्यानें या मुद्यांचें खण्डन करण्यांत लेखणी खर्च न करतां भागवत धर्माच्या तत्त्वांकडे वळूं

भागवत धर्माचें मूळ वेदांतच आहे. भागवत धर्म हा वरती म्हटल्याप्रमाणें भक्तिप्रधान आहे. म्हणून प्रथमतः भक्तीच्या स्वरुपाचा विचार करूं. सामान्य मनुष्य भक्ति म्हणजे देवाचें भजनपूजन असें समजतो व त्यास पोषक असा भागवतांतील प्रल्हादांनीं म्हटलेला

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

श्लोकहि आढळून येतो. पण सूक्ष्म दृष्टीनें जो याचा विचार करील त्याला आढळून येईल कीं, या श्लोकांत सांगितलेलें ' आत्मनिवेदन ' सोडून दिल्यास बाकीच्या सर्व क्रिया सांगितल्या आहेत. ज्या क्रियांच्या द्वारें भक्ति प्रगट होते, त्या क्रियांचा उल्लेख यांत आहे. पण या क्रियांच्या द्वारा प्रगट होणारी व जिच्या योगानें या क्रियांचा समावेश भक्तींत होईल त्या भावनेचा यांत उल्लेख नाहीं. ती भावना म्हणजे प्रेम. तें असेल तर देवाचें पूजन, भजन, अर्चन भक्तींत जमा होणार; नाहीं तर त्या क्रिया भक्तींत जमा होत नाहींत. तुकाराम महाराजांच्या दृष्टान्तानें सांगावयाचें तर मागें एक आहे म्हणून पुढील शून्यास किंमत; आणखी एकादें शून्य त्यावर ठेवलें तर त्याची किंमत आणखी वाढली. पण त्या मागच्या एकाचा फांटा पुसला कीं सर्वच शून्यें सारखीं. त्यांच्याच शब्दांत सांगायचें तर,

एके दाखविले दहा । पहा फांटा पुसून ॥

तसेंच ईश्वरावरील नितान्त प्रेम जर बुडाशीं नसेल तर अर्चन-पूजनाला काय महत्त्व ? मोलानें ठेवलेला पुजारीहि पूजा करतो पण त्याचें लक्ष पैशाकडे ! मोल घेऊन कीर्तन करणारा कंठरवानें ओरडतो पण सारें ध्यान समाप्तीकडे ! तात्पर्य, भगवन्ताची भक्ति ही क्रिया नाहीं, ती अन्तःकरणाची एक भावना आहे. तिच्यामुळें मनाच्या सर्व वृत्ति व त्यांना प्रगट करणाऱ्या क्रिया भगवन्ताच्या मोहरानें होतात. म्हणूनच भक्त्याचार्य नारदांनीं ' सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा ' अशी भक्तीची व्याख्या केली आहे. शाण्डिल्यांनीं सुद्धां ' सा परानुक्तिरीश्वरे ' अशीच व्याख्या दिली आहे.

द्रुतस्य भगवद्धर्मात् धारावाहिकतां गता ।
सर्वेशे मनसो वृत्तिः भक्तिरित्यभिधीयते ॥

अशी व्याख्या भक्तिरसायनकारांनीं केलेली आहे. एकनाथांनींहि खालीलप्रमाणें भक्तीचें व्याख्यान केलें आहे.

**भक्त म्हणवितां वाटे गोड । भजनमुद्रा अति अवघड । भक्तीचें अंतर अतिगूढ । नकळे उघड श्रुतिशास्त्रां ॥ ज्ञान सांगतां अतिसुगम । भक्तिरहस्य गुह्य परम । अकृत्रिम उपजे प्रेम । ऐसें हें वर्म लाविल्या न लगे ॥ ४२ ॥ कृपण जरी दूरी जाये । तो घरींचें ठेवणें जीवीं वाहे । तैसें माझें प्रेम पाहे । जो हृदयीं वाहे सर्वदा ॥ ४३ ॥ कां गर्भ संभवल्यापाठीं । उल्लासें वाढवी गोरटी । तैसी माझ्या प्रेमाची पोटीं । आवडी मोठी जैं होय ॥ ४४ ॥ जैसे वंध्या गर्भाचे डोहळे । तैसे माझ्या प्रेमाचे सोहळे । पोटांतलेनि कळवळें । उल्हास बळें चढोवढी ॥ ४५ ॥ सदैव जांवई आल्या घरा । जेवीं सर्वस्व वेंची सुंदरा । तेवीं माझा कळवळा पुरा । ज्याच्या जिव्हारा वोसंडे ॥ ४६ ॥ बीज अधिकाधिक पेरितां । उल्हास कृषीवळाचे चित्ता । तेवीं सर्वस्व मज अर्पितां । तैसी उल्हासता जैं होये ॥ ४७ ॥ सगुण सुरूप समर्थ भर्ता । निघोन गेलिया तत्वतां । त्यालागीं तळमळी जैसी कान्ता । तैसी कळवळता जैं उठी ॥ ४८ ॥ त्या नांव गा माझी भक्ति । उद्धवा जाण निश्चितीं । जे भक्तीसी मी भुलोनि श्रीपती । भक्तांहातीं आंतुडलों ॥ ४९ ॥ चढल्या आवडी माझी प्रीती । तेंचि जाण पां माझी भक्ती । ऐसा भक्तीचा महिमा श्रीपती । स्वयें उद्धवाप्रती सांगत ॥ ५० ॥**

कै. पांगारकरांनीं नारदभक्तिसूत्राचें रसाळ भाषेंत मराठींत स्पष्टीकरण केलें आहे तें वाचण्याजोगें आहे.

भागवतधर्मीय संतांचा असा विश्वास आहे कीं, असा भक्तीचा जिव्हाळा का अंतःकरणांत उत्पन्न झाला, कीं त्याला दुसरें वेगळें

साधन करण्याची जरुरी नाहीं. ही भक्तिच सर्व साधनें प्रसवते. तुकयाबंधु कान्होबा म्हणतात :

**पुढें भक्तीनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येतीं ।**
**स्थिर केलीं जीं अचपळें होतीं । सिद्ध आणूनि लाविली पंथीं गा ॥**
**भक्तीचे उदरीं जन्मलें ज्ञान । भक्तीनें ज्ञानासी दिधलें महिमान**
**॥१॥ भक्ति तें मूळज्ञान तें फळ । वैराग्य केवळ तेथींचें फूल ॥२॥**

—श्रीएकनाथगाथा

शास्त्रानुसार कर्म करणें आवश्यक, पण ही भक्ति अंतःकरणांत उत्पन्न झाली कीं कर्म मागें राहातें. जातां जातां एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं, बंगाली चैतन्यांचे शिष्यरूप गोस्वामीप्रभृति यांनीं या भक्तिप्रेमाचें मोठें शास्त्र तयार केलें आहे. अद्वैताग्रणी भक्तिरसायनकार यांनीं भक्तिरसायनांत भक्ति हा रस कसा हें दाखवून त्याचे भाव, विभाव, अनुभाव वगैरे वर्णन केलें. पण महाराष्ट्रीय साधुसंतांनीं आपला फक्त अनुभव सांगितला. त्याचें शास्त्र बनवण्याचें त्यांच्या मनांत आलें नाहीं. याचें एक कारण असें दिसतें. त्यापैकीं एक श्रीएकनाथ जर सोडून दिले, तर बाकीच्यांना जरी संस्कृत कळत असलें तरी यांपैकीं कोणाजवळ पांडित्य होतें असें म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं भक्तिमार्गाचा वेगळ्या तऱ्हेनें प्रसार केला.

भक्तीचें मूळ स्वरूप जें ईश्वरविषयक प्रेम त्याचें स्वरूप सांगणें कठीण आहे. नारदांनीं आधींच सांगून टाकलें, ' मूकास्वादनवत् ' येथें मुक्यानें साखर खाल्ल्याप्रमाणें आहे. गोडी लागते पण सांगतां येत नाहीं. तरी पण त्यांनीं कोठें कोठें जें भक्तीचें स्वरूप प्रगट झालेलें दिसतें त्याचें लक्षण खालीलप्रमाणें केलें आहे.

**गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानम् ।**
**अविच्छिन्नं सूक्ष्मतरं अनुभवरूपम् ॥**

अशी भक्ति उत्पन्न होणें हें परमार्थांतील साध्य. ' स्वयं फल-रूपता इति ब्रह्मकुमारः । ' ( नारदभक्तिसूत्र )

देवाच्या जवळ प्रल्हादानें जें मागणें मागितलें आहे तेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

> या प्रीतिरविवेकानां विनयेष्वनपायिनी ।
> त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्माऽपसर्पतु ॥ १ ॥

ही भक्ति उत्पन्न होण्याचें मुख्य साधन म्हणजे देवाची कींव आकणें हें होय; कारण,

> प्रेम देवाचें हें देणें । देहभाव जाय जेणें ।
> न धरावीं मनें । शुद्धि देशकाळांची ॥

अशा भक्तीचें फळ नारद सांगतातः—

> यद् लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति अमृतो भवति तृप्तो भवति ।
> यत् प्राप्य न किंचित् वाञ्छति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति ॥

भगवन्ताच्या कृपेशिवाय तद्विषयक प्रेम उत्पन्न होत नाहीं, त्याचें दर्शन होऊं शकत नाहीं, असा या भक्तांचा सिद्धांत आहे. उपनिषदांतहि याला प्रमाण आहे. 'यमेवैष वृणुते तेन लभ्यः। तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् । ' येथपर्यंत भक्तीचें स्वरूप सांगितल्यावर थोडक्यांत या भक्तिमार्गाचें वैशिष्ट्य सांगून हा भाग आटपूं.

वैदिक धर्मांत योग, ज्ञान, कर्म इत्यादि जीं साधनें सांगितलीं आहेत त्यापेक्षां भक्ति हें साधन सुलभ तर आहेच. पण त्याबरोबर तें गोमटें अथवा सबळ साधन आहे. आधीं तिचें सामर्थ्य पाहूं. भक्त्येतर साधनांना इतर साधनांची अपेक्षा असते. उदाहरणार्थ,

विवेकास वैराग्याची जोड पाहिजे. वैराग्यास विवेकाची मदत पाहिजे. नाथमहाराज म्हणतात,

**विवेकेंविण वैराग्य आंधळें। वैराग्याविण विवेक पांगळे ॥**
**यत्कर्मभिर्यत् तपसा ज्ञानवैराग्यवत् च यत।**
**योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ॥**
**सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽजसा।**
**स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचित् यदि वांच्छति ॥**

पण भक्तीची श्रेष्ठता अशी आहे कीं, सूर्य हा जसा अंधःकाराचा नायनाट करण्यास दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करीत नाहीं, अथवा सिंह शिकार करण्याकरतां शस्त्रास्त्राची अपेक्षा करीत नाहीं, तशीच भक्ति ही संसारभीति नष्ट करण्यास इतर साधनांची अपेक्षा करीत नाहीं. हिचा अवलंब केल्यास सर्व साधनें प्राप्त होतात.

**आणिकां साधनां नापेक्षिती। सर्व संगातें निरसिती ॥**
**मोक्षमार्गीं मुख्य भक्ति। जिनें स्वरूपप्राप्ति तात्काळ ॥**

—३२, नाथ भागवत, अ. १४

**अवघ्या दशा येणें साधती। मुख्य उपासना सगुणभक्ती ॥**
**प्रगटे हृदयींची मूर्ती। भावशुद्धी जाणोनिया ॥**
**बीज आणि फळ हरिचें नाम** ॥ (तु. म. गाथा)

आतां तिची सुलभता सांगतों. नारद म्हणतात, ‘अन्यस्मात् सौलभ्यं भक्तौ’ ही सुलभता खालीलप्रमाणें सांगतां येईल. योगामध्यें इन्द्रियांची सहज प्रवृत्ति कोंडून त्यांना शून्याकारता आणावी लागते. पण हें करणें म्हणजे पाणी पश्चिमेकडून पूर्वेस वाहत असतांना त्याच्या गतीच्या उलट पूर्वेकडून पश्चिमेकडे पोहण्यासारखें आहे. इंद्रियें बहिर्मुख असल्यानें त्यांना अंतर्मुख करणें व देवाकडे लावणें फारच कठिण. भागवतधर्म ही कोंडाकोंडी सांगत नाहीं. कारण इंद्रियें कोंडून कोंडलीं जात नाहींत. उलट कालांतरानें दाबून

धरलेली वाफ जशी उसळते तशीं तीं उसळतात. नाथमहाराज म्हणतात,

**इंद्रियें कोंडितां न कोंडती । विषय सांडतां न सांडती ।**
**पुढतपुढती बाधों येती । यालागीं हरिभक्ती द्योतिली वेदें ॥**

—भागवत २९३।२

कै. न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या धर्मपर व्याख्यानांत भागवतधर्माच्या याच महत्त्वाच्या गुणाचें वर्णन केलें आहे.

नारदांनीं म्हटलें आहे,

**तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधादि तस्मिन्नेव करणीयम् ।**

(भक्तिसूत्र)

इन्द्रियप्रवृत्तींना न कोंडितां त्यांना भगवन्ताचें वळण दिल्यानें तीं सहजच वश होतात असा सोपा उपाय भागवतधर्मानें सांगितल्यानें भागवतधर्म हा आंधळ्यानें अबलानें सुद्धां चालून जावा असा झाला, म्हणूनच भागवतांत 'धावन् निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥' ३९ (अ. २) असें याचें वर्णन केलें आहे. शिवाय योगमार्गानें जातांना कामक्रोधाचे अनेक विलग उठावतात त्यांना ठेंचून जेरीस आणतांना मनुष्याची बुद्धिच मेटाकुटीस येते व परमार्थ नकोसा होतो. भागवतधर्मांत या बाबतींत मोठीच सोय आहे. श्रीएकनाथ महाराज म्हणतात, 'भागवतधर्म हा राजमार्ग आहे. आंधळा काठीवांचून चालला तरी भीति नाहीं. शिवाय चोरवटयाची भीति नाहीं.' कारण,

**यापरी हरिकीर्तन । देत परम समाधान ।**
**भक्ती हा राजमार्ग पूर्ण । मार्गीं स्वयें रक्षण चक्रपाणी करता ॥**
**चक्र घेऊनि भक्ताचे ठायीं । म्हणे तुझें कार्य कायी ।**
**मज जगीं वैरीचि नाहीं । भक्तद्वेषी पाही निजशस्त्रें नाशी ॥**

**चक्रें अभिमानाचा करी चेंदा । मोहममता छेदी गदा ।**
**शंखें उद्बोधी निजबोधा । निजकमळें सदा निजभक्त पूजी ॥**
—भागवत, अ. २, ५४२–४४

रामकृष्ण परमहंस हेंच तत्त्व एका सुंदर दृष्टान्तानें सांगत असत. योगमार्गातील साधक म्हणजे माकडीच्या पोरासारखा. माकडीच्या पोरालाच आईच्या पोटाला धरावें लागतें. माकडी या झाडावरून त्या झाडावर उड्या मारते. तेव्हां पोराला माकडीला धरावें लागतें. जर कां हात सुटला कीं तें खालीं पडलेंच ! मांजरीच्या पोरांचें तसें नाहीं. मांजरी आपल्या तोंडांत मुलांना घेऊन बोक्यापासून त्यांचें संरक्षण करते. पिलांचें काम जसें ओरडायचें तसेंच भक्तांचें आहे. त्यांनीं धांवा करावा, देव त्यांचें रक्षण करण्यास सिद्ध आहेच.

**मोहें धांवे घाली पान्हा । नाम घेतां पंढरीराणा ॥** –तुकाराम

या धर्माचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे या धर्माची उदारता. मोठ्या वृक्षांखालीं ज्याप्रमाणें सर्व प्राणी सांवलीचा अनुभव घेऊं शकतात, तसेंच या धर्मवृक्षाखालीं सर्व स्त्रीपुरुष-पापी, अधम--या सर्वांना सावली मिळते. हा सर्वांना आश्रय देणारा धर्मपंथ आहे. गीताच सांगते,

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥** ९-३२
**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः ॥** ९-३०
**यारे यारे लहान थोर । याती भलते नारीनर ।**
**करावा विचार । नलगे चिन्ता कोणासी ॥**
**सकळांसीं येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिच्या नामीं ॥**
—तुकाराम

ज्ञानेश्वर म्हणतात,

**राजाज्ञेचीं अक्षरें अहातीं । तियें चामा एका जयां पडती ।**
**तया चामासाठीं जोडिती । सकळ वस्तू ॥ ५३ ॥**
**वांचोनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे ।**
**तेंचि चाम्र एक जैं लाहे । तेणें विकती आघवीं ॥ ५४ ॥**
**तैसें उत्तमत्व तैंचि सरे । तैंचि सर्वज्ञता खरे ।**
**जें मनोबुध्दि भरे । माझेनि प्रेमें ॥ ५५ ॥**
**म्हणोनि कुळ जाती वर्ण । हें आघवेंचि गा अकारण ।**
**एथ अर्जुना माझें पण । सार्थक एक ॥ ४५६ ॥**

चांडाळादिकांनाहि भगवन्ताची प्राप्ति मोकळी आहे. भागवतांत तर ''विप्रात् द्विषड्गुणयुवान् श्वपचो वरिष्ठः ।' असें वचन आहे.

—भागवत, तृतीय स्कंध ३३७

तुकारामबोवाहि तसेंच म्हणतात,

**वैष्णव तो याति अंत्यज असतां । मानावा तत्वतां निश्चयेंसी ॥**

भागवतधर्मानें भक्तीवर जोर दिला व मुक्तीचा दरवाजा जरी सर्वांना खुला ठेवला असला, तरी त्याचा अर्थ धार्मिक विधि, नीतिनियम, सर्व गुंडाळून ठेवावेत असें त्याचें सांगणें नाहीं. भक्तीला अविरोधी वेदविहित कर्में अवश्य आचरावींत असा त्यांचा दंडक आहे.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**तैसीं आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं निकी ।**
**तंव नोहावें यागादिकीं । उदासीन** ॥-ज्ञा. अ.१८, ओवी १५२

रामदास म्हणतात,

**सदाचार हा थोर सांडू नये तो ।**
**जगीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥**

तुकारामबोवा म्हणतात,

**शिखासूत्र तुझा गुंतवा जमान । तंववरी तूं जाण श्रुतिदास ॥**
**कर्म आचरणें यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥**

भगवन्तावर निन्तात श्रद्धा व प्रेम उत्पन्न झालें नाहीं तोंपर्यंत कर्माचा त्याग करूंच नये. उत्कट प्रेम ज्याच्यांत उत्पन्न झालें त्याचें शास्त्र स्वतंत्रच होतें. त्याचें वर्णन ज्ञानदेवांनींहि गीतेच्या १६ व्या अध्यायांतील तिसऱ्या श्लोकामधील तेजावरील व्याख्यानांत केलें आहे.

**आतां ईश्वरप्राप्तीलागीं । प्रवर्ततां ज्ञानमार्गीं । धिंवसेयाच्या अंगीं । उणीव नोहे ॥ ८६ ॥ वोखटें मरणाऐसें । तेंहीं आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोद्देशें । न गणीचि सती ॥ ८७ ॥ तैसा आत्मनाथाचिया आधी । लावुनि विषयविषाची बांधी । धांवो आवडे पाणधी । शून्याचिये ॥ ८८ ॥ न ठाके निषेधु आड । न पडे विधींची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ॥ ८९ ॥ ऐसें ईश्वराकडे निज । धावें आपसया सहज । तया नांव तेज । आध्यात्मिक तें ॥ १९० ॥**

परमार्थांत पावित्र्याची भूमिका अवश्य आहे, हें हा धर्म गृहीत धरूनच चालतो. श्रीएकनाथ म्हणतात:—

**मुख्य साधावया परमार्था । अवश्य पाहिजे गा शुचिता ।**
**शुचित्वावांचोनि तत्वतां । न लगे हातां निजस्वार्थ ॥**

—भागवत ३८०।३

तुकारामबोवा म्हणतात,

**करूनिया शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥**

भगवद्विषयक प्रेम अथवा भक्ति अन्त:करणांत उत्पन्न होण्यास ईश्वराची कृपा हा एक मार्ग वर दिलाच आहे. पण याच्या जोडीला नारदांनीं खालीलप्रमाणें आणखीहि मार्ग दिले आहेत.

तत् तु संगत्यागात् विषयत्यागाच्च अव्यावृतभजनात् ।
लोकेऽपि भगवद्गुणश्रवणकीर्तनात् मुख्यतस्तु महाकृपयैव ॥

आतांपर्यंत भागवतधर्म अथवा भक्तिमार्ग याच्या सामान्य स्वरूपाचें वर्णन केलें. आतां त्या धर्मानें आपल्या प्रान्तांत जें स्वरूप धारण केलें, त्याचा विचार करूं

भागवतधर्माचें सामान्य स्वरूप सांगतांना महाराष्ट्रीय सन्तांच्याच ग्रंथांतून प्रामुख्यानें उतारे दिले आहेत. त्याचा हेतु असा कीं, वरील वर्णन वाचतांना वाचकास आपोआपच कळावें कीं, महाराष्ट्रीय साधुसन्तांनीं प्रसृत केलेला धर्म हा शुद्ध भागवतधर्मच होय. यांत वारकरी, समर्थादिक सर्व सांप्रदाय येतात. कारण हे सर्व उपासनाप्रधान वैदिक सांप्रदाय आहेत.

या भागवतधर्मानें महाराष्ट्रांत जें स्वरूप धारण केलें त्याचीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत. तीं थोडक्यांत देऊन त्याचें कार्य सांगून हा लेख संपवूं.

भागवतधर्मांतील महाराष्ट्राबाहेरच्या, विशेषत: दक्षिणेकडील रामानुजाचार्यांनीं मान्य ग्रंथांत 'पंचरात्रागम' यास वेदाइतकेंच प्रामाण्य दिलें. आमच्याकडील आचार्यांनीं पंचरात्रागमाला जवळजवळ मुळींच महत्त्व दिलें नाहीं. त्यांनीं श्रीमद्भागवत व गीता हे ग्रंथ प्रमाणभूत म्हणून मानले. पण वेदाचा संबंध कधींच सोडला नाहीं. ते वेद-मूळाला घट्ट धरून बसले. यामुळें औपनिषदीय अद्वैत तत्त्वज्ञानाची पुरी छाया श्रीज्ञानदेवापासून तों तहत तुकारामबोवा, समर्थ यांच्यापर्यंत झालेल्या सर्व साधूंच्या ग्रंथांवर पडलेली दिसते. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामबोवांचे अभंग, समर्थांचा दासबोध हे ग्रंथ वाचतांना किती तरी औपनिषदिक वचनांची स्मृति होते. कै. पांगारकरांनीं श्रीतुकारामचरित्रांत

तुकारामबोवांच्या अभंगात कित्येक उपनिषद्वचनांचा उल्लेख कसा सापडतो, हें साधार दाखविलें आहेच. हे सर्व संत वेदप्रामाण्य न मानणारा तो नास्तिक असेंच मानतात.

**नास्तिका द्यावया तोंड । वेदांचें गाढें बंड ।**
**तें देखोनिया पाखांड । आनाचि वाजे ॥** ज्ञा. अ. १३-१९
**वेदबाह्य बंड बोले तो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥**
—तुकाराम.

महाराष्ट्रीय भागवतधर्मांचें हें वैशिष्ट्य आहे कीं, यानें भक्तीस अद्वैत तत्त्वज्ञानाची जोड दिली. बाकीचे बहुतेक भक्त्याचार्य हे द्वैती--कोणी विशिष्ट, कोणी नुसते पण द्वैती—आहेत. महाराष्ट्रामध्यें हा मोठा लक्षांत ठेवण्यासारखा मिळाफ आहे. महाराष्ट्रीय साधूंनीं शुद्ध विमल असें अद्वैत आत्मज्ञान उपनिषदांपासून घेतलें व त्यास भक्तीची जोड दिली.

तसेंच यांनीं कर्मांचा त्याग केला नाहीं. आपण महाराष्ट्राबाहेरील बंगाल, गुजराथ अथवा संयुक्तप्रांत यांत प्रादुर्भूत झालेल्या भक्तांच्या वाङ्मयाची व त्यांनीं प्रसृत केलेल्या भक्तिमार्गाची आपल्या संत-वाङ्मयाशीं व त्यांनीं प्रसृत केलेल्या भक्तिमार्गाशीं तुलना केली तर आपल्या लक्षांत ही गोष्ट चटकन् येईल. या संतांनीं भक्तिरसाचा आस्वाद घेतला, तो वाङ्मयात ओतला. पण जगाला मार्गदर्शन करतांना राधेपेक्षां रुक्मिणीला महत्त्व दिलें. ‘ रासक्रीडे ’ ऐवजीं काल्यावर जोर दिला. याचा परिणाम असा झाला कीं, महाराष्ट्रांत भक्तिसंप्रदाय हा पुष्कळच आचारशुद्ध राहिला. काल्यांत तर जगाचा खेळ आपण त्याहून वेगळें राहून कसा खेळावा हें जें भगवंतांनीं आचरण करून दाखवलें, त्याचेंच वर्णन आहे. महाराष्ट्रीय साधूंनीं अशा रीतीनें ज्ञान, भक्ति व कर्म यांचा समन्वय

साधला, व यथार्थ औपनिषदिक तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रांत प्रसार केला. म्हणून वीरशैव--वीरवैष्णवासारखे तीव्र विरोधी पंथ महाराष्ट्रांत रुजले नाहींत. महाराष्ट्राची अशी सुंदर मनोभूमिका या संतांनीं तयार केली.

या संप्रदायानें काय कामगिरी केली, याची यथार्थ कल्पना यावी असें जर वाटत असेल, तर ज्या समाजांत यांनीं आपलें हें तत्त्वज्ञान पसरलें त्याची पूर्वीची भूमिका काय होती, म्हणजे त्यांचें तत्त्वज्ञान काय होतें, त्यांची संस्कृति, आचारविचार काय होते, याची माहिती करून घेणें अवश्य आहे. ज्ञानदेवादि वारकरी सन्तांनीं कीर्तन-प्रवचन—वाङ्मयनिर्मितिद्वारा जी सुधारणा केली, ती ज्या समाजांत केली, त्याचें चित्र त्यांच्या ग्रंथांतून आढळतें व हें अगदीं स्वाभाविक आहे. कारण, माणसाची संस्कृति व तत्त्वज्ञान त्याच्या आचारविचारावरून, त्याच्या देवविषयक कल्पनेंत व देवपूजेच्या कल्पनेंत प्रतिबिंबित झालेलें आढळून येतें. समाजस्थितीचें प्रतिबिम्ब धार्मिक वाङ्मयांत सुद्धां उठल्याशिवाय राहत नाहीं. कारण, धर्म हा इतका व्यापक आहे कीं, सामाजिक चालीरीती धर्माला स्पर्शिल्या-शिवाय राहूंच शकत नाहींत. विशेषत: धर्मप्रधान अशा देशांत व काळांत तर हें अशक्यच आहे. म्हणून या साधुसंतांच्या वाङ्-मयांत पूर्वस्थिति दाखवणारे उतारे आढळून आले तर त्यांत फारसें नवल नाहीं.

संतवाङ्मयांत आढळून येणारे उल्लेख आपण जर मननपूर्वक वाचले तर आपल्याला या साधुसन्तांनीं केवढें भरीव कार्य केलें याची कल्पना येईल. हें कार्य दोन प्रकारचें आहे. पहिलें, समाजांत असलेल्या खोट्या नैतिक व धार्मिक चाली यांवर प्रहार करणें व दुसरें, अधिक महत्त्वाच्या खालच्या समाजास न लाथाडतां त्यांच्या

उपास्य देवदेवतांच्या उच्च व भव्य स्वरूपाची त्यांना जाणीव करून देणें. हें खरें रचनात्मक, विधायक कार्य होय. येशूनें बायबलमध्यें म्हटलें आहे कीं, I came not to destroy, but to fulfil. तसेंच या साधूंनीं नुसती दोषात्मक, विध्वंसक टीका केली नाहीं, तर त्या त्यांच्या देवदेवतांवर वेगळा प्रकाश पाडला.

एकनाथ व तुकारामबोवा यांचे खालील अभंग पाहिले म्हणजे आमच्या वरच्या विधानाची सत्यता पटेल.

**नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥ १ ॥**
**बळिया माझा पंढरीराव । जो या देवांचाहि देव ॥ २ ॥**
**रंडी चंडी शक्ति । मद्यमांसातें भक्षिती ॥ ३ ॥**
**बहिरव खण्डेराव । रोटी सुटीसाठीं देव ॥ ४ ॥**
**गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥ ५ ॥**
**मुंजा म्हैसा सुरें । हें तों कोण लेखीं पोरें ॥ ६ ॥**
**वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥ ७ ॥**
**तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पति ॥ ८ ॥**

—तुकाराम गाथा, ५३७

**सेंदरी देवी दैवतें । कोण तीं पूजी भुतेंखेतें ।**
**आपुल्या पोटा जी रडते । मागती शितें अवदान ॥ १ ॥**
**आपुले इच्छे आणिकां पींडी । काय ते देईल बराडी ।**
**कळोहि आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधीर ॥**
**तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन ।**
**तुका म्हणे त्याचें करा चिन्तन । वंदू चरण येती सकळें**

—तुकाराम गाथा, ४३२

याचा आरंभ आपणांस ज्ञानेश्वरींत आढळून येतो. ज्ञानेश्वरांनीं अज्ञानाच्या लक्षणांत अज्ञान्याच्या भक्तीचें मोठें सुंदर वर्णन केलें आहे.

**माझी मूर्ति निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो**

**देवी। याले जाये ॥ ११५॥...... ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी। अवघे न गांव द्वारीं। अदेव जैसी ॥**

—ज्ञा. अ. १३, ओ. ११५-२२

हें कार्य फार मोठ्या प्रमाणांत श्री एकनाथांच्या वाङ्मयांत आढळून येतें. नाथांचें भारुड प्रसिद्ध आहे. कै. पांगारकरांनीं मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा (एकनाथ तुकारामांचा काळ) यांत एकनाथी भारुडें या तेराव्या प्रकरणांत कांहीं भारुडें व त्यांचे अर्थ दिले आहेत. त्यांत ४२५ पानावर ते म्हणतात, "ह्या भारुडांत वर्णनें कोठें कोठें पाल्हाळिक असून पुनरुक्ति आहे. तथापि यांत ३५० वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्राचें चित्र उत्कृष्ट प्रतिबिंबित झालें आहे." पानें ४२९ ते २९ वाचकांनीं अवश्य वाचून पहावींत.

या भारुडांत वासुदेव, बाळसंतोष, फुलवरा, गोंधळ, सौरी इत्यादि अनेक रूपकें आहेत. नाथांचीं भारुडें १२५ विषयांवर असून त्यांची संख्या ३०० चे वर आहे.

या भारुडांचा अभ्यास जसा व्हावयास पाहिजे तसा अजून झाला नाहीं. या भारुडांत प्रचलित धार्मिक व सामाजिक चालीरीतींवर टीका आहे. पण ही टीका नुसती दोषाविष्करणापुरतीच नव्हे, तर ज्या देवदेवतांची टीका केली त्यांचें खरें स्वरूप काय आहे हें दाखवून उपासकांना उच्च अशा भूमिकेवर आणण्याकरतां आहे. आपण नाथांचे एकदोन अभंग पाहूं. प्रथम फुलवरा म्हणून प्रसिद्ध असलेला अभंग आहे तो पाहूं व त्याचा विचार करूं.

पिंड ब्रह्मांड अन्तरीं दैवत भिन्नाकृती वो। शोधोनी पाहतां अवघें चराचर व्यापक घनसंभूती वो। भेदभाव त्रिगुणाचा रजतम सत्वाची आरती वो। ऐसें जाणोनी। केली उभवणी। द्वैत सारुनी। परी तो मनीं एक हरि अंकिला। तुज म्यां फुलवरा बांधिला ॥१॥ जय जगदम्बे पूर्णकदम्बे जगउद्बोधें देह तुज अर्पिला । तुज

म्यां फुलवरा बांधिला ॥ ध्रु. ॥ आई भवानी थोर जाणोनी तुज म्यां उपासिलें वो । हातीं परडी देऊन तिनें मज भिकेसी लाविलें वो । खुळा पांगळा करुनी आपणाजवळीं बैसविलें वो । उदो अस्तुचें भरे । फिरे गरगरे । भूत वावरे । मज व्यर्थ शीण वाटला ॥ २ ॥ नवस करोनी खंडोबासी मुरळी होउनि बैसलें वो । आपुले जे का सखे सज्जन ते विवंचुनी भरीं भरलें वो । वारी मागतां पोट भरेना बहुश्रम पावलें वो । श्वानाचिये परी । वृथा गुरगुरी । जाय चाचरीं । परी तो हरी नाहीं देखिला ॥ ३ ॥ माझे घरीं पाहुणा भैरव येउनी बसला वो । त्रिगुणाचा त्रिशूळ घेउनी प्रपंच विस्तारिला वो । जोगी न लाऊनी परत भरुनी भराड म्या घातिला वो । ऐशीं वरदळें । सोशिलीं बळें । जालीं निर्फळें । सुखाचा लेशु नाहीं देखिला ॥४॥ मुंजाबाची अंक घालुनि मेसाई आळविली वो । त्रिगुणाची तिवई करुनि त्यावरी बैसविली वो । धूप दीप नैवेद्य दाउनि पंचारती केली वो । तिनें मज नाडिलें । दुःख भोगिलें । सुख नासलें । मग म्या ढकलून दिलें तिला ॥ ५ ॥ ऐशीं दैवतें केलीं अनंतें नवस बहू फोडिले वो । परि तें फलकट जालें शेवटीं गळा येउनी पडिले वो । बहु जाचिलें दुःख भोगिलें चौदिशीं व्यापिलें वो । जालें मी उदास । धरली कास । सोडुनी आस । पंढरी पाहुनी जीव हर्षला ॥ ६ ॥ वैकुंठींचें निधान त्याचें असती जे प्रियकर वो । त्यांची गांठ पडली तेणें दिधला अभय कर वो । त्यांचे संगतीं गेलें भक्तीनें देखिलें भीमा तीर वो । परात्पर सोयरा । पुंडलिक बरा । दिधला थारा । तेणें मज बुडतां हात दिधला ॥ ७ ॥ डोळां घालुनी अंजन घेउनी गेलें मज राउळीं वो । विटेवरी जगदम्बा एकाएकीं नयनीं देखिली वो । मनोभाव बरदळ वृत्ती देहाची खुंटली वो । एका जनार्दनीं भले । द्वैत हरपलें ऐक्य संचलें । जन्ममरणाचा पट फाटला ॥

भागवत धर्म ........ दि:
क्रमांक ........ नों. दि:

यांतील २, ३, ४, ५ या कडव्यांत तुळजापुरची भवानी, जेजुरीचा खंडोबा, भैरव बहिरोबा व मेसाई यांची उपासना करून ती ‘निर्फळ’ कशी ठरली व त्यांनीं आपणांस कोणच्या गतीला पोंचवलें याचें प्रभावी वर्णन केलें आहे. नाथमहाराज म्हणतात, “मी तुळजापूरची भवानी आई थोर म्हणून तिला शरण गेलों; पण तिनें मला ‘स्वानुभव रसाळ खाजें’ देण्याऐवजीं हातांत परडी देऊन, गळयांत कवडयाची माळ घालून घरोघर भीक मागायला लावलें. भवानीचे उपासक परडी घेऊन भीक मागतात हें प्रसिद्ध आहे. पण यांत परमार्थ काय साधला? जेजुरीच्या खंडोबाला शरण गेलों व मुरळी होऊन बसलों; रिकामे श्रम झाले. श्वानाप्रमाणें गुरगुरण्यांत काळ व्यर्थ गेला. देव तर दिसलाच नाहीं. अशाच प्रकारचा परिणाम ग्रामदेवता बहिरोबा, मेसाई यांची उपासना करण्यांत अनुभवास आला” असें त्यांनीं दाखविलें आहे. यानंतर पंढरपूरला जाणाऱ्या साधुसन्तांनीं आपणांस पंढरीच्या दैवताची ओळख करून देऊन विश्वव्यापिनी चिद्शक्तीची कशी ओळख करून दिली व त्या योगानें आपलें कल्याण कसें झालें हें सांगितलें आहे.

या वर्णनावरून एक गोष्ट प्रामुख्यानें दिसतें कीं नाथांच्या वेळेपर्यंत सुद्धां या वेगवेगळ्या संप्रदायांत असे लोक निर्माण झाले नाहींत कीं ज्यांनीं ह्या देवदेवतांचें यथार्थ स्वरूप लोकांपुढें मांडून भक्तांना उच्च नीतितत्त्वें शिकवलीं. उदाहरणार्थ, तुळजापूरची भवानी अथवा जेजुरीच्या खंडोबाचीच उपासना घेऊं. भवानी आदिस्वरूप चित्शक्ति—तिच्या इक्षणमात्रानें जगत् निर्माण होतें व लय पावतें; पण हें तिचें खरें स्वरूप जगापुढें मांडलें गेलें नाहीं. तिची उपासना फक्त कामिक स्वरूपांत व निकृष्ट साधनांत जगापुढें आली. म्हाळसाकान्त खंडोबा हा शिवाचा अवतार; पण त्याच्यापुढें

वाद्यामुरळीचा गोंधळ सुरू करण्यांत आला. शिवाचें उदात्त स्वरूप झांकलें गेलें. देवाचें माहात्म्य भक्तांवर अवलंबून आहे. नाथमहाराजांनीं लोकांचें लक्ष या कामनिक व अधोगतीस नेण्याचा संभव असणाऱ्या पूजेच्या प्रकाराकडे वेधलें. देवदासींच्या चालीवर पाश्चिमात्य लोकांनीं येऊन आम्हांला सांगण्यापूर्वीच या साधुसंतांनीं आम्हांला जागृत केलें.

त्यांनीं एवढेंच काम केलें असतें तरी सुद्धां लोकजागृतीचें हें मोठें काम होतें! पण त्यांनीं नुसती दोषदर्शनात्मकच टीका न करतां संघटनात्मक, रचनात्मक कार्य केलें व तेंही अशा स्वरूपांत कीं, वैदिक धर्मानें या देवदेवतांना आपल्या पोटांत समाविष्ट केलें. या समावेश करण्याच्या--पचविण्याच्या--शक्तीमुळेंच वैदिक धर्म आजवर तगला. उपनिषद् द्रष्ट्या ऋषींनीं जुनीं संहितेंतील यज्ञादिकांचें वर्णन घेऊन त्याचीं रूपकें करून अध्यात्म सांगितले. या महात्म्यानींहि तसेंच केलें. त्यांच्या उपासनामार्गांना आध्यात्मिक रूप दिलें. उदाहरणार्थ, वासुदेव अथवा देवीचा गोंधळ. ज्ञानेश्वर महाराजांचा व तुकाराम महाराजांचा एक एक गोंधळ देतों. त्यावरून हें अध्यात्मरूपांतर या साधूंनीं कसें केलें, उपासनेस धक्का न लावतां देवतेचें उच्च स्वरूप पुढें ठेऊन साधनसुधारणा कशी केली हें कळून येईल.

तूं विटेवरी सखये बाई हो करीं कृपा । माझें मन लागो तुझ्या पायीं हो करीं कृपा । तूं सांवळे सुंदरी हो करीं कृपा । लावण्य मनोहरी हो करीं कृपा । निजभक्तां करुणा करी हो करीं कृपा ॥१॥ पंढरपुरीं राहिली । डोळां पाहिली । संतें देखिली । वरुनी विठाई वरुनी विठाई । सच्चिदानंद अंबाबाई हो करीं कृपा । उजळ कुलदीपा । बोध करीं सोपा । येउनी लवलाहीं येउनी लवलाहीं ॥ ध्रु. ॥ तुझा देव्हारा मांडिला हो करीं कृपा । प्रेम चांदवा वर दिधला हो करीं

कृपा । ज्ञानगादी दिली बैसावया हो करीं कृपा । वरी बैसविली आदिमाया हो करीं कृपा । काम क्रोध मद मत्सर । दंभ अहंकार । त्यांचें बळ फार । सर्व सुख देई, सर्व सुख देई ॥ २ ॥ शुकसनकादिक गोंधळी हो करीं कृपा । नाचताती प्रेमकल्लोळीं हो करीं कृपा । उदो उदो शब्द आरोळी हो करीं कृपा । पुढें पुंडलिक दिवटा हो करीं कृपा । त्यानें मार्ग दाविला निटा हो करीं कृपा । आई दाविली मूळपीठा हो करीं कृपा । बाप रखुमादेवीवरु । सुखसागरु । त्याला नमस्कारु । सर्व सुख देई, सर्व सुख देई ॥३॥

डोळे मोडत ओरडणारी मुरळी व तिचा तुणतुणें वाजवणारा साथीदार यांचा गोंधळ व शुकसनकादिकांनीं घातलेला गोंधळ यांची तुलनाच होणें कठिण !

सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ वो । पंचप्राण दिवटे दोन्ही नेत्रांचें हिल्लाळ वो॥२॥ पंढरपुरनिवासे तुझे रंगीं नाचत असे वो । नवरस मुखीं माझ्या मनींची जाणोनियां इच्छा वो ॥२॥ मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवनमाझारीं वो । चौक साधियेला नाभिकळस ठेविला वरी वो ॥ ३ ॥ बैसली देवता पुढें वैष्णवांचें गाणें वो । उद्‌गारें गर्जती कंठीं तुळशीचीं भूषणें वो ॥ ४ ॥ स्वानंदाचे ताटीं धूप दीप पंचारती वो । वोवाळिती माता विठाबाई पंचभूतीं वो ॥ ५ ॥ तुझें तुज पावलें माझा नवस पुरवी आतां वो । तुका म्हणे राखे आपुलिया शरणागता वो ॥ ६ ॥

आतां वासुदेवाचें उदाहरण:—

हल्लींच्या काळीं शहरांत वासुदेव हें काय प्रकरण आहे हेंच समजायची पंचाईत. पण खेडेगांवांत अजूनसुद्धां सकाळीं अथवा यात्राप्रसंगीं सकाळीं मोरांच्या पिसांची उंच टोपी व लांब अंगरखा घातलेला वासुदेव ‘ आळंदीच्या ज्ञानोबाला । जेजुरीच्या खंडोबाला ’

असें म्हणत टाळ वाजवीत फिरतांना दिसतो. त्याला एक पैसा दिला कीं, आपलें काम संपलें असें समजणाऱ्या समाजास ज्ञानदेवादिक संत खऱ्या वासुदेवाचें स्वरूप वासुदेवाच्या रूपकानें सांगतात, वासुदेव जगाला मोहनिद्रेंतून जागें करतो.

बोल बोले अबोलें । जागे बाहेर आंत निजले । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों अंधार ना उजडलें गा ॥ १ ॥ वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी कांहीं तरी दान पुण्य करा । जाव नेदा तरी जातों माघारा गा ॥ २ ॥ हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें । नाहीं निवडली थोर लहानें । नका निजों भिकेचिया भेणें ॥ ३ ॥ मी वासुदेव तत्त्वतां । कळों येईल विचारितां । आहे ठाउका सभाग्य संतां । दुजा नाहीं आणिक मागती गा ॥४॥ काय जागाचि निजलासी । सुनें जागवूनी दारापाशीं । तुझ्या हितालागीं करिसी वसविशीं । भेटी न घेसी वासुदेवाची गा ॥ ५ ॥ ऐसे जागविले अवघे जन । होतें संचित तिहीं केलें ज्ञान । तुका म्हणे दुबळीं कोण कोण । गेलीं वासुदेवासी विसरून गा ॥६॥

साधुसंतांना हें कार्य करतां आलें; कारण त्यांनीं अद्वैत व भक्ति यांचा सुंदर मिलाफ घातला होता. शंकराचार्यांनींसुद्धां वेगवेगळ्या उपासनांचा असाच समन्वय केला.

या साधुसंतांच्या कार्याचा आपण विचार केल्यास आपणास आणखी एक गोष्ट त्यांच्या कार्यासंबंधीं सांगतां येईल. त्यांनीं धर्म व नीति यांची सांगड घालण्याचा मोठा प्रयत्न केला. आमच्या धर्मावर पाश्चिमात्यांचे असे आक्षेप आहेत कीं, यांच्या धर्मांत नीतीला मोठें स्थान नाहीं. मनुष्यानें भजन केलें व मग तो कसाहि वागला तरी चालेल, अशी यांची शिकवणूक आहे. स्वकर्तव्यावर हे लोक जोर देत नाहींत. Bishop Caldwell म्हणतो,

" Undoubtedly Indian literature contains a large amount of moral teaching, some of which is of very high order; but it is a remarkable circumstance, and one which European Christians find it difficult to believe or even comprehend, that this teaching is unconnected with religious teaching. Books containing moral disiquisitions and maxims may be studied at home; but in the temple they are unknown and unheard of morality is supposed to consist merely in the discharge of the duties of one's caste and station towards one's fellowmen......Religion, on the other hand, is supposed to rise far above such petty considerations as the social duties and to consist solely in the worship of the gods by means of the appointed praises, prayers, and observances, in the hope of obtaining thereby union with the supreme spirit and final emancipation. The duties of life are never inculcated in any Hindu temple. The discharge of those duties is never represented as enjoined by the gods, nor are any prayers ever offered in any temple for help to enable the worshippers to discharge those duties aright......Hence we often see religion going in one direction and morality in another. We meet with a moral Hindu, who has broken altogether away from religion and what is still more common, still more extraordinary, we meet with a devout Hindu who lives a flagrantly immoral life. In the latter case, no person sees any inconsistancy between the immorality and the devoutness. "

वस्तुस्थिति याहून वेगळी आहे. या साधुसंतांनीं मुरळीसारखे अनीतिकारक, भीक मागण्यासारखे, समाजास घातक असणाऱ्या

रिवाजांचीं व्यंगें दाखविलीं व लोकांना नीतीचा, सदाचाराचा व स्वकर्तव्याचा उपदेश केला. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**देव अवतार घेऊन । धर्मासी नीतीसी शेस भरी ।**-ज्ञा० ४।५३

नाथ म्हणतात,

**धर्माधर्म न विचारितां । म्हणती ईश्वरचि मोक्षदाता ।**
**हे भक्त पाखंडी कथा । स्थापूनि चिद्रूपता निवारी ॥**

तुकाराम महाराज म्हणतात,

**स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेनापति ।**
**हेचि विष्णूची महापूजा । अनुभव नाहीं दुजा ॥**
**सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ।**
**निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ ॥ १ ॥**

खालच्या समाजांत नीतीचा प्रसार करून त्यांना उच्च भूमिकेवर आणण्याचें मोठें कार्य या लोकांनीं केलें.

# १२. ह. भ. प. पांगारकरांचें भागवतधर्मकार्य

( ले.—नरहर सदाशिव जोशी, खरशीकरशास्त्री )

पूजनीय ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या स्मारक-ग्रंथांत त्यांनीं भागवतधर्माची केलेली अपूर्व सेवा दाखविली जावी म्हणून त्यांचे कार्याबद्दल अल्पसें विवेचन येथें करीत आहें.

लक्ष्मणराव आठ वर्षांचे असतांना त्यांना आंकडीचा विकार जडला. अनेक औषधोपचार करूनही गुण येईना. आंकडीचा रोग फार वाईट असतो; त्यामुळें त्यांचे आईस फार चिंता उत्पन्न झाली व तिनें त्याच्या वडिलांस ( त्या वेळच्या चुलत्यास, पण पुढें दत्तक पित्यास ) सांगितलें कीं, याला पुण्याला घेऊन जा व तेथील सुप्रसिद्ध वैद्य बापूसाहेब मेहेंदळे यांना दाखवा. एके दिवशीं भाऊ ( वडील ) त्यास घेऊन बैलगाडीनें निघाले, ते पुण्यास न जातां आळंदीस गेले. तेथें जाऊन श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीची षोडशोपचार पूजा करून लक्ष्मणास दोन्ही हातांनीं धरून त्याचें मस्तक त्यांनीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीवर ठेविलें व सद्गदित अंतःकरणानें श्रीज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना केली.

### अश्वधाटी

देवा! तुझा बाळ, तूं यास सांभाळ, याची न आबाळ कांहीं करी ।
संसार-जंजाळ वारी कृपापाळ, दारीं करी काळ हा चाकरी ॥
दावी न वैद्यास, धन्वंतरी यास तूं एक, विश्वास हा अंतरीं ।
बा वांचवी यास, त्वत्कीर्ति गायास लावी, खरी आस माझी हरी ॥

'तुझ्यावांचून मी दुसरा वैद्य जाणत नाहीं, व तुझ्या चरणतीर्थावांचून मी याला दुसरें औषध देणार नाहीं.' असें म्हणून भाऊंनीं लक्ष्मणाचे तोंडांत तीर्थ घातलें. त्या दिवसापासून लक्ष्मणाचे सबंध आयुष्यांत त्यास आंकडीचा विकार बिलकूल झाला नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं भागवतधर्माचा वृक्ष लावलेला आहे. त्याच्या शाखा दूर-वर पसरून भागवत धर्माचें वाङ्मय खालच्या तळापासून वरच्या दर्जाच्या लोकांत प्रसृत करण्यासाठींच लक्ष्मणाचा दुर्धर रोग बरा केला व त्याचेकडून भागवतधर्मप्रसाराचें कार्य उत्तम करून घेतलें.

बी. ए. होऊन कॉलेज सोडल्यावर पंढरपुरास हायस्कूलमध्यें पांगारकरांनीं शिक्षकाची नोकरी धरली. पंढरीच्या वास्तव्यांत त्यांच्या आयुष्यास भागवतधर्माचें वळण लागलें. ते लिहितात:—

"पंढरपूर हें नामसंकीर्तन-भक्तीचें महापीठ आहे. पंढरपूरचें, श्री-विठ्ठलाचें, पंढरीस भेटणाऱ्या भक्त-भाविकांचें पोटभर वर्णन मी आपल्या ग्रंथांतून शतश: (नव्हे सहस्रश:) आपल्या व्याख्यान-प्रवचनांतून केलेलें आहे.

" पंढरीस गंगुकाकांच्या मठांत एक वृद्ध गृहस्थ वीणा घेऊन 'जयजय राम कृष्ण हरी' हें भजन करीत होते. दोनशें टाळकरी मागें साथ करीत होते. दोनतीन हजार लोक भजन आनंदानें ऐकत होते." (चरित्रचंद्र)

या कीर्तनांत ते रंगून गेले होते; चित्तास प्रसन्नता आली, प्रपंचाचें विस्मरण झालें; लौकिक वृत्ति मावळल्या व आनंद वाढत चालला. हा नामस्मरणाच्या आनंदाचा धडा प्रथम त्यांस मिळाला. भागवत सांप्रदायांत नामस्मरण सर्व साधनांपेक्षां श्रेष्ठ आहे असें ठरविलें आहे, तें पांगारकरांना पटलें. तेथें एके दिवशीं भोजनोत्तर एक आंधळा त्यांस म्हणाला, 'बाबा, आज एकादशी असतां

तुम्ही जेवलात ' हें ऐकून त्यांना लाज वाटली व आजन्म एकादशी व्रत करण्याचा निर्धार केला. भागवत सांप्रदायांत संतसंगास फार महत्त्व आहे. पांगारकरांना अगोदरच संतवाङ्मयाविषयीं आदर होता. पंढरीस राहिल्यावर अनेक संतांचीं दर्शनें व सहवास झाला. संतसहवासामुळें भागवत धर्माचीं मुळें त्यांचे अंतःकरणांत खोलपर्यंत रुजलीं होतीं.

पंढरीस नित्य चंद्रभागास्नान, पुंडलीकाचें दर्शन व श्रीप्रेममूर्ति पांडुरंगाचें रूप पाहणें हा क्रम अव्याहत होता. या क्षेत्राचा महिमा अगाध असून सकल संतांनीं तो गायला आहे. ते लिहितातः—

"पांडुरंगाच्या चरणांवर मस्तक ठेवतांना प्रथमच डोळे प्रेमाश्रूंनीं वाहिले. ज्यांच्या चरणकमळावर कोट्यावधि शिरें आजवर नमलीं, श्रीज्ञानेश्वर, नाथ, तुकोबासारख्या महाविभूतींनीं आपलीं शिरें ज्या चरणांवर वाहिलीं, त्याच चरणांवर माझें मस्तक आज लवत आहे. कोण भाग्य हें ! सर्व संतमहंतांचा प्रेमपुंज हा पांडुरंग- ' तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे ।। ' इ. चातुर्मास तर नामसंकीर्तनानें पंढरपुरास भूवैकुंठ प्रत्यक्ष केलें."

( चरित्रचंद्र, पृ. १५७ ).

पंढरीस असतांना भागवत सांप्रदायाबद्दलच्या आदरानें त्यांच्या हृदयांत ठाणें दिलें. नेहमीं संतदर्शनें घ्यावींत हा हव्यास वाढत चालला. मोरोपंताचे चरित्राच्या प्रकाशनांत बराच काळ घालविल्यावर त्यांनीं भागवतधर्माची जी अमूल्य सेवा केली आहे, त्याचें वर्णन संक्षेपतः करीत आहें. त्यांनीं भागवतधर्माचा जो ध्वज उभारला त्याचें नांव ' भक्तिमार्गप्रदीप '. हा प्रदीप ( १९०४ ) प्रथम पंढरपुरास उजळला. त्यानें हजारों नव्हें लाखों लोकांना भक्तिमार्ग दाखविला आहे.

या ग्रंथास महाराष्ट्रांतील कोन्याकोपऱ्यांतूनहि मागण्या आल्या. फार काय, पण बंगाल, ब्रह्मदेश, केन्या, आफ्रिका, इंग्लंड येथूनही त्याला मागण्या आल्या. १९०४ सालीं हा भागवतधर्माचा प्रदीप प्रथम लोकांना दिसला. ३२ वर्षांत त्याच्या दीड दोन लाख प्रती पसरल्या. प्रदीपामुळें अनेक पारमार्थिक स्नेही त्यांना मिळाले. प्रदीपाच्या अनुकरणानें या जातीचीं ८–१० पुस्तकें निघालीं. कोणी या प्रदीपाचीं १०८ सदक्षिणात्मक वायनें दिलीं.

न्या. चंदावरकरांच्या एका व्याख्यानांत 'भक्तिमार्गाचा प्रसार महाराष्ट्रांत जारीनें होत आहे' यास प्रमाण म्हणून 'पांगारकरांच्या भक्तिमार्गप्रदीपाच्या' हजारों प्रती खपत आहेत हें दिलें. विविध-ज्ञान-विस्तारानें अभिप्रायांत म्हटलें कीं, 'पूर्वीची पिढी जात चालल्यामुळें तिजबरोबर नष्ट होऊं पाहणारी जुनी परंपरा पांगार-करांचा प्रदीप झाल्यापासून कोठें कोठें पुन्हा दृगोचर होऊं लागली आहे, हें त्यांचें महद्भाग्य आहे.' या पुस्तकांत भागवतधर्मी संत-महंत यांची अप्रातिम कविता उतरली आहे. ती वाचतांना वाच-णाऱ्यास आनंदाच्या गुदगुल्या होतात. प्रार्थनेसाठीं हें पुस्तक मोठें कार्यकारी आहे. याच्या अनुकरणानें महात्मा गांधी यांनीं आपलें प्रार्थनापुस्तक तयार केलें आहे. मसूरकर महाराजांनीं 'भक्ति-सामर्थ्य' म्हणून एक पुस्तक काढलें आहे; त्यावरील अभिप्रायांत 'नवाकाळ' कर्ते म्हणतात, "अशा तऱ्हेचीं पुस्तकें रचण्याचा मार्ग पांगारकर यांच्या 'भक्तिमार्गप्रदीप' ह्या पुस्तकानें दाखविला. भावांनीं बहिणींना भाऊबिजेसाठीं या पुस्तकाची ओवाळणी घातली, असें या पुस्तकाचें महत्त्व आहे.

या पुस्तकामुळें भागवत धर्माचा प्रसार केवढा झाला आहे हें पाहिल्यास पांगारकर यांच्या कामगिरीबद्दल कोणास आदर वाट-

णार नाहीं बरें ?

प्रथम हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे कीं, एके काळीं महाराष्ट्रांत ‘ वारकरी व धारकरी ’ हा वाद माजला असतांना पांगारकरांनीं भागवत सांप्रदायी वारकरी पंथाबद्दल लिहून हा वाद चिघळूं दिला नाहीं. श्रीसमर्थ रामदास हे धारकरी होते असा एक पक्ष होता. पण रामदासही भागवत सांप्रदायीच होते असें पांगारकरांचें नेहमीं वक्तव्य होत असे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून भागवत धर्मास चालना दिली गेली; त्याचेच आधारें श्रीसमर्थ रामदास भागवतानुयायी होते. त्यांचे ग्रंथ सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास हें ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. म्हणूनच पांगारकरांस हे संतमहंत जितके प्रिय होते, तितकेच रामदासस्वामीही त्यांना आवडत असत. त्यांच्या खाजगी भाषणांतही ते हेंच बोलत असत. त्यांना संतमंडळ व रामदास यांच्यांत भिन्नत्व वाटत नसे. याची खूण, संतांचे वाङ्मयाबरोबरच संत रामदास यांचेंही वाङ्मय त्यांनीं परिश्रमपूर्वक प्रसिद्ध केलें आहे. कालानुरूप शिकवणुकींत थोडा फरक असला तरी उभय पक्षांचीं मतें एकच होतीं व तीं भागवत सांप्रदायास अनुसरून आहेत असा त्यांचा निश्चय होता.

## भागवतधर्म

पांगारकरांना भागवतधर्माचीं तत्त्वें अत्यंत प्रिय होतीं. त्या तत्त्वांबद्दल अल्पसें विवेचन करणें अवश्य वाटतें. तें वाचल्यावर पांगारकरांनीं या धर्माबद्दल प्रेम कां धरलें होतें तें सहज लक्षांत येईल.

## नव योगेश्वर

ऋषभ देवाच्या पुत्रांपैकीं नऊजण योगेश्वर होते.

**सकळ भाग्याचें भूषण । ब्रह्मज्ञानाचें अधिष्ठान ॥**

असे ते होते.

त्यांचिया नामाची कीर्ति । आईक सांगेन परिस्थिति ।
त्यांचेनि नामें आतुडे मुक्ति । जाण निश्चिती भाविकां ॥

कविर्हरिरन्तरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।
आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ भा० ११।११

ते वेगळे दिसती नवांक । परी भगवद्रूपें अवघे एक ।
संतासंत जन अनेक । आपणांसकट देखा एकत्वें पाहती ॥
त्यांसी तव असंतता । उरली नाहीं सर्वथा ।
संत म्हणावया पुरता । भेदु न ये हाता चिन्मयत्वें ॥

ते नवयोगेश्वर गमन करीत असतां मिथिला नगरींत पूर्णप्रज्ञ राजा विदेही याचा मोठा यज्ञ सुरू होता. त्या यज्ञाचे पूर्णाहुतीचे वेळीं ते तेथें गेले. हे देदीप्यमान ब्रह्मवर्चसी नवयोगेश्वर पाहतांच यज्ञकर्ते आचार्य त्यांच्या स्वागतार्थ उभे राहिले. राजा विदेहानें त्यांची मधुपर्कादिकें पूजा करून त्यांस संतुष्ट केलें व तो म्हणाला,

दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः ।
तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम् ॥ भा० ११, अ०२९

आजि मी भाग्यें सभाग्य पूर्ण । लाधलों तुमचें दर्शन ।
तरी 'आत्यान्तिक क्षेम' कोण । तें कृपा करून मज सांगा ॥
आत्यंतिक क्षेमाचें वर्म । जरी म्हणाल भागवत धर्म ।
त्या धर्माचा अनुक्रम । साङ्ग सुगम सांगा जी ॥

अशी विदेहाची प्रार्थना ऐकून नवयोगेश्वरांतील पहिला कवि बोलूं लागला. त्यानें सहज व सुलभपणें आबालवृद्धांस तरतां येण्यास्तव जो धर्म सांगितला, त्याचें नांव भागवत धर्म होय. भागवत धर्मानुष्ठानानें परमात्मप्राप्ति फार सुलभ होते, तशी यज्ञयागानें, तपानुष्ठानानें व योगसाधनानें होणार नाहीं.

इंद्रियें कोंडितां न कोंडिती । विषय सांडितां न सांडिती ।

पुढतपुढती बाधूं येती । यालागीं हरिभक्ति द्योतिली वेदें ॥
योगी विषय त्यागिती । त्यागितां देहदुःखी होती ।
भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥
दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण ।
हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥
जेथें हरिचरणभजनप्रीती । तेथें भवभयाची निवृत्ती ।
परम निर्भय भगवद्भक्ती । आमची मती निजनिश्चयी ॥
एवं भागवतधर्मे जे सेवक । स्वधर्मकर्म त्यांचे रंक ।
तें राहों न शके त्यांसन्मुख । मा केवी बाधक हों शकेल ॥

भागवतधर्मांत भक्तीस प्राधान्य असून नामस्मरणानें चारी मुक्ति दासी होतात.

बाधूं न शके कर्माकर्म । ऐसा कोण भागवत धर्म ।
तें भक्तीचें निजवर्म । उत्तमोत्तम अवधारीं ॥
त्यजूनि देहाभिमानवोढी । सर्वांभूतीं हरिभक्ति गाढी ।
तो कर्माकर्में पायीं रगडी । मुक्ति पाय झाडी निजकेशीं ॥
तो ज्याकडे कृपादृष्टी पाहे । त्याचें निर्दळे भवभये ।
तो जेथ म्हणे तेथ राहे । लवलाहे भक्ति हरिची ॥
त्याचेनि अनुग्रह करी । देव प्रगटे दीनांच्या अंतरीं ।
त्याच्या कर्माकर्मांची बोहरी । स्वयें श्रीहरी करूं लागे ॥
भगवंताची नामकीर्ति । याचि नामें परमभक्ती ।
भक्तिपाशीं चारी मुक्ती । दासीत्वें वसती नृपनाथा ॥ए.भा.अ.५

वेदान्तादि सर्व शास्त्रांचें ध्येय मोक्षप्राप्तीचें, तर भागवत धर्माचें ध्येय मोक्षापलीकडील प्रेम-भक्तीचें आहे. इतर सर्व मार्गांनीं मोक्षासाठीं अनेक साधनांची आवश्यकता सांगितली आहे; पण भागवतधर्मांत अशा साधनांची भानगड नाहीं. प्रपंचाचा त्याग अर्थात् सर्व-

संगपरित्याग केला तर मोक्ष प्राप्त होणार हें इतर पंथ सांगतात; तर भागवतधर्म परब्रह्माचें प्रेमसुख भोगण्याचें स्थानच प्रपंच आहे, अशी घोषणा बाहू उभारून करीत आहे. जीवास अंतिम सुख कोणतें व तें भोगावयाचें कसें याबद्दल सुलभ व सोपारा मार्ग जनतेचे हवालीं भागवतधर्मानें केला आहे.

## भिन्न मतें

जीव आपल्या संचितादि कर्मानें बद्ध झाला आहे; तो मायावश व अविद्येनें जखडला आहे; यामुळें तो अज्ञानावस्थेंत जन्ममृत्यूचे चक्रांत सांपडला आहे व या मायामय भवसागरांतून तरून जाणें फारच अशक्य आहे. मोठमोठ्यांनासुद्धां अनेक जन्मांतही ब्रह्म-प्राप्ति होऊं शकत नाहीं. यासाठीं जीवानें सर्वसंगपरित्यागपूर्वक अनेक साधनांचे द्वारा मोक्ष मिळवून घ्यावा. त्यामुळेंच त्याचें अज्ञान नाहींसें होईल व तो मुक्त होईल. तो मुक्त झाला नाहीं तेथ-पर्यंत त्याला जन्ममृत्यूच्या चक्रांत सतत फिरावें लागून अत्यंत हाल व दु:खें सोसावीं लागतात. तेव्हां या मायेच्या मोहांत गुर-फटलेला जीव मुक्त होण्यास तपादि साधनें करून मायाबंधापासून मुक्त व्हावें असा सर्वत्र उपदेश आहे.

## भागवत सांप्रदायाचें महत्त्व

भागवत सांप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा प्रपंच जाणीवरूप जीव व आनंदरूप श्रीहरि असा आहे. ‘आनंदं ब्रह्मेति व्यजानात्। ’ असेंच उपनिषदें म्हणतात. आनंद हेंच ब्रह्माचें स्वरूप आहे. त्या आनं-दास आपला आनंद घेतां येत नाहीं; आईच्या स्तनांतील दुधाची माधुरी आईस घेतां येत नाहीं; पुष्पांतील सुगंध फुलाला घेतां येत नाहीं; साखरेची गोडी साखरेस कळत नाहीं, त्याप्रमाणें आनंदरूप ब्रह्मास आपल्या आनंदाची प्रतीति नसते. म्हणून श्रुतिही सांगते

कीं, ‘ स वै नैव रमते तस्मात् एकाकी न रमते स द्वितीयमैच्छत् ’ (बृ.उ.९ ) म्हणूनच तो आनंद. ‘एकोऽहं बहुस्यां’, ‘ नेह नानास्ति किंचन’ अशीं उपनिषदांचीं वचनें आहेत. एकपणावीण एक असणारा परमात्मा आपलें प्रेम व्यक्त होऊन स्वानुभवांत असण्यासाठीं द्वैतभावावर आला. त्याचें द्वैतावर येणें याचेंच नांव जगदाकार होणें. आनंद व्यक्त झाला त्याचेंच नांव ‘ जीव ’. ‘ममैवांशो जीवलोके ’ ‘एकांशेन स्थितो जगत्’ असेंच गीताशास्त्र म्हणतें. परब्रह्माव्यतिरिक्त जीव उत्पन्न होणें शक्य नाहीं. बीजच नसेल तर वृक्ष असूं शकत नाहीं. आनंदघन परमात्मरूपी बीज नसेल तर प्रेमरूप जीव व्यक्त कसा होणार ? मातेचे ठिकाणीं, मी आई असावें अशी भावना असते; पण तिचा आईपणा पुत्र झाल्यावाचून तिच्याही प्रतीतींत येणें शक्य नाहीं. लेकराचा जन्म झाला म्हणजेच आईच्या आईपणाचा जन्म होतो. पित्याचेंही तसेंच आहे. मी पिता आहें असा एखादा निपुत्रिक म्हणूं लागेल तर जसा तो पिता होऊं शकत नाहीं, त्याला मूल झाल्याशिवाय तो पिता कोणाचा होणार ? तसेंच मी निर्गुण ब्रह्म आहें हें तरी निर्गुणाचे स्वानुभवांत कसें उतरणार ? निर्गुण आहे हें निर्गुणास समजण्यास समजून देणारीं ज्ञानेंद्रियें हीं असूं शकत नाहींत. तेव्हां निर्गुण हा शब्द वा तत्त्व आहे. हेंही सगुणावांचून कळावयाचें नाहीं व तें समजून स्वानंद, प्रेमप्रतीतींत सतत रमावें हा मूळचा असलेला स्वभाव व्यक्त होतो. त्याचेंच नांव जीव आहे. ब्रह्मच व्यक्त झालें; तें जीवस्वरूपानें व्यक्त झालें नसतें तर, ‘ निर्गुण ब्रह्म आहें ’ हें तरी कशानें व कोणास कळलें असतें ? अर्थात् मुलाकडून आईचें ज्ञान प्रतीत झालें. ‘ मी आई ’ हा बोध मुलावांचून होत नव्हता. परमात्मा आहे हाही प्रत्यय तेव्हांच आला कीं, परमात्मा जेव्हां जीव या अवस्थेस आला. अर्थात् जीवाकडूनच ब्रह्मरूप

प्रगट झालें. म्हणून त्या जीवास जाणीव म्हटलें आहे. जाणीव म्हणजे ज्ञान. तें ज्ञान जीवाकडून व्यक्त झालें म्हणूनच आनंदब्रह्म लक्षांत आलें. जीवाकडूनच म्हणजे जाणिवेनेंच आपल्या आनंदास जाणतां आलें. त्या जीवरूप जाणीवेस चक्रांत भरडून निघण्याचें कारण नाहीं. मूळचे रूपाचा विकास जगद्रूपानें झाला आहे, हें भागवतधर्म दाखवितो. तेथें माया, अविद्या, अज्ञान यांचा संबंध नाहीं. सायंकाळीं झावळ्या अंधकारांत दोरी पडली होती; पण ती एकाला सर्प भासून तो माझ्या पायास गुंडाळला आहे, या खोट्या भीतीनें मृत्युपंथाला लागतो. पण इतक्यांत शेजारींच उभा असणाऱ्यानें ती दोरी हातांत घेतली व हा सर्प नसून, ती दोरी आहे असें सांगतांच त्याचा सर्पभ्रम दूर झाला. सर्पभ्रम ही माया म्हणतात. पण दोरीवर सर्प दिसला त्याही वेळीं तो सर्प नसून दोरीच होती. पहिल्यानें दोरी ही सर्परूप आहे असें समजून नंतर ती सर्प नाहीं हें तर्कानें पटविण्याकडे इतर तत्त्ववेत्यांची चाल, तर भागवतधर्माची दृष्टि ती दोरीच हातीं घेऊन सापाचा भास दोरीच्या अनुभवानें नाहींसा करण्याकडे आहे.

**तरी आतां देह असो अथवा जावो। आम्ही तों केवळ वस्तुचि आहों।**
**कां जे दोरी सर्पत्व वावो। दोरीचिकडूनि ॥**

हें दृश्य ब्रह्मांड व त्यास प्रगट करणारें तत्त्व एकच ज्ञानानंदस्वरूप आहे.

**माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें। हें जगतचि नोहे आघवें।**
**जैसें दूध मुरालें आपैसें। तरी तेंचि दहीं ॥**
**कां बीजचि झालें तरु। भांगारचि अलंकारु।**
**तैसा मज एकाचा विस्तारु। तें हें जग ॥**
**हें अव्यक्तपणें थिजलें। तेंचि मग विश्वाधारें ओथिजलें।**

तैसें अमूर्त मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणे ॥ ज्ञानेश्वरी ९

अमृतानुभवांतही हा विषय फार उत्तम तऱ्हेनें सोडविला आहे. जीव व परमात्मा यांचें ऐक्य करून मोक्ष मिळवावा असें ध्येय इतर मतवाले मांडतात. भागवतधर्माचें मत हें कीं, जीव-शीव हे भेदच नाहींत. एकच श्रीहरि परमात्म्याचें व्यक्त दर्शन आहे. म्हणून भागवतधर्मांत मोक्षाची प्रतिष्ठा नाहीं. ऐक्य करावें हें इतर सांगणार; तर ऐक्य कधींच तुटलें नाहीं हें भागवतधर्म सांगतो व जेथें ऐक्य होऊन मोक्ष होणें हा शेवट इतर दाखवितात, तेथपासूनच भागवत धर्माच्या प्रेमभक्तीस सुरवात होत असते. यांतील भाव नीट लक्षांत राहिला म्हणजे भागवतधर्माचें श्रेष्ठत्व लक्षांत येईल.

श्रीहरीस जगद्रूपानें अगर कल्पनेच्या रूपानें भेटत आहे हा बोध जेथें उमटतो त्यास प्रभूचा भक्त म्हणतात. प्रभूशीं, ज्ञानाशीं त्याचा विभक्तपणा राहिला नाहीं. हा विभक्तपणा पूर्वीही नव्हताच. येथें पूर्व आणि अपर नाहीं. एकपणा केव्हांही मोडला नव्हता. म्हणूनच हें ऐक्य विश्वरूपांतील कल्पनावस्तु नाहींशा होऊन झालें नाहीं. तर त्या वस्तु जशाच्या तशाच असून झालें. ही प्रत्यक्ष समाधि होय. जाणीव श्री प्रभूवरच स्थिर झाल्यानें अनंत वस्तु अथवा कल्पना उठल्या तरी त्यांतील निजानंद हालत नसतो. हीच समाधि. कल्पना दाबण्याचा प्रयत्न करून लावलेली समाधि नसून जशी प्रभुस्वरूपांत सहज आहे तशी स्वीकारलेली ती खरी समाधि होय. तेव्हां आतां संसार हा भवसागर व भीतिदायक न राहतां तो प्रेमसागर, परमात्म्याचेंच प्रत्यक्ष दर्शन आहे हा निश्चय होतो. ही भक्तभूमिका आहे व ज्ञानानंद भोगणें हें त्याचें स्वरूप आहे. अंतरांतल्या ज्ञानानंदाच्या गोडीनें सर्व विश्व आनंदमय भोगीत राहणें जगाचा त्याग न करणें हेंच त्याचें ध्येय असतें.

परमात्मा व जीव अभिन्न असून ते भिन्नच नाहींत, ही भागवत-धर्माची शिकवण आहे. सर्वाभूतीं भगवद्भाव हाच सकल संतांनीं अंगीकारलेला आहे व नामस्मरण हें अव्यक्त परमात्मा व्यक्त झाल्याचें प्रतीक आहे; म्हणून भागवत धर्मांत नामस्मरणास फार महत्त्वाचें स्थान आहे. तें नाम कसें व कां श्रेष्ठ आहे याचा विचार करण्याचें हें स्थळ नाहीं. पण वरील अल्पशा विवेचनावरून भागवत-धर्माचीं अमोल तत्त्वें लक्षांत येतील.

श्री. पांगारकर महाराजांनीं हजारों प्रवचनें, व्याख्यानें, कीर्तनें भागवत धर्माच्या प्रचारासाठीं केलीं. सर्वत्र प्रवास करून हीं तत्त्वें जनांसमोर आपल्या रसाळ भाषेंत मांडलीं. त्यांचे सर्व ग्रंथांतून भागवत सांप्रदायानुसार वर्णन आलेलें आहे. ज्ञानेश्वरी, नाथभागवत व दासबोध हे ग्रंथ भागवतधर्माचें प्रस्थानत्रय आहेत असें ते म्हणत असत. पंढरीची वारीही ते करीत असत. त्यांनीं भागवतधर्माची केलेली अमोल सेवा परमात्म्याजवळ रुजू झाली आहे. त्यांच्या-सारखे भागवतसांप्रदायी वारंवार येवोत अशी श्रीप्रभुचरणीं प्रार्थना आहे !



# १३. मराठी कवितेची इंग्रजी राजवट

( ले.–प्रा. **भ. श्री. पंडित**, एम्.ए , नागपूर. )

गेल्या सव्वाशें वर्षांतील मराठी कवितेचें विहंगमावलोकन करतांना कांहीं महत्त्वाचे मुद्दे सुटून जाणें अपरिहार्य आहे. तथापि तिचा एकंदर इतिहास लिहितांना तिच्यांत आतांपर्यंत झालेल्या स्थित्यंतरांसंबंधीं अल्पस्वल्प विवेचन करणें आवश्यक आहे. त्यांत विशिष्ट काळांत तिचें स्वरूप कशा प्रकारचें होतें, तें तसें होण्यास काय कारणें घडलीं व त्या काळच्या प्रमुख कवींच्या काव्यांत कोणकोणते विशेष आढळतात यांसंबंधींचे विचार संक्षेपानें व्यक्त होतील. प्रस्तुत विषयाचें विवेचन सोयीचें व्हावें म्हणून निरनिराळ्या काव्यप्रवृत्तींच्या अनुरोधानें एकंदर पांच कालविभाग कल्पिले आहेत. प्रत्येक विभाग स्थूलमानानें पंचवीस वर्षांचा मानला आहे. अर्थात् एकाद्या कालविभागांतील काव्यप्रवृत्ति नंतरच्या कालविभागांत पूर्णांशानें लुप्त झाली असें मानण्याचें कारण नाहीं. ती पूर्वींइतपत प्रबल न राहतां क्षीण झाली येवढाच त्याचा अर्थ आहे.

[ १८१८–१८४५ ]

इ. स. १८१८ सालीं महाराष्ट्रावर इंग्रजांचा अंमल सुरू झाला. पण त्यांच्या राज्याची एकंदर घडी नीट बसण्यास मध्यंतरीं जवळ जवळ चाळीस वर्षें जावीं लागलीं. ‘ अंग्रेजी ’ सुरू झाली तरी अजून पेशवाईतले अखेरचे दुर्दैवी शाहीर प्रभाकर व परशराम विद्यमान होते. त्यांच्यावर ‘ विपरित आला काळ, मेरुला गिळलें मुंग्यांनीं ’ व ‘ जुने कायदे सर्व मोडले, जाधिंपुन झाली

अंग्रेजी ' असे निराशेचे उद्‌गार काढण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला होता. हंसराज व विठोबाअण्णा हे नव्या युगांत वावरत होते, तरी त्यांच्या काव्यांत अध्यात्म व भक्ति या जुन्या प्रवृत्तींची प्रभा मावळतांना रेंगाळत होती. या अवधींत इंग्रज राज्यकर्त्यांनीं एतद्देशीयांना इंग्रजी भाषा व वाङ्मय शिकविण्यासाठीं शाळा स्थापन केल्या. या शाळांतून शिक्षण घेऊन जी मंडळी बाहेर पडली ती संस्कृत साहित्याची व्यासंगी होती. तिनें अर्वाचीन गद्यपद्य वाङ्मयाचा पाया घातला.

## [ १८४५–१८७० ]

इंग्रजांच्या राज्याबरोबर छापखाने आले. त्यांच्यामुळें ग्रंथांचा प्रसार स्वस्त व सुलभ झाला. यापूर्वी ग्रंथ गद्यांत लिहिण्याची फारकरून प्रथा नव्हती; कारण तें पद्याप्रमाणें श्रवणसुभग, स्मरणसुलभ व सूत्रबद्ध नाहीं. पण छापण्याच्या सोयीमुळें पद्याचें महत्त्व कमी झालें. गद्याची नव्यानेंच पुनर्घटना झाली. त्यांत कथा, कादंबरी, नाटक व निबंध या नव्या नव्या वाङ्मयप्रकारांची निपज होऊं लागली. त्यामुळें पद्याचें क्षेत्र पूर्वीच्या मानानें संकुचित झालें.

संस्कृत व इंग्रजी शिकलेली नवीन मंडळी शिक्षणखात्यांत अधिकारपदावर होती. तिला ' शास्त्री ' ही उपाधि होती. तिनें ' मेहेरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ' यांच्या हुकुमावरून शालोपयोगी वाङ्मय निर्माण केलें. तिनें इंग्रजीवरून अनेक गद्य ग्रंथ मराठींत उतरले; परंतु पद्य ग्रंथ मात्र संस्कृतावरून भाषांतरले किंवा स्वतंत्र रचले; कारण गद्याला पूर्वपरंपरा नव्हती. पण पद्याला सहा शतकांची पूर्वपरंपरा असल्यामुळें तें तिच्याशीं विसंगत वाटण्याची भीति होती. शिवाय या बाबतींत शास्त्रीमंडळीपुढें त्यांचे सहकारी महादेवशास्त्री कोल्हटकर यांचें उदाहरण होतें. त्यांनीं

'अथेल्लो'चें गद्य भाषांतर केलें तें जनतेला रुचलें. परंतु त्यांनीं एका इंग्रजी कवितेचें 'एका लहान काळया मुंगीला गवसला बहु थोर । दाणा गोधूमाचा, उचलेना ती जरी करी जोर ॥' हें आर्याबद्ध भाषांतर मुद्दाम मुलांसाठीं केलें तें मात्र तिला पचलें नाहीं. शिवाय या सुमारास 'नवनीत' व 'सर्वसंग्रह' यांतून प्राचीन मराठी कविता प्रकाशांत आली होती, ती जनतेसमोर होती. तेव्हां त्यांतील पंतपंडितांच्या कवितेला आदर्श मानून नवीन मंडळीनें अर्वाचीन पद्याची प्राणप्रतिष्ठा केली.

परशुरामपंत तात्या गोडबोल्यांनीं नामार्थदीपिका, बालबोधामृत व मराठ्यांच्या इतिहासावरील सोप्या आर्या हीं पद्यें स्वतंत्र रचलीं आहेत. 'देवा परमसमर्था' व 'शाळेंत सोबत्यांनीं' या सर्वश्रुत आर्या बालबोधामृतांतील आहेत. परंतु या स्वतंत्र कृतीपेक्षां उत्तरराम, वेणीसंहार व मृच्छकटिक या नाटकांचीं त्यांनीं केलेलीं सरस भाषांतरें विशेष प्रसिद्ध आहेत. 'काव्येषु नाटकं रम्यम्' या सुभाषितानुसार हीं नाटकें खरोखरच रमणीय काव्यें आहेत. 'नवनीत' हा प्राचीन कवींच्या वेच्यांचा संग्रह तात्यांच्या रसिकतेचा द्योतक आहे आणि 'केकादर्श' हा केकावलीवर टीकापर ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेचा निदर्शक आहे. त्यांचें 'वृत्तदर्पण' होतकरू कवींना मार्ग दाखविण्यास सदैव सिद्ध आहे.

परंतु रसिक कवि व मार्मिक आलोचक या दृष्टींनीं तात्यांपेक्षां कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची कीर्ति विशाल आहे. त्यांचें मेघदूताचें रूपांतर मुळाहून शतपटीनें सुंदर व सरस आहे. त्यांचा शिखरिणीमधला 'विरहीविलाप' मुळांतील वसंततिलकेमधल्या 'विरहीविलापा'पेक्षां अधिक उत्कट व करुण आहे.

**'घरातें मी येतां दचकुनि उठोनी हंसुनिया ।**

विशालां नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां ॥ '

सारखे त्यांतले स्मृतितरग अंतःकरणास सहज स्पर्श करतात. त्यांचा 'अन्योक्तिकलाप' सुभाषित शाङ्‌र्गधराइतकाच मर्मभेदक आहे. 'विद्या-प्रशंसा' या त्यांच्या स्वतंत्र काव्यांत वीज म्हणजे 'संदेशहारिका दासी' आणि सूर्य म्हणजे 'फुताग्राफींतला चित्रकार' अशी नवीन कल्पनांची चुणूक आहे. त्यांनीं पद्याच्या भाषेवर एक निबंध लिहिला आहे. स्वतः त्यांची भाषा निव्वळ सुगम नाहीं तर सरस आहे.

कृष्णशास्त्री राजवाड्यांनीं मालतीमाधव व मुद्राराक्षस यांचीं रूपांतरें केलीं आहेत. उत्सवप्रकाश हें त्यांचें स्वतंत्र काव्य आहे. त्यांतला शृंगार उत्तान आहे व विनोद बालिश आहे. मात्र मधून मधून काव्यदृष्ट्या कांहीं वर्णनें हृदयंगम आहेत. वानगीदाखल

चपल चपल बहु थुइथुइ नाचत हळुहळु पद टाकितसे,
पदर शिरावरि आणुनि उघडुनि पळभरि मुख झांकितसे ॥

हें वारवधूच्या नर्तनाचें वर्णन प्रेक्षणीय आहे. पाळंद्यांनीं मालविकाग्निमित्राचें रूपांतर केलें आहे. त्यांची 'रत्नमाला' सर्व जातींच्या लोकांसाठीं आहे. म्हणूनच विशिष्ट देवनामांचा तिच्यांत निर्देश नाहीं. फक्त परमेश्वर, प्रभू, बापा असे सर्वमान्य उल्लेख आहेत. हा तत्कालीन ख्रिस्ती विचारसरणीचा परिणाम आहे. 'रत्नमाले' तील 'प्रभो प्रणतवत्सला', 'कृपासागर तूं', 'दयासिंधो देवा', इत्यादि स्तोत्रें खरोखरच प्रासादिक व मधुर आहेत. म्हणूनच तीं जनतेंत अद्यापि प्रचलित आहेत. गणेशशास्त्री लेले यांच्या रघुवंशाच्या रूपांतराचा क्रम चिपळूणकरांच्या मेघदूताच्या खालोखाल लागेल. शिवाजी, कृष्णाकुमारी, ऋतुवर्णन व हिंदूंचे सण या त्यांच्या स्वतंत्र कृति आहेत. पारख्यांनीं ऋतुसंहाराचें रूपांतर केलें आहे व दातारांनीं कुमारसंभवाच्या कांहीं सर्गांचें रूपांतर केलें आहे.

या कालविभागांतील कवींच्या काव्यांचीं नांवें कृष्णाकुमारी, ऋतुवर्णन, सण, उत्सव अशीं एकाच प्रकारचीं आढळतात. कारण या विषयांवर 'दक्षिणाप्राइज कमिटी'नें काव्यें मागविलीं होतीं व तीं या कवींनीं रचलीं होतीं. या कवींनीं शाळाखात्यासाठीं व बक्षिसासाठीं काव्यें रचल्यामुळें त्यांत स्वयंप्रेरणेचा पूर्णपणें अभाव आहे. या कवींचीं रूपांतरित काव्यें सुंदर आहेत. स्वतंत्र काव्यें शालोपयोगी असल्यामुळें त्यांचें स्वरूप नीतिपर व उपदेशपर आहे.

या कवींची महनीय कामगिरी म्हणजे त्यांनीं संस्कृत साहित्यांतील अभिजात ललित कृति मराठींत आणल्या आणि निव्वळ मराठी जाणणाऱ्या रसिकांना त्यांची गोडी लावली. प्राचीन कवींत फक्त रघुनाथपंडितानें श्रीहर्षाच्या ' नैषधा-' स मराठी वेष दिला होता. परंतु या अर्वाचीन कवींनीं कालिदास, भवभूति, शूद्रक, विशाखदत्त, जगन्नाथ इत्यादिकांच्या कृति यशस्वितेनें मराठींत आणल्या आणि साहित्यांत एक नवें दालन उघडलें. शिवाय या कवींच्या कविता अनेक वर्षें क्रमिक पुस्तकांतून असल्यामुळें पुढील पिढीच्या भाषेला सुरवातीस याच कवींच्या भाषासरणीचें वळण लागलें.

संस्कृत साहित्यांतील अभिजात ललित कृतींचीं मराठी भाषांतरें करण्याची प्रवृत्ति या काळांत विशेष प्रबळ व प्रचलित होती. ती पुढील काळांत क्षीण झाली. कारण विद्यापीठांत आरंभीं मराठी भाषेला जें स्थान होतें तें पुढें संस्कृत भाषेच्या अभ्यासाला मिळालें. त्यामुळें मूळ संस्कृत काव्यें सुशिक्षितांच्या वाचनांत येऊं लागलीं. तेव्हां साहजिकच रूपांतराचें कष्टसाध्य कार्य प्रायः लोप पावलें. अगदीं अलीकडे रूपांतरांचे एक दोन प्रयत्न झाले. पण ते लोकमान्य झाले नाहींत.

[ १८७०–१८९५ ]

इ. स. १८५७ सालीं मुंबई विद्यापीठ स्थापन झालें. त्याच्या अभ्यासक्रमांत इंग्रजीला महत्त्व होतें. तिच्या वाङ्मयाच्या परिशीलनानें इकडील तरुणांना भुरळ पडली. त्या वाङ्मयांतील कांहीं लकबा मराठींत रूढ करण्याचा त्यांनीं प्रयत्न आरंभिला. त्यांत कुंटे हे प्रमुख होते. त्यांनीं राजा शिवाजी हें बारा सर्गांचें वीरकाव्य ( Heroic-epic ) रचण्याचा चंग बांधला होता. कुंट्यांचा पंतपंडितांच्या काव्यावर कटाक्ष होता. त्यांचा त्यांनीं 'Degenerate-Sanskrit's Marathi Poets' म्हणजे 'अधःपतित संस्कृतोत्पन्न मराठी कवि' असा उल्लेख केला आहे. मराठी काव्यांत एकसुद्धां संस्कृत शब्द नको असें त्यांचें म्हणणें होतें. शब्दाचा उच्चार एक व लेखन दुसरेंच ही विसंगति त्यांना नापसंत होती. 'उचल्न' मधील 'च' सस्वर न लिहितां उच्चारानुसार 'उच्ल्न' असा व्यंजनदर्शक लिहिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या काव्यांत 'उठे घोर हर्हर्, उठे घोर दिन् दिन्, उडे रक्त मध्यें, रणीं सर्व किन् किन्' असें लेखन केलें आहे. त्यांनीं आपल्या काव्याचा प्रारंभ मिल्टन व पोप यांच्या शैलीचें अनुकरण करून उत्तरगर्भित प्रश्नांनीं केला आहे आणि मिल्टनच्या पद्धतीप्रमाणें पल्लेदार वाक्यांनीं उपमांचा विस्तार केला आहे. प्रस्तुत काव्यांत बहुतेक स्थळीं भुजंगप्रयात वृत्त योजलें आहे. तें मनाला 'मनाच्या श्लोका' च्या पकडीमुळें वैराग्यपर वाटतें. रचना आवेशपूर्ण वाटावी म्हणून कवींनीं आटोकाट प्रयत्न केला आहे; परंतु गुरुत्व येणाऱ्या अक्षरांची संख्या अल्प असल्यामुळें तो फसला आहे. काव्यांत स्वाभाविक विरामस्थळांचा अवमान केला आहे. उलट, त्यांबद्दल विरामचिन्हांचा सर्रास उपयोग केल्यामुळें अर्थसंदेह, अर्थ-

विपर्यास, दूरान्वय इत्यादि दोषांचा उद्‌भव झाला आहे. हें काव्य विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कडक टीकेमुळें मागें पडलें, असा एक अपसमज रूढ आहे. वास्तविक तें मुळांतच रुक्ष आहे. मात्र मधून मधून कांहीं प्रसंग बहारीचे आहेत. मासल्यासाठीं आलेल्या नूरजानीचें शृंगारिक शब्दचित्र पाहण्याजोगें आहे—

**ते मोकळे केस सुरेख सारे, अंगांत चोळी नव्हती अहा ! रे।**
**गुंडाळलें कीं लुगडें शरीरा, तें अंग शोभे, सुटतांच वारा ॥**
**चिकटलें भिजतां लुगडें जसें, सुतनु ती सुकुमार किती दिसे !**
**जणुं उभी पुतळी जणुं चित्र कीं, अवयवें दिसतीं मृदु बोलकीं ॥**

कुंट्यांनीं 'मन' व 'राजाराम महाराज' हीं दोन काव्यें आणखी लिहिलीं आहेत. त्यांत रचनेचें निरंकुशत्व आढळत नाहीं.

गंगावर्णना हें एकमेव काव्य लिहिणारे चिंतामणी पेठकर हे इंग्रजी रचनेचें यशस्वी अनुकरण करणारे कवि होते. त्यांना आयुष्य अतिशय थोडें लाभलें, नाहीं तर त्यांच्या हातून अनेक सुधारणा घडल्या असत्या. काव्यांत बिकट व अपरिचित शब्द, पौराणिक इतिहास व दंतकथा यांचे संदर्भ आणि अलंकारांचें संभार नकोत असें त्यांचें मत होतें. या गोष्टी काव्यवाचनांत अडथळे उत्पन्न करतात असें त्यांना वाटे. एका चरणांत एक विचार व्यक्त व्हावा या जुन्या पद्धतीवर त्यांचा कटाक्ष होता. उलट प्रत्येक विचाराला जितका अवकाश आवश्यक असेल तितक्यांत त्याचा समावेश करण्याचा यत्न केला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आपल्या काव्यांत त्यांनीं हा यत्न सिद्धीस नेऊन दाखविला आहे. त्यांचा विचार यमकें गाळण्याचा होता, परंतु वाचक बिचकतील म्हणून त्यांनीं तो बाजूस ठेवला. त्यांचे विचार उच्च आहेत, शब्द प्रौढ आहेत व भाषा भारदस्त आहे. क्वचित त्यांनीं सत्यनिष्ठेपेक्षां राज-

निष्ठा व्यक्त केली आहे. ती आज अनिष्ट वाटत असली तरी १८७० च्या सुमारास स्वाभाविक होती.

इंग्रजी Blank Verse च्या अनुकरणानें मराठींत निर्यमक रचना करण्याचा पहिला प्रयत्न एका महाराष्ट्रीयेतर कवीनें केला. त्यांचें नांव घंटया नायडू. ते जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांना अकाळीं मृत्यु आला. 'मैना' या त्यांच्या छोटेखानी काव्यांतला पुढील निर्यमक श्लोक यमकांची खरोखरच कांहीं आवश्यकता नाहीं हें पटवील.

**उडूचे लेवोनी नग शशिकलेच्या बिजवरा ।**
**ललाटीं शुक्राची चटक टिकली लावुनि जरा ॥**
**कुसुंबी शालूचा पदर सुदृशी बांधुन करीं ।**
**दिशातें ये द्याया शुभ हळदकुंकू स्मितमुखी ॥**

या कवींनीं मराठी कवितेच्या रचनेंत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. जुन्या श्लोकरचनेवर त्यांनीं हल्ले चढवले नाहींत, परंतु तिच्या मापनांत, अर्थावकाशाच्या मर्यादेंत व यमकाच्या बंधनांत सोयी व सवलती असाव्या हें प्रत्यक्ष प्रयोगानें दाखवून दिलें. तो काळ बहुसंख्याक पुराणमतवाद्यांचा असल्यामुळें त्यांना अनुयायी मिळाले नाहींत. परंतु इतिहासांत त्यांचे प्रयत्न नमूद आहेत.

याच सुमारास दुसरा एक गट इंग्रजी खंडकाव्यें व वीणाकाव्यें मराठींत आणण्याच्या प्रयत्नांत गुंतला होता. मात्र तीं इकडे आणतांना इकडील परिस्थितीस अनुरूप असा फेरफार करण्याकडे त्यांचें लक्ष होतें. अशा तऱ्हेचा पहिला प्रयत्न प्रधान यांनीं केला. त्यांनीं स्कॉटच्या Lady of the Lake चें 'दैवसेनी' हें रूपांतर केलें आहे. मूळ इंग्रजी काव्यांत स्कॉटलंडच्या पार्वतीय प्रदेशाचें

वातावरण आहे. रूपांतरांत त्याबद्दल त्याप्रमाणें असणाऱ्या महाराष्ट्राची योजना करतां आली असती. परंतु मुळांतील प्रेमप्रसंग रूपांतरांत तसेच्या तसे उतरवतां यावेत म्हणून त्यांनीं राजस्थानाची निवड केली आहे. कारण त्याच्या इतिहासांत वीरमणी व धीर रमणी यांचे प्रणयप्रसंग प्राचुर्यानें आढळतात. प्रधानांची भाषा जितकी साधी व सोपी तितकीच रसाळ आहे. वर्णनेंही रेखलेलीं आहेत. त्या काळीं या काव्याला दोन आवृत्तींचा योग आला यावरून त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष पटते.

अशाच प्रकारचा दुसरा प्रयत्न कर्नल कीर्तिकर यांनीं केला. कीर्तिकर व्यवसायानें डॉक्टर पण हृदयानें कवि होते. त्यांनीं टेनिसनच्या Princess चें ‘ इंदिरा ’ हें रूपांतर केलें; तें प्रसिद्ध आहे. आपलें काव्य मूळ इंग्रजी काव्याची ‘ अनुकृति आहे, भाषांतर नव्हे ’ असें स्वतः त्यांनीं नमूद केलें आहे. मूळ काव्याप्रमाणें रूपांतराचा हेतु

**संसारामाधिं कैसें स्त्रीपुरुषांचें परस्परालंगीं ।**
**साह्य असोनि परस्पर घ्यावें ओझें स्वयें शिरोभागीं ॥**

हेंच शिकविण्याचा आहे. कुंटयांप्रमाणें कीर्तिकरांनींही हिर्मुसले, खबर्दार, विंचवाच्या असें उच्चारानुसारी लेखन केलें आहे. मात्र तें मर्यादशील आहे. मूळ काव्यांत मधून मधून लहान लहान गीतें आहेत तशीं तीं रूपांतरांतही आहेत.

‘ Come down, O maid, from yonder mountain height ’ या गीताचें रूपांतर असें आहे—

**पर्वतशिखरावरि राहुनि तूं काम करिसि सुखशाली ।**
**ये गुंफेच्या ठायिं विहारा वासंतिक सुखकालीं !**
**अद्री सोडुनियां, येईं धरणीच्या ठायीं ’ ॥**

'इंदिरें' त Princess चें रचनासौंदर्य अथवा वागर्थमाधुर्य नाहीं. परंतु क्वचित् मूळांत नसलेले उदार विचार आहेत. आपल्या-कडील 'वरसंशोधना' च्या चालींत,

**जया जैशी व्हावी, मन-मिळतशी शोधुन, तयें ।**
**वरावी हो भार्या, तरिच जुगतीं दोन हृदयें ॥**

अशी सुधारणा सुचविण्यांत आली आहे, ती योग्य नाहीं असें कोण म्हणेल? कीर्तिकरांची 'भक्तिसुधा' पाळंद्यांच्या 'रत्नमाले' इतकी मधुर नाहीं. परंतु तिच्यांत भाबड्या भक्तीचा ओलावा भरपूर आहे. त्यांची 'विलापलहरी' ही दिवंगत पत्नी-वरील विलापिका आहे. ती लेंभ्यांच्या 'शोकावर्ता' इतकी सरस नाहीं. पण साधेपणामुळें अंतःकरणाचा ठाव घेते.

महाजनींच्या ठिकाणीं हीच रूपांतराची प्रवृत्ति होती. पण प्रधान–कीर्तिकरांच्या प्रयत्नांपेक्षां त्यांच्या प्रयत्नाची दिशा थोडी निराळी होती. प्रधान–कीर्तिकरांचा कल खंडकाव्याकडे होता, तर महाजनींचा ओढा वीणाकाव्याकडे (Lyrics) होता. त्यांनीं ब्लेक, बर्न्स, वर्डस्वर्थ, कोलरिज, बायरन, शेले, कीट्स, टेनिसन, ब्राउनिंग व लाँगफेलो यांच्या उत्तमोत्तम वीणाकाव्यांचीं बेमालूम रूपांतरें केलीं आहेत. त्यांनीं आपल्या रूपांतरांना 'इंग्लिश भाषारामांतील सुंदर व सुगंधी कुसुमें' म्हटलें असून 'तीं गुंफ-ण्याचें चातुर्य आपल्या अंगीं नाहीं व तरूंवर त्यांचें जें सौन्दर्य होतें तें त्यांना तोडल्यावर व चोळवटल्यावर प्रतिकृतींत राहिलें नाहीं, असा विनय व्यक्त केला आहे. परंतु निराळ्या रूपाचीं, निराळ्या रंगाचीं व निराळ्या सुगंधाचीं हीं कुसुमें म्हणजे महाराष्ट्र-शारदेच्या कुंजवनाचीं नवीन भूषणें आहेत. महाजनींपासूनच मराठी वाङ्म-यांत वीणाकाव्यें रचण्याची प्रथा प्रचलित झाली. त्यांची रूपां-

तराची हातोटी अप्रतिम आहे. तींत मुळांतील भावार्थाला किंचित् ढळ पोंचत नाहीं. प्रत्यंतरासाठीं त्यांचीं भिल्लकन्या, मातृविलाप व युवतीचा पश्चात्ताप हीं रूपांतरें पडताळण्यासारखीं आहेत. यांपैकीं पहिलीं दोन अनुक्रमें वर्ड्स्वर्थच्या The Solitary Reaper व The Affliction of Margaret या गीतांचीं रूपांतरें असून शेवटचें बर्न्सच्या ' Ye Banks and Braes O ' Bonnie Dorn या गीताचें रूपांतर आहे. महाजनींची सहृदयता आणि इंग्रजी-मराठीवरील तुल्यप्रभुता पुढील उताऱ्यांवरून स्पष्ट होईल—

Alas ! the fowls of heaven have wings,
And blasts of heaven will aid their flight,
They mount--how short a voyage brings
The wanderers back to their delight !
Chains tie us down by land and sea !

किती विहग धन्य ते ! उडति पक्षयोगें नभीं ।
सुखें विचरती वरी, दचकवी तयांतें न भी ।
क्षणांत निजनीड ते अवतरूनियां गांठती ।
धरेसि खिळलों अम्ही, तव पडे कशी गांठ ती ? ॥

महाजनी केवळ कविच नव्हते. ते एक रसज्ञ व मर्मज्ञ टीकाकार होते. हें त्यांनीं रूपांतरास ज्या टीपा जोडल्या आहेत, त्यांवरून प्रत्ययास येतें.

या सुमारास सुविद्य तरुण साहित्यिकांत मॅकेच्या One Thousand and one Gems of English Poetry आणि पॉल-ग्रेव्हच्या The Golden Treasury या दोन कवितासंग्रहांची अतिशय चहा होती. महाजनींचा आदर्श समोर ठेवून भांडारे, मणी, पावणस्कर व भवाळकर यांनीं त्यांतील कांहीं गीतांचीं

रुपांतरें केलीं आहेत. परंतु त्यांनीं या कार्यांत शेवटपर्यंत नेट धरला नाहीं. नाहींतर महाराष्ट्रशारदेच्या उपवनाचा एक भाग कायमचा हिरवा गार झाला असता.

इंग्रजी रूपांतरांची ही प्रवृत्ति प्रबळ असतांना अन्य कांहीं कवि स्वतंत्र काव्यरचना करीत होते. त्यांत सर टी. माधवराव व बापूसाहेब कुरुंदवाडकर ही राजकुळांतली मंडळी प्रमुख होती. माधवरावांच्या कविता आप्तांवर आहेत. पण भावाविष्करणाची पद्धति पुराण्या प्रकारची आहे. कुरुंदवाडकर म्हणजे अभिनव मोरोपंत आहेत. खरे व जोशी यांची कविता ऐतिहासिक आहे. खऱ्यांची रचना रेखीव आहे आणि प्रसंगविषेशीं हृदयंगम आहे. आठल्यांनीं मुख्यत: मुलींसाठीं कविता लिहिली आहे. सासरची पाठवणी, माहेरचें मूळ, मुलीचा समाचार व दांपत्य-सुखाचा ओनामा हीं त्यांचीं काव्यें एके काळीं स्त्रीवर्गात विलक्षण प्रिय होतीं. आठल्यांची साधी, शुद्ध व सुबोध भाषासरणी त्यांच्या महाराष्ट्र 'भाषा-चित्र-मयूर' या पदवीस सार्थ ठरते. त्यांच्या कवितेंत कल्पनेची भरारी नाहीं, पण चमक मात्र भरपूर आहे. माहेरीं जाण्यास उतावळ्या झालेल्या मुलीचें हें शब्दचित्र म्हणजे जणूं तिचें अंतरंग बाहेर काढून ठेविलें आहे.

**लावून लक्ष जननी बसली असेल ।**
**जातां न मी, मजवरी वहिनी रुसेल ॥**
**जावें क्षणांत उडुनी गमतें मनाला ।**
**नाहींत पंख मज, काय करूं तयाला ॥**

आठल्यांनीं काव्याच्या ओघांत 'देवा देवा, खचित मुलिचा जन्म हा फार खोटा' असे अर्थांतरन्यास सहज साधले आहेत, आणि

**संसारीं मन एक वेळ शिरल्या माहेर होतें शिळें ।**

कोठेंहि घन वर्षला तरि जगीं गंगेस गंगा मिळे ॥

अशीं तत्त्वें गुंफिलीं आहेत. त्यामुळें त्यांचीं काव्यें अतिशय चटकदार झालीं आहेत. वि. कों. ओक व लोंढे यांची बहुतेक कविता बालोपयोगी व शालोपयोगी आहे. आगाशे व पाध्ये यांची रचना बहुशः प्रासंगिक आहे. आगाशांची भाषा पांडित्य-प्रचुर व रचना क्लिष्ट आहे. पण बाष्पांजलीसारख्या त्यांच्या करुण कृतींत काव्य भरपूर आहे. नित्सुरे व लेंभे यांचीं काव्यें रसाच्या दृष्टीनें उच्च प्रतीचीं आहेत. लेंभ्यांच्या शोकावर्तांत पादपूरक शब्द, संबोधनें व पुनरुक्ति यांनीं गर्दी केली असली तरी वैलापिक काव्यांत त्यांचें स्थान अढळ आहे. वा. दा. ओक हे कवीपेक्षां रसिक टीकाकार म्हणून अधिक प्रसिद्ध होते. काव्य-माधुर्य हा अर्वाचीन कवींच्या निवडक काव्याचा पहिला संग्रह त्यांनीं प्रसिद्ध केला. त्यांचे विविध-ज्ञान-विस्तारांतील काव्यपरी-क्षणात्मक लेख चिंतनीय आहेत.

या सर्व कवींत मोगरे व कानिटकर यांचें स्थान विशेष आहे. या दोघांची कविता स्वतंत्र आहे, पण विचारांवर इंग्रजीची छाप आहे आणि रचनेचें वळण जुनें आहे. मोगऱ्यांनीं विलापिका (Elegy) विडंबन (Parody) हे दोन इंग्रजी काव्यप्रकार प्राचुर्यानें हाता-ळले आहेत. पण त्यांत उत्कटतेचा अभाव आहे. सरळ विचार, साधी भाषा व टापटिपीची रचना या बाबतींत मोगऱ्यांचा हात कुणी धरूं शकत नाहीं. मराठी कवितेला प्रथम कानिटकरांनीं संगीत नाटकांतलि पदांच्या चालींची जोड दिली. या वेळीं—म्हणजे १८८० पुढें—नाटक मंडळ्यांची चलती होती. त्यांच्या सार्वत्रिक संचारा-मुळें लोकांत नाटकी चाली प्रचारांत होत्या. तेव्हां सहाजिकच मराठी कवितेच्या प्रसारास त्यांचें अप्रत्यक्ष साहाय्य झालें. कानिट-

करांच्या 'संमोहलहरी'वर इंग्रजी तत्त्वज्ञानाची गडद छाया आहे. त्यांचीं अकबर, नारायणराव पेशवे आणि कृष्णा कुमारी हीं ऐतिहासिक काव्यें स्कॉटच्या मार्मियन् व लेज् ऑफ् दी लास्ट मिनिस्ट्रेजच्या धर्तीवर लिहिलीं आहेत. आयुष्याच्या अखेरीस ते गूढवादी पदें रचूं लागले होते. पण जिव्हाळयाच्या अभावीं तीं जीव धरूं शकलीं नाहींत.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासूनच हा पाउणशें वर्षांचा काळ काव्याच्या बाबतींत निरनिराळ्या प्रयोगांचा होता. त्या काळच्या कवींनीं संस्कृत व इंग्रजी काव्यांचीं भाषांतरें व रूपांतरें केलीं आणि अनुवाद व अनुकार केले. स्वतंत्र कविता रचून पाहिली. पण एकही प्रयोग यशस्वी झाला नाहीं. कारण जनतेंत अजून स्वत्व, स्वाभिमान व आत्मविश्वास यांचा अभाव होता. पण पुढील काळांत हीं न्यूनें नष्ट झालीं व काव्याचा अभ्युदय झाला.

## [१८९०–१९२०]

यापूर्वींच्या संक्रमणकालापेक्षां हा पुढला कालविभाग सर्वच दृष्टींनीं क्रांतिकर होता. पांच दहा वर्षांपूर्वीं स्थापन झालेल्या राजकीय सामाजिक व शैक्षणिक संस्था या वेळीं ताज्या दमांत व ऐन जोमांत होत्या. त्यांचे संस्थापक विष्णुशास्त्री चिपळुणकर हे विद्यमान नव्हते, पण त्यांनीं निर्माण केलेली तत्त्वप्रणालि आपलें कार्य आपोआप करीत होती. राष्ट्रांत राष्ट्रसभेची स्थापना, प्राणप्रतिष्ठा झाली होती आणि महाराष्ट्रांत टिळकांचा 'केसरी' व आगरकरांचा 'सुधारक' हीं वैचारिक 'पत्रें' राजकीय व सामाजिक जीवनांत नवे प्राण फुंकत होतीं. जीवनाच्या या दोन क्षेत्रांत नित्य नव्या नव्या चळवळींचें आवाहन होत होतें आणि त्यामुळें एकंदर जनतेंत एक प्रकारचें प्रोत्साहक चैतन्य खेळत होतें. तत्कालीन वाङ्मयावर या

वातावरणाचा खोल असर झाल्याविना राहिला नाहीं.

या वेळीं वाङ्मयाच्या प्रांतांत विविधज्ञानविस्तार व काव्य-रत्नावलि हीं मासिकें आस्थेवाईकपणानें कार्य करीत होतीं. विविध-ज्ञान-विस्ताराचें कार्य जुनें होतें. परंतु काव्यरत्नावलि नुकतीच दोन वर्षांपूर्वीं जन्मास आली होती. यापुढें करमणूक व मासिक मनो-रंजन या दोन नवीन नियतकालिकांची वाङ्मयांत भर पडली. आधुनिक कवितेला मानाचें व महत्त्वाचें स्थान मिळवून देणारे कवि प्रथम याच नियतकालिकांतून पुढें आले. यांपैकीं प्रत्येकानें आधुनिक कवितेला कांहींना कांहीं वैशिष्ट्य मिळवून दिलें आहे. अंतःकरणांत स्फूर्तीचा जिवंत झरा असणाऱ्या या कवींनीं मराठी कवितेचें पुरातन स्वरूप पार पालटून टाकलें. या पूर्वींच्या कवींच्या लेखनाची शैली अव्यक्तिगत (Objective) होती. नवीन कवींनीं व्यक्तिगत (Subjective) शैलीचा अंगी-कार केला. त्यामुळें त्यांच्या कवितेंत उत्सुकता व उत्कटता यांचा स्वाभाविक संचार झाला. जुन्या कवींचा ओढा वर्णनपर कवितेकडे होता. हीं वर्णनेंही लांबलचक, पाल्हाळिक व कंटाळवाणीं असत. काव्य हें प्रदीर्घ असलेंच पाहिजे अशी त्या काळची एक समजूत होती. परंतु वाङ्मयविकासाबरोबर वर्णनाचें हें कार्य कथा व कादं-बरी या गद्य प्रकारांकडे जातांच पद्याचें क्षेत्र आपसुकच संकुचित झालें. नवीन कवींच्या स्फूर्तीचा ओघ त्रुटित व सुटसुटीत वीणाकाव्यें प्रस्फुटित करण्याकडे वळला. वीणाकाव्यांचा संभव भावनेच्या उद्रेकाच्या उदरीं असल्यामुळें त्यांना लगत्वानुसारी छंदाचें बंधन नडूं लागलें व प्रासांचे पाश जखडूं लागले. तेव्हां त्यांनीं अगदीं सहजगत्या लवाचिक व सोईस्कर अशा मात्रिक 'जाती'चा अवलंब केला. मात्रिक रचनेंत लगत्वानुसारी रचनेइतकी मुस्कटदाबी

नसल्यामुळें तोंड थोडें फार हलवतां येऊं लागलें. त्यामुळें नवीन कवितेला मर्यादित गेयता प्राप्त झाली. कवीला कविता म्हणतांना भावप्रदर्शनार्थ इच्छित स्थळीं मुहूर्तमात्र विराम घेतां येऊं लागला, आवश्यक स्थळीं आघात देतां येऊं लागला व मनाप्रमाणें वाणीला झोका देतां येऊं लागला. साहजिकच अंगच्या अमोघ परिणाम-कारकतेमुळें नवीन कविता जनतेच्या आकर्षणाचा विषय बनली.

कवितेच्या विषयांच्या बाबतींतही नवीन कवींनीं नवीन मार्ग चोखाळला. ते कवितेकरितां नित्याच्या अनुभवांतले विषय निवडूं लागले. निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळीं रूपें घेणारा ' बहुरूपी ' निसर्ग हा त्यांच्या काव्याचा विषय बनला. निरनिराळ्या मनु-ष्यांच्या अंतरंगांत प्रवेश करून त्यांच्या सुखदु:खांना वाचा फोडा-वयाची हा आणखी एक त्यांच्या आवडीचा विषय झाला.

विचारप्रदर्शन व भावनाविष्करण यांच्या पुरातन पद्धतींत त्यांनीं आमूलाग्र उलथापालथ घडवून आणली. आपले विचार ते भावनेच्या भरांत बोलूं लागले आणि भावनांना बुद्धिपुरस्सर अलं-कृत न करतां स्वाभाविक स्वरूपांत प्रदर्शित करूं लागले.

या जातिवंत कवींत टिळक हे अग्रेसर होत. ते सर्व कवींत वयानें ज्येष्ठ व अनुभवानें श्रेष्ठ होते.समवयस्क केशवसुतांना त्यांच्या-पासून स्फूर्ति मिळाली होती आणि दत्त व बालकवि या तरुणांना त्यांचा सहवास घडला होता. टिळकांचें काव्य प्रसन्न व निरामय आहे. त्यांची वाणी प्रासादिक व प्रेमळ आहे. टिळकांना ' फुलां-मुलांचे कवि' म्हणतात, याचें कारण त्यांनीं त्यासंबंधीं विपुल कविता लिहिल्या आहेत हें तर आहेच; परंतु त्यांसारखेंच त्यांचें काव्य अव्याज व प्रफुल्ल आहे. टिळकांच्या कवितेंत काव्य व तत्त्वज्ञान यांचा सुंदर समन्वय झाला आहे. किंबहुना तोच त्यांच्या काव्याचा

विशेष आहे. तो जसा ' वनवासी फूल, बापाचे अश्रु, माझी भार्या व सुशीला ' या साधारण दीर्घ काव्यांत आढळतो, तसाच तो ' बोंबाबोंब, ' ' कारण मी वेडा नुसता ' इत्यादि स्फुट वैणिकांतही दृगोचर होतो.

लक्ष्मीबाई टिळकांच्या प्रतिभेचा उन्मेष प्रेमळ पतीच्या साहचर्यांत झाला. रोजच्या पाहण्यांतले साधे घरगुती प्रसंग काव्यमय करावयाचें आणि त्यांत एकाद्या साध्या सामाजिक रूढीवर बोट ठेवावयाचें, हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. सासुरवाशिणीला माहेरीं नेण्यासाठीं मावशी म्हणून जावयाचें आणि

तूं साधी अल्लड पोर लाडके ।
गुरुजनें काल्पिली थोर लाडके ।
तुज कशास हा संसार ? लाडके ।

अशी ' बालविवाहा ' वर सहज टीका करावयाची. हा तसलाच प्रकार आहे. त्यांच्या सहजोद्गारांना काव्याचें स्वरूप आलें आहे हा त्यांचा दुसरा विशेष आहे.

रे. टिळकांच्या मानानें केशवसुतांच्या भावनेंत आवेग अधिक आहे. त्यांच्या वृत्तींत एक प्रकारचें औध्यत्व आहे. क्वचित् तें बेपर्वाईच्या हद्दीपर्यंत पोंचलें आहे. त्यांच्या वाणींत त्वेष व आवेश आहे. ते लवकर विकारवश होतात, त्यामुळें त्यांचें काव्य अत्यंत उत्कट व विलक्षण परिणामकारक. झालें आहे. टिळक व आगरकर यांच्याशीं शिष्य या नात्यानें साक्षात् संबंध आल्यामुळें त्यांच्या ' स्वतंत्रता ' व ' सुधारणा ' या वादाचा त्यांच्या काव्यांत प्रोत्साहक प्रतिध्वनि उमटला आहे. त्यांच्या अनेक काव्यांत राष्ट्रप्रेम व स्त्रीदाक्षिण्य यांचें दर्शन घडतें. कारण त्या काळीं हे विषय सर्वप्रिय होते. त्यांच्या पूर्वीचे कवि

स्त्रीचें अंगनिअंग वर्णन करण्यांत गुंग असत. स्त्री म्हणजे एक प्रदर्शनीय पदार्थ अशी त्यांची कल्पना असे. पण केशवसुतांच्या वेळेपासून हा दृष्टिकोन बदलला आणि त्याबद्दल स्त्रीपुरुष समान आहेत, पुरुषाप्रमाणें स्त्रीलाही भावना आहेत, त्यांना अन्याय म्हणजे अखिल मानवतेला अन्याय करण्यासारखें आहे, हा नवा दृष्टिकोण पुढें आला. केशवसुतांच्या सहानुभूतीचें क्षेत्र वरिष्ट वर्गातल्या स्त्रीच्या उद्धारापुरतें मर्यादित नव्हतें. त्यांत ' मजूर ' व ' अंत्यज ' यांना स्थान होतें.

केशवसुतांनीं कवितेचें तेंच-तें-स्वरूप पालटण्यासाठीं परिश्रमाची पराकष्ठा केली. त्यांनीं भावाविष्काराच्या व्यक्तिगत Subjective शैलीचा सर्रास पुरस्कार केला व विपुल प्रमाणांत मात्रिक 'जातीं'चा स्वीकार केला. त्यांनीं ' सॉनेट ' हा इंग्रजी काव्यप्रकार व पद्यप्रकार मराठींत नव्यानें आणला. कांहीं वैणिकें रचलीं व कांहीं गूढगुंजन लिहिलीं. त्याचप्रमाणें वर्डस्वर्थचें अनुकरण करून त्यांनीं निसर्गावर चिंतनपर ( Reflective ) कविता लिहिल्या.

केशवसुतांच्या काव्यांत त्याच त्या विचारांचा पुनरुच्चार नाहीं. त्यांनीं मोजकेंच काव्य लिहिलें आहे. परंतु तें प्रभावोत्पादक कसें होईल इकडे अधिक लक्ष पुरविलें आहे. त्यांची रचना साधारण ओबडधोबडच आहे. परंतु काव्यांतील तेजस्वी विचारांमुळें व ओजस्वी शब्दांमुळें तिला नसतें महत्त्व देण्याचें कारण उरत नाहीं.

केशवसुतांच्या अशा बहुविध गुणांमुळें आणि आधुनिक कवींत प्रथम त्यांचाच कवितासंग्रह प्रसार पावल्यामुळें त्यांना 'आधुनिक कविकुलगुरु' असें मानण्यांत येतें व इतर कवींना त्यांच्या ' संप्रदायातील अनुयायी ' असें लेखण्यांत येतें. टिळकांसारख्या ज्येष्ठ कवींनीं ' पुरें जाणतों मीच माझें बळ ' यासारख्या अहंवादी

कविता लिहिण्यांत व सुधारणेचें ‘ रणशिंग ’ फुंकण्यांत केशव-सुतांचें अनुकरण केलें आणि गोविंदाग्रजांसारख्या कनिष्ठ कवींनीं कांहीं कारण नसतांना केवळ टूम म्हणून स्वतांला केशवसुतांचे चेले मानून घेतलें; त्यामुळें ‘केशवसुतांचा संप्रदाय’ हा प्रयोग रूढ झाला व स्वतःचें स्वतंत्र वैशिष्टय असलेल्या कवींनाही त्यांत कोंबण्यांत येऊं लागलें. वस्तुतः हा प्रकार अनुचित आहे. हा काळच कवितेच्या बाबतींत उत्कर्षाचा होता. त्यामुळें भिन्नभिन्न जिवंत वाणीचे कवि निर्माण झाले आणि त्यांनीं आपापल्या वैशिष्ठयांनीं मराठी कवितेला नवनवोन्मेषशालिनी केलें.

केशवसुतांची कविता अंशतः इंग्रजीचा अवतार आहे. तिच्यामुळें काव्यप्रांतांत जशा कांहीं इष्ट प्रवृत्ति प्रतिष्ठा पावल्या, तशा अनिष्ट प्रवृत्तिही अकारण बळावल्या. स्वतः केशवसुत इंग्रजीच्या इतक्या पकडींत होते कीं ‘ कीर्तिचें पीस ’ ‘ अज्ञात थडगें ’ ‘ निराशेचें अंडें ’ असे आपल्या परंपरेस सर्वथैव विसदृश प्रयोग त्यांच्याकडून न कळत घडले आहेत. ‘ Poets are mad ’ या इंग्रजी वचनाचा त्यांनीं असाच वेळीं अवेळीं ध्यास घेतला आहे. अापण उन्मनस्क आहोंत, वेडे आहोंत, वेडें पीर आहोंत, पिसे आहोंत, डोक्याच्या भ्रमणामुळें विक्षिप्त झालों आहोंत, असे चमत्कारिक उद्‌गार त्यांच्या काव्यांत अनेक ठिकाणीं आले आहेत. वस्तुतः आपल्या परंपरेप्रमाणें ‘ कवि ’ म्हणजे ‘ शाहणा. ’ परंतु केशवसुतांनीं इंग्रजी वचनाचा पाठपुरावा केल्यामुळें नंतरच्या कांहीं कवींनीं केवळ एक टूम म्हणून त्याचीच री ओढली आणि स्वतःचें हंसें करून घेतलें. केशवसुतांची

**‘ युवा जसा तो युवतीस मोहे, तसा कवी हा कवितेस पाहे ’**

ही कल्पनाही अभिनंदनीय नाहीं. वनितेवर कवितेचें

रूपक करणें निराळें, आणि अशरीरिणी कवितेलाच वनिता समजून तिनें आपणांस वेडें केलें आहे म्हणून तिच्यावर ' फिर्याद ' करणें निराळें. हा प्रकार चंद्रशेखर, दत्त व रेंदाळकर यांच्या काव्यांतही आढळतो. केशवसुतांचा आत्मविश्वास हा कित्येकदां अहंकारांत परिणत झाला आहे.

**शारदेनें जो मंत्र दिला कानीं**
**तसें लिहिलें मीं काव्य तिच्या मानी**

हा ' परि त्या विश्वंभरें बोलाविलें ' या संतवाणीचा भावानुवाद विनयमधुर आहे. परंतु

**' आम्ही कोण म्हणून काय पुसतां ? '**

हा अहंकार म्हणजे झपाटा आहे.

केशवसुतांच्या कवितेंत आरंभीं आरंभीं उत्साह व आशा यांचा आनंद होता. परंतु पुढेंपुढें प्रतिकूल परिस्थितीच्या कचाट्यामुळें म्हणा अथवा उदासीन मनोरचनेमुळें म्हणा, ते पक्के निराशावादी बनले. या बाबतींत तरी गोविंदाग्रज म्हणतात त्याप्रमाणें ते खरो-खरच ' शेले ' ठरले.

**काळोखाच्या जगामध्यें या, मृत आशांच्या चितांवरुनिया,**
**पिशाच्च माझें भटकत राहे, शांति न सोचित या**

अथवा

**' मींहि कशाला येथ रहावें ? काय असे ज्या मी चिकटावें ? '**

या उद्गारांत निराशेशिवाय दुसरें काय आहे ?

केशवसुतांच्या मानानें विनायकाचा व्यासंग अल्प होता व वाचन सीमित होतें. दोघाचें वास्तव्य खानदेशांत असल्यामुळें त्यांच्या आपसांत नेहमीं भेटीगांठी पडत. त्यामुळें विनायकांच्या ' चिमणी, सुवास, प्रीति निमाली तर ' अशा तीन चार कवितांवर केशवसुतांचा

ठसा उमटला आहे. केशवसुतांत व विनायकांत राष्ट्रीयता ही बाब साम्याची आहे. परंतु विनायकांत ती पराकोटीला पोंचली आहे.

**देशभक्ता प्रासाद बंदिशाळा, शृंखलांच्या गुंफिल्या त्यास माळा,**
**चिता सिंहासन शूळ राजदंड, मृत्युदैवत दे अमरता उदंड!**

या चार चरणात तिचें दिव्यत्व प्रगट झालें आहे.

विनायक हे आपल्या काळाचे प्रतिनिधि आहेत. त्यांच्या काव्यांत तत्कालीन चळवळींचें उठावदार प्रतिबिंब पडलें आहे. त्यांत टिळकांचा कारावास, चाफेकरांची फांशी, गणेशोत्सव, शिवाजी उत्सव, जहालमवाळ यांचा तंटाबखेडा, रूसोजपान युद्ध इत्यादि घडामोडींचा चालता बोलता इतिहास सामावला आहे. विनायकांतला ' टीकाकार ' प्रखर आहे. जहालमवाळांच्या राष्ट्रसभेंतील बखेड्यावर त्यांनीं

**कारटीं करंटीं तिथें । निपजलीं भुतें । मातृशोणितें,**
**स्वतःला लाली आणाया धावलीं ॥**
**कल्याण काय नेणती । मात्र भांडती । आपसांत तीं,**
**परां वश झालीं--स्वत्वाला विसरलीं ॥**

अशी मर्मभेदक टीका केली आहे. सर्कशींतला लाचार सिंह पाहून ते त्याच्या आड भारतीयांना ' ही इष्ट नव्हे परवशतेंत बहाली ' असा इषारा देतात.

विनायक केवळ कवि नव्हते, ते एक थोर कलाकार होते. ध्यास तो भास, गणिकोध्दार, मोहानंतर इत्यादि कवितांत त्यांची कला प्रदर्शित झाली आहे. ठसठशित व्यक्तिदर्शनें, चित्रमय वर्णनें व वेधक निवेदनें यामुळें त्यांची हीं आटोपसर कथाकाव्यें कलादृष्ट्या सुंदर वठलीं आहेत. त्या काळच्या अशिक्षित स्त्रियांना इतिहासाचें ज्ञान व्हावें, म्हणून त्यांनीं ऐतिहासिक स्त्रियांवर गाणीं रचलीं आहेत.

तीं अर्थातच साधीं व सुबोध आहेत. चिमा व स्वप्न या काव्यांवरून त्यांची विनोदवृत्ति उघड होते.

कविता उपदेश करणारी अथवा नीतिशिक्षण देणारी नसावी असा कलापक्ष आहे. पण माधवानुजांच्या कवितेचें नेमकें तेंच जीवित-कार्य होतें. आणि ' धरी रे ध्यानीं, जग अळवावरचें पाणी ' अशा कुणालाही पटणाऱ्या 'काव्या'नें तिनें तें पार पाडलें आहे. माधवानुजांची कविता खरोखरच ' जाईच्या फुला-'सारखी साधीसुधी व बाळबोधी आहे. तिचा रंग भडक नाहीं कीं सुवास मादक नाहीं. माधवानुज डॉक्टर होते. दुष्काळांत त्यांना फिरतीचें काम करावें लागे. त्यांतच त्यांनीं ' फुट् फुट् दगडा ! फुट् फुट् फुट ' सारखीं करुण गीतें लिहिलीं आहेत. बंगालच्या माइकेल 'मधुसूदन दत्त'ला, प्रथन त्यांनीं मराठी पेहेराव चढवला.

चंद्रशेखरांच्या 'चंद्रिके'चें वळण जुनें असलें, तरी अंतःकरण नवें आहे. कथाकाव्यांच्या आहोटीच्या काळांत त्यांनीं ' काय हो चमत्कार, उघड गुपित, किस्मतपूरचा जमीनदार ' यांसारखीं उच्च प्रतीचीं कथाकाव्यें लिहिलीं व तीं लोकप्रिय केलीं, यांतच त्यांचें वैशिष्ट्य आहे. इंग्रजी कवितांना बेमालूम मराठी रूप देण्याचें त्यांचें कसब अजब आहे. मिल्टनच्या L'elegro व Ie-Panseroso यांना रंगराव हर्ष व चिंतोपंत उदास करण्यांत तें उघड झालें आहे. यापेक्षां विशेष हें कीं, मूळ काव्यांत जेथें जेथें ग्रीक पुराणांतले संदर्भ आहेत, तेथें तेथें त्यांनीं तत्सदृश आपल्या पुराणांतले संदर्भ घातले आहेत. चंद्रशेखरांचें शब्दशिल्प अनुपम आहे आणि रचनाचातुर्य अप्रतिम आहे. त्यांना साधण्यासाठीं त्यांनीं रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र केली होती.

दत्त अल्पायुषी होते. परंतु त्यांचें कवित्व चिरंजीव आहे. त्यांत

जिवाला झोंबणारा जिव्हाळा आहे. 'बा नीज गडे व विश्वामित्रीच्या कांठीं' हीं त्यांचीं गीतें करुणानें ओतप्रोत आहेत. त्यांच्या शब्दांत आर्द्रता आहे आणि सुरांत आर्तता आहे. त्यांना करुणरसाप्रमाणें वत्सलरसाचें उद्भावन साधलें आहे. 'शाहणी बाहुली, गडे तूं बोलत कां नाहीं व मोत्या शीक रे अ आ ई' हीं त्यांचीं शिशुगीतें सदैव सरस आहेत. त्यांत खुबीदार विनोद देखील आहे. दत्तांनीं मुलां-विषयीं कविता लिहिल्या नाहींत तर मुलांसाठीं लिहिल्या हें विशेष आहे.

तांबे हे केशवसुतांचे समसामायिक. परंतु त्यांचा बोलबोला झाला तो वीस सालानंतर. दहा सालापर्यंत त्यांचें काव्यलेखन अखंड चालू होतें. नंतर आठदहा वर्षें त्यांत खंड पडला. वीस सालानंतर तें पुन्हां सुरू झालें व शेवटपर्यंत अखंड चाललें. तांबे हे स्त्रीपुरुषांचे कवि होते. स्त्रीपुरुषांच्या विविध भावनांना तोंड फोडण्यांत त्यांना कमालीचें यश लाभलें होतें. म्हणूनच नाट्य-गीताचें जनकत्व त्यांच्याकडे जातें. त्यांनीं निर्माण केलेले काव्या-त्मक स्त्रीपुरुष रसानुकूल सुरांत बोलतात आणि भावनेच्या अनु-रोधानें हालतात व चालतात. त्यामुळें त्यांच्या काव्याला अभिनय व संगीत यांची जोड मिळाली आहे. आपल्या पात्रांना उठाव देण्यासाठीं तांब्यांनीं निसर्गाचा उपयोग पार्श्वभूमीप्रमाणें केला आहे त्यामुळें त्यांचीं शब्दचित्रें ठळक उमटलीं आहेत. याप्रमाणें त्यांच्या लेखनांत काव्य, चित्र व संगीत या तीन ललित कलांचा सुरेख संगम झाला आहे.

केशवसुतांनीं मिल्टॉनिक सॉनेट मराठींत आणलें, तर तांब्यांनीं शेक्स्पीरियन आणलें. तांब्यांच्या 'गेली ज्योति विझोनिया' या सॉनेटची केशवसुतांनीं मुक्तकंठानें स्तुति केली होती. आपल्या

'आम्ही कोण ?' या सॉनेटपुरता त्यांनीं तांब्यांनीं आणलेल्या शेक्सपीरियन पद्धतीचा स्वीकार केला आहे.

'चिव्‌चिव् चिमणी, वारा, गडी फू व कुणि असेल ग' हीं तांब्यांचीं शिशुगीतें महाराष्ट्रांतील घराघरांतून प्रसार पावलीं आहेत. त्यांचा गूढवाद रूपकात्मक आहे. त्यामुळें त्यांतलें तत्त्व शुष्क वाटत नाहीं अथवा त्याची भाषा रुक्ष होत नाहीं.

तांबे सामाजिकतेला अथवा राजकीयतेला विमुख नव्हते, मात्र त्यांवर त्यांनीं उसन्या अवसानानें नीरस व्याख्यानें झोडलीं नाहींत. विधवांचीं दुःखें विधवांच्याच मुखांनीं त्यांनीं वेशीवर टांगलीं आहेत. त्यांनीं 'साम्राज्यवाद्यां'च्या मर्मस्थळावर

**'गिळि अपुलें, गिळि परकें, खांचही भरे तरी न**
**शांतीच्या वर बाता बोंबले अधाशी हा'**

असा अचूक टोमणा हाणला आहे; आणि विषमतेचा अन्याय दूर करण्यासाठीं 'किरिट रंकास दे, करटि भूपाप्रती' असें रुद्रास आवाहन केलें आहे.

तांबे किरकिरे किंवा चिरचिरे नव्हते. त्यांचा आशावाद अमर होता. 'फुल गळे, फळ गोड जाहलें' असा त्यांचा अनुभव होता. 'मरणांत खरोखर जग जगतें' असा त्यांचा विश्वास होता.

रहाळकरांच्या काव्यलेखनाचा आरंभ जितक्या त्वरेनें झाला तितक्याच त्वरेनें तो विराम पावला. त्यांच्या लेखनावर केशव-सुतांची छाया असली, तरी केशवसुतांपेक्षा त्यांचें विचार-प्रदर्शन व भावाविष्करण सरळ व सुगम आहे. मात्र त्यांत केशवसुतांची तीव्रता नाहीं. कवि या नात्यापेक्षां केशवसुतांचे शिष्य व भाष्यकार म्हणून त्यांची प्रसिद्धि अधिक आहे.

Bee च्या कवितेचा उगम विचाराच्या तंद्रींत आहे. आपल्या

वृत्तीला ते विशेष उच्छृंखल होऊं देत नाहींत. त्यांचे भावही संयमित असतात. त्यामुळें त्यांचें काव्य सर्वांहून निराळें आहे. त्यांचें अनुकरण सोपें व सहजसाध्य नाहीं. अर्थात् रचनेबाबत सारखेपणा दिसत नसल्यामुळें कुणाच्याही मागें त्यांचें अनुयायित्व चिकटवतां येत नाहीं. पण याचा अर्थ असा नाहीं कीं त्याचे चहाते कमी आहेत.

Bee च्या अंगीं थोड्या शब्दांत व्यापक विचार व्यक्त करण्याचें कौशल्य आहे. वाटेल त्या तुच्छ विचाराला अथवा क्षुद्र भावाला ते थारा देत नसल्यामुळें त्यांच्या कवितांची मोजदाद साहजिकच कमी आहे. मात्र कमींतकमी शब्द वापरण्याच्या हव्यासामुळें त्यांचें काव्य क्वचित् क्लिष्ट व कठिण झालें आहे. 'माझी कन्या' या त्यांच्या कवितेंत भाव व विचार यांचा मोठा मनोहर मिलाफ झाला आहे. 'कमला' या काव्यांत त्यांची प्रखर ध्येयनिष्ठा व्यक्त झाली आहे.

अशरीरिणी कवितेलाच वनिता मानून तिची आराधना करण्याचा केशवसुतांच्या काव्यांतील चमत्कारिक प्रकार रेंदाळकरांच्या काव्यांत कळसाला पोंचला आहे. किंबहुना त्यांच्या बाबतींत कवितेशीं प्रणयाराधन ही एक मनोव्यथा होती. यासंबंधीं कांहीं टीकाकारांनीं त्यांच्यावर निर्दय आरोप केले आहेत, ते निराधार आहेत. रेंदाळकरांचा संस्कृत, बंगाली व इंग्रजी वाङ्मयाशीं परिचय होता. परंतु त्यांना टीकात्मक दृष्टिकोन नसल्यामुळें आपल्या काव्यांत नावीन्य निर्माण करतां आलें नाहीं. फक्त भाषांतरापुरता त्यांनीं त्या वाङ्मयाचा उपयोग केला आहे. निरनिराळीं वृत्तें हाताळण्यांत व भाषेला हवी तशी लवविण्यांत रेंदाळकर कुशल होते. त्यांच्या ठिकाणीं लेखनाचा उरकही दांडगा होता. त्यांनीं नियमक कवितेचा प्रचार धडाडीनें केला.

**‘निसर्ग–मृदु पाद हे रुचिर काव्य देवी ! तुझे**
**कशास मग सांग या यमक–शृंखळा घातल्या ?**
**भरेल नवरंग कां रुचिर इंद्रचापीं कुणी ?**

हा त्यांचा युक्तिवाद जितका तर्कशुद्ध तितकाच हृदयंगम नाहीं असें कोण म्हणेल ? रेंदाळकरांच्या ‘ उघडि नयन रम्य उषा ’ या गीतांतला मधुरिमा सदैव नवीन आहे. ‘ अजून चालतोच वाट ’ हें त्यांचें अंतिम गीत हृदयद्रावक आहे.

नागेश हे रेंदाळकरांचे खरेखुरे जिवलग मित्र. त्यांनीं रेंदाळकरांच्या निर्यमक कवितेच्या प्रचाराला जातीनें हातभार लावला. रेंदाळकरांच्या मानानें नागेशाचें काव्य जास्त संस्कृतप्रचुर आहे. परंतु त्यांत देखील

**होतीं झाडें लाविलीं दोनचार, आला होता अल्पसा त्यां बहार**
**होती आशा येथुनी एकदां तूं, कीं जाशील; व्यर्थ तो होय हेतू.**
**आतां गेलीं हाय ! झाडें सुकून, गेलीं पानें मातिमाजी मिळून.**

यासारखीं अनेक भावमधुर स्थळें आहेत.

सुमंत हे रेंदाळकर व नागेश यांचे निकटवर्ती. त्यांची रचना पूर्णतया निर्दोष आहे. परंतु भावनेंत उत्कटतेचा अभाव आहे. तरीसुद्धां ‘ मुकुट मला हा नलगे देवा ! ’ यासारखें त्यांचें एखादें भावगीत हृदयास स्पर्श केल्याशिवाय राहत नाहीं. काव्यगायनाच्या चालीचा श्रीगणेशा सुमंतांनींच केला.

या काळच्या तरुण कवींत गोविंदाग्रज हे सर्वांत अधिक प्रसिद्ध होते. त्यांनीं केवळ काव्याच्या प्रांतांतच नव्हे, तर नाटकाच्या व विनोदाच्या प्रांतांतही अलौकिक लौकिक मिळवला होता. कल्पकता हा गोविंदग्रजांच्या काव्याचा विशेष आहे. तरल कल्पना Fancy व गगनगामी कल्पना Imagination यांचें त्यांत सारखेंच प्राचुर्य आहे.

कल्पकता हा बुद्धीचा गुण पण त्याला अंत:करणांतील उत्कट भावनेची जोड देण्यांत गोविंदाग्रजांनीं कल्पनातीत यशस्विता प्राप्त केली होती. त्यामुळें त्यांच्या लेखनांत कल्पना व भावना यांचा सम-समा संयोग झाला आहे. गोविंदग्रजांच्या प्रेमगीतांत एक प्रकारचें रम्य औदास्य आहे. 'फुलें वेचलीं पण-' ही कविता जितकी उदास तितकीच रम्य आहे. सुखदु:खांच्या द्वंद्वांत सांपडलेल्या मानवजीवनांत हास्य व करुण या दोन रसांनाच प्रमुख स्थान आहे, हें गोविंदाग्रजांच्या लक्षांत आलें होतें. त्यामुळें त्यांच्या ' विहिणींचा कलकलाट, हुकमे-हुकूम, चिंतातुर जंतु ' यांसारख्या विनोदी कविता आणि ' राजहंस माझा निजला, कळ्यांचीं फुलें कशीं झालीं, लीला ' यांसारख्या वैलापिक कविता रसिकांत सारख्याच प्रिय आहेत. विनोदी कवितांच्या पडद्याआड गोविंदाग्रजांनीं टीका केली आहे. परंतु तिनें सावजास जखमा होत नाहींत; उलट गुदगुल्या होतात. गोविंदाग्रजांचें मराठी भाषेवर असाधारण प्रभुत्व होतें. त्यांनीं शब्दसंपदा मुक्तहस्तांनीं उधळली आहे. एकाद्या सामान्य कवीच्या काव्यांत हा प्रकार दोषास्पद ठरला असता, पण गोविंदाग्रजांच्या काव्यांत त्याला गुणाचें स्वरूप आलें आहे. गोविंदाग्रजांच्या काव्यांत विलक्षण नादमाधुर्य आहे. केवळ त्याच्या बळावर ते कित्येक रसिकांना मंत्रमुग्ध करतात. कलगीच्या गाण्यासारखी एकादीदुसरी शब्द-जंजाळाची निरर्थक कविता वगळली तर ' प्रेम आणि मरण, गोफ, गुलाबी कोडें, एकाद्याचें नशीब, पहिलें चुंबन, विरामचिन्हें ' अशा त्यांच्या कितीतरी कविता महाराष्ट्रशारदेच्या शृंगारास शोभवीत आहेत.

बालकवि ठोंबरे हे कवींच्या नंदनवनांतील सर्वांत लहान फुल-पांखरूं. त्यांना निसर्गनिरीक्षणाचें विलक्षण वेड होतें. त्यांचा

निसर्ग जिवंत आहे. त्यांची फुलराणी निजते व संध्यारजनी लाजते. निसर्गावर ते मानवी भावनांचा आरोप करतात, त्यामुळें त्यांच्या काव्यांत निसर्गाचीं नीरस वर्णनें आढळत नाहींत. उलट शब्दांच्या कुंचल्यानें रेखाटलेलीं आकर्षक रेखाचित्रें दृष्टीस पडतात. ते वर्डस्वर्थप्रमाणें चिंतन करीत बसत नाहींत किंवा आपल्याकडे उपदेशकाची भूमिका घेत नाहींत. त्यामुळें कलेच्या दृष्टीनें त्यांचीं निसर्गावरलीं काव्यें निर्दोष आहेत.

बालकवींच्या शब्दांत व प्रयोगांत अवर्णनीय जादू आहे. फुल-राणी, साखरचुंबा, मायावी, कुसुंब्याचा गुलजार हात; फिकट निळीचा रंग, सरसर शिरवें ’ यांत टोमणा नाहीं असें कोण रसिक म्हणेल ? त्यांच्या वाणीची माधुरी अवीट आहे. ‘ जा वळसे वळसे घेत, लपत छपत हिरवाळींत ’ यासारखे चरण कितीदां घोळले तरी तृप्ति होत नाहीं.

या काळांत ‘अर्वाचीन कविता’ ‘अभिनवकाव्यमाला भाग १ व २’ आणि ‘कुसुमगुच्छ’ हे आधुनिक कवींच्या वेच्यांचे संग्रह प्रसिद्ध झाले. ते अनुक्रमें चंद्रशेखर, लेले, टिळक व मित्र यांनीं संपादन केले आहेत. शिवाय टिळकांपासून तों बालकवीपर्यंतच्या कवींचे स्वतंत्र कवितासंग्रह त्यांच्या आप्तांनीं अगर चाहत्यांनीं प्रसिद्ध केले. फक्त Beeचा कवितासंग्रह नंतरच्या काळांत प्रसिद्ध झाला. हीं प्रकाशनें आधुनिक कवितेच्या अभिवृद्धीचीं निदर्शक होत. याच काळांत ब. ज. करंदीकर, ल. ग. लेले, भिडेद्वय, माधवराव मोडक, मुजुमदार, भालचंद्र, इंदुकांत, देवधर, रणदिवे, राधारमण, आनंदीरमण, सोनाळकर, फणसे, रिसबूड, वनवासी इत्यादि मंडळी, मनोरंजन, वि. ज्ञा. विस्तार व काव्यरत्नावली या मासिकांतून काव्यलेखन करीत होती. परंतु त्यांत आकर्षण नव्हतें. त्यामुळें तें लेखन प्रसार

पावलें नाहीं. साहित्याच्या इतर प्रांतांत नांव मिळविलेल्या शि. म. परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर, ह. ना. आपटे, न. चिं. केळकर, ल. रा. पांगारकर इत्यादिकांनींही या काळीं थोडेंफार काव्यलेखन केलें, तें अर्थातच केवळ हौस म्हणून निर्माण झालें होतें. परंतु त्यावरून त्या काळीं कवितेला किती मान व महत्त्व प्राप्त झालें होतें तें स्पष्ट होतें.

या काळांतील कवितेवर निरनिराळ्या नियतकालिकांतून अनुकूल प्रतिकूल टीका बरीच आली. अनुकूल टीकाकारांत डॉ. गुणे, प्रि. राजवाडे, बा. अ. भिडे, ना. म. भिडे, प्रो. भाटे, प्रि. वा. ब. पटवर्धन हे प्रमुख होते, तर प्रतिकूल टीकाकारांत आजगांवकर, आठल्ये, ग. वि. कुलकर्णी, आगाशे व अ. ब. कोल्हटकर प्रमुख होते. या काळची कविता आपल्या अंगच्या गुणांनीं आज आदरणीय ठरली आहे. तेव्हां प्रतिकूल टीकांचा परामर्श घेण्याचें प्रयोजन नाहीं. एवढें बरीक खरें कीं, प्रतिकूल टीकाकारांनीं कवींच्या स्वयंकेंद्रियत्वावर, अहंकारावर व निरर्थक गूढगुंजनावर जे आक्षेप घेतले आहेत, त्यांत अगदींच तथ्य नाहीं असें नाहीं. मात्र साधे विषय, सोपी भाषा, त्रुटित रचना व गेय चाली यासंबंधींचे आक्षेप फोल आहेत. प्रतिकूल टीकाकारांनीं खासगी संभाषणांत अगर सार्वजनिक लेखनांत कवितेवर टीका केल्यास ती कवींना झोंबत असे, असें त्यांच्या कवितासंग्रहावरून निदर्शनास येतें. कवितेला मान नाहीं असें म्हणतांच तें शल्य केशवसुतांच्या मनास डसत असे व ते संतापानें टीकाकारांना पुसत कीं,

**'अशी असावी कविता म्हणून, तशी नसावी कविता म्हणून;**
**सांगावया कोण तुम्ही कवीला, आहांत मोठे ?'**

विनायक त्रागा करीत व म्हणत,

**‘ काय अशा जनतेंत रहावें ? काय पहावें ? काय चहावें ?**
**बरें राहणें निर्जन रानीं, ओढ्यासंगें गाणें गाणीं ’**

चंद्रशेखरांची भाषा आर्जवी असे. ते विनंती करीत,

**‘ जाया करूं नका हो ! हिमकालीं खुंट हे प्रहारांनीं ।**
**लवतिल हेच वसंतीं द्राक्षांच्या गोड गोड भारांनीं ॥ ’**

आणि Bee कुणी रसिकच नाहींत म्हणून तक्रार करीत,

**महाराष्ट्रकविपरंपरा, खंड न पडला तिला जरा;**
**उणीव रसिकांचीच खरी, आज भासते परोपरी.**

## [ १९२१–१९४५ ]

या कालविभागाच्या प्रारंभीं एक नवीन गट पुढें आला. सावरकर–गोविंदापासून त्यानें काव्यालेखनाची स्फूर्ति घेतली होती. विनायक करंदीकर हे राष्ट्रीय बाण्याचे पहिले कवि. परंतु विनायकराव सावरकर केवळ ‘ कविच ’ नव्हते, तर ‘ क्रांतिकारक ’ होते. तानाजी व बाजी प्रभूवरील त्यांच्या पोवाड्यांनीं एक तपापूर्वीं साऱ्या महाराष्ट्रांत नवजीवनाचा संचार केला होता.

‘ स्वतंत्रेच्छुनें पाहिजे युद्ध केलें; रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ? ’ असा त्यांचा साऱ्या राष्ट्राला खडा सवाल होता. तो अनेक कवींच्या कानीं पडला होता व अंतःकरणांत शिरला होता. हा नवीन गट त्याच कवींचा होता.

सावरकर–गोविंदाच्या कविता फार पूर्वीं उफाळल्या होत्या. परंतु त्यांना ऐन बहारींत कर्झनशाहीच्या क्रोधाला बळी पडावें लागलें होतें. त्यामुळें कालपरवापर्यंत त्यांचा उघड उघड प्रसार नव्हता. सावरकरांची कविता म्हणजे महाराष्ट्र शारदेचा अमोल ठेवा आहे. रवींद्रनाथ व मोहम्मद इक्बाल यांच्या देशभक्तिपर कविता कल्पनारम्य आहेत. सावरकरांच्या कवितेंत साक्षात् अनुभवाचे

रसरशित अंगार आहेत. देशभक्ति म्हणजे सतीचें वाण. तें बुद्ध्याच स्वीकारल्याची त्यांना जाणीव होती, म्हणूनच ' अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला ' असे आशेचे अमर उद्‌गार त्यांच्या मुखावाटे बाहेर पडले आहेत.

उद्दाम उड्डाण करणाऱ्या आपल्या स्वतंत्र प्रतिभेचे पंख एकाएकीं कातरले गेल्यामुळें गोविंदांनीं 'प्रभो ! तुज कळतें कळतें कळवळणें—जिवविहगाचें चिंवचिंवणें, ' अशी ईश्वराची आर्त आळवणी केली आहे. कायद्याच्या निरनिराळ्या बंधनांमुळें आपण मुक्तकंठानें लोकमान्यांची स्तुति करूं शकत नाहीं, हें दुःख सांगतांना देखील त्यांच्या मनाचा आशावाद ढळलेला नाहीं. ते म्हणतात,

मुक्या मनानें किती उडवावे शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चवघडे ?

अनंततनय, माधव, निफाडकर, बेहेरे, टेकाडे, उपाध्ये, बोवडे आदि कवि या नवीन गटांतले होते. त्या वेळीं देशभक्ति आजच्याइतकी सोपी नसल्यानें या कवींचा भर ऐतिहासिक कवनांवर होता. वर्तमानापेक्षां भूताला महत्त्व देणारी ही कविता कांहीं काल लोकप्रिय झाली, तरी आपलें आसन कायम टिकवूं शकली नाहीं. या कवींपैकीं कांहींचा राधाकृष्णांचें प्रेम हा आवडता विषय होता. तोही समाजाच्या नव्या डोळ्यांना ताजेपणाच्या अभावीं फार दिवस रुचला नाहीं. मात्र या कवींच्या काव्यात तडफ आहे व भाषेंत जोरदारपणा आहे. आधुनिक कवितेच्या प्रसाराच्या दृष्टीनें यांपैकीं टेकाड्यांचें कार्य विशेष आहे. त्यांचा आवाज भरदार व त्याची फेक पल्लेदार. त्यांनीं बृहन्महाराष्ट्रांत दौरे काढले व आपल्या गायनानें आधुनिक काव्य लोकप्रिय केलें.

याच सुमारास रविकिरणमंडळाची स्थापना झाली. या वेळीं

समाजांत बऱ्याच सुधारणा झाल्या होत्या. स्त्रीशिक्षण वाढलें होतें. सभासमारंभांत ती पुरुषाच्या बरोबरीनें भाग घेत होती व विधवा-विवाहही हळुहळू मान्यता पावत होते. त्यामुळें पूर्वींच्या पिढींत स्त्री ही सहानुभूतीचा विषय होती, तर आतां ती प्रीतीचा विषय बनली होती. सार्वजनिक उत्सवांत व शाळा-कॉलेजांत पुरुषांचा स्त्रियांशीं संपर्क येत होता. त्यामुळें परस्परांत नैसर्गिक आकर्षण वाढलें होतें. पूर्वींच्या पिढींत प्रेमविवाह नव्हता. आतां पाश्चात्य शिक्षणाच्या व सुधारणांच्या संसर्गानें लग्नाची वयोमर्यादा वाढली होती. त्यामुळें साहाजिकच त्यांना वाव मिळाला होता. अद्यापि शिक्षण फक्त वरिष्ठ समाज घेत होता. तेव्हां अर्थातच या नव्या नव्या चाली त्यांतच रूढ होत होत्या व त्यांना वाङ्मयांतून वाचा फुटत होती.

खेड्यापाड्यांतला समाज नेहमींप्रमाणें निरक्षर होता. त्यांतली एकादी दुसरी व्यक्ति शहरांत येऊन सुशिक्षित झाली, तरी तिच्यावर पूर्वाश्रमींचे संस्कार राहत नसत. उलट तीही शहरांतील लोकांच्या लेखनाचें वळण गिरवीत बसे. म्हणून या काळांत ग्रामगीत या नांवानें जो नवा काव्यप्रकार वाङ्मयांत आला त्याचें ग्रामीण स्वरूप निर्मळ राहिलें नाहीं. त्यावर शहरी राहणीचीं पुसट पुटें आहेत.

राजकारणांत टिळकांचें युग संपून गांधींचें युग सुरू झालें होतें. त्यांतील असहकार, अहिंसा, निरोधन, कायदेभंग, सत्याग्रह, प्रायो-पवेशन इत्यादि "सविनय" प्रकारांसंबंधीं महाराष्ट्राला असावी तेवढी आवड नव्हती. त्यामुळें 'गांधी मोहनदास हा अनुभवी येशू-परी आपदा' असा महात्माजींसंबंधीं क्वचित् कुठें आदर प्रकट झाला असला तरी त्यांचा मतप्रणालीशीं कुणी कवि समरसला होता असें म्हणतां येत नाहीं. नाहीं म्हणावयास साने गुरुजी व त्यांची 'पत्नी' यांचा अपवाद आहे.

पण वाचकांत गुरुजींच्या गद्याचा जितका बोलबाला आहे, तितका तो पद्याचा नाहीं. रविकिरण मंडळांतील द. जं. गोखले व रानडे दंपती यांची कविता अगदींच तुटपुंजी व सामान्य आहे. घाट्यांची कविता थोडी असली तरी चटकदार आहे. माडखोलकरांची मनो-रचना कवीपेक्षां यशस्वी टीकाकाराची आहे. माधव ज्यूलियन हे या मंडळाचे व या काळाचे मुख्य कवि होत. त्यांच्यापेक्षां गिरीश हे वयानें व यशवंत हे यशानें श्रेष्ठ असले, तरी ह्या दोघांच्या लेखनावर त्यांच्या मतप्रणालीची व लेखनशैलीची गर्द साउली पडली आहे.

माधव ज्यूलियनच्या काव्यांत स्त्रीकडे पाहण्याचा सरळ व स्वाभाविक दृष्टिकोण आहे. त्यात सोंग अगर ढोंग नाहीं. स्त्री ही जशी भोगदासी नाहीं, तशी ती देवीही नाहीं. ती जीवनांतली सहचरी आहे, हें सत्य त्यांत प्रतिबिंबित झालें आहे. मात्र त्यांची या प्रकारची बरीच कविता ऐन पंचविशींतील असल्यामुळें तिच्यांत खळखळाट फार आहे. शिवाय तिच्यावर मुसलमानी काव्यांतील

**देऊं नको तूं चुंबनें, देऊं नको आलिंगनें ।**
**देऊं नको तूं दर्शनें, प्रीती तरी मी नावरी ॥**

या हटवादीपणाचा थोडाफार परिणाम झाला आहे. त्यांची कविता कॉलेजकुमारांत प्रिय असण्याचें कारण त्यांतली ही तारुण्यसुलभ नव्हाळी होय. हळुहळू तिचें अंतरंग खोलावत होतें तोंच दुर्दैवानें त्यांचा अंत झाला.

समर्पक शब्दांच्या योजनेनें काव्यांतील पात्राचें हुबेहूब चित्र काढण्यांत माधव ज्यूलियन सिद्धहस्त आहेत. ‘ पिरोजा कौला ’ हें एक त्यांचें नमुनेदार चित्र आहे. सुधारकांतील रावबहादुर ठोसरांचें ‘ वदन गुलाबी हें धवधवलें, शरीर सुखवस्तू लवथवलें । ’

हें, अथवा ‘ ओठ मिशांच्या लपले खालीं.’ हें चित्र जिवंत नाहीं असें कोण म्हणेल ? माधव ज्यूलियनच्या रचनेंत चंद्रशेखरांची टापटीप आहे. त्यामुळें त्यांच्या काव्यांत सर्वत्र प्रमाणबद्ध सौंदर्याचा आढळ होतो.

पुढील कवींना निर्दोष पद्यें रचतां यावीं म्हणून त्यांनीं छंदोरचना हा प्रचंड ग्रंथ निर्माण केला. गज्जल हा मुसलमानी पद्यप्रकार व काव्यप्रकार शुद्ध स्वरूपांत प्रथम त्यांनींच रूढ केला. त्याचप्रमाणें मूळ फारशी व मूळ इंग्रजी यांतून उमरखय्यामच्या रुबाळांचे दोन अनुवाद केले. त्यांचा फार्सी-मराठी कोश प्रसिद्धच आहे.

माधव ज्यूलियनच्या ठिकाणीं लेखनाचा उरक विलक्षण होता. त्यांची भाषापद्धति सर्वांपेक्षां निराळी आहे. त्यांत संस्कृत, प्राकृत, फारशी व इंग्रजी शब्द एकाच रांकेंत जवळजवळ असतात. उत्फुल्ल मिजास, छुपा नगारा, संगीन मुजोरी, रोमँटिक कवि हे शब्दप्रयोग त्यांनीं मागचा पुढचा विचार न करतां केले आहेत. सुरवातीसच त्यांच्या काव्यांत मुसलमानी शब्दांनीं निव्वळ हैदोस घातला होता. पुढें त्यांना ‘ भाषाशुद्धिविवेक ’ सुचला. त्यामुळें त्यांनीं रूढ शब्दांनाही केवळ ते परकीय म्हणून हद्दपार करण्याचा सपाटा चालवला. परके शब्द राहूं नयेत म्हणून त्यांनीं पूर्वीं लिहिलेल्या आपल्या कवितांचें संस्करण व परिष्करण करण्याचा उद्योग आरंभला. त्यांत मूळ आविष्करणाचा अर्धाअधिक जीव नाहींसा झाला. त्यांच्या ‘मराठी असे आमुची मायबोली’, ‘ तेथें चल राणी ’ ‘संगमोत्सुक डोह, वृद्ध कवि, अज्ञात नाथास,’ आदि कविता कधींही न कोमेजणाऱ्या आहेत.

गिरीशांनीं ‘ अभागी कमल व आंबराई ’ हीं खंडकाव्यें यशस्वितेनें लिहिलीं आहेत. परंतु त्यापेक्षां त्यांचीं ‘ अंधारांतल्या बाणा- ’

सारखीं लहान लहान कथाकाव्येंच विशेष चटकदार आहेत. त्यांचीं भावगीतें सुंदर आहेत पण सरस नाहींत. मात्र त्यांच्या आत्मपर कवितांत जिव्हाळा आहे. प्रत्यंतरार्थ पुण्यपुरीस, पितृस्मृति, समर्थांचें चाफळ इत्यादि कविता पहाण्यासारख्या आहेत. त्यांचे शब्द सोलीव आहेत, मांडणी कातीव आहे आणि रचना रेखीव आहे. त्यांच्या अविश्रांत परिश्रमाचें व दीर्घ तपश्चर्येचें तें फळ आहे.

या दोघांपेक्षां यशवंत हे साहित्यक्षेत्रांत अधिक यशवंत ठरले आहेत. त्यांच्याइतकें स्वयंकेंद्रियत्व दुसऱ्या कुठल्याही कवीच्या ठिकाणीं नाहीं. त्यांची वृत्ति अत्यंत भावनोत्कट आहे. साध्या भावनेलाही ते शब्दांचा साज सहज चढवतात. ते स्वतःशीं प्रामाणिक असल्यामुळें त्यांचीं कांहीं गीतें चिरंजीव झालीं आहेत. आई, मृत्यूस, मांडवी, मी पापी कळतां, इत्यादि त्यांच्या कविता म्हणजे भावनेचे स्वच्छंद उद्रेक आहेत.

आरंभीं आरंभीं यशवंतांचा कल राष्ट्रीय काव्यें लिहिण्याकडे होता. ‘चीड अंतरीं सदा भडकते, जिव्हेवरि परि वाणी अडते, । लगाम कांटेरी हा नडते’ हे त्यांचे उद्‌गार अथवा ‘आत्मविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती, गाउं त्यांना आरती,’ हे त्यांचे विचार साऱ्या समाजाला स्पर्श करणारे होते. पण पुढें पुढें सहकाऱ्यांच्या सान्निध्यांत व कॉलेजकुमारांच्या स्तुतिपाठांत ते प्रेमकाव्याकडे वळले. त्यांचीं प्रेमगीतें तयार केल्यासारखीं वाटतात. त्यांच्यांत ओघ आहे, पण तो बांधलेल्या कालव्यासारखा भासतो.

यशवंतांच्या काव्यांत दोष अनेक आहेत. शब्दांचे अपप्रयोग, कल्पनांची गल्लत, अनौचित्य यांचीं पुष्कळ उदाहरणें काढून दाखवतां येतील. पण त्यांच्या प्रतिभेच्या प्रकाशांत ते दोष लुप्त होतात. आपल्या काव्यांतून खाजगी दुःखें सांगावयाचीं व समाजा-

वर अकारण तोंडसुख घ्यावयाचें ही यशवंतांची वृत्ति अभिनंदनीय नाहीं. त्यांना टीकाकाराचा दृष्टिकोण नाहीं. तो असता तर त्यांनीं आपणच आपलीं काव्यें सुधारलीं असतीं.

रविकिरणमंडळाच्या सदस्यांनीं विविध पद्यप्रकार हाताळून व भिन्नभिन्न काव्यप्रकारांविषयीं 'काव्यविचारां'त चर्चा करून मराठी वाङ्मयाची बहुमोल सेवा केली. त्यांच्या परिश्रमामुळें भाषा सुंदर बनली व रचना रेखीव झाली. मात्र त्यांनीं उथळ प्रणयाला प्राधान्य दिल्यामुळें भ्रमरवृत्तीचीं प्रेमगीतें बेसुमार निपजलीं. माडखोलकर काव्यावर जो स्त्रैणत्वाचा आरोप करतात, तो या काळच्या काव्यावर करावयास हवा.

रविकिरणमंडळाच्या अनुकरणानें महाराष्ट्रांतील निरनिराळ्या नगरांत वेणुमंडळ, भ्रमरमंडळ, दादर-कविमंडळ, भारत-कविमंडळ, बिल्वदलमंडळ, सरोजमंडळ अशीं मंडळें अस्तित्वांत आलीं व स्वतःच्या बऱ्यावाईट कवितांचे लहान मोठे संग्रह प्रसिद्ध करूं लागलीं. यापूर्वीच्या पिढींत फक्त तुतारीमंडळ हेंच काय तें नाममात्र अस्तित्वांत होतें. परंतु स्वतःच्या काव्याचें प्रकाशन हें मात्र त्याचें कार्य किंवा ध्येय नव्हतें. इतकेंच काय, पण स्वतः कवींनीं आपणच आपले काव्यसंग्रह प्रसिद्ध केले नव्हते. टिळकांचे व तांब्यांचे काव्यसंग्रह उजगरे व मायदेव या चाहत्यांनीं संपादन केले होते. पण यापुढें जो तो कवि आपणच आपला कवितासंग्रह 'प्रसिद्ध' करूं लागला. त्यामुळें मराठी कवितेच्या बाबतींत कांहीं काळ तरी 'उदंड माजली गवताऐशी' ही उक्ति खरी ठरली. मराठी कवितेवर चोहोंकडून टीकेचा जो भडिमार होऊं लागला त्याचें एक कारण तिची ही स्वच्छंद व अनिर्बंध बेसुमार वाढ होय. कवितेवर टीका होण्याचें दुसरें

कारण म्हणजे काव्यगायनाला आलेला महापूर होय. हव्या त्या वेळीं व वाटेल त्या उत्सवांत काव्यगायनाच्या मैफली झडूं लागल्या. काव्याचे क्षुद्र व क्षुल्लक विषय, हेकेखोर व चिकट कवींचें भसाड्या आवाजांतलें पाल्हाळिक काव्यगायन आणि उत्सवचालकांचा काव्यगायनाच्या कार्यक्रमाचा आंबटशोक यांमुळें बेचव पद्याबरोबर विशुद्ध वाङ्मयीन कविताही मनोरंजनाऐवजीं जनतेच्या थट्टेचा विषय बनली व 'कविलोगा-'ची 'जात' तिरस्करणीय वाटूं लागली. कवितेवर टीका होण्याचें तिसरें कारण म्हणजे फोनो व रेडिओ यांच्या मध्यस्थीनें रसिकांच्या कानांवर होणारा भावगीतांचा बेहद्द जुलूम होय. चवथें कारण म्हणजे अल्पजीवी नियतकालिकांचा सुळसुळाट व त्यांनीं हव्या त्या पाणचट भावगीतांना दिलेलें अवास्तव महत्त्व होय. भावगीत हा काव्यप्रकार एका बैठकींत लिहून होतो. इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणें त्याला वेळेची तर आवश्यकता नसतेच, पण विचारांचेंही वावडें असतें. समाजांत यापूर्वींच महाकाव्याची तर राहो, पण खंडकाव्याचीही चहा उरली नव्हती. माधव ज्यूलियन यांचें 'विरहतरंग' व यशवंत यांचें 'जयमंगला' हीं खंडकाव्यें नाहींत, तर अनेक भावगीतांच्या मालिका आहेत. तशांत चिल्लर कवींच्या हातांत भावगीत पडतांच त्यास थिल्लर स्वरूप आलें व सटरफटर नियतकालिकें, फोनो, रेडिओ व काव्यगायन या सिद्धप्रसिद्धीच्या साधनांच्या साहाय्यानें तें साहित्यक्षेत्रांत धुमाकूळ घालूं लागलें. भावगीतांत 'भावा' पेक्षां गीताला महत्त्व मिळालें. गीतांना पैशांचा भाव असल्यामुळें लवकरच त्यांना यांत्रिक स्वरूप आलें आणि साहित्यांत जिकडे तिकडे लुंग्यासुंग्या कवींचा गोंधळ आणि धांगडधिंग्या भावगीतांचा सुकाळ झाला. खऱ्या रसिकांना या परिस्थितीचा उबग आला. जातिवंत कविही आपल्या

जागीं स्वस्थ राहिले. त्यामुळें 'काव्याला ओहोटी लागली आहे' असा भ्रम उत्पन्न झाला.

या परिस्थितीला पालटण्यासाठीं केशवकुमार पुढें आले. प्रेमवेडे कवि, त्यांचे प्राणचट विषय, त्यांचीं जाडींजाडीं बाडें, त्यांचीं कंटाळवाणीं गायनें आणि प्रसिद्धीचीं येनकेन साधनें, या सर्व प्रकारांत त्यांच्या विनोदी दृष्टीला भरपूर भांडवल दिसलें. त्याबरोबर त्यांनीं आपलें साधेंच परंतु सुंदर काव्यलेखन बाजूला सारलें व निरर्गल कवींवर विडंबनाचें हत्यार उगारलें. त्यांच्या 'झेंडूच्या फुलां'तील कांहीं कवितांचा रोख कदाचित् व्यक्तिविषयक असला, तरी त्यांच्या सद्धेतूसंबंधीं वाद नाहीं. 'बुद्धीचे भरवी समुद्र, शुनितें भुंकणें' आदि त्यांचे प्रयोग विडंबनाचे उत्कृष्ट मासले आहेत. मित्रांच्या कुचेष्टेनें केशवकुमारांची प्रतिष्ठा अधिक वाढली, यांत तथ्य असलें, आणि त्यांच्या अनुकरणानें कांहीं काळ गालिच्छ विडंबनाचें पेंव फुटलें हें सत्य असलें, तरी त्यांच्या परिणामकारक विडंबनपद्धतीमुळें काव्यांतून स्फूर्तीच्या गिरण्या बंद पडल्या आणि नरिस कवितेच्या पैदाशीला पायबंद बसला, हें सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहे. केशवकुमारांच्या विडंबनाप्रमाणेंच उपाध्ये व बोबडे यांचीं विडंबनेंही खुसखुशीत व चुरचुरीत आहेत.

या वेळच्या नामवंत कवींत पुढील मंडळी येतात. मायदेव त्यांच्या बहुविध शिशुगीतांमुळें विख्यात आहेत. काव्यविहारी त्यांच्या सुबोध काव्यलेखनामुळें सर्वांपेक्षां निराळे आहेत. हरिभाऊ गोखल्यांचें लेखन साधें पण प्रसन्न आहे. अज्ञातवासींच्या कांहीं कविता चटकदार आहेत. साधुदासांत महाकाव्याच्या निर्मितीची क्षमता आहे, तर डॉ. श्रीखंड्यांत अभिजात रसिकता आहे. य. खं. कुलकर्णी, स. अ. शुक्ल, अधिकारी, निशिगंध, पद्माकर, महाजन, बळवंत पळशीकर,

गाडगीळ, खापर्डे, गु. ह. देशपांडे, लक्ष्मीबाई बेहरे, लक्ष्मीतनया, सारजाबाई बापट इत्यादि मंडळींनीं थोडेंफार लिहिलें आहे. पण त्यांत विशेष आकर्षण नाहीं.

या काळच्या तरुण कवींत अनिलांचें काव्य वेगळें व आगळें आहे. त्यांत प्रीतीच्या आतुरतेचें, मैत्रीचें व पूर्तीचें सुरेल संगीत आहे. अनिलांचें प्रेमकाव्य रविकिरणमंडळाच्या प्रेमकाव्यासारखेंच वैषयिक आहे; परंतु तें एकनिष्ठ आहे. त्यांत भ्रमरवृत्ति नाहीं. शिवाय त्यांत मंदिर, मूर्ति, पूजा, फुलें इत्यादि शब्दांचा समावेश आणि भक्ति, शांति, तृप्ति इत्यादि भावनांचा सन्निवेश असल्यामुळें त्यास एक प्रकारचें गूढ सौंदर्य प्राप्त झालें आहे. त्यांत पुनः जुन्या संतवाणीच्या अक्षरसंख्याक छंदांची योजना असल्यामुळें एकंदर काव्यास एक प्रकारचें मांगल्य व माधुर्य आलें आहे. अनिलांचीं भग्नमूर्ति आणि निर्वासित चिनी मुलाचे अश्रू हीं काव्यें म्हणजे स्वाभाविक गद्याला अस्वाभाविक करण्याचे प्रयोग आहेत. त्यांत भावनेला प्राधान्य नाहीं; रचनेला प्राधान्य आहे. किंबहुना रचनेसाठीं काव्यें निर्माण झालीं आहेत. त्यांचें बहिरंग मोहक नाहीं, कीं अंतरंग वेधक नाहीं. अनिल हे मुक्तछंदाचे एक प्रवर्तक आहेत.

सौ. विमलाबाई देशपांड्यांत एके काळीं ' एक भावविवश कवयित्री ' होती. त्यांचा ' वसंत ' त्याचें प्रत्यंतर आहे. ' वसंत वेडा उन्मत्त, वातावरणीं सुगंध झोकुनि जिवास करितो उत्कंठ ॥ ' या ओळींतलि शब्दाशब्दांत भावाची उत्कटता खचून भरली आहे.

पा. ना. देशपांड्यांची कविता रसवत्तेंत कमी आहे. पण ती रचनादृष्ट्या निर्दोष असून अर्थपूर्ण आहे. त्यांचा कल खंडित कथा-काव्याकडे आहे. त्यांचीं ' भारती व सोहागरांत ' हीं काव्यें कल्पना-पूर्ण व कलात्मक आहेत.

गोपीनाथ तळवलकरांची कविता थोडीच पण भावमधुर आहे. ग. ह. पाटलांच्या कवितेंत निसर्गाचें प्रसन्न, मोकळें व निरोगी वातावरण आहे. सौ. नावलेकरांची कविता साधीच पण गोड आहे. 'तुजाविणा फुला, चैन नच मला' ही कविता वात्सल्यानें ओतप्रोत आहे. या. मु. पाठकांचें शशिमोहन काव्य निव्वळ करमणुकीचें नाहीं; त्यांत सेवेची शिकवणूक आहे. तें काव्य सहेतुक असून सुद्धां नीरस नाहीं, हें विशेष आहे. हुडांच्या कवितेंत मधून मधून रम्य स्थळें आहेत. सौ. संजीवनी मराठे यांची कविता अन्तर्बाह्य मनोरम आहे. त्यांच्या प्रेमगीतांत संयम आहे व वत्सल-गीतांत अकृत्रिम ममत्व आहे. कारे, बोरकर व ना. घ. देश-पांडे यांचीं संगीतकें अत्यंत सुरेल आहेत. भावमाधुर्य, शब्दसौंदर्य, अर्थगांभीर्य व रचनाचातुर्य या दृष्टींनीं तीं नितांत रमणीय आहेत. काणेकरांत अवखळ प्रणय आहे. काळे कल्पक कवि आहेत.

या कालविभागांत महाराष्ट्र शारदेचे दोन भाग, अभिनव काव्य-मालेचे ३, ४ व ५ हे भाग, विदर्भवीणा, मालविका, गोदातटींचा गुंजारव, पद्मदल, भावसंगम आदि प्रादेशिक कवितासंग्रह, सुगी हा जानपद गीतांचा संग्रह आणि विनोदिनी व उपहासिनी हे विनोदी कवितांचे संग्रह, इतकें महत्त्वाचें प्रकाशन झालें. याशिवाय जुन्या नव्या कवींचे स्वतंत्र कवितासंग्रह व निरनिराळ्या मंडळाचे कविता-संग्रह बाहेर पडले ते वेगळेच. सुगींत ठोकळ, चौधरी, गोरे, कोलते, घुले, नारखेडे आदि कवींची कविता आहे. विनोदिनी व उपहासिनींत दीक्षित, नातू, साठे, बकुलराय, पंडित सप्रे आदि कवींची कविता आहे. या सर्व संग्रहांत कांहीं कांहीं कविता खरोखरच हृद्य व आस्वाद्य आहेत. मर्ढेकर व लाड यांचे काव्यसंग्रह वेगळ्या वळणाचे आहेत.

[ १९४६-   ]

आतां काव्याचें नवयुग सुरू झालें आहे. नवे कवि हे बदललेल्या जगांतले आहेत. शीघ्र प्रवास व शीघ्र विचारविनिमय यामुळें जग लहान झालें आहे. संहारक व विध्वंसक शक्तीसमोर मानव दुबळा ठरला आहे. सर्वच अनिश्चित झालें आहे. प्रत्येकापुढें जीवनमरणाचा प्रश्न आहे. तेव्हां प्रणयापेक्षां जीवन श्रेष्ठ आहे, अशी उगवत्या कवींची धारणा आहे. मानवता हा त्यांचा धर्म आहे, जागतिक शांततेची स्थापना हें त्यांचें कार्य आहे व विश्वबंधुता हें त्यांचें ध्येय आहे. त्यांच्या काव्यांत वैयक्तिक सुखदु:खांना स्थान नाहीं. मानवांत उच्च-नीच व श्रीमंत-गरीब हा भेदभाव नको, अशी त्यांची इच्छा आहे. श्रमजीवी जनांना पुंजीपतींच्या पकडींतून सोडवावयाचें व वरच्या पातळीवर आणावयाचें हें त्यांचें ब्रीद आहे. ते कवि म्हणून आपण कुणी निराळे आहोंत असें मानत नाहींत. इतर माणसांप्रमाणेंच आपण माणसें आहोंत अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यांचा स्वभाव लोकांशीं फटकून वागण्याचा नाहीं, लोकांत मिसळण्याचा आहे. सर्वांत समता हवी असा त्यांचा आग्रह आहे व त्यासाठीं क्रांति करण्याचा त्यांचा दावा आहे. या कवींत कुसुमाग्रज हे अग्रगण्य आहेत. रेगे, शांता शेळके, अशोक, पोवळे, चिंधडे, बढे, पारधी, कांत, काळेल्ले, आठल्ये, माडगुळकर, निकुंब, मुक्तिबोध इत्यादि मंडळी त्यांच्याच मार्गांतली आहेत. या मंडळींचा उत्साह अदम्य आहे आणि आशा अनंत आहे. मराठी कवितेचें भवितव्य त्यांच्या हातांत सुरक्षित आहे हें निश्चित !

# १४. संस्कृत साहित्याचें महत्त्व

( लेखक-श्री. पं. काव्यतीर्थ, मीमांसक, विद्याभरण, श्रौतस्मार्तकोविद्, धर्मांगममर्मज्ञ, वेदार्थवित् श्रीधर अण्णाशास्त्री वारे, श्रीक्षेत्र नाशिक. )

शास्त्रेषु चारु साहित्यं सर्वावयवसुन्दरम् ।
प्रेक्षावदिष्टदं प्रेष्ठं सर्वविद्योपकारकम् ॥ १ ॥

कविरच्युतरायः ।

श्रीक्षेत्र नाशिक येथें स्थापन झालेल्या पांगारकर स्मारक मंडळानें कै. ह. भ. प. पांगारकरांच्या स्मरणार्थ स्मारकग्रंथ प्रकाशित करण्याचें ठरविलें असून त्या ग्रंथाच्या पहिल्या विभागांत अनेक प्रार्थितयश लेखकांचे निबंध देण्याचें ठरविलें आहे. सदर मंडळाचे चिटणीस श्री. ग. त्र्यं. बगदे, नासिक, यांनीं मलाही सदर विभागांत वरील विषयावर एक निबंध लिहिण्याबद्दल विनंति केली. मींही त्यांची विनंति कै. पांगारकरांवर माझा जो आत्मभाव व पूज्यत्वनिष्ठा हृदयीं वसत आहे, त्यास अनुसरून स्वीकारली. म्हणून प्रस्तुतचा नावीन्यपूर्ण लघुतम निबंध यथामति लिहिण्याचें साहस करीत आहें.

सर्व जागतिक वाङ्मयांत आम्हां आर्यांचें वाङ्मय सर्वांत प्राचीन, महत्त्वपूर्ण, सर्वांगसुंदर, पदलालित्य, अल्पाक्षर, अर्थगुरु, सरस, सगुण, निर्दोष, अतीतानागत वर्तमानज्ञानबोधक, विविधविषयावगाही, इतिहासजनक व संततधाराप्रवाही अशा थोर योग्यतेचें आहे, असें म्हटलें असतां अतिशयोक्तीचा आक्षेप कदापि संभवनीय नाहीं; कारण जगांतील सर्व भाषांची जननी संस्कृत भाषाच होय, हें सर्व-

वादिसंमत स्वीकृत प्रमेय आहे. अर्थातच त्या भाषेनें भाषित श्रुति-स्मृति, पुराणें, आरण्यकें, उपनिषदें, वेदांतसूत्रें, दर्शनें, शास्त्रें, नीति, अर्थ, काम, शिल्प, मानस, भूमि, अन्तरिक्ष, यंत्र, तंत्र, मणि, मंत्र, औषधी, अनेकविध कला इत्यादिविषयक वाङ्मय सर्वोच्च, सर्व-प्रथम असें आहे. कारण ऋग्वेद सर्वांत जुना व पहिला वाङ्मयीन ग्रंथराज होय हें प्रमेयही सर्वांस मान्य आहे.

याच दृष्टीनें वरील शिरोभूत श्लोकांत म्हटलें आहे कीं, साहित्यशास्त्र अर्थात् संस्कृत साहित्यशास्त्र हें वेद, वेदांगें, आस्तिक-नास्तिक दर्शनें, पुराणें, भारत–रामायणादि इतिहास, अर्थ, काम, वार्ता, शिल्प, नीति, भूगोल, खगोल, विविध कला इत्यादि अनेक विषयक शास्त्रें, या सर्वांहून रम्य व मनोहर असें आहे. कारण त्याची रचना, रस, गुण, रीति, अलंकार, पदलालित्य, अर्थगौरव, वाक्यार्थ-सौष्ठव, विविध विषयप्रतिपादन, याथातथ्य अभिनय इत्यादि सर्व अवयवांनीं नितांतसुन्दर व उठावदार अशी नाहीं, असें कोण म्हणूं शकेल ?

तसेंच तें सहृदय रसिक बुद्धिमान् लोकांना ऐहिक मनो-विनोदापासून पारात्रिक स्वर्गीय आनंद, नव्हे पारमार्थिक निरतिशय ब्रह्मानंदापर्यंतच्या आनंदाला देणारें म्हणूनच श्रेष्ठ-सर्वजनप्रिय होय.

शिवाय, तें चारही वेद, सहा अंगें, पूर्वोत्तर मीमांसा, काणाद व गौतमन्याय, अठराही पुराणें व उपपुराणें ( महाभारत-रामायणासह ), मन्वादि धर्मशास्त्रें, अर्थ, वार्ता, दण्डनीति, विविध शिल्पादि कला यां सर्व विद्यांवर परम उपकार करणारें शास्त्र होय.

## साहित्यशास्त्र म्हणजे काय ?

एथपर्यंत ज्या साहित्यशास्त्राची महत्ता–थोरवी वर्णन केली, तें साहित्यशास्त्र काय स्वरूपाचें होय, असें वाटणें स्वाभाविक

आहे. करितां त्यासंबंधीं थोडें समालोचन करूं. काव्यमीमांसेंत राजशेखरानें साहित्य शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. 'शब्दार्थयोर्यथावत्सहभावेन विद्या साहित्यविद्या।' शब्द व अर्थ याच्या औचित्यपूर्ण एकत्र अस्तित्वानें जी विद्या अर्थात् शास्त्र तयार केलें गेलें, त्यास साहित्यविद्या--साहित्य शास्त्र—असें म्हणतात. वक्रोक्तिजीवितकारांच्या मतें 'शब्दार्थयोः सौन्दर्यवृद्धिकृच्चित्तप्रसादकरोऽविनाभावेन सहभावः।' शब्द व अर्थ यांचा, सौन्दर्य वाढवून त्याचे द्वारा चित्ताला प्रसन्न करणारा असा, एकमेकांस विलग न होऊं देणारा जो सहभाव म्हणजे एक स्वरूपानें असणें यासच साहित्य म्हणणें योग्य होय. इतरांच्या मतानें 'शब्दार्थयोः रचनाविच्छित्तिविशेषाद्रमणीयतरं ससामग्रीकं गद्यपद्यतदुभयात्मकं सहभवनं साहित्यम्।' शब्द व अर्थ यांच्या रचनासंबन्धीं चमत्कृतिपूर्ण वैशिष्ट्यामुळें नितांतसुंदर रस, ध्वनि, गुण, रीति, अलंकार, छंद, गाथा प्रभृति सामग्रीसह क्वचित् गद्यरूप, क्वचित् पद्यरूप, क्वचित् गद्यपद्य उभयरूप असें जें सहभवन, नियतपणें एकत्र अस्तित्व म्हणजे साहित्यशास्त्र होय.

तात्पर्य, वरील लक्षणांस अनुगुण असणारे, रामायणादि महाकाव्यें, रघुवंश, किरातार्जुनीय, नैषधप्रभृति काव्यें, शाकुन्तलादि नाटकें, भारतचम्पूप्रभृति चम्पूग्रंथ, कादम्बरी, हर्षचरितप्रभृति कथाग्रंथ, साहित्यशास्त्राचें प्रक्रियासिद्ध स्वरूप दर्शवितात. तर रसगंगाधर, ध्वन्यालोक, वक्रोक्तिजीवित, काव्यमीमांसा, काव्यप्रकाश, साहित्यदर्पण, साहित्यसार आदिग्रंथ साहित्यप्रक्रियाघटक अवयवांचीं लक्षणें, लक्ष्यसंगति, वर्ज्यावर्ज्यत्व, अवान्तर भेद, उहापोह करून विवृत करतात. म्हणून हे दोन्ही प्रकारचे ग्रंथ साहित्यशास्त्र नांवानें वाङ्मयक्षेत्रांत संबोधिले जातात.

## साहित्यशास्त्राचें सर्वसामान्य प्रयोजन

**काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।**
**सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥**

—काव्यप्रकाशे ।

या काव्यप्रकाशकारांच्या उक्तीवरून साहित्यशास्त्र हें कीर्ति, धन, व्यवहारज्ञान, अर्थात् धर्माधर्मविवेक, नीतिअनीतिविवेक, कर्तव्याकर्तव्यविवेक, आचारअनाचारविवेक, एतत्सम्बन्धींचें ज्ञान, अरिष्ट, संकट, विपत्तींचा नाश, तत्काल उत्कृष्ट आनंदाची प्राप्ति, प्रियपत्नीकृत उपदेशतुल्य उपदेश वगैरे फलोद्देशानें प्रवृत्त झालें असल्याचें दिसून येतें.

**काव्यादि स्वार्थमन्यार्थं चाथ स्वार्थश्चतुर्विधः।**
**धर्मादिः कीर्तिसम्पत्तितृप्तिमुक्तिवपुःक्रमात् ॥**
**वाल्मीक्यादेरभूत्कीर्त्यै धावकादेः श्रियेऽपि च।**
**कामाप्त्यै जयदेवादेर्मुद्गलादेस्तु मुक्तये ॥**
**जिज्ञासोः सुन्दरीरीत्या काव्यं समुपदेशकृत्।**
**ऐहिकामुष्मिकादेर्यत्सोऽयमन्यार्थ उच्यते ॥**

—साहित्यसारे ।

कवि अच्युतराय म्हणतात कीं, साहित्यशास्त्रापासून महाकवि वाल्मीकि, कालिदास, भारवी, भवभूति, भासप्रभृतींनीं काव्य, नाटक, चम्पू, कथा आदि ग्रंथ निर्माण करून त्यांचे द्वारा विपुल धवल यश संपादन केलें. अत्यंत दारिद्री अशा धावक पंडितानें चिंतामणि महामंत्राची उपासना करून तत्प्रसादरूप लोकोत्तर विचित्र विद्या मिळवली. परंतु दारिद्र्याचे क्लेश दूर झाले नाहींत. करितां शतसर्गात्मक नैषधीयचरित नांवाचें महाकाव्य रचून तें गुण-ग्रहण-कौतुकी अशा श्रीहर्ष राजास समर्पण करून त्याचे विनिमयांत प्रतिवर्षी

लक्ष रुपयांचें उत्पन्न देणारी भूमि मिळवून धनचिंता नष्ट केली. कृतज्ञतेनें नैषधाचे प्रतिसर्गाचे अंतिम श्लोकांत श्रीहर्षाचें कर्तृत्व, त्याच्या मातापित्यांचे नांवांसह अंकित केलें. याचप्रमाणें श्री. बोपदेवानें हेमाद्रिपंतांच्या आश्रयानें अनेक विषयांत अनेक ग्रंथ निर्माण करून विपुल धन मिळाविलें. जयदेव कवीनें राणी पद्मावतीच्या सतीत्वपरीक्षणार्थ केलेल्या विक्षिप्त कृतीनें गतप्राण झालेल्या आपल्या पत्नीस गीतगोविंद काव्य करून त्याचे द्वारा श्रीराधारमण श्रीकृष्णास प्रसन्न करून घेऊन निद्रेंतून जागी झाल्याप्रमाणें पुनश्च जिवंत करून घेतलें. याप्रमाणें स्वमनोरथ पूर्ण करून घेतले. सूर्यशतककार मयूर कवि व आर्याशतककार मुद्गल कवि यांनीं आपआपल्या काव्यद्वारा स्वस्वोपास्य देवतांना संतुष्ट करून सद्यःसाक्षात्कार मिळविला. श्रीजगन्नाथराय पण्डितानें गंगालहरी काव्यद्वारा श्रीगंगेस प्रसन्न करून घेऊन यवनीसंसर्गज अशुद्धि दूर सारून सर्वप्रत्ययकारक परम शुद्धि मिळविली.

या व यांसारख्या अन्य आर्ष, मानुष उदाहरणांवरून साहित्यशास्त्रापासून चारही प्रकारचा स्वार्थ कसा प्राप्त होतो हें सहजपणें लक्षांत येईल.

ज्याप्रमाणें कामिनी स्त्री गुरुजनादिकांच्या आधीन असलेल्या आपल्या पतीस चातुर्यानें नेत्रकटाक्ष, भुजविक्षेप, नितंबसंचलन, गातिविलास, भाषामार्दव, गात्रविनयन आदि अभिनयानें सरसता उत्पन्न करून स्वाभिमत प्रवृत्तींत प्रवृत्त करते, त्याप्रमाणें रामादिवत् पित्राज्ञापालनप्रभृति आचार आचरावेत व रावणादिवत् परदारापहरणादि दुराचार सांडावेत, इत्यादि उपदेश कोमल, मंजुळ, मधुर, आकर्षक व परिणामकारक रीतीनें सहज करणें हा अन्यार्थही साहित्यशास्त्रापासून सिद्ध होतो.

याप्रमाणें ऐहिक, पारलौकिक व पारमार्थिक अभीष्टफलप्राप्ति साहित्यशास्त्रापासून होते.

हाच अभिप्राय साहित्यदर्पणकारांनींही द्योतित केला आहे. ते म्हणतात कीं,

**चतुर्वर्गफलप्राप्तिः सुखादल्पधियामपि ।**
**काव्यादेव यतस्तेन तत्स्वरूपं निरूप्यते ॥** साहित्यदर्पणे ।

वेदांतशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, कामशास्त्र हीं शास्त्रें व्युत्पन्न व प्रत्युत्पन्न प्रतिभाशाली प्रज्ञावंतांसाठीं होत. मंदमतींच्या लोकांचा प्रवेश त्यांच्यांत होणें फार कष्टसाध्य व कादाचित्कप्रवृत्तिक होय. करितां, मंदप्रज्ञ लोकांना विनाक्लेश सुखसाध्य अशी चतुर्वर्गफलप्राप्ति, अर्थात् रामादिकांप्रमाणें वागावें, रावणादिकांप्रमाणें वागूं नये, इत्यादि कर्तव्याकर्तव्य उपदेशानें विधिनिषेधपरिपालनद्वारा व परमात्मस्तवन वगैरे करण्यामुळें धर्मप्राप्ति, तदनुषंगानें द्रव्यलाभ व त्याचे द्वारा काम ( इष्ट मनोरथपूर्ति ), मोक्षोपयोगी पदपदार्थवाक्यार्थव्युत्पत्तिजननद्वारा मोक्षलाभ ज्या अर्थीं साहित्यशास्त्रापासून होतो, त्या अर्थीं त्या शास्त्राचें तदेकदेशभूत प्रधानतम अंश अशा काव्याचें लक्षण निरूपण करितों.

## साहित्यशास्त्र हें कांतासम्मित वाङ्मय होय.

शासक वाङ्मय हें तीन प्रकारानें शासन करतें. अर्थात् स्वार्थबोध करून देऊन प्रवर्तक वा निवर्तक होतें. साहित्यसारांत सदरील तिन्ही प्रकार पुढीलप्रमाणें विवेचिले आहेत.

**वेदेतिहासकाव्यादि शब्दभेदास्त्रिधा मताः ।**
**उपदेशो नृपसुहृत्सुन्दरीरीतितः क्रमात् ॥**
**नृपाज्ञावत्तु वेदाज्ञाऽनुलंघ्यैवेति वैदिकः ।**
**नृपरीत्योपदेशोऽसौ फले पवाति सौख्यदः ॥**

सुहृदुक्तिकृतौ सौख्यं फले नोचेद्भयं नहि ।
सुहृद्रीत्योपदेशोऽयमितिहासादिकर्तृकः ॥
योऽधिकारी सुखायैव श्रवणेऽनुष्ठितौ फले ।
कांतारीत्योपदेशं स्यात्सोऽयं काव्यादिसंभवः ॥
सुन्दरी स्वेशहृदयं वशीकृत्य स्वसद्गुणैः ।
लौकिकं वैदिकं चापि कूजतीष्टं ससाधनम् ॥
तद्वत्काव्याद्यपि श्रीमन्महारामायणादिकम् ।
श्रोतुर्मनो वशीकृत्य हितं वक्ति सहेतुकम् ॥
अयं सर्वत्र सुखदः श्रवणेऽनुष्ठितावपि ।
तद्गुणाद्यै रसोत्पत्तेः फले त्विष्टार्थसिद्धितः ॥साहित्यसारे,

एक प्रकार—प्रभुसंमित, दुसरा प्रकार--सुहृत्संमित, तिसरा प्रकार—कान्तासंमित. पैकीं वेद, स्मृति, स्वतःपेक्षां अधिक समर्थ हितकर्ता, आप्त यांचा उपदेश शासनप्रभुसंमित होय. कारण राजाज्ञे-प्रमाणें धर्माज्ञा, वेदाज्ञा अनुल्लंघनीय अतएव सर्वश्रेष्ठ होय. प्रभु-संमित वाङ्मय श्रवणकालीं व अनुष्ठानकालीं सुखद नसून कष्ट-लभ्य ज्ञानजनक असतें. परंतु फलकालीं मात्र अत्यंत सुखप्रद किंबहुना सुखमय आहे. दुसरें सुहृत्संमित वाङ्मय मित्रत्वाचे नात्यानें स्पष्ट व निर्भीड उपदेश करितें. पुराणें, उपपुराणें, भारतादि इतिहास सुहृत्संमित वाङ्मयांतच अंतर्भूत मानले जातात. सुहृत्संमित वाङ्मयाचें शासन सफल झालें तर सुखकारक तर आहेच, परंतु कदाचित अश्रवण वा अननुष्ठानामुळें फलजनक न झालें तरी भयप्रद अर्थात् उल्लंघनाचें पाप माथीं लादणारें निश्चित नाहीं. तिसरें कांतासंमित काव्यादि वाङ्मयाकडून केला जाणारा उपदेश. पत्नी ज्याप्रमाणें स्वकीय सद्गुणांनीं पतिमन वश करून घेऊन साधनसहित इष्टार्थाचा आदेश करिते, तद्वत् विविध रस-गुण-रीति-अलंकारादि सामग्रीनें श्रोत्याचें मन आकार्षित करून सका-

रण मृदु, विविध रस, गुण, रीति, अलंकारादि सामग्रीनें व गंभीर, परिणामकारक असा केला जातो. या कांतासंमित वाङ्मयाचें वैशिष्ट्य व सर्वांकडून आदरणीयत्व हें आहे कीं, हें वाङ्मय श्रवण-दर्शनकाळीं, अनुष्ठानकाळीं व फलानुभवकाळीं त्यांतील नवरसांच्या विविध परिणतीनें सरसता कायम राखतें व ती सहृदयांचें हृदय रसास्वादमग्न करून इष्टार्थसिद्धिप्राप्तीनें उत्पन्न झालेल्या आनंदसागरांत तरंगावयास लावते. अतएव, हा वाङ्मयाचा तिसरा प्रकार सर्वजनप्रिय कां होणार नाहीं ?

## साहित्यशास्त्र हें स्वतंत्र शास्त्र होय.

इतर शास्त्रांप्रमाणें साहित्यशास्त्र हेंही एक स्वतंत्र शास्त्र आहे. साहित्य शब्दाची व्याख्या पहिल्या दोन सिद्धांतविवेचनाचे वेळीं केली असल्यानें येथें आतां पुनरुक्ति करीत नाहीं. त्याचें शास्त्रत्व, शासनप्रकारवर्णनानें स्पष्ट झालें आहेच. शिवाय,

**प्रवृत्तिर्वा निवृत्तिर्वा नित्येन कृतकेन वा ।**
**पुंसां येनोपदिश्येत तच्छास्त्रमभिधीयते** ॥ कुमारिल भट्टाः ।

पुरुषांची प्रवृत्ति अथवा निवृत्ति ज्या नित्य वा कृत्रिम नियमांनीं अर्थात् तत्प्रतिपादक ग्रंथांनीं उपदेशिली जाते त्यास शास्त्र म्हणतात, असें भट्ट कुमारिलांचें म्हणणें आहे. हें लक्षण वरील लक्ष्यांत साहित्यशास्त्रांत समन्वित होतें, हेंही वरील शासकत्वाच्या विवेचनावरून कुशाग्रमति वाचकांचे ध्यानीं आल्यावांचून राहाणार नाहीं.

**सर्वेषां शास्त्राणामद्वैते ब्रह्मणि तात्पर्यम् ॥**

सर्व शास्त्राचें पर्यवसान अद्वैत ब्रह्मवेदनांत आहे या न्यायानें विचार केला तरी साहित्यशास्त्राचें अंतिम मुख्य तात्पर्य अक्षराख्य परब्रह्म जाणण्यांतच आहे. कारण, साहित्यशास्त्राचा उद्गम अक्षराख्य परब्रह्मांतूनच झाला असून तेंच त्याचें वेद्य होय. ' वस्तु-

पादानं हि वस्तुस्वरूपं तदेव च वेदितव्यं तद्वेदने नैव च याथातथ्यो वस्तुस्वरूपाविर्भाव इति नियमात् । ' वस्तुगत उपादान कारणच वस्तूचें स्वरूप असतें आणि तेंच जाणावयाचें असतें. त्याच्या जाणण्यानेंच यथार्थपणें वस्तुस्वरूपाची ओळख पटते, असा नियम आहे. अग्निपुराणांत तर स्पष्टच म्हटलें आहे कीं—

अक्षरं परमं ब्रह्म सनातनमजं विभुम् ।
वेदान्तेषु वदन्त्येकं चैतन्यं ज्योतिरीश्वरम् ॥
आनन्दः सहजस्तस्य व्यजते स कदाचन ।
व्यक्तिः सा तस्य चैतन्यचमत्काररसाव्हया ॥
आद्यस्तस्य विकारो यः सोऽहंकार इति स्मृतः ।
ततोऽभिमानस्तत्रेदं समाप्तं भुवनत्रयम् ॥
अभिमानाद्रतिः सा च परिपोषमुपेयुषी ।
व्यभिचारादि सामान्याच्छृङ्गार इति गीयते ॥
तद्भेदाः कामभितरे हास्याद्या अप्येनकशः ।
सत्त्वादि गुणसन्तानाज्जायन्ते परमात्मनः ॥
रागाद्भवति शृंगारो रौद्रस्तैक्ष्ण्यात्प्रजायते ।
वीरोऽवष्टम्भजः संकोचभूर्बीभत्स इष्यते ॥
शृंगाराज्जायते हास्यो रौद्रात्तु करुणो रसः ।
वीराच्चाद्भुतनिष्पत्तिः स्याद्बीभत्साद्भयानकः ।
शृंगारहास्यकरुणा रौद्रवीरभयानकाः ।
बीभत्साद्भुतशान्ताख्या स्वभावाच्चतुरो रसाः ।
न भावहीनोऽस्ति रसो न भावो रसवर्जितः ।
भावयन्ति रसानेभिर्भाव्यन्ते च रसा इति ॥

—अग्निपुराणे

या कारिकांचा स्फुटार्थ पुढील वंशवृक्षावरून सहज लक्षांत येईल.

अक्षर—परब्रह्म

|

आनन्द ( सहज )

|

व्यक्ति ( चमत्कार किंवा रस )

|

अहंकार

|

अभिमान

|

( व्यभिचार ) रति–राग–( प्रेम–स्नेह )

| सत्वोद्रिक्त | अवष्टब्धरति | शृंगार | तीक्ष्ण रति | संकोचरति |
|---|---|---|---|---|
| शान्त | वीर | हास्य | रौद्र | बीभत्स |
| | अद्भुत | शांत ( केचिन्मतें ) | करुण | भयानक |

प्रकृतिभूत रस चार असून बाकी रस विकृतिभूत आहेत. भाव अर्थात् चित्तसहोत्पत्तिशिष्ट स्वभाव, वाच्य कूटस्थ चित्तवृत्ति होय. स्वभावावांचून रस नाहीं व रसावांचून स्वभाव नाहीं. स्वभाव व रस हे परस्परांचे भावक अर्थात् पोषक व उद्बोधक आहेत. अक्षराख्य परब्रह्म–आनंदाची प्रतीति, प्राकृत वा वैकृत रसांत अनुस्यूतपणें अचूक व स्पष्ट अशी होते. 'रसो वै सः' या छांदोग्य उपनिषदुक्तींतही वरील अर्थच अभिप्रेत आहे. साहित्यदर्पणकारांनीं रसास्वादसमुत्थ आनंदाला ब्रह्मानंदाचा सहोदर भ्राता म्हटलें, साक्षात् ब्रह्मानंद

म्हटलें नाहीं. याचें कारणही हेंच कीं, रसास्वादन आनंद—पर-ब्रह्माच्या सहजानंदापासून पांचव्या पिढीचा परिणत व सीमित असा आनंद आहे व हाच आनंद साहित्यशास्त्राचा जीवात्मा होय, हें पुढें यथावसर स्पष्ट होईल.

साहित्यशास्त्राचें तात्त्विक मूळ याप्रमाणें स्थिर झाल्यानंतर प्रक्रियामूळाचा विचार क्रमप्राप्त होतो. तत्संबंधानें नाटयशास्त्रांत भरताचार्य म्हणतात कीं,

**जग्राह पाठ्यमृग्वेदात्सामभ्यो गीतमेव च ।**
**यजुर्वेदादभिनयान्रसानाथर्वणादपि ॥** —नाट्यशास्त्रे भरतः ।

ऋग्वेदापासून पाठ्य भाग, गद्यपद्यात्मक लहानमोठीं वाक्यें; सामवेदापासून गायनभाग, श्रुति, लय, मूर्च्छा, आरोहावरोह, विकार, आगम, प्रश्लेष, ताल, आदि विषय; यजुर्वेदापासून अभिनय, गात्रविनामन, भ्रूविक्षेप, अपांगप्रसारण, नितंबसंचलन, गतिविन्यास, नृत्य, लास्य आदि विषय; अथर्ववेदापासून रस अर्थात् त्यांचें आलंबन, उद्दीपन, स्थायि संचारी भाव, हे विषय साहित्यशास्त्राच्या प्रक्रियेसाठीं मूल घटक म्हणून ग्रहण केले आहेत.

साहित्यशास्त्राच्या स्वतंत्र अस्तित्वासाठीं वरील दोन मौलिक आधार तयार झाल्यावर आधेयभूत दार्शनिक घटक अवयवें व प्रक्रियाघटक अवयवें कोणकोणतीं आहेत हें पुढील उद्देशमात्र दोन स्वतंत्र याद्यांवरून सहज कळून येईल.

## घटक अवयवांच्या दोन याद्या

### १. दार्शनिक घटक अवयवें

साहित्यशास्त्र या बाबतींत पाणिनीय दर्शन ( व्याकरणशास्त्र ), न्याय दर्शन ( काणाद व गौतमन्यायशास्त्र ) व मीमांसादर्शन ( पूर्व व उत्तर दोन्ही ) यांना अनुसरणारें आहे. त्यांतले त्यांत पूर्वमीमांसेशीं तें अधिक

जुळतें आहे. अर्थात या तिन्ही शास्त्रांनीं जे दार्शनिक पदार्थ अंगीकृत केले आहेत तेच या शास्त्राचे पदार्थ होत असें समजण्यास हरकत नाहीं. दिग्दर्शन म्हणून कांहीं पदार्थांचा निर्देश करीत आहें.

१ द्रव्यादि प्रसिद्ध सप्तपदार्थ.
२ अभिधा, लक्षणा, व्यंजना, तात्पर्याख्या, वृत्तिचतुष्टय.
३ जातीशक्ति.
४ अभिहितान्वयवाद.
५ शक्तिग्रह, व्याकरणादि अष्ट प्रमाणोपज्ञ.
६ अर्थनियामक कारणें चौदा.
७ प्रत्यक्षादि अनुपलब्ध्यन्त षट्प्रमाणें.
८ पाणिनिसंमत विभक्त्यर्थ.
९ तात्पर्य म्हणजे वक्त्याचा आशय.
१० तात्पर्यनिर्णायक उपक्रमादि षड्लिंगें.
११ शाब्दबोध भावनामुख्यार्थ विशेष्यक
१२ ज्ञेयांश अक्षरब्रह्म.
१३ फलांश परमानन्द इत्यादि.

## २. प्रक्रियाघटक अवयवें.

साहित्यशास्त्राचीं प्रक्रियाघटक अवयवें प्रायः सर्वविदित आहेत. तथापि दिग्दर्शन म्हणून पुढीलप्रमाणें संक्षेपतः त्यांचा निर्देश करीत आहें.

१ रस अवान्तर भेदसहित.
२ ध्वनि ,,
३ गुण ,,
४ रीति ,,
५ अलंकार ,,
६ दोषाभाव ,,
७ छंद ,,
८ पदलालित्य
९ अर्थगौरव
१० वाक्यसौष्ठव
११ विविधविषयावगाहित्व
१२ बुद्धिपूर्वा रचना.
१३ सहजस्फूर्तिरचना.
१४ नायक
१५ नायिका.
१६ सहकारी परिवार.
१७ गीत.
१८ नृत्य.
१९ अभिनय.
२० विविधभाषावक्तृत्त्व.
२१ रङ्ग
२२ सामाजिक वर्ग वगैरे वगैरे.

स्थलसंकोचास्तव विशेष विवरण करण्याचें टाळीत आहें.

## साहित्यशास्त्राची व्याप्ति व सर्वशास्त्रोपकारकता

साहित्यशास्त्र म्हणजे एक सारस्वत काव्यपुरुष आहे. या काव्यपुरुषाचा जीवात्मा रस होय. शब्दार्थ हे शरीर होत. संस्कृत भाषा मुख, प्राकृत भाषा बाहु, अपभ्रंश भाषा जघनभाग, पैशाची भाषा पाद, मिश्र भाषा उर:स्थल, छंदोजात रोमराजि, प्रश्नोत्तरें, कथा, प्रवल्हिका आदि वाणीची क्रीडा, अनुप्रास-उपमादि अलंकार आभूषणें, माधुर्य-प्रसादादिक गुण सद्गुणवर्ग, गौडी-पांचाली आदि रीति अवयवसस्थानसौंदर्य, ध्वनि शील, पदलालित्य शरीरकान्ति, अर्थगौरव मन:प्रगल्भता, वाक्यसौष्ठव विनोद, विविध विषयावगाहित्व पांडित्य, बुद्धिपूर्वाकृति अभ्यास, सहजस्फूर्तिरचना प्रतिभा, नायक-नायिका तत्सहकारी परिवार भृत्यवर्ग, गीत-नृत्य-अभिनय लीला-कैवल्य, रंग सिंहासन, सामाजिक उपासक वर्ग होत. अशा प्रकारचा हा काव्यपुरुष सरस्वतीचा कनिष्ठ प्रियतम पुत्र असून त्यानें निखिल वाङ्मयविश्व शब्दार्थांच्या विशिष्ट रचनारूपी लीलेनें व्यापून टाकलें आहे. एका कवीनें म्हटलें आहे कीं—

**गिरः काव्यपुमान्पुत्रः कनियान्प्रियकृच्छ्रुतः।**
**तेनेदं वाङ्मयं विश्वं व्याप्तं वाग्बंधलीलया॥**

या पद्याचा अर्थ वरील अर्थाचाच द्योतक आहे. आतां यापुढें या काव्यपुरुषाच्या व्याप्तीसंबंधीं कांहीं ठळक उदाहरणें देतों. म्हणजे त्यावरून त्याच्या अभिव्याप्तीची कल्पना येईल.

**अभ्रातेव पुंस एति प्रतीची गर्तारुगिव सनये धनानाम्।**
**जायेव पत्य उशती सुवासा उषा हस्रेव निरिणीते अप्सः॥**

—ऋग्वेद १-१२४-७

धनाप्राप्तीकरितां न्यायालयाचा उंबरा ओलांडणाऱ्या गतधवा स्त्रीप्रमाणें अथवा कामोत्सुक स्त्री पतिपुढें सुंदर वस्त्र परिधान

करून येते त्याप्रमाणें, अथवा हास्ययुक्त स्त्रीप्रमाणें ती उषादेवी आपलें रूप प्रकट करीत आहे. या ऋङ्मंत्रांत उपमाचतुष्टय वर्णिलेलें स्पष्ट दिसून येत आहे.

**ब्रह्मा देवानां पदवीः कवीनां ऋषिर्विप्राणां महिषो मृगाणाम् ।**
**श्येनो गृध्राणां स्वधितिर्वनानां सोमः पवित्रमत्येति रेभन् ॥**

—सामवेद, उ. आ. ५-६-२

देवतांमध्यें ब्रह्मा, कवींमध्यें मार्गदर्शक, विप्रांमध्यें ऋषि, पशूंमध्यें महिष, पक्ष्यांमध्यें गृध्र, हिंसकामध्यें स्वधिति, असा हा सोमराजा शब्द करीत दशापवित्रांतून बाहेर पडत आहे. या साममंत्रांत उल्लेखालंकार स्पष्ट दिसत आहे.

**चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा द्वे शीर्ष सप्तहस्ता सो अस्य ।**
**त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महादेवो मर्त्यां आविवेश ॥**

—माध्यं. सं. १७-९१

ब्रह्मा, होता, उद्गाता, अध्वर्यू हे ज्याचे चार शृंग आहेत; ऋक्, यजुः, साम हे तीन ज्याचे पाद आहेत; हविर्धान व प्रवर्ग्य हे दोन ज्याचीं शिरें आहेत, सात होते अथवा गायत्र्यादि सात छन्द हे ज्याचे हात आहेत; प्रातर्, मध्य, तृतीय या तीन सवनांनीं तीन प्रकारें बांधलेला, हिरण्यगर्भादि पिपीलिकापर्यन्त सर्व जीवांना उपजीव्य, असा हा मोठा देव सर्व कामांना वरसणारा म्हणून वृषभवाच्य यज्ञपुरुष सर्व मनुष्यांना व्याप्त करून राहिला आहे. कोणी हा मंत्र व्याकरणपर तर कोणी अग्निपरही लावतात. कोणताही अर्थ घेतला तरी त्यांत रूपकालंकार स्पष्टतया प्रतीत होतो.

**वाचं धेनुमुपासीत तस्याश्चत्वारः स्तनाः ।** इत्यादि

—बृह. उप. ६-९-१

या उपनिषदांतही रूपक स्पष्ट प्रतीत होतें.

**महतः परमव्यक्तं अव्यक्तात्पुरुषः परः ।**
**पुरुषान्नपरं किंचित्सा काष्ठा सा परा गतिः ॥** (कठ उप. १-३-११)

महत्तत्त्वाहून अव्यक्त (प्रकृति) श्रेष्ठ, अव्यक्ताहून पुरुष श्रेष्ठ; पुरुषाहून श्रेष्ठ, उत्कृष्ट कांहींही नाहीं. पुरुष हीच पराकाष्ठा व परागति अर्थात शेवटची सीमा वा शेवटची गति आहे. या कठमंत्रांत सारालंकार स्पष्ट दृग्गोचर होत आहे.

**व्यामिश्रेणैव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥** (भ.गीता ३--२)

'केव्हां कर्मप्रशंसा, केव्हां ज्ञानप्रशंसा अशा जणुं काय व्यामिश्र (संदेहोत्पादक) वाक्यानें माझ्या बुद्धीला तूं मोहित करतो कीं काय ? या दोन्हींमध्यें निश्चित श्रेयःसाधन कोणतें तें एकच सांग, ज्यायोगें मी कल्याण प्राप्त करून घेईन.' या गीतावाक्यांत उत्प्रेक्षा प्रतीत होते.

**निःश्वसितमस्य वेदा वीक्षितमेतस्य पञ्चभूतानि ।**
**स्मितमेतस्य चराचरमस्य च सुप्तं महाप्रलयः ॥** (भामत्याम्)

वेद ह्या परमेश्वराचे निःश्वास होत. पंचमहाभूतें विलकनें होत. चराचर जगत् हें स्मित हास्य होय. महाप्रलय हा निद्रा होय. या पद्यांत रूपकें वर्णित केलीं आहेत.

या वरील सर्व उदाहरणांवरून वेदापासून तो भारतापर्यंत वाङ्मयांत सर्वत्र साहित्य प्रसृत झालेलें ध्यानीं येईल. पुराणें तर साहित्यमय पदोपदीं आहेत. करितां त्यांतील उदाहरणें दिलीं नाहींत.

अतएव, साहित्यशास्त्र हें न्याय, व्याकरण, मीमांसा ह्या शास्त्रत्रयाप्रमाणें सर्व शास्त्रांवर उपकार करणारें आहे. कारण त्या त्या शास्त्राच्या अध्ययन-अध्यापन-प्रवचनांनीं त्या त्या शास्त्राचें प्रक्रियाज्ञान होईल. परंतु व्युत्पत्ति अर्थात् परंपराविशुद्ध असामान्य ज्ञानाची

पूर्तता होऊन प्रत्युत्पन्न मति म्हणजे अवगत ज्ञान, व्याख्यान-प्रवचन-लेखन-पाठनद्वारा संक्रमित करण्याचें प्रगल्भ शक्तिशालित्व हें साहित्यशास्त्रावांचून प्राप्त होणें शक्य नाहीं.

**वैदग्ध्यं सर्वशास्त्रेषु वैचक्षण्यं कलासु च ।**
**व्युत्पत्तिः प्रतिपत्तिश्च साहित्यस्य निषेवणात् ।** ( सुभाषिते )

सर्व शास्त्रांत असाधारण पाण्डित्य, कलांमध्यें निपुणता, व्युत्पादन शक्ति व संक्रामक शक्ति, हे मतिविकास साहित्यशास्त्राच्या सेवनानें अर्थात् पठन-पाठन-परिशीलनांनीं प्राप्त होतात.

लोकव्यवहारांतही असाच अनुभव आहे कीं, कित्येक वैयाकरण, नैयायिक, मीमांसक स्वस्वविषयांचे गाढे पंडित आहेत. परंतु साहित्यशास्त्राच्या अवगतीचे अभावीं साधी सत्यनारायणाची कथा किंवा एकाद्या विवक्षित विषयाचें सुसंगत प्रवचन ते करूं शकत नाहींत. अखेर त्यांना या क्षतिपूर्तीसाठीं साहित्यशास्त्राची कास धरावी लागतेच.

सुभाषितकारांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,

**व्याक्रियारहितो मूको बधिरस्तर्कवर्जितः ।**
**मीमांसया विहीनोऽन्धः पङ्गुः साहित्यवर्जितः ॥** –सुभाषिते ।

व्याकरणरहित विद्वान् मुका, न्यायरहित बहिरा, मीमांसेनें विहीन अंध होय; आणि साहित्यवर्जित विद्वान् पङ्गु होय. लोकांतही डोळे, कान, वाणी असलेला मनुष्य जर का पंगु, पादरहित असेल तर स्वतंत्रपणें कार्य करण्यास समर्थ होत नाहीं. परावलंबन करावें लागतें. तोच न्याय वरील पद्यानें दर्शविला आहे.

साहित्यशास्त्रांत प्रसंगवशात् सर्व शास्त्रांचे विषय व विविध कला यांचें वर्णन आलें असल्यानें त्यांचें ज्ञानही सहज व सुगम रीतीनें विनायास प्राप्त होतें, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

## साहित्यशास्त्राचा लोकव्यवहारांत उपयोग

काव्याचा आत्मा असलेला रस प्रत्येक मनुष्यव्यक्तीच्या स्वभावांत रसरसलेला आहे. वर सांगितलेंच आहे कीं—

**न भावहीनोऽस्ति रसो न भावो रसवर्जितः ।**
**भावयन्ति रसानेभिर्भाव्यन्ते च रसा इमे ॥** ( अग्निपुराणे )

स्वभाव व रस यांचा अन्योऽन्य अविनाभाव-(नित्य सहचरितत्व) संबंध आहे. अनंत व्यक्तींचे अनंत स्वभाव असून ते एकमेकांहून परस्परविलक्षण व विचित्र असोत; परंतु त्यांचा अंतर्भाव शृंगार, वीर, करुण, बीभत्स, अद्भुत, हास्य, भयानक, रौद्र, शांत या नवरसांपैकीं कोणत्या ना कोणत्या रसांत असणार हें निश्चित. करितां, व्यक्तीची रसप्रियता अर्थात् 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायानुसार रुचिवैचित्र्य नेमकें ओळखलें व तदनुसार त्या व्यक्तीशीं व्यवहार ठेवला तर व्यवहारांत विरोध, कलह, विद्वेष, मात्सर्य, असूया इत्यादिकांचा समूळ नाश जरी नव्हे तरी प्रवृद्धि खास होणार नाहीं.

**नायकनायिकादीनां प्रसंगागतवर्णनैः ।**
**वर्तितव्यं कथं लोके तज्ज्ञायतेऽति पेशलम् ॥**

शिवाय नायक—प्रतिनायक, नायिका—प्रतिनायिका, त्यांचा सहकारी परिवारवर्ग यांचे विविध सुखदुःख प्रसंगांतील वागणुकीचीं जीं वर्णनें, त्यांवरून लोकांत आपणही कसें वागावें या व्यवहारज्ञानाची अतिसुंदर शिकवणूक मिळते. इतर ज्ञानाप्रमाणें व्यवहारज्ञानही परमावश्यक आहे. अन्यथा पदोपदीं उपहास, उपेक्षा ठेवलेलीच आहे.

**अपि शास्त्रेषु कुशला लोकाचारविवर्जिताः ।**
**उपहासमुपेक्षां च प्राप्नुवन्ति पदे पदे ॥** ( सुभाषिते )

अनेक शास्त्रांत निष्णात असणारे परंतु लोकाचारास पराङ्मुख असलेले असे विद्वान् लोकसुद्धां लोकव्यवहारांत पावलोपावलीं उपहास, उपेक्षा यांचा विषय बनतात.

तात्पर्य, व्यवहारज्ञानासाठीं साहित्यशास्त्र परम उपयोगीं शास्त्र आहे, हें कोण नाकारूं शकेल ?

## साहित्यशास्त्राची परम्परा

**स्वयम्भूर्भगवान्स्वशिष्यं नन्दिकेश्वरं रसाधिकारिकं काव्यविद्याविभागं ग्राहयामास** । इत्यादि ( काव्यमीमांसायां । )

रसाधिकारिक विद्याविभाग अर्थात् साहित्यशास्त्र हें स्वतः ब्रह्मदेवानें स्वशिष्य नंदिकेश्वर याचेकडून ग्रहण करविलें. याचप्रमाणें साहित्याचे अनेक विभाग अनेक शिष्यांकडून ग्रहण करविले आहेत. उदाहरणार्थ—कविरहस्य इंद्राकडून, औक्तिक भाग उक्तिगर्भाकडून, रीतिनिर्णय सुवर्णनाभाकडून, अनुप्रासविभाग प्रचेतायनाकडून, यमकें व चित्रबंधादिक चित्रांगदाकडून, शब्दश्लेष शेषाकडून, वस्तुसंबंधीं ज्ञान पुलस्त्याकडून, उपमादि भाग औपगायनाकडून, अतिशयोक्त्यादि पाराशराकडून, अर्थश्लेष उतथ्याकडून, शब्दार्थोभयालंकार कुबेराकडून, विनोद कामदेवाकडून, रूपकादि भरताकडून, दोषभाग धिषणाकडून, गुणभाग उपमन्यूकडून, औपनिषादिक भाग कुचुमाराकडून ग्रहण करविलेत. पुढें या सर्व आचार्यांनीं ते सर्व विभाग पृथक्पृथक् स्वतंत्र शास्त्ररूपानें विवृत करून शिष्यप्रशिष्यद्वारा विस्तारिले.

तदनंतर भरतानें हा सर्व नाट्यवेद ( साहित्यशास्त्र ) शाण्डिल्यादि रौद्रवीरान्त शतपुत्रांना पढवून प्रयोगभूमीवर सामाजिकांच्या श्रवणपथांत व दृष्टिपथांत आणून सोडला. हा सर्व इतिहास

सविस्तर पाहावयाचा झाल्यास भरतमुनिप्रणीत नाट्यशास्त्राचा उपक्रम-भाग पाहावा. स्थलसंकोचास्तव तो सर्व येथें देत नाहीं.

साहित्यशास्त्राच्या मुख्यतः तीन शाखा आहेत. एक शाखा, श्रव्य व दृश्य अशी कविकृति; दुसरी शाखा दोन्ही प्रकारच्या कविकृतीला घटक गुण-दोष-रीति-अलंकार यांची मीमांसा व दर्शनाल प्रयोजक-रूपक-उपरूपकादि मीमांसा; तिसरी शाखा, अभिधादि वृत्तिविस्तार व तदनुषंगिक सर्व दार्शनिक प्रमेय यांची मीमांसा होय. पैकीं पहिल्या शाखेंत आदिकवि वाल्मीकि, व्यास, कालिदास, भारवि, माघ, श्रीहर्ष, बिल्हण, जगद्धर, वाक्पति, प्रवरसेन, मयूर, जयदेव, शालिवाहन, दण्डी, भट्टी, सुबंधु, बाण, विष्णुशर्मा, नारायण, यमुनात्रिविक्रम, अनंत, भोजदेव, भवभूति, राजशेखर, मुरारि, विशाखदत्त, श्रीकृष्णमिश्र, भास प्रभृति प्रसिद्ध अप्रसिद्ध अनेक कविजनांची परम्परा अव्याहत चालत आली आहे. दुसऱ्या शाखेंत भामह, भोजदेव, महामाहेश्वर, विद्यानाथ, केशवमिश्र, वाग्भट, मम्मट, रुद्रट, उद्भट, राजशेखर, हेमचंद्र, अच्युतराय, विश्वनाथ कवि, जगन्नाथराय, अप्पय्या दीक्षित, वामनप्रभृति अनेक ग्रंथकार झाले आहेत. तिसऱ्या शाखेंत भरतमुनि, अभिनवगुप्त, भट्ट मुकुल, मम्मट, अप्पय्या दीक्षित, राजानक, क्षेमेंद्र, जगन्नाथराय, भट्टशोभाकरप्रभृति अनेक ग्रंथकार झाले आहेत. अलीकडे मात्र ही परंपरा खंडित झाल्यासारखी दिसते. क्वचित अपवादादाखल कोठें ग्रंथनिर्मिति झाली तर झाली. संस्कृत साहित्याला एक प्रकारें अवनतीचा काल प्राप्त झाला, असें म्हटल्यास वावगें ठरणार नाहीं.

## साहित्यशास्त्राचा निर्माणकाल.

साहित्यिक अवयवांचा संकलित निर्देश अग्निपुराण व भरतमुनि-

प्रणीत नाट्यशास्त्र यांतच सर्वप्रथम आढळतो. भरतमुनि त्रेता-युगांत झाला व अग्निपुराण श्रीवेदव्यासानें द्वापरान्तकालीं केलें. अर्थात् साहित्यशास्त्राचा निर्माणकालही हाच मानिला पाहिजे. त्रेतायुग व द्वापरान्त काल आजपासून किती संवत्सर पूर्वीं होऊन गेला हें सिद्ध करणें फार मोठ्या विस्ताराचें कार्य असल्यानें तो विचार येथें न करणेंच बरें. साधारणत: आजपासून ६००० वर्षांपूर्वीं द्वापरान्त काल व त्याच्या पूर्वींचा महदंतर असलेला त्रेतायुग काल होय. आधुनिक इसवी सनाच्या आरंभापूर्वींचा प्रत्यासन्न काल हा भरतमुनींचा काल मानतात. इसवी सनपूर्व ३००० वर्षे पुराणकाल मानतात. कोणता विचार युक्तियुक्त हें पाहाण्याचें स्थल हें नाहीं. करितां, निर्देश मात्र जातां जातां करून ठेवीत आहें. वाचकांनींच त्याचा अधिक विचार करून काय तें ठरवावें. तदनंतरच्या ग्रंथकारांमध्यें आद्य ग्रंथकार भामह होय. याचा काल कलीची सहावी शताब्दि मानली जाते. त्यानंतरच्या प्रत्येक ग्रंथकारांचा काल या लहानशा लेखांत देतां येणें शक्य नाहीं. सबब तोही विचार सोडून देणें भाग आहे.

## संस्कृत साहित्य व मराठी साहित्य यांचा अन्योन्य संबंध

संस्कृत साहित्य व प्राकृत (महाराष्ट्र) साहित्य यांचा परस्परसंबंध पितापुत्राप्रमाणें असून संस्कृत भाषा व प्राकृत भाषा (महाराष्ट्री भाषा) यांचा परस्परसंबंध मातापुत्रीप्रमाणें आहे.

**सर्वभाषा जनन्येषा यतो विबुधवाङ् मता ।**
**तस्या ज्योतिर्विलासेन भातु भारतमन्दिरम् ॥** मामकीनः ।

ज्या अर्थीं संस्कृत भाषा सर्व भाषांची जननी आहे, त्या अर्थीं तिच्या ज्योति:प्रकाशानें भारतदेशरूपी मंदिर प्रकाशित होवो !

संस्कृतीं प्राकृतीं साहित्य तेंवि तेंचि। भाषामात्र उभयत्र दूजी दूजी
भाषा मऱ्हाठी संस्कृत काई। मुख्य सारांश एकचि दोन्ही ठायीं॥
बरा नीट आणी वांकडा ऊंस। चवी घेतां सारिखाचि रस ॥३॥
नाना सांडुनी शब्दकुसरी। दृष्टी द्यावी विवेकावरी॥
वाया अभिमानें मन पिसें। म्हणे गोसावनिंदन ऐसें ॥ ४ ॥

( गोसावीनंदन. )

तात्पर्य, संस्कृत भाषेप्रमाणें मऱ्हाठी भाषा ही व्याकरणबद्ध असून त्या मऱ्हाठी व्याकरणाचें मूळ अधिष्ठान संस्कृत पाणिनीयादि व्याकरणच आहे. तसेंच मऱ्हाठी भाषेंतील साहित्यसामग्री ही संस्कृत साहित्यसामग्रीवरच आधारलेली आहे. मऱ्हाठी साहित्य संस्कृत साहित्याहून यत्किंचित् न्यून नाहीं हें त्याचा सूक्ष्म दृष्टीनें सखोल अभ्यास केला असतां मर्मज्ञांच्या प्रतीतींत प्रकट झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

संस्कृत साहित्यिक वाङ्मयाप्रमाणें मऱ्हाठी साहित्यविषयक व तदनुषंगिक इतर शास्त्रीय वाङ्मयावर अनेक उत्तमोत्तम उदात्त ग्रंथकार होऊन गेले आहेत व आजही नवीन नवीन उदय पावत आहेत.

उदाहरणार्थ—ज्ञानेश्वर, मोरोपंत, तुकाराम, एकनाथ, नामदेव; निजानंद रंगनाथ, श्रीधरस्वामी, समर्थ रामदास आदि संतवर्य; नामजोशी, अनंतफंदी, कृष्णशास्त्री, विष्णुशास्त्री चिपळूणकर, परशुरामपंत गोडबोले, अण्णासाहेब किर्लोस्कर, गणेशशास्त्री लेले, दासगणू, धर्ममार्तंड लेलेशास्त्री, वामनपंडित, लोकमान्य टिळक, ल. रा. पांगारकरप्रभृति अनेक कवि व ग्रंथकार होऊन गेले आहेत. आजही अनेक साहित्यिक विद्वद्रत्नें या महाराष्ट्रभूमीस आपल्या अस्तित्वानें भूषवून साहित्यसेवेनें ओवाळीत आहेत. त्या सर्वांचा नामनिर्देश विस्तारभयास्तव करीत नाहीं. शिवाय, वाचकवृंदाचा

त्यांच्याशीं नित्य परिचय असल्यानें उल्लेख करण्याची तितकी जरूरीही भासत नाहीं.

मराठी साहित्य पूर्वी कितीहि निर्माण झालें असलें व आज होत असलें तरी त्यांत साहित्याच्या सर्व अंगोपांगांचा पुरेपूर उहापोह करणारा, क्रमबद्ध व सिद्धांतनिदर्शक अशा मोठ्या शास्त्रीय ग्रंथाची भर पडणें अत्यंत आवश्यक आहे. तसेंच, परकीय राजवटींच्या संसर्गानें परकीय भाषेंतील रूढ झालेल्या वा रूढ होऊं घातलेल्या शब्दांना स्वभाषेंतील पर्यायशब्द दाखविणाऱ्या एक्या शब्दकोशाची न्यूनता आहे. तीही भरून निघणें अत्यंत जरूरीचें आहे.

## नाशिकमधील साहित्यग्रंथनिर्मिति

अलीकडच्या दोनतीन शतकांच्या काळांत संस्कृत किंवा मराठीचे साहित्यग्रंथ व इतरविषयक शास्त्रीय ग्रंथ निर्माण झाले आहेत, त्या ग्रंथांचीं व ग्रंथकर्त्यांचीं नांवें नि निर्माणकाळ खालील याद्यांवरून लक्षांत येईल.

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| १. भर्तृहरीच्या नीति, शृंगार, व वैराग्य या शतकत्रयावरील व्याख्या. | कृष्णशास्त्री महाबळ | ... | संस्कृत |
| २. रघुनाथभटजी महाराजांचें चरित्र. | निरंजन रघुनाथ | श. १७३३ –३४ | मराठी ओवीबद्ध. |
| ३. लक्ष्मीसहस्र काव्यव्याख्या | हरिबाबा पढेगांवकर | १७६० ते ९० शक | संस्कृत |
| ४. भक्तिरसायन भागवत दशमपूर्वार्ध उत्प्रेक्षा खण्डकाव्य. | ,, | ... | ,, |
| ५. द्वादशाक्षरमालिका | हरिबाबांचे पुत्र | शक १७९० ते १८०६ | संस्कृत |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. मंत्रमालिका. | एकनाथशास्त्री पढेगांवकर | ... | ,, |
| ७. साहित्यसार व त्यावरील आमोद व्याख्या. | अच्युतराय मोडक नारायण शास्त्रीसाठे यांचे | शक १७५३चे मागें पुढें | ,, |
| ८. भामिनीविलासावरील प्रणयप्रकाशिका नांवाची टीका. | शिष्य व श्री. रघुनाथ भट-जीचे शिष्य | ... | ,, |
| ९. गोदालहरी व तिच्या-वरील टीका. | ... | ... | ,, |
| १० गोदाष्टकें दोन. | अच्युतराय मोडक. | ... | संस्कृत |
| ११ नीतिशतक. | ,, | ... | ,, |
| १२ शुकत्रिश्लोकी. | ,, | ... | ,, |
| १३ नीतिनक्षत्रमाला. | ,, | ... | ,, |
| १४ स्वानुभूतिनवरत्नमाला. | ,, | ... | ,, |
| १५ अभिनव रामायणचंपू | लक्ष्मणशास्त्री दाते. | श. १७८० ते १८३० | ,, |
| १६ आमोदमंदार. | ,, | ... | संस्कृत |
| १७ गजेंद्रमोक्ष. | ,, | ... | मराठी |
| १८ नृहरिचरितसुधा. | कवि गंगाधर | श. १७९० | संस्कृत |
| १९ रामलीला लता. | देव ऊर्फ दादा | १८०४ चा | ,, |
| २० भक्तिकल्पद्रुम. | शास्त्री देव धर्माधिकारी | सुमार. | ,, |
| | | | ,, |
| २१ भक्तिविष्णुपदी. | ,, | ... | ,, |
| २२ श्रीरामस्तवराज | ,, | ... | ,, |
| २३ गणेशद्वादश नामस्तोत्र | ,, | ... | ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ सुश्लोकलाघव सुभाषित, श्लिष्ट खण्डकाव्य. | विठोबा अण्णा दप्तरदार; मूळ राहिवाशी कऱ्हाडचे, पण पुढें नाशकास येऊन राहिले व येथें रचिला असें म्हणतात. | | संस्कृत |
| २५ सप्तशतीव्याख्या | बापूभट्ट चंद्रात्रे. | शक १७७३ | संस्कृत |
| २६ स्फुट काव्य | कवि गोविंद आबा दरेकर | | मराठी |
| २७ संस्कृत व प्राकृत स्फुट काव्यसंग्रह. | त्र्यंबक रामचंद्र कुलकर्णी किंवा कविकौस्तुभ | सन १९०७ ते ३७ | |
| २८ कविकौस्तुभचरित्र | गोसावी आ. श्रीराम | | मराठी |
| २९ प्राणाचार्य देवधर वैद्य चरित्र | वामन केशव दातार शास्त्री वैद्य | सन १९३५ | ,, |
| ३० रामदासीबोवा, मोरोपंतचरित्र व काव्यविवेचन, ज्ञानेश्वर, श्रीएकनाथ, मुक्तेश्वर, तुकारामादि चरित्रें. | लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,बी.ए. मुमुक्षुकर्ते. | सन १९०६ ते १९४० | मराठी |
| ३१ मराठी संतवाङ्मयाचा इतिहास, खंड ३ | ल. रा. पांगारकर मुमुक्षुकार. | सन ११२० ते ४० | मराठी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ सार्थ दासबोध, सार्थ मनोबोध वगैरे ग्रंथ | श्री. पांगारकर मुमुक्षुकार | ,, | मराठी |
| ३३ सप्तशती चतुर्थाध्यायावरील गूढार्थदर्शिनी नांवाची टीका. | श्रीधर जण्णा शास्त्री वारे. | सन १९३० ते १९४० | संस्कृत |
| ३४ याज्ञवल्क्यचरित्र व शुक्लयजुर्वेद वैदिकवाङमय-परिचय. | ,, | ,, | मराठी |
| ३५ मठिकाव्य, सरस काव्य. | गोपाळशास्त्री पुराणिक. | सन १९३० | मराठी |
| ३६ रामभूमींतिल नररत्नें, चरित्रग्रंथ. | आचार्य श्रीराम गोसावी | | मराठी |
| ३७ शारदामंडन | अनंत वामन बर्वे. | | मराठी |
| ३८ माझी भूमिका | महाराष्ट्र नाट्य- | सन | मराठी |
| ३९ नवे डोळे | मंदिरसंस्थेनें | १९२९ | ,, |
| ४० नाटककार गडकरी | प्रकाशिलेले | | ,, |
| ४१ आठवणीचे खंदक वगैरे. | ग्रंथ. | | ,, |
| ४२ गोदागौरव | नाथ निफाडकर | सन १९२९ | ,, |
| ४३ मानारचें आखात | नाशकास येऊन राहिल्यावर लिहिलें म्हणतात. | | ,, |
| ४४ षष्टीपलात्मक गोविंदस्तोत्र | सदाशिव देव ऊर्फ आपदेव धर्माधिकारी | शक १६५८ | संस्कृत |
| ४५ वृत्तचंद्र | श्री.अ.शा.वारे | | संस्कृत |
| ४६ छंदोमंजरी–भाषांतर | ,, | | मराठी |

## प्रसंगानें इतर शास्त्रीय वाङ्मय.

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| १ शारदातिलकावरील व्याख्या. | राघवभट्ट महाबळ, मूळ नाशिक, पण पुढें काशी. | शके १३ वें शतक शेवटीं | संस्कृत |
| २ जीवन्मुक्तिविवेक-टीका. | अच्युतराय मोडक | | संस्कृत |
| ३ पञ्चदशीटीका. | ,, | | ,, |
| ४ निर्णयसिंधुटीका. | ,, | | ,, |
| ५ चिद्रत्नचषक व त्यावरील आमोदटीका. | ,, | | ,, |
| ६ अद्वैतामृतमंजरी. | ,, | | ,, |
| ७ ऋषिभट्टी किंवा संस्कारभास्कर. | ऋषिभट्ट शौचे | शके १६४० | ,, |
| ८ प्रयोगदर्पण. | गोपालसुत | शके १६४० | ,, |
| ९ प्रतिष्ठादर्पण, बृहत् व लघु. | पद्मनाभ दीक्षित. | | संस्कृत |
| १० रुद्रदर्पण. | | | संस्कृत |
| ११ पद्मनाभीय कात्यायन श्रौतसूत्रपद्धति, २६ अ. | | | ,, |
| १२ कात्यायन श्रौतसूत्र काशीभाष्य. | सदाशिवसुत काशी दीक्षित | | ,, |
| १३ रुद्रपद्धति. | ,, | | ,, |
| १४ प्रतिष्ठासारदीपिका. दोन परि० | पांडुरंगशास्त्री टकले. | शके १७०२ | ,, |
| १५ पर्वनिर्णय. | बाबाजोशी घोलप स्वामी. | शके १७८२ | ,, |

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| १६ गोत्रप्रवरकारिका. | सदाशिव देव | शके | संस्कृत |
| १७ खेटपीठमाला. | ऊर्फ आपदेव | १६५८ | ,, |
| [ १ सापिंडय कल्पलता. | धर्माधिकारी. | | |
| २ दर्शपूर्णमास व चातुर्मास्यविहारकारिका. | आपदेव | शके १६५८ | ,, |
| ३ काशिकानित्ययात्रास्तव. ] | | | |
| १८ मूल्याध्यायटीका. | बापूभट्ट चंद्रात्रे | शके १७७३ | संस्कृत |
| १९ देवभट्टी अथवा प्रतिष्ठाप्रकाश. | भटंभट वारे नाशिक, नंतर उज्जैन. | शके १७८६ | संस्कत |
| २० ह्यहःसाध्य देवप्रतिष्ठापद्धति. | जयरामभट्ट वारे ज्योतिर्विद्. | शके १७६० | संस्कृत |
| २१ गोदायात्राविवेक. | रामकृष्ण शा. शुक्ल | | ,, |
| २२ गोदानिर्णयचंद्रिका. | वै. के. हरिशास्त्री गर्गे | | ,, |
| २३ आषाढोद्वाहनिर्णयखंडन. | लक्ष्मण हरिशास्त्री गर्गे | | ,, |
| २४ कुण्डविमर्ष. | ,, | | ,, |
| २५ व्यवहारज्योतिष वगैरे. | यज्ञेश्वर जोशी घोलप. | | मराठी |
| २६ कर्मकाण्डप्रदीप. | ती. वैदिकतिलक | शके १८४० ते १८६१ | संस्कृत |
| २७ शांतिकांडप्रदीप. | आण्णाशास्त्री | ,, | |
| २८ आषाढोद्वाहनिर्णय | वारे. | | |

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| २९ तृतीयप्रतिज्ञा परिशिष्टप्रदीप. | | | संस्कृत |
| ३० यज्ञपार्श्वप्रदीप. | | | |
| ३१ गृह्यकर्मकाण्डप्रदीप | श्रीधर आण्णाशास्त्री वारे | शके १८४० ते १८६३ | संस्कृत |
| ३२ श्रौतकर्मकाण्डप्रदीप. | | | |
| ३३ आपदेवीय गोत्रप्रवरप्रदीपिका. | | | |
| ३४ सापिण्ड्यप्रदीप. | | | |
| ३५ संहितास्वाहाकारप्रदीप. | | | |
| ३६ श्रीमंथसरणिप्रदीप. | | | |
| ३७ पर्वनिर्णयप्रदीप. | | | |
| ३८ आर्षानार्षसूत्रविवेक | | | |
| ३९ गायत्रीपद्धतिप्रदीप | | | |
| ४० प्रतिष्ठासरणिप्रदीप | | | |
| ४१ पूर्तकर्मकाण्डप्रदीप. | | | संस्कृत |
| ४२ स्वात्मप्राचिती. | निरंजन रघुनाथ | | मराठी |
| ४३ साक्षात्कार. | ,, | | ओवीबद्ध. |
| ४४ त्रिदोषविमर्श | वामन केशव शास्त्री दातार वैद्य. | सन १९१२ ते १९३५ | संस्कृत |
| ४५ १९ वे संमेलनांतील निबंधसंग्रह | | | ,, |
| ४६ चरक अरुणदत्त टीका प्रकाशन (त्रिदोषतत्व.) | | | ,, |
| ४७ अष्टांगसंग्रहग्रंथ प्रकाशन. | प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवघर. | शके १८१० | ,, |
| ४८ दत्तकनिर्णयामृत. | श्रीधर अण्णा शास्त्री वारे | शके १८५० ते १८६९ | संस्कृत |

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| ४९ कुण्डार्कसुप्रभा. | श्रीधर अण्णाशास्त्री वारे | शके १८२० ते १८३२ | संस्कृत |
| ५० सूर्योपस्थानसूत्रभाव-दर्शन व्याख्या. | | | |
| ५१ यूपछागलक्षण परिशिष्ट टिप्पणी. | | | |
| ५२ कुंडमंडप सामान्य निर्णय टिप्पणी. | | | |
| ५३ भाषिकसूत्र टिप्पणी. | | | |
| ५४ मंत्रभ्रांतिहरसूत्र टिप्पणी | | | |
| ५५ शतपथसायणभाष्य टिप्पणी व प्रकाशन. | | | |
| ५६ प्रतिज्ञासूत्रटिप्पणी. | | | |
| ५७ शतसहस्रायुतलक्षचण्डी पद्धति. | | | |
| ५८ राज्याभिषेकपद्धति | | | |
| ५९ शतमुखगायत्री कोटि-होमपद्धति. | | | |
| ६० भागवतस्वाहाकारपद्धति | | | |
| ६१ सूर्ययागपद्धति. | | | |
| ६२ विष्णुयागपद्धति. | | | |
| ६३ ब्रह्मकर्मप्रदीप, भा. १।२ | | | |
| ६४ कातीय परिभाषाध्याय व्याख्या व तत्परिशिष्ट. | | | |
| ६५ खेटपीठमाला व्याख्या. | | | |
| ६६ गणेशाथर्वशीर्ष सुधा व्याख्या. | | | |
| ६७ शौनकीय व पिप्प- | | | |

| ग्रंथ | ग्रंथकर्ता | निर्माणकाल | भाषा |
|---|---|---|---|
| लादीय प्रत्यंगिरासूक्तांची | | | संस्कृत |
| सुधा व्याख्या. | | | ,, |
| ६८ धर्मशास्त्रीय विवाद्य | श्रीधर आण्णाशास्त्री वारे | शके १८५० ते १८६९ | ,, |
| विषयक स्फुट निर्णय. | | | ,, |
| ६९ संख्याशास्त्राचा | | | ,, |
| संस्कृत अनुवाद. | | | |
| ७० याज्ञवल्क्यशिक्षा- | | | मराठी |
| भाषांतर. | | | |
| ७१ कठ व मैत्रायणी- | | | संस्कृत |
| यादि संहिता प्रस्तावना. | | | |
| ७२ धर्मशास्त्रनिबंध | | | संस्कृत |
| (वेदशास्त्रदीपिका) (वेदोत्ते- | | | |
| जक सभा पुणें स्मा.ग्रंथ ) | | | मराठी |

नाशकांतील ग्रंथ, ग्रंथकार नि ग्रंथकाल यांची वरील यादी पूर्ण आहे असें नाहीं. प्रस्तुत ग्रंथांत विस्तारभयास्तव तिचा संक्षेप केला आहे.

—संपादक.

---

## विद्यानिधि कवींद्र

सर्वविद्यानिधान, विद्यानिधि कवींद्राचार्य सरस्वती चतुर्थाश्रम-निवासी आश्वलायन दे. ऋ. महान् तपस्वी ब्राह्मण ( गोदातीरनिवासी पश्चाद्येनाश्रिता काशी । ऋग्वेदियाऽभ्यस्ता सांगा शाखाऽश्वलायनी शस्ता )

—कवींद्रचंद्रोदयः ।

विद्यानिधि कवींद्र हे गोदातीरनिवासी म्हणून अत्यंत प्रसिद्ध होते. जनस्थानाचें—नाशिकचें एक मौलिक तेजस्वी रत्न म्हणून ते अतिविख्यात होते. कवींद्रकृत मौलिक ग्रंथ—१ कवींद्रचंद्रोदय ( मानपत्रसंग्रह ), २ कवींद्रग्रंथसूची, ३ कवींद्रकल्पद्रुम. कवींद्रांचें वक्तृत्व अस्खलित,

प्रतिभासंपन्न, प्रसादयुक्त, परिणामकारक नि चैतन्य निर्माण करणारें होतें.

कवींद्रांची धर्मविषयक महत्वाची कामगिरीः—आग्रा येथें शहाजहान बादशहाच्या पुढें अखिल हिंदुराष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून ते उपस्थित होते. कवींद्रांनीं आपल्या परिणामकारक वक्तृत्व व उत्तम वकिली-चातुर्य या दोन सद्गुणांच्या जोरावर काशी व प्रयाग येथील हिंदुयात्रे-वरील अन्याय्य लादलेला कर माफ करून घेतला. या महान् हिंदुधर्म-वीरांनीं या बजावलेल्या फार मोठ्या कामागिरीबद्दल त्या वेळच्या अखंड हिंदुराष्ट्रानें त्यांचा अभिनंदनपर संदेश, मानपत्रें देऊन व विद्वत्परिषदा भरवून गौरव-सत्कार करून त्यांच्याबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. खुद्द बादशहानें विद्यानिधान वा विद्यानिधि ही पदवी समर्पण केली.

कवींद्रांचे सर्व ग्रंथ कलकत्ता येथील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथशाळेंत आहेत. तसेंच जयपूर, अडयार, बडोदें येथील ग्रंथालयांतही आहेत. कवींद्रांचा काल—इ. स. १६२७ ते ५० असा आहे.

( दे. ऋ. ब्राह्मणपरिचयग्रंथ, प्र. १२|८ )

---

## उपसंहार

कष्टं भारतवासिनः कतिपयात्कालाद्यथाशासनं
साहित्यं परिहाय दुर्व्यसनिनोऽभूवन्नितीमांस्त्यजन् ॥
साधूल्लासकलाकलापकलितां लक्ष्मीं युरोपार्जिरे
विज्ञानोदयदक्षिणां वितनुते सारस्वते योऽधुना ॥
किञ्च ! भो भारता निर्मलकर्मयोगैः सारस्वतेयं शरणं प्रयातं ।
यतो भवेयुर्भवतां प्रभावाः पुनःपुनः किं कलिगर्हणेन ॥ इति.

म. म. दुर्गाप्रसाद द्विवेदः ।

"हे भारतवासि जन हो ! महत्कष्ट आहे कीं, ज्याप्रमाणें शासन अर्थात् स्वराज्य टाकिलें त्याप्रमाणें साहित्याचा त्याग करून

तुम्ही दुर्व्यसनी झालांत म्हणूनच कीं काय, तुम्हांला सोडून देऊन हा सारस्वत पुरुष साधु, विद्वान् यांना उल्लासित करणारी आपली कलाकलापसंबंधीं सर्व लक्ष्मी ( शोभा-विलास ) विज्ञानोदयरूपी दक्षिणेचे आशेनें युरोपच्या प्रांगणावर विस्तारीत आहे. करितां हे भारतियांनो, त्या सारस्वत पुरुषालाच शरण जा. म्हणजे तुम्ही पुनः प्रभावित व्हाल. नुसताच कलिकालाला वारंवार दोष लावण्यांत अर्थ काय ?"

वरील कवीच्या खिन्नोद्गारांवरून असें दिसतें कीं, साहित्यशास्त्र हें आपलें पूर्व वैभव, गौरव, गाम्भीर्य यांच्यापासून ढळलें आहे. त्यावर युरोपीय आचारविचार रीतीरिवाज, वेषभूषा, शील, संस्कार यांचा पगडा बसला व बसविला गेला. उदाहरणार्थः—वर्णनीय विषयांची निवड, प्रतिपाद्य कथानकांचें पर्यवसान, विविक्षित अलंकारांशिवाय अन्य अलंकारांचा अभाव, गुणांचा परिपोष नसणें, प्रायः छन्दो-विरहितता, चुंबन, एकशय्या, एकपात्रभोजन, असूचित पात्रांचा आगम व निर्गम, प्रत्यक्ष युद्धानिदर्शन, युरोपीय समाजरचनापद्धतीचें चारित्र्य प्रसंग इत्यादि साहित्यविश्वांतील अदलाबदल बारकाईनें पाहिली तर वरील कवीचा उद्वेग यथार्थ नाहीं असें कोण म्हणूं शकेल ?

करितां आर्यांनीं वेळींच सावध होऊन तनमनधनानें आर्य साहित्य आर्य सभ्यतेच्या दृष्टीनें जोपासिलें तर तें विपत्तिकाळांतहि आनंदपर्यवसायी मार्ग दाखवून उत्कर्षास नेल्यावांचून राहाणार नाहीं.

अन्यथा—**अपारे काव्यसंसारे कविरेकः प्रजापतिः ।**
**यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ॥** ध्वन्यालोके ।

ह्या अपार काव्यसंसाराचा सर्वोपज्ञ कवि एकच प्रजापति होय. तो आपल्या रुचीप्रमाणें काव्यविश्वाचें परिवर्तन घडविणारच आहे.

**नरत्वं दुर्लभं लोके विद्या तत्र सुदुर्लभा ।**
**कवित्वं दुर्लभं तत्र शक्तिस्तत्र सुदुर्लभा ।**
**व्युत्पत्तिर्दुर्लभा तत्र विवेकस्तत्र दुर्लभः ॥**
**एतच्च सुलभं सर्वं साहित्यस्य समादरात् ॥** आग्नेय ।

तात्पर्य:—मनुष्यता, विद्या, कवित्व, प्रतिभा, व्युत्पत्ति, विवेक, हे उत्तरोत्तर दुर्लभ वस्तु होत. ह्या सर्व वस्तु साहित्यशास्त्रानें सुलभ होतात. म्हणून साहित्यशास्त्राचा समादर करावा.

शेवटीं ज्या विद्वद्वर्य पांगारकरांच्या स्मारकग्रंथाचा घटक अवयव म्हणून हा निबंध लिहिला, ते कै. ल. रा. पांगारकर साहित्याचे मर्मज्ञ विद्वान् लेखक ग्रंथकार होते. त्यांनीं आपलें उत्तर आयुष्य नाशकास घालवून या क्षेत्रास भूषविलें. अनेक ग्रंथसम्पत्ति निर्माण करून ठेवून सदैव ऋणी केलें. त्यांना श्रद्धांजलि समर्पण करून हा निबंध संपवितों. ह्या निबंधाचे वाचनानें वाचकवृंदास साहित्याचा ओझरता पण चिरकाल टिकणारा परिचय झाला तर मी माझे परिश्रम सफल झाले म्हणून समजेन.

**स्वतंत्रसिद्ध भारते स्वतन्त्रमार्यसाहित्यम् ।**
**हित्वा तन्त्रं परायत्तमनुभूयात्स्वतन्त्रताम् ॥**

इति शिवम् !

श्रीराम समर्थ

# १५. वामनी त्रिविध पराक्रम.

( लेखक वा. रा. निसाळ शास्त्री, संगमनेर )

" वामन वामन ज्ञानेश्वर । श्रीकृष्ण एकपर्णी ग ! "

—श्रीगीतसंग्रह ३३७

" सकळही संतांचा । मानोनी ब्रह्मवेष ।
वामनमूर्तीमध्यें ग बाई । करी तूं समावेश ॥ "

—*श्रीज्ञानेश्वकन्या ( गुलाबरावमहाराज ) श्रीगीतसंग्रह ३५९*

**प्रस्तावना**—श्रीगीता—भागवतज्ञान हें वेदमूलक म्हणून अत्यंत श्रीमंत असून त्यानें जगदुद्धाराची सर्वांगीण अशी फार काळजी घेतली आहे. रामायण ( वासिष्ठासह ) काव्यानें व भारत इतिहासानें तर त्याची विविध साधनांनीं पराकाष्ठा करून सोडिली आहे ! तसेंच प्राचीन अर्वाचीन संस्कृत प्राकृत सकल सत्पुरुषांनीं आपल्या धर्मसंस्कृतीच्या सदाचारानें त्याचा परिपोष करून स्वतपोबलावर आजपर्यंत भारताचें चांगलेंच संरक्षण केलें. त्यांच्या दिव्यज्ञानधर्माची धारणा आज फारच क्वचित् व्यक्तींत असली तर कांहींशा अंशानें असेल ! असो.

आतां मात्र थोराथोरांना मोठी चिंता उत्पन्न झाली आहे कीं, येथून पुढें भारताचें सर्वांगीण कल्याण कसें होईल ? कारण जनतेंत आधुनिक विविध ज्ञानाच्या स्वैर नर्तनानें खऱ्या ज्ञानाचा लोप होत चालला आहे. अर्थात् ज्या सूक्ष्म ज्ञानांत मोठ्यामोठ्यांचीहि त्रेधा उडते, तेथें सर्वसामान्य जीवांची दिशाभूल होणें अपरिहार्य आहे. खऱ्या ज्ञानाच्या अभावीं सर्वत्र अज्ञान-अंधकारांत एका दैन्य-दुःखावांचून दुसरा कोणता अनुभव येणार ? व उन्नतीचा विश्वसनीय मार्ग तरी कोणता सांपडणार ?

ही प्रस्तुतची परिस्थिति लक्ष्यांत घेऊन आम्हीं शक्य तितक्या सोप्या

मांडणीनें या वामनी अल्पशा प्रकरणग्रंथानें जनींजनार्दनाची यथाशक्ति सेवा करण्याचें योजिलें आहे.

भक्तीच्या शक्तीनें आत्मबली ज्ञानसूर्याचा उदय होण्याचा मात्र अवकाश, कीं मग ती व्यक्ति, तें कुटुंब, तो समाज सर्वांगीण उन्नतीचें साम्राज्य भोगितो. यास प्राचीन कालच्या अनेक व्यक्तींचा इतिहास जरी प्रमाण असला तरी त्रिपुरारहस्यांतील देवी 'हेमलेखे' चा इतिहास तर फारच कौतुकास्पद आहे. कारण ज्या एका विदुषीनें थोरांपासून पोरांपर्यंत अध्यात्माचें शिक्षण देऊन 'विद्यानगर' नांवानें स्वनगरीचें यश मोठमोठ्या महात्म्यांच्या मुखांतून वदविलें ! या कालीं श्री आचार्य-नाथ-ज्ञानेशादि सत्पुरुषांनींही या आर्यावर्तांत 'ब्रह्मविद्येचा' चा सुकाळ करून तेंच यश संपादिलें आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, बहुतेकांचा सत्संप्रदायापाशीं परिचय नसल्यामुळें ते ग्रंथही समन्वयदृष्टीच्या अभावीं दिवसेंदिवस कठीण होत चालले आहेत. मी या स्वल्पशा सत्कृतीनें पारमार्थिकांची विशेषतः ती अडचण दूर करून सर्वसाधारण जीवांसही येथें उन्नत करण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. हें या निबंधांतील 'विषयानुक्रमाणीके' वरूनही साधारण लक्ष्यांत येण्यासारखें आहे. विशेषतः या निबंधाची उपयुक्तता अशी—

१. या निबंधानें सर्वसामान्य लोकांचा **भक्तीच्या** टप्प्यांतून ज्ञानांत प्रवेश होईल.

२. तसेंच ज्ञानांत प्रवेश असलेल्या साधकांस **अन्वयव्यतिरेकाच्या** अभ्यासकक्षांनीं हा निबंध 'विज्ञान' मंदिरांत पोंचवील.

३. याच्या परिशीलनानें कोणाही सत्पुरुषाच्या अध्यात्म ग्रंथांतील किंवा प्रवचन–कीर्तनकारांच्या व्याख्यानांतील आरंभापासून शेवटपर्यंतच्या अभ्यासभूमिका ओळखतां येऊन, आपल्या मनोभूमीच्या अनुरोधानें अभ्यास करितां येईल.

४. किंबहुना आत्मबली सदाचारानें जगदुद्धाराची यांत दिशा आहे, म्हणून हा छोटेखानी बहुगुणी निबंध म्हणजे '**वामनदर्शना**' चा '**अरुणोदय**' च होय. मात्र शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांतील **पारि-**

भाषिक शब्दांच्या व्याख्या ध्यानांत आणून प्रत्येकानें अवश्य मनन करावें,

या पुस्तकांतील आधारवचनें, ज्या वामनी ग्रंथांतील आहेत, त्यांची यादी:-१ यथार्थदीपिका २ निगमसार ३ ब्रह्मस्तुति ४ नामसुधा ५ भगवद्दास्य ६ भक्तिमहिमा ७ सिद्धांतसवय्या ८ कर्मतत्त्व ९ स्फुट श्लोक.

**विषय** —१ उपक्रम २ तीन पराक्रमांची महती ३ या निबंधाचें साध्य ४ मंगलाचरण ५ साहित्य-व्याख्या ६-९ वामनी साहित्य-पराक्रम १० काव्यरसद्वारा परमार्थांत प्रवेश ११ भक्तिशास्त्राचा उपक्रम १२ सशास्त्र भक्तिगंगेचे जनक वामनच १३ खऱ्या दुर्लभतम सत्समागमानें भक्तींत प्रवेश १४ भक्तीनें परमानंदी कोण झाले ? १५ नवविध भक्तीचा उपक्रम १६ पहिल्या तीनभक्तींचा चढता महिमा १७ दास्यभक्तींचें मर्म १८ अर्जुनाचें सख्यभक्तिभाग्य १९ बळीची आत्मनिवेदनभक्ति २०-२१ दिव्य भक्तीचा संदेश २२ दिव्य भक्तीचें चढतें लक्षण २३ खऱ्या भक्तींत सगुणनिर्गुण साक्षात्कार २४ सिद्धांचा भक्तिस्वभाव तोचि साधकांचा साधनमार्ग २५ उत्कंठा, भक्तीची याचना २६ सिंहावलोकन २७ अज्ञांची भक्ति ती उपासना व ज्ञात्यांची तर ती अद्वैतभक्ति २८ मुक्तीपेक्षां भक्तीचें श्रेष्ठत्व २९ भक्तीनें ज्ञान पक्वता होत नाहीं म्हणणारांचें खंडण ३० भाष्यप्रमाणानें मुक्तांच्या इहपर लीलाभक्तीची सिद्धि ३१ दिव्य-भक्तिसुखाकरितां जन्मास भिऊं नये ३२ भक्तीनें गर्भवास टळून लीलादेहाची प्राप्ति ३३ भक्तास भगवत्कृपा गर्भांतही सांभाळते ३४ तीव्रतम परमार्थ उद्यम करणारास येथेंच सायुज्यादि मोक्षसाम्राज्य ३५ शास्त्रानें परोक्षज्ञान, पण अपरोक्ष ज्ञान तर समाधि अभ्यासानें ३६ किंवा भक्तीनेंच स्थिर होतें ३७ सगुणद्वारां निर्गुणप्राप्ति हें दृष्टांतानें कथन ३८ समाधीनें व्यतिरेकज्ञानपूर्णता ३९ अन्वयज्ञानाची न्यायानें सिद्धि ४० जगद् ब्रह्म कीं भ्रम ? ४१-४३ विचार-अभ्यास-युक्तीनें भ्रमनिरास ४४ व्यापक हरिस्मरणाचें बल ४५-४६ विज्ञाननिरूपण ४७ महात्म्याची ब्रह्मरूपता ४८ ज्ञानपाखंडी दुराचाऱ्यांचें सोपपत्तिक खंडण ४९ सदाचारी खरे संत त्रैलोक्यवंद्य ५० धर्मसेवेनें जगदुद्धार ५१-५३ समारोप.

*    *    *    *

१. श्रीकविवर्य ज्ञानी भक्तराज वामनांचा-दिसावयास वामनच, चुडगा, छोटासा, परंतु पराक्रमानें फार मोठासा अवतार श्रीसमर्थकालीं झाला. यांनीं मुख्यतः ३ विक्रम केले, असें त्यांच्या विस्तृत अमोल वाङ्मयावरून स्पष्ट दिसतें, म्हणून हे त्रि-विक्रम खरे !

२. आतां ‘ कोणते ते त्यांचे तीन पराक्रम ?’ या प्रश्नास उत्तर असें कीं, ‘ साहित्य, भक्ति व ज्ञान या तिन्ही शास्त्रांस व त्यांतही विशेषतः भक्तिज्ञानशास्त्रास त्यांनीं चालना दिली; ’ हे ते होत. त्यांतही त्यांची महत्वाची कामगिरी म्हणजे स्वतः ते ‘ आचार्यपदवी’चे महापंडित असून देखील त्यांनीं सुलभ अशा मराठी-देशी भाषेंतून आपले ग्रंथ लिहून सर्व जगावर अनंत उपकार केले, ही होय. किंबहुना पंडितवाङ्मय हें खरोखर जगाचें महद्भाग्य होय, असें विधान करावयास तरी हरकत कोणती ? कारण या दिव्य अवतारानें वेद भागवत-भाष्यादि संस्कृत वाङ्मय व श्रीज्ञानेश नाथ-तुकोबा-समर्थादि महाराष्ट्र-संतवाङ्मय यांतील रहस्यांचें संकलन करून तें आपल्या प्रासादिक वाणीनें ठामठोकपणें साधकांच्या पूर्णत्वानें पदरांत टाकिलें आहे. म्हणूनच यापुढें भक्तिज्ञानशास्त्राच्या मार्गांत कोणाचीही दिशाभूल होण्याचा सहसा संभव नाहीं, असें आम्हांस वाटतें.

३. आतां सामान्य जनांपासून थोर सज्जनांपर्यंत, विशेषतः भक्तिज्ञानशास्त्राची धारणा करून देऊन या पुरुषधुरंधरानें त्यामार्गें जगदुद्धार कसा केला, हें आम्हीं या छोट्याशा निबंधांत क्रमानें दाखविण्याचें योजिलें आहे. त्याचे जनींजनार्दन मननानें सार्थक करोत, एवढेंच श्रीभगवानास विनम्रपणें आम्ही विनवितों.

४. मंगलाचरणः—

अंग वक्रे[1], अधरीं धरि पावा । गोपवेश हरि तोचि जपावा ॥
वामे[2] बाहुवरि गालहि डावा । तो ठसा स्वहृदयांत[3] पडावा ॥

## १. साहित्यशास्त्र

५. साहित्यशास्त्र म्हणजे ' वर्णनीय विषयांच्या अनुरोधानें सालंकार रसमय शब्दचमत्कृति. ' ही शक्ति जातिवंत कवींत असते, म्हणूनच तो आपल्या काव्यकन्यकेच्या विलक्षण हाव-भावाच्या प्रभावानें रसिकास मोहित करून आपलें इष्टकार्य साध-ण्यास समर्थ असतो.

६. कविवर्य वामन हे अशा कविजनांपैकीं एक होत. यांनींच विविध वृत्तांत यमकादि शब्दालंकारांचीं व रूपकादि अर्थालंकारांचीं काव्यें मराठींत आणिलीं.

तसेंच संस्कृत काव्यांचे त्याच वृत्तांत उत्तम भाषांतरकार जर कोणी झाले असतील, तर ते एक वामनच होत. संस्कृतांतील कठीण सामासिक पदें व त्यांचा व्यापक भाव मराठी भाषेंत, शिवाय त्याच वृत्तांत आणणें, हें काम किती कठीण असतें, हें ' जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे ! ' इतरांस काय त्याचें ? गोपीगीत ( भाग. स्कंध १० ), गंगालहरी ( जगन्नाथपं. कृत ), जटायुस्तुति, भरतभाव ( अध्यात्मरामायण ) इत्यादि काव्यें तर तीं वाचणा-रास भाषांतरित आहेत असें वाटत नाहीं, इतकीं तीं सुलभ व प्रासादिक उतरलीं आहेत.

७. परंतु एवढ्यावरून ' पंडित ' हे ' भाषांतरे कवी 'च आहेत, असें कोणीं समजूं नये. कारण ' द्वारकाविजया ' सारख्या सगुण-विषयक व ' कर्मतत्त्व ' ' चरमगुरुमंजरी ' इत्यादिसारख्या

---

१ वांकडें अंग केलेला हरि ध्यानानें स्मरण करीत सांभाळावा. २ डाव्या. ३ स्वतःच्या हृदयांत.

निर्गुणविषयक स्वतंत्र ग्रंथांची निर्मीतिही त्यांच्यांत विपुल दिसून येते. ‘ नामसुधा ’ ‘ ब्रह्मस्तुति ’ सारखीं चटकदार टीकाप्रकरणें ‘ गीतार्णवसुधे ’ सारखीं ज्ञानाचा तौलनिक पद्धतीनें अभ्यास करणाऱ्या साधकांकारितां लिहिलेलीं प्रकरणें ही त्यांची स्वातंत्र्य-काव्यपताकाच होय, असें कोण म्हणणार नाहीं ?

८. ते भक्तोत्तम होते म्हणून भागवतरामायणाच्या मूळ आलंबनानें, रामकृष्णांच्या अलौकिक अवतारकथागायनानें जगाचे ते फार आवडते झाले. भगवत्कथा गातांना शब्दालंकार व अर्थालंकार या दुथड्यांनीं तुडुंब वाहणाऱ्या त्यांच्या काव्यगंगेचा महिमा काय वर्णावा ! आजपर्यंत सहस्रावधि हरिदासांच्या सत्पात्रांत स्नान-पानार्थ उभ्या राहिलेल्या कोटयवधि जनसमुदायास या सुश्लोकी गंगेनेंच पुण्यश्लोक केलें आहे, हें कोणीही कबूल करील.

९ कथानकांतील उभय अलंकारांचीं उदाहरणें ‘ श्री वामनी-दर्शनांत ’ आम्हीं दिलीं आहेत. या छोटया निबंधांत विस्तरभयामुळें त्यांपैकीं कांहींच देतां येत नाहीं; असो.

१० कोणी चिकित्सक म्हणेल, परमार्थांत साहित्यशास्त्राचा खटाटोप कशाला पाहिजे ? यावर श्रीज्ञानेशांनीं मार्मिक असें उत्तर दिलें आहे कीं,— उत्तम कवित्वरससेवनानें निसर्गतः रासिक असलेल्या जीवांचा परमेशतत्त्वांत प्रवेश होतो,* शिवाय सर्वसामान्य लोकांचें रंजन होत होत त्यास साधनसाध्यभावानें असलेल्या धर्मज्ञानाचा बोध होतो. त्या बळानें हळके हळके ते आत्मबली होऊन कृतार्थ होतात. एकंदरींत हा वामनांचा साहित्यविषयक प्रथमपराक्रम बराच प्रभावी आहे.

---

*** वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसि-कत्वीं परतत्त्व- । स्पर्श जैसा ॥** ( ज्ञाने. )

## २. भक्तिशास्त्र

११. आतां वामनांच्या दुसऱ्या पराक्रमाकडे विशेषतः वळूं या.

१२. श्रीभगवानानें वामनावतारीं बळीचें सत्त्व हरण करण्याकरितां व इंद्रादि देवतांवर कृपा करण्याकरितां त्रिविक्रम विश्वरूप घेऊन त्रिपादभूमीच्या आक्रमणानें त्रिविध पराक्रम केले, ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे. त्यांत त्रिविक्रमानें पहिल्या चरणानें सकल भूमीचें आक्रमण करून, जेव्हां दुसरा चरण ब्रह्मलोकीं ठेविला, तेव्हां त्याच्या वज्रापेक्षांही कठीण अशा नखप्रहारानें ब्रह्मांडाचा भेद होऊन जगत्पावन गंगेचें अवतरण झालें. तद्वत् वादीमतखंडणपूर्वक मराठींत सशास्त्र अद्वैतभक्तिगंगानिर्मितीचें पहिलें श्रेय भक्तवर्य वामनास आहे. 'श्रीवामनीदर्शना'च्या 'दिव्य भक्ति', 'नित्य-वैकुंठ', 'सगुणमोक्ष' या तीन प्रकरणांत आम्हीं सज्ञान भक्ति-भूमिकांची साविस्तर विशेष मीमांसा सप्रमाण केली आहे; म्हणून येथें तिचा अतिसंक्षेप दुसऱ्या पराक्रमांत देत आहोंत, त्याचें सुज्ञानें लक्ष्यपूर्वक परिशीलन करावें.

१३. प्रथम मनुष्यदेह दुर्लभ, त्यांत कांहीं आयुष्य लाभणें दुर्लभ, व त्यांतही त्याचें सार्थक करणारा संतसमागम मिळणें तर दुर्लभतम होय.

सवाई

**दुर्लभ मानवदेह, तयांतहि दुर्लभ तें किति काळ जिणें।**
**त्यांतहि दुर्लभ संतसमागम, काय जिणें हरिभक्तिविणें ! ॥**
**ज्यासि हरि प्रिय, जे हरिचे प्रिय, भेटति ते जगदात्मपणें।**
**दुर्लभ दुर्लभ ते म्हणे वामन, जे मन शोधिति विष्णुगुणें ॥**

—वा. पं. भाग ३, स्फुट सवाया.

१४. सत्समागमांत दिव्यभक्ति लाभल्यानें 'अजामिळ–गणिका-

व्याध ' इत्यादिकांसारखे पापीही निर्दोष होऊन सुखसंपन्न झाले. आतां तिनें आणखी कोण थोर थोर परमानंदी केले, तें ऐका—

**भक्तिसुखें प्रऱ्हाद तरे, मुनि नारद भक्तिसुखें विचरे ।**
**भक्तिसुखें सनकादिक पावन, भक्तिसुखें उपमन्यु तरे ॥**
**भक्तिसुखें ध्रुव बाळ सुखावे, व्यासमुखें जगताप हरे ।**
**वाल्मिकि, अंबऋषी, बळि, भीष्म, शुकादिक तन्मय भक्तिभरें ॥**

—वा. पं. क. सं. भा. ३, पृ. ४७

१५. भगवंतावरील ' परम प्रेम ' हें जिचें स्वरूप आहे, अशी एकरूप भक्ति, व्यापारभेदानें ९ प्रकारची झाली. ते प्रकार भागवतांत असे वर्णिले आहेत:—

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥**

१६. ' श्रवण ' हा भक्तिमंदिराचा पाया असला तरी नवविधा भक्तींत 'स्मरणभक्ति' ही मुख्य होय. तिची महती वामनांनीं अनेक ठिकाणीं अनेक रीतीनें गायिली आहे. एके ठिकाणीं तीविषयीं ते म्हणतात कीं, नवविध भक्तिकुसुमांतील ' स्मरणभक्ति ' हें आधारभूत सूत्र (दोरा) होय. कारण, प्रत्येक भक्तिव्यापार स्मरणपूर्वक असतो. त्यांतही ' नर्तन करीत हरिनामगायनानें देहभान हरपतें, परमानंदाचा आविर्भाव होतो ' असें विधान करीत करीत ते सांगतात कीं, ' कीर्तन हें कलींतील त्वरित साक्षात्काराचें एक मुख्य साधन होय; ' म्हणून,

**गाऊनिया मधुर हें हरिनाम, नाचा ।**
**पाहों मग प्रेम कसा हरिना मनाचा ॥**
**तत्रापि कीर्तनाचि मुख्य कलौ करीतो ।**
**होतो तया प्रकट तारक लोकरी तो ॥** —वा. पं. भा. ३ स्फुट.

१ अज्ञान. २ कलियुगांत. ३ ईश्वर.

१७. त्यांनीं वंदनपूर्वक सकलकर्मसमर्पणाचा विधि ‘ कर्मतत्त्व ’ नांवाच्या एका प्रकरणग्रंथांत विस्तारानें कथन केला आहे. त्याचप्रमाणें ‘ दास्यभक्ती ’ चें मर्म, सकलकर्मसमर्पणांत आहे, हा सिद्धांत ‘ भगवद्दास्य ’ प्रकरणीं साधकबाधक विचारांनीं मांडून, शेवटीं भगवंतानें अर्जुनास ‘ यत्करोषि यदश्नासि ’ इत्यादि दिलेला निर्णयच सांगितला आहे कीं,

> **सुकृत[1], लौकिक, वैदिक पांडवा ! ।**
> **मज समर्पुनि तूं करि तांडवा[2] ॥**
> **करिसि होमिसि भक्षिसि देशि, रे !**
> **मजमधेंच समर्पित तें शिरे ॥** —भगवद्दास्य ९.

सारांश, ‘ तदर्पिताऽखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलता । ’ हेंच नारदसूत्रात कथन केलेलें अखंड भक्तीचें लक्षण वामनांनींही आपल्या भक्तिमीमांसेंत सांगितलें.

१८. सख्यभक्तीच्या पूर्णत्वाचें महाभाग्य एकट्या अर्जुनाचेंच ! त्याचें कोण वर्णन करणार ? वामन म्हणतात,

> **पांडवभाग्य सहस्रमुखासहि[3] वाच्य नव्हे, न धरे अनुमाना ।**
> **जें अतिथोर पितामह[4]-वैभव त्याहुनिही अति उत्तम माना ॥**
> **लोक चतुर्दश निर्मुनिही विधि[5] पात्र न ज्या पुरुषोत्तम-माना[6] ।**
> **तो हरि ‘भाय रे ! भाय[7]’ म्हणोनिहि थापटि पार्थ तुरंगम-माना॥**
> —भा. ३, पृ. ५७

१९. आत्मनिवेदन या पूर्ण भक्तीस तर शुद्धसत्त्व मनाचा ‘ बळी राजा ’ च व्हावयास पाहिजे; कारण त्यावांचून सकलसमर्पण भक्ति घडणें अशक्य ! एकदां का शुद्धसत्त्व मनानें भगवच्चरणीं

१ पुण्य, २ नृत्य. ३ शेषासही. ४।५ ब्रह्मदेव. ६ ईश्वरसन्मानास. ७ घोड्यास थापटतांना चुचकारण्याचा प्रेमळ शब्द.

खरें सर्वस्वार्पण झालें कीं, मग पुढील भाग्यास काय अंतपार आहे ? तें पुढें अनंतकाळ अनंतपणानेंच उल्लसणार, हें त्रिसत्य ! पंडित, इंद्र-भाग्य व बलिभाग्य यांची तुलना करीत म्हणतात:—

घनाक्षरी

इंद्र इंद्रपददास, बळी त्यावरी उदास ।
दासीसम ज्या पदास, लेखिना निपट कीं ॥
म्हणूनिच विश्वपाळ, झाला द्वारीं द्वारपाळ ।
जयापाशीं सर्वकाळ, असुरांच्या कटकीं ॥

सारांश, बळीच्या आत्मनिवेदन भक्तीपासून अनन्य निश्चयाच्या सज्ञान भक्तीचा चांगलाच बोध होतो.

२०. वामन, साधकास या चरित्रद्वारा रूपकानें दिव्यभक्तीचा संदेश सदृष्टांत देतात तो असा:—

घनाक्षरी

बळी हाचि सत्व गुण,[१] यास करा हो ! निपुण[१] ।
भाग्या अपत्याची खूण,[१] कळतां ठसा पडे ॥
तंतुलागीं सर्वपट, देतां काय खटपट ? ।
तसें अर्पितां निपट, विश्व हें न सांपडे ॥
ऐसें[२] दान दे जें सत्व, नुरे त्यासही भिन्नत्व[२] ।
आत्मनिवेदनतत्व, नेणती हे बापडे ॥
व्यर्थ घेउनी संन्यास, वेष दाविती अन्यास ।
होतां वामनीं हा न्यास,[३] कर्मशेंडी उपडे[४] ॥ ४ ॥

—वामनचरित्र (द्वितीय).

२१. मूळचें मन शुद्ध सत्व आहे, पण अनेक जन्मांतील विषय-

---

१. सत्त्वगुणाच्या बळीराजास आत्मसमर्पणाच्या कलेंत निपुण करा, म्हणजे भाग्यसंततीस कांहीं कमतरता नाहीं. २. समर्पित सत्त्वास आत्म्या-हून भिन्नत्व नसतें, म्ह० शुद्धसत्त्व ब्रह्मरूप असतें. ३. संन्यास. ४. निष्कर्म–आत्मता येते.

भोगानें तें विविध वासनाविवश होऊन, अत्यंत मलिन झालें असतें. परमेश्वरास समर्पण केलेल्या सदाचारानें मात्र तें परमशुद्ध होऊन कर्त्याची इतकी पूर्णता करून देतें कीं, कर्मादि त्रिपुटीच पुनः उठूं देत नाहीं ! हें चळीच्या आत्मनिवेदनभक्तींत 'तंतुपटा'च्या दृष्टांतानें वरील पद्यांत आपण ऐकलेंच आहे. येथें भगवान् हा 'तंतु' असून तदर्पित कर्मादि हा 'पट' होय. भगवान् म्हणजे आपला आत्माच !

२२. आतां आपणांस भक्तीच्या अंतरंगाकडे भक्तलक्षणें दाखवीत दाखवीत वामन खालील वचनांनीं एका उच्च भूमिकेकडे म्हणजे ज्ञानाकडे कसें नेतात, पहा:—

**निर्निमित्त आपली आवडी । जे न विटे कोणे घडी ॥**
**तोचि वासुदेव ऐशी गोडी । तोचि भक्त ॥** निग. सा. ११२३
**सहज आत्मयाची प्रीती । तोचि आत्मा सर्वभूतीं ॥**
**ऐसी सर्वदा ज्याची स्थिती । तोचि भक्त ॥** निग. सा. ११२४
**जड चैतन्य सर्वही । चराचर आकार जितुका कांहीं ॥**
**वासुदेवावांचोनि नाहीं । तोचि भक्त ॥** नि. सा. ११२२
**आत्माचि[1] ब्रह्म निराकार । तोचि नित्यमुक्त परमेश्वर[1] ॥**
**साकारीं देखे निराकार । तोचि भक्त ॥** नि. सा. ११२५

२३. आत्मज्ञानी भक्तांस भक्तवत्सल भगवंताच्या सगुण-निर्गुण या उभय रूपांचा साक्षात्कार त्यांच्या यथार्थ भक्तिमाहिम्यानें होतो. गुणत्रयांचा ( सत्त्व, रज, तमांचा ) विटाळ नाहीं, म्हणून

---

१. आत्माच निर्गुण ब्रह्म व सगुण परमेश्वरही. वरील वचनांत सज्ञान भक्तीच्या तिन्ही चढत्या भूमिका क्रमानें दिल्या आहेत, त्या अशा :— १ देहांत परमप्रिय देव पाहणें, ही पहिली; २ तो आत्मदेव सर्वभूतांत पाहणें ही दुसरी. आणि ३ चराचरांत-जडचेतन आकारांत निराकार असा आत्माच एक परब्रह्म भगवान् होय असें अंतर्बाह्य पाहणें ही तिसरी भूमिका.

सगुण भगवान्‌ही भक्तांस निर्गुण ब्रह्म होय. 'ब्रह्मणोहि प्रतिष्ठाऽहं' इत्यादि भगवद्गीतावचनांत हेंच मर्म आहे.

**शुद्धसत्त्व ब्रह्मचि केवळ । साकार दिसे भक्तवत्सल ।।**
**गुणत्रयाचा विटाळ । जेथें नसे ।। –नि. सा. १।१२६**

जशी ज्याची दृष्टि, तशी त्यास सृष्टि; भक्तास साकार–निराकाराचें किंबहुना यथार्थ ज्ञानानें म्ह. ईश्वराच्या शुद्धसत्त्वमय-विद्या-उपाधीनें सकल उभय रूपांच्या विवर्तांचें तत्त्व एक अधिष्ठान आत्म-भगवानच असा अखंड ऐक्यतेचा साक्षात्कार असतो. अर्थात् साकार देव त्यांस दिसला तरी तत्त्वतः तो निराकार ब्रह्म आपला आत्माच होय, ही खूणगांठ त्यांनीं हृदयांत पक्की बांधलेली असते. सोन्याचा अलंकार केवळ सोनें नाहीं, असें कोणी म्हणेल काय? एवंच,

**तोही भक्तांचे दृष्टी दिसे । परि तेथें आकार नसे ॥**
**भजती जैसें तैसें । फळ दे कल्पवृक्ष ॥ नि. सा. १।१२७**

श्रीकृष्ण भगवानाची स्तुति करितांना प्रत्यक्ष ब्रह्मदेव म्हणतात,

**अमृत म्हणति मोक्षा तोचि तूं अंबुजाक्षा ।**
**सगुण अगुण लक्षा, येसि जो भक्तपक्षा ॥**

२४. 'सगुण-निर्गुणानें लक्ष्य भगवान् एकच,' हा भक्तोत्तम ब्रह्मदेवासारख्यांचा निसर्ग पाहून, चतुर साधकजन श्रवणमननानें निर्गुणास जाणतात, व अक्लेशतः मनोनाश–वासनाक्षयाकरितां व समाधि-विश्रांति प्राप्त होण्याकरितां 'आपला निर्गुण आत्माच सगुण भगवान् होय,' या खुणेनें षड्गुणैश्वर्यशाली भगवंतास भजतात.

**जाणूनि याचिकरितां अगुणासि[१] योगी ।**
**ऐक्यें करोनि भजती सगुणाचिलागीं ॥**

१. निर्गुणास.

**स्वात्मैक्यभक्ति करितांचि जनार्दनाची ।**
**आनंदसागरिं मुरे लहरी मनाची ॥** —ब्रह्मस्तुति.

देवेंद्राशीं निकरानें युद्ध करणाऱ्या जीवन्मुक्त भक्तराज वृत्रासुरानें परमसंकटसमयींच्या प्रारब्धभोगांतही अनन्यभक्तीची याचना जशी भक्तवत्सल भगवानाजवळ केली, तशीच चतुर साधकही नित्य सप्रेम करीत असतो. कारण, सिद्धांचे जे भक्तिस्वभाव, तोच साधकांचा साधनमार्ग होत असतो.

२५. शिष्यः—जीवन्मुक्त वृत्रासुरानें भगवानापाशीं भक्तियाचना कशी केली ?

गुरुः—वामनांनीं एका गोड श्लोकांत तिचें बरोबर प्रतिबिंब वठविलें आहे, तो श्लोक ऐक.

**प्रियोत्कंठता[1] स्त्रीस जैशी वियोगीं ।**
**मला प्रीति ते दे हरी नित्यें योगीं ॥**
**जशी भेटि अत्यंत काळें पतीची ।**
**सदा भक्ति ऐशी असो श्रीपतीची ॥** –भक्तिमाहात्म्य १३

‘ पतिवियोगांत सतीस जशी उत्कंठा लागते, श्रीहरे ! मला तशी उत्कंठाभक्ति नित्य दे, ’ हा वरील श्लोकाचा भावार्थ होय.

२६. आतांपर्यंत केलेल्या विषयविवेचनाचें येथें सिंहावलोकन करणें अवश्य आहे

( १ ) संसारदुःखांतून आपण आपला उद्धार करणें हें अधिकारी मानवाचें आद्यकर्तव्य होय, हा वामनी श्लोकांचा पहिला मुद्दा.

( २ ) नवविधा भक्तींपैकीं कोणत्याही एका उत्कट भक्तीनें आपणास संसारसागराच्या पार जातां येतें, हा दुसरा मुद्दा.

---

१ पतीची उत्कंठा. २ वियोगांत उत्कंठेनें प्रिय वस्तूचें तीव्र स्मरण झाल्यानें संयोग घडतो.

( ३ ) परंतु अज्ञान्याच्या सगुणभक्तीपेक्षां ज्ञान्याची सगुण भक्ति ही दिव्य व व्यापक कशी असते, हें निगमसारवचनावरून, भक्तराज बळीच्या आत्मसमर्पणावरून व भाग. स्कंध ६ तील वृत्रासुराच्या उद्गारावरून चांगलेंच लक्षांत येतें.

तात्पर्य, अशी सद्गुणवती भक्ति ही मुक्तिदायक, म्हणून ती मुक्तीपेक्षांही थोर नाहीं, असें कोण म्हणेल ?

२७. शिष्यः—अज्ञानी जीवानें प्रेमपूर्वक केलेली सगुणभक्ति व ज्ञानी महात्म्यानें प्रेमपूर्वक केलेली सगुणभक्ति यांत विशेष फरक कोणता हें मला अधिक स्पष्ट करून सांगावें.

गुरुः—भक्तवर्य वामनानेंच हें सदृष्टांत थोडक्यांत उत्तम निरूपण केलें आहे, तें ऐक !

आत्मत्वें सकळांची आवडी । परी कोणी नेणती हे गोडी ॥
आत्मज्ञानी एक घडी । ते गोडी न विसरे ॥ निग. सा. १।१२९
जे भेदें भजती । ते भक्तीचें रहस्य नेणती ॥
निर्निमित्त आपुली प्रीती । त्यासि जाणती देहत्वें ॥ नि.सा. १।१३३
जीवेश्वर दोघे आत्मरत । त्यांत जीव तितुके भ्रांत ॥
भ्रांति फिटतां सहज अत्यंत । परस्परें प्रीति आयती ॥नि.सा. १।१३०
बहुतां स्त्रियांचा पती । समान सकळांची प्रीती ॥
परी नवोढा[1] तितुक्या नेणती । तरुणी भोगिती सर्वदा ॥नि. १।१३१

अज्ञाच्या भक्तींत भेदाचा दंश असतो, म्हणून तीस उपासना म्हणतात व ज्ञान्याच्या भक्तींत आत्मप्रेमाचा ऐक्यस्पर्श बोधाबरोबर स्फुरतो, म्हणून तीस केवळ दिव्य-भक्ति म्हणतात. दृढ उपासना भक्तीपासूनच, दिव्य भक्ति म्हणजे सज्ञान भक्ति, श्रीहरिगुरुकृपेनें प्राप्त होते, असें—' भक्त्या संजातया भक्त्या '

१. तारुण्यांत न आलेल्या, अल्लड.

इत्यादि वचनानें भाग. ११ व्या स्कंधांत सांगितलें आहे; म्हणून— 'भक्तिर्जनित्री ज्ञानस्य' म्हणजे 'ज्ञानास प्रसवणारी जननी भक्तिच,' म्हणून हिला कदापि कोणींहि सोडूं नये.

मात्र उपासनारूप भक्ति ही कर्तृतंत्र म्हणजे कर्त्यानें केली तर ती होऊं शकते, तशी दिव्य-केवळा-भक्ति नव्हे; कारण ती एकदां का प्राप्त झाली, म्हणजे सर्व करणें संपतें. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'अद्वैत भक्तींत क्रिया नसते.'

**'क्रिया कीर न साहे। परी अद्वैतीं भक्ति आहे'** –ज्ञानेश्वरी

अशा भक्तीस भागवत-टीकाकार श्रीधराचार्य ज्ञानाचें प्रकारांतरच म्हणतात.

२८. शिष्यः—गुरुमहाराज! भक्तीचें फल जर मुक्ति आहे, तर तीहून म्हणजे भक्तीपेक्षां मुक्तिच श्रेष्ठ होय, असें सिद्ध होत नाहीं काय?

**भक्तिनें हरिहि मुक्तिच दावी। मुक्ति थोर तरि कां न वदावी?**
भक्तिमा० १७

गुरुः—तूं म्हणतोस तशी मुळांत वस्तुस्थिति नाहीं, हें एका लौकिक उदाहरणानें ऐक.

**सोनियाचिकरितां परिसाची[१]! श्रेष्ठता वदति हे परिसाची[२]॥**
**त्या महत्व, न तथापिहि हेमीं। भक्ति थोर म्हणतों तशि हे मी॥**
भ. मा. १८

लोखंडाचें सोनें करणारा परीस हा त्याहून नित्य श्रेष्ठच होय, हें कोणीही कबूल करील! उलटपक्षीं सोन्याच्या लोभानें परिसाची उपेक्षा करणाराचा जसा तोट्याचा व्यवहार होतो, तद्वत् भक्तीस

१. लोखंडाचें सोनें करणारा पाषाण २. ऐका.

टाकून मुक्तीस कवटाळणाराचा व्यवहारही तोट्याचाच !

लोभ जो धरुनिया कनकाचा[1] । टाकितो परिस तो जन काचा[2] ॥
घे सवर्ण, परिसास उपेक्षी[3] । भक्तितें त्यजुनि मुक्ति अपेक्षी ॥

भक्तिमाहा. १९

भक्तीच्या सुखवैभवाचा अनुभव नसल्यामुळें बहुतेक मुमुक्षु लोक पुनर्जन्मरूप संसारास उगीच भितात. त्यांनीं शांतपणें विचार करावयास पाहिजे कीं, 'मृगजळांत का सूर्य बुडत असतो ?' किंवा 'अमृतपान करणारास का कधीं मरण येणार आहे ?' अहो, ज्यांचा सांभाळ करणारा जगत्साक्षी समर्थ भगवान्, त्यांना कोठून, कशाची व काय म्हणून भीति असणार ?

भक्तिच्या निजसुखानुभवासी । नेणतां जन भितात्ति भवासी ॥
कां बुडे मृगजळांत रवी[4] हो । नेणती खुण अशी बरवी हो ! ॥

भक्तिमा. २०

असो हें, अहो ! ज्यास पीयूष[5] पाळी ।
जरा[6]-मृत्यु कैचा तयाच्या कपाळीं[7] ? ॥
स्वयें विश्वसाक्षीच[8] रक्षी जयाला, ।
अजी ! काय भी[9] त्या महाराजयाला ?। भ. मा. २१

मुक्तीपेक्षां भक्तिच किती तरी गोड, हें वामन एका मार्मिक दृष्टांतानें पटवितात,

मुक्तिही बरि न यास्तव लोकीं । भक्ति गोड बहु मानवलोकीं[10] ॥
जो स्वयें रस तया रस नाहीं[11] । भक्तिमाजिं रसही रसनाही[12] ॥

भक्तिमा. ३

१. सोन्याचा. २. कच्चा, अविचारी. ३. टाकितो. ४. सूर्य. ५ अमृत. ६ म्हातारपण. ७ नशिबीं. ८ ईश्वर. ९ भय. १० मनुष्यलोकीं ११ रसास रसाची गोडी काय ? १२ वृत्तिरूपी जीभ.

अमृत जरी फार फार गोड असलें तरी त्यास जिभेवांचून स्वतः-च्या रसाची माधुरी का कळणार आहे? या दृष्टांताप्रमाणें मुक्ति-रूप परब्रह्म वस्तु सकल रसाचें अधिष्ठान असली तरी त्यास स्व-माधुरी कळणार कशी? भक्तींत तरः—

**अमृत आणि तया रसना असे। स्वरस[1] नित्य नवे सुजना असे॥**
**रसचि मुक्ति,परंतु न जीभली। म्हणुनि तीहुनि भक्ति अजी भली॥**

भ. मा. ५

भावार्थः—भक्तींत ज्ञानस्वरूप अमृताची प्राप्ति असून बाधित शुद्ध-सत्त्व वृत्तीच्या जिभेनें तें तीस उपभोगितां येतें. परंतु ज्ञानस्वरूप कैवल्यमुक्तींत सकलवृत्तींचा निःशेष बाध असल्यामुळें तेथें रस-ग्रहणाचें साधन नसतें. सारांश, उभयानुभवाची भक्ति, ही मुक्ती-हून थोर होय.

२९. पूर्वपक्षीः—एकदां श्रवणमननविचारानें आत्मज्ञान झाल्यावर मग दृढ अपरोक्ष ज्ञानप्राप्तीस किंवा निर्गुण पूर्णब्रह्मप्राप्तीस अंतरंग-साधन अशी निर्गुणोपासना करणेंच उचित! कारण ज्ञानबोध झाल्यावर दृढ अपरोक्षाकरितां निर्गुणोपासना न करितां जर सगुण भजनाकडेस पूर्वीप्रमाणें प्रवृत्ति ठेविली, तर ज्ञानाचा परिपाक होणार कसा?

सिद्धांतीः—आग्रही निर्गुणोपासकांस 'सगुणप्रेमा हा ज्ञानविरोधी आहे,' असें त्यांच्या दृष्टीनें वाटत असल्यास वाटो; परंतु विचार-जन्य ज्ञानसाधनाशीं किंवा यथार्थ अपरोक्ष ज्ञानाशीं भक्तीचा किंचितही विरोध नाहीं. कारण, सज्ञान भक्ति ही निर्गुणोपासनेचें प्रकारांतर होऊं शकते. यास दृष्टांतः—सोन्याचें प्रकारांतर अलंकार, हें सोनेंच नाहीं का? शिवाय प्रेमभक्ति ही यथार्थ ज्ञानामधील

---

१ आत्मरस.

कामादि सकल विघ्नसमूहांचा सर्वथैव नाश करून, अक्लेशतः अव्युत्थान-समाधि-ज्ञान देणारी होय; हें गीताभाष्यवृत्तिकार श्री-मधुसूदनसरस्वतींनीं 'गूढार्थदीपिके'च्या उपोद्घातांत सप्रमाण प्रति-पादिलें आहे. यावरही कोणी दुराग्रहानें पूर्वपक्षच घेऊन बसल्यास वामन म्हणतात,

अशी भक्तिरसविघाती ज्ञानपक्वता ?

**जळो पक्वता ते मला तों न यो[1] गा !'**

हाच विषय पिलु—पक्षिणीच्या दृष्टांतानें विशद करतांना पुढील ३ श्लोकांत वरील उद्गाराचा चौथा चरण थोड्या फरकानें गातात.

**फुटोनी जयीं पांख[2] ये शक्ति पक्षीं[3] ।**
**न मातेस मानील तो गोड पक्षी ॥**
**म्हणीं वीसरे पक्व मी भक्ति-योगा ।**
**जळो पक्वता[4] ते मला तों न यो गा** ॥ भ. मा. ९

खऱ्या विचाराच्या अभावीं निर्गुण झाली तरी उपासना ही एक सात्त्विक वृत्तिच ! तिनें ज्ञानपक्वता येत असली तरी भक्तीचा परिपोष होत नाहीं. उलट, सगुणप्रेमाचा विसर मात्र पडत जातो. म्हणूनच भक्तजनास अशा पक्वतेची अरुचि उत्पन्न होणें साह-जिक आहे. त्या ज्ञानपक्वतेंत आणखी कसे तोटे होतात हें वरील दृष्टांतानेंच स्पष्ट करितात,

**जयीं शक्ति पक्षीं पिलांच्या निघाली ।**
**न माता मुखीं अन्न आणोनि घाली ॥**
**म्हणीं झांकिसी पक्व होतां कृपा हे ।**
**जळो पक्वता ते, तिला कोण पाहे ?** ॥ भ. मा. १०

**पिलूं माउलीलाच सर्वत्र पाहे । मुखीं अन्न ते माय घाली कृपा हे ॥**

१. येवो. २ पंख. ३. पंखांत. ४. ज्ञानाची परिपाकदशा.

पुढें हा न हीं शून्यही भाव राहे।
जळो पक्कता इंदिरेच्या वरा[1] ! हे ॥ भक्तिमा. ११

निर्गुणोपासनेचें फळ जें कैवल्यज्ञान, किंवा देहपातानंतरची विदेहकैवल्य गति, तींत तर हा पिढ व ही मादी म्हणजेच देवभक्त हीं रहात नाहींत; मग अशी पक्कता काय कामाची ?

तर ' देवभक्त, नवविध भजन ' इत्यादि द्वैतत्रिपुटींत तुला मोक्ष कसा मिळणार ? असा कोणी चिकित्सक पृच्छकानें भक्तास प्रश्न केल्यास त्यावर त्यांचें समर्पक उत्तर असतें कीं,

कां बरें ? बंधक काय ते त्रिगुण आहेत. यथार्थ विचारानें ऐक्यबोध हृदयीं ठेवून केलेल्या सगुण भक्तीनें खऱ्या ज्ञानाचा परिपोष होऊन त्रिगुण-संसार नाहींसा होतो. मग ईश्वरावरील प्रेम-निसर्गानें अखंड तोच सर्व भावानें आवडतो.

आत्माराम शुकनारदादि संतराजे हरिगुणावर लुब्ध होण्याचें विशेष कारण तरी ' कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण ' हेंच होय.

३०. नृसिंहतापनीयोपनिषद्भाष्यांत सर्वज्ञ श्रीमच्छंकरचरणांनीं असें म्हटलें आहे कीं, ' मुक्ताअपि लीलया विग्रहं धृत्वा भजंत्येव ' म्हणजे ' संसाररूप जे त्रिगुण ' त्यांतून मुक्त झालेले जे विदेहकैवल्याधिकारी महात्मे ते देखील शुकनारदादिवत् लीलेनें देह धारण करून ईश्वराचें भजन करितात.

या मुद्याचें विशद व्याख्यान एका वामनांनींच यथार्थदीपिकेंत खंडणमंडणपूर्वक केलें आहे. वामनदर्शनांतील ' नित्यवैकुंठ ' निबंधांत ' वामनचाळिशीं ' प्रकरणीं वामनांचा हा विशेष आम्हीं ४० ओव्यांत साधिला आहे. तेथें या विषयाचें सविस्तर विवेचन पहा.

१ लक्ष्मीपते.

येथें रासिकांच्या जिज्ञासाजागृतीकरितां त्यांतील एकच ओवी घेतों,

जैसे ईश्वरोपाधिसत्त्व। तैसेचि याच्या सत्वासही अक्षयत्व[1] ॥
मुक्त वैकुंठ विष्णुरूप यांचें तत्व।
हेंच कीं सत्व नित्यत्व सम सर्वांचेंही ॥ य. दी. ७।११३२

३१. कोणा मुमुक्षूस वाटत असेल कीं, 'भगवद्भक्ति करण्याकरितां तरी पुनः गर्भवासांत यावें लागणार ना? मग तीपेक्षां अधिक क्लेशाची निर्गुणोपासनाच करून एकदांचा कैवल्यमोक्ष, म्हणजे जो झाला असतां पुन्हा गर्भाला यावें लागत नाहीं तो पटकाऊं म्हणजे झालें!' परंतु असा विचार करणारांनीं हेंही विचारांत घ्यावयास पाहिजे कीं, (१) ब्रह्मलोकापर्यंतच्या दिव्य विषयांविषयीं कडकडीत वैराग्य झाल्याशिवाय निर्गुणोपासनेचें ज्ञान टिकत नाहीं. शिवाय, (२) निर्गुणोपासनेच्या ध्यानास कोणताही आलंब नसल्यामुळें अधिकतर क्लेशच होतात, असें प्रत्यक्ष भगवान गीतेंत सांगतात. एवंच, दोन्ही मुद्यांचा विचार करितां कोणत्याच उपासनेची सिद्धि नसल्यामुळें अनादि वासनावेगानें पुनः गर्भांत येण्याचें तर टळत नाहीं; मग याच जन्मापासून भक्ति करण्याचा निश्चय करून, तिच्या पूर्णतेस आणखी जन्म घ्यावा लागल्यास भ्यावें कां?

३२. वामन म्हणतात, अनन्य भक्ति करणाराचीं सकल कर्में जर येथेंच क्षीण झालीं, तर पुढील जन्मीं त्यास गर्भवासांत यावें लागत नाहीं. भक्तीच्या सामर्थ्यानें त्यास पुढील देह लीलेनें धारण करितां येतो. मग तो वैकुंठीं, ब्रह्मलोकीं वा भूलोकीं कोठेंही निर्माण होवो. काय आश्चर्याची गोष्ट आहे पहा! हें

१ लीलाशरीराची ईश्वरवत् मुक्तविद्याउपाधि असते; म्हणून सर्वत्र समब्रह्मरूपता.

आम्ही न्यायानेंही मांडून दाखवितों. प्रतिज्ञा:—

कित्येक येवोनि पुन्हा भवासी। जन्मोनिही होति न गर्भवासी ॥

कारण, भक्तिप्रतापानें त्यांचीं कर्में अत्यंत क्षीण झालेलीं असतात हा हेतु. ज्या ज्या ठायीं क्षीणकर्मता, तेथें तेथें त्रिगुणांचा संपर्कही नसतो, ही व्याप्ति. यास दृष्टांत सनकादिक, नारद, पृथु, मनु इत्यादि अनेक आहेत.

मा ताच नाहीं सनकादिकां हो।
म्हणून भवासही धाकति भक्त कां हो? ॥ भ. मा. २२

म्ह. भक्तांस संसारीं जन्म नसतो हें सिद्ध!

सत्संगांत भक्तीचा पराकाष्ठेचा विकास होऊन ही स्थिति प्राप्त झालेल्या देवर्षि नारदाची कथा भागवताच्या उपक्रमांत अशी आहे कीं:—

जन्मांतरीं उद्भव नारदासी। पोटीं जिच्या ते अति नचि दासी ॥
सत्संगतीनें भजतां अजाला। गर्भाविणें उद्भव त्यासि जाला ॥
भ. मा. २३

पश्चात्ताप पावलेल्या अजामिळानें म्हातारपणीं अनन्य भक्ति केल्यावर त्यास देहांतीं भगवत्साधर्म्याचा श्यामसुंदर, पीतपीतांबरधारी, चतुर्भुज देह मिळून त्याचा नित्य वैकुंठांत प्रवेश झाला, असें भागवत, स्कंध ६, अध्याय १ ते ३ आधारें लिहिलेल्या नामसुधेंत वामन म्हणतात:—

करिं गदांबुज[1] अंबुद[2] सावळा। कटितटीं तडिदंबर[3] मेखळा ॥
सतत षोडशवार्षिक कोंवळा। हरि करी, हरिनाम अजामिळा ॥
—नामसुधा अ. २। ३।४६

१. गदा + अंबुज = गदा व कमळ. २. मेघ. ३. तडित् + अंबर = विजेसारखें दिव्य वस्त्र.

सारांश, कोठें दासीपुत्र व कोठें दिव्यदर्शन नारद ! तसाच कोठें पापराशी अजामिळाचा देह व कोठें भगवद्देह ! म्हणून भक्तास गर्भांत यावें लागतें, असा नियम नाहीं, हें सिद्ध झालें.

३३. आतां गर्भवासांत आलेल्या भक्ताचें सांकडें तर परमेश्वरास ! भक्तास काय त्याचें ? यास दृष्टांत 'प्रल्हादाचा.'

प्रल्हाद आला जरि गर्भवासा । तें सांकडें त्याच जगन्निवासा ॥
समूळ संसार मृषाच[1] वाटे । गर्भीं असा लावियला सुवाटे[2] ॥

भक्तिमा. २६

गर्भांत असतांच प्रल्हादानें नारदबोधाची हरिकृपा कशी ओळखिली, हें वामन दृष्टांतासह सांगतात:—

जो स्वप्निंच्या अजगरें[3] गिळिलाचि सारा ।
जो पावला विषमया उदरा असारा ॥
जागें तयास करितां स्मरतां न पाहे ।
प्रल्हाद गर्भगत[4] देखतसे कृपा हे ॥—भक्तिमा. २८

या श्लोकाचा विवरणार्थ असा:—

एका मनुष्यास असें स्वप्न पडलें कीं, आपण रानांत चाललों असतां एका मोठ्या अजगरानें आपणास संपूर्ण गिळिलें. इतक्यात कोणीं जागें केलें. तेव्हां तो जागा झालेला आश्चर्यानें आपणाशींच म्हणाला, 'अरे ! हें तर स्वप्न ! तें किती विचित्र ! पाहिलें तरी लटकेंच ! !'

या दृष्टांताप्रमाणें विषारी घाणेरड्या उदरीं आला तरी सद्गुरुबोधानें स्वरूपीं जागा झालेल्या प्रल्हादास या जन्मरूपी स्वप्नापासून पीडा झाली नाहीं; श्रीहरिकृपा ती हीच ! !

१. खोटा २. सन्मार्गास ३. मोठ्या सर्पानें. ४ गर्भातील.

श्री शुकाचार्यांचा अनुभव पण असा तर खराच, पण त्यांच्या जीवनन्मुक्तिदशेंतील मौजा तर फारच विलक्षण! हें भक्तीच्या फळांचें संकलन करून वामन गातात:—

असोनियां ज्ञानहि भक्तियोगा।
न सोडतां, 'मुक्ति' म्हणे 'न यो[1] गा!'॥
शुकास त्या गर्भ खरा न वाटे।
वृक्षांत 'ओ' दे स्वपित्यास वाटे[2] ॥—भ. म. २९

ज्ञानाच्या पूर्णतेनें गर्भांतून बाहेर येतांच समाधिसुखानें इतस्ततः स्वैरसंचार करणाऱ्या सर्वस्वरूप शुकामागें मोहानें जेव्हां व्यास, 'अरे शुका, अरे शुका!' अशा हांका मारूं लागले, तेव्हां त्यास वृक्ष 'ओ' देऊं लागले, अशी शुकाचा अधिकार दाखविणारी भागवतारंभीं कथा आहे.

सारांश, भक्ति-ज्ञानाच्या उभयतोमुखी रंगांत दंग झालेल्या नित्यसमाधिमंत वैराग्यश्रीमंत शुकास आपण गर्भास आलों, हें खरें वाटलें नाहीं!

एकंदरींत गर्भदुःखाचें भय मनांत न धरतां साधकोत्तमानें नित्य अनन्य भक्तिच करावी. त्यांत त्याचें परम कल्याण आहे.

## ३. ज्ञानशास्त्र

३४. देवानें पापी अजामिळाला देहांतीं वैकुंठीं नेलें, तसें तो कृपाळु आपणांसही स्वधामास नेईल, अशा सामान्य भक्ताच्या निश्चयाप्रमाणें नित्य अनन्य भक्तांचा ढिला निश्चय कधींच नसतो. त्यास गुणत्रय--मायासंसारींच्या दुःखांतून तात्काळ मोक्ष व्हावा, झट्कन सुटावें, अशी खरी मुमुक्षुता असल्यामुळें व्याकुळतेची तीव्रता असते. म्हणूनच तो संतसद्गुरुसमागमें सज्ञान भक्तांचा,

१ येवो. २ वाटेनें.

वा भक्तिपूर्वक ज्ञानाचा, ध्यानाचा साक्षेपानें अभ्यास करितो व यथार्थ ज्ञानसंपन्न होतो; मग भगवत्कृपेनें येथेंच, या भूलोकींच, जिवंतपणींच त्यास ज्ञानाचें, वैकुंठादि सकळ मोक्षसुखाचें, महावैभव कसें लाभतें, हें वामन एका श्लोकानें सांगतात.

सायुज्यादि मुक्ती[1]-सुखें याचि देहीं।
असे भोगुनी, वर्ततो तो विदेही[2] ॥
निजानंदबोधीं निजीं[3] नीज[3] पाहे[3] ।
चिदात्मा[4] जगीं, वामनाची[5] कृपा हे ॥

——भाग. ३ पृ. ४६ श्लोक ७

३५. शिष्य:—आम्हांस श्रवणमननानें ज्ञान झालें म्हणजे झालें; कारण 'ज्ञानादेव तु कैवल्यम्।' म्हणजे 'कैवल्यमोक्ष ज्ञानानेंच होतो,' असें श्रुति सांगते. मग भक्ति करण्याचें लोढणें आमच्या गळ्यांत उगीच काय म्हणून अडकवितां?

गुरुः—हा मूर्खा! भक्तिरहित सवृत्तिक ज्ञानास का ज्ञान म्हणतात? ज्या ज्ञानानें श्रुति मोक्ष सांगते, तें यथार्थ ज्ञान, निर्वृत्तिक समाधिज्ञान होय; म्हणून

सवाई

जाणणियाविण[6] जाणसि काय तुं? 'जाण[7]' तुझेंचि तुला न कळे
जागृतिस्वप्नसुषुप्तित हेंच[7] अशा स्वसुखीं मन कां न वळे?
जाणणें[7] रूप तुझेंचि असे[7] परि देहि मि[8] आपण बुद्धि चळे।

भावार्थ——वामन म्हणतात, तूं 'जाणण्यावांचून जें जाणणें' तें काय जाणणार आहेस? तें 'जाण' म्ह. ज्ञान तुझें यथार्थ

१ मुक्ति चार प्रकारच्या, त्या अशा:——(१) सलोकता. (२) समीपता. (३) सरूपता. (४) सायुज्यता. २ जीवन्मुक्त. ३ आत्म्यांत आपणास पाहतो. ४ हा कर्ता. ५ वामनस्वरूप ईश्वराची. ६ जाणणें या वृत्तीवांचून, ७ ज्ञान. ८ मी देही.

स्वरूप खरें; परंतु चित्तशुद्धि व एकाग्रता नसल्यानें तें तुला आत्मत्वानें जाणतां येत नाहीं. जागृदादि विषम अवस्थांत समतेच्या सुखानें हेंच नित्य नांदतें असें कळतेंही; पण देहादि अभिमानी बुद्धिचांचल्यानें स्थिरता राहात नाहीं; म्हणून पुनःपुनः भ्रम होतो. ही परिस्थिति निवळण्यास साधन एकच !

श्यामसमागमें[1] चित्त मिळे तरि हें निजरूप तयीं निवळे ॥

—भा. ३ स्कु. १०

म्ह. भगवद्भजनानेंच आत्मसूर्यावरील मालिन्याचे ढग वितळतील !

३६. जीवानें अनन्य भक्तीच्या अभ्यासानें प्रथम स्थिरता संपादावी. म्हणजे शुद्ध सत्त्वोदयानें ब्रह्मसाक्षात्कार होतो, हें भागवताच्या ' यथायथात्मा ' इत्यादि श्लोक प्रमाणाच्या भाषांतरानें कविवर्य वामन सांगतातः—

श्रवण-कीर्तन-भक्ति जशी जशी । हरिकृपा अभिवृद्धि[2] तशी तशी ॥
जसि कृपा उपजे मधुसूदना । तसितसी अगुणीं[3] स्थिरता मना ॥

आत्म्याच्या आवडीनें सादर सतत सगुणाची भक्ति करणाऱ्या खऱ्या वैष्णवासच स्थिर साक्षात्कार ! इतरास टकमकच !

सहज आत्मपणें[4] हरि[4] आवडे । सगुणभक्ति[5] तयावरि हे घडे ॥
अनुभव स्थिर होय तया नरा । तरिच केवळ वैष्णव[6] तो खरा ॥

—नामसुधा ३।२।४१

३७. मृत्युसंकट टळून गेल्यावर वैराग्यशील झालेल्या अजामिळानें जसा अभ्यास केला, तसा अभ्यास थोड्या धैर्यानें निश्चयानें केला असतां अखंडानंद श्रीहरीच्या सगुणनिर्गुण या उभय साक्षात्कारांची किल्ली हातीं येते.

---

१ श्यामसुंदर श्रीकृष्णध्यानानें. २ वाढ. ३ निर्गुणीं. ४ इदमिव भासणारा हरी आनंद आत्मा आहे, अशा बोधानें आवडेल. ५ नवविधाभक्ति. ६ विष्णुभक्त.

शिष्य:—तर अजामिळानें म्हातारपणींही निश्चयानें अभ्यास कसा केला तें सांगावें.

गुरु—ऐक !

क्वचित्[1] गंगातीरीं हरिगृहिं हरिद्वारनगरीं ।
निजा चित्ता योजी द्विजवर चिदाकाशकुहरीं[2] ॥
दृढ प्रत्याहारें[3] नियमुनि मनीं इंद्रियगणा ।
चिदाकारें[4] चित्तें-करुनि भजतां विप्र अगुणा[4] ॥

परंतु केवळ आत्मा तर या चिदाकार चित्तवृत्तीच्याही पलीकडे किंबहुना,

न जेथें चिच्छक्ती सहजचि असे निर्गुणपणीं ।
अखंडानंदाचा अनुभव असे ऐक्य सगुणीं ॥

म्हणजे जेथें चिच्छक्तीचाही वेगळेपणानें अर्थात् वृत्तिरूपानें अनुभव येत नाहीं; कारण ती ज्या निर्गुणरूपांत ऐक्यरूपानें म्हणा किंवा सहज रूपानें म्हणा असते, म्हणून ' अखंडानंदाचा ' अनुभवही या शक्ति ( विद्यावृत्ति ) व शक्त ( आत्मा ) यांच्या ऐक्यांत होतो.

सारांश, सगुणद्वारा परमानंदाचा लाभ होतो हें सिद्ध झालें.

३८. ही मनोरूप वृत्तिसत्ता अभ्यासानें तत्त्वसरेंत कशी विलीन होते, हें एका दृष्टांतानें पटवितात.

ते दृष्टि दीपासचि पाहताहे । तेव्हां पदार्थांपरतें[5] न पाहे ॥

आपली दृष्टि जेव्हां दीपाकडे टक लावून पाहूं लागते, तेव्हां

१ कधीं गंगातीरीं तर कधीं हरिद्वारीं हरिमंदिरांत. २ मनाच्या सूक्ष्म उपाधीनें व्यापक चिदाकाशाचें ' कुहर ' ( गुहा ) म्हटलें. यास श्रुतींत ' दहराकाश ' म्हणतात. ३ बहिर्मुख इंद्रियांस गोलकांत स्थापणें. ४ विद्या-वृत्तीनें—निर्गुण भजनानें. ५ वेगळया.

तीस इतर पदार्थ दिसत नाहीं; त्याप्रमाणें ध्यानमग्न मन इतर जग न पाहतां विकार टाकून आत्म्यांत लय पावतें.

**ध्यानीं मन स्वात्मसुखीं निमालें[1] । ते विक्रिया[2] टाकुनि तेंचि झालें॥**

—ब्रह्मस्तुति

समाधि-अभ्यासानें व्यतिरेक म्हणजे सर्व जगाहून भिन्न असें ज्ञान चांगलें होतें. मग अशा समाधिसंपन्न मनास जें प्रचंड सामर्थ्य प्राप्त होतें तें काय वाणीनें सांगतां येतें !

## अन्वयज्ञान

३९. या आत्मसामर्थ्याच्या उत्साहानेंच वामन सर्वात्मभावाची घोषणा कशी करितात पहा.

**'सकळ चिन्मय[3]' काढिन मी 'रवा'[4] ।**
**जरि खरा उतरे तरि मीरवा[5] ॥**
**नग[6] समस्त अशेषचि[7] हेम[8] हा ।**
**जग तसें दिसतें, निज नेम हा ॥**—भाग. ३।८

भावार्थः—'रवा' म्हणजे नाण्याचा एक तुकडा. पूर्वी तापलेल्या तेलांत नाणें किंवा त्याचा तुकडा टाकून तो हात न भाजतां जो बाहेर काढील तोच खरा; दिव्य करण्याचा हा एक प्रकार होय. वामन म्हणतो, 'मी चिन्मय रवा काढीन. जर खरा ठरलों तर माझी स्तुति करा.' ते ही गोष्ट न्यायानें मांडतात. 'सकल जग चिन्मात्र ब्रह्म होय !' ही प्रतिज्ञा; कारण, सर्व जगाचें अधिष्ठान चैतन्य आहे' हा हेतु. 'जें कारण ज्या कार्याचें अधिष्ठान असतें, तें कार्य तद्रूप असतें,' ही व्याप्ति. यास दृष्टांतः 'सुवर्ण अलंकाराचा;' म्हणून जग चैतन्यमात्र होय, हा सिद्धांत.

---

१ गढून गेलें. २ विकार. ३ सर्व ब्रह्म. ४ नाण्याचा तुकडा, पैसा इ. ५ स्तुति करा. ६ अलंकार. ७ सर्व. ८ सोनें.

४०. शिष्यः—मग आमचा ‘ स्त्रीपुत्रा’दि संसारही ब्रह्मच म्हणावयाचा काय ?

गुरु— होय. कारण असंग आत्म्याची त्यांत अंतर्बाह्य व्यापकता आहे. अर्थात् अधिष्ठानदृष्टीनें तो परब्रह्म हरिच, पण विवर्तदृष्टीनें तो जगद्भ्रम होय !

जायासुतादि जग हें भ्रम तो असा रे –।
मायाविलास नटला हरि तोचि सारें ॥
चित्रीं विचित्र दिसतो पटिं तंतु एक ।
विश्वीं अनेक रचना हरि तोचि एक ॥—भा. ३, पृ. ४५.

४१. सुवर्णाच्या व्यापक दृष्टीनें अलंकार सोनेंच; परंतु ‘ अलंकार ’ म्हणून सुवर्णाहून एक निराळी वस्तु आहे, असें मानणारा भ्रमिष्टच नाहीं काय ? वास्तविक तर सोन्यावरील अलंकाराचा विवर्तही सोनेंच ! परंतु जोंपर्यंत वृत्तींत द्वैतभ्रम भरला आहे, तोंपर्यंत वारंवार वारंवार विचार करून अधिष्ठानाच्या (आत्म्याच्या) अन्वयस्मरणानें वृत्तीचा अभ्यास करावा; म्हणजे तो द्वैतभ्रम क्रमाक्रमानें नाहींसा होतो.

४२. जोंपर्यंत चित्तचंचलतेचा जोर आहे, तोंपर्यंत व्यतिरेक अभ्यासावरच जोर असावा. विचारपूर्वक थोडी स्थिरता साधल्यावर अन्वयी योगाकडे वळणें हितावह होतें. उलटपक्षीं, तसें न केल्यास क्षणोक्षणीं विक्षेप होऊन भ्रमास ब्रह्म म्हणण्याची पाळी येईल; म्हणून येथें सावधगिरीनें अभ्यासवृत्तीच्या सिंहासनावर बसावें.

४३. हा अन्वयाभ्यास वामनांनीं यथार्थदीपिका व उपादानादि वेदांत-प्रकरणांत फार उत्कृष्ट रीतीनें दाखविला आहे. श्रीवामन-दर्शनीं ‘ अन्वयव्यतिरेक ’ प्रकरणांत आम्ही याचें मीमांसापूर्वक विशद रीतीनें प्रतिपादन करूं.

४४. तूर्त येथें त्या सर्वांचा सारांश ज्या अधिष्ठानहरिस्मरणांत पूर्णपणें साधिला आहे, त्याच एका श्लोकाचें वारंवार मनन करावें. तो श्लोक असा:—

अनंतशक्ति भ्रम जो हरी तो। जो मोहमाया स्मरणें हरीतो ॥
स्मरेचि आत्मा जगिं स्वस्वरूपी । संसार त्याला न वसे स्वरूपीं ॥

—भा. ३, पृ. ४५

भावार्थ:— जो अनंतशक्ति ( अज्ञ दृष्टीस ) जगत्स्वरूप भ्रम तो तर (सज्ञ दृष्टीनें) पाहूं गेलें असतां हरिच ! तरी पण जो अन्वयानें जगांत आत्मा व आत्म्यांत सकल संसार आहे, असें नित्य स्मरण करितो, त्याला मात्र अभ्यासबलानें संसार भासत नाहीं !

४५ ' सर्वं ब्रह्म ' ' इदं सर्वं आत्मैव ' ' वासुदेवः सर्वम् ' या श्रुतिस्मृति हाच एक नगारा पिटून राहिल्या आहेत. ' राजविद्या राजगुह्यं ' गीता ९।२ पासून ' पश्य मे योगमैश्वरम् ' गी. ९।४ पर्यंतच्या यथार्थदीपिका-टीकेंत हेंच ' राजविद्या-ऐश्वर-योगविज्ञान ' वामनांनीं विस्तरशः प्रतिपादिलें आहे, त्याचाच संक्षेप ' अर्जुना, तूं जाण रे! ' या प्रसिद्ध पदांत देखील आला आहे. तथापि सदहू विषयाच्या दृढीकरणासाठीं त्यापैकीं थोडासा नमुना पहा:—

अंड कोटी खर्व रे ! मजमाजीं सर्व रे !
न मी त्यांत तीं न मज–माजीं हें अपूर्व रे ! !

म्हणजे कोट्यवधि ब्रह्मांडें मज आत्म्यामध्येंच आहेत खरीं; परंतु त्या कल्पितांत मी नाहीं; कारण कल्पित वस्तु कोठेंही नसतेच. म्हणून त्या अनंत ब्रह्मांडभासांत मीही नाहीं हो !

सारांश, आद्यंतमध्यें एकच अखंडैकरस प्रत्यगात्म ब्रह्मच ! येथें त्याविना दुसरी कोणतीही वस्तु नाहीं, हा परम सिद्धांत झाला.

४६. ' सर्व ' पणानें विलसणारें, वा विविधपणानें स्फुरणारें तें

विज्ञान होय. यासच ' सगुण ज्ञान ' म्हणतात. हें एक हिशेबी निर्गुण ज्ञानापेक्षां श्रेष्ठ आहे. कारण केवळ निर्गुणोपासना ज्ञानांत जगतास ' अथ ' पासून ' इति ' पर्यंत दुःखरूप, भ्रम, अतएव सर्वथैव त्याज्य, असें म्हणून व्यतिरेकी अभ्यासकक्षेवरच संपूर्ण भर दिला आहे. तसा आग्रह या सगुणज्ञानांत नाहीं; कारण यांत अन्वय ज्ञानाचे उन्नतभाव अभ्यासानें इतके परिपाकदशेला येत असतात कीं, सगुणपणांत निर्गुणपणा अगदीं दाटून जातो, किंबहूना सगुण हा निर्गुणाचा पर्यायच होतो म्हणा ना ! म्हणून वामन म्हणतात,

**निर्गुण ज्ञानाचा मुकुट । हें सगुणज्ञान उत्कट[1] ॥**
**त्याज्यांश[2] जेथें नुर निपट । रामकृष्णरूपें तैसें चराचर पाहतां ॥**
—य. दी. ९।१६४

' तरंग ' ओतप्रोत ' जल ' असल्यामुळें त्यांत टाकण्यासारखें काय आहे ? अर्थात् 'तरंग' हें 'जल'च, ही झाली विज्ञानदृष्टि; पण जोंपर्यंत बालबुद्धि आहे तोंपर्यंत 'जला'हून 'तरंग किंवा 'सोन्या'हून ' अलंकार ' वेगळे वाटतात. अर्थात् अशा बुद्धीस द्वैतभ्रमदृष्टि म्हणतात. अलंकारदर्शनाबरोबर अलंकारांतील कांहीं एक न टाकतां ' हें सोनें'च अशी जी निःशंकवृत्ति, तीच अभ्यासानें कमावलेली जगद्ब्रह्मदृष्टि, ' अद्वैत ' विज्ञान समजावें.

' तरंगांत जल ' ' अलंकारांत सोनें ' या व्याप्यव्यापकभावाच्या अन्वयाभ्यासानें कार्य—कारणाचें एकत्व दिसूं लागतांच ' अद्वैत दृष्टि ' येते व तीच पुष्ट झाल्यावर अन्वयव्यतिरेकाच्या कक्षा मोडून तिचें ' विज्ञानां-' त पर्यवसान होतें.

४७. श्रीगुरुकृपेनें आपला हा अनवच्छिन्न म्ह० परिपूर्ण आत्मा

---

१ पूर्ण भरून गेलेले. २ टाकण्याजोगें.

महत्पुण्याईनें ज्यानें जाणला, तो महात्मा का मग, ३॥ हातांच्या देहाएवढाच रहाणार आहे? कोणी जर त्यास विचारिलें कीं, 'आपण महात्मे केवढे आहांत? आम्हांस तर ३॥ हातांचेच दिसतां. यावर ते पूर्ण पुरुष अधिक तें काय बोलणार? परंतु वामन म्हणतात, ' ते मंदहास्यपूर्वक त्या पृच्छकापाशीं सहजपणें एवढे उद्गार काढतील कीं, " हा देह सात विति होईल तो कसा रे! " म्ह० " अज्ञदशेंतील देहास ' मी ' म्हणणारा भ्रमरूप आत्मा कांहींही वरळो, पण ज्ञानदशेंतील परिपूर्ण ब्रह्मरूप आत्मा सात वितींचा देह कसा होईल? हा गोड श्लोक संपूर्ण असा:—

जाणेल जो गुरुकृपेस्तव आपणातें।
तो कां स्मरेल नसत्या पहिलेपणातें!॥
तो तूंच कीं, म्हणुनि पूसति लोक सारे।
हा देह सात विति होइल तो कसा रे!॥

—भा. ३, पृ. ४०

तात्पर्य, अद्वैतविज्ञानानें आपलें निरुपम ऐश्वर्यसाम्राज्य भोगणारा आत्माच अव्यवहार्य प्रत्यक् ब्रम्ह होय.

४८. अशा रीतीनें साधनाभ्यासमार्गानें स्वतः कृतकृत्य होऊन, जगास अधिकाराप्रमाणें उपदेश करून सन्मार्गास लावणारे थोर महात्मे ते परमेश्वराप्रमाणें सर्वत्र परम पूजनीय होतात; परंतु ' सर्व ब्रम्ह ' म्हणून त्या निष्ठेचा अभ्यास न करणारे जे ज्ञानाभिमानी—वाचाळ, यथेष्टाचरण करितात, त्यांची जगांत 'छी थू' होते; कारण उघडच आहे कीं,--

काळुखि लाविति जे गगनासहि काळुखि लागे करिंच वरी।
भूचर भानुवरी जरि थुंकिति; थुंकि पडे वदनांचिवरी॥

—भा. ३ पृ. ५१

१ मिथ्या. २ जमिनीवर चालणारे, मनुष्य. ३ तोंडावर.

भावार्थ--असंग ब्रह्माचे ठिकाणीं कोणताही मल नाहीं. यास दृष्टांत ' आकाशाचा '. परंतु आकाशाप्रमाणें निर्मळ असें अभ्यास-मार्गानें ब्रह्म न होतां भ्रमानें ' मी असंग ब्रम्ह, किंवा सर्व ब्रम्ह ' असें म्हणून जे अनादि कामादि वासनेला फुकट बळी पडतात, त्यांची स्थिति वरील कवितेंत वर्णिलेल्या दृष्टांताप्रमाणें हुबेहुब आहे. म्हणजे ' आकाशाला काजळ वा कोळसा लावणाराच्या हातालाच तीं लागून राहतात, किंवा सूर्यावर थुंकणाराची थुंकी उलट त्याच्याच तोंडावर पडते ! '

४९ असो; याच्या उलट—संतांची सदाचारानें वाढलेली थोरवी पहा:—

कर्म करूनि अकर्म, तथापिहि धर्मविरुद्ध कदा न करी ।
त्यासिच वंदिति वंद्य, जगत्रय हे म्हणे वामन त्याचिपरी॥ भा. ३५.५१

वर्णाश्रमधर्माच्या राहाटीनें ते सावधानपणें सदाचार करितात, पण त्यांचीं तीं कर्मं सहजच भगवदर्पित होत असल्यानें तें नैष्कर्म्य आत्मरूपानेंच राहतात. मग अशा पुरुषधुरंधराला वंद्य इंद्रादि देव किंवा तिन्ही लोकही वंदन कां बरें करणार नाहींत ?

ज्ञात्यास ईश्वराची आज्ञा पण अशीच आहे, हें ब्रह्मदेव गातात:-

श्रवण मनन साक्षात्कार ज्या ज्ञानदीक्षा ।
तव तनु करि शिक्षा कीं जगीं धर्मरक्षा ॥ —ब्रह्मस्तुति.

५०. त्या संतराजराजेश्वरांचा जीवन्मुक्तींतील भक्तीचा मंगल निसर्ग कैवल्यपर्यवसायी किंवा भगवत्पर्यवसायी प्रार्थनेचाच कसा असतो हें वामन स्वसदाचारानें सदृष्टांत कथन करितात. सवाई——

जान्हवि सागरिं ऐक्यहि पावुनि भेटि अखंड तयास तिला ।
त्याचेचि मेघमुखें जल घेउनि मेळवि त्यांतचि त्या सलिला ॥
सर्वहि तूजमधें, सकळांत तुं, ये रितिनें दिसतोसि मला ।
भक्ति अशीच असो म्हणे वामन मुक्ति कदापि न मागुं तुला ॥

टीप :-दृष्टांतांतील 'जान्हवी म्ह. गंगा' हिनें दृष्टांतांत कैवल्यपर्यवसायी किंवा भगवत्पर्यवसायी विद्यास्फूर्तीचें ग्रहण करावें. तसेंच आपणांत सागरांतील जल घेण्याचें गंगेस जसें मेघ हें द्वार आहे, तद्वत् कल्पित प्रतिबिंबाचा भक्ताचा जीवभाव होय. त्यापासून निघालेली अंतःप्रेम-प्रवाहाची गंगा ही तर जगत्पावनी होते.

* * * *

जगत्प्रतिबिंबधारी अद्भुत आत्मश्रीहरिदर्पणांतील अपार लीलांचा आल्हादकारक अनुभव एका भागवतोत्तमासच माहीत. वामन तो साश्चर्य वर्णितात,

सिद्धांत सवाई

विश्व समस्त दिसे तुज अंतरिं आरसियांत जशी नगरी ।
कांहिंच जें न दिसे तुजवांचुनि भासवितोसि तुं तूजवरि ॥
बिंबचि तें प्रतिबिंब चराचर मूर्ति, परोपरिच्या कसरी ।
चित्सुख-पूर्ण सदोदित दर्पण तूजहि काय अशक्य हरि ॥

—सि. स. ११ वा. का. भा. ३

५१. अनेक जन्मांच्या निष्काम पुण्याईनें सर्वत्र 'ब्रह्म' किंवा भगवान' दृष्टि होते, हें शास्त्र-संत कंठरवानें सांगतातः—

बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते । —गीता
नैकजन्मांतराभ्यासाद्भक्तिमान् गरुडध्वजे । —भारत
बहुता सुकृताची जोडी, म्हणुनी विठ्ठलीं आवडी ॥

म्हणून आपणही आपल्या वर्णाश्रमधर्मांनीं श्रीहरीचा परम संतोष करून प्रथम त्याची कृपा संपादावी, हें वामन उपदेशितात.

आवश्यकें करुनिया विहितें[1] स्वकर्मै ।
निष्काम तीं तुज समर्पिति विष्णुधर्मे ॥

१ शास्त्रानें सांगितलेलीं.

कर्मार्पणेंचि तुझि आवडि त्या जनाला ।
तूझ्या कथा मग हरी! रुचती तयाला ॥
—ब्रह्मस्तुति १।१।६३

या युक्तीच्या हातवटीनें ' योगावांचुन मोक्ष ! '

कर्मार्पणें तव कथाश्रवणेंचि ज्याला ।
त्वद्भक्तिचा परम दुर्लभ लाभ झाला ॥
आत्मैक्य आवडि तुझी कळली मुकुंदा ।
झालेच सिद्ध[1] न करोनिहि योगधंदा[2] ॥—ब्रह्मस्तु. १।१।६४

वर्णाश्रमविहित निष्काम धर्माचरणाच्या आर्यसंस्कृतीनें जशी जशी प्रत्येक व्यक्तीची, कुटुंबाची, समाजाची क्रमाक्रमानें चित्त-शुद्धि होऊन सुशीलता वाढत जाईल, तसतसा त्यांचे हृदयीं भगव-द्भावाचा सत्य उदय होऊन, अखिल जगाचें कल्याण होईल!

५२. सर्व जगांत ' अध्यात्मविद्या ' हा महानिधि भारताचाच आहे, परंतु आज तो त्यास दुर्दैवानें पारखा झाला आहे; इतकेंच नव्हे, तर त्याचा भारतांचा पुष्कळसा भाग पाश्चात्य वारुणीच्या सेवनानें आसुरी स्वभावाचा झाल्यामुळें अद्याप किती काळ त्यास आपत्तींत खिचपावें लागतें, नकळे!

येथून तरी त्यानें—भारतानें—हें निश्चित ध्यानांत ठेवावें कीं,—आपद्धर्मानें ( आपत्तींत पाळावयाच्या सूक्तोक्त धर्मानें ) कां होईना जोंपर्यंत आपण धर्मपथावर येत नाहीं, तोंपर्यंत आपणास कोठेंही यश येणार नाहीं. मग इहपर सौख्य कोठचें ? नी परमानंद महा-पुरुषार्थ तरी कोठचा ? असो.

५३. आतां या अल्पशा वामनी प्रकरणलेखनाचें फल सकल पुरुषार्थसिद्धीचें मूळ ' अध्यात्म विद्या ', तिचेंही मूळ ' परमेश्वर-भक्ति' या लाभांची तीव्र, तीव्रतर, तीव्रतम जिज्ञासा प्रत्येक

१ जीवन्मुक्त. २ निर्गुण उपासनेनें ध्यान, समाधि इ. व्यापार न करितां.

भारतीयांत उत्पन्न व्हावी व तिचा सर्वथैव उत्कर्ष ज्या आपल्या धर्म-संस्कृतींत भरला आहे, तिचें यथाशक्ति प्रत्येकाकडून सप्रेम सेवन व्हावें हेंच मी श्रीहरिगुरुचरणाजवळ विनम्रपणें मागत आहे.

---

## परिशिष्ट.

श्री वामनपंडितांवरील कांहीं आक्षेपांचा परिहार खालीं गुरु-शिष्यांच्या प्रश्नोत्तरानें केला आहे.

शिष्यः—श्रीशंकरानंद, श्रीज्ञानेश्वरादि गीताटीकाकारांनीं आरंभीं श्रीगणेशाचें—क्षुद्र देवतांचें—मंगलाचरण केलें म्हणून त्यांना गीतेचा 'अचुं-बित'—'यथार्थ' असा अर्थ सांपडला नाहीं, असें 'यथार्थ दी.कार म्हणतात, याचें इंगित काय? कारण 'थोर' महज्जन, पामराप्रमाणें व्यर्थ बडबडत नाहींत!

गुरु—श्रीगीतेची व पंडितांची मुख्य व उपास्य देवता श्रीकृष्ण आहे, म्हणून मंगलाचरण पण तिचेंच सर्वथैव इष्ट होय. 'उपास्य दैवत हें कारण-ब्रह्म मानून इतर देवता कार्य-ब्रह्मांत गणाव्यात' ही तर पुराण-पद्धति आहे. उदाहरणार्थ, स्कंद पुराणांतील मुख्य देवता श्रीशिव ही आहे, म्हणून कांहीं ठिकाणीं विधेय-स्तुत्यर्थ अर्थवाद अशी विष्णुनिंदा देखील आढळते! साराश,असा समन्वय नच मानिल्यास सर्वत्र अव्यवस्थिति होईल.दुसरें, गणेशादि देवतांचें खरोखरच पंडितांस वावडें असतें तर 'गोरस-हरण', 'विराट-पर्व' (वा. पं. का. भा. १ पहा) या प्रकरणांत श्रीगणेश-शारदेचें मंगलाचरण दृष्टीस पडलें नसतें! यावर, सदर्हु प्रकरणें 'क्षेपक' होत, अशी आधुनिक विद्वान शक्कल काढून मोकळे होतात, हें आम्हीं जाणून आहोंत, पण गोरसहरण हें प्रकरण श्रीवामनांचेंच होय, ही साक्ष त्याची सुंदर रचनाच देत आहे!

शिष्य-हें जग किंमय आहे!

गुरु—पूर्ण ज्ञात्यास केवळ चिन्मय असून, भक्तास तें भगवन्मय आहे, परंतु पामरांस त्यांच्या अनादि वासनासंस्कारबळानें भूतमयच भासतें,

त्यास कोणी काय करावें ? " हें समस्त श्री वासुदेव। ऐसा प्रतीति-रसाचा ज्या भाव । तोचि भक्तांमाजी राव । ज्ञानिया तोचि "-श्रीज्ञानेश्वरी.

शिष्य—तर अज्ञानी जीवास पूर्ण ज्ञात्याच्या किंवा भक्ताच्या सुखाचा अनुभव कशानें येईल ?

गुरु—सगुण भगवानाच्या सानन्य-दैन्यता-पूर्वक भक्तीनें प्रत्यहीं 'अनिर्द-आत्मबिंबाच्या ठायीं थोडा काल, दोनचार क्षण का होईना, प्रतिबिम्ब-रूप जीव जोंपर्यंत एकत्वविश्रांति पावत नाहीं, तोंपर्यंत पुढील अभ्यास हातीं न आल्यामुळें तो शास्त्र वाचूनही फुकट जातो. जगासह देहभावास 'अक्लेशतः' सोडण्याचें सुलभ साधन ईश्वरभक्ति हेंच होय.

शिष्य—पुढील अभ्यास कोणता ?

गुरु—विविध-ज्ञानांत जगांत आपल्या नित्य विश्रांत स्वरूपज्ञानाचें-आत्म्याचें अनुसंधान करणें, यास अन्वयाभ्यास म्हणतात. हाच पक्कदशेस गेला असतां विज्ञान म्हणजे विशेष ज्ञानानें स्वानुभव विशेषतेनें विराजतो.

सारांश, अज्ञ दशेंतलि विज्ञान विविधतेचें—नानापणाचें, द्वैताचें असून 'ज्ञ' दशेंतील विज्ञान एकत्वानुभवस्फुरणाचें असतें, हें तर शास्त्ररहस्य आहे. ( सूतसं. ब्रह्मगीता ४–५६, ५७ ) गी. अध्याय ९ मधील 'मया ततमिदं सर्वं' इ. २ श्लोकांत प्रेमवक्रोक्तीनें पण श्लोकसंगतिचातुर्यानें वामनानें तेंच सांगितलें आहे; तर श्रीभगवान भाष्यकारचरणांनीं अध्यायाच्या गोळाबेरजेनें अ. ९ च्या उपोद्घातांतच त्याचें संकलन केलें आहे. श्रीज्ञानेशांनीं त्याचेंच श्लोकटीकेंत विशद व्याख्यानांनें अनुकरण केलें आहे.

शिष्य—पण यथार्थदीपिका व भाष्य-ज्ञानेश्वरींत कांहीं ठिकाणीं विरोध कां दिसतो ?

गुरु—अरे ! दिसणारा विरोध हा साक्षात् विरोध नव्हे, विरोधाभास आहे. याचें कारण गीताश्लोकसंगतीचें स्वाभिप्रेत यथार्थ व्याख्यान हें होय. आतां तें पांडित्य प्रकृतीचें असल्यामुळें आधुनिक वेदांत्यांना तो विरोध वाटतो, इतकेंच ! वामन हे उत्कृष्ट मायावादी होत, हें कदापि विसरूं नकोस.

शिष्यः—बरें पण वामनांच्या वाङ्मयानें परमार्थात विशेष कोणतें कार्य केलें?

गुरुः—ऐक, (१) मूळ चतुःश्लोकी भागवतांतील अन्वयव्यतिरेकाच्या दोन मुख्य श्रौत कक्षा यथार्थदीपिकेंतून वारंवार अभ्यास—आवृत्तीनें माडतांना बहुत परिश्रम केले आहेत. यांच्या अभ्यास—साक्षेपानेंच पूर्ण अध्यासनिवृत्ति होते. (२) अन्वयी भक्तीशिवाय यथार्थ विज्ञानोदयाचें स्वानुभवी ज्ञान होत नाहीं. म्हणजे शास्त्रतः झालेलें आत्मसत्तेचें सामान्य ज्ञान हें विशेष रूपानें अपरोक्षत्वानें स्फुरतें तें भक्तीनेंच! हे ठायीं ठायीं ठामठोकपणें प्रतिपादिलें आहे. ( ३ ) वस्तुतः जागृत संसार जरी आभासिक आहे तरी तो मनोरथ-स्वप्नसृष्टीपेक्षां सत्य आहे; या जनप्रत्ययानुसार व्यावहारिक अनिवर्चनीय सत्तेचा अंगिकार करून, एका बिंबप्रतिबिंबवादावर विशेषतः भर दिला आहे. ( य. दी. १५ पहा. ) या वादग्रहणानें परमार्थादि अधिकारी जीवाची स्पष्टतर सिद्धि होत असून आमोक्षान्त अभ्यास—उन्नतीची स्पष्टता ज्याची त्यास चांगली अनुभवास येते. आणि ज्ञानोत्तर लीलाभजनादि व्यवहाराची देखील उत्कृष्ट संगति लागते. ( ४ ) नृसिंहतापनीयांतील भगवान भाष्यकारप्रोक्त आधिकारिक मुक्तांचा इहपरलीलाभजनस्वभाव श्रीवामनांनीं ' सर्गेपिऽ नोपजायंते ' ' तद्धाम परमं मम ' इत्यादि श्लोकटीकेंत नित्यवैकुंठगतींचा उल्लेख करीत भागवतप्रामाण्यानें जो वर्णिला आहे, तो तर वैकुंठोल्लेखपूर्वक कोणत्याही संस्कृत टीकाकारांनीं दाखविला नाहीं. किंबहुना आधिकारिक लोकगतीसंबंधीं अर्वाचीन बहुतेक वेदांत्यांत नास्तिकताही आढळते! परंतु अनेक जन्म घेणाऱ्या वासनावंत जीवांनीं ब्रह्मलोकादि पुण्यतम परलोकांचा संबंधच नास्तिक्यानें तोडून टाकिल्यास उपासनाबलावर होणाऱ्या विशुध्द सत्वोदयास जागा कुठें? तदभावीं वेदांत रुचला तरी पचणार कसा?

शिष्यः-तर मला वाटतें, साधकोपयोगी वरील उपयुक्त प्रक्रियांवर जोर देतांना यथार्थदीपिकाकारांनीं आपल्या व्याख्यानांतून अनेक वक्रोक्ति योजिल्या असाव्यात!

गुरुः–होय. काव्यास जसा वक्रोक्तिअलंकारानें रंग चढतो, तद्वत् पंडित लोक आपला सिद्धांत दृढ करण्याकरितां अनेक वक्रोक्तींची योजना करितात. त्यामुळें चिकित्सकांची मननशक्ति वाढून विचारजन्य बोधास एक प्रकारची मदत होते. उलट पक्षी अखिलात्म्या पंडितांची कोणासंबंधी मत्सरवक्रता खरी असती तर गीतासमश्लोकी अ. ९ च्या उपोद्घातीं ' संत ( ज्ञानेश्वर ) हें रत्न असून मी गुंजेसारखा, आम्हां उभयांच्या तुलनेंत संत हेच मौल्यवान ! ' ( ९-६७ ) अशी नम्रोक्ति त्यांनीं काढिली नसती. असाच भगवान भाष्यकारासंबंधीं त्यांचा परम पूज्य भाव आहे. ( चरमगुरुमंजरी, अनुभूतिलेश १४१ पहा. )

वि. सूचना — श्रीवामनीविज्ञानचाळिसी वैकुंठगतीसह, हें वामनीवचन संकलनाचें सार्थ प्रकरण विज्ञाननिरूपणावर विशेष प्रकाश पाडणारें आहे.

# १६. आत्मवृत्त आणि ह. भ. प. पांगारकर

( लेखकः–वि. बा. आंबेकर, एम्. ए. प्राध्यापक, नासिक कॉलेज)

आत्मकथन करण्याची आवड माणसाला सामान्यतः स्वाभाविकच असते म्हटलें तरी चालेल. पुस्तकरूपानें प्रकाशित झालेलीं आत्मवृत्तें पाहिलीं म्हणजे थोरामोठ्यांनीं करावयाचा हा एक प्रपंच आहे, असें सर्वसामान्य माणसाला वाटतें. पण लहानांतलीं लहान माणसेंहि घरबसल्या आपल्या आयुष्यांतील आठवणी पुन्हा पुन्हा आठवून कौटुंबिक गप्पांच्या बैठकी रंगवून सोडीत असतात. आपल्याशीं संबंध पावणाऱ्या अनेक प्रसंगांची पुनःपुनः उजळणी करून एक प्रकारचा आनंद मिळविण्याची वृत्ति सर्वांमध्यें सारखीच असते. पण कौटुंबिक गप्पांच्या मर्यादेबाहेर जाऊन आत्मकथन जाहीर रीतीनें करण्यांत कांहींतरी अनौचित्य घडेल अशा भीतीनें कित्येकजण आपले अनुभव सर्वत्र व सर्वदा सांगत बसत नाहींत. शिवाय सामान्य चाकोरींतल्या माणसाला असें वाटतें कीं, आपला आयुष्यक्रम तो काय आणि त्यांत वावरणाऱ्या बेतशीर भगदुराच्या आपल्यासारख्या प्रापंचिकाचें महत्त्व तें काय ? अशा एक प्रकारच्या भीतीनें त्याला आपलें स्वतःचें जीवनचरित्र इतरांना सांगण्याचा मोह आवरावा लागतो. वास्तविक मोठ्या माणसांनीं आत्मवृत्तांत लिहिलेले कांहीं भाग तर असे असतात कीं, ते सामान्य माणसाच्या आयुष्याशीं तंतोतंत जुळू शकतील. घरांतील बालपण, शाळेंतील जीवन, नातेवाइकांची वागणूक, आपण पाहिलेलें सामाजिक जीवन, निरनिराळ्या प्रांतांतून केलेल्या सफरी इत्यादि प्रकार, खरें पाहिलें तर सर्वांच्या बाबतींत सारखेच असतात. किंबहुना असेंहि म्हणतां

येईल कीं, आत्मवृत्त लिहिणाऱ्या माणसाच्या मोठेपणाकडे पाहून आत्मचरित्रें वाचलीं जातात. खुद्द आत्मचरित्रांतल्या निवेदनांत इतरांपासून वेगळें असें काय आहे हें बारकाईनें पाहात राहिलें तर निदान कांहीं भागापुरतें तरी साम्य आढळतें. तसले भाग सर्वांनींच निःसंकोचपणें लिहून दाखविण्यास हरकत नसावी, असें वाटतें.

पण हरकत उत्पन्न होते ती माणसाला मोठेपणाची उपाधि म्हणून लाभणें किंवा न लाभणें यामुळेंच होय. स्वतःविषयींची माहिती पद्धतशीरपणें, विस्तारानें, रसभरितपणानें आणि संकोच सोडून लिहून दाखविण्याला माणसाच्या ठिकाणीं कांहीं विशेष प्रकारची प्रौढी असावी लागते. रोजच्या व्यवहारांतील आत्मश्लाघेची अहंविशिष्ट भावना अशा बाबतींत फारशी उपयोगी पडत नाहीं. संभाषणाच्या बैठकींत चारदोन माणसें प्रसंगवशात् एकाद्याचें स्वतःविषयींचें पुराण थोड्याफार सहनशीलपणें ऐकून घेतील. पण छापून काढलेल्या ग्रंथांत ग्रंथ लिहिणाऱ्या माणसाच्या सार्वजनिक प्रतिष्ठेनें वाचक आधींच अंकित झालेला असावा लागतो. अशी आमची आत्मवृत्ताविषयींची कल्पना रूढ आहे. निदान आपल्याकडील आत्मवृत्तांच्या वाचनाचे बाबतींत तरी वाचक स्वतःच्या आणि लेखकाच्या संबंधांत कांहीं अंतर आधींच मोठ्या विनयानें राखीत असतो, आणि मगच तो आत्मवृत्तविषयक ग्रंथाला स्पर्श करतो, हें अगदीं खरें आहे. कुणीहि उठतो आणि स्वतःविषयीं कांहींतरी लिहून समाजाला सादर करतो ही गोष्ट समाजाला परवडणार नाहीं. सांगणाऱ्यानें कांहींतरी विशेष पराक्रम केलेला असला पाहिजे, अशी अट वाचकवर्गातर्फे अलिखित स्वरूपांत जाहीर झालेली असते ! मग हा पराक्रम अध्यात्मांतला असो, राजकारणांतला असो, रणांगणावरचा असो किंवा विद्येंतला असो. विशेषतः मराठी वाङ्मयांत तरी एकादा

अपवाद वगळल्यास हें म्हणणें कुणालाही सहज पटेल अशाच प्रकारचीं आत्मवृत्तें आजवर प्रकाशित झालेलीं आहेत.

अशा पराक्रमी लोकांच्या आत्मवृत्तांची मागणी वाचकवर्गाकडून व्हावी यांत फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. शिवाय अशा प्रसिद्ध व लोकप्रिय लेखकांना किंवा कार्यकर्त्यांना आपण स्वत:विषयीं कांहीं सांगावें असें वाटून त्यांनीं आत्मकथन केलें तर त्यांतही अस्वाभाविक असें काय आहे ? मोठमोठ्या कार्यकर्त्यांना कित्येक वेळां असेंहि वाटतें कीं, लोकांसमोर जो आपला चरित्रक्रम प्रत्यक्ष घडला तो कांहीं त्यांना आपला परिचय पूर्णपणें व यथासांगपणें करून देईल इतका तपशीलवार व सविस्तर घडलेला नाहीं. किंबहुना आपलें कार्य चांगल्या रीतीनें लोकांच्या ध्यानांत यावें म्हणूनहि कित्येक वेळां त्यांना आत्मकथनाची यातायात करावी लागते. कांहींच्या कार्याबद्दल आणि वैयक्तिक गुणदोषांबद्दल समाजांत विपरीत ग्रह पसरलेले असतांना त्यांचा शक्य तर निरास करावा म्हणून कित्येकांना आपली कैफीयत द्यावीशी वाटते. कांहीं झालें तरी स्वसमर्थनासारखें अधिक प्रिय कार्य माणसाला दुसरें कोणतें वाटणार ? पण यापेक्षांहि अधिक व्यापक बुद्धीनें कांहींजणांना स्फूर्ति होणें संभवनीय आहे.

आपण जो समाज पाहिला त्या समाजांतल्या अनेक संकेतांनीं आपल्या बाबतींत कोणचे हर्षविषादाचे प्रसंग निर्माण केले, तसे प्रसंग निर्माण होत असतांना आपण त्या बाबतींत कोणची समन्वयाची किंवा विरोधाची वृत्ति राखली, हें लोकांना सांगण्याचा मोह कोणाहि कर्तबगार कार्यकर्त्याला होणें स्वाभाविक आहे. शिवाय, समाजाच्या नव्यानें पचनीं पडावी म्हणून एखादी कार्य-

पद्धति अस्तित्वांत आणूं पहाणाऱ्या झुंजार आणि कर्तबगार माणसांना आपल्या प्रतिक्रियांची उजळणी शांतपणानें करावीशी वाटणें हें मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. धर्म, नीति, नवीन आचार व प्रवृत्ति, उदयोन्मुख राजकीय संवेदना, नवीन समाजरचनेचें स्वप्न, ज्ञानदानाचीं आधुनिक उपकरणें इत्यादि अनेक बाबतींत ज्यानें ज्यानें परंपरागत मार्गांशीं विरोधक भूमिका स्वीकारली, आपलें तत्त्व समाजाच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला, त्याला त्याला आपल्या जीविताचें साफल्य अजमावून पहाण्याची एक प्रकारची ईर्ष्या वाटत असते. ह्या ईर्ष्येंतून आत्मश्लाघा तर वजा घालावयाची आणि कार्याची प्रौढी तर वर्णन करून सांगावयाची, असलें दुहेरी कार्य लेखकाला पार पाडावयाचें असतें. त्याबरोबरच असलें कार्य करतांना केवळ स्वत:लाच समजलेल्या मनोवृत्तींचा झगडा उघड करून दाखवावा अशीहि अपेक्षा प्रत्येक कार्यकर्त्यामध्यें असणें अगदीं संभवनीय आहे. प्रत्यक्ष कार्य करून दाखविलेल्या कार्याच्या पाठीमागें अनेक धागेदोरे गुंतलेले असतात, आणि ह्या धाग्यादोऱ्यांच्या मागें मनाच्या कितीतरी सूक्ष्म हालचालींची चोरटी चाहूल नित्यश: संचार करीत असते. अगदीं बालपणापासून लोकप्रियतेच्या उधान भरतीनें जीवित तुडुंब भरून जाईपर्यंत मनाच्या खोल कप्प्यांतल्या ह्या सूक्ष्म हालचालींचा स्पर्श ज्याचा त्यालाच जाणवतो.

चरित्र आणि आत्मचरित्र ह्यांमधला मुख्य फरक याच एका गोष्टीनें निश्चित होतो. दुसऱ्यानें लिहिलेल्या चरित्रामध्यें येणाऱ्या गोष्टी ह्या प्रसंगविशेषीं कोणत्याहि मोठ्या व्यक्तीच्या जीवनविषयक कार्याच्या संदेशाचा मोठेपणा पटवून देतात. लोकांना जें जीवन दिसलें, त्या जीवनाची थोरवी कमीअधिक करणारे अनेक गुणावगुण

चरित्रकाराला दिसले, त्या प्रमाणांत तो मांडून दाखवितो. चरित्रकारानें जो समाज बघितला तो समाज, आणि त्या समाजांत संचार करणारी चरित्रविषयीभूत व्यक्ति यांचा समन्वय चरित्रकार आपल्या मगदुराप्रमाणें घालण्याचा प्रयत्नहि करतो. व्यक्तीच्या बाह्य स्वरूपाचा उठाव आणि मनांतील स्थूल भावनांची जाणीव ह्या गोष्टी चरित्रकार शक्य तितक्या प्रमाणांत विशद करून सांगतो. पण इतकें सगळें होऊनहि बाहेर दिसलेला इतिहास वर्णन करण्याची अंतिम मर्यादा एखादा चरित्रकार कितीहि कौशल्यानें गाठूं शकला, तरी वर्ण्य व्यक्तीचें सारें खरें मनोगत त्याला हस्तगत होईलच असें नाहीं. ज्याचा तो स्वतः असल्या गोष्टी सांगण्यासाठीं प्रवृत्त होईल तेव्हांच शक्य तर असल्या गोष्टींचा परिचय वाचकांना व्हावयाचा. त्यांतहि ' शक्य तर ' असें म्हणण्याचें कारण असें कीं, स्वतःचें आत्मकथन करणारा माणूस प्रांजल आणि प्रामाणिक पाहिजे. त्याच्या विवेकशक्तीला एक प्रकारचें ताटस्थ्य आलेलें असलें पाहिजे, आणि त्याच्या मनोवृत्तीला स्वतःकडे पहाण्याची खोडकर विनोद—बुद्धि लाभलेली असली पाहिजे. आत्मकथन करणाऱ्या माणसानें स्वतःकडे पाहूं नये, स्वतःच्या काल्पनिक प्रतिबिंबाकडे पाहावें, म्हणजे मग स्वतःला विसरून त्या प्रतिबिंबाच्या अनेक बऱ्यावाईट गोष्टींची मनमोकळेपणानें शहानिशा करतां येते. प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीवर त्याच्या मनानें केलेली प्रतिक्रिया त्याला मग साहजिकपणेंच अजमावून पाहातां येते; इतकेंच नव्हे, तर तिची न्याय्य बुद्धीनें मौजहि अनुभवितां येते.

म्हणूनच प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें आत्मकथन करणाऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धि केवढी आहे, ह्या कल्पनेला वाच-

काच्या दृष्टीनें आत्मवृत्तामध्यें कोणतेंहि महत्त्व उरूं नये. प्रसिद्धि किंवा प्रतिष्ठा ह्या असोत किंवा नसोत, त्या व्यक्तीनें केलेलें कार्य व्यापक असो किंवा नसो, त्या व्यक्तीच्या आगमनानें कुटुंबाच्या चार भिंतींच्या बाहेरची सृष्टि उजळून जावो किंवा न जावो, पण त्या व्यक्तीनें बाह्य सृष्टीवर ज्या मानसिक प्रतिक्रिया केल्या, त्यांचा आविष्कार भावनांच्या उत्फुल्ल आवेशानें समर्पक आणि समयोचित शब्दांच्या घडणीनें आणि मनाच्या प्रामाणिक आणि प्रांजल सद्वृत्तीनें लिहून दाखवण्यांतच सारें महत्त्व आहे.

मराठीमध्यें जीं आत्मवृत्तें उपलब्ध आहेत, तीं कांहीं केवळ आधुनिक काळांतील नव्हेत, तर अतिशय जुन्या काळांतील देखील संतवाङ्मयांत आत्मवृत्तपर उल्लेख सांपडतात. महानुभाव पंथांतील मुख्य संस्थापक चक्रधर आणि वारकरी सांप्रदायांतील प्रमुख प्रचारक नामदेव-तुकाराम ह्यांचे स्वत:विषयींचे उल्लेख अतिशय भावनापूर्ण भाषेनें व्यक्त केलेले आढळतात. त्यांच्याच परंपरेंतील निरनिराळ्या जातीचे लहानलहान संतहि स्वत:विषयीं कांहीं उल्लेख करतात. चोखामेळ्यासारखा अस्पृश्य आणि जनाबाई, बहिणाबाई व कान्होपात्रा ह्यांच्यासारख्या स्त्रिया यांनींहि प्रसंगोपात्त आत्मकथन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण ह्या साऱ्या उल्लेखांतून आपल्या भक्तीचें वैशिष्ट्य आणि भावनांची आवेशसुलभता हीं खर्चीं पडलीं आहेत. आपण क्षुद्राहूनही क्षुद्र असून आपलें दैवत हें भक्ताच्या कसोटीला नेहमीं उतरणारें आहे, हें दाखवून देण्याचीच कामगिरी त्यांच्या उल्लेखानें प्रामुख्यानें केलेली आहे. स्वत:पेक्षांहि भक्तीचा डांगोरा पिटावा आणि दैवताची आसक्ति इतरांच्या चिकाणीं भिनवावी हीच त्यांची मुख्य दृष्टि आहे. नंतरच्या काळांत पेशवाईतील नाना फडणिसाचें एक त्रोटक आत्मकथन उपलब्ध आहे. त्यांत आयु-

ष्यांतील कांहीं खडतर प्रसंगांचा उल्लेख करून त्यांतून आपण ईश्वरी कृपेनें कसे निभावलों हें सांगितलें आहे. क्वचित एकदोन ठिकाणीं स्वत:मधले कांहीं दोष अत्यंत प्रामाणिकपणें सांगितले आहेत. पण ज्या वैयक्तिक पापांचा नानांनीं उल्लेख केलेला आहे, तीं पापें एक तर त्या काळांत कांहीं अंशीं उपेक्षणीय मानलीं जात आणि असल्या दोषांसंबंधांत नानांनीं जितक्या प्रामाणिकपणें उच्चार केलेला आहे, तितक्याच प्रामाणिकपणानें त्यांनीं जर आपल्या राजकीय जीवनांतील अनेक घटनांवर प्रकाश पाडला असता, तर त्यांच्या लेखनाचें कांहींतरी साफल्य झालें असें म्हणतां आलें असतें.

त्यानंतर अव्वल इंग्रजींत नव्या राजवटींत दादोबा पांडुरंग ह्यांनीं आपल्या आयुष्याचा पूर्वभाग आत्मकथनपर पद्धतीनें वर्णन करून सांगितला आहे. त्यामध्यें मात्र इंग्रजी राजवटीमधल्या पहिल्या काळाचें यथार्थ दर्शन घडल्यावांचून राहात नाहीं. त्यामुळें एक नवीन सामाजिक इतिहास जसा उपलब्ध होतो, तसाच त्याच समाजांत वावरणाऱ्यां व्यक्तींनीं त्या नवीन जीवनाचा स्वीकार कसा केला याचाही उत्कृष्ट बोध होतो. पण तेंहि चरित्र अपूर्णच आहे. शिवाय आपल्या वेळच्या कौटुंबिक, शैक्षणिक आणि फक्त आपल्याशींच संबंध पावणाऱ्या सामाजिक गोष्टींचा इतिहास द्यावा ही दृष्टि दादोबांनीं विशेष प्रमाणांत राखली आहे. त्यामुळें मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या प्रतिबिंबाशीं खेकळर् चाळा करीत स्वत:च्या आकृतीचें रमणीय दर्शन ज्या आत्मीयतेनें करून द्यावयास हवें होतें, तसली आत्मीयता अर्थातच त्यांनीं कधीं बाळगली नाहीं. ह्यानंतरच्या काळांत मात्र महाराष्ट्रामध्यें अनेक कार्यकर्त्या स्त्रीपुरु-षांनीं स्वत:च्या जीवनचारित्रांचें कथन करून मराठींतील हा वाङ्मय-

प्रकार बराच समृद्ध करून सोडला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दादोबांचे समकालीन असलेले दुसरे लेखक बाबा पदमजी. बाबांनीं आपल्या आयुष्यांत सर्वसामान्य माणसापेक्षां जरा विशेष स्वरूपाचे प्रकार अनुभवले. ख्रिस्ती धर्माबद्दल त्यांना आकर्षण वाटलें. त्यांनीं त्या धर्माचा स्वीकार केला. सुमारें शंभर वर्षांपूर्वीं असल्या धर्मांतराबद्दल होणारा स्वकीयांचा जाच आज कल्पनेनेंहि अजमावतां येणें कठीण आहे. धर्मांतर करणारा माणूस एरवीं कितीहि चांगला असला, तरी त्याला स्वकीयांकडून सामान्य माणुसकीचेंहि प्रेम लाभणें सर्वथा अशक्य होऊन जाई, आणि पुन: त्याचें तोंड पाहणेंहि मुष्किलीचें ठरे. बाबांनीं आपल्या धर्मांतरामुळें हा जाच सहन केला. त्यांचें धर्मांतर हें केवळ पोटभरू वृत्तीनें झालेलें असावें, असें आज नि:पक्षपातीपणानें कोणाही म्हणतां येणार नाहीं. स्वत:च्या आध्यात्मिक आणि नैतिक उन्नतीचें एक साधन म्हणूनच त्यांनीं ख्रिस्ती धर्माचा आश्रय केला असला पाहिजे हें उघड आहे. ख्रिस्ती झालेल्या तत्कालीन उच्चवर्णीय हिंदूची पोटाची पंचाईत धर्मांतरानें व्यवस्थित रितीनें मिटविली असेंहि पुराव्यानिशीं आज म्हणतां येत नाहीं. तरीहि सर्वसामान्य परंपरानिष्ठ लोकांनीं त्यांचें दर्शन त्याज्य मानलें. बाबांनीं आपल्या आत्मवृत्तांत तत्कालीन कांटेकोर रीतिरिवाजामुळें आणि कठोर स्वधर्माभिमानामुळें स्वकीयांनीं त्यांना बहिष्कृत कसें राखलें याचें प्रत्यंतर देणारीं अनेक वर्णनें दिलीं आहेत. बाळशास्त्री जांभेकर मेण्यांतून शाळा तपासण्यासाठीं जात असतां पुस्तकें वाचीत जात. अज्ञानी वाटसरू म्हणत कीं, "शास्त्रीबुवा बायबलचें पठन करीत आहेत. लवकरच ते ख्रिस्ती होणार !" यावरून तत्कालीन अडाणी समाजानें बाबा पदमजी-सारख्या प्रत्यक्ष धर्मबाह्य झालेल्या सत्प्रवृत्त गृहस्थांनाही कसें वाग-

विलें असेल त्याची कल्पना येते. बाबांच्या आत्मवृत्तांतहि स्वतःचे अनुभव मनमोकळेपणानें दिलेले आहेत. तत्कालीन समाजाचेंही चित्रण त्यांत बऱ्याच अंशीं यथार्थपणें रेखाटलें आहे. तरी पण त्यांतहि एकादी गोष्ट लिहून दाखवितांना जो एक प्रकारचा संकोच वाटतो तो बाबांनाही वाटला आहे. शिवाय ज्या धर्मांत आपण गेलों त्या धर्माचें उज्ज्वल स्वरूप वर्णन करून सांगण्याकडेही बाबांचा कल विशेष आहे. त्यामुळें त्यांच्याहि आत्मकथनांत स्वतःची पारख करण्याचा कठोरपणा किंवा स्वतःचे अनेक खाजगी अनुभव सांगितल्याशिवाय राहावत नाहीं म्हणून सांगण्याचा भावनाप्रक्षोभ दिसत नाहीं.

यानंतर गेल्या तीस वर्षांत मराठी वाङ्मयांतील आत्मवृत्तांच्या संख्येंत झपाट्यानें वाढ होत गेली. कित्येकांनीं संपूर्ण आत्मवृत्तें लिहून दाखविलीं. कित्येकांनीं त्रोटक आत्मवृत्तपर उल्लेख आपल्या कार्याचा आढावा घेतांना क्वचित् केले आहेत. धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, न. चिं. केळकर, ना. गो. चापेकर, धर्मानंद कोसंबी, सी. ग. देवधर, श्री. कृ. कोल्हटकर, बॅ. सावरकर, नाना पावगी, ग. त्र्यं. माड-खोलकर, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, गणपतराव बोडस, इत्यादि अनेक गृहस्थांनीं आत्मवृत्तें लिहिलीं आहेत. रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले, लक्ष्मीबाई टिळक, कमलाबाई देशपांडे, लीला-बाई पटवर्धन इत्यादि स्त्रीलेखिकांनींहि आपआपले जीवनवृत्तांत प्रकाशित केले आहेत. " आमचे डोंगरीच्या तुरुंगांतील १०१ दिवस." (आगरकर), 'माझा संगीताचा व्यासंग' (टेंबे), "साहित्य-सेवेंतील स्मृति" (फडके), "ज्ञानकोशाची बारा वर्षांची कामगिरी" (केतकर), " माझा नाटकी संसार" (वरेरकर), इत्यादि कांहीं

मर्यादित स्वरूप कल्पून मुद्दामच एक विशिष्ट कार्यापुरता जीवन-वृत्तांत देण्यास पोषक होईल असलेंहि आत्मकथन प्रगट झालें आहे. सुमारें तीस वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तार मासिकांत "एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे" येत असत. लेखकानें 'टोमदेव' हें टोपणनांव घेतलें होतें. साताराचे सुप्रसिद्ध वकील दादासाहेब करंदीकर आणि वऱ्हाडांतील प्रसिद्ध पुढारी दादासाहेब खापर्डे यांच्या रोजनिशांचे उल्लेख तत्कालीन लोकांच्या बोलण्यांत नेहमीं येत असत. त्या अद्यापहि अप्रकाशित आहेत. अहमदनगर येथील श्री. चौकर हेहि प. वा. लोकमान्य टिळक यांचे समकालीन. त्यांचेंहि एक अप्रकाशित आत्मवृत्तपर टांचण उपलब्ध होण्यासारखें आहे असें म्हणतात.

वर उल्लेखिलेल्या लेखक-लेखिकांपैकीं बरेचजण चालू पिढींतील काळाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले असे नाहींत. विशेषतः महाराष्ट्रांत रानडे, टिळक, गोखले यांच्यासारखे पुढारी प्रत्यक्ष वावरत होते, तेव्हांच्या काळाबद्दलची आपुलकी त्यांनीं पुढल्या काळांतहि मनाशीं जोपासून वाढविली. या सर्वांच्या आत्मवृत्तांचा एक उपयोग मात्र निश्चितपणें होण्यासारखा आहे. तो म्हणजे महाराष्ट्राचा एक अनेकविध इतिहास संगतवार रीतीनें उपलब्ध होणें हा होय. महाराष्ट्रांत एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या उत्तरकाळांत शिक्षित पुढाऱ्यांनीं व कार्यकर्त्यांनीं निरनिराळ्या कार्यांच्या शाखा विशेष जोरानें व राष्ट्रोन्नतीच्या उद्देशानें अस्तित्वांत आणल्या. या निरनिराळ्या शाखा राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीला परस्परपोषक ठरणाऱ्या असल्या तरी त्या शाखांच्या प्रवर्तकांत आणि प्रचारकांत अनेक प्रसंगीं स्वभाववैचित्र्यामुळें मतभिन्नता आणि मतविरोध हीं निर्माण झालीं. त्यामुळें समाजांतील कित्येक गोष्टी घुसळून कशा निघाल्या

त्याचा यथासांग बोध होण्यास त्या आत्मवृत्तांचा निःसंशय उपयोग होण्यासारखा आहे; पण त्यामधून निष्पन्न होईल तो महाराष्ट्राचा इतिहास होईल. तो निर्माण करणाऱ्या माणसांच्या मनोगतांतील अनेक स्थूलसूक्ष्म संवेदना त्यांतून निश्चितपणें प्रकट होतीलच असें म्हणतां येणार नाहीं. राष्ट्रोन्नतीच्या महनीय प्रेरणेनें हे सारे लोक कार्यप्रवृत्त झाले; किंवा यांतील कांहीं त्या महनीय प्रेरणेचा जो आविष्कार झाला त्याचे साक्षीदार झाले. पण काय घडलें त्याची साक्ष पुढल्या पिढ्यांना सांगण्याची कामगिरी करतांना आपण आत्मवृत्त लिहीत आहों ही जाणिव त्यांनीं राखावयास हवी होती. ज्या माणसांभोंवतीं नवा इतिहास घडत होता आणि घडविला जात होता, त्या चैतन्यपूर्ण माणसांच्या मनोघटनेंतील फरकांची धग आत्मौपम्य बुद्धीनें त्याच्या आत्मवृत्तांनीं प्रामुख्यानें व्यक्त करावयास हवी होती. म्हणजे समाजाच्या अमूर्त आत्म्याचें स्पंदन आज जें प्रायः अदृश्य अवस्थेंत लोप पावून गेलें आहे तसें तें गेलें नसतें.

या काळांत एका मनोज्ञ मन्वंतराची घडामोड झाली. या घडामोडीनें सगळ्यांनाच धक्के दिले आणि हे धक्के खाऊन जागचें पाऊल उचलून सर्वांनाच पुढें सरकावें लागलें. त्यांतल्या त्यांत वर उल्लेखिलेले लेखक हे शिक्षित आणि जाणते होते. त्यांना जेव्हां आपल्या जागेवरून पुढें सरकावें लागलें, तेव्हां त्यांच्या मनोरचनेंतही कांहीं हालचाल झाली असली पाहिजे. इतिहास तयार मालाचें प्रदर्शन करतो. माल तयार होत असतांना झालेल्या धांदलीचें, धावपळीचें आणि अनेक इष्टानिष्ट फरकांचें निवेदन आत्मवृत्तांतच होऊं शकतें. म्हणून जाणत्या माणसांनीं आत्मकथन करतांना फक्त घडलेल्या हकिगतींचे तर्जुमे लिहिण्याऐवजीं स्वतःच्या मनोरचनेवर

वरचेवर होत जाणाऱ्या परिणामांची व स्वतांच्या मानसिक क्रिया-प्रतिक्रियांची एकसारखी चाहूल घेतल्याचें प्रत्यंतर पटवून दिलें पाहिजे. पांचपांचशें वर्षांच्या दीर्घ कालखंडांत कित्येक वेळां न घडणाऱ्या विराट घडामोडी या लेखकांच्या प्रत्यक्ष डोळ्यासमोर आणि सान्निध्यांत घडल्या. त्यांतील अनेक घटनांच्या उत्पाती आणि विलक्षण वेगवान् स्वरूपानें त्यांच्यावर वस्तुतः केवढे मोठे परिणाम केले असले पाहिजेत. ज्यामुळें मनोरचनेंतील साऱ्या मूल्य-मापनाची शक्ति बदलून जाऊन तीक्ष्ण आणि तेजस्वी बनावी असे कितीतरी प्रसंग त्यांनीं अनुभविले असतील. त्या अनुभवांनीं मनो-रचनेंतील कितीतरी संवेदनांचें स्वरूप आमूलाग्र बदलून टाकलें असेल. पण इतकें होऊनही यांतील कित्येकांनीं आपल्या वंश-विस्ताराचें आणि कौटुंबिक स्वास्थ्याचें रसभरित वर्णन देण्यांतच कृतकृत्यता मानली आहे ! निदान चोखंदळ वाचकाची तरी त्यामुळें निराशाच झाल्याशिवाय राहात नाहीं. त्या वाचकाला या लेखकांनीं समकालीन काळाचा इतिहास लिहावा एवढीच अपेक्षा नाहीं किंवा या इतिहासाकडे पाठ फिरवून स्वतःच्या तुटपुंज्या आणि अनवलिप्त आयुष्यक्रमांतील ठराविक चाकोरींच्या वर्णनां-वरच त्यांनीं भर द्यावा अशीहि वाचकांना गरज नसते. तर त्या सर्व घडामोडींतून अपरिहार्यपणें फिरण्याचा प्रसंग आला असतांना यांनीं आपल्या मनःसामर्थ्याचा आणि मनोभावनांचा कोणता झगडा अनुभविला तेंच जाणून घेण्यासाठीं वाचक आशाळभूतपणें आत्मवृत्तांचीं पानें चाळूं लागतो. घडलेल्या इतिहासाचे सूक्ष्म अणु-परमाणु कुठेंहि सांपडणार नाहींत ते येथें सांपडतील, या भावनेनें तो आत्मवृत्तांशीं समरस होण्याची ईर्ष्या बाळगतो. पण केवळ हकिगतींचे तर्जुमे देणारीं आत्मवृत्तें वाचून तो शेवटीं फजीत पावतो

असेंच म्हटलें पाहिजे. विशाल सामाजिक जीवनाच्या रासायनिक प्रयोगशाळेंत स्वतःच्या जीविताचा प्रयोग मांडून तो चुकतमाकत तडीस नेणाऱ्या प्रयोगकलाविशारदाच्या दर्शनाची आंच वाचकांना एकसारखी लागलेली असते, हें विसरून चालणार नाहीं.

या वर उल्लेखिलेल्या महनीय कालखंडांत ज्यांनीं आपल्या जीविताचे प्रयोग केले, त्यांत प्रामुख्यानें उल्लेखिण्यासारखे लेखक म्हणजे न. चिं. केळकर, ना. गो. चापेकर, सी. ग. देवधर, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, श्री. कृ. कोल्हटकर आणि बॅ. सावरकर हे होत. स्त्रियांपैकीं प्रामुख्यानें उल्लेखिण्यासारख्या रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक ह्या होत. पांगारकरहि ह्याच कालखंडांत पडतात. ह्यांतील कांहींना मोठ्या माणसाचें सान्निध्य आणि सहवास लाभला, तर कांहींना स्वतःलाच स्वतंत्र पुढारीपणाचा अधिकार मिळवितां आला. त्या दृष्टीनें ह्यांच्या आत्मवृत्तांचें सांकल्यानें केलेलें वाचन अतिशय उद्बोधक ठरणारें आहे. आत्मवृत्तामध्यें जो भावनाप्रक्षोभ पाहिजे, तो पुष्कळ अंशीं धर्मानंद कोसंबी, रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक ह्यांनींच काय तो व्यक्त केला आणि खऱ्या आत्मवृत्ताची कसोटी ह्या तिघांनींच अगदीं स्वाभाविकपणें पाळली आहे असें म्हणतां येईल. केळकरांना टिळकांचें सान्निध्य लाभलें, देवधरांना रानडे-आगरकरांचा सहवास घडला, कोल्हटकरांच्या समोर त्यांचे चुलते श्री. वामनराव कोल्हटकर ह्यांच्या सुधारकी जीवनाचा प्रत्यक्ष देखावा घडला, बाळासाहेब पंतप्रतिनिधि ह्यांना सरंजामशाहीच्या स्वामिसेवक भावापासून लोकशाहीच्या प्रजानुवर्तित्वापर्यंत फार मोठा संघर्ष अनुभवावयास मिळाला; आणि बॅ. सावरकर ह्यांना दहशतवादी चळवळीचे अत्यंत उग्र परिणाम वाट्यास आले. पांगार-

करांनाही आपल्या जीवनांत मोठमोठ्या पुढाऱ्यांचा प्रत्यक्ष परिचय आणि उपयोग करून घ्यावा लागला, आणि राजेरजवाड्यांनीं त्यांना प्रत्यक्ष राजयोग अर्पण केला. तसें पाहिलें तर हे सारेच जीवनक्रम अनुभवानें समृद्ध आणि भावनांच्या कल्लोळांनीं प्रक्षुब्ध होण्यासारखे आहेत, असें म्हटलें पाहिजे. आपल्या जीवितकार्यामध्यें आत्म्याची तृप्ति लाभवून घेतांना आणि कार्यसाफल्याचा ब्रह्मास्वाद मिळवितांना ह्या लोकांनीं आपल्या जीवनविषयक प्रयोगांत केवढ्या तरी मोलाच्या घडामोडी केल्या असतील! ह्या घडामोडी होत असतांना जीवनाच्या प्रयोगांत ग्राह्य मानलेले कितीतरी आडाखे सोडून देतांना त्यांच्या अंतःकरणांनीं केवढे तरी उद्रेक सहन केले असतील. जीविताला आरंभ करतांना ह्या साऱ्यांनीं अगदीं सर्वसामान्य पद्धतीनें आरंभ केला असेल आणि जीविताची परिसमाप्ति करतांना कांहींतरी विशेष व्रताची सांगता झाल्याचें असामान्य सुख त्यांना मिळालें असेल!

पण हें सारें होऊनही त्यांच्या प्रत्यक्ष आत्मवृत्तलेखनांत चित्तक्षोभाचे व हर्षविषादाचे असे अनेक प्रसंग यावयास हवे होते, तसे आले नाहींत आणि आले असले तरी ते वर्णन करून सांगण्याच्या पद्धतींत स्वतःच्या खोल, गूढ आणि रहस्यमय भावनांचा जो बिंबप्रतिबिंबात्मक भाव होता, तोहि व्यक्त झालेला नाहीं. "ह्यांतील बरीचशी माहिती टिळकचारित्रामध्यें आली आहेच; म्हणून येथें विस्तार करीत नाहीं" असें म्हणण्याचा केळकरांना आत्मवृत्तांत प्रसंग यावा, ह्यावरूनच आत्मवृत्त लिहितांना घडलेल्या इतिहासाच्या पुरवण्या दाखल करून घ्याव्यात हा त्यांचा हेतु दिसतो. कोर्टांतील खटल्यांत ज्याप्रमाणें जास्तींत जास्त प्रमाणांत समर्पक साक्षीपुरावे दाखल करतात, त्याप्रमाणें आपण

केलेल्या प्रत्येक गोष्टीची कैफीयत देत असतांना अनेक प्रकारचे पुरावे उपलब्ध करून देऊन जीवनांतल्या आपल्या हालचालींचें आणि कार्यप्रसंगांचें पक्कें समर्थन करावें, एवढाच हेतु केळकरांनीं मुख्यतः बाळगलेला दिसतो. चाफेकरांनीं तर आपल्या जीवनवृत्तांत आपण स्वतः अगदीं एकमार्गी राहिलों आणि चित्तविक्षेपाचे आणि भावनाप्रक्षोभाचे प्रसंग आपल्याला कधीं आलेच नाहींत, असें म्हटलें. ज्याच्यामुळें मनाची बैठक पार बदलून जाईल असें आपल्या वाटेला कांहीं आलेंच नाहीं हें चाफेकरांचें म्हणणें वाचल्याबरोबर एक तर असें वाटतें कीं, कडेनें काय वाटेल तें घडलें तरी आपल्या मनाची समावस्था ढळूं न देण्याइतका स्पृहणीय संयम चाफेकरांनीं संपादन केला. पण कदाचित् उलट बाजूनें असेंहि म्हणतां येईल कीं, विराट् प्रक्षोभक सामाजिक जीवनाशीं चाफेकरांनीं स्वतःची गांठच पडूं दिली नाहीं. गंगेच्या मुखाजवळच्या विस्तीर्ण जलप्रवाहाशीं जावें आणि पोहतां येत नाहीं म्हणून कांठावरच्या गुडघ्याभर पाण्यांत बुड्या मारून निमज्जनाचें पुण्य जोडावें, असला सामान्य यात्रेकरूचा प्रकार आपल्या जीवितयात्रेंत चाफेकरांनीं इष्ट मानला असावा.

देवधरांच्या जीवनवृत्तांतांत खाजगी आयुष्यांतील भावनांची झुंज कांहीं कांहीं ठिकाणीं व्यक्त झालेली आहे. पन्नास वर्षांपूर्वीच्या काळांत देवधर कर्ते सुधारक म्हणून गाजले, स्वतः त्यांनीं पुनर्विवाह केला. आगरकरांच्या सुधारक पत्राचें संपादन केलें. लोकाप्रिय पक्षाच्या विरुद्ध उभें राहून रणांगणामधली हातघाई त्यांनीं प्रत्यक्ष अनुभवली; त्यामुळें त्यांच्या जीविताला साहजिक एक प्रकारची धार आली. पण विनयबुद्धीमुळें म्हणा, किंवा स्वतः-बद्दलचें एक चमत्कारिक औदासीन्य असेल म्हणून म्हणा, वैय-

क्तिक वाढीला उपकारक होणारे अनेक भावनासंगर अगदीं हाताशीं असूनहि टाळल्यासारखे दिसतात. बाळासाहेब पंतप्रतिनिधि औंधकर ह्यांना तर विशिष्ट संस्थानी पेशामुळें आणि दीर्घायुष्यामुळें केवढी तरी मोठी सामाजिक सृष्टि वावरायला आणि अनुभवायला मिळाली. पण असें असूनहि संस्थानच्या उलाढाली, कौटुंबिक प्रसंग आणि स्वतः आपलीं मतें आपण प्रत्यक्षामध्यें उतरविल्यांचा एक काव्यात्मक आभास ह्या गोष्टींची रचना करण्यांतच त्यांचें बरेंचसें लेखन खर्चीं पडलें आहे. हजारों मैलांचे रमणीय देखाव्यांनीं भरलेल्या प्रदेशांचें अंतर तोडून जातांना भर वेगांत धांवणाऱ्या आगगाडीचीं दारें आणि खिडक्या बंद करून प्रवाशानें प्रवास करावा आणि मुक्काम गांठावा तसा कांहींसा प्रकार श्रीमंतांच्या बाबतींत घडलेला दिसतो. व्यवहारांत त्यांची श्रीमंती त्यांना खूप उपयोगी पडली असेल, पण आत्मवृत्तलेखनाच्या कामांत ती त्यांना थोडी नडलेलीहि दिसते. कारण श्रीमंतीचा डौल बिघडूं नये म्हणूनच कदाचित् ते कितीतरी सामाजिक जीवनांतल्या प्रसंगांशीं कधीं फारशा जिव्हाळ्यानें सलगी करूं शकले नाहींत.

कोल्हटकर स्वतः कवि आणि नाटककार; समाजसुधारणेच्या प्रचारासाठीं विनोदाचें अस्त्र वापरणारे एक वाकबगार लेखक. चुलते वामनराव कोल्हटकर यांच्या सान्निध्यांत त्यांनीं तत्कालीन सामाजिक जीवनाचा परिचय करून घेतलेला; काल्पनिक सृष्टीचे मनोरे रचण्यांत कुतुबमिनार उभारणाऱ्या कुतुबुद्दिनालाहि मागें टाकतील इतके पराक्रमी, मनांतील भावनांचा आशय शब्दांनीं व्यक्त करण्यांत कधींहि पराजय येणार नाहीं इतक्या दर्जाचे भाषाप्रभु, पण एक तर मोठ्या आत्मवृत्ताकरितां त्यांनीं जीं टांचणें केलीं होतीं तींच चुकून प्रत्यक्ष आत्मवृत्त म्हणून प्रकाशांत आलीं असें म्हणतात, त्यामुळें

त्यांच्याचसंबंधानें कांहीं लिहिणें हें थोडेंफार अन्यायाचें होईल. तरी पण टिपण-टांचणांत का होईना, पण वैयक्तिक जीवनामधले सामाजिक जीवनाशीं झुंज करणारे भावनाकल्लोळ, त्यांनीं त्रोटक स्वरूपांत सूचित करावयास हरकत नव्हती. बॅ. सावरकरांचें आयुष्य तर एका उत्पाती चळवळीनें उजळून गेलेलें. त्या चळवळींत मुख्य कर्णधार म्हणून त्यांच्यावर जबाबदारी आलेली आणि अगदीं बिकट प्रसंगांतहि ती जबाबदारी पार पाडण्याइतकी हिंमत आणि हिकमत त्यांनीं व्यक्त केली. पण खूप धावणाऱ्या माणसाचें हृदय नेहमींच्या समधात अवस्थेच्या मानानें विलक्षण वेगानें उडावें आणि तें तसें उडत असतांना नियंत्रण चालवून त्याची जलद क्रिया ताबडतोब संयमित करावी, हें जसें माणसाला शारीरिक दृष्ट्या शक्य होत नाहीं, तसें सावरकरांचेंहि झालें आहे. ज्या चळवळीमध्यें पडून आपण विलक्षण गतीनें पुढें गेलों, त्या गतीचा अनावर कैफ आत्मकथन करणाऱ्या शांत अवस्थेंतहि ओसरला नाहीं. त्यामुळें त्यांनीं आपल्या आत्मकथनांत हालअपेष्टांचें केवढेंहि मोठें वर्णन केलें असलें तरी तटस्थ वृत्तीनें स्वतःच्या कार्यमग्न आकृतीकडे त्यांना पाहतां आलें नाहीं. म्हणून हे सारे लेखक आणि त्यांचे जीवनवृत्तांत ह्या दोन्ही गोष्टी केवढ्याहि विशाल आणि विराटस्वरूपी असल्या तरी त्यांच्या दर्शनानें मानवी जीविताची उदात्त, उत्कट आणि उग्र तपस्या कठोर, प्रक्षोभक आणि तेजस्वी स्वरूपांत आपल्यासमोर उभी राहिल्याचा प्रत्यय वाचकांना येत नाहीं.

धर्मानंद कोसंबी, रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्या आत्मवृत्तांनीं मात्र आत्मवृत्तांतील सारें आकर्षकत्व उत्पन्न करण्याचा फार सुंदर प्रयत्न झालेला आहे. धर्मानंद कोसंबी ह्यांना

एका विशिष्ट वयांत तत्त्वजिज्ञासेनें आणि धर्मशोधनानें गांठलें. प्रक्षुब्ध मनानें त्यांनीं अनेक ठिकाणीं संचार केला, अनेक ग्रंथांचीं पारायणें केलीं, आणि अनेक साधुपुरुषांचे सहवास स्वतःला घडवून घेतले. हा त्यांचा प्रयत्न अगदीं वैयक्तिक स्वरूपाचा होता. पण भोंवतालच्या जीवनांतील विवेकशून्यता, तत्त्वच्युति आणि चित्तग्लानि ह्या साऱ्या गोष्टींनीं त्यांच्या मनावर अमूर्त स्वरूपांत कसा परिणाम केला होता, हें त्यांनीं आपल्या निवेदनांत अत्यंत प्रभावीपणानें व्यक्त केलें आहे. मानवी जीवनाची अतिशय उदात्त उंची नजरेच्या टापूंत यावी, म्हणून त्यांनीं केलेले खडतर प्रयत्न त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा जिव्हाळा जसा व्यक्त करतात, तसाच सामाजिक सृष्टीचा विशालपणाही उघड करून दाखवतात. तत्त्व-जिज्ञासा हें एक वेड आहे, तत्त्वचिंतन हा एक ध्यास आहे, तत्त्वचर्चा हा एक परम आनंद आहे आणि तत्त्वप्राप्ति हें एक असह्य समाधिसुख आहे; पण ह्या साऱ्या गोष्टी टप्प्याटप्प्यानें प्राप्त करून घेतांना जो भावनासंकुल प्रयत्न करावा लागतो, तोहि अत्यंत कष्टाचा आणि बहुविध स्वरूपाचा असतो. स्वतःला घेतलेली धर्मानंद ही पदवी अक्षरशः खरी कशी आहे, हें शब्दरूपानें मूर्ति-मंत पटवून देण्याचें सामर्थ्य त्यांनीं व्यक्त केलें. हें त्यांना शक्य झालें, त्याचें कारण आपल्या कार्याकडे तटस्थपणें पाहाण्याची दृष्टि हेंच असलें पाहिजे.

रमाबाई रानडे ह्यांनीं 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' लिहून रानड्यांसारख्या एका द्रष्ट्या आणि प्रज्ञावंत लोकाग्रणीच्या सहवाससौख्याचा पुनःप्रत्यय मिळविला; पण हा पुनःप्रत्यय मिळवितांना रानड्यांच्या मोठेपणाबरोबर स्वतःच्या वैयक्तिक जीवनांतल्या सुखदुःखांच्या आठवणी त्यांनीं रसभरितपणें सांगि-

तल्या आहेत. रानडे मोठे होते, पण खाजगी व्यवहारांत त्यांना सर्वसामान्य जीवनांतल्या उपाधि होत्याच. सार्वजनिक व्यवहारांत रानड्यांचे कोणते भाग होते, त्याची माहिती दुसरा कोणी चरित्रकार देईलच, पण आपल्या वांट्याला त्यांच्या आयुष्यामधला जो भाग आला, त्याचें दर्शन मात्र आपणाइतकें दुसऱ्या कोणाला यथासांगपणें घडवून देतां येणार नाहीं, ही जाणीव श्री. रमाबाईनीं बरोबर राखलेली आहे. म्हणून त्यांनीं वर्णन केलेल्या भागांत रानड्यांचें कौटुंबिक जीवन प्रामुख्यानें आलेलें आहे. पण मोठ्या मनाच्या माणसानें कौटुंबिक जीवनांतील लहानसहान गोष्टींतही चोवीस तास अंगामध्यें मुरलेल्या थोर तत्त्वज्ञानाची बैठक कशी सहजासहजीं निर्माण केली तें रमाबाईनीं आपल्या पुस्तकांत सुंदर रीतीन दाखविलें आहे. आपल्या सान्निध्यांतल्या प्रत्येक माणसाला सुज्ञ, संयमी, दूरदर्शी, धोरणी, क्षमाशील आणि दयाप्रेरित कसें बनवावें ही किमया रानड्यांजवळ फार मोठ्या प्रमाणांत होती. त्यांच्याजवळ गेल्यावर उंच माणसाला ठेंगणें व्हावें लागलें नाहीं ! आणि ठेंगण्या माणसाला उंच व्हावें लागलें नाहीं, इतकी जादू रानड्यांच्या स्वभावांत होती. हें स्वभावदर्शन प्रत्यक्ष निवेदन न करितां नुसत्या प्रसंग-घटनांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या मांडणीनें रमाबाईनीं केलेलें आहे. त्यांत स्त्रीसुलभ श्रद्धेची आंच आणि भाषेची अनुपम गोडी ह्या गोष्टींनीं फार मोठा रसाळपणा उत्पन्न केला आहे.

लक्ष्मीबाई टिळकांचें आत्मवृत्त म्हणजे तर मनुष्यजीवनाच्या आणि मनुष्यस्वभावाच्या वाढीचा एक उत्कृष्ट नमुनाच म्हटला पाहिजे. कवि म्हणून गाजलेले टिळक त्यांच्या सहवासाला जन्मभर होते. ते जितके हुषार होते तितकेच विक्षिप्तहि होते. ते जितके

दयाळु होते, तितकेच चमत्कारिक होते. पण कुणाहि रसिक वाचकाला त्यांच्याविषयीं हें सारें आज म्हणतां येतें, त्याचें कारण लक्ष्मीबाईंचीं स्मृतिचित्रेंच होत. एवढें सांगितलें म्हणजे त्या चित्रांत लक्ष्मीबाईंनीं अनेक प्रसंगांतील आपल्या मनोगतांना आणि अनेक घटनांतील आपल्या भावना-संवेदनांना कोणत्या प्रकारानें साकार आणि सचेतन स्वरूप दिलें असेल, त्याची सहज कल्पना करतां येईल. यांतहि श्री. रमाबाईंच्या मानानें श्री. लक्ष्मीबाईंनीं स्वतःचें म्हणून आत्मकथन जास्त प्रमाणांत केलें असून तें मराठी वाङ्मयांत निदान आज तरी उत्कृष्ट आत्मवृत्ताचा नमुना म्हणून लोकप्रिय झालेलें आहे.

ह. भ. प. पांगारकर यांच्या आत्मवृत्ताची स्फूर्ति पुष्कळ अंशीं लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांच्या वाचनानें निर्माण झाली, हें पांगारकरांच्या निकटवर्तीयांना माहीत आहे. त्या पांचसात वर्षांत आत्मवृत्तलेखनाची एक लाट विशेष जोरानें प्रचलित झाली आणि लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांनीं या लाटेला एक विलक्षण लोकप्रियता आणली. स्मृतिचित्रांच्या लेखिकेचा सत्कार-समारंभ स्वतः हजर राहून पांगारकरांनीं पाहिला, आणि आपल्याहि आत्मकथनाचा आनंद आपण शक्य तोंवर लुटावा अशी पांगारकरांना प्रेरणा झाली. इतर पुरुषलेखकांप्रमाणें पांगारकरांनीं महाराष्ट्रांतील एक महनीय कालखंड प्रत्यक्ष कार्य करून अनुभवला होता. स्त्रीलेखिकांप्रमाणें पांगारकरांना संतवाङ्मयाच्या निदिध्यासानें एक प्रकारची श्रद्धा लाभली होती. शिवाय स्त्रियांच्या विशुद्ध भाषेचा पांगारकरांना सहज अंगवळणीं पडण्यासारखा परिचय घडला तोहि संतवाङ्मयाच्या अभ्यासानें ! बायकांच्या निर्व्याज प्रेमळपणाची झांक संतवाङ्मयांत स्वाभाविकपणें आली आहे. फरक इतकाच कीं बाय-

कांचा प्रेमळपणा प्रापंचिक असतो, तर संतांचा प्रेमळपणा आध्यात्मिक आहे. पण पांगारकरांनीं आपल्या जीवनकार्यांत या प्रेमळपणाच्या रसांत स्वतःला एकसारखें बुडवून घेतल्यामुळें इतर पुरुषलेखकांना जो लाघवीपणा कष्टसाध्य वाटला असता तो पांगारकरांना सहजसिद्ध मार्गानें अंगीं मुरवितां आला! लेखणीचें व वाणीचें आर्जव हें बायकांना त्यांच्या गोड गळ्याइतकेंच स्वाभाविक असतें. तें आर्जव मराठी पुरुषलेखकांना अपवादप्रसंगींच काय तें व्यक्त करतां आलें आहे. पांगारकरांच्या लेखणींत व वाणींत हें आर्जव ओतप्रोत भरलेलें आहे. मोहक रुसण्याची जादू आणि प्रेमळ लडिवाळपणाची नजरबंदी स्त्रीवाङ्मयाइतकी संतवाङ्मयानेंहि जोपासली आहे. पांगारकरांचें मन संतवाङ्मयाच्या परिवारांत इतकें हौसेनें तन्मय झालें होतें कीं, त्यांना बोलतां बोलतां सहज गहिंवर फुटे आणि लिहितां लिहितां त्यांच्या डोळ्यांतून चटकन पाणी गळूं लागे. नेमके हेच स्वभावविशेष स्त्रियांच्या ठिकाणीं प्रभावीपणानें कार्यकर होतात. हे स्वभावधर्म बायकांच्या लेखनाला अवीट आकर्षकता आणतात.

पांगारकरांना स्त्रियांचे हे स्वभावधर्म भाषेच्या लाघवाच्या दृष्टीनें जसे साध्य झाले होते, तसेच मन श्रद्धाळु बनविण्याच्या कामींहि ते हस्तगत झाले होते. कारण आपल्या काळांतील मोठमोठ्या लोकांचे साध्या व्याख्यानांत नुसते उल्लेख करण्याचे प्रसंग आले तरी पांगारकर जागच्याजागीं भरलेल्या सभागृहापुढें ढसढसा रडावयास लागत. त्यांच्या मनाला या बाबतींत आपले प्रेमळ अश्रु आवरून धरण्याच्या कामीं कधीं यश आलें नाहीं. स्त्रियांची ही निर्व्याज श्रद्धा आणि मनाची कोवळीक पांगारकरांना संतवाङ्मयाच्या सतत सान्निध्यानें आपलीशी करतां आली. त्यांच्या

आत्मवृत्तांत वाचकाला जो एक गोडवा भासतो आणि तो निश्चित कशांत आहे, त्याची उपपात्ति लागत नाहीं, त्याचें मर्म बहुधा हें असावें, असें वाटतें. विवेकापेक्षां प्रेमानंद आणि तर्ककर्कशतेपेक्षां जिव्हाळ्याचें सौहार्द यांनीं त्यांचें आत्मकथन ओथबून गेलें आहे. त्यांत प्रत्येक गोष्टीवर सुस्पष्ट उजेड पाडणाऱ्या सूर्यप्रकाशापेक्षां हिमधवल आच्छादनानें मोहक सौन्दर्य उत्पन्न करणाऱ्या चंद्रिकेच्या शीतल सुषमेची जादूच फार मोठी आहे.

पांगारकर महाराष्ट्राच्या एका उत्पाती कालखंडांत शरीरानें वावरले. आपद्धर्म म्हणून त्यांनीं आधुनिक दळणवळणाच्या साधनांचा उपयोगहि केला. राजकारणांत स्वधर्म व पूर्वजप्रीति यांना विशेष आपुलकीनें जवळ करणाऱ्या आणि प्रसंगविशेषीं त्यावरच भर देऊन आधुनिक लोकजागृतीचें कार्य करणाऱ्या टिळकांच्या जहाल पक्षांत त्यांनीं हौसेनें प्रवेश केला होता. पदवीधर होण्यासाठीं त्यांनीं अट्टाहास केला आणि आधुनिक काळांतलें पदवीपरीक्षेपर्यंतचें शिक्षण संपादन केलें. तरी पण आगरकरांच्या सान्निध्यांत आपली आस्तिक्यबुद्धि डळमळल्याचा त्यांना खेदच वाटला. ती पुन्हा थाऱ्यावर येऊन शेवटपर्यंत अचल राहिली म्हणून त्यांना आनंदाहि वाटला. विवेक आणि तर्क यांच्या प्रखर प्रकाशांत जीवन जगण्याचा रुक्षपणा पतकरण्यापेक्षां त्यांनीं गूढ आनंद लाभवून देणाऱ्या चमत्कृतिपूर्ण धर्मभक्तीचा सांप्रदायिक मार्गच मोठ्या ईर्ष्येनें चोखाळला. पदवीधर मनुष्य इतकी विलक्षण आस्तिक्यबुद्धि प्रगट करतो, या चमत्कृतिपूर्ण आणि कांहींशा अशक्य वाटणाऱ्या देखाव्यानें त्यांनीं भोंवतालच्या सृष्टीला चकित करून, पाहातां पाहतां आपलेंसें केलें. साऱ्या नवीन गोष्टींची त्यांना नावड होती म्हटलें तरी चालेल. पैठणच्या वाटेवर त्यांना टांग्यांत दोन तरुण सुवासिनी भेटल्या.

त्यांचें वर्णन करतांना पांगारकरांना जो उमाळा आला आहे तो त्या स्त्रियांच्या ठसठशीत सौभाग्यतिलकाच्या दर्शनानें ! भारदे यांच्या कुलीन व आतिथ्यशील घराण्यांतील या तरुणींनीं आपल्या घरीं नेऊन पांगारकरांना पहाटे सुग्रास भोजन मिळण्याची जी तत्परता खली तीबद्दल ' धन्यो गृहस्थाश्रम: । ' असें पांगारकर आपल्या आत्मवृत्तांत मोठ्या कौतुकानें वर्णन करतात ! या मुलींची अध्यात्मांत किंवा धर्मजिज्ञासेंत कांहीं गति होती अशांतला भाग नाहीं. पण जुन्याची जपणूक त्या चोखंदळपणानें करीत होत्या, एवढी एकच गोष्ट त्यांच्या जीवितसाफल्याला पुरून उरण्याइतकी प्रभावी आहे, असें पांगारकरांना वाटलें. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेंतील साऱ्या लहनमोठ्या संकेतांबद्दल पांगारकरांना विशेष ओढ होती. प्रत्यक्ष पैठणला पोंचल्यावर जोडे काढून नाथांच्या पैठणांत त्यांनीं अनवाणी संचार केला ! इतकी विलक्षण ओढ त्यांना कां वाटली हें त्यांचें त्यांनाहि कदाचित् स्पष्ट करून सांगतां आलें नसतें ! पण जन्मजात खलाशाला समुद्राची ओढ, चंद्राला असते त्यापेक्षांहि जास्त असावी, तशी त्यांना ही अबोधपूर्व ओढ होती हें मात्र अगदीं खरें !

त्यांचें मन समकालीन काळांतल्या कोणत्याच आधुनिक विचाराशीं सलगी करूं शकलें नाहीं. आधुनिक करमणुकीचे प्रकार तर त्यांनीं वर्ज्यच मानले होते. टाळमृदंगांच्या ताफ्यांतील रसभरित संगीतानें त्यांना शेंकडों वेळां तल्लीन केलें असेल; पण मराठी रंगभूमीवरील संगीताचा बहर आला आणि गेला; पण पांगारकरांनीं तसल्या ' तामस ' कुपथ्याला एखादा क्षुद्र कीटक झटकून टाकावा तसें झटकून टाकलें. तसली चव त्यांनीं स्वत:लाही फारशी लावून घेतली नाहीं आणि आपल्या कुटुंबीयांनाही लागूं दिली नाहीं.

त्यांच्या पत्नीनें तर तीर्थयात्रांचें आणि देवतार्चन करण्याचें धार्मिक वेडसुद्धां कधीं स्वतःला लावून घेतलें नाहीं. सगळें घरांतच आयतें पतीच्या रूपानें चालून आलें आहे, मग उगीच बाहेरची वणवण करण्यांत काय स्वारस्य आहे, असाच विचार त्यांनीं सयुक्तिकपणें केला असला पाहिजे. ' तुझें आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी । ' हा महामंत्र त्यांनीं अक्षरशः पाळला. त्यांनीं पतिदैवताशीं चारी मुक्ति तल्लीनतेनें साधल्या ! पतीच्या गैरहजेरींत, पतीला आवडणारा एकादा जिन्नस पानावर घेण्याचा प्रसंग आला तर तो जिन्नस पानांतच रहावा, कंठ रुद्ध व्हावा, आणि पतीच्या आठवणींत तल्लीन होऊन गेल्यानें भान हरपावें असें कालिदासाच्या मेघदूतांतील यक्षपत्नीप्रमाणें त्यांच्या हातून झालेलें आदर्श एकनिष्ठेचें आचरण स्वतः पांगारकरांनीं वर्णन केलें आहे. आनंदीबाई पतीला पाटावर बसवून, त्याची पूजा करून व त्याच्या पायाचें तीर्थ घेऊन आपल्या व्रताची सांगता करीत. त्यांची ही तन्मयता जशी वाखाणण्यासारखी आहे तशीच ती निर्माण करणाऱ्या पांगारकरांची थोरवीहि प्रशंसनीय आहे. त्यांच्या सत्त्वस्थ मुलानें कधीं आधुनिक नटण्यामुरडण्याचे चाळे केले नाहींत; म्हणून पांगारकर संतुष्टपणा प्रदर्शित करतात. ब्राह्मण घराण्यांतील जुने आचार त्यानें आपल्या हाडींमासीं खिळवून घेतले, म्हणून त्यांना फार आनंदही वाटलेला आहे. कौटुंबिक जीवनांतील तृप्तीचें, संतोषाचें आणि निष्ठेचें हें वातावरण सनातनी धर्मभोळ्या लोकांना केव्हांहि अभिमानास्पद आणि अभिनंदनीयच वाटणारें आहे. सारे प्रपंच असेच झाले असते तर प्रत्येक गांवाचें पंढरपूर झालें असतें आणि साऱ्या समाजाला मोक्षाचा आनंद मिळाला असता !

पांगारकरांच्या मनाला जुन्या काळांतील विषयांचा आणि

विचारांचा एवढा मोठा वेध होता कीं, आजच्या समकालीन काळां-तील अनेक घडामोडींसंबंधानें त्यांनीं सर्वस्वीं उदासीनता बाळ-गली. बुद्धिप्रामाण्याच्या नव्या युगांत त्यांनीं श्रद्धेचें प्रामाण्य जोपासलें आणि त्या प्रामाण्याचे अनेक पुरावे आपल्यासंबंधांत घडत गेल्याचें त्यांनीं मनःपूर्वक मान्य केलें. लहानपणीं त्यांच्या शरीराला आंकडी येण्याचा रोग जडला. हा त्यांचा रोग औषधपाण्यानें बरा झाला नाहीं. आळंदीला त्यांच्या वडिलांनीं त्यांना नेलें आणि देवळां-तील देवासमोर मुलाला ठेवून त्यांनीं अनन्यभावें प्रार्थना केली. तेव्हांपासून त्यांना त्या रोगाचा चुकूनही उपसर्ग झाला नाहीं! 'मुमुक्षु' पत्र चालवीत असतांना त्यांचे दिवस पैशाच्या दृष्टीनें फार हलाखीचे गेले. छापखान्याचें बिल वसूल करण्याकरितां श्री. सापकर हे एकदां येऊन बसले. जवळ पैसे नाहींत अशा स्थितींत पांगारकर आपल्या खोलींत गेले आणि देवाचा त्यांनीं मनोभावें धावा केला. दारावर थाप वाजली. एक दुसरेच गृहस्थ आले. त्यांनीं पांगारकरांचीं पुस्तकें अकस्मात् विकत घेतलीं. किंमतीची रक्कम बरोबर सापकरांच्या बिलाइतकी भरली! पुस्तकें विकत घेणाराचा चेहरा त्यांना पुनः कधीं दिसला नाहीं! ज्या पांडुरंगानें नामदेवापासून सांवतामाळ्यापर्यंत आपल्या अनेक भक्तांना आणि दामाजीपासून चोख्यामेळ्यापर्यंत आपल्या अनेक उपासकांना संकट-काळीं निरनिराळ्या रूपांनीं प्रगट होऊन साहाय्य केलें, त्याच्याशिवाय आपलीं पुस्तकें ऐनवेळीं विकत घेण्यासाठीं दुसरें कोण येणार, असें पांगारकरांना अगदीं प्रामाणिकपणें वाटलें! ते ज्या समाजांत राहिले, त्या समाजासाठींहि देव असाच धांवून आला असता, तर कितीतरी खटपटी वांचल्या असत्या! पण बाकीच्या करंट्यांनीं असली श्रद्धा बाळगली नाहीं, त्याला देव काय

करणार आणि पांगारकरांचा तरी त्याला काय उपाय ?

असल्या श्रद्धेनें आणि विश्वासानें त्यांनीं आपल्या जीवनक्रमाची एकसारखी वाढ केली. गणेशोत्सवासारख्या प्रसंगीं त्यांनीं ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं. त्यावेळींहि तो उत्सव गणेशाचा आहे या धार्मिक कल्पनेची त्यांची जाणीव कधीं बुजली नाहीं. त्यांचे व्याख्यानाचे विषयहि सामान्यत: महाराष्ट्रांतील धर्मविषयक उपासनापंथाविषयींच असत. पांगारकरांनीं कांहीं वर्षें शिक्षकाचा व्यवसाय करून सन १९०६ पासून म्हणजे तिशीपसातिशींत स्वत:ला संशोधनकार्याला वाहून घेतलें. या संशोधनांत त्यांना कागदपत्र व पोथ्या मिळविण्याचे अनेक कष्ट करावे लागले. तरीहि त्यांनीं निवडलेला प्रांत पुष्कळ अंशीं अविवाद्य असा होता. म्हणजे त्यांत राजकीय किंवा सामाजिक जीवनांतील कोणत्याहि तीव्र मतभेदाचें रण माजण्याचा संभव नव्हता. हा प्रांत पांगारकरांनीं निवडण्याची थोडीफार कारणमीमांसाहि करतां येण्यासारखी आहे. विशेषत: ज्या काळांत त्यांनीं हा व्यवसाय पत्करला त्या काळांतील घडामोडी ध्यानांत घेतल्या तर बऱ्याच गोष्टींची उपपत्ति सहज लागते. १८९८ पासून १९१० पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांत कोणतेंहि कार्य करणाऱ्या माणसाला सरकारच्या अवकृपेचा धाक बाळगूनच वावरावें लागे. टिळकांना या काळांत दोनदां राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली. रस्त्यानें जातांना हातांत साधी काठी घेऊन जाणेंहि कधींकधीं अशक्य होत असे. देशी गोष्टीबद्दल कोणतीहि आपुलकी बाळगणें व ती तशी स्पष्ट करून दाखविणें हें प्रत्येकाला तेव्हां धोक्याचें वाटे. हिरण्यकश्यपूच्या कथानकावरील एक नाटक किंचित् राजकीय रूपकाच्या धर्तीवर गेलें आहे, असें कुणीसें म्हटल्यावर गडकऱ्यांनीं सबंध हस्तलिखित जाळून टाकलें ! इतकी त्या काळात सरकारी तोह-

मतीची जरब होती. वस्तुतः पांगारकरांचा ओढा टिळकपक्षाकडे होता. त्या पक्षातर्फे मान्य झालेले कांहीं कार्यक्रम राष्ट्रांतील ठराविक सांस्कृतिक परंपरेला उपकारक होते. पण तसल्या कार्यक्रमां-बद्दलची सहानुभूति व सहकार्य हीं उघड रीतीनें व्यक्त केलीं तर त्यांतून सरकारी रोषाचें चक्रही निर्माण होण्याचा संभव होता.

पांगारकरांनीं ही स्थिति जाणली होती. उदात्त आणि भव्य असें कांहीतरी कार्य करून दाखवून लोकप्रियता मिळावी आणि आपल्या ज्ञानाचें व बुद्धीचें सार्थक करावें ही वांच्छा पांगारकरां-सारख्या तरुणाला त्या काळांत वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. त्यांच्यापुढलीं टिळक–परांजपे–गोखले इत्यादिकांचीं उदाहरणें सर्वस्वीं प्रोत्साहक अशींच होतीं. या लोकांसारखें कांहींतरी कार्य करावें असें पांगारकरांना विद्यार्थिदशेपासूनच वाटत होतें. कारण पदवीपरीक्षा हातीं पडण्यापूर्वी अनेक सार्वजनिक कार्यक्रमांत हौसेनें भाग घेऊन परीक्षेत दुर्लक्ष्यामुळें अपयश आल्याबद्दल त्यांनीं जिनसी-वाले-टिळक-गोखले यांची थोडी नाराजीहि पतकरली होती. पण सभांतून भाषणें करणें व मासिकांतून आणि वृत्तपत्रांतून लेखन करणें या गोष्टी ते हौसेनें करीत. खरी मनांतली इच्छा ही कीं, कमींत कमी दुय्यम पुढारीपणाची प्रतिष्ठा हातीं आली तर लोक-सेवेचें बौद्धिक व वाङ्मयीन कार्य निर्वेधपणें करण्यास सांपडावें. पण एकंदर परिस्थितींत प्रत्यक्ष वर्तमानकालीं कार्यक्रमांत भाग घेऊन हालचाल केली तर सरकारच्या दडपशाहीनें प्रसंगवशात् सारें जीवनच खच्ची होऊन जाण्याची भीति होती ! अशा स्थितींत भूतकाळांतल्या इतिहासविषयक गोष्टींना हात घातला तर त्याबद्दल असली काहीं अडचण नव्हती, हें त्यांनीं हमखास जाणलें. त्यातहि इतिहासांतला त्यांनीं असा भाग निवडला कीं, जो निवळ धार्मिक

अनु. क्र. ३५... नों. दि. १५/८/७८... ९२४०

व वाङ्मयीन स्वरूपाचा असावा. म्हणजे विद्वानांनीं मतभेदाची शाब्दिक झटापट कधीं कधीं केली तरी त्यांतून जीवनाला वेगळें वळण लागून स्वास्थ्य व स्थैर्य हीं टिकून रहाण्याबद्दलची खंती तरी निर्माण होऊं नये ! टिळकांना शिक्षा झाली तेव्हां सारा आरोप मी पत्करतों व शिक्षा भोगतों असें पांगारकरांनीं टिळकांना म्हटलें; पण हें म्हणणें तात्कालिक भक्तीच्या उमाळ्यापुरतेंच होतें असें दिसतें. कारण पांगारकरांचा स्वभाव धकाधकी पत्करण्याइतका कडवा नव्हता हें उघड आहे.

धर्मश्रद्धेचा कार्यभाग निवडण्यांत लोकांची अप्रीति चुकूनहि वांट्यास येण्याचा संभव नव्हता. " महाराष्ट्राची नाडी मीं बरोबर ओळखली आहे." असें पांगारकर म्हणत, तें अगदीं खरें आहे. कारण महाराष्ट्रांतल्या बहुजनसमाजाला पांगारकरांच्या काळांत तरी आध्यात्मिक वाङ्मयाचा आणि धार्मिक उपासनांचा फार मोठा वचक वाटत होता. शिवाय असल्या गोष्टींभोंवतीं गोळा होण्यास लोकांना अवघड असें कांहींच वाटलें नाहीं. ज्या पांडुरंगाचें स्तवन अनेक संतांनीं केलें, त्याच्या नांवावर एक विशिष्ट वर्ग अन्यायीपणा आणि पोटभरूपणा करतो आहे, ही खुद्द पांडुरंगाला न परवडणारी गोष्टहि पांगारकरांना परवडली. ज्या राजेरजवाड्यांनीं आपल्या संस्थानांतून व्यावहारिक जीवनांत वाटेल तो अयोग्य निरकुंशपणा केला, त्यांनीं दांभिक व देखाव्याच्या धर्मबुद्धीनें केलेले आदरसत्कार पांगारकरांनीं मन:पूर्वक मान्य केले. एकाद्या संस्थानी गांवांत राजयोग्याच्या इतमामानें राहात असतांना त्यांना अधूनमधून आठवण झाली ती फक्त आपल्या विरहाकुल भार्येची ! पांडुरंगाच्या राज्यांतील हजारों जीव साध्या प्राथमिक सुखसोयींपासूनहि दूर ढकलले जात होते. त्या दलित जनतेला

संस्थानिकांनीं विसरूं नये म्हणून खणखणीत उपदेश करण्याइतकी उग्र तपोनिष्ठा आणि उद्भट पुण्यप्रकोप त्याना कधीं व्यक्त करावासा वाटला नाहीं ! पांगारकरांच्या आध्यात्मिक ज्ञानानें आणि संतवाङ्मयाच्या प्रसारानें असलें सामर्थ्य गाजविण्याची पांगारकरांना बुद्धि दिली असती तर दलितांच्या परित्राणासाठीं नारासिंहावतार धारण करणाऱ्या पांडुरंगानें त्याबद्दल कधीं राग मानला नसता ! ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदासादि संतांनीं हे समरप्रसंग टाळले नाहींत आणि संतांच्या चिंतनमय सहवासांत अहर्निश राहणाऱ्या पांगारकरांनीं ते आपल्या परिस्थितीनुसार टाळले, एवढाच काय तो किरकोळ फरक आहे.

असल्या मनांतील द्वंद्व उत्पन्न करणाऱ्या समरप्रसंगांची गुंफण पांगारकरांनीं आपल्या आत्मवृत्तांत केली असती तर त्या आत्मवृत्तानें फार मोठी कामगिरी बजावली असती. माणसानें अनुभवलेल्या लौकिक व व्यावहारिक अशा सर्व मामुली गोष्टी काळाच्या उदरांत गडप होतात. मानसिक द्वंद्वाचे समरप्रसंगच काय ते टिकतात. कारण त्या समरप्रसंगांच्या मागें असलेल्या तत्त्वश्रद्धेनें जगाची प्रगति होते. असली समरकार्यधुरंधर तत्त्वश्रद्धा पांगारकरांनीं संपादन केली नाहीं. ती त्यांना संपादन करणें अगदीं सहज शक्य होतें. त्यामुळें त्यांच्या आहे त्या आत्मवृत्तांत पांगारकरांचा स्थूल कार्यविकास रसभरितपणें वर्णिला गेला, तरी त्यांत मनोविकासाची सूक्ष्म पडछाया आढळून येत नाहीं. हें न्यून थोडें महत्त्वाचें आहे म्हणूनच उल्लेखिलें आहे. नाहींतर आज आहे या वाचनीय स्थितींतहि त्यांचें आत्मवृत्त आकर्षक झालें आहे. रसाळ भाषाशैली आणि आत्मतृप्तीचा मनमोकळा आनंद हे त्यांच्या लेखनशैलीचे मुख्य धर्म आहेत. आपण स्वतःला जितके आवडतों तितके प्रत्येक वाच-

वा. क्र. ७९६४



कालीहि निःसंशय आवडूं अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा आहे. या श्रद्धेनें त्यांना निःसंकोचपणा लाभवून दिला. म्हणूनच कोणत्याहि खाजगी किंवा सार्वजनिक प्रसंगाचें वर्णन करतांना त्यांना बालसुलभ निर्व्याज वृत्ति राखतां आली आहे. कीर्तनपुराणें आणि प्रवचनें य द्वारा त्यांनीं अनेक लोकांना रिझाविलें. संतवाङ्मय जेव्हां उपेक्षित होतें, तेव्हां त्याला महत्त्व आणून देण्याइतकी स्पृहणीय कामगिरी त्यांनीं केली. त्यासाठीं मात्र शारीरिक कष्ट, अपमान आणि मनस्ताप यांची त्यांनीं पर्वा केली नाहीं. कार्याचा निदिध्यास त्यांनीं कायम राखला व फार मोठें अमूल्य वाङ्मयसंकलन केलें. लोकांत आयतीच असलेली श्रद्धा त्यांना या कामीं उपयोगी पडली आणि संशोधनाचे कष्ट त्यांना सुसह्य करतां आले. नवीन काळांतल्या कोणत्याच गोष्टींत त्यांनीं मन घातलें नाहीं.

**' न मे कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । '**

अशी वृत्ति त्यांनीं समकालीन सार्वजनिक घडामोडींसंबंधीं राखली.

**' रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग । अन्तर्बाह्य मन आणि जग ॥ '**

असला समरोत्सुक झुंजारपणा त्यांनीं कांहीं काल पतकरला; पण तो दीर्घकाल टिकला नाहीं. तरी त्यांनीं आंखून घेतलेल्या कामगिरींत तल्लीनता संपादन केली. कुणी कांहीं म्हणोत पण या तल्लीनतेनें आपल्याला भरपूर आनंद लाभतो आहे या एका प्रसन्न विचारानें त्यांनीं आपलें आत्मवृत्त लिहिलेलें आहे. " नारायणानें मला कांहीं कमी केलें नाहीं " या कल्पनेची त्यांना एकसारखी प्रामाणिक जाणीव होती, म्हणूनच त्यांनीं रसभारितपणें वर्णन केलेल्या आत्मकथनांत रुचि आणि प्रसाद हीं उत्पन्न झालीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३३... विः ...

REFBK-0007164

श्री पांगारकर स्मारकमंडळ, आगामी प्रकाशनें:—

# (२) श्री पांगारकर स्मारकग्रंथ

भाग २

# श्री पांगारकर-गौरव

( श्री पांगारकरांचे मित्र व चहाते यांचे गौरवपर लेख कविता, स्मृतिलेख, मृत्युलेख वगैरे )

संपादक ग. त्र्यं. बगदे ( कुळकर्णी ), मूल्य ६ रुपये.

# (३) श्री पांगारकर-सूक्तिसुमनें

( पांगारकर वाङ्मयांतील निवडक वचनें )

संग्राहक वि. त्र्यं. कचोळे, मूल्य २ रुपये.

# (४) श्रीसमर्थगौरव

( श्रीसमर्थशिष्यांनीं व पंडितांनीं समर्थांवर उधळलेलीं काव्यमय स्तुतिसुमनें )

संपादक ग. त्र्यं. बगदे ( कुळकर्णी ), मूल्य ४ रुपये

## ( ५ ) श्रीसमर्थांचीं पत्रें

संपादक ग. त्र्यं. बगदे ( कुळकर्णी ), मूल्य ४ आणे

# (६) श्रीसरस्वतीपूजन

( विविध विषयांवरील लेखसंग्रह )

ले. ग. त्र्यं. बगदे ( कुळकर्णी ), मूल्य ३ रुपये